वैद्य य. गो. जोशी (G.F.A.M., H.P.A.) यांनी अनेक जबाबदारीच्या पदांवर कामे केली आहेत.

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे व आयुर्वेद महाविद्यालय हडपसर येथे प्राचार्य, प्राध्यापक व कायचिकित्सा विभागप्रमुख, मानद चिकित्सक-साने गुरुजी रुग्णालय-हडपसर, शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेदीय रुग्णालय, वै. पुरुषोत्तम शास्त्री नानल रुग्णालय, ब्लाईंड रिलीफ असोसिएशन नेत्र रुग्णालय, वसई इत्यादी मान्यवर रुग्णालयांत सेवा केली आहे.


आयुर्वेदाच्या सिद्धांताचा नवीन दृष्टीकोनातून विचार, आयुर्वेद शास्त्राचा प्रत्यक्षात यशस्वीपणे उपयोग करण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास, सूत्ररूप ग्रंथोक्त ज्ञानाचा प्रत्यक्षरूप उपयोग करून आयुर्वेदीय विषय निपुणतेने, सुलभसाध्य पद्धतीने शिकविण्याची हातोटी.

विद्यार्थी तसेच सर्वसामान्य व्यक्तींना आयुर्वेदाची यथायोग्य माहिती देवून त्याबद्दलचे गैरसमज दूर करून आदरभावना निर्माण करण्याचे प्रयत्न.

अनेक व्याख्याने, चर्चासत्रे, चिकित्साशिबिरांचे आयोजन.

विविध रुग्णालयातील कामकाजाप्रमाणेच खाजगी आयुर्वेदीय व्यवसाय.

कायचिकित्सा, आयुर्वेदीय पंचकर्म विज्ञान, शारीरक्रिया विज्ञान, शारीर क्रिया प्रात्याक्षिक, रोगविज्ञान-विकृतीविज्ञान, रोगावस्था, गुटीवटी, चूर्णे, आसव अरिष्ट काढे, भस्म पिष्टी रसायनकल्प, घृततैल अवलेह-मलम, ऋतुचर्या, साधे उपाय सोपे उपाय, माझं सोनुलं, यशवंत चिकित्सा, सद्य:फलदायी व आत्ययिक चिकित्सा, उदरभरण नोहे, चरक संहिता-यशवंत टीका भाग १ व २ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत.



DOWNLOADED FROM
WWW.AYUTECH.NET
AyuTech™
WHATSAPP - 9420697079

DR. JAY V. DAVLA

पुणे विद्यापिठांतरगत बी. ए. एम्. एस्. च्या अभ्यासक्रमातील
'काय-चिकित्सा' या विषयासाठी मान्यत्याप्राप्त संदर्भ ग्रंथ.

# चूर्णे

**प्रा. वैद्य यशवंत गोविंद जोशी**
जी. एफ्. ए. एम्., एच्. पी. ए.
- प्राचार्य आयर्वेद महाविद्यालय, हडपसर
- प्राध्यापक कायचिकित्सा विभाग
आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर
- माजी प्राचार्य, प्राध्यापक, कायचिकित्सा विभाग
टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे
- मानद चिकित्सक
साने गुरूजी रुग्णालय, हडपसर

**पुणे साहित्य वितरण**

CHURNE (MARATHI)
VAIDYA Y. G. JOSHI

**प्रकाशक**
सौ. संपदा श्याम कोपर्डेकर
पुणे साहित्य वितरण
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

© वैद्य य. गो. जोशी

प्रथम आवृत्ती : १९८०
द्वितीय आवृत्ती : १९८५
तृतीय आवृत्ती : १९९६
चौथी आवृत्ती : १५ ऑगस्ट १९९९
पाचवी आवृत्ती : ३० सप्टेंबर २००८
सहावी आवृत्ती : ४ नोव्हेंबर २०१३

**मुद्रणस्थळ**
मधुसूदन घळसासी
एम. आर. ॲण्ड को.
१५५२, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

**मूल्य ४५ रुपये**

## चूर्णाविषयी थोडेसे

आयुर्वेदीय औषधीकल्प अनेक पद्धतीने तयार करून वापरले जातात. माझ्या पहिल्या पुस्तकाद्वारे गुटीवटी म्हणजेच गोळी या स्वरूपात वापरल्या जाणाऱ्या औषधांची माहिती दिली गेली. या गोळ्या बनविताना, वनस्पतिजन्य द्रव्ये वापरताना, त्यांना अनेक खिनिजांची जोड-विशेषत: पारा व गंधकाची जोड-दिलेली असते व त्यामुळे हे कल्प टिकाऊ बनतात हेही आपण पाहिले.

वनस्पतिजन्य औषधे वापरण्याच्या ज्या पद्धती आहेत त्यापैकी या वनस्पतींपासून टिकाऊ स्वरूपाचे कल्प बनविताना केली जाणारी आसवअरिष्ट आणि टिकाऊ काढे यांची माहिती 'आसव, अरिष्ट, काढे' या पुस्तिकेमध्ये दिलेली होती.

आज या पुस्तकाद्वारे चूर्णाची माहिती करून देण्याचा विचार आहे.

चूर्णे तयार करताना ही चूर्णे सामान्यत: वनस्पतीजन्य द्रव्यांपासूनच बनविली जातात. यात खनिज पदार्थ नसतात. सामान्यत: ही वनस्पतीज द्रव्येच असली तरी नवायस चूर्णासारख्या अपवादात्मक प्रसंगी लोहासारख्या खनिजाची जोड दिलेली आढळते. पण हे अपवादाचेच उदाहरण होय.

वनस्पतिज औषधे वापरण्याच्या मुख्यत: तीन पद्धती आहेत. स्वरस, कल्क वा चूर्ण, आणि काढा या त्या तीन पद्धती होत. यापैकी वनस्पतींचा रस काढून वापरणे (स्वरस) ही यातील गुणांचे दृष्टीने विचार करता श्रेष्ठ पद्धती. यामुळे वनस्पतीचे अपेक्षित त्या सर्व गुणकर्मांचा फायदा मिळू शकतो. हे जरी खरे असले, तरी यासाठी वनस्पती ओली व ताजी असणे आवश्यक असते व प्रत्येक वेळी हे कठीणच ठरते. याचसाठी काही अन्य पद्धतींचा वापर करणे आवश्यक ठरते.

वनस्पती जर वाळलेली असेल तर त्या वनस्पतीचे चूर्ण वापरले जाते किंवा त्यापासून काढा करून तो वापरला जातो. याच काढ्यापासून काही प्रसंगी आसव, अरिष्टे बनवून त्यांचाही वापर केला जातो. काढा, आसव अरिष्टे बनविल्याने त्या त्या वनस्पतीमधील गुणकर्म तयार झालेल्या द्रव स्वरूपाच्या औषधीकल्पात उतरत असले तरी सर्वच गुण त्यात येतात असे नव्हे. या वनस्पतीचे गुण सर्वार्थाने मिळावेत याकरिता चूर्णे वापरणेच अधिक सयुक्तिक ठरते.

चूर्णात या प्रकारे सर्व गुण प्रकर्षाने असल्याने चूर्णे वापरणे इष्ट असले तरीही चूर्णे वापरताना काही विशेष गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे वनस्पती 'चूर्णे' या स्वरूपात जास्त दिवस टिकत नाही. वनस्पती चूर्णे या

स्वरूपात सहा महिनेपर्यंत, जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत गुणकारी राहू शकते. त्यानंतर त्यातील गुण कमी होतात, ती निर्वीर्य बनते व म्हणूनच वापरण्यास निरुपयोगी ठरते. एवढेच नव्हे, तर काही वेळा वनस्पतींना कीड लागून ती वनस्पती गुणकारी तर राहोच, पण काही प्रसंगी विषलक्षणे निर्माण करू शकते. याचसाठी चूर्णे वापरताना ती कधी बनविली आहेत ते पाहणे निश्चितच महत्त्वाचे आहे.

चूर्णांचा वापर करताना आणखीही एक गैरसोयीची बाब आहे व ती म्हणजे आवश्यक असणारी अधिक मात्रा. चूर्ण वापरताना योग्य ते परिणाम घडून यावेत यासाठी प्रत्येक वेळी किमान दोन ते तीन ग्रॅम इतक्या प्रमाणात द्यावे लागते. इतक्या मोठ्या डोसमध्ये चूर्ण घेणे रुग्णास काही वेळा कठीण होते. बालकांमध्ये म्हणूनच चूर्णाचा वापर क्वचितच केला जातो.

या प्रकारे चूर्णे वापरताना काही अडचणी येत असल्यातरी वनस्पतींचे औषधी गुण स्वरसाखालोखाल चूर्णामध्येच येत असल्याने त्यांचा वापर करणे बरेच वेळा आवश्यक ठरते.

चूर्णे वापरताना ती चांगली बारीक केलेली आसावीत. सर्वसाधारणपणे वस्त्रगाळ पूड करून मगच ती चूर्णे वापरात आणली जातात.

व्यवहारात अनेक वनस्पतींची चूर्णे वापरली जातात. त्यांपैकी फक्त काहींचाच विचार या पुस्तिकेत मांडला आहे. एकेरी चूर्णे (याष्टिमधु चूर्णाचा अपवाद वगळता) येथे वर्णिलेली नाहीत. अनेक वनस्पतींचे मिश्रणातून तयार होणाऱ्या चूर्णांचा, तसेच जी बाजारात सुलभतेने मिळणे शक्य होते त्यांचाच विचार येथे मांडलेला आहे.

या प्रकारची चूर्णे वापरताना त्यातील घटक वनस्पतींची चूर्णे वस्त्रगाळ करून एकत्रित मिसळतात व तो कल्प वापरण्यास तयार होतो. क्वचित प्रसंगी या वनस्पतिद्रव्यांचे चूर्णास भावना दिली जाते. (उदा. चौसष्टी पिंपळी) भावना म्हणजे विशिष्ट द्रवपदार्थाबरोबर ही चूर्णे चांगली घोटणे. यामुळे त्या द्रवपदार्थांचे संस्कार चूर्णावर होतात व या चूर्णात त्या द्रव्यांचे गुणकर्मही उतरतात. गंधर्व हरीतकी किंवा गोमूत्र हरीतकी ही चूर्णे बनविताना अनुक्रमे एरंड तेल व गोमूत्र यांचेबरोबर चूर्णे भाजून कल्प तयार केला जातो.

या प्रकारे काही अपवाद सोडले तर मात्र ही सर्व केवळ मिश्रणेच आहेत.

चूर्णाविषयी इतक्या सर्वसामान्य विचारानंतर प्रत्येक चूर्णाचा स्वतंत्र पणे विचार करणे इष्ट ठरेल.

❑❑❑

## अनुक्रमणिका


| क्र. | चूर्णाचे नाव | पृष्ठ क्र. | क्र. | चूर्णाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | अविपत्तिकर चूर्ण | १ | २५ | लवंगादि चूर्ण | २३ |
| २ | अमलक्यादि चूर्ण | २ | २६ | विडंगादि चूर्ण | २४ |
| ३ | स्वादिष्ट विरेचन चूर्ण | २ | २७ | दाडिमाष्टक चूर्ण | २५ |
| ४ | सुखसारक चूर्ण | ३ | २८ | ऐलादि चूर्ण | २६ |
| ५ | गंधर्व हरीतकी चूर्ण | ४ | २९ | चोपचिन्यादी चूर्ण | २७ |
| ६ | नारायण चूर्ण | ५ | ३० | चंदनादि चूर्ण | २८ |
| ७ | त्रिफळा चूर्ण | ७ | ३१ | मूत्रल चूर्ण | २९ |
| ८ | गोमूत्र हरीतकी चूर्ण | ८ | ३२ | पंचनिंब चूर्ण | ३० |
| ९ | इसब गोल | ९ | ३३ | निंबगंधक चूर्ण | ३१ |
| १० | द्राक्षादि चूर्ण | १० | ३४ | अतिविषादि चूर्ण | ३२ |
| ११ | सुदर्शन चूर्ण | ११ | ३५ | सितोपलादि चूर्ण | ३३ |
| १२ | जातिफलादि चूर्ण | १२ | ३६ | कर्पूरादि चूर्ण | ३४ |
| १३ | गंगाधर चूर्ण | १३ | ३७ | तालिसादि चूर्ण | ३५ |
| १४ | बृहत्गंगाधर चूर्ण वृद्धगंगाधर चूर्ण | १४ | ३८ | चौसष्टी पिंपळी | ३६ |
| | | | ३९ | शृंग्यादि चूर्ण | ३७ |
| १५ | समशर्कर चूर्ण | १५ | ४० | यष्टिमधु चूर्ण | ३८ |
| १६ | हिंग्वष्टक चूर्ण | १५ | ४१ | कट्फलादि चूर्ण | ३९ |
| १७ | सामुद्रादि चूर्ण | १७ | ४२ | भागोत्तर चूर्ण | ४० |
| १८ | अष्टांग लवण चूर्ण | १७ | ४३ | सारस्वत चूर्ण | ४१ |
| १९ | भास्करलवण चूर्ण | १८ | ४४ | नवायस चूर्ण | ४१ |
| २० | पंचसम चूर्ण | १९ | ४५ | अश्वगंधादि चूर्ण | ४३ |
| २१ | वडवानल चूर्ण | २० | ४६ | शतावरील चूर्ण | ४४ |
| २२ | वैश्वानर चूर्ण | २१ | ४७ | शतावर्यादि चूर्ण | ४५ |
| २३ | चित्रकादि चूर्ण | २१ | ४८ | पुष्यानुग चूर्ण | ४५ |
| २४ | पिपल्यादि चूर्ण | २२ | | अकारानुक्रमे कल्पांची यादी | ४७ |
| | | | | रोगानुरूप चूर्णे | ४८ |


❑❑❑

## १. अविपत्तिकर चूर्ण

**घटकद्रव्ये :** त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), नागरमोथा, वावडिंग, वेलची, तमालपत्र, लवंग, निशोत्तर, साखर.

अविपत्तिकर चूर्णामधील प्रमुख घटकद्रव्य निशोत्तर हे आहे. निशोत्तर मृदुरेचक औषधीद्रव्य असून उत्तम पित्तनाशन करणारे आहे.

अविपत्तिकर चूर्ण हे अम्लपित्तावरील एक प्रमुख औषधीद्रव्य आहे. अम्लपित्तामध्ये पित्त हे द्रव व सर गुणाने वाढलेले असून ते साम म्हणजेच अपाचित, अपक्व असे असते. अम्लपित्तामध्ये अग्निमांद्य हे प्रमुख लक्षण असून त्याबरोबरच छातीत जळजळणे, आंबट ढेकर येणे वा उलटी होणे, उलटीतून पित्त पडून गेल्यानंतर थोडा वेळ आराम वाटणे, डोके दुखणे, हात, पाय व डोळे यांची जळजळ होणे, पोटात दुखणे या प्रकारची अनेक लक्षणे उत्पन्न होतात. ही सर्वच लक्षणे अविपत्तिकर चूर्णाने कमी होतात.

विरेचन किंवा जुलाबाचे औषध घेणे ही पित्तासाठी उपयुक्त असणारी प्रमुख चिकित्सा आहे. निशोत्तर हे मृदुविरेचन करणारे असल्यानेच पित्तशमनासाठी या अविपत्तिकर चूर्णाचा उपयोग होतो.

अम्लपित्ताचे मूळ कारण असलेले अग्निमांद्य दूर करून, प्राकृतावस्था मिळवून देण्यासाठी त्रिकटु, वावडिंग, वेलची, तमालपत्र, लवंग यांसारखी जाठराग्नि वाढविणारी, आमाचे पचन करणारी औषधीद्रव्ये अविपत्तिकर चूर्णामध्ये योजलेली आहेत. यामुळेच सामपित्ताचे पाचन होऊन, अग्निप्राकृत होऊन, सर्वच लक्षणे कमी होत असतात.

मृदुविरेचन करणारे व अग्निमांद्य दूर करणारे औषध असल्यानेच अम्लपित्ताप्रमाणेच उदर (Ascitis), शोथ (Oedema or General Anasarca) यांसारख्या, अग्निमांद्यामुळे उत्पन्न होणाऱ्या विरेचनाची अपेक्षा असणाऱ्या रोगांमध्येही अविपत्तिकर चूर्ण उपयुक्त ठरते.

निशोत्तर किंवा त्यापासून बनविलेल्या अविपत्तिकर चूर्णाचा उपयोग करताना, याने पोटात मुरडा होऊन जुलाब होतो हे लक्षात घेतले पाहिजे. हे औषध गरम पाण्याबरोबर घेतल्याने पोटात धरणारा मुरडा कमी होतो. कारण गरम पाणी हे उत्तम वातानुलोमक आहे. याचसाठी अविपत्तिकर चूर्ण कधीही गार पाण्याबरोबर घेऊ नये.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - १ वेळ, रात्री झोपण्यापूर्वी.

**अनुपान :** गरम पाणी.

❏ ❏ ❏



## २. आमलक्यादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** आवळकाठी, चित्रक, हिरडा, सैंधव, पिंपळी.

आमलकी म्हणजेच आवळा. आवळा ज्यामध्ये प्रमुख घटक आहे ते आमलक्यादि चूर्ण होय. आमलक्यादि चूर्ण हे अम्लपित्तावरील एक चांगले औषध आहे. अम्लपित्तामध्ये घशाशी आंबट येणे, छातीत जळजळणे, मळमळणे, उलटी होणे व पोटात दुखणे यांसारखी लक्षणे आढळतात. रुग्णास उलटी झाल्यावर थोडा वेळ बरे वाटते. अम्लपित्ताची ही सर्व लक्षणे पित्ताचे द्रव आणि सर गुण वाढल्याने उत्पन्न होत असतात. अम्लपित्तामध्ये जाठराग्नि मंद होतो व ही अम्लपित्ताची लक्षणे निर्माण होत असतात.

आमलक्यादि चूर्णामुळे अग्निमांद्य दूर होते व पित्ताचे ठिकाणी असणारी सामताही त्वरेने कमी होते. यामुळेच अम्लपित्तातील सर्व लक्षणे या चूर्णाच्या उपयोगाने निश्चयाने कमी होतात.

अम्लपित्त हा जरी पित्ताचा व्याधी असला तरी या रोगात पित्त वाढलेले असते ते द्रव व सरगुणांनी. या प्रकारे वाढलेले पित्त कमी करण्यासाठी, तसेच अग्निमांद्य दूर करण्यासाठी उष्ण, तीक्ष्ण औषधांची जरुरी असते. यासाठीच या कल्पात चित्रक, सैंधव, पिंपळी या औषधांचा प्रयोग केलेला आहे.

अम्लपित्तामध्ये मृदुविरेचन (Mild Purgative) देणे अपेक्षित असते. आवळकाठी व हिरडा यांमुळे हे मृदुविरचनाचे कार्य घडते.

या प्रकारे अम्लपित्त व तज्जन्य लक्षणे यावरील आमलक्यादि चूर्ण हे एक प्रधान औषध आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❏ ❏ ❏

## ३. स्वादिष्ट विरेचन चूर्ण

**घटकद्रव्ये -** जेष्टमध, बडिशेप, सोनामुखी, गंधक, साखर.

विरेचन म्हणजे ज्यामुळे शौचास पातळ येते असा उपक्रम. अनेक रोगांमध्ये विशेषत: जेव्हा बद्धकोष्ठता असते त्यावेळेस व पित्तप्रधान रोगांमध्येही मृदुविरेचनाची Mild Purgative) जरुरी भासते.

स्वादिष्ट विरेचन चूर्णामध्ये जेष्ठमध, बडिशेप व साखर यंसारखी मधुर रसाची औषधीद्रव्ये आहेत. सोनामुखी हे यातील प्रमुख विरेचक द्रव्यही मधुरच आहे. या प्रकारे गोड औषधांनी युक्त असल्यानेच या चूर्णाला स्वादिष्ट विरेचन चूर्ण असे नाव दिलेले आहे.

विरेचनाच्या दृष्टीने यातील महत्त्वाचे द्रव्य आहे सोनामुखी. बाकीची घटकद्रव्ये विरेचनोपग म्हणजेच सोनामुखीचे विरेचनाचे गुणकर्मात वाढ करणारी आहेत.

या कल्पाचा विशेष उपयोग होतो तो बद्धकोष्ठतेची सवय असणाऱ्या व्यक्तींना. या चूर्णाचा नित्य वापर केला तरी चालते. त्यामुळे अन्य काही बाधक लक्षणे कधीही निर्माण होत नाहीत हे विशेष. अर्श (Piles) म्हणजे मूळव्याध. या रोगातही बरेच वेळा मलावरोध हे लक्षण आढळते. शौचाचे वेळी या मलाच्या बनलेल्या गाठीमुळे असह्य वेदना उत्पन्न होतात आणि रक्तस्रावही होतो. हे सर्व थांबविण्यासाठी द्रवमल-प्रवृत्ती (Loose Motions) येणे आवश्यक असते. हे कार्य स्वादिष्ट विरेचन चूर्णाकडून घडते. परिकर्तिका (Fissure in Ano) या रोगातही याच कारणासाठी स्वादिष्ट विरेचन चूर्णाचा लाभदायक प्रयोग केला जातो.

विरेचनासाठी वापरली जाणारी द्रव्ये गार पाण्याबरोबर कधीही देऊ नयेत. जर दिली तर पोटात मुरडा होतो. याउलट, गरम पाण्याबरोबर दिल्याने वातानुलोमन चांगले होऊन विरेचनही उत्तम होते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - रात्री झोपण्यापूर्वी.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ४. सुखसारक चूर्ण

**घटकद्रव्ये :** सोनामुखी, वावडिंग, सुंठ, हिरडा, ओवा, पादेलोण, आवळकाठी, ? जेष्ठमध.

स्वादिष्ट विरेचन चूर्णाप्रमाणेच मृदुविरेचन करणारा (Mild Purgative) आणखी एक कल्प म्हणजे सुखसारक चूर्ण होय. यामध्येही सोनामुखी हेच महत्त्वाचे घटकद्रव्य आहे. या सोनामुखीचे गुणकर्मात वाढ होते ती वावडिंग, हिरडा व आवळकाठी यांच्या संयोगाने. सोनामुखीमुळे उत्पन्न होणारे मुरडा धरणे हे लक्षण टाळण्यासाठीच यामध्ये सुंठ, ओवा, पादेलोणसारखी वातानुलोमक द्रव्येही घातलेली आहेत. यामुळेच कोणत्याही तऱ्हेचा त्रास न होता सुखपूर्वक विरेचन घडत असल्यानेच



या चूर्णास सुखसारक चूर्ण असे म्हणतात.

स्वादिष्ट विरेचनाप्रमाणेच बद्धकोष्ठता (Constipation), अर्श (Piles), परिकर्तिका (Fissure in Ano) या रोगांमध्ये उपयुक्त असे हे चूर्ण आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - रात्री झोपण्यापूर्वी.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ५. गंधर्व हरीतकी चूर्ण

**घटकद्रव्ये :** हिरडा, एरंड तेल.

प्रथमत: हरीतकी चूर्ण म्हणजेच हिरड्याचे चूर्ण घेऊन ते लोखंडी भांड्यामध्ये एरंडेल तेलात भाजले जाते. याप्रमाणे तयार होणाऱ्या कल्पास गंधर्व हरीतकी चूर्ण असे म्हणतात. गंधर्व हा एरंडासाठी असणारा एक संस्कृत शब्द. एरंड तेलात हरीतकी भाजून बनविला जाणारा कल्प म्हणूनच गंधर्व हरीतकी हे नाव या कल्पास मिळालेले आहे.

हरीतकी हे उत्कृष्ट अनुलोमन करणारे द्रव्य आहे. अग्नि वाढवून मलाचे योग्य तऱ्हेने पाचन करून, ज्या औषधीद्रव्याने शौचास पातळ येते त्या द्रव्यास अनुलोमक अशी शास्त्रीय संज्ञा आहे. हरीतकी उत्तम अनुलोमक आहेच पण हरितकी चूर्ण एरंड तेलात भाजल्याने हरितकीच्या अनुलोमक गुणात अनेक पटीने वाढ होत असते, हेही खरे. कारण एरंड तेल हेही उत्तम विरेचन करणारे द्रव्य म्हणून प्रसिद्ध आहे. म्हणूनच ज्या रुग्णांमध्ये बद्धकोष्ठता हे लक्षण प्राधान्येकरून आढळते अशा सर्व रुग्णांमध्ये गंधर्व हरीतकी उत्तम कार्यकारी ठरते.

अनेक व्यक्तींमध्ये बद्धकोष्ठता हे लक्षण कायमचे असते. बाकी काही तक्रार नाही, पण शौचास मात्र साफ होत नाही, अशी तक्रार करणाऱ्या अनेक व्यक्ती भेटतात. विशेषत: ज्यांची वातप्रकृती आहे अशा रुग्णांत हे लक्षण प्रामुख्याने आढळते. अशा या रुग्णांमध्ये केवल हरीतकी चूर्ण, त्रिफला चूर्ण किंवा विरेचनासाठी उपलब्ध असणारी सुखसारक किंवा स्वादिष्ट विरेचन चूर्णासारखी इतर औषधे वापरण्यापेक्षा गंधर्व हरीतकी वापरणे हे अधिक लाभदायक ठरते. एरंड हे उत्कृष्ट वातशामक असल्यानेच हे घडते.

एरंडाच्या वातशामक गुणामुळेच अनेक प्रकारच्या वातविकारांमध्ये या गंधर्व हरीतकीचा उपयोग केला जातो. पक्षाघात किंवा अर्धांगवात (Hemiplegia) यासारख्या

रोगात विरेचन ही एक प्रमुख चिकित्सा सांगितली जाते. अर्धांगवात हाही एक वातविकार असल्याने या रोगाने पीडित रुग्णांमध्ये गंधर्व हरीतकी हाच कल्प विरेचनासाठी वापरणे इष्ट ठरते.

गंधर्व हरीतकीच्या वापराने पोटात मुरडा (Griping Pains) मात्र होतो. म्हणजेच शौचास पातळ येते खरे, पण मलप्रवृत्ती थोडी थोडी होते व त्या वेळेस पोटात दुखते. गंधर्व हरीतकीमुळे उत्पन्न होणारे या प्रकारचे मुरडा होणे हे लक्षण टाळण्यासाठी हे चूर्ण नेहमी गरम पाण्याबरोबरच घेतले पाहिजे. गार पाण्याबरोबर घेता उपयोगी नाही. गरम पाणी हे उत्तम वातानुलोमक असल्यानेच याचे उपयोगाने मुरडा हे लक्षण निश्चयाने नाहीसे होते.

केवल गंधर्व हरीतकीसाठीच नव्हे, तर सामान्यत: सर्वच विरेचन कल्पांबाबत गरम पाणी हे अनुपान आवश्यक आहे असे म्हणता येईल.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून १ वेळ, रात्री झोपण्यापूर्वी.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ६. नारायण चूर्ण

**घटकद्रव्ये :** चित्रक, त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), हपुषा, वेखंड, ओवा, पिंपळमूळ, बडिशेप, सब्जा, यवानी, कपूरकाचरी, धने, वावडिंग, जिरे, सोनचाफा, पुष्करमूळ, लवणपंचक, कोष्ठ, यवक्षार, सज्जीक्षार, इंद्रवारुणी, निशोत्तर, दंति, शिकेकाई.

नारायण चूर्ण हा विरेचन करणाऱ्या औषधीकल्पांपैकी एक उत्तम कल्प आहे. विरेचन औषध म्हणजेच ज्या औषधाने जुलाब होतात असे औषध. या चूर्णातील इंद्रवारुणी, निशोत्तर, दंति, शिकेकाई ही तीक्ष्ण विरेचन करणारी औषधे असून त्रिफळा, वावडिंग तसेच यवक्षार, सर्ज्जीक्षार ही औषधे विरेचनाचे कार्यास मदत करणारी आहेत.

विरेचन करणाऱ्या औषधीकल्पांपैकी नारायण चूर्ण हा एक कल्प असल्यानेच ज्या ज्या रोगांमध्ये विरेचनाची अपेक्षा असते अशा सर्व रोगात हे चूर्ण उपयोगी पडते. अशा रोगांमध्ये प्रमुख व्याधी उदर हा आहे. उदर किंवा जलोदरामध्ये पोटात पाणी साठू लागते. पोटात साठून राहणारे हे पाणी काढून टाकण्यासाठीच विरेचन-चिकित्सा देणे आवश्यक ठरते. आधुनिक शास्त्रपद्धतीचा वापर करणारे वैद्यवर



यासाठी मूत्रल म्हणजेच मूत्राचे प्रमाण वाढविणारी (Diuretic) औषधे वापरतात. यामुळे संचित झालेल्या पाण्याचे प्रमाण जरी तत्काळ कमी होते असे वाटले तरी पुन:पुन्हा जलनिर्मितीची प्रवृत्ती मात्र थांबत नाही. याउलट, विरेचनाचे (Purgative) आहे. विरेचनाने साठलेले पाणी तर कमी होतेच; पण शिवाय विरेचन हा पित्तावरील उपक्रम असल्याने, या उपक्रमाने पित्ताची संपूर्ण चिकित्सा घडत असल्याने, पाक होणे व द्रव निर्माण होणे ही दूषित पित्ताची कार्ये कमी होतात आणि कायम स्वरूपाचा फायदा होतो.

जलोदरामध्ये विरेचनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या या नारायण चूर्णामध्ये जलोदराचे मूलभूत कारण असणारे अग्निमांद्य दूर करण्याचे व दूरगामी परिणाम घडवून आणण्याचे कार्यासाठी अनेक घटक जोडले आहेत. चित्रक, सुंठ, मिरे, पिंपळी, हपुषा, पिंपळमूळ, बडिशेप, कपूरकाचरी, जिरे, धने यांसारखी औषधीद्रव्ये अग्निदीपन करणारी असून या द्रव्यांच्या संयोगाने नारायण चूर्ण हे जलोदरावरील एक फार उत्तम औषध बनते.

ओवा, जिरे, कुष्ठ, सब्जा, बडिशेप ही औषधी घटकद्रव्ये उत्तम वातानुलोमकही आहेत. उदरातील तणाव दूर करण्याचे कार्य या सुगंधी द्रव्यांमुळे या कल्पाकडून घडत असते.

केवल जलोदरातच नव्हे, तर हृद्रोग (C.C.F.), श्वास (Asthma), कुष्ठ (Skin diseases), गुल्म आणि जीर्णज्वर (Chronic Fevers), आदि रोगांमध्येही हा कल्प उपयुक्त ठरतो. विरेचन कल्प असल्यानेच कोणत्याही कारणाने येणारी सूज (Oedema) कमी करण्यासाठीही अत्यंत उपयुक्त असे हे चूर्ण आहे. अर्धांगवात (Hemiplegia) यासारख्या काही वातविकारांमध्येही विरेचनाची अपेक्षा असते. यामध्येही हा कल्प वापरला जातो.

विष्णुतेजाचे प्रभावाने जसे सर्व दैत्यजन पलायन करतात तसेच या चूर्णाच्या उपयोगाने अनेकविध रोग नष्ट होतात व याचसाठी या चूर्णाला नारायण चूर्ण हे नाव मिळालेले आहे.

**प्रमाण :** १ ते ३ ग्रॅम - रात्री झोपण्यापूर्वी.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ७. त्रिफळा चूर्ण

**घटकद्रव्ये :** हिरडा, बेहडा, आवळकाठी.

चांगल्या तयार झालेल्या, पिकलेल्या हिरडा, बेहडा व आवळकाठी या तीन वनस्पतींची फळे (बीरहित, बी काढून टाकून) घेऊन, त्यांचे चूर्ण करून जो कल्प बनविला जातो तो त्रिफळा चूर्ण होय. त्रिफळा चूर्णामध्ये याप्रकारे हिरडा, बेहडा व आवळकाठी यांचे प्रत्येकी समभाग मिश्रण असते. इतर कोणत्याही फळांचे मिश्रणास त्रिफळा ही संज्ञा न देता केवळ हिरडा, बेहडा व आवळकाठी यांच्या मिश्रणासच ही संज्ञा वापरली जाते. कारण ती एक योगरूढ संज्ञा आहे.

त्रिफळाचूर्ण हे अनुलोमक द्रव्यातील एक महत्त्वाचे औषध आहे. त्रिफळेच्या उपयोगाने बद्धकोष्ठता नाहीशी होऊन शौचास पातळ येते. बद्धकोष्ठतेची सवय असणारे अनेक रुग्ण नित्य, दररोज रात्री त्रिफळा चूर्णाचा वापर करतात व बद्धकोष्ठतेमुळे येणारी बेचैनी, अस्वस्थता, पोटात धरणारा गुबारा आदि त्रासदायक लक्षणांपासून मुक्त होतात. त्रिफळा मृदुविरेचन करणारी असल्याने त्यामुळे फार मोठे जुलाब होतील व त्याचा त्रास होईल असे कधीही होत नाही.

त्रिफळा चूर्ण हे जसे बद्धकोष्ठतेसाठी चांगले औषध तसेच ते अन्य अनेक रोगांवररही यशस्वीरीत्या वापरता येते. दृष्टीदोष हा त्यातील महत्त्वाचा रोग. त्रिफळा हे नेत्र्य म्हणजेच डोळ्याला हितकर, डोळ्याला बल देणारे व त्यामुळेच दृष्टिदोष कमी करणारे औषध म्हणून ओळखले जाते. अनेक व्यक्तींमध्ये नजर कमी होते, लांबचे दिसणे कमी होत जाते. डोळ्यांवर सातत्याने पडणारा ताण वा अन्य कारणांनी हे घडत असते. अशा रुग्णांना त्रिफला चूर्ण सातत्याने देत राहिल्यास चष्म्याचा सतत वाढणारा नंबर स्थिर राखता येतो किंवा जर अगदी थोडा नंबर असेल तर तो घालविताही येतो.

त्रिफळाचूर्ण पाण्यात टाकून, पाणी चांगले उकळून ते पाणी व्रणकर्माचे वेळी जखमा धुण्यासाठी वापरल्यास, दुष्टव्रणही (Septic wounds) लवकर शुद्ध होतात व जखमा लवकर भरून येण्यास मदत होते.

अनेक व्यक्तींमध्ये हिरड्या सुजणे, त्यातून पू वा रक्त येणे अशी लक्षणे आढळतात. अशा रुग्णांमध्ये त्रिफळा चूर्णाने दंतधावन केल्यास (दात घासल्यास) हिरड्यांची सूज कमी होते. त्यातून वाहणारा पू व रक्तस्राव कमी होतो आणि हिरड्या मजबूत बनतात.

**प्रमाण :** बद्धकोष्ठेसाठी २ ते ३ ग्रॅम - रात्री झोपण्यापूर्वी.

**इतर रोगांसाठी :** ५०० मि. ग्रॅ. ते १ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑



## ८. गोमूत्रहरीतकी चूर्ण

**घटकद्रव्ये :** हिरडा, गोमूत्र.

प्रथमत: हरीतकी म्हणजेच हिरड्याचे चूर्ण घेऊन ते लोखंडाच्या भांड्यात चांगले भाजले जाते. त्यानंतर त्यात गोमूत्र घालून गोमूत्राबरोबर चांगले भाजतात. त्यामुळे गोमूत्रातील द्रवांश नाहीसा होऊन बाकी घटक मात्र हरीतकीबरोबर राहतात. असे पुन:पुन्हा १० वेळा केल्यानंतर गोमूत्रहरीतकी हा कल्प तयार होतो.

हरीतकी किंवा हिरडा हे उत्तम अनुलोमक म्हणजेच मलाचे पाचन करून, द्रवमलप्रवृत्ती करणारे-शौचास पातळ करणारे-औषधीद्रव्य आहे. गोमूत्र हेही उत्तम विरेचन करणारे द्रव्य असून गोमूत्राबरोबर हरीतकी चूर्ण भाजल्याने विरेचनाचे कार्यात निश्चितच वाढ होत असते व म्हणूनच गोमूत्रंहरतकी चूर्ण हा उत्तम विरेचन कल्प म्हणून ओळखला जातो.

गोमूत्र हे जसे उत्तम मलविरेचन करणारे आहे तसेच ते मूत्रलही आहे. मूत्रल म्हणजे मूत्राचे प्रमाण वाढविणारे. ज्या रोगात अंगावर सूज येते (Oedema) अशा सर्व रोगात मूत्रप्रवृत्ती वाढून, लघ्वीचे प्रमाणात वाढ होऊन, सूज कमी करण्यासाठी या गोमूत्रहरीतकीचा लाभदायक प्रयोग केला जातो. हृद्रोग (C.C.F.), जलोदर (Ascitis), कफज शोथ (Nephiritis) यासारख्या रोगांमध्ये सूज येणे हे एक प्रमुख लक्षण आढळते. या सर्व रोगांमध्ये इतर औषधांना सहाय्यक म्हणून या कल्पाचा उपयोग केला जातो. या सर्व रोगांमध्ये मूत्रल औषधांचे जोडीला विरेचनाचीही अपेक्षा असतेच. गोमूत्रहरीतकीमुळे मूत्राचे प्रमाण वाढते व मृदुविरेचनही होत असते, हे या कल्पाचे वैशिष्ट्य होय.

गोमूत्र नुसते पिणे हेही वरील प्रकारच्या रोगांमध्ये उपयुक्त ठरते. पण त्याची मात्रा-प्रमाण-अपेक्षित लाभासाठी किमान १०० ते २०० मि. ली. इतकी आवश्यक ठरते. गोमूत्राच्या दुर्गंधीमुळे इतक्या प्रमाणात गोमूत्र पिणे बरेच वेळा अशक्यप्राय ठरते. गोमूत्रहरीतकी तयार करताना १० वेळा गोमूत्रात भाजले गेल्याने गोमूत्रतील आवश्यक ते सर्व घटक भरपूर प्रमाणात या चूर्णात आलेले असतात. गोमूत्र पिण्यापेक्षा गोमूत्रहरीतकी चूर्ण घेणे निश्चित कमी कष्टप्रद असते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ९. इसबगोल - सत् इसबगोल

**घटकद्रव्ये :** इसबगोल.

इसबगोल ही एक वनस्पती असून या इसबोलाचे बीज औषधात वापरले जाते. याच बीजाची टरफले काढून टाकून चूर्ण करून सत् इसबगोल हे सफेद वर्णाचे चूर्ण बनविले जाते. इसबगोल बीज वा सत् इसबगोल या दोन्हींचे गुणधर्म सारखेच असतात.

इसबगोल हे एक असे मजेदार द्रव्य आहे की जे बद्धकोष्ठता व जुलाब होणे या दोन्ही परस्परविरोधी लक्षणांसाठी उपयोगी पडते. मात्र दोन्हींमध्ये वापरण्याच्या पद्धतीत मात्र भेद आहे.

इसबगोलाचा पाण्याशी संपर्क आला असता ते पाणी शोषून घेते व बरेच फुगते. जर इसबगोल चूर्ण याच स्वरूपात पोटात घेतले तर ते महास्रोतसातील, आतड्यातील द्रवांश शोषून घेते. याप्रकारे आतड्यातील द्रवाचे प्रमाण कमी झाल्याने होणारे जुलाब कमी होतात. प्रवाहिका (Dysentry) या रोगामध्ये पातळ जुलाब होत नाहीत, पण आंव किंवा शेम पडते. मळाबरोबर किंवा नुसताच पडणारा हा कफसदृश पदार्थ स्त्यान (चिकट) असल्याने लवकर बाहेर पडत नाही व त्यामुळे फार कुंथल्यानंतर अगदी थोडी थोडी मलप्रवृत्ती वारंवार होत राहते. अशा अवस्थेत सत् इसबगोल वापरल्यास त्याच्या पिच्छिल म्हणजेच बुळबुळीतपणामुळे मोठ्या आतड्यात संचित झालेला कफसदृश पदार्थ सुकरतेने बाहेर पडतो व त्यामुळेच प्रवाहिकेत होणाऱ्या मलप्रवृत्तीचे प्रमाण पुष्कळच कमी होते.

जुलाब होत असताना या प्रकारे इसबगोल वा सत् इसबगोल हे चूर्ण या स्वरूपात सेवन केले जात असले तरी बद्धकोष्ठतेसाठी वापरताना मात्र ते वेगळ्या पद्धतीने घ्यावे लागते. यासाठी इसबगोल एक ग्लासभर पाण्यात भिजत घातले जाते. ३-४ तास असे भिजत ठेवल्यामुळे ते पाणी शोषून घेते व त्यामुळे बरेच फुगते आणि त्याचा एक अत्यंत बुळबुळीत असा गोळा तयार होतो. यातील पाणी काढून टाकल्यानंतर उरलेल्या बुळबुळीत गोळ्यामध्ये थोडी साखर घालून ते चांगले एकत्रित करून नंतर त्यात थोडेसे दूध मिसळले जाते. खिरीसारखे झाल्यानंतर ते पिण्यास वापरतात. यामध्ये प्रथमतः साखरेबरोबर घोटणे महत्त्वाचे. जर साखरेत न घोटता आधीच दूध मिसळले तर एकच गोळा तसाच राहतो व हे मिश्रण घेणे अशक्यप्राय ठरते. या तयार झालेल्या बुळबुळीत पदार्थाचे सेवनाने शौचास साफ होते.



या प्रकारे सेवन करण्याच्या भिन्न पद्धतीमुळे एकच द्रव्य परस्परविरोधी अशा बद्धकोष्ठता व द्रवमलप्रवृत्ती या दोन्हींवरही उपयुक्त ठरते.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅम - दिवसातून १ वेळ.

**अनुपान :** वर सुचविल्याप्रमाणे.

## १०. द्राक्षादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** मनुका, गुळवेल, सुंठ, शृंगी, नागरमोथा, रक्तचंदन, कुटकी, पाठा, काडेचिराईत, धमासा, वाळा, धने, कमळ, रिंगणी, पुष्करमूळ, कडूनिंब.

द्राक्षादि चूर्णातील सर्व औषधे शीतवीर्य (थंड) असून उत्तम पित्तशामक आहेत. मधुर (गोड), तिक्त (कडू) आणि कषाय (तुरट) रसाची औषधे पित्तशामक म्हणून ओळखली जातात. द्राक्षादि चूर्णातील द्राक्ष किंवा मनुका मधुर रसाच्या असल्या तरी बाकी बहुतांश औषधे तिक्त रसाची म्हणजेच कडू आहेत. त्यामुळेच नावात जरी द्राक्ष असले तरी या चूर्णाची चव अत्यंत कडू आहे हे मात्र लक्षात घेतले पाहिजे.

गुळवेल, कुटकी, पाठा, काडेचिराईत, निंब ही औषधे तिक्त रसातील श्रेष्ठ औषधे म्हणून गणली जातात. तिक्त म्हणजेच कडू रसाची द्रव्ये. अग्निदीपन करणारी, भूक वाढविणारी, रुची उत्पन्न करणारी आणि उत्तम ज्वरनाशक असतात. त्यामुळेच ज्वरामध्ये (fever) वापरण्यास योग्य असा हा कल्प आहे.

या चुर्णामध्ये मनुका असून त्या मृदुविरेचन करणाऱ्या, शौचास पातळपणा आणणाऱ्या आहेत. विरेचन (Mild Purgative), विशेषतः मृदुविरेचन हा पित्तावरील एक उत्कृष्ट चिकित्सापक्रम समजला जातो. विरेचनाने पित्ताची दुष्टी दूर होते व पित्तरोग पूर्णांशाने बरा होण्यास साहाय्य होते. ताप येणे हा एक पित्ताचाच व्याधी असून त्यामध्ये विरेचन अपेक्षित असते. पण हे विरेचन सुरुवातीस देणे मात्र इष्ट नसते. सुरुवातीस पित्त साम असते, त्यावेळेस विरेचन निषिद्ध असते. पण कालांतराने पित्त निराम झाल्यानंतर विरेचन देणे युक्त ठरते. या दृष्टिकोनातून विचार करता या कल्पाचा उपयोग जीर्ण ज्वरात (Chronic Fevers) करणे इष्ट ठरते. नवज्वरावर म्हणजेच ताप आल्यानंतर लगेच द्राक्षादि चूर्ण वापरू नये. जीर्णज्वरात येणारी अग्निमांद्य, प्लीहावृद्धी (Enlarged Spleen) आणि ज्वर ही लक्षणे द्राक्षादि चूर्णामुळे निश्चित कमी होतात.

जीर्णज्वराप्रमाणेच विषमज्वरामध्ये (Intermittent Fevers) आणि ज्या ज्वराचे निश्चित निदान करणे कठीण होते. अशा ज्वरप्रकारातही (Pyrexia of Unknown Origin) द्राक्षादि चूर्ण लाभदायक ठरते.

तापामध्ये असणारा खोकला कमी करण्यासाठी या चूर्णातील रिंगणी, पुष्करमूळसारखी द्रव्ये कार्यकारी ठरतात; तर ज्वरात असणारा दाह (सर्वांगाची आग होणे) हे लक्षण रक्तचंदन, कमळ, वाळा, नागरमोथा यांसारख्या शीत गुणांच्या द्रव्यांनी नाहीसे होते.

तापानंतर येणारा थकवा, दौर्बल्य कमी करण्यासाठी दिली जाणारी बलवर्धक औषधे (Tonics) द्राक्षादि चूर्णाचे साहाय्याने मृदुविरेचन देऊन नंतर वापरली तर अधिक उपयुक्त ठरतात असे प्रत्यक्षात आढळते.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ११. सुदर्शन चूर्ण

**घटकद्रव्ये :** त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), हळद, दारुहळद, रिंगणी, कपूरकाचरी, त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), पिंपळमूळ, मूर्वा, गुळवेल, धमासा, कुटकी, पित्तपापडा, नागरमोथा, त्रायमाणा, वालक, कडूनिंब, पुष्करमूळ, जेष्ठमध, कुडा, यवानी, इंद्रयव, भारंगी, शेवग्याचे बी, गोखरू, वेखंड, दालचिनी, कमळ, वाळा, चंदन, अतिविष, बला, शालिपर्णि, पृश्निपर्णि, वावडिंग, तगर, चित्रक, देवदारु, चव्य, तालिसपत्र, पटोलपत्र, जीवक, ऋषभक, लवंग, वंशलोचन, पद्मक, काकोली, जायपत्री, भूनिंब.

अनेकविध घटकद्रव्यांनी बनविलेले हे सुदर्शन चूर्ण आहे. या चूर्णामध्ये अनेक तिक्त (कडू) रसांची औषधे आहेत. गुळवेल, कुटकी, पित्तपापडा, नागरमोथा, कडूनिंब, भूनिंब, पुष्करमूळ, पटोलपत्र, इंद्रयव, कुडा, अतिविष इत्यादी घटकद्रव्ये तिक्त असून ज्वररोग नाहीसा करणारी आहेत. ही तिक्त रसांची औषधे गुणाने थंड प्रकृतीची असल्यानेही ज्वराचे कारण असणाऱ्या पित्ताचे शमनास उपयुक्त ठरतात. या कल्पास धमासा, कमळ, वाळा, चंदन, बला, काकोली यांसारख्या उत्कृष्ट शीतवीर्य द्रव्यांची जोड मिळालेली असल्याने सुदर्शन चूर्णाच्या पित्तहरणाच्या कार्यास मदत होत असते.



सुदर्शन चूर्णाचा उपयोग या प्रकारे सर्व प्रकारच्या तापांसाठी होत असला तरी याचा विशेष उपयोग होतो तो विषमज्वरासाठी. विषमज्वरामध्ये थंडी वाजून ताप येतो. हा ताप लगेचच थोड्या वेळात उतरून काही ठराविक कालानंतर पुन्हा येतो. असा ताप दररोज, एक दिवसाआड वा दर दोन दिवसांनी येत राहतो. अशा प्रकारच्या विषमज्वरांमध्ये सुदर्शनचूर्ण फारच चांगले लागू पडते.

तापामुळे सर्व प्रकारचे शारीरिक तसेच मानसिक दैन्य उत्पन्न झालेले असते. गळून गेल्यासारखे वाटणे, कोणतेही काम करण्यामध्ये उत्साह नसणे, बेचैनी इ. मानसिक दौर्बल्याची लक्षणे कमी करण्यासाठी या चूर्णातील वेखंड, मूर्वा इ. द्रव्ये कार्यकारी ठरतात.

सुदर्शन चूर्णामध्ये असणाऱ्या रिंगणी, कपूरकाचरी, पुष्करमूळ, जेष्ठमध, अतिविष, लवंग, वंशलोचन यांसारख्या श्वसनमार्गावर कार्यकारी व कफनाशक द्रव्यांमुळे तापामध्ये असणारी खोकला, दम लागणे यांसारखी लक्षणे या चूर्णाने त्वरेने कमी होतात.

ज्वरामध्ये, विशेषत: विषमज्वरामध्ये रुग्णाचे बल फार झपाट्याने कमी होते, वजन कमी होते व त्यामुळे रुग्ण कोणतेही शारीरिक काम करण्यास असमर्थ बनतो. या प्रकारे येणारा थकवा दूर करून रुग्णास पुन्हा बल प्राप्त व्हावे यासाठी या चूर्णास बला, जीवक, ऋषभक, काकोली यांसारख्या बल्य औषधांची जोड देण्यात आली आहे.

दानवांचा नाश करण्यासाठी जसे श्रीविष्णूचे सुदर्शनचक्र सदैव कार्यरत असते तसेच सर्व प्रकारच्या ज्वरांवर, म्हणजेच कोणत्याही प्रकारच्या तापावर उपयुक्त असणारे, तापामध्ये येणारे उपद्रव दूर करण्यास सदैव सज्ज असे हे सुदर्शन चूर्ण आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## १२. जातिफलादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** जायफळ, लवंग, वेलदोडा, तमालपत्र, नागकेशर, कापूर, चंदन, लोध्र, वंशलोचन, तगर, आवळकाठी, तालिसपत्र, पिंपळी, हिरडा, जिरे, चित्रक, सुंठ, मिरे, वावडिंग, भांग, साखर.

जातिफलादि चूर्णातील अनेक घटकद्रव्ये असली तरी त्यातील महत्त्वाची कार्यकारी द्रव्ये आहेत जायफळ, कापूर आणि भांग ही. यामध्येही इतर घटकांपेक्षा भांगेचे प्रमाण अधिक असते. जायफळ, कापूर आणि भांग ही तीनही औषधीद्रव्ये उत्कृष्ट स्तंभन करणारी आहेत. याचे उपयोगाने जुलाब लगेच थांबतात.

अतिसार (Diarrhoea), विसूचिका (कॉलरा) किंवा तत्सम रोगांमध्ये अगदी पातळ असे रेच वारंवार होतात. रेच त्वरेने थांबविणे आवश्यक असते. अन्यथा द्रवधातू शरीराबाहेर अधिक प्रमाणात गेल्याने. शरीरातील द्रवांश कमी होऊन, रसक्षय (Dehydration) निर्माण होऊन अनेक उपद्रव उत्पन्न होतात व यामुळे मृत्यूही संभवतो. हे सर्व टाळण्यासाठी जातिफलादि चूर्णाचा उत्तम उपयोग होतो.

या कल्पातील चंदन, सुंठ, लोध्र, तगर, नागकेशर आदि द्रव्ये जातिफलादि चूर्णाच्या वरील गुणकर्मांची वाढ करण्यास उपयुक्त ठरतात.

अतिसारादि प्रकारचे सर्व व्याधी निर्माण होण्यामागे मूळ कारण असते ते अग्निमांद्य हे होय. या प्रकारचे अग्निमांद्य दूर करणेही आवश्यक असते. याचसाठी जायफळ, कापूर, भांग यांसारख्या स्तंभक औषधी घटकांना येथे सुंठ, मिरे, पिंपळी, लवंग, वेलदोडे, जिरे, चित्रक, वावडिंग यांसारख्या उत्तम दीपनपाचन औषधांची जोड दिलेली असते.

यामुळेच जातिफलादि चूर्ण हा या सर्व रोगांवरील तात्पुरता उपाय नव्हे, तर व्याधी पूर्णांशाने बरा करण्यासाठीही हा कल्प अत्यंत उपयुक्त आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** ताक.

❑ ❑ ❑

## १३. गंगाधर चूर्ण

**घटकद्रव्ये :** नागरमोथा, इंद्रयव, बेल, लोध्र, मोचरस, धायटीची फुले, गूळ.

गंगाधर चूर्णातील नागरमोथा, बेल, लोध्र, मोचरस वगैरे औषधे कषायरसाची असून स्तंभक आहेत. त्यामुळे कोणत्याही रोगामध्ये असणारे द्रवमलप्रवृत्ती (Loose motions) हे लक्षण लगेच थांबते. याचमुळे अतिसार (Diarrhoea), प्रवाहिका (Dysentery), ग्रहणी (Chronic Colitis किंवा Sprue) वा तत्सम सर्व विकारांचा उपशम गंगाधर चूर्णामुळे होतो.



बेल, मोचरस यांसारख्या औषधी घटकांमुळे शौचाबरोबर होणारा रक्तस्राव कमी होत असल्यामुळे विशेषत: रक्तप्रवाहिका, रक्तातिसार यामध्ये हे औषध विशेष कार्यकारी ठरते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** ताक, पाणी.

❑ ❑ ❑

## १४. बृहत् गंगाधर चूर्ण - वृद्ध गंगाधर चूर्ण

**घटकद्रव्ये :** नागरमोथा, सुंठ, धायटीची फुले, कुडा, लोध्र, बेल, मोचरस, पाठा, इंद्रयव, आंब्याची कोय, अतिविष, लाजाळू.

बृहत् गंगाधर चूर्णालाच वृद्ध गंगाधर चूर्ण असेही म्हणतात. या दोन्ही नावांनी हे चूर्ण बाजारात विकत मिळते. यामध्ये गंगाधर चूर्णातील सर्व घटकद्रव्ये आहेतच. पण त्याखेरीज सुंठ, पाठा, कुडा, आंब्याची कोय, अतिविष, लाजाळू हे घटक अधिक आहेत. गंगाधर चूर्णापेक्षा यात या प्रकारे अधिक घटकद्रव्ये असल्यानेच यास बृहत् किंवा वृद्ध गंगाधर चूर्ण असे म्हणतात.

सुंठ, कुडा, आंब्याची कोय, अतिविष, लाजाळू ही औषधेही उत्तम स्तंभक असल्याने गंगाधर चूर्णाप्रमाणेच द्रवमलप्रवृत्तीसाठी हा कल्प उपयुक्त ठरतो. अर्थातच गंगाधर चूर्णापेक्षा अधिक कार्यकारी असा हा कल्प आहे हे निश्चित. अतिसार (Diarrhoea), प्रवाहिका (Dysentery), ग्रहणी (Chronic Colitis) रोगांवर म्हणूनच हा कल्प उपयुक्त आहे. सुंठ, इंद्रयव, पाठा, अतिविष ही औषधीद्रव्ये उत्तम अग्निदीपन करणारी असल्याने अतिसारादि रोगात असणारे अग्निमांद्य दूर होऊन व्याधीचा समूळ उच्छेद होण्यासाठी गंगाधार चूर्णापेक्षा बृहत् गंगाधर चूर्णाची उपयुक्तता अधिक आहे.

लाजाळू, मोचरस, कुडा, बेल आदि औषधे रक्तस्तंभकही आहेत. त्यामुळेच मलावाटे जाणारे रक्त त्वरेने थांबावे यासाठीही या चूर्णाचा उपयोग केला जातो.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** मध, ताक, तंडुलोदक.

❑ ❑ ❑

## १५. समशर्कर चूर्ण

**घटकद्रव्ये :** सुंठ, पिंपळी, मिरे, नागकेशर, दालचिनी, वेलदोडा, साखर.

या चूर्णामध्ये अनेक औषधे असली तरी त्यातील वजनाने निम्मी साखर असते व उरलेल्या अर्ध्या भागात इतर सर्व औषधी घटक समाविष्ट असतात. त्यामुळेच या कल्पाला समशर्कर चूर्ण असे नाव मिळालेले आहे.

समशर्कर चूर्णात नागकेशर हे प्रमुख घटकद्रव्य आहे. नागकेशर उत्तम अग्निवर्धन करणारे औषध आहे. अग्निमांद्यामुळे उत्पन्न होणारे महत्त्वाचे व्याधी म्हणजे अतिसार, प्रवाहिका, ग्रहणी व अर्श हे होत. यांपैकी रक्तार्शामध्ये (Bleeding Piles) अग्निवर्धनाबरोबरच रक्तस्तंभनाचीही आवश्यकता असते. म्हणूनच नागकेशराचे कल्प हे रक्तार्शासाठीही प्रामुख्याने वापरले जातात. समशर्कर चूर्ण हे नागकेशराच्या कल्पातील एक उत्कृष्ट कल्प असल्याने रक्तार्शावरील उत्कृष्ट कल्प म्हणूनच तो ओळखला जातो.

या चूर्णात नागकेशराबरोबर असणारी सुंठ, मिरे, पिंपळी, दालचिनी, वेलदोडा ही सर्वच औषधीद्रव्ये नागकेशराचे दीपन, पाचन गुणात अनेक पटीने वाढ करण्यास कारणीभूत ठरतात. या द्रव्यांच्या दीपन, पाचन गुणांनी लाभ व्हावा, पण त्यांच्या तीक्ष्णतेचा शरीरावर कोणताही दुष्परिणाम मात्र होऊ नये, यासाठीच यामध्ये साखरेचाही वापर केलेला असतो.

आयुर्वेदीय सिद्धांतानुसार तमकश्वास किंवा दमा (Bronchial Asthma) हा आमाशयोद्भव रोग आहे व त्यासाठी महास्रोतसावर कार्यकारी दीपन, पाचन औषधे वापरल्यास दम्याचे रुग्णास वारंवार येणारे दम्याचे वेगावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. यासाठी समशर्कर चूर्ण हे एक उत्तम औषध आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** लोणी, साखर.

❑❑❑

## १६. हिंग्वाष्टक चूर्ण

**घटकद्रव्ये :** त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), ओवा, सैंधव, जिरे, शहाजिरे, हिंग.

हिंग्वाष्टक चूर्णामध्ये हिंग आणि इतर सात द्रव्ये अशी एकूण आठ औषधीद्रव्ये



आहेत. यावरूनच या कल्पाला हिंग्वाष्टक चूर्ण असे नाव मिळालेले आहे.

हिंग्वाष्टक चूर्णामध्ये हिंग हा महत्त्वाचा घटक. एका विशिष्ट प्रकारच्या झाडापासून मिळालेला निर्यास (डिंक) म्हणजे हिंग होय. हिंग हा अग्निप्रदीपन करणारा आहे. दररोजच्या स्वयंपाकामध्ये हिंग वापरला जातो तो केवल त्याच्या उत्तम वासासाठी किंवा पदार्थ खमंग व्हावेत यासाठीच नव्हे, तर त्याचबरोबर हिंग हा उत्कृष्ट अग्निवर्धक आहे म्हणून. हिंगाप्रमाणेच यामध्ये असणारी सुंठ, मिरे, पिंपळी, ओवा, जिरे यांसारखी औषधीद्रव्येही आहारात त्यांचे ठिकाणी असणाऱ्या याच प्रकारच्या गुणांमुळे वापरली जातात. हिंग्वाष्टक चूर्णाचे उपयोगाने भूक वाढते, रुची प्राप्त होते व खाल्लेल्या अन्नाचे पचनही चांगले होते.

भूक न लागणे, तोंडाची चव जाणे, तोंड कडवट असणे, पोटात दुखणे, गुडगुडणे, पोटात गुबारा धरणे, तोंडाला पाणी सुटणे, मळमळणे वा उलटी होणे, शौचास साफ न होणे किंवा दुर्गंधीयुक्त जुलाब होणे ही सर्व अजीर्णाची, अग्निमांद्याची लक्षणे आहेत. ही सर्व लक्षणे हिंग्वाष्टक चूर्णाने कमी होतात.

या कल्पातील हिंग, ओवा, मिरे, जिरे वगैरे औषधीद्रव्ये सुगंधी आहेत. सर्वच सुगंधी द्रव्यांमध्ये उडनशील तैल (Volatile oil) असते. या उडनशील तैलाने युक्त सर्व सुगंधी द्रव्ये ही उत्तम वातानुलोमक म्हणजेच वायूची गती प्राकृत करणारी असतात. हिंग्वाष्टक चूर्णामधील ही सुगंधी द्रव्ये वरीलप्रमाणे वातानुलोमनाचे कार्य करीत असल्यानेच पोटातील गुबारा (आध्मान, गॅस धरणे) कमी करण्यास निश्चितच उपयुक्त ठरतात. वातानुलोमन झाल्यानेच उदरशूल (पोटात दुखणे) हे लक्षणही त्वरेने कमी होते.

अग्निमांद्य हे अनेक व्याधींचे मूळ कारण म्हणून सांगितले जाते. हिंग्वाष्टक चूर्ण हे अग्निमांद्य दूर करणारे असल्यानेच अग्निमांद्यामुळे उत्पन्न होणाऱ्या अन्य अनेक रोगांवरही याचा उपयोग होतो. अर्श किंवा मूळव्याध (Piles), ग्रहणी (Chronic Colitis), दमा किंवा तमकश्वास (Bronchial Asthma) यांसारख्या रोगांमध्ये म्हणूनच स्वतंत्रपणे कार्यकारी नसले तरी त्या त्या रोगांवर कार्यकारी इतर औषधींचे बरोबर वापरणे सहाय्यभूत ठरते.

गरम पाणी हेही उत्तम वातानुलोमक असल्याने हिंग्वाष्टकाचे वातानुलोमनाचे कार्य सुकर व्हावे यासाठी अनुपानाकरिता गरम पाणी वापरले जाते.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅम - दिवसातून दोन वेळा जेवणानंतर.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## १७. सामुद्रादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** मीठ, सैंधव, यवक्षार, सज्जीक्षार, सौवर्चल, सुंठ, मिरे, पिंपळी, चित्रक, वावडिंग, हिंग.

समुद्रात मिळणारे मीठ म्हणजेच लवण, ते सामुद्रलवण. या सामुद्रलवण किंवा मिठाबरोबर इतर अनेक क्षार व इतर दीपनपाचन घटकांनी युक्त असे हे सामुद्रादि चूर्ण बनविलेले असते.

सर्व प्रकारचे क्षार अग्निवर्धन करणारे असतात. यामुळेच अनेक क्षारयुक्त असा हा कल्प अग्निमांद्यावरील एक महत्त्वाचा औषधीकल्प म्हणून ओळखला जातो. यात असणारे मीठ व अनेक क्षार यामुळे सर्व प्रकारचे पाचक-स्राव वाढीस लागतात व त्यामुळे अग्निमांद्य, अजीर्ण व तज्जन्य आध्मान म्हणजेच पोटात गुबारा धरणे हे लक्षण सामुद्रादि चूर्णाच्या उपयोगाने त्वरेने कमी होते. मिठामुळे तोंडाला रुचीही प्राप्त होते.

सुंठ, मिरे, पिंपळी, चत्रक, हिंग, वावडिंग ही औषधीद्रव्येही दीपनपाचनासाठी उत्कृष्ट आहेत. क्षार व दीपनपाचन औषधे एकत्रित झाल्याने भूक वाढविणारा, खाल्लेल्या अन्नाचे पचनास मदत करणारा हा एक उत्तम कल्प आहे.

अग्निमांद्य दूर करण्याबरोबरच वातशमनाचे कार्यही या कल्पाने होत असल्याने बद्धकोष्ठतेची असणारी सवय घालविण्यासाठी अनेक दिवसपर्यंत हा कल्प घेणे युक्त ठरते. अजीर्णामुळे उत्पन्न होणारा उदरशूल (पोटात दुखणे) या चूर्णाचे उपयोगाने चटकन कमी होतो.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❏❏❏

## १८. अष्टांगलवण चूर्ण

**घटकद्रव्ये :** सौवर्चल, जिरे, आमसूल, दालचिनी, वेलदोडे, मिरे, साखर.

सौवर्चल हे एक काळ्या रंगाचे, विशिष्ट गंधयुक्त असे खनिज मीठ आहे. मिठालाच संस्कृत शब्द आहे लवण. हे सौवर्चल नावाचे लवण व इतर सा‍‌त औषधांनी युक्त (एकूण ८ औषधे) असे अष्टांगलवण चूर्ण तयार होते.

अष्टांगलवण चूर्ण हा अजीर्ण वा अग्निमांद्यावरील एक उत्तम कल्प म्हणू



ओळखला जातो. खाल्लेल्या अन्नाचे पचनासाठी अग्नि प्रदीप्त असणे आवश्यक असते. जर हा अग्नि बिघडला, मंद झाला तर या अग्निमांद्यामुळे अनेक प्रकारची लक्षणे उत्पन्न होतात. अरुची (तोंड बेचव होणे), हृल्लास (मळमळणे), तोंडाला पाणी सुटणे, पोटात दुखणे, शौचास साफ न होणे वा दुर्गंधीयुक्त मलप्रवृत्ती होणे, पोटात गुडगुडणे वगैरे अनेक लक्षणे ही अग्निमांद्याचीच लक्षणे होत. ही सर्वच लक्षणे अष्टांगलवण चूर्णाने त्वरेने कमी होतात.

सौवर्चलामुळे पाचक स्राव वाढतात व तोंडाला चांगली चवही येते. जिरे, दालचिनी, मिरे, वेलदोडे ही सर्व घटकद्रव्ये उत्तम दीपन असून यांचे उपयोगाने पाचक स्रावही वाढतात. याचबरोबर ही द्रव्ये सुगंधी असल्याने, व सर्वच सुगंधी द्रव्ये वातानुलोमनाचे कार्य करीत असल्याने, पोटात दुखणे, गुडगुडणे आदि लक्षणे कमी करण्यास त्यांचा चांगला उपयोग होतो.

तोंडाला रुची प्राप्त करून देणे, पाचक स्राव वाढविणे व पर्यायाने अग्निमांद्य दूर करणे यासाठी अम्लरसाची (आंबट) द्रव्ये फारच उपयुक्त ठरतात. आमसूल व अम्लवेतस ही खरोखरच अम्लद्रव्यातील श्रेष्ठ औषधे आहेत. या औषधांचा अष्टांगलवण चूर्णामध्ये समावेश असल्याने हे चूर्ण अग्निमांद्य, अजीर्णावरील प्रमुख औषधांपैकी एक महत्त्वाचे औषध ठरते.

अम्लवेतस हे या प्रकारे अग्निवर्धनासाठी उत्कृष्ट असले तरी त्याच्या तीक्ष्णतेमुळे त्याचे शरीरावर काही दुष्परिणाम होण्याची शक्यता असते, हा दोष काढून टाकण्यासाठी, तीक्ष्णत्व कमी करण्यासाठीच या कल्पामध्ये इतर औषधांना साखरेची जोड दिलेली आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून २ वेळा. जेवणानंतर.

**अनुपान :** पाणी.

❏❏❏

## १९. भास्करलवण चूर्ण

**घटकद्रव्ये :** मीठ, सौवर्चल, बिडलोण, सैंधव, पिंपळी, पिंपळमूळ, काळे जिरे, तमालपत्र, नागकेशर, तालिसपत्र, अम्लवेतस, मिरे, जिरे, सुंठ, डाळिंब, दालचिनी, वेलदोडा.

जाठराग्नि प्रदीप्त करून अग्निमांद्य, अजीर्ण दूर करणारा हा आणखी एक कल्प. यातील सर्वच औषधे तीक्ष्ण, उष्ण आहेत. विशेषत: पिंपळी, पिंपळमूळ,

जिरें, मिरे, तमालपत्र, तालिसपत्र, सुंठ, दालचिनी इत्यादी द्रव्ये ही याप्रकारची उष्ण, तीक्ष्ण असून अग्निमांद्य दूर करणारी व पर्यायाने अग्निमांद्याने उत्पन्न होणारी अनेकविध लक्षणे नाहीशी करणारी आहेत. मीठ व मिठाचे सर्वच प्रकार हे उत्तम प्रकारे पाचक रसांचे स्राव वाढविणारे असतात व म्हणूनच त्यांची योजना या प्रकारच्या कल्पात केलेली असते. पाचक स्रावांचे प्रमाण वाढावे यासाठी अम्लरसाची (आंबट) औषधीद्रव्येही कार्यकारी होत असल्याने या कल्पास डाळिंब, अम्लवेतस यासारख्या अम्लरसाच्या औषधींचीही जोड दिलेली आहे.

या प्रकारे तयार केलेल भास्करलवण चूर्ण हे औषध अग्निमांद्यावरील एक फार चांगले औषध आहे. या चूर्णाचा विशेष उपयोग होतो तो प्लीहादोष असताना. गुल्म (पोटात वाढणारी गाठ) या रोगावरीलही हे एक प्रभावी औषध समजले जाते.

भास्करलवण चूर्ण हे अग्निमांद्यजनित उदरशूल (Abdominal pain) यावरील एक महत्त्वाचे औषध आहे. सर्व प्रकारचे वातकफज शूलासाठी हा कल्प उपयोगी पडतो. सुंठ, दालचिनी, तमालपत्र, जिरे यांसारख्या सुगंधी द्रव्यांमुळे वातानुलोमन उत्तम प्रकारे होऊन उदरवेदना कमी होण्यास मदत होते.

भास्करलवण चूर्णातील सर्वच औषधे उष्ण, तीक्ष्ण असल्याने जेव्हा पित्ताचा अनुबंध असतो त्यावेळी म्हणजेच जेव्हा उदरवेदनेबरोबर दाहादि लक्षणे (Burning Sensation) असतील त्यावेळी मात्र भास्करलवण चूर्ण घेणे टाळले पाहिजे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून २ वेळा. जेवणानंतर.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## २०. पंचसम चूर्ण

**घटकद्रव्ये :** सुंठ, हिरडा, पिंपळी, निशोत्तर, सौवर्चल.

पाच औषधी घटकद्रव्ये व तीही सर्व सम म्हणजेच सारख्या प्रमाणात घेऊन तयार केलेले चूर्ण ते पंचसम चूर्ण होय.

या कल्पातील सुंठ, पिंपळी ही उत्तम दीपन औषधे आहेत, तर हिरडा व निशोत्तर ही मृदुविरेचन करणारी म्हणजेच शौचास पातळ करणारी घटकद्रव्ये आहेत. सौवर्चल हा एक मिठाचा प्रकार असून त्यामुळे पाचक स्राव वाढत असतात.

ज्या रुग्णांमध्ये भूक नीट लागत नाही. खाल्लेल्या अन्नाचे सम्यक पचन होत नाही, पोटात गुबारा धरतो व या सर्व लक्षणांचे जोडीला बद्धकोष्ठताही असते अशा



रुग्णांमध्ये पंचसम चूर्ण वापरणे इष्ट ठरते. या चूर्णाच्या उपयोगाने शौचास साफ होते, पोटातील जडपणा कमी होतो,

बद्धकोष्ठतेमुळे येणारे उदरशूल (पोटात दुखणे) हे लक्षणही पंचसम चूर्णाने त्वरीत कमी होते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## २१. वडवानल चूर्ण

**घटकद्रव्ये :** सैंधव, पिंपळी, पिंपळमूळ, चतुर्जात (तमालपत्र, वेलची, नागकेशर, दालचिनी), चित्रक, सुंठ, हिरडा.

वडवानल म्हणजे वणवा. सर्व काही भस्मसात करणारा जसा वडवानल तसाच ज्यामुळे जाठराग्नि प्रदीप्त होऊन खाल्लेल्या सर्व अन्नाचे पचन केले जाते असा कल्प म्हणजे वडवानल चूर्ण होय. वडवानल चूर्ण हा अग्निवर्धन करणाऱ्या कल्पांपैकी एक श्रेष्ठ कल्प आहे हेच नावावरून स्पष्ट होते.

वडवानल चूर्णामध्ये असणारी पिंपळी, पिंपळमूळ, चित्रक, सुंठ ही द्रव्ये तीक्ष्ण, उष्ण गुणाची व त्यामुळेच अग्नि वाढविणारी आहेत. चतुर्जात म्हणजेच तमालपत्र, वेलची, नागकेशर, दालचिनी हे औषधी घटकही अग्निदीपनाचे कार्यास मदत करीत असतात. याचसाठी तर नेहमीच्या आहारातही ही सर्व द्रव्ये मसाल्याचे पदार्थ म्हणून वापरली जातात. रुची वाढविण्याचे कार्याबरोबर ही द्रव्ये पचनाचे कार्यही करीत असतात. वडवानल चूर्णात असणाऱ्या सैंधवामुळे सर्व प्रकारचे पाचक स्राव अधिक प्रमाणात स्रवतात.

या सर्व गुणधर्मांमुळेच वडवानल चूर्णाचा उपयोग अग्निमांद्य व अजीर्णासारख्या रोगात केला जातो. या चूर्णाच्या उपयोगाने भूक चांगली लागू लागते, तोंडाला चव चांगली येते व खाल्लेल्या अन्नाचे सम्यक् पचन होते. यामुळे मळमळणे, उलटी होणे, पोटात गुडगुडणे, पोट फुगणे, पोट दुखणे ही सर्व लक्षणे त्वरेने कमी होतात.

अग्निमांद्य दूर करणारा कल्प असल्यानेच अग्निमांद्यामुळे उत्पन्न होणारे उपद्रवात्मक रोगही या वडवानल चूर्णाचे उपयोगाने कमी होत असतात. अर्श, अतिसार, ग्रहणी हे यातील महत्त्वाचे रोग. अम्लपित्तावरही अग्निवर्धन करणारी

चिकित्सा अपेक्षित असते. यासाठीही वडवानल चूर्णाचा यशस्वी वापर करता येतो.

वडवानल चूर्णातील सर्वच औषधे उष्ण, तीक्ष्ण असल्याने या चूर्णाचा उपयोग रिकाम्या पोटी न करता जेवल्यानंतर करणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून २ वेळा. जेवणानंतर.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## २२. वैश्वानर चूर्ण

**घटकद्रव्ये :** सैंधव, ओवा, कीटमारी ओवा, पिंपळी, सुंठ, हिरडा.

वडवानल चूर्णाप्रमाणेच अग्निदीपन करणारा हा आणखी एक कल्प आहे. वैश्वानर म्हणजे जाठराग्नि, वैश्वानर किंवा जाठराग्नि प्रदीप्त करण्याचे कार्य करणारा कल्प म्हणजेच वैश्वानर चूर्ण हा कल्प होय.

वैश्वानर चूर्णातील घटकद्रव्यांप्रमाणेच यातील घटकद्रव्येही उष्ण, तीक्ष्ण व उत्कृष्ट दीपन, पाचन अशीच आहेत. परंतु यामध्ये चित्रकासारखी द्रव्ये नसल्याने वडवानल चूर्णाच्या तुलनेने या कल्पामध्ये तीक्ष्णता कमी प्रमाणात आहे असे म्हणता येईल.

या कल्पामध्ये ओवा हाही एक घटक आहे. ओवा उत्कृष्ट वातानुलोमक आहे व म्हणूनच पोटात धरणारा गुबारा कमी करण्यासाठी तसेच उदरशूल (पोटात दुखणे) हे लक्षणही कमी करण्यासाठी ओवा हे उत्कृष्ट द्रव्य समजले जाते. कीटमारी यवानीमुळे पोटात होणारी जंतांची प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी वैश्वानर चूर्ण लाभदायक ठरते.

वडवानल चूर्णाप्रमाणेच अग्निमांद्य, अजीर्ण, तज्जन्य लक्षणे आणि उपद्रव कमी करणारा हा एक कल्प आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून २ वेळा. जेवणानंतर.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## २३. चित्रकादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** चित्रक, सुंठ, हिंग, पिंपळी, पिंपळमूळ, ओवा, मिरे, सज्जीक्षार, यवक्षार, मीठ, सोवर्चल, बिडलोण, रोमेलवण.



**भावना :** महाळुंग रस, डाळिंबाचा रस.

प्रथम चित्रक, सुंठ वगैरे वनस्पतिद्रव्ये, सज्जीक्षार यवक्षारासारखे क्षार व वेगवेगळ्या प्रकारचे मीठ हे सर्व बारीक करून ती द्रव्ये महाळुंगाचा रस व डाळिंबाचा रस यामध्ये खलून हे मिश्रण उन्हात वाळविल्यानंतर चित्रकादि चूर्ण तयार होते.

जाठराग्नि वाढविणारी जी अनेक चूर्णे आहेत, त्यापैकीच चित्रकादि चूर्ण हे आणखी एक चूर्ण. यातील चित्रक, सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, मिरे ही वनस्पतीद्रव्ये उष्ण, तीक्ष्ण असून अग्निदीपन करणारी आहेत. क्षार तर स्वभावतःच तीक्ष्ण असतात. यांचेमुळे पाचक स्राव चांगल्या तऱ्हेने निर्माण होतात. लवण म्हणजेच मीठ. मीठ व मिठाचे प्रकार हे पाचक रसांचे स्रवण चांगले व्हावे याकरिता उपयुक्त ठरतात.

अशा प्रकारच्या उष्ण, तीक्ष्ण, दीपन, पाचन द्रव्यांना महाळुंग व डाळिंबाच्या रसांच्या भावना दिल्याने त्यांचे गुणकर्मामध्ये अनेक पटीने वाढ होते. महाळुंग व डाळिंब ही दोन्ही अम्लरसांची (आंबट) द्रव्ये. अम्लरस हा अग्निदीपन करणारा, भूक वाढविणारा, स्राव वाढविणारा रस. या अम्लरसामुळेच चित्रकादि चूर्ण निश्चितच अधिक कार्यकारी बनते.

हिंग, ओवा ही वातानुलोमक द्रव्ये या चूर्णात असल्याने पोटात धरणारा गुबारा कमी करण्यासाठी, पोटातील वेदना नाहीशा करण्यासाठी हा कल्प उपयोगी पडतो.

भूक मंदावणे, तोंडाला चव नसणे, पोटात दुखणे, पचन योग्य न झाल्याने छातीत जळजळणे, घशाशी आंबट येणे इ. लक्षणे कमी करण्यासाठी चित्रकादि चूर्णाचा लाभदायक प्रयोग केला जातो.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## २४. पिप्पल्यादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** पिंपळी, डोरली, रिंगणी, यवक्षार, चित्रक, कुटकी, सारिवा, पाठा, कपूरकाचरी, लवण पंचक.

अग्निमांद्य व अजीर्ण या रोगांवर उपयुक्त असणारा हा आणखी एक उत्तम

कल्प आहे.

पिप्पल्यादि चूर्ण हे उत्कृष्ट दीपन, पाचन, श्वसनमार्गावर तसेच पचनसंस्थेवर कार्यकारी असे औषध आहे. पिंपळी, यवक्षार, चित्रक ही सर्व उष्ण, तीक्ष्ण औषधे असून जाठराग्नि प्रदीप्त करणारी द्रव्ये आहेत. कुटकीमुळे यकृतातील पित्तनिर्मितीचे कार्य वाढते. तसेच पित्ताचे आंत्राकडे वहन चांगल्या तऱ्हेने होते व त्यमुळेच पचनही सुधारते. यवक्षार व निरनिराळ्या तऱ्हेचे मिठांचे प्रकार (समुद्र मीठ व इतर खनिज मिठांचे प्रकार) यामुळे सर्वच पाचक स्राव अधिक प्रमाणात स्रवू लागतात.

वरील गुणकर्मामुळेच पिप्पल्यादि चूर्ण हे उत्तम अग्निवर्धक ठरते. व त्यामुळेच अग्निमांद्यजनित अनेक लक्षणे कमी करण्यास उपयुक्त ठरते. हे चूर्ण उत्तम वातानुलोमक असल्याने या चूर्णाचा विशेष उपयोग होतो तो उदरशूल (पोटात दुखणे), पोट जड वाटणे, गुडगुडणे इत्यादी लक्षणांसाठी. ग्रहणी (Chronic Colitis किंवा sprue) या रोगामध्येही पिप्पल्यादि चूर्णाचा विशेष उपयोग आढळून येतो.

दमा (तमकश्वास Asthma) हा एक श्वसनमार्गाचा रोग असला तरी आयुर्वेदीय मतानुसार हा रोग आमाशयोद्भव आहे. म्हणजेच या रोगाचे मूळ कारण पचनसंस्थेतील बिघाड हेच आहे. पचनसंस्थेवर कार्यकारी असणाऱ्या पिप्पल्यादी चूर्णाचा उपयोग म्हणूनच तमकश्वासावरही चांगला होतो. या चूर्णात असणारी पिंपळी, रिंगणी, डोरली, कपूरकाचरी ही द्रव्ये उत्तम कफदोषहर असून फुफ्फुसावरही कार्यकारी होतात. या घटकांच्या संयोगाने पिप्पल्यादि चूर्ण हे दमा (Asthma), बरेच दिवसापासून असणारा खोकला (Chronic Bronchitis) यावरील अत्यंत लाभदायक औषध ठरते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, गरम पाणी.

❑❑❑

## २५. लवंगादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** लवंग, कापूर, वेलदोडा, दालचिनी, नागकेशर, जायफळ, वाळा, सुंठ, खुरासनी ओवा, अगरु, वंशलोचन, जटामांसी, कमलबीज, पिंपळी, चंदन, तगर, वालक, कंकोळ.

लवंगादि चूर्ण हे अरोचक दूर करणारे एक महत्त्वाचे औषध. अरोचक म्हणजे तोंडाला चव नसणे, तोंड बेचव होणे. मुख्यत: जाठराग्निमांद्यामुळे उत्पन्न होणारे हे



लक्षण आहे. लवंगादि चूर्णातील सर्वच औषधे उत्तम अग्निदीपन करणारी, भूक वाढविणारी व परिणामत: रुची प्राप्त करून देणारी आहेत.

यातील बहुसंख्य म्हणजे लवंग, कापूर, वेलदोडा, दालचिनी, नागकेशर, जायफळ, वाळा, सुंठ, अगरू, जटामांसी, चंदन, तगर, कंकोळ ही औषधे सुगंधी आहेत. या द्रव्यांचे उपयोगाने तोंडाला येणारी दुर्गंधी त्वरेने कमी होते. सर्वच सुगंधी द्रव्ये ही उत्कृष्ट वातनुलोमकही असतात. त्यामुळे सुगंधी द्रव्यांपासून बनविलेले लवंगादि चूर्ण हे उदरशूल (पोटात दुखणे), आध्मान (पोट फुगणे) यावरही उत्तम कार्यकारी होते.

कापूर, जायफळ, नागकेशर, सुंठ ही द्रव्ये जशी जाठराग्नि प्रदीप्त करणारी आहेत तशीच ती स्तंभकही आहेत. यामुळे अतिसार, प्रवाहिका, ग्रहणी आदि रोगांत येणारी द्रवमलप्रवृत्ती (जुलाब, Loose motions) कमी करण्यासाठी व या रोगांचे मूळ कारण असणारे अग्निमांद्य दूर करण्यासाठीही लवंगादि चूर्ण लाभदायी ठरते.

लवंगासारखी सुगंधी द्रव्ये विशेषत: जायफळ, कापूर, जटामांसी, तगर इ. द्रव्ये ही शुक्रस्तंभकही आहेत. ज्या रुग्णांमध्ये स्त्रीसंभोगाचे वेळी शुक्रधातूचे स्खलन लवकर होते अशा रुग्णांमध्ये या कल्पाचा चांगला उपयोग होतो. खुरासनी ओवा हे औषधीद्रव्यही या दृष्टीने उपयुक्त ठरते.

लवंग, कापूर, वेलची, दालचिनी, वंशलोचन, पिंपळी, कंकोळ आदि द्रव्ये कफनाशनासाठी व श्वसनमार्गावर कार्य करण्याबाबतही प्रसिद्ध आहेत, यामुळेच तमकश्वास (दमा Asthma), हृद्रोग (C.C.F.), राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis) आदि रोगांमध्ये असणारा खोकला कमी करणे, या रोगांमुळे उत्पन्न होणारा दम लागणे ही लक्षणे कमी करण्यासाठी लवंगादि चूर्ण वापरणे इष्ट ठरते. श्वसनमार्गातील संचित कफ कापराबरोबर श्वासावाटे बाहेर पडतो. रुग्णास आराम मिळतो. श्वासाला असणारी दुर्गंधीही या चूर्णाचे उपयोगाने त्वरेने कमी होते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## २६. विडंगादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** वावडिंग, ओवा, कडुनिंबाची साल, पळसांचे बी, कीटमारी ओवा, हिंग.

विडंग म्हणजेच वावडिंग. विडंग हे प्रधान कार्यकारी द्रव्य यामध्ये असल्याने

या चूर्णास विडंगादि चूर्ण असे म्हणतात. हा एक कृमींवरील म्हणजेच जंतांवरील उत्तम कल्प आहे. पोटात असणारे जंत अनेक प्रकारचे असतात. त्या सर्वांवरच या विडंगादि चूर्णाचा उपयोग होतो. या चूर्णातील विडंग हे द्रव्य गांडूळाप्रमाणे दिसणाऱ्या लांब, मोठ्या कृमींवर (गंडूपद कृमी Common round Worms) विशेष कार्यकारी आहे. तर पळसाचे बी व कीटमारी ओव्यामुळे सुताच्या धाग्याप्रमाणे दिसणारे किंवा इतर छोटे कृमी (Thread worms किंवा Hook Worms) यावर अधिक कार्य घडते. कडूनिंबाची साल ही रक्तजकृमीसाठी उपयुक्त आहे.

कृमीमुळे अनेक वेळा उदरशूल हे लक्षण उत्पन्न होताना दिसते. हे लक्षण कमी करण्यासाठीच या कल्पास ओवा आणि हिंग यांसारख्या वातानुलोमक औषधीद्रव्यांची जोड दिलेली आहे.

पलाश बीज हे विरेचन करणारेही असल्याने याचा उपयोग कृमिपातनासाठीही होतो. अर्थात विडंगादि चूर्णामुळे कृमिपतन होईल. एवढेच नव्हे, तर याचे उपयोगाने कृमींचा पूर्णांशाने विनाश करणे शक्य होईल.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ✓२७. दाडिमाष्टक चूर्ण

**घटक द्रव्ये :** डाळींब, खडीसाखर, त्रिगंध (वेलदोडा, दालचिनी, तमालपत्र), त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी)

दाडिम म्हणजेच डाळींब. डाळींब, खडीसाखर, त्रिगंधातील तीन औषधे व त्रिकटुमधील तीन औषधे अशा एकंदर आठ औषधांचे असे हे दाडिमाष्टक चूर्ण बनते.

दाडिमाष्टक चूर्ण हा अग्निमांद्य व त्यामुळे उत्पन्न होणारे उपद्रवात्मक रोग यावरील एक महत्त्वाचा कल्प आहे. डाळींब हे मधुर, अम्लरसाचे असून उत्तम अग्निदीपन करणारे तसेच रुची वाढविणारे औषध आहे. त्याचप्रमाणे ते उत्तम कफवातनाशकही आहे.

अग्निमांद्यावर कार्यकारी अशा या द्रव्याला जोड मिळालेली आहे ती त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी) सारख्या उत्कृष्ट दीपनपाचन द्रव्यांची व त्रिगंधा (वेलदोडा, दालचिनी, तमालपत्र) सारख्या सुगंधी वातानुलोमक द्रव्यांची. या त्रिकटु व त्रिगंधामुळे



दाडिमाचे गुणकर्मात लक्षणीय वाढ होत असते. तोंडाला चव नसणे, भूक न लागणे, ढेकर येणे, पोटात दुखणे, पोटात गुडगुडणे आदि अजीर्णामुळे वा अग्निमांद्यामुळे उत्पन्न होणाऱ्या लक्षणांवर दाडिमाष्टक चूर्ण लाभदायी ठरते.

दाडिम हे कृमींवरील कार्यकारी द्रव्यांपैकी एक महत्त्वाचे औषधीद्रव्य. कृमिप्रकारांपैकी विशेषतः लांबट, फितीच्या आकाराचे असणारे कृमी (Tape worms) यावर दाडिम विशेष उपयुक्त ठरते. आयुर्वेदीय मतानुसार कृमींचे उत्पत्तीस अग्निमांद्यही प्रमुख कारण असतेच. या सर्वांचा विचार करता दीपन, पाचन, कृमिघ्न असा हा कल्प कृमिचिकित्सा करताना अवश्य लक्षात घेतला पाहिजे.

दाडिम हे उत्कृष्ट हृद्बल्य तसेच रक्तवर्धकही आहे. यामुळे दाडिमाष्टक हे हृद्रोगी रुग्णामध्ये (C.C.F.) किंवा पांडु रोगामध्येही (Anaemia) यशस्वीरीत्या वापरता येते.

त्रिकटु, त्रिगंध व दाडिम ही सर्वच द्रव्ये श्वसनमार्गातील कफविकारावर उपयुक्त ठरत असल्याने कास (Cough), श्वास (Breathlessness), गलग्रह आदि रोगांवरही दाडिमाष्टक चूर्ण उपयुक्त ठरते.

त्रिकटु व त्रिगंध ही तीक्ष्णत्व असणारी औषधे. या औषधांचा तीक्ष्ण गुण कमी करण्यासाठी या चूर्णातील साखरेचा उपयोग होतो.

**प्रमाण :** २ ते ४ ग्रॅम - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## २८. एलादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** वेलची, प्रियंगु, नागरमोथा, बोराच्या बीमधील मगज, पिंपळी, श्वेतचंदन, लाह्या, लवंग, नागकेशर.

एला म्हणजे वेलची किंवा वेलदोडा. एला प्रमुख घटक असणारे ते एलादि चूर्ण होय.

एलादि चूर्ण हे छर्दीवरील उत्तम औषध आहे. छर्दि (Vommiting) म्हणजेच उलटी होणे. खाल्लेल्या अन्नाचे पचन नीट न होता त्या अन्नाला प्रतिलोम (विरुद्ध) गती प्राप्त होऊन ते अपचित अन्न व इतर पाचक स्राव मुखावाटे बाहेर पडणे हे छर्दीमधील प्रमुख लक्षण होय. या चूर्णामधील सर्व घटकद्रव्ये ही सुगंधी व म्हणूनच वातानुलोमक आहेत. प्रतिलोम (विरुद्ध) गती कमी करून आहाराला अनुलोम गती

प्राप्त करून देण्याचे कार्य ही द्रव्ये करतात व म्हणूनच छर्दी त्वरेने कमी होते. या सुगंधी द्रव्यांच्या अनुलोमक गुणाप्रमाणेच चंदन, नागकेशर, बोरच्या बीमधील भाग (बीजमज्जा) ही कषाय (तुरट) रसांची व म्हणूनच स्राव कमी करणारी औषधे आहेत. यामुळे छर्दी कमी होण्यास मदत होते.

छर्दीप्रमाणेच वायूच्या प्रतिलोम गतीमुळेच उत्पन्न होणाऱ्या अन्य लक्षणांपैकी उचकी लागणे हेही एक महत्त्वाचे लक्षण होय. या उचकीसाठीही एलादी चूर्ण वापरल्यास निश्चित फायदा होतो.

तीव्र उदरशूल (Intestinal Colic) हेही एक प्रतिलोम वायूचेच लक्षण. हे लक्षण कमी करण्यासही एलादि चूर्ण समर्थ ठरते.

वारंवार उलटी होणे यामुळे बरेच वेळा शरीरातील द्रवधातू शरीराबाहेर गेल्याने रसक्षयाची लक्षणे (Symptoms of Dehydration) उत्पन्न होतात. ही लक्षणे टाळण्यासाठी, रसक्षयाने येणारा थकवा कमी करण्यासाठी संतर्पण द्रव्यातील श्रेष्ठ द्रव्य लाह्या याचेही चूर्ण या एलादि चूर्णात समाविष्ट केलेले आहे.

संतर्पण चांगले व्हावे यासाठीच अनुपानासाठी मध किंवा साखर वापरली जाते. उलटीमध्ये औषधाचे प्रमाण अधिक झाल्यास पुन्हा औषधाचीही उलटी होण्याची शक्यता लक्षात घेऊनच हे चूर्ण थोडेथोडे चाटले पाहिजे. अनुपानासाठी पाणी वापरणे हे याचसाठी टाळले पाहिजे.

**प्रमाण :** १ ते ३ ग्रॅम - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** मध, साखर.

❑❑❑

## २९. चोपचिन्यादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** चोपचिनी, साखर, पिंपळमूळ, मिरे, लवंग, अक्कलकारा, खुरासनी ओवा, वावडिंग इ.

चोपचिन्यादि चूर्ण हे उपदंश आणि फिरंग (Syphilis and Gonorrhoea) या रोगावरील एक महत्त्वाचे औषध आहे. चोपचिनी ही वनस्पती या रोगांवरील श्रेष्ठ द्रव्य समजले जाते. पण असे असले तरी या रोगाच्या सुरुवातीस, ज्या वेळी मेढ्रप्रदेशी व्रण असतो त्या काळात या औषधीकल्पाचा फारसा प्रभाव जाणवत नाही. या रोगांमुळे कालांतराने उत्पन्न होणारी सर्व लक्षणे मात्र या चूर्णाच्या उपयोगाने निश्चयाने कमी होतात.



फिरंगाच्या अभ्यंतर अवस्थेमध्ये उत्पन्न होणाऱ्या लक्षणांपैकी सांधे दुखणे व सुजणे हे महत्त्वाचे लक्षण आढळते. या वेळी सर्वच लक्षणे ही संधिवातासारखी असतात. या प्रकारच्या संधिवातामध्ये वेदना व सूज कमी करण्यासाठी या चोपचिन्यादि चूर्णाचा उपयोग होतो. पिंपळमूळ, मिरे, अक्कलकारा ही घटकद्रव्येही वेदनाप्रशमनासाठी उपयुक्त ठरतात.

फिरंगामध्ये सांधे दुखणे असते ते रात्री अधिक प्रमाणात. दिवसा त्यामानाने वेदना कमी असतात. याचमुळे रात्री झोप येईनाशी होते. चोपचिन्यादि चूर्णातील खुरासनी ओवा हे द्रव्य स्वापजनन म्हणजेच वेदना कमी करून झोप आणणार आहे. रात्री अधिक प्रमाणात असणाऱ्या वेदना या चूर्णाने निश्चितपणे कमी होतात.

केवळ फिरंगाच्या अभ्यंतर अवस्थेत निर्माण होणाऱ्या संधिवेदनांसाठी हे चूर्ण उपयुक्त आहे असे मात्र नव्हे. आमवात (Rheumatisum) वातरक्त (Gout) यासारख्या रोगामधील संधिवेदना कमी करण्यासाठीही हे चूर्ण तितकेच उपयोगी पडते.

फिरंग, उपदंशादि व्याधींमुळे उत्पन्न होणाऱ्या क्लैब्य (नपुंसकता), मैथुनशक्ती कमी होणे यासारख्या लक्षणासाठीही चोपचिन्यादि चूर्ण वापरता येते.

चोपचिन्यादि चूर्णाचा दुसरा महत्त्वाचा उपयोग होतो तो अपस्मारासारख्या रोगामध्ये. चोपचिनी, आकारकरभ, खुरासनी ओवा ही द्रव्ये मनाचे ठिकाणी आलेले वैषम्य दूर करून मानसिक संतुलन प्राप्त करून देत असतात व म्हणूनच मानसिक रोगामध्ये उपयुक्त ठरतात. अपस्माराचा वेग येऊन गेल्यानंतर पुन्हा वेग येऊ नये वा आलाच तर अगदी अल्पबल राहावा यासाठी जे कल्प वापरले जातात त्यामध्ये चोपचिन्यादि चूर्ण हा एक कल्प लक्षात ठेवला पाहिजे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ३०. चंदनादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** चंदन, वंशलोचन, वेलदोडा, कंकोळ, गोखरू, जहरमोहरा, दगडीबार, प्रवाळभस्म, शिलाजतु.

**भावना :** गुलाबजल, आमलकी रस.

चंदनादि चूर्णातील सर्व औषधीघटकद्रव्ये ही शीत गुणांची व म्हणूनच पित्तदोष दूर करणारी आहेत. पित्ताचा उष्ण गुण वाढल्याने अनेक रोगांमध्ये दाह किंवा आग होणे हे लक्षण उत्पन्न होते. हे दाह लक्षण कमी करण्यासाठी चंदनादि

चूर्णातील चंदनासारख्या वनस्पतीद्रव्यांना प्रवाळभस्म, दगडीबोर, जहरमोहरा यासारख्या खनिजांची जोड दिलेली आहे. ज्वर, प्रमेह, रक्तपित्त आदि रोगांत असणारी जळजळ, आग होणे ही लक्षणे चंदनादि चूर्णाच्या प्रयोगाने त्वरित कमी होत असतात.

या कल्पातील गोखरू, दगडीबोर, चंदन, वंशलोचन, शिलाजतु ही द्रव्ये मूत्रमार्गावरही कार्यकारी आहेत. ती सर्व मूत्रल आहेत. मूत्रल म्हणजे मूत्राचे प्रमाण वाढविणारी औषधे. याचमुळे चंदनादि चूर्णाचा उपयोग सदाह मूत्रप्रवृत्ती असताना, लघ्वीचे वेळी आग होत असताना (Burning micturition) उत्तम प्रकारे होतो. मूत्रकृच्छ्र (Painful micturition) मूत्राघात (Scanty urination), मूत्राश्मरी वा मूत्रशर्करा (Urinary stone) या रोगावरील चंदनादि चूर्ण हे एक अग्रगण्य असे औषध आहे. चंदनादि चूर्ण तयार करताना दिलेल्या गुलाबजल व आमलकी रसाच्या भावनांमुळेही मूत्रदाह कमी होण्यास साहाय्य होते.

दगडीबोराचे उपयोगाने मूत्रकृच्छ्रता त्वरेने कमी होत असते. त्याचप्रमाणे यामुळे मूतखड्याचे बारीक तुकडे होऊन ते अगदी बारीक शर्करेच्या रूपाने लघ्वीवाटे बाहेर पडून शस्त्रकर्म टाळता येणे शक्य होते. अर्थात मूतखडा जर लहान असेल तरच याचा उपयोग आहे. अन्यथा शस्त्रकर्मच करावे लागते. मूतखडा कमी करण्यासाठी शिलाजीत व जहरमोहरा ही द्रव्येही उपयुक्त ठरतात.

संक्षेपाने सांगावयाचे झाल्यास मूत्रमार्गावरील अनेकविध रोगांसाठी उपयुक्त असे हे चूर्ण आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी, तांदळाचे धुवण किंवा नारळाचे पाणी.

❑ ❑ ❑

## ३१. मूत्रल चूर्ण

**घटकद्रव्ये :** धने, वाळा, चंदन, सागाचे बी, गोखरू.

मूत्रल म्हणजे मूत्राचे प्रमाण वाढविणारे. या मूत्रल चूर्णाच्या उपयोगाने मूत्राचे प्रमाण वाढते हे नावावरूनच स्पष्ट आहे. धने, वाळा, चंदन, गोखरू, सागाचे बी ही सर्वच औषधीद्रव्ये मूत्रमार्गावर कार्यकारी म्हणून प्रसिद्ध आहेत. ही सर्व औषधे उत्कृष्ट शीतगुणांची असल्याने त्यामुळे जसे मूत्राचे प्रमाण वाढते त्याचप्रमाणे मूत्रप्रवृत्तीचे वेळी होणारा दाह (Burning micturition) हे लक्षण त्वरेने कमी करण्यासाठीही या मूत्रल चूर्णाचा उपयोग होतो.



मूत्राचे प्रमाण वाढत असल्यानेच मूतखडा (मूत्राश्मरी, Urinary stone), मूत्रकृच्छ्र (Painful micturition), मूत्राघात (Scanty urination) यांसारख्या मूत्रमार्गातील अन्य रोगावस्थांमध्येही मूत्रलचूर्ण यशस्वीपणे वापरता येते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** पाणी, नारळाचे पाणी किंवा तांदळाचे धुवण (तांदूळ धुताना निघणारे सफेद पाणी, हेही उत्तम मूत्रल म्हणून प्रसिद्ध आहे.)

❑ ❑ ❑

## ३२. पंचनिंब चूर्ण

**घटकद्रव्ये :** कडूनिंबाचे मूळ, पान, फळे, फुले आणि साल, लोहभस्म, हिरडा, चक्रमर्द (टाकळा), चित्रक, भल्लातक, विडंग, शर्करा, आवळकाठी, हळद, पिंपळी, मिरे, सुंठ, बावची, बाहवा, गोखरू.

**भावना :** माक्याचा रस, खैराच्या सालींचा काढा.

या चूर्णामध्ये कडूनिंबाचे मूळ, पाने, फळे, फुले आणि साल असे पंचांग असते म्हणूनच या चूर्णाला पंचनिंब चूर्ण असे म्हणतात. कडूनिंब हा उत्तम रक्तशोधक म्हणजेच रक्तदुष्टी दूर करणारा म्हणून ओळखला जातो. तिक्तरसाची (कडू) औषधे पित्तदोष दूर करणारी असतात. पित्त आणि रक्त यांच्यात असणाऱ्या आश्रयाश्रयी भावाने ही औषधे रक्तदोष दूर करण्यासही उपयुक्त ठरतात. कडूनिंबाप्रमाणेच हळद, टाकळा, बावची. बाहवा ही औषधी घटकद्रव्येही रक्तदोष दूर करण्यामध्ये अग्रगण्य आहेत.

पंचनिंब चूर्ण तयार करताना दिलेल्या माक्याच्या रसाच्या व खैराच्या सालींच्या काढ्याच्या भावनांमुळेही या चूर्णाचे रक्तदोष दूर करण्याचे कार्यात अनेकपटीने वाढ होत असते.

या सर्वांमुळेच पंचनिंब चूर्ण हे रक्तदोष दूर करणाऱ्या औषधी कल्पांपैकी एक महत्त्वाचे औषध आहे. इसब, नायटा, खरूज, गजकर्ण व या प्रकारचे अनेक त्वचारोग यामध्ये प्रामुख्याने रक्तदुष्टी असते. वारंवार गळवे होणे, अंगाला खाज सुटणे, अंगावर पित्त उठणे (शीतपित्त), वारंवार तोंड येणे, यांसारखी लक्षणेही रक्तदुष्टीमुळेच उत्पन्न होत असतात. हे सर्व रोग पंचनिंब चूर्णाच्या उपयोगाने कमी होतात.

बऱ्याचशा त्वचारोगांमध्ये जखमा होऊन त्यातून स्राव वाहात राहतो. पू, रक्त

किंवा लसिका स्राव कमी करण्यासाठी कषाय (तुरट) रसांची औषधं वापरणे आवश्यक असते. या दृष्टीनेच यातील हरिद्रा आणि लोहभस्म ही महत्त्वाची औषधे आहेत. रक्तदोषांमुळे उत्पन्न होणाऱ्या कृमींचा नाश करण्यासाठी भल्लातक, विडंग, चक्रमर्द, हळद या द्रव्यांचा उपयोग होत असतो. यांचेमुळे जखमा लवकर शुद्ध होतात व चटकन बऱ्याही होतात.

रक्तदोष दूर करण्यासाठी, त्यापासून कायमची मुक्तता मिळण्यासाठी मृदुविरेचनाची (Mild Purgative) अपेक्षा असते. पंचनिंब चूर्णातील हिरडा, बाहवा, आणि आवळकाठी यांसारख्या मृदुविरेचनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या औषधांची जोड यासाठीच या चूर्णास दिलली आहे.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ३३. निंबगंधक चूर्ण

**घटकद्रव्ये :** कडूनिंबाची पाने, शुद्ध गंधक.

या चूर्णामध्ये निंब आणि गंधक हे दोन घटक आहेत. गंधक हे द्रव्य शुद्ध स्वरूपात वापरले असताना ते रक्तदोष दूर करण्यातील एक अग्रगण्य औषध बनते. या ठिकाणी शुद्ध गंधक याचा अर्थ रासायनिकदृष्ट्या शुद्ध असा मात्र नव्हे. गंधकाचे विषारी गुण कमी करणे म्हणजे गंधकशुद्धी करणे होय. हे करीत असताना उलट गंधक रासायनिकदृष्ट्या अशुद्धच बनत असते. शुद्धीबाबतची आयुर्वेदाची ही एक अगदी वेगळी अशी परिभाषा आहे.

शुद्ध गंधकाचे रक्तदोष दूर करण्याचे कार्यास मदत होते ती कडूनिंबामुळे. कडूनिंब हे अत्यंत तिक्त (कडू) असून ते उत्कृष्ट पित्तशामकही आहे. रक्तदुष्टी दूर करण्यामध्येही निंब महत्त्वाचे कार्य घडवून आणते.

निंब आणि गंधक ही दोन्ही औषधे उत्कृष्ट रक्तदोषहर असल्यानेच रक्तदुष्टी करणाऱ्या औषधांमध्ये निंबगंधक चूर्ण हा महत्त्वाचा कल्प समजला जातो. अनेक प्रकारचे त्वक्‌विकार विशेषत: ज्या त्वक्‌विकारांमध्ये खाज येणे, पुरळ उठणे, व्रण उत्पन्न होणे व व्रणातून स्राव वाहणे ही लक्षणे आढळतात. अशा सर्व प्रकारांत व अवस्थांत निंबगंधकाचा लाभदायक प्रयोग करता येतो.

पामा (खरूज, scabies) वरील हा एक महत्त्वाचा कल्प आहे हे ध्यानात



ठेवले पाहिजे.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ३४. अतिविषादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** अतिविष, पिंपळी, हिरडा.

अतिविषादि चूर्णामधील प्रमुख औषधीद्रव्य अतिविष हे लहान मुलांच्या अनेक रोगांमध्ये उपयुक्त असे द्रव्य आहे. नावाने अतिविष असले तरीही संपूर्णतया निर्विष असे हे औषधं आहे. लहान बालकांमध्ये नेहमीकरता वापरल्या जाणाऱ्या गुटीमध्ये समाविष्ट असणाऱ्या औषधांमध्ये अतिविष हे एक प्रमुख औषध असते.

अतिविषादि चूर्णाचा उपयोग प्रामुख्याने लहान मुलांमधील दंतोद्‌भव रोगामध्ये चांगला होतो. दात येण्याच्या सुमारास अजीर्णाची लक्षणे उत्पन्न होतात. जुलाब, उलट्या, खोकला, ताप यांसारखी अनेक लक्षणे उद्‌भवतात. या सर्वच अवस्थांमध्ये अतिविषादि चूर्णाचा उत्कृष्ट उपयोग होतो. पिंपळीसारख्या औषधीद्रव्याची जोड मिळाल्याने कफनाशनाचे व त्यामुळे सर्दी, खोकला इत्यादी श्वसनमार्गातील रोग कमी करण्याचे कार्य या अतिविषादि चूर्णामुळे घडते.

अतिविषादि चूर्ण वापरताना एक काळजी मात्र घ्यावी लागते. अतिविष ही वनस्पती फार लवकर किडते. यासाठीच या वनस्पतीला 'घूणप्रिया' म्हणजेच कीटकांना प्रिय अशा अर्थाचे पर्यायवाची नाव दिले जाते. अतिविषादि चूर्ण म्हणूनच नेहामीच नवे वापरावे. तयार केल्यापासून ५ ते ६ महिन्यांपेक्षा अधिक कालानंतर वापरण्यास ते निरुपयोगी ठरते.

अतिविषादि चूर्णामध्ये काही वेळा या चूर्णाचे गुण अधिक प्रकर्षाने वाढावेत यासाठी डिकेमाली हे दंतोद्‌भव रोगांसाठी उपयुक्त असणारे आणखी एक द्रव्य मिसळलेले असते.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान** - मध.

❑❑❑

## ३५. सितोपलादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** खडीसाखर, वंशलोचन, पिंपळी, वेलची, दालचिनी.

सिता म्हणजेच खडीसाखर. खडीसाखरेला असणाऱ्या या संस्कृत शब्दावरून खडीसाखर म्हणजेच सिता हे प्रमुख घटकद्रव्य असणारे जे चूर्ण त्यास सितोपलादि चूर्ण असे नाव दिले गेले आहे.

सितोपलादि चूर्ण हे खोकल्यासाठी उपयुक्त असणारे औषध म्हणून व्यवहारामध्ये प्रसिद्ध आहे.

सितोपलादि चूर्णामधील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे वंशलोचन. बांबूची वाढ होत असताना त्या बांबूमध्ये एक प्रकारचा पांढरा पदार्थ तयार होत असतो. हा पदार्थ म्हणजेच वंशलोचन होय. बांबूपासून मिळणारे हे वंशलोचन फारच महाग मिळत असल्याने व्यवहारात अनेक वेळा कृत्रिम पद्धतीने बनविलेले वंशलोचन वापरले जाते. वंशलोचन हे उत्तम वातपित्तशामक औषध आहे. श्वासमार्गामध्ये निर्माण झालेल्या कफाचे शरीराबाहेर नि:सारण करण्यासाठी-कफ लवकर बाहेर पडून जाण्यासाठी या वंशलोचनाचा उपयोग होत असतो. वंशलोचन हे ज्वरघ्नही (ताप कमी करणारे) आहे. म्हणूनच वंशलोचन असणाऱ्या सितोपलादि चूर्णाचा उपयोग प्रामुख्याने ज्या वेळेस खोकला आणि ताप ही दोन्ही लक्षणे एकत्रित आढळतात, त्या अवस्थेत केला जातो.

राजयक्ष्मा किंवा क्षयरोग (Tuberculosis) या रोगामध्ये ताप व खोकला ही दोन्ही लक्षणे प्रामुख्याने आढळतात. ताप व खोकला यांचे जोडीला खोकल्यातून रक्त पडणे, अत्यंत थकवा वाटणे, दम लागणे ही लक्षणेही या रोगामध्ये असतात. वंशलोचन हे उत्तम रक्तस्तंभन करणारे म्हणजेच रक्तस्राव थांबविणारे व बल्य म्हणजेच बल मिळवून देणारे द्रव्य असल्याने राजयक्ष्म्यामध्ये सितोपलादि चूर्णाचा अनेक अवस्थांमध्ये उत्तम लाभ होतो.

सितोपलादि चूर्णामध्ये असणाऱ्या दालचिनीमध्ये सिनेमिक ॲसिड नावाचा असणारा घटक क्षयरोगविरोधी (Antitubercular) म्हणूनच कार्य करीत असतो. याचसाठी सितोपलादि चूर्णामध्ये दालचिनीचा समावेश केलेला दिसतो. शिवाय दालचिनी, वेलची ही द्रव्ये कफनि:सारक तसेच सुगंधी असल्याने मुखदौर्गंध्य-तोंडास येणारी घाण-कमी करण्यासाठीही उपयुक्त ठरतात.

पिंपळी हे द्रव्य तर फुफ्फुस या शरीरावयवाला बल देणाऱ्या सर्व द्रव्यांमध्ये अग्रगण्य समजले जाते. खडीसाखर ही मधुररसाची, बल्य व उत्तम पित्तशामक



असल्याने सितोपलादि चूर्णास पित्तशमनाचे कार्यामध्ये सहकारी ठरते.

राजयक्ष्मा (T.B.) मध्ये असणाऱ्या ताप, खोकला या लक्षणांपासून मुक्तता मिळविण्यासाठी सितोपलादि चूर्णाचा जसा उपयोग होतो तसाच अन्य अनेक रोगांमध्येही हा कल्प उपयुक्त ठरतो.

वंशलोचनाच्या रक्तस्तंभन या गुणामुळे तसेच हा कल्प उत्तम वातपित्तशामक असल्याने सितोपलादी चूर्ण हे रक्तपित्तावरही उत्तम कार्यकारी ठरते. विशेषत: ऊर्ध्वग रक्तपित्तामध्ये (नाक, घसा, तोंड या वाटे होणारा रक्तस्राव) रक्तस्राव त्वरेने थांबविण्यासाठी या चूर्णाचा उपयोग होतो. हृद्रोग (Congestive Cardiac Failure) व त्यामुळे उत्पन्न होणारा श्वास (Cardiac Asthma), तसेच कोणत्याही कारणाने निर्माण होणारा मंदज्वर (Low grade fever) व खोकला यासाठी सितोपलादि चूर्ण महत्त्वाचे समजले जाते

याचसाठी (Chronic Bronchitis) करताही सितोपलादि चूर्ण लाभदायक ठरते.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## ३६. कर्पूरादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** कापूर, वेलची, कंकोळ, जायफळ, जायपत्री, लवंग, जटामांसी, मिरे, पिंपळी, सुंठ, साखर.

सितोपलादि व तालीसादि चूर्णांप्रमाणेच खोकल्यासाठीच वापरले जाणारे आणखी एक चूर्ण कर्पूरादि चूर्ण हे होय. सितोपलादि हे पित्तप्रधान खोकल्यासाठी, तालीसादि वातप्रधान खोकल्यासाठी तर कर्पूरादि चूर्ण हे कफप्रधान खोकल्यासाठी वापरणे अधिक युक्त ठरते.

कर्पूरादि चूर्णामधील सर्वच औषधे ही उत्तम कफनाशन करणारी व श्वसनमार्गावर कार्यकारी अशी आहेत. विशेषत: यातील प्रमुख घटकद्रव्य कापूर हे उत्तम कफघ्न द्रव्य आहे. कापूर पोटातून औषधरूपाने दिला गेल्यानंतर त्याचे शरीराबाहेर उत्सर्जन होते ते श्वासावाटे. ज्या रुग्णास कापूर दिलेला असतो त्याचे श्वासास कापराचा वास येतो तो यामुळेच. कापूर श्वासावाटे बाहेर पडत असतानाच श्वसनमार्गावर आपले कार्य घडवून आणतो. श्वसनमार्गात कोठेही संचित झालेल्या कफाचे शरीराबाहेर

नि:सरण करण्यासाठी हा कापूर उपयोगी पडतो. कापराच्या या गुणकर्मामुळेच वातकफज्वरामध्ये (Influenza) किंवा श्रसनक सन्निपातामध्ये (Broncopneumonia) कर्पूरादि चूर्ण हे एक महत्त्वाचे औषध ठरते.

Bronchitis व विशेषत: Bronchectassis मध्ये फुफ्फुसात कफसंचय होऊ लागतो. फुफ्फुसामध्ये निर्माण झालेल्या पोकळीत संचित कफाचे बरोबर पू होऊ लागतो व त्यामुळे ताप येणे, छातीत दुखणे, श्वासास दुर्गंधी येणे यांसारखी लक्षणे उद्‌भवतात. ही सर्व लक्षणे कर्पूरादि चूर्णाच्या उपयोगाने त्वरित कमी होतात.

तमकश्वास (Bronchial Asthma) मध्येही खोकला व त्यातून पडणारा कफ कमी करण्यासाठीही कर्पूरादि चूर्ण उपयुक्त ठरते.

कंकोळ, वेलची, जायपत्री, लवंग, जटामांसी यांसारख्या कफघ्न व सुगंधी द्रव्यांची योजना कर्पूरादि चूर्णामध्ये केलेली असल्याने कापराचे गुणकर्मामध्ये अनेक पटीने वाढ होऊन कर्पूरादि चूर्ण हे कफप्रधान खोकल्यावरील एक अग्रगण्य असे औषध तयार होते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅम. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, गरम पाणी.

❑❑❑

## ३७. तालीसादि चूर्ण

**घटकद्रव्य :** तालीसपत्र, मिरे, सुंठ, पिंपळी, वंशलोचन, वेलची, दालचिनी, साखर.

सितोपलादि चूर्णाप्रमाणेच कास म्हणजेच खोकल्यासाठी वापरले जाणारे आणखी एक चूर्ण म्हणजे तालीसादि चूर्ण होय. सितोपलादि चूर्णाचा उपयोग पित्ताचा अनुबंध असणाऱ्या खोकल्यासाठी विशेष करून होतो तर तालीसादि चूर्णाचा उपयोग वातप्रधान खोकल्यासाठी होत असतो.

तालीसादि चूर्णामध्ये प्रमुख घटक आहे तालीसपत्र. तालीसपत्र उत्तम वातकफघ्न औषध असून श्वसनमार्गावरही कार्यकारी असे हे औषधीद्रव्य आहे. वातप्रधान कासासाठी म्हणजेच ज्या रोगांमध्ये कोरडा खोकला असतो त्या सर्व प्रकारच्या खोकल्यामध्ये तालीसादि चूर्णाचा उपयोग होतो. तालीसादि चूर्णाच्या उपयोगाने खोकल्याची ढास कमी होते, घशात अडकलेला कफ लवकर सुटतो, घशात जाणवणारी रूक्षता कमी होऊन घशाची खवखव थांबते व खोकलाही कमी होतो.



तालीसपत्रास दिलेली मिरे, सुंठ, पिंपळी, वंशलोचन, दालचिनी इत्यादींची जोड ही तालीसपत्राचे गुणकर्म वाढविण्यास साहाय्यभूत ठरते. यातील वंशलोचन हे हृदयाला बल देणारे, कफाचे नि:सरण करणारे तसेच बल्यही आहे. याचमुळे तालीसादि चूर्णाचा उपयोग हृद्रोग (C.C.F.), तमकश्वास किंवा दमा (Bronchial Asthma) यांसारख्या रोगामध्ये असणारा खोकला कमी करण्यासाठीही होतो.

वातकफज्वरानंतर (Influenza) येणारा व बऱ्याच काळपर्यंत राहणारा खोकला कमी करण्यासाठीही तालीसादि चूर्णाचा लाभदायक प्रयोग केला जातो. ब्रॉंकायटीस (Bronchitis) सारख्या श्वसनाचे रोगातही अत्यंत उपयुक्त असा हा कल्प आहे.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅम - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ३८. चौसष्टी पिंपळी

**घटकद्रव्ये :** पिंपळी चूर्ण.

**भावना :** पिंपळीचा काढा.

पिंपळीच्या चूर्णास एका दगडी खलामध्ये पिंपळीच्या काढ्यामध्ये चांगले खलले जाते. या प्रकारास पिंपळी काढ्याच्या भावना दिल्या अशी शास्त्रीय संज्ञा आहे. याप्रमाणे पिंपळी चूर्णास पिंपळीच्याच काढ्याच्या एकंदर ६४ वेळा भावना दिल्यानंतर त्यापासून अखेरीस जो कल्प तयार होतो तो चौसष्टी पिंपळी हा होय.

पिंपळीला पिंपळीच्याच काढ्याच्या वारंवार भावना दिल्याने पिंपळी चूर्णास सूक्ष्मत्व येते, म्हणजेच पिंपळीचे सर्व गुण प्रकर्षाने वाढतात. केवळ पिंपळी चूर्ण वापरावयाचे ठरविल्यास अपेक्षित लाभ होण्यासाठी याची जी मात्रा-प्रमाण लागते त्यापेक्षा कितीतरी कमी मात्रा चौसष्टी पिंपळीची पुरते हा या प्रकारे कल्प बनविण्यातला महत्त्वाचा फायदा.

पिंपळी हे औषधीद्रव्य श्वसनमार्गावर विशेषत: फुफ्फुसावर कार्यकारी आहे. फुफ्फुस या अवयवास या पिंपळीमुळे बल मिळते, तसेच पिंपळी उत्तम कफदोषहरही आहे.

खोकला (कास, Cough), श्वास (Bronchial Asthma), हिक्का (उचकी) कमी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त असा हा कल्प आहे. चौसष्टी पिंपळीमुळे खोकल्यामध्ये असणारा कफ लवकर बाहेर पडतो. इतकेच नव्हे, तर कफ निर्माण होण्याची

प्रवृत्तीच कमी होते. राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis) मध्ये खोकला कमी करण्यासाठी, फुफ्फुसाला बल मिळून त्याचे ठिकाणी असणारी विकृती दूर व्हावी याकरिता, तसेच या रोगात असणारे ताप हे लक्षण कमी करण्यासाठी जे महत्त्वाचे कल्प आहेत त्यापैकीच चौसष्टी पिंपळी हा एक कल्प आहे.

दमा किंवा तमकश्वासामध्ये (Bronchial Asthma) श्वासाचे वारंवार वेग किंवा अटॅक येतात. दोन अॅटॅकच्या मधल्या काळात रुग्णास फारसा त्रास नसतो. या वेगमध्यकालीन अवस्थेमध्ये चौसष्टी पिंपळीचा उपयोग केल्यास दम्याचे वारंवार येणारे वेग थांबतात किंवा त्यामधील कालावधी वाढतो व जर वेग आलाच तर तो अगदी अल्पबल असा असतो.

या सर्व गुणकर्मांमुळेच पिंपळीला फुफ्फुसासाठी, 'प्राणवहस्रोतसासाठी उपयुक्त 'रसायन' असेच म्हटले जाते.

पिंपळी या वरीलगुणाप्रमाणेच उत्तम दीपन, पाचनही असल्याने अरुची, अग्निमांद्य, अजीर्ण, विबंध, गुल्म, उदरशूल यांसारख्या जाठराग्निमांद्यामुळे उत्पन्न होणाऱ्या अनेकविध रोगांवर कार्यकारी ठरते. ज्वर, विशेषतः जीर्णज्वर कमी करण्यासही चौसष्टी पिंपळी साहाय्यभूत ठरते.

**प्रमाण :** २५० ते ५०० मि. ग्रॅ. - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ३९. शृंग्यादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** काकडशिंगी, अतिविष, पिंपळी.

शृंगी हे काकडशिंगीचे संस्कृत नाव. शृंगी हे प्रमुख असणारे चूर्ण ते शृंग्यादि चूर्ण होय. यामध्ये काकडशिंगी, अतिविष आणि पिंपळी ही फक्त तीनच औषधे आहेत. ही तीनही औषधे उत्तम प्रकारची कफदोषनाशक आहेत, त्याचप्रमाणेच ती श्वासमार्गावर कार्यकारी आहेत. यामुळेच कास (Cough), श्वास (Asthma) यासारख्या रोगांवरील ते एक चांगले औषध आहे. विशेषतः सकफ कासावर म्हणजे ज्या खोकल्याबरोबर कफ अधिक प्रमाणात बाहेर पडतो त्या प्रकारात या शृंग्यादि चूर्णाचा उपयोग अधिक होतो. अतिविष हे या चूर्णातील औषध बालांमध्ये उपयुक्त ठरणाऱ्या औषधांपैकी श्रेष्ठ द्रव्य आहे. त्यामुळेच बालांमध्ये आढळणाऱ्या श्वसनमार्गातील रोगांवर हा कल्प फारच लाभदायी ठरतो हे निश्चित. उत्तम कफघ्न असल्यानेच,



वातकफज्वर व त्यामध्ये उत्पन्न होणाऱ्या न्यूमोनिया किंवा ब्रॉंकायटीससारख्या अवस्थेमध्ये हा कल्प यशस्वीरीत्या वापरला जातो.

अतिविष आणि पिंपळी ही औषधीद्रव्ये उत्तम दीपन, पाचन आहेत व म्हणूनच भूक न लागणे, उलटी होणे, जुलाब होणे यांसारख्या अजीर्णजन्य रोगांत हा कल्प कार्यकारी ठरतो. अतिविष हे औषधीद्रव्य उत्तम स्तंभकही आहे व याचा उपयोग विशेषतः लहान बालकांमध्ये होत असल्यानेच शृंग्यादि चूर्णाचा विशेषत्वाने उपयोग केला जातो तो दंतोद्भव रोगांसाठी. लहान मुलांमध्ये दात येण्याच्या वेळी अनेकविध त्रासदायक लक्षणे उत्पन्न होतात. जुलाब होणे, उलटी होणे, खोकला, दम लागणे, ताप येणे ही यातील महत्त्वाची लक्षणे. दंतोद्भवाच्या वेळी उत्पन्न होणारी ही सर्वच लक्षणे या चूर्णाच्या उपयोगाने निश्चयाने कमी होतात.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ४०. यष्टिमधु चूर्ण

**घटकद्रव्ये :** जेष्ठमध.

यष्टिमधु हे जेष्ठमधाचे संस्कृत नाव. यष्टिमधु चूर्ण हे एक एकेरी चूर्ण आहे. म्हणजेच यामध्ये केवळ जेष्ठमध हे एकच औषधी द्रव्य आहे.

यष्टिमधु चूर्ण अनेकविध प्रकारच्या रोगांसाठी उपयुक्त असणारे औषध आहे. विशेषतः याचा उपयोग होतो तो कास, श्वास यासारख्या श्वसनमार्गातील रोगांसाठी. जेष्ठमध हे उत्तम कंठ्य आहे. खोकल्याबरोबर असणारा कफ न सुटणे व त्यामुळे घसा खवखवणे, दुखणे हे लक्षण जेष्ठमधाचे उपयोगाने त्वरेने कमी होते. यष्टिमधु वापरल्याने घशातील कफ लवकर सुटतो व त्याचबरोबर या यष्टिमधूच्या स्निग्ध गुणामुळे घशातील कोरडेपणाही कमी होतो. याच गुणामुळे स्वरभेद (आवाज बसणे) यावरही यष्टिमधु वापरणे योग्य ठरते.

सुपारी खाण्याने त्या सुपारीचे कषाय रसाने (तुरटपणामुळे) घसा एकदम सुकतो, कोरडा होतो, बोलता येईनासे होते, ठसका लागतो व दमही लागतो. अशावेळी जेष्ठमधाने त्वरित फायदा होतो. याचसाठी व्यवहारात सामान्यतः सुपारीबरोबर जेष्ठमध चूर्णही मिसळलेले असते.

तमकश्वास (Bronchial Asthma) या रोगामध्येही घशातील कफ लवकर

सुटत नाही. खोकल्याची ढास लागते व वाढत जाते. या अवस्थेतही यष्टिमधु चूर्णाचे वापराने लाभ आढळून येतो.

जेष्ठमध हे द्रव्य उत्तम व्रणरोपक म्हणजेच झालेली जखम त्वरेने भरून काढणारे आहे. तसेच ते बल्य आणि ज्वरघ्नही आहे. जेष्ठमधाच्या या गुणधर्माचा फायदा आपणास राजयक्ष्म्याच्या रुग्णामध्ये करून घेता येतो. या रोगामध्ये ताप येणे, खोकला, दम लागणे या लक्षणांचे जोडीला फुफ्फुसांमध्ये व्रण उत्पन्न झालेला असतो. राजयक्ष्मी रुग्णांमध्ये बलही कमी झालेले असते. ही सर्वच लक्षणे कमी करण्यासाठी यष्टिमधु हे एक उत्तम औषध आहे.

जेष्ठमध हा उत्तम व्रणरोपक आहेच पण त्याचे उपयोगाने जखमेतून होणारा स्राव कमी होतो. याचसाठी अनेक प्रकारच्या त्वक्रोगात आढळणारी स्राव व कंडू (खाज येणे) ही लक्षणे नष्ट करण्यासाठी या चूर्णाचा लेप करणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅ. - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ४१. कट्फलादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** कायफळ, कात, बेहडा, जेष्ठमध, कंकोळ.

कायफळाचे संस्कृत नाव आहे कट्फल. कायफळ किंवा कट्फल महत्त्वाचा घटक असलेले चूर्ण म्हणजे कट्फलादि चूर्ण होय.

कायफळ हे उत्तम कफघ्न औषध आहे. श्वसनमार्गावर कार्यकारी अशा या औषधीद्रव्याने खोकला त्वरेने कमी होतो. विशषत: कोरडा खोकला कमी करण्यासाठी या चूर्णाचा उपयोग होतो. कात, बेहडा, जेष्ठमध, कंकोळ ही इतर औषधेही उत्तम कफघ्न आहेत, त्याचप्रमाणे कंठ्य आहेत. कंठ्य म्हणजे घशावर कार्यकारी औषधे. या औषधांमुळे घशात असणारी सूज, त्या ठिकाणी असणारी लाली व वेदना कमी होतात. कट्फलादि चूर्णाच्या उपयोगाने कफ लवकर सुटतो व त्यामुळे वारंवार येणारी खोकल्याची ढासही कमी होते. घशात होणारी खवखवही या चूर्णाच्या उपयोगाने त्वरेने कमी होते.

घसा बसणे (आवाज नीट उच्चारता न येणे) हे लक्षण अनेक रुग्णांत पडशानंतर उत्पन्न होत असते. या लक्षणावरही कट्फलादि चूर्णाचा उत्तम उपयोग होतो.



दम्यासारख्या श्वसनमार्गातील काही रोगांमध्ये तसेच हृद्रोगामध्येही खोकला हे एक फार त्रासदायक असे लक्षण असते. विशेषत: दम्याच्या रुग्णास खोकल्याची ढास लागते व त्यामुळे दमा वाढत जातो. कफ लवकर सुटत नाही व सुटला की, रुग्णांस किंचित् का होईना पण तात्पुरता आराम मिळतो. या अशा प्रकारच्या रुग्णांतही खोकला कमी करण्यासाठी कट्फलादि चूर्ण वापरणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅ. - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ४२. भागोत्तर चूर्ण

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, हिरडा, पिंपळी, बेहडा, जेष्ठमध, अडूळसा, भारंगमूळ.

भागोत्तर चूर्णातील बहुतांश द्रव्ये ही कफहर व प्राणवहस्रोतसावर म्हणजेच श्वसनमार्गावर कार्यकारी आहेत. या चूर्णाचा विशेषत्वाने उपयोग होतो तो खोकला कमी करण्यासाठी. ज्या खोकल्यामध्ये कफ फार असतो पण हा कफ लवकर सुटत नाही, बाहेर पडत नाही, त्या प्रकारात भागोत्तर चूर्ण उपयुक्त ठरते. यासाठी पिंपळी, जेष्ठमध, बेहडा ही द्रव्ये कार्यकारी ठरतात. या चूर्णाचे उपयोगाने कफ लवकर सुटतो, घसा रिकामा होतो, खोकल्याची येणारी उबळ त्वरेने कमी होते. याचसाठी हे चूर्ण तमकश्वासातही (दमा, Asthma) वापरले जाते. दम्यामध्ये खोकल्याची ढास लागते, कफ लवकर सुटत नाही व त्यामुळे दम्याचा त्रास वाढतच जातो. या रोगात कफ निघून गेला की थोडा वेळ तरी आराम मिळतो. याचसाठी तमकश्वासामध्ये या चूर्णाचा वारंवार उपयोग करणे इष्ट ठरते. जीर्णकास (Chronic Bornchitis) यामध्येही उपयुक्त असा हा कल्प आहे. स्वरभेद (आवाज बसणे), गलग्रह (घसा दुखणे), गलपाक (घसा लाल होणे) या लक्षणांवरही उत्तम औषध म्हणून या भागोत्तर चूर्णाचा उल्लेख करावा लागेल.

या चूर्णामध्ये असणाऱ्या अडूळशामुळेही खोकल्याची उबळ कमी होते. याचप्रमाणे वासा (अडूळसा) ही वनस्पती उत्तम रक्तस्तंभक असल्याने, राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis) या रोगात असणारा खोकला व त्याबरोबर रक्त पडणे ही लक्षणेही भागोत्तर चूर्णाने कमी होतात.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅ. - दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ४३. सारस्वत चूर्ण

**घटकद्रव्ये** - कोष्ठ, अश्वगंधा, सैंधव, ओवा, जिरे, शहाजिरे, सुंठ, जिरे, पिंपळी, पाठा, शंखपुष्पी, वचा.

मनोदोषांवर कार्यकारी अशा औषधांपैकी सारस्वत चूर्ण हे एक महत्त्वाचे औषध आहे. मनाचा सत्त्व गुण कमी झाल्याने व अनुषंगाने रज आणि तम हे दोष वाढल्याने मनाचे अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होतात. उन्माद आणि अपस्मार हे दोन मानसरोगांतील महत्त्वाचे रोग. या दोहोंवरही कार्यकारी असा हा कल्प आहे. कोष्ट, वचा, अश्वगंधा, शंखपुष्पी ही त्यातील विशेष कार्यकारी द्रव्ये आहेत.

पण यासारख्या व्याधितावस्थेपेक्षाही सारस्वत चूर्णाचा उपयोग अधिक होतो तो बुद्धिवर्धनासाठी. धी, धृती आणि स्मृती हे जे बुद्धीचे तीन भेद त्या सर्वांचीच वृद्धी सारस्वत चूर्णाने होते. यासाठी या कल्पातील महत्त्वाचे द्रव्य आहे शंखपुष्पी. इतर औषधे ही शंखपुष्पीचे गुणकर्मात वाढ करीत असतात. मुलांमध्ये स्मरणशक्ती वाढीस लागावी यासाठी उपयुक्त असल्याने परीक्षेच्या काही दिवस आधी या कल्पाचा उपयोग केल्यास परीक्षेमध्ये अधिक उज्ज्वल यश संपादन करणे शक्य होते.

आजच्या यांत्रिक युगामध्ये मनाचे संतुलन बिघडण्याजोगे अनेक प्रसंग उद्‌भवतात. या मानसिक अस्वस्थतेमुळे रक्तदाब वाढणे, पोटातील अल्सर, स्वभाव चिडचिडा होणे इत्यादी अनेक उपद्रव संभवतात. यावरही सारस्वत चूर्ण उपयुक्त आहे. याचा अर्थ रक्तदाब वाढण्यावरील वा अल्सरवरील हे औषध आहे असा मात्र नव्हे. पण या लक्षणांचे मूळ कारणच नष्ट करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सारस्वत चूर्णाने घडत असल्याने अशा रुग्णांमध्ये इतर औषधांना साहाय्यक म्हणून या कल्पाचा निश्चितच लाभ होतो.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅ. - दिवसातून ३ वेळ.

**अनुपान :** तूप + साखर किंवा दूध.

❑❑❑

## ४४. नवायस चूर्ण

**घटकद्रव्ये :** सुंठ, मिरे, पिंपळी, वावडिंग, चित्रक, त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), नागरमोथा, लोहभस्म.



अयस म्हणजे लोह. लोहभस्म नव म्हणजेच नऊ इतर औषधांबरोबर एकत्रित करून केलेला कल्प तो नवायस चूर्ण होय.

लोह भस्म हे पांडुरोगावरील (Anaemia) एक आवश्यक असे औषध आहे. पांडूमध्ये शरीरातील रक्तधातूचे प्रमाण कमी होते; रक्तरंगू (R. B. C.) मध्ये असणारे 'हिमोग्लोबिन' हे महत्त्वाचे घटकद्रव्य, जे रक्तवर्णाचे म्हणजे लाल असते, ते म्हणजेच रक्तधातू होय. हिमोग्लोबिनच्या निर्मितीसाठी लोह आवश्यक असते. लोहभस्मातील लोह हे इतर कोणत्याही लोहक्षारांपेक्षा फार चटकन शरीराशी सात्म्य होते व म्हणूनच लोहभस्म रक्तवर्धनासाठी अग्रगण्य समजले जाते.

पांडु किंवा ॲनिमिया या रोगामध्ये अग्निमांद्य हेही एक प्रमुख लक्षण आढळते. हे अग्निमांद्य दूर करून, खाल्लेल्या अन्नाचे सम्यक् पचन करून त्या आहाराचे शरीरधातूमध्ये परिणमन करण्याचे व पर्यायाने रक्तादि धातू वाढविण्याचे कार्य सुंठ, मिरे, पिंपळी, चित्रक यांसारखी दीपन, पाचन करणारी म्हणजेच अग्निमांद्य दूर करणारी औषधे करीत असतात.

कृमी किंवा जंत होणे हे पांडुरोगाचे एक महत्त्वाचे कारण आहे. नवायस चूर्णातील वावडिंगामुळे कृमींची वाढ थांबते. एवढेच नाही, तर कृमींचा पूर्णांशाने नाश होतो व पांडुरोगाचे मूळ कारणच नाहीसे झाल्याने रक्तक्षयही कमी होऊ लागतो. लोहभस्माने याप्रकारे रक्तवर्धनाचे कार्य उत्तम प्रकारे होत असले तरी या लोहामुळे मलावष्टंभ मात्र उत्पन्न होतो. मलाचे खडे होतात व त्यामुळे रोग्यास काही त्रासदायक उपद्रव उत्पन्न होण्याची शक्यता असते. हे सर्व टाळण्यासाठीच नवायस चूर्णामध्ये त्रिफळा चूर्णही मिसळलेले असते. त्रिफळेमुळे शौचास साफ व नियमित होते व अशा प्रकारे लोहामुळे उत्पन्न होण्याची शक्यता असणारे मलावष्टंभ व त्यामुळे निर्माण होणारे उपद्रव टाळता येतात. पांडुरोगामध्ये असणारा रक्तक्षय कमी होऊन रक्तवृद्धी उत्कृष्टपणे होण्यासाठी हा कल्प तुपाबरोबर घेणे अत्यावश्यक असते.

नवायस चूर्णाचा वापर चालू असताना शौचास काळी होते ती लोहभस्मामुळे.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅ. - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप + साखर.

❑❑❑

## ४५. अश्वगंधादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** अश्वगंधा, देवदारु.

अश्वगंधादि चूर्णामध्ये अश्वगंधा किंवा आस्कंद आणि देवदारु ही दोनच औषधे असतात. यापैकी अश्वगंधा हे एक मधुर, तिक्त रसाचे औषध असून स्वभावाने ते उष्णवीर्य आहे. हे औषधी द्रव्य उत्तम बल्य आहे. विशेषत: नाडी व हृदयाला बल देण्यामध्ये हे एक अग्रगण्य औषध आहे.

अश्वगंधेमुळे शरीरातील सर्वच म्हणजेच सातही धातूंच्या उत्पत्तीचे कार्य सुव्यवस्थितपणे चालते. धातूंची पुष्टी उत्तम प्रकारे होते. याचसाठी अश्वगंधा उत्तम रसायनद्रव्य मानले जाते. अश्वगंधामुळे याप्रकारे धातुपोषण होत असल्यानेच धातुक्षयजन्य वातप्रकोपासाठी या अश्वगंधादि चूर्णाचा उपयोग होतो.

वातप्रकोप दोन प्रकारे होत असतो. धातक्षयाने आणि वायूच्या प्राकृत गतीत आलेल्या अडथळ्यामुळे. यापैकी प्राकृत गतीतील अवरोधामुळे उत्पन्न झालेल्या वातविकारांसाठी अश्वगंधा वापरता उपयोगी नाही, तर केवळ धातुक्षयजन्य वातविकारांसाठीच हा कल्प उपयोगी पडतो, हे प्रथमत: लक्षात घेतले पाहिजे. निराळ्या भाषेत सांगावयाचे झाल्यास कृश व्यक्तीमध्ये, दुर्बल व्यक्तीमध्ये, रूक्ष सेवनामुळे उत्पन्न झालेल्या वातविकारावर उत्तम कार्यकारी म्हणून अश्वगंधादि चूर्ण वापरता येते. अर्धांगवात (Hemiplegia), कंपवात (Tremors), मांसशोष (Wasting of muscles), निद्रानाश (Insomnia) इत्यादी रोगांवरील अश्वगंधादि चूर्ण हे महत्त्वाचे औषध आहे.

देवदारु हीही अश्वगंधेप्रमाणेच उत्तम कफघ्न औषधी वनस्पती असल्याने व त्यामुळेही वातविकारांचे शमन होत असल्यानेच या वनस्पतीच्या साहाय्याने अश्वगंधादि चूर्णाचे गुणकर्म निश्चितच वाढतात.

अश्वगंधा ही सप्त धातुवर्धक आहेच, पण त्याचबरोबर विशेषत: शुक्रवर्धक म्हणूनही या द्रव्याचा उपयोग होतो. याचमुळे शुक्राल्पता असताना व त्यामुळे येणारी नपुसकता किंवा मैथुनशक्ती कमी होणे ही लक्षणे कमी करण्यासाठीही अश्वगंधादि चूर्णाचा लाभदायक उपयोग करता येतो.

अश्वगंधा ही स्तन्यजनन म्हणूनही उपयुक्त ठरते. स्तन्यजनन म्हणजेच सूतिकेमध्ये दुधाचे प्रमाण वाढविणारे औषध. बाळंतपणानंतर या अश्वगंधादि चूर्णाच्या केलेल्या वापराने दूध चांगले येते, स्त्रीचे बळ वाढते व बाळंतपणानंतर येणाऱ्या वातविकारांपासून मातेस दूर ठेवता येते.

**प्रमाण** - २ ते ३ ग्रॅ. - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान** - दूध.

❑❑❑



## ४६. शतावरी कल्प

**घटकद्रव्ये :** शतावरी, वेलची, केशर, साखर.

शतावरी कल्पामधील प्रमुख घटकद्रव्य शतावरी हे मधुररसाचे, शीतवीर्य (थंड), उत्तम बल्य असे वनस्पती द्रव्य आहे. शतावरीमुळे रसरक्तादि सर्व म्हणजेच सप्त शरीरधातूंची उत्पत्ती उत्तम प्रकारे होत असल्याने बल्य (Tonic) म्हणून या शतावरी कल्पाचा प्रामुख्याने उपयोग केला जातो.

विशेषत: गर्भिणी स्त्रियांमध्ये अशा प्रकारची सप्तधातुवर्धक चिकित्सा करणे आवश्यक ठरते. आहाराचे जोडीला शतावरी कल्पासारख्या बल्य औषधांची जोड दिल्याने गर्भिणी स्त्री व गर्भ या दोहोंचेही पोषण चांगल्या प्रकारे होते. गर्भाची वाढ उत्तम प्रकारे होत राहते. याचसाठी गर्भिणी अवस्थेमध्ये अगदी दुसऱ्या महिन्यापासून ते प्रसूतीपर्यंतही शतावरीकल्प घेणे उपयुक्त ठरते.

केवळ गर्भिणी अवस्थेतच नव्हे तर प्रसूतीनंतरही शतावरी कल्प वापरला जातो. शतावरीचा स्तन्यजनन म्हणूनही या अवस्थेत उपयोग होतो. शतावरीच्या सेवनाने सूतिकेमध्ये स्तन्याचे (दुधाचे) प्रमाण वाढते व त्यामुळे बालकास मातेचे दूध पुरेसे मिळाल्याने बालकाचे योग्य तऱ्हेने पोषण होण्यास मदत होते.

शतावरी कल्पाचा उपयोग गर्भिणी अवस्थेत वा प्रसूतीनंतर सूतिकावस्थेत करताना शतावरीचे बल्य या गुणखर्मात वाढ व्हावी व त्यामुळे दुधाचे प्रमाण वाढावे यासाठी हा कल्प दूध या अनुपानाबरोबर घेणे अधिक सयुक्तिक ठरते.

शतावरी मधुररसाची असली तरी तिलाही एक प्रकारचा कडवटपणा असतो. हा कडवटपणा दूर व्हावा, हा कल्प अधिक रुचकर व्हावा यासाठी या कल्पास साखर, वेलची, केशर या द्रव्यांची जोड दिलेली असते.

शतावरी ही या प्रकारे बल्य म्हणून वापरली जात असली तरी या बरोबरच अन्य काही रोगांतही ती तितकीच उपयुक्त ठरते. या रोगांपैकी अम्लपित्त (Gastritis, Peptic ulcer) व अतिसार (Diarrhoea) या दोन महत्त्वाच्या रोगांचा उल्लेख करावाच लागेल. या रोगावरही शतावरी कल्प लाभदायक ठरतो.

**प्रमाण :** १ ते २ ग्रॅ. - दिवसातून २ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ४७. शतावर्यादि चूर्ण

**घटकद्रव्ये :** शतावरी, गोखरू, गांगेरुकी (नागबला), अतिबला, इक्षुरक (तालिमखाना), कपिकच्छु बीज (खाजकुयलीचे बी).

शतावर्यादि चूर्ण हा एक बल्य म्हणून उपयुक्त असणारा औषधीकल्प आहे. शतावरी, नागबला, अतिबला ही औषधी घटकद्रव्ये मधुर रसांची, शीतवीर्य (थंड) व उत्तम बल्य आहेत. यांच्या उपयोगाने रसरक्तादि सप्त शरीरधातूंचे उत्तम प्रकारे पोषण होते. मांसादि धातूमध्ये वृद्धी झाल्याने वजन वाढते, उत्साह वाढतो व एकंदरीत कार्यशक्ती वाढीस लागते.

पण शतावर्यादि चूर्ण वापरले जाते ते केवळ बल्य म्हणूनच नव्हे तर उत्कृष्ट वाजीकर द्रव्य म्हणूनही हे उपयुक्त ठरते. वाजी म्हणजे घोडा. घोड्याप्रमाणे ज्यामुळे मैथुनशक्ती प्राप्त होते ते वाजीकर द्रव्य होय. शतावर्यादि चूर्णामध्ये असणारी तालिमखाना व कपिकच्छु बीज (खाजकुयलीचे बी) ही द्रव्ये या वाजीकरणाचे कार्य करण्यामध्ये अग्रगण्य असणारी द्रव्ये आहेत. गोखरू हे द्रव्यही याचसाठी उपयुक्त ठरते.

वाजीकर द्रव्ये तीन प्रकारची असतात. कही द्रव्यांमुळे शुक्राचे प्रमाण वाढल्याने वाजीकरण घडते, काहीमुळे शुक्रस्तंभनाचे कार्य होऊन अपेक्षित कर्म घडते तर तिसऱ्या प्रकारची द्रव्ये ही शुक्रवर्धक व शुक्रस्तंभक अशा दोन्ही गुणांनी युक्त असतात. ही तिसऱ्या प्रकारातील औषधेच श्रेष्ठ वाजीकर समजली जातात. शतावर्यादि चूर्ण हे तिसऱ्या प्रकारात मोडणारे औषध असून त्याने शुक्रवर्धन व स्तंभन ही दोन्ही कार्ये घडतात.

दूध हे उत्तम शुक्रवर्धक समजले जाते. याचसाठी या प्रकारची वाजीकर औषधे दुधाबरोबर घेतल्याने अधिक लाभदायी ठरतात.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅ. - रात्री झोपण्यापूर्वी.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## ४८. पुष्यानुग चूर्ण

**घटकद्रव्ये :** पाठा, जांभूळ बी, आंब्याची कोय, पाषाणभेद, [illegible] मोचरस, लाजाळू, कमलकेशर, अतिविष, नागरमोथा, बेलाचे मूळ, लोध्र



कायफळ, मिरे, सुंठ, द्राक्षा (मनुका), रक्तचंदन, अनंतमूळ, धायटी, जेष्ठमध, अर्जुन, कुटज, इंद्रयव.

आयुर्वेदीय औषधांचा विशेषतः वनस्पतिद्रव्यांच्या संग्रह करताना ही औषधे विशिष्ट ऋतूमध्ये, विशिष्ट काळी, ठराविक तिथीस आणण्याने, गोळा केल्याने अधिक उपयुक्त ठरतात असे वर्णन प्राचीन आयुर्वेदीय ग्रंथातून मिळते. पुष्यानुग चुर्णासाठी आवश्यक ती औषधीद्रव्ये पुष्यनक्षत्रावर गोळा करावीत, म्हणजे ती अधिक उपयुक्त ठरतात, असे म्हटलेले आढळते व यावरूनच या कल्पास पुष्यानुग चूर्ण हे नाव मिळालेले आहे.

पुष्यानुग चूर्णातील बहुतांश औषधे ही शीतगुणाची आहेत व त्यामुळे पित्त व रक्तदुष्टी दूर करण्यास हा कल्प उपयुक्त ठरतो. यातील जांभूळ बी, अर्जुन, कुटज, लोध्र, अतिविष यांसारखी औषधे ही कषायरसाची (तुरट) असल्याने स्तंभनाचे कार्य करतात. यामुळेच हा कल्प अतिसार (Diarrhoea), प्रवाहिका (Dysentery) यांसारख्या रोगात असणारी द्रवमलप्रवृत्ती (Loose motions) कमी करण्यास उपयुक्त ठरतो. विशेषतः रक्त प्रवाहिका वा रक्तातिसार यामध्ये पडणारे रक्त त्वरेने थांबविले जाते. रक्तस्तंभनाचे कार्य या पुष्यानुग चूर्णाकडून घडत असल्यानेच रक्तार्श व अधोग रक्तपित्त यासाठीही हे चूर्ण उपयुक्त ठरते. पण या सर्वांपेक्षाही पुष्यानुग चूर्ण यशस्वीरीत्या वापरले जाते ते अनेक प्रकारच्या स्त्रीरोगांमध्ये. कषाय रस व शीत गुण व त्यामुळे होणारे रक्तस्तंभन या सर्वांमुळे पुष्यानुग चूर्ण रक्तप्रदरावरील (P. V. Bleeding) एक महत्त्वपूर्ण औषध म्हणून गणले जाते. लोध्र, गैरीक, कट्फल, अनंतमूळ, जेष्ठमध, कमलकेशर आदि द्रव्ये पुष्यानुग चूर्णातील वरील गुणकर्मांची वाढ करण्यास उपयुक्त ठरतात.

रक्तप्रदराप्रमाणेच श्वेतप्रदर (Leucorrhoea) यावरही पुष्यानुग चूर्ण वापरले जाते. सातत्याने घेतल्यास मासिकपाळीचे वेळी होणारा त्रास कमी होण्यासाठी (कष्टार्तव, dismenorrhoea) व मासिकपाळी नियमित येण्यासाठीही अत्यंत उपयोगी ठरणारा हा एक कल्प आहे.

**प्रमाण :** २ ते ३ ग्रॅ. - दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तांदळाचे धुवण (तांदूळ धुतल्यानंतर निघणारे पाणी.)

❑ ❑ ❑

## अकारानुक्रमे कल्पांची यादी


| क्र. | चूर्णाचे नाव | पृ. क्र. | क्र. | चूर्णाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिविषादि चूर्ण | ३२ | २६ | पंचसम चूर्ण | १९ |
| २ | अविपत्तिकर चूर्ण | १ | २७ | पिपल्यादि चूर्ण | २२ |
| ३ | अष्टांगलवण चूर्ण | १७ | २८ | पुष्यानुग चूर्ण | ४५ |
| ४ | अश्वगंधादि चूर्ण | ४३ | २९ | भागोत्तरचूर्ण | ४० |
| ५ | आमलक्यादि चूर्ण | २ | ३० | भास्करलवण चूर्ण | १८ |
| ६ | इसबगोल-सत्इसबगोल | ९ | ३१ | मूत्रल चूर्ण | २९ |
| ७ | अेलादि चूर्ण | २६ | ३२ | यष्टिमधु चूर्ण | ३८ |
| ८ | कट्फलादि चूर्ण | ३९ | ३३ | लवंगादि चूर्ण | २३ |
| ९ | कर्पुरादि चूर्ण | ३४ | ३४ | वडवानल चूर्ण | २० |
| १० | गंगाधर चूर्ण | १३ | ३५ | विडंगादि चूर्ण | २४ |
| ११ | गंधर्व हरितकी चूर्ण | ४ | ३६ | वृद्धगंगाधर चूर्ण<br>बृहद्गंगाधर चूर्ण | १४ |
| १२ | गोमूत्र हरितकी चूर्ण | ८ | | | |
| १३ | चंदनादि चूर्ण | २८ | ३७ | वैश्वनर चूर्ण | २१ |
| १४ | चित्रकादि चूर्ण | २१ | ३८ | शतावरी कल्प | ४४ |
| १५ | चोपचिन्यादि चूर्ण | २७ | ३९ | शतावर्यादि चूर्ण | ४५ |
| १६ | चौसष्टी पिंपळी | ३६ | ४० | शृंग्यादि चूर्ण | ३७ |
| १७ | जातिफलादि चूर्ण | १२ | ४१ | समशर्कर चूर्ण | १५ |
| १८ | तालिसादि चूर्ण | ३५ | ४२ | सामुद्रादि चूर्ण | १७ |
| १९ | त्रिफळा चूर्ण | ७ | ४३ | सारस्वत चूर्ण | ४१ |
| २० | दाडिमाष्टक चूर्ण | २५ | ४४ | सितोपलादि चूर्ण | ३३ |
| २१ | द्राक्षादि चूर्ण | १० | ४५ | सुखसारख चूर्ण | ३ |
| २२ | नवायस चूर्ण | ४१ | ४६ | सुदर्शन चूर्ण | ११ |
| २३ | नारायण चूर्ण | ५ | ४७ | स्वादिष्ट विरेचण चूर्ण | २ |
| २४ | निंबगंधक चूर्ण | ३१ | ४८ | हिंग्वाष्टक चूर्ण | १५ |
| २५ | पंचनिंब चूर्ण | ३० | | | |


❑❑❑



## रोगानुरुप चुर्णे

अग्निमांद्य -अष्टांगलवण चूर्ण, चित्रकादि चूर्ण.

अजीर्ण-दाडिमाष्टक चूर्ण, पंचसम चूर्ण, पिप्पल्यादि चूर्ण, भास्करलवण चूर्ण, वडवानल चूर्ण, वैश्वानर चूर्ण, सामुद्रादि चूर्ण, हिंग्वाष्टक चूर्ण.

अतिसार -जातिफलादि चूर्ण, लवंगादि चूर्ण, शतावरी कल्प.

अर्धांगवात -अश्वगंधादि चूर्ण, गंधर्व हरीतकी, नारायण चूर्ण.

अम्लपित्त -अविपत्तिकर चूर्ण, आमलक्यादि चूर्ण, वडवानल चूर्ण, शतावरी कल्प.

अरोचक -लवंगादि चूर्ण.

अर्श -समशर्कर चूर्ण, स्वादिष्ट विरेचन चूर्ण, सुखसारक चूर्ण, हिंग्वाष्टक चूर्ण.

आमवात -चोपचिन्यादि चूर्ण.

इसब -पंचनिंब चूर्ण.

उचकी -एलादि चूर्ण.

उन्माद -सारस्वत चूर्ण.

उन्हाळे लागणे-चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.

उपदंश -चोपचिन्यादि चूर्ण.

कफजशोथ -गोमूत्रहरीतकी चूर्ण.

कष्टार्तव -पुष्यानुग चूर्ण.

कास-कट्फलादि चूर्ण, कर्पूरादि चूर्ण, तालीसादि चूर्ण, दाडिमाष्टक चूर्ण, यष्टिमधु चूर्ण, लवंगादि चूर्ण, शृंग्यादि चूर्ण, सितोपलादि चूर्ण.

कुष्ठ -नारायण चूर्ण.

कृमी -दाडिमाष्टक चूर्ण, विडंगादि चूर्ण.

खरूज -निंबगंधक चूर्ण, पंचनिंब चूर्ण.

खोकला -कट्फलादि चूर्ण, दाडिमाष्टक चूर्ण, यष्टिमधु चूर्ण, शृंग्यादि चूर्ण, सितोपलादि चूर्ण.

गजकर्ण -पंचनिंब चूर्ण.

गलग्रह -कट्फलादि चूर्ण, पिप्पल्यादि चूर्ण, बृहत्गंगाधर चूर्ण, भागोत्तर चूर्ण, लवंगादि चूर्ण.

ग्रहणी -गंगाधर चूर्ण, पिप्पल्यादि चूर्ण, बृहत्गंगाधर चूर्ण, भागोत्तर चूर्ण, लवंगादि चूर्ण,

गुल्म-भास्करलवण चूर्ण.

छर्दि -एलादि चूर्ण.
जलोदर -गोमूत्र हरीतकी चूर्ण, नारायण चूर्ण.
जंत -दाडिमाष्टक चूर्ण, विडंगादि चूर्ण.
ज्वर -द्राक्षादि चूर्ण, सितोपलादि चूर्ण, सुदर्शन चूर्ण.
जीर्णज्वर -चौसष्टी पिंपळी, द्राक्षादि चूर्ण, नारायण चूर्ण,
तृष्णा -चंदनादि चूर्ण.
त्वचा रोग -निंबगंधक चूर्ण, पंचनिंब चूर्ण.
दंतोद्भव रोग -अतिविषादि चूर्ण, शृंग्यादि चूर्ण.
दमा -कर्पूरादि चूर्ण, चौसष्टी पिंपळी, दाडिमाष्टक चूर्ण, पिप्पल्यादि चूर्ण, यष्टिमधु चूर्म, समशर्कर चूर्ण.
दाह -चंदनादि चूर्ण.
दुष्टव्रण -त्रिफळा चूर्ण
दृष्टिदोष -त्रिफळा चूर्ण.
निद्रानाश -अश्वगंधादि चूर्ण.
नेत्र्य -त्रिफळा चूर्ण
प्रवाहिका -गंगाधर चूर्ण, बृहत्‌गंगाधर चूर्ण, लवंगादी चूर्ण.
परिकर्तिका -स्वादिष्ट विरेचन चूर्ण, सुखसारक चूर्ण.
पांडु -नवायस चूर्ण.
प्लीह दोष -भास्करलवण चूर्ण.
फिरंग -चोपचिन्यादी चूर्ण.
बद्धकोष्ठता -अविपत्तिकर चूर्ण, आमलक्यादि चूर्ण, इसबगोल, गंधर्व हरीतकी चूर्ण, त्रिफळा चूर्ण, स्वादिष्ट विरेचन चूर्ण, सुखसारक चूर्ण.
मनोदोष -सारस्वत चूर्ण.
मांसशोष -अश्वगंधादि चूर्ण.
मूतखडा -चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.
मूत्रकृच्छ्र -चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.
मूत्रदाह -चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.
मूत्राश्मरी -चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.
मूळव्याध -समशर्कर चूर्ण, स्वादिष्ट विरेचन चूर्ण, सुखसारक चूर्ण, हिंग्वाष्टक चूर्ण.
रक्तदोष -निंबगंधक चूर्ण, पंचनिंब चूर्ण.
रक्तप्रदर -पुष्यानुग चूर्ण.
रक्त प्रवाहिका -गंगाधर चूर्ण.
रक्तपित्त -चंदनादि चूर्ण.



रक्तार्श -समशर्कर चूर्ण.
राजयक्ष्मा -भागोत्तर चूर्ण, यष्टिमधु चूर्ण, सितोपलादि चूर्ण
वाजीकर -अश्वगंधादि चूर्ण, शतावर्यादि चूर्ण.
वातव्याधि -अश्वगंधादि चूर्ण, गंधर्व हरीतकी चूर्ण.
विषमज्वर -सुदर्शन चूर्ण.
विसूचिका -जातिफलादि चूर्ण.
शीतपित्त -पंचनिंब चूर्ण.
शोथ-अविपत्तिकर चूर्ण, गोमूत्र हरीतकी चूर्ण, नारायण चूर्ण.
श्वेतप्रदर -पुष्यानुग चूर्ण.
संधिवात -गंधर्व हरीतकी चूर्ण.
स्तन्य -अश्वगंधादि चूर्ण, नारायण चूर्ण.
स्मृत्याल्पता -सारस्वत चूर्ण.
हृद्रोग -गोमूत्र हरीतकी चूर्ण, सितोपलादि चूर्ण
क्षय -भागोत्तर चूर्ण, यष्टिमधु चूर्ण, सितोपलादि चूर्ण
Anaemia -नवायस चूर्ण.
Ascitis -गोमूत्र हरीतकी चूर्ण, नारायण चूर्ण.
Asthma -कर्पूरादि चूर्ण, चौसष्टी पिंपळी, पिप्पल्यादि चूर्ण, यष्टिमधु चूर्ण, समशर्कर चूर्ण, हिंग्वाष्टक चूर्ण.
Bleeding P. V. -पुष्यानुग चूर्ण.
Bleeding Piles -समशर्कर चूर्ण.
Bronchitis -कर्पूरादि चूर्ण, भागोत्तर चूर्ण.
Burning micturition -चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.
Chronic Colitis -गंगाधर चूर्ण, पिप्पल्यादि चूर्ण, बृहत् गंगाधर चूर्ण.
Chronic Fevers -नारायण चूर्ण.
Cholera -जातिफलादि चूर्ण
Constipation -अविपत्तिकर चूर्ण, आमलक्यादि चूर्ण, इसबगोल, गंधर्व हरीतकी चूर्ण, त्रिफळा चूर्ण, स्वादिष्टविरेचन चूर्ण, सुखसारक चूर्ण
Colic -एलादि चूर्ण, भागोत्तर चूर्ण.
Cough -कट्फलादि चूर्ण, कर्पूरादि चूर्ण, तालीसादि चूर्ण, दाडिमाष्टक चूर्ण, यष्टिमधु चूर्ण, शृंग्यादि चूर्ण, सितोपलादि चूर्ण.
Diarrhoea -गंगाधर चूर्ण, बृहत् गंगाधर चूर्ण, जातिफलादि चूर्ण, लवंगादि चूर्ण, शतावरी कल्प.
Dysmenorrhoea -पुष्यानुग चूर्ण.

Dysentery -गंगाधर चूर्ण, बृहत् गंगाधर चूर्ण, लवंगादि चूर्ण.

Enlarged Spleen -द्राक्षादि चूर्ण.

Epillepsy -सारस्वत चूर्ण.

Fissure in Ano -स्वादिष्ट विरेचन चूर्ण, सुखसारक चूर्ण,

Gastritis -शतावरी कल्प.

Gonorrhoea -चोपचिन्यादि चूर्ण.

Hemiplegia -अश्वगंधादि चूर्ण, गंधर्व हरीतकी चूर्ण, नारायण चूर्ण.

Insomnia -अश्वगंधादि चूर्ण.

Leukorrhoea -पुष्यानुग चूर्ण.

Maleria -सुदर्शन चूर्ण.

Nephritis -गोमूत्र हरितकी चूर्ण.

Oedema -गोमूत्र हरितकी चूर्ण, नारायण चूर्ण.

Painful micturition -चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.

Peptic ulcer -शतावरी कल्प.

Piles -समशर्कर चूर्ण, स्वादिष्ट विरेचन चूर्ण, सुखसारक चूर्ण, हिंग्वाष्टक चूर्ण.

Pneumonia -कर्पूरादि चूर्ण, शृंग्यादि चूर्ण.

P. U. O. -द्राक्षादि चूर्ण.

Purgative -अविपत्तिकर चूर्ण, आमलक्यादि चूर्ण, इसबगोल, गंधर्व हरीतकी चूर्ण, त्रिफळा चूर्ण, स्वादिष्ट विरेचन चूर्ण, सुखसारक चूर्ण.

Rheumatic Arthritis -चोपचिन्यादि चूर्ण.

Scanty Urination -चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.

Septic Wounds -त्रिफळा चूर्ण.

Syphilis -चोपचिन्यादि चूर्ण.

Tonic -अश्वगंधादि चूर्ण, द्राक्षादि चूर्ण, शतावरी कल्प, शतावर्यादि चूर्ण.

Turberculosis -भागोत्तर चूर्ण, यष्टिमधु चूर्ण, सितोपलादि चूर्ण.

Urinary stone -चंदनादि चूर्ण, मूत्रल चूर्ण.

Wasting of muscles -अश्वगंधादि चूर्ण.

Worms -दाडिमाष्टक चूर्ण, विडंगादि चूर्ण.

■ ■ ■

वैद्य य. गो. जोशी (G.F.A.M., H.P.A.) यांनी अनेक जबाबदारीच्या पदांवर कामे केली आहेत.

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे व आयुर्वेद महाविद्यालय हडपसर येथे प्राचार्य, प्राध्यापक व कायचिकित्सा विभागप्रमुख, मानद चिकित्सक- साने गुरुजी रुग्णालय-हडपसर, शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेदीय रुग्णालय, वै. पुरुषोत्तम शास्त्री नानल रुग्णालय, ब्लाईंड रिलीफ असोसिएशन नेत्र रुग्णालय, वसई इत्यादी मान्यवर रुग्णालयांत सेवा केली आहे.

आयुर्वेदाच्या सिद्धांताचा नवीन दृष्टीकोनातून विचार, आयुर्वेद शास्त्राचा प्रत्यक्षात यशस्वीपणे उपयोग करण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास, सूत्ररूप ग्रंथोक्त ज्ञानाचा प्रत्यक्षरूप उपयोग करून आयुर्वेदीय विषय निपुणतेने, सुलभसाध्य पद्धतीने शिकविण्याची हातोटी.


विद्यार्थी तसेच सर्वसामान्य व्यक्तींना आयुर्वेदाची यथायोग्य माहिती देवून त्याबद्दलचे गैरसमज दूर करून आदरभावना निर्माण करण्याचे प्रयत्न.

अनेक व्याख्याने, चर्चासत्रे, चिकित्साशिबिरांचे आयोजन.

विविध रुग्णालयातील कामकाजाप्रमाणेच खाजगी आयुर्वेदीय व्यवसाय.

कायचिकित्सा, आयुर्वेदीय पंचकर्म विज्ञान, शारीरक्रिया विज्ञान, शारीर क्रिया प्रात्याक्षिक, रोगविज्ञान-विकृतीविज्ञान, रोगावस्था, गुटीवटी, चूर्णे, आसव अरिष्ट काढे, भस्म पिष्टी रसायनकल्प, घृततैल अवलेह- मलम, ऋतुचर्या, साधे उपाय सोपे उपाय, माझं सोनुलं, यशवंत चिकित्सा, सद्य:फलदायी व आत्ययिक चिकित्सा, उदरभरण नोहे, चरक संहिता-यशवंत टीका भाग १ व २ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत.

# गुटी वटी



**वैद्य. य. गो. जोशी**

Jay U. Savla

पुणे विद्यापिठांतर्गत बी.ए.एम्.एस्. च्या अभ्यासक्रमातील 'काय-चिकित्सा' या विषयासाठी मान्यताप्राप्त संदर्भ ग्रंथ.

# गुटी वटी


**प्रा. वैद्य यशवंत गोविंद जोशी**

जी.एफ.ए.एम्., एच्.पी.ए.

- प्राचार्य आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर
- प्राध्यापक कायचिकित्सा विभाग
  आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर
- माजी प्राचार्य, प्राध्यापक, कायचिकित्सा विभाग
  टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे
- मानद चिकित्सक
  सानेगुरूजी रुग्णालय, हडपसर



**पुणे साहित्य वितरण**

GUTI VATI (MARATHI)
VAIDYA Y. G. JOSHI

**प्रकाशक**
सौ. संपदा श्याम कोपर्डेकर
पुणे साहित्य वितरण
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

**© वैद्य य. गो. जोशी**

प्रथम आवृत्ती : १९७८
द्वितीय आवृत्ती : १९८३
तृतीय आवृत्ती : १९८८
चतुर्थ आवृत्ती : १९९६
पाचवी आवृत्ती : १५ ऑगस्ट १९९९
सहावी आवृत्ती : ३० सप्टेंबर २००८
सातवी आवृत्ती : ४ नोव्हेंबर २०१३

**मुद्रणस्थळ**
मधुसूदन घळसासी
एम. आर. ॲण्ड को.
१५५२, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

**मूल्य ४५ रुपये**

आयुर्वेदीय औषधी निर्माण व सफल आयुर्वेदीय उपचार
यांच्या प्रत्यक्षाद्वारे माझ्यावर लहानपणापासूनच
सुसंस्कार करून ज्यांनी आयवेंदाची गोडी
उत्पन्न केली ते माझे वडील
कै. गो. रा. जोशी पंचनदीकर ऊर्फ
ती. अण्णांस
समर्पण...

य. गो. जोशी

## अनुक्रमणिका


| नाव | पृ. क्र. | नाव | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| आयुर्वेदीय कल्पाविषयी थोडे | १ | ३१. श्रीफल कुसुम वटी | ३२ |
| १. आरोग्यवर्धिनी | ३ | ३२. चंद्रप्रभा | ३३ |
| २. संजीवनी गुटी | ५ | ३३. गोक्षुरादि गुग्गुंळु | ३५ |
| ३. शंखोदर | ७ | ३४. स्मृतिसागर रस | ३५ |
| ४. निद्रोदय रस | ८ | ३५. उन्मादगजकेसरी | ३६ |
| ५. सूतशेखर रस | ९ | ३६. गंधक रसायन | ३७ |
| ६. लघु सूतशेखर | १० | ३७. स्वायंभुव गुग्गुळु | ३८ |
| ७. त्रिभुवनकीर्ति रस | ११ | ३८. अश्वकंचुकी | ३९ |
| ८. पारिजातक गुटी | १३ | ३९. इच्छाभेदी | ४० |
| ९. आनंदभैरव रस | १३ | ४०. नाराच रस | ४० |
| १०. चंद्रकला | १४ | ४१. जलोदरारि | ४१ |
| ११. संशमनी गुटी | १६ | ४२. कांचनार गुग्गुळु | ४१ |
| १२. लघु मालिनी वसंत | १७ | ४३. त्रिफळा गुग्गुळु | ४२ |
| १३. सुवर्णमालिनी वसंत | १८ | ४४. वातविध्वंस | ४३ |
| १४. मधुमालिनी वसंत | १८ | ४५. सिंहनाद गुग्गुळु | ४४ |
| १५. विषतिंदूक वटी | १९ | ४६. योगराज गुग्गुळु | ४५ |
| १६. अग्नितुंडी रस | २० | ४७. महायोगराज गुग्गुळु | ४६ |
| १७. वातगजांकुश | २१ | ४८. त्रयोदशांग गुग्गुळु | ४७ |
| १८. शंख वटी | २२ | ४९. पुनर्नवा गुग्गुळु | ४७ |
| १९. लशुनादि वटी | २३ | ५०. हृदयार्णव रस | ४८ |
| २०. व्योष्यादि वटी | २३ | ५१. बृहत् वात चिंतामणि | ४९ |
| २१. शूलहर वटी | २४ | ५२. वसंतकुसुमाकर | ४९ |
| २२. कांकायन गुटी | २४ | ५३. योगेन्द्र रस | ५० |
| २३. बोलबद्ध रस | २५ | ५४. लक्ष्मीविलास | ५१ |
| २४. प्रतापलंकेश्वर | २६ | ५५. नित्यानंद रस | ५२ |
| २५. कृमिमुद्‌गर रस | २७ | ५६. बाळगोळी | ५२ |
| २६. लवंगादि वटी | २७ | ५७. लेपगुटी | ५३ |
| २७. खदिरादि वटी | २९ | ५८. श्वित्रहरवर्ति | ५४ |
| २८. नागगुटी | २९ | अकारानुक्रमे कल्पांची यादी | ५६ |
| २९. चतुर्भुज रस | ३० | रोगानुरूप औषधे | ५७ |
| ३०. श्वासकुठार | ३१ | | |


❑❑❑

## आयुर्वेदीय कल्पांविषयी थोडेसे

या पुस्तिकेमध्ये काही आयुर्वेदीय औषधांचे गुणधर्म, त्यांचे उपयोग, घेण्याचे प्रमाण, अनुपान यासंबंधीची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आयुर्वेदीय औषधी या अनेकांकडून वापरल्या जातात. या वापरताना त्याचे विषयीच्या अपुऱ्या माहितीने, काही गैरसमजुतींमुळे अनेक वेळा ही औषधे निरुपयोगी ठरतात. एवढेच नव्हे तर क्वचित अपायकारकही ठरतात आणि त्यामुळे आयुर्वेदीय औषधांविषयी गैरसमज अधिकच वाढीस लागतात.

या सर्व गोष्टी टाळावयाच्या असतील तर आयुर्वेदीय औषधांचे गुणधर्म जाणून घेणे आवश्यकच ठरते. याचसाठी या छोट्या पुस्तकामध्ये काही औषधांचे विवरण केलेले आहे.

हे विवेचन करीत असताना सर्वसामान्य जनांना कळावे याच उद्देशाने यामध्ये शास्त्रीय, बोजड शब्द शक्यतो टाळले आहेत आणि व्यावहारिक शब्दांचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे.

आयुर्वेदीय औषधी द्रव्यांमध्ये वनस्पतीजन्य द्रव्यांचा उपयोग प्रामुख्याने केला जातो. निरनिराळ्या वनस्पतींचे रस, त्यांचे काढे, त्यांची चूर्णे, आसवारिष्टे वा वनस्पतींनीसिद्ध केलेली तेले किंवा तूप किंवा अवलेह अशा विविध प्रकारे ही औषधे वापरली जातात.

या वनस्पती औषधांचे जोडीला किंवा स्वतंत्रपणेही काही खनिज पदार्थांची भस्मे (उदा. सुवर्ण, रौप्य, ताम्र, लोह, अभ्रक यांची भस्मे), काही प्राणीजन्य पदार्थ (उदा. कस्तुरी, गोरोचन, गोमूत्र वगैरे) हेही वापरले जातात.

जी औषधे चूर्ण करून, एकत्रित करून दुसऱ्या रस, काढा इत्यादी द्रव पदार्थांबरोबर खलून तयार करतात त्यांना खल्वीरसायने असे म्हणतात. अशा खलून केलेल्या औषधाच्या गोळ्या बनविल्या जातात.

याप्रमाणे औषधे ही चूर्णे, काढा, आसव, अरिष्ट, अवलेह, तूप, तैल, स्वरस, गोळ्या इत्यादी अनेक प्रकारे वापरली जात असली तरी या पुस्तकामध्ये फक्त गोळ्यांची माहिती करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

गोळ्या अनेकविध असल्या तरीही नेहमीच्या वापरातील व बाजारामध्ये सुलभतेने मिळू शकणाऱ्या गोळ्यांचीच माहिती गुणकर्मासह दिलेली आहे.

गोळ्यांनाच गुटी, वटी, वटक, मोदक अशी निरनिराळी नावे दिली जातात.

वनस्पतीजन्य औषधांचे गुणधर्म वाढावेत यासाठी बरेच वेळा त्यांचे जोडीला पारा व गंधक यांपासून बनविली जाणारी संयुगे वापरतात. या संयुगाचे वापराने बनविलेल्या औषधांना रसौषधि असे म्हटले जाते. 'रस' म्हणजेच पारा. यामुळेच अनेक औषधांचे नावात शेवटी रस हा शब्द आढळतो. उदा. त्रिभुवनकीर्ति रस, सूतशेखर रस, चंद्रकला रस इ.

बहुतांशी गोळ्यांमध्ये पारा व गंधकाचे संयुग असते. कज्जली, पर्पटी, रस सिंदूर, हिंगुळ ही पारद गंधकांची संयुगे आहेत. या संयुगांमुळे इतर औषधी द्रव्यांचे गुण वाढतात व त्यामुळेच वनस्पती द्रव्ये ही थोड्या प्रमाणात वापरूनही अधिक कार्यकारी होऊ शकतात. पारद गंधकांचे संयुगाचे आणखीही एक महत्त्वाचे कार्य या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे. पारद गंधकांचे योग हे वनस्पतीजन्य द्रव्यांचे वीर्य म्हणजेच त्यांचे कार्यकारित्व कायम राखतात. या संगुयांमुळेच वनस्पती द्रव्ये कधीही किडत नाहीत, खराब होत नाहीत किंवा त्यांचे गुणधर्मही कमी होत नाहीत, त्यांना Expiry Date असत नाही उलट ही औषधी द्रव्ये जितकी जुनी तितकी ती अधिक कार्यकारी होत असतात.

गोळ्या तयार करताना वनस्पती द्रव्यांची चूर्णे, खनिज द्रव्यांची भस्मे वगैरे एकत्र करून हे मिश्रण निरनिराळ्या वनस्पतींचे रस, काढे, दुध, गोमूत्र इत्यादी द्रवपदर्थांबरोबर खलली जातात. यासाठी जे द्रव्य वापरले जाते त्या द्रवाची 'भावना' दिली असा शब्दप्रयोग केला जातो.

गोळ्या वापरण्याच्या प्रमाणावर या गोळ्यांचा आकार अवलंबून असतो. सामान्यत: १२५ मि. ग्रॅम., २५० मि. ग्रॅम., ५०० मि. ग्रॅ. या तीन आकारांमध्ये गोळ्या मिळतात.

गोळ्यांचा वापर करताना या गोळ्या ज्या बरोबर वापरल्या जातात त्यालाच 'अनुपान' असे म्हटले जाते.

अनुपान हे औषधांचे गुणधर्म वाढविण्यासाठी, त्याचे शरीरावर होणारे वाईट परिणाम कमी करणे किंवा संपूर्णतया टाळण्यासाठी किंवा औषध घेण्यास सुलभ व्हावे यासाठी वापरावे लागते.

आयुर्वेदीय औषधी कल्पांविषयी विशेषत: गोळ्यांविषयी इतक्या सर्वसामान्य विवेचनानंतर प्रत्यक्ष औषधी कल्पांचा विचार करणे शक्य होईल.

❏ ❏ ❏



## १. आरोग्यवर्धिनी

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म, ताम्रभस्म, त्रिफळा, शिलाजतु, गुग्गुळु, चित्रकमूळ, कटुका.

**भावना :** कडू निंबाचा रस.

आरोग्यवर्धिनीमधील प्रमुख घटक द्रव्य कुटकी हे आहे. कुटकी ही यकृतावर (लिव्हर) काम करते. यकृतामध्ये अन्नपचनासाठी आवश्यक असणारे पित्त निर्माण होत असते. कुटकीमुळे या पाचक रसाची (पित्ताची) उत्पत्ती चांगल्या प्रकारे होण्यास मदत होते. उत्पन्न होणारे पित्त एका नलिकेवाटे लहान आतड्यात येते व अन्नावर पचनाचे कार्य करीत असते. आरोग्यवर्धिनी मधील शिलाजतु, ताम्रभस्म यासारखी घटक द्रव्ये निर्माण झालेल्या पित्ताचे स्रवण चांगले व्हावे, लहान आतड्यापर्यंत त्या पित्ताचे चांगल्या प्रकारे वहन व्हावे याकरिता मदत करतात.

या सर्व कारणांमुळेच निरनिराळ्या प्रकारच्या यकृत विकारावर आरोग्यवर्धिनीचा उपयोग करणे लाभदायक ठरते. विशेषत: कावीळीवरील हे एक उत्कृष्ट औषध समजले जाते.

लहान मुलामध्ये यकृत दोषामुळे अनेक वेळा यकृताचा आकार वाढतो, पित्ताच्या निर्मितीमध्ये व वहनामध्ये अडथळा येतो, पचन बिघडते व कालांतराने पोटात पाणी होऊन जलोदरासारखी अवस्था निर्माण होते (Cirrhosis of the liver). केवल लहान मुलातच नव्हे तर मोठ्या माणसांमध्येही मद्यपानाच्या अतिरेकाने किंवा तत्सम इतर कारणांमुळे ही अवस्था उत्पन्न होत असते. या सर्व अवस्थेमध्ये आरोग्यवर्धिनी यशस्वीरीत्या वापरता येते.

जलोदर वा मूत्रपिंडाच्या-विकृतीमुळे सर्वांगास सूज येणे (शोथ), हृदयाच्या दौर्बल्यामुळे येणारी सूज या अवस्थांवरही आरोग्यवर्धिनीचा वापर केला जातो.

पित्त आणि रक्त यांचा अन्योन्यसंबंध आयुर्वेद शास्त्रात सांगितलेला आहे. पित्त दोषामुळे रक्तदोष होण्याची शक्यता असते. यकृत हे रक्ताच्या उत्पत्तीचे नियमन करणारे स्थान आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. आरोग्यवर्धिनी ही यकृतावर कार्य करणारी म्हणजेच पर्यायाने रक्तदुष्टी दूर करणारी आहे. रक्तदुष्टीमुळे उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रकारच्या त्वचारोगांवर, विशेषत: खरुज, नायटा, इसब यावर आरोग्यवर्धिनी वापरली जाते ती याच कारणामुळे.

आरोग्यवर्धिनी तयार करताना कडुनिंबाच्या दिलेल्या भावना यामुळेही रक्तदोष दूर होण्याचे कार्य उत्तम प्रकारे होऊ शकते.

पांडूरोगांमध्ये (Anaemia) रक्ताची निर्मिती योग्यप्रकारे होत नाही. आरोग्यवर्धिनी रक्तनिर्मितीच्या कार्याचे नियमन करणाऱ्या यकृतावर कार्यकारी असल्याने, तसेच या गुटीमध्ये लोह, ताम्र आदि रक्तनिर्मितीस आवश्यक घटक द्रव्ये असल्याने पांडूरोगामध्येही आरोग्यवर्धिनी महत्त्वाचे औषध समजले जाते.

वारंवार घसा दुखणे, सुजणे व याबरोबरच गिलायु (Tonsils) वाढणे, त्या खराब (Septic) होणे, गिलायुमध्ये पूयोत्पत्ति होणे (Acute or Chronic Tonsillitis) यावरही आरोग्यवर्धिनीचा उत्तम उपयोग होतो. फक्त गिलायूसाठीच नव्हे तर शरीरात ~~कोठेही जर~~ वारंवार सूज येत असेल (Inflammation) तर अशा अवस्थेत आरोग्यवर्धिनीचा वापर करणे श्रेयस्कर ठरते.

पाक होणे (Inflammation) हे पित्ताचे कार्य आहे असे आयुर्वेद मानतो. हे पाक होण्याचे कार्य पित्तदोष दूर झाल्याने थांबते व सूज कमी होऊन रोगी रोगमुक्त होतो.

जीर्णज्वर म्हणजेच अनेक दिवसांपासून असणारा पण थोड्या प्रमाणात असणारा ताप-हाडीताप आहे असे ज्याचे बरेच वेळा वर्णन केले जाते अशा या रोगामध्ये यकृत प्लीहा वाढते, थकवा वाढतो, रक्त कमी होते, सर्वच देहधातू क्षीण झाल्याने वजनही कमी होते. अंगात ताप सातत्याने राहिल्याने शरीरातील स्नेहांश कमी होऊन रूक्षता वाढते. या अवस्थेमध्येही आरोग्यवर्धिनी एक महत्त्वाचे औषध आहे.

वारंवार होणाऱ्या अजीर्णास बरेच वेळा यकृतदुष्टीच कारणीभूत असते. म्हणूनच आजीर्णामध्येही आरोग्यवर्धिनी वापरली जाते. बऱ्याच व्यक्तींमध्ये मलावरोध हे लक्षण आढळते. कुटकी द्रव्य मृदुविरेचन करणारे असल्याने कोठा साफ राहावा या उद्देशानेही आरोग्यवर्धिनीचा उपयोग करतात.

रक्तदाब वाढणे (High Blood Pressure) या रोगामध्ये चक्कर येते, डोके दुखते, कानांत आवाज येत राहतात, झोप कमी होते, जी झोप लागते तीही शांत लागत नाही व रोगी अस्वस्थ बनतो. वातप्रकोपजन्य अशी ही लक्षणे आहेत असे भासमान होत असले तरी पित्तावृत्त वाताची ही लक्षणे आहेत, हे लक्षात घेणे जरुरीचे आहे. यासाठीच या रोगामध्ये जी चिकित्सा करावी लागते ती आवरण केलेल्या पित्ताची. आरोग्यवर्धिनी ही उत्कृष्ट पित्तविरेचक असल्याने याचा उपयोग साहजिकच वाढलेल्या रक्तदाबासाठीही यशस्वीपणे करता येतो. शिवाय रक्तवह स्रोतसाचे मूलस्थान असणाऱ्या यकृतावर आरोग्यवर्धिनीचे विशेष कार्य असल्यानेही ती या विकारामध्ये अत्यंत उपयुक्त ठरते.

प्राकृतावस्थेमध्येही आरोग्यवर्धिनी वापरल्यास भूक वाढते, पचन सुधारते,



उत्साह वाढतो व अन्नाचे पचन चांगले झाल्याने बलही प्राप्त होते. म्हणूनच बल्य म्हणून याचा वापर केला जातो. विशेषतः लहान मुलांमध्ये बल्य म्हणून या गुटीचा उपयोग अधिक होतो असे आढळते.

याप्रमाणे आरोग्यवर्धिनी ही कावीळ, जलोदर, शोथ, जीर्णज्वर, त्वचारोग, रक्तदाब आदि अनेक रोगांवर उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे निरोगी अवस्थेमध्येही वापरल्यास भूक वाढून बल वाढते. या सर्वांमुळेच आरोग्यवर्धिनी हे सार्थ नाव या गुटिकेस दिले जाते.

**प्रमाण :** २ गोळ्या दिवसातून ३ वेळा.

लहान मुलांसाठी : १ गोळी दिवसातून ३ वेळा (गोळ्या १२५ मि. ग्रॅ. च्या असतात).

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## २. संजीवनी गुटी

**प्रमुख घटकद्रव्ये :** वावडिंग, सुंठ, पिंपळी, त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), वेखंड, गुळवेल, बिब्बा, शुद्ध बचनाग. या सर्व औषधी द्रव्यांचे चूर्णास गोमूत्राच्या भावना दिलेल्या असतात.

संजीवनी गुटी हे पचनसंस्थेवर काम करणारे उत्तम औषध आहे. भूक मंदावणे, तोंडाला चव नसणे, निरुत्साह वाटणे, अंग जड होणे, थकवा येणे, पोटात गुबारा धरणे, जुलाब वा उलट्या होणे इत्यादी लक्षणे ही अग्निमांद्याची लक्षणे समजली जातात. या सर्व लक्षणांवर संजवनी सारखे दुसरे औषध मिळणार नाही.

जुलाब होणे, आव पडणे, पोटात मुरडा होणे या सर्वांसाठी संजीवनी गुटी हे अगदी सर्वोत्कृष्ट औषध समजले जाते. यामुळे जुलाब, आव पडणे हे तर थांबतेच पण अधिक दिवस चालू ठेवले तरीही मलावष्टंभ मात्र होत नाही.

अग्निमांद्यामुळेच पोटात जंत निर्माण होत असतात. यांनाच कृमि अशी संज्ञा आहे. संजीवनी गुटीमध्ये असणाऱ्या वावडिंग व बिब्बा या दोन औषधी द्रव्यामुळे संजीवनी गुटीचा कृमीसाठी उपयोग होतो. विशेषतः गंडूपद कृमि (गांडूळाप्रमाणे लांब असणारे जंत) यावर या संजीवनी गुटीचा विशेष प्रभाव आढळून येतो.

जंतासाठी वापरल्या जाणाऱ्या इतर औषधाप्रमाणे या संजीवनी गुटीच्या वापराने जंत पडतात असे मात्र नव्हे. निर्माण झालेले, पोटात असलेले जंत

पाडण्यासाठी बाजारात मिळणाऱ्या इतर कृमिपातन करणाऱ्या औषधांचे प्रयोगानंतर पुन:पुन्हा कृमि उत्पन्न होणाची प्रवृत्ती थांबवण्याचे कार्य ही संजीवनी गुटी करीत असते.

संजीवनी गुटीमध्ये बचनाग हे एक विशेष कार्यकारी द्रव्य आहे. बचनाग हे उत्तम स्वेदन म्हणजेच घाम आणणारे (Diaphoretic) असे औषध असल्यानेच तापासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक औषधी कल्पामध्ये या बचनागाचा समावेश केलेला असतो. संजीवनी गुटीमध्ये असणाऱ्या बचनागामुळेच जुलाब होणे या लक्षणाचे जोडीला जेव्हा ताप येतो त्यावेळी या गुटीचा वापर करणे श्रेयस्कर ठरते.

लहान मुलांमध्ये विशेषत: दात येण्याचे वेळी पचनाच्या तक्रारी प्रामुख्याने आढळतात. जुलाब व ताप ही दोन्हीही लक्षणे वारंवार उत्पन्न होतात. मुले फार्च किरकिरी बनतात. या दात येण्याच्या अवस्थेमध्येही संजीवनी गुटी फार उपयोगी पडते.

वारंवार पडसे होणे, नाक चोंदणे, डोके दुखणे यासारखी लक्षणे अनेक रुग्णांमध्ये आढळून येतात. मुख्यत: ॲलर्जी हे याचे प्रमुख कारण सांगितले जाते. ही ॲलर्जी त्या रुग्णामध्ये का निर्माण होते याचे समर्पक उत्तर सांगणे मात्र कठीण आहे. वातावरणातील वाढते प्रदूषण किंवा खाण्यापिण्यातील बदललेल्या सवयी यामुळे असेल पण सध्या या प्रकारच्या रुग्णांची संख्या ही दिवसानुदिवस वाढतच आहे. याच लक्षणांची परिणती कालांतराने दम्यामध्ये झालेली आढळते.

हे सर्व रोग श्वसनमार्गाचे रोग म्हणून समजले जात असले तरी आयुर्वेदाचे मतानुसार मात्र या सर्वांचे मूलभूत कारण बिघडलेले पचन हे आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

संजीवनी गुटी हे म्हणूनच श्वसनाचे वरीलप्रकारचे विकारावरील उत्तम औषध आहे या गुटीतील बिब्बा हे द्रव्य या प्रकारच्या श्वसनविकारांवर उत्तम कार्यकारी द्रव्य होय. संजीवनीच्या उपयोगाने या रोगांपासून त्वरित आराम मिळेल असे मात्र नव्हे तर पुन:पुन्हा उद्भवणारी वरील लक्षणे ही 'मुले कुठार:' या न्यायाने निश्चितच कमी होतात व रोगी रोगमुक्त होतो. म्हणूनच अनेक दिवसपर्यंत संजीवनी गुटीचा प्रयोग चालू ठेवावा लागतो.

रोग उत्पन्न झाल्यानंतर तो बरा करणे यापेक्षा रोग उत्पन्नच होऊ नये यासाठी प्रयत्न करणे हे अधिक श्रेयस्कर ठरते. Prevention is always better than cure असे म्हणूनच म्हटले जाते. या दृष्टीने पाहातानाही संजीवनी गुटी अनेक रोगांमध्ये प्रतिबंधात्मक म्हणूनं खात्रीपूर्वक वापरता येते.



पाणी बिघडल्याने अनेक प्रकारच्या साथींचे रोग उत्पन्न होत असतात. विशेषत: कॉलऱ्यासारख्या रोगाच्या साथीमध्ये नियमाने संजीवनी गुटी घेतल्याने या रोगापासून बचाव होऊ शकतो. इतकेच कशाला पण टाईफॉईडच्या (संततज्वर) साथीमध्येही प्रतिबंधक उपाय म्हणून संजीवनी गुटीचा निश्चयाने उपयोग होतो. यासाठीच कोठेही बाहेरगावी जायचे असेल, खाण्या-पिण्यातील नियम पाळणे कठीण असेल; अजीर्ण, जागरण आदि अपथ्ये घडणार असतील तर संजीवनीचा वापर केल्याने वरील रोगांचे भय राहणार नाही.

संजीवनी गुटी ही याप्रमाणे अनेक रोगांवरील औषध असून नावाप्रमाणेच संजीवन प्राप्त करून देणारी गुटी आहे.

**प्रमाण :** २ गोळ्या दिवसातून ३ वेळा. प्रतिबंधक उपायासाठी- १ गोळी दिवसातून ३ वेळा.

(गोळी सामान्यत: १२५ मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** पाणी.

## ३. शंखोदर

**घटकद्रव्ये :** शंखभस्म, अफू, जायफळ, टंकण.

**भावना :** खसखशीचा काढा.

शंखोदरातील प्रमुख घटक द्रव्ये आहेत अफू व जायफळ. अफू आणि जायफळ ही दोन्ही द्रव्ये उत्कृष्ट स्तंभक आहेत. म्हणजेच यांच्या सेवनाने जुलाब त्वरीत थांबतात. शंखभस्मही आतड्यातील वाढलेल्या द्रवांशाचे शोषण करून अफूच्या कार्यात मदत करते.

विसूचिका (कॉलरा), गॅस्ट्रो (अतिसार) किंवा तत्सम रोगांमध्ये अगदी पातळ, पाण्यासारखे जुलाब अनेक वेळा होतात. त्यामुळे शरीरातील द्रवधातु बाहेर पडत असतो. शरीरातील द्रवांश कमी झाल्याने म्हणजेच रसक्षय झाल्याने (Dehydration) अनेक प्रकारचे उपद्रव निर्माण होतात व मृत्यूही येण्याची शक्यता असते.

अशा रोग्यांमध्ये जुलाब त्वरित थांबविण्याठी शंखोदराचा यशस्वीपणे उपयोग केला जातो. यामुळे जुलाब थांबल्याने होणारा रसक्षय तर टळतोच पण यातील अफूमुळे पोटात होणारा मुरडाही निश्चयाने कमी होतो व रोग्यांस त्वरित आराम मिळतो.

**प्रमाण :** १ ते ४ गोळ्या दिवसातून ४ वेळा (गोळी सामान्यत: १२५ मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** गोड ताजे ताक.

❑❑❑

## ४. निद्रोदयरस

**घटकद्रव्ये :** रससिंदूर, वंशलोचन, अफू, धायटी चूर्ण, आवळकाठी.

**भावना :** भांगेचा काढा.

निद्रोदय हा अफूचा एक चांगला कल्प आहे. अफूच्या उपयोगाने गुंगी येते व त्यामुळेच झोपही लागते. भांग ही मानसिक ताण कमी करून गुंगी आणविणारे द्रव्य आहे. धायटी अफू व भांगेबरोबर वापरल्याने या दोन द्रव्यांचे गुणधर्मात वाढ होते.

म्हणूनच ज्यावेळेस झोपेची नितांत आवश्यकता असते त्यावेळी निद्रोदयरसाचा उपयोग करता येतो. मानसिक ताणामुळे निर्माण होणारा निद्रानाश यावर हे उत्तम उपयोगी आहेच पण त्याचबरोबर शरीरात कोठेही कान दुखणे, दात दुखणे, पाठ दुखणे इत्यादी प्रकारच्या वेदना असतील त्या वेळी गुंगी येऊन वेदना तात्पुरत्या थांबविण्यासाठी या निद्रोदयरसाचा उपयोग होतो.

पोटात फार दुखून रोगी अस्वस्थ झाला असताना मात्र रोगाचे निश्चित निदान होण्यापूर्वी वेदना कमी करण्यासाठी हे औषध वापरू नये. कारण त्यामुळे वेदना कमी होऊन, काहीशा दबल्या जाऊन तात्पुरते बरे वाटले तरी एकादेवेळी त्यास असलेला रोग विकोपाला जाणे शक्य असते.

निद्रोदय रसात असणाऱ्या अफू व भांग यामुळे मलावरोध (Constipation) होण्याची शक्यता असते. या प्रकारे मलावरोध होऊ नये यासाठीच या कल्पामध्ये आवळकाठीसारख्या मृदु रेचन करणाऱ्या द्रव्यांची जोड दिलेली असते.

निद्रोदयरसातील अफूमुळे याची सवय लागण्याची शक्यता लक्षात घेता झोपेसाठी नित्य दररोज घेण्याचे हे औषध नव्हे, तर फक्त रोगावस्थेतच घ्यावयाचे आहे याची जाणीव मात्र ठेवली पाहिजे.

**प्रमाण :** झोपेसाठी २ ते ४ गोळ्या रात्री झोपण्यापूर्वी. वेदना कमी करण्यासाठी १ गोळी दिवसातून ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** मध, पाणी.

❑❑❑



## ५. सूतशेखररस

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, ताम्रभस्म, शंख भस्म, बचनाग, धोत्र्याचे बी, सुंठ, मिरे, पिंपळी, बेलाचा मगज, कचोरा, टंकण, चतुर्जात.

**भावना :** माक्याचा रस.

सूत शखर : याच्या गोळ्या किंवा मोठी मात्रा मिळते. सूतशेखर २ प्रकारचा असतो. साधा सूतशेखर व सुवर्ण सूतशेखर.

साध्या सूतशेखरामध्ये वरील सर्व घटक द्रव्ये असतात तर सुवर्ण सूतशेखरामध्ये वरील घटक द्रव्यांच्या जोडीला सुवर्णभस्म मिसळलेले असते.

सूतशेखर ही पित्ताची मात्रा म्हणून व्यवहारात ओळखली जाते. पित्त प्रकोप असताना विशेषत: स्निग्ध, द्रव इत्यादी गुणांनी पित्त वाढले असता सूतशेखर कार्यकारी होते. पित्तप्रकोपाचे जोडीला अग्निमांद्य असेल तर म्हणजेच साम पित्त असताना सूतशेखर वापरावे असे आयुर्वेद शास्त्र सुचविते.

आम म्हणजे अग्निमांद्यामुळे अन्नाचे पचन योग्य न झाल्याने निर्माण होणारा अपाचित (नीट न पचलेला) असा रसाधातु होय. यामुळे शरीराशी असात्म्य असे एक प्रकारचे विषद्रव्य (Toxin) तयार होते. हाच आम अनेकविध प्रकारच्या रोगांचे मूलभूत कारण असतो.

सूतशेखरामुळे वाढलेले पित्त तर कमी होतेच पण त्याच बरोबर यातील सुंठ, मिरे, पिंपळी, ताम्रभस्म यासारखी औषधी द्रव्ये अग्निमांद्य दूर करण्यासाठी, आम कमी करण्यासाठीही उपयुक्त ठरतात.

अग्निमांद्य व पित्तप्रकोप असणारा प्रमुख व्याधि अम्लपित्त हा आहे. अम्लपित्तमध्ये आंबट ढेकरा येणे, घशाशी व छातीत जळजळणे, मळमळणे वा उलटी होणे अशांसारखी लक्षणे असतात. ही सर्व लक्षणे सूतशेखरने तत्काळ कमी होतात. लिंबू सरबतातून घेतल्यास याचा अधिक लाभ होतो.

डोके दुखणे हेही अम्लपित्ताचे एक प्रमुख व रोग्याला त्रासदायक असे लक्षण आहे. दररोज सकाळी डोके दुखणे, ते जड होणे अशी लक्षणे असताना सूतशेखरने निश्चयाने आराम मिळतो. अम्लपित्तामुळे दुखणाऱ्या डोकेदुखीसाठी ॲस्पीरीनसारखी वेदनाशामक औषधे घेतल्यास वेदना कमी होण्याऐवजी डोकेदुखीचे जोडीला चक्कर येणे यासारखी लक्षणे मात्र उत्पन्न होत असतात. म्हणूनच अशावेळी सूतशेखर हे एकमेव औषध समजावे लागते.

पित्तप्रकोपामुळेच गरगरणे, चक्कर येणे ही लक्षणे उत्पन्न होतात. यासाठी

सूतशेखर आल्याच्या रसाबरोबर दिले जाते.

ओकारी मग ती अजीर्णामुळे असो, अम्लपित्तामुळे असो वा इतर काही कारणांनी असो ती कमी करण्याचे कार्य सूतशेखर करते.

सूतशेखरमध्ये असणाऱ्या बचनागामुळे तापावरील एक चांगले औषध म्हणूनही हा कल्प ओळखला जातो. ज्वर हा पित्ताचा व्याधि व यामध्येही अग्निमांद्य असतेच. म्हणूनच सूतशेखर उपयुक्त आहे. विशेषत: तापाचे प्रमाण अधिक असेल (१०२° फॅ. पेक्षा जास्त) तर सूतशेखर अधिक लाभदायी ठरते.

सूतशेखर पित्ताची मात्रा म्हणून ओळखली जात असली तरीही सर्व प्रकारच्या पित्तलक्षणांवर याचा उपयोग होतो असा मात्र याचा अर्थ नव्हे. पित्त जेव्हा तीक्ष्ण, उष्ण गुणांनी वाढलेले असेल त्यावेळेस सूतशेखर काहीही उपयोगी नाही. यामध्ये ताम्रासारखी तीक्ष्ण औषधे असल्याने क्वचित अशा अवस्थेमध्ये सूतशेखरने त्रास अधिकच वाढतो हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणूनच हातापायाची, डोळ्यांची व सर्वांगाची आग, जळजळ होत असताना हे जरी पित्ताचे लक्षण असले तरीही सूतशेखर अनुपयुक्त ठरते.

सुवर्ण हे उत्तम पित्तघ्न द्रव्य समजले जाते. म्हणुनच साध्या सूतशेखरपेक्षा सुवर्ण सूतशेखर हे अधिक कार्यकारी ठरते.

**प्रमाण :** सूतशेखरची मात्रा असल्यास उगाळून वापरली जाते. उगाळल्याने ते अधिक कार्यकारी होत असल्याने कमी प्रमाणात दिले जाते. एकावेळेस मात्रेचे ४ ते ५ वळसे उगाळले जातात. गोळ्या असतील तर एक ते दोन गोळ्या दिवसातून ३ वेळा. (गोळी सामान्यत: १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** आल्याचा रस, लिंबूसरबत किंवा दूध.

❏ ❏ ❏

## ६. लघु सूतशेखर

**घटकद्रव्ये :** सुंठ, सोनकाव.

**भावना :** नागवेलीच्या (विड्याच्या) पानांचा रस.

लघुसूतशेखर हे अम्लपित्तावरील एक प्रभावी औषध आहे. अम्लपित्तामध्ये अग्निमांद्य हे प्रमुख लक्षण असते. पोटात दुखणे, छातीत जळजळणे, घशाशी आंबट येणे, मळमळणे व उलटी होणे अशी लक्षणेही यामध्ये आढळतात. यामध्ये अग्निप्रदीप्त करणारी, दीपन औषधे वापरावी लागतात.



लघुसूतशेखरमधील सुंठ ही उत्तम पित्तशामक असून जाठराग्नि वाढविणारी व म्हणूनच अम्लपित्तावरील उत्कृष्ट औषधी समजली जाते. याचे जोडीला असणारे सोनकावही एक पित्तशामक असे द्रव्य आहे. सोनकावेमुळे अम्लपित्तामध्ये वाढलेला द्रवांश कमी होऊन मळमळणे, उलटी होणे वगैरे लक्षणे कमी होतात.

विड्यांची पाने (नागवेल) ही सुद्धा उत्कृष्ट दीपन, पाचन असल्याने त्यांचाही अम्लपित्तासाठी उपयोग होतो.

अम्लपित्ताप्रमाणेच अजीर्णामुळे उत्पन्न होणारी मळमळ किंवा उलटी कमी करण्यासाठीही लघुसूतशेखरचा उपयोग होतो.

सूतशेखरपेक्षा घटक द्रव्ये सर्वस्वी वेगळी असूनही सूतशेखरप्रमाणेच पित्तावर, विशेषत: अम्लपित्तावर कार्यकारी असल्यानेच या कल्पाला लघुसूतशेखर म्हटले जाते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** लिंबू सरबत किंवा विड्याबरोबर.

❏ ❏ ❏

## ७. त्रिभुवनकीर्ति रस

**घटकद्रव्ये :** हिंगुळ (पारा व गंधकाचे एक संयुग), बचनाग, सुंठ, टंकण, पिंपळी, पिंपळमूळ.

**भावना :** तुलसी स्वरस, आर्द्रक (आले) स्वरस व स्वर्णक्षीरी (पिवळा धोत्रा) स्वरस.

त्रिभुवनकीर्ति हे तापावरील औषध म्हणून सर्वसामान्यपणे ओळखले जाते. बचनाग हा यातील एक महत्त्वाचा घटक. बचनाग हे विषद्रव्य असले तरीही ते शुद्ध करून योग्य प्रमाणात वापरल्याने औषधी द्रव्य म्हणून याचा उपयोग करता येतो.

बचनाग हा उत्तम स्वेदन करणारा म्हणजेच घाम आणणारा (Diaphoretic) आहे. बचनाग असल्याने त्रिभुवनकीर्तीमुळे घाम येतो आणि ताप उतरण्यास मदत होते. त्रिभुवनकीर्तीतच नव्हे तर तापासाठी वापरल्या जाणाऱ्या अन्य औषधी कल्पामध्येही बचनाग हा महत्त्वाचा घटक असतोच.

त्रिभुवनकीर्तीमधील दुसरे महत्त्वाचे द्रव्य हिंगुळ हे होय. हे पारा व गंधकाचे संयुग आहे. पारा व गंधक यांपासून अनेक प्रकारची संयुगे बनतात. ही सर्व संयुगे

योगवाही असतात. योगवाही म्हणजेच ज्या द्रव्यांबरोबर मिसळून वापरली जातात त्या दुसऱ्या द्रव्याचे गुणधर्म वाढवणारी द्रव्ये. हिंगुळ योगवाही असल्याने बचनागादि इतर द्रव्यांचे गुणधर्म वाढतात व थोड्या प्रमाणात वापरूनही या द्रव्यांचे गुण मात्र वाढलेले आढळतात.

हिंगुळ हा उत्तम कफघ्न आहे. श्वसनमार्गातील विशेषत: फुफ्फुसामध्ये निर्माण होणाऱ्या कफाचे शोषण हिंगुळामुळे होते. त्रिभुवनकीर्तीमध्ये असणारी टंकण, पिंपळी ही द्रव्येही याचप्रकारचे कार्य करतात.

त्रिभुवनकीर्ति तयार करताना तुळस, आले व स्वर्णक्षीरी या तीन वनस्पतींच्या रसामध्ये खल केलेला असतो. या तिन्ही वनस्पती उत्तम कफघ्न म्हणून ओळखल्या जातात.

या सर्वांमुळेच त्रिभुवनकीर्तीचा उपयोग तापाबरोबर जेव्हा खोकला असतो, खोकल्यातून जेव्हा कफ अधिक प्रमाणात बाहेर पडतो अशावेळी अधिक होत असतो. फ्लू किंवा न्युमोनिया सारख्या तापावर (वातकफज्वर) म्हणूनच त्रिभुवनकीर्ति ही अधिक उपयोगी पडते.

त्रिभुवनकीर्ति फक्त तापावरच उपयोगी पडते असे नव्हे तर बरेच वेळा अंग मोडून येते, कसर वाटते, खोकला येतो, सर्व अंग ठणकते अशा प्रकारची लक्षणे उत्पन्न होतात, रुग्ण यामुळे अगदी बेचैन होतो. या अवस्थेत ताप मात्र फारसा येत नाही. या अवस्थेमध्ये तत्काळ आराम मिळण्यासाठी त्रिभुवनकीर्तिसारखे दुसरे औषध शोधूनही मिळणे कठीण.

वारंवार होणारे पडसे व त्यामुळे निर्माण होणारी डोकेदुखी यापासून त्वरीत आराम मिळण्यासाठीही त्रिभुवनकीर्ति लाभदायी दिसून येते.

त्रिभुवनकीर्तिमधील हिंगुळ, बचनाग आदि सर्वच द्रव्ये ही फार तीक्ष्ण अशी औषधी द्रव्ये आहेत. यामुळेच तापामध्ये जेव्हा वात किंवा कफाची लक्षणे आढळतात तेव्हाच त्रिभुवनकीर्ति वापरता येते. या उलट तापाचे प्रमाण अधिक असेल; हात, पाय, डोळे यांची जळजळ होत असेल, खोकताना कफाबरोबर रक्त पडत असेल किंवा याप्रकारची इतर पित्ताची लक्षणे आढळून येत असतील तर त्रिभुवनकीर्तीचा वापर करणे टाळले पाहिजे. पित्तप्रकृतीच्या रुग्णामध्येही त्रिभुवनकीर्ति फार जपून वापरली पाहिजे.

**प्रमाण :** २ गोळ्या दिवसातून ३ वेळा.

लहान मुलांमध्ये : १ गोळी दिवसातून ३ वेळा (गोळी सामान्यत: १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी किंवा मध.

❑❑❑



## ८. पारिजातक गुटी

**घटकद्रव्ये :** हिंगुळ, बचनाग, सुंठ, मिरे, पिंपळी, पिंपळमूळ, टंकण.

**भावना :** तुळशी रस, आल्याचा रस, पिवळ्या धोतऱ्याचा रस, पारिजातकांच्या पानांचा रस.

पारिजातक गुटीमध्ये त्रिभुवनकीर्ति प्रमाणेच सर्व घटक असून भावनाही त्रिभुवनकीर्ति प्रमाणेच आहेत. म्हणजेच त्रिभुवनकीर्तीलाच पारिजातकाच्या पानांच्या रसात खलून पारिजातक गुटी बनविली जाते. या कल्पाचा उपयोग त्रिभुवनकीर्तीप्रमाणेच ताप, खोकला, पडसे इत्यादींसाठी होतो.

पारिजातक हे अत्यंत कडू रसाचे असते. कडू रस हा ताप नाहीसे करणारा म्हणूनच वापरला जातो. पारिजातकामुळे घामही बराचसा येतो व म्हणूनच ताप उतरण्याची क्रिया अधिक त्वरेने घडते.

पारिजातकाचा विशेष उपयोग हिवतापासाठी होतो. अशा प्रकारच्या तापामध्ये थंडी वाजून ताप भरतो व काही वेळाने दरदरून घाम येऊन ताप उतरतो. ठराविक दिवसांनी अशा प्रकारचा थंडी ताप येत राहतो. पारिजातक गुटी हे यावरील औषध आहे.

मलेरियाच्या अनेक रोग्यांमध्ये मलेरियसाठी उपलब्ध असणारी औषधे घेऊनही ताप येण्याचा क्रम थांबत नाही. अशाही रोग्यांमध्ये पारिजातक गुटी निश्चितपणे गुणकारी ठरते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, आल्याचा रस.

❑❑❑

## ९. आनंदभैरव रस

**घटक द्रव्ये :** बचनाग, मिरे, पिंपळी, टंकण, हिंगुळ.

**भावना :** आल्याचा रस.

आनंदभैरव हा खोकल्यावरील एक उत्तम कल्प आहे. यामध्ये असणारे मिरे, पिंपळी ही द्रव्ये उत्तम कफनाशक अशी आहेत. तसेच फुफ्फुसाला बळ देणारी आहेत. हिंगुळ हाही फुफ्फुसातील कफाचे शोषण करतो व म्हणूनच खोकला, पडसे इ. लक्षणे कमी होतात. टंकण हे द्रव्य हिंगुळाला सहाय्यकारी व कफनाशक असेच

आहे.

या सर्व कफनाशक द्रव्यांचे जोडीला दिलेली आल्याच्या रसाची भावना ही कफनाशाचे कार्यास पोषक अशीच आहे.

आनंदभैरव रसामध्ये बचनाग हाही एक घटक आहे. बचनाग हा उत्तम स्वेदन म्हणजेच घाम आणणारा असून त्यामुळे ताप उतरण्यास मदत होते व यासाठीच तापावरील एक उत्तम औषध म्हणून या कल्पाचा वापर केला जातो.

ज्या तापामध्ये खोकला, पडसे, घसा दुखणे इत्यादी कफाची लक्षणे बरीच असतात अशा फ्ल्यूसारख्या प्रकारामध्ये म्हणूनच या आनंदभैरव रसाचा उपयोग अधिक होतो. यातील सर्वच द्रव्ये उष्ण, तीक्ष्ण असल्याने ज्या तापामध्ये सर्वांगाची आग होते, तापाचे प्रमाण अधिक असते अशा प्रकारात मात्र आनंदभैरव वापरणे इष्ट नव्हे.

आनंद भैरव रसाचे दोन पाठ मिळतात. त्यापैकी हा खोकल्याकरीता वापरला जाणारा कल्प आहे. दुसऱ्या पाठातील घटक द्रव्ये संपूर्णपणे वेगळी आहेत म्हणूनच आनंदभैरव (कास) असे लिहिलेले औषधाचे वरील गुणधर्म आहेत. आनंदभैरव (अतिसार) चे नव्हेत हे मात्र निश्चितपणे लक्षात ठेवले पाहिजे.

**प्रमाण :** २ ते ३ गोळ्या ३ वेळा. गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.

**अनुपान :** आल्याचा रस, मध.

❑ ❑ ❑

## १०. चंद्रकला

**घटक द्रव्ये :** पारा, गंधक, ताम्रभस्म, अभ्रकभस्म.

**भावना :** नागरमोथा काढा, डाळींबाचा रस, दूर्वा रस, केवड्याचा रस, सहदेवी रस, कोरफडीचा रस, पित्तपापडा काढा, मरवा रस, शतावरी रस.

**प्रक्षेप :** कुटकी, गुळवेल सत्व, पित्तपापडा, वाळा, मधुमालती, चंदन, अनंतमूळ.

**भावना :** द्राक्षारस.

पारा, गंधक, ताम्र, अभ्रक यांना प्रथमत: नागरमोथ्याचा काढा व इतर शतावरी रसापर्यंतच्या एकूण ९ द्रव्यांच्या भावना दिल्या जातात. त्यानंतर त्यात कुटकीपासून अनंतमूळापर्यंतची ७ औषधे मिसळून पुन्हा द्राक्षारसाच्या भावना देऊन हा कल्प बनविला जातो.



एकंदरीत पाहता उत्कृष्ट पित्तशामक म्हणूनच हा कल्प उपयोगी आहे हे स्पष्ट आहे.

या कल्पामध्ये वापरली जाणारी सर्वच औषधे ही शीत गुणाची व म्हणूनच पित्त कमी करणारी अशी आहेत. अपवाद फक्त पारा, गंधक व ताम्र यांचा. यापैकी पारा व गंधकाची संयुगे ही स्वत:चे गुणधर्म व्यक्त न करता ज्या इतर द्रव्यांबरोबर वापरली जातात त्या इतर द्रव्यांचे गुण वाढविण्याचे कार्य करीत असतात. अशा द्रव्यांना योगवाही ही शास्त्रीय संज्ञा आहे. **Catalytic agent** प्रमाणेच हे कार्य आहे असे म्हणता येईल.

ताम्रभस्म हे जरी तीक्ष्ण, उष्ण गुणाचे असले तरी उत्कृष्ट पित्तविरेचक द्रव्य म्हणून ओळखले जाते. याचे तीक्ष्ण, उष्ण, विषारी गुण कमी करण्यासाठी नागरमोथा वगैरे अनेक शीत गुणांच्या वनस्पतींच्या रसात हे खलले जाते. म्हणजेच ताम्रभस्मावर शीत गुणांचे संस्कार होत असतात. या सर्वांमुळे ताम्राचा पित्तविरेचन हा अपेक्षित गुण मिळतो पण त्यामुळे होणारे दुष्परिणाम मात्र टाळले जातात.

याप्रमाणे या कल्पामध्ये वापरली जाणारी नागरमोथा, पित्तपापडा, केवडा, सहदेवी, चंदन, मधुमालती, शतावरी, गुळवेल, मरवा, वाळा इत्यादी सर्वच औषधे ही शीतगुणांची, थंड प्रकृतीची असल्याने पित्त जेव्हा तीक्ष्ण, उष्ण गुणाने वाढते त्यावेळेस या कल्पाचा उत्तम उपयोग होतो.

याचसाठी तापामध्ये जेव्हा ताप तीव्र होतो, १०३° फॅ. किंवा त्याहीपेक्षा अधिक प्रमाणात वाढतो त्यावेळी चंद्रकलेचा उपयोग केल्याने ताप लवकर कमी होत असतो.

कोणत्याही कारणाने शरीरामध्ये वाफा आल्यासारखे वाटणे, अंगाची आग होणे, डोळे जळजळणे यासारखी लक्षणे असतील तर चंद्रकला यशस्वीपणे वापरली जाते.

पित्ताच्या उष्ण, तीक्ष्ण गुणाचा अतिरेक झाल्याने अनेक वेळा नाकातून अचानक रक्त येऊ लागते. घुणा फुटला असे याला व्यावहारिक भाषेत म्हटले जाते. असे वारंवार घडत असेल तर ते थांबविण्यासाठी चंद्रकला उपयोगी पडते.

नाकातूनच नव्हे तर असाच रक्तस्राव तोंडातून, गुदमार्गाने, मूत्रमार्गाने वा योगनीमार्गानेही होण्याची शक्यता असते. हा पित्ताचा तीक्ष्ण, उष्णगुण वाढल्याने होणारा रक्तस्राव चंद्रकला वापरल्याने त्वरित थांबतो.

चंद्रकिरण जसे शीतल असते, चांदणे दाह कमी करणारे असते, तशीच शीतलता उत्पन्न करून उष्ण, तीक्ष्ण गुणांचा नाश करणारे असल्यामुळेच या

औषधाला चंद्रकला हे सार्थ नाव दिलेले आहे.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून चार वेळा. (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## ११. संशमनी गुटी

**घटक द्रव्ये :** गुळवेल.

प्रथमतः गुळवेलीचा काढा करून, नंतर तो काढा आटवला जातो. यामुळे जो घन भाग मिळतो त्याच्याच गोळ्या करून त्याला संशमनी गुटी असे म्हटले जाते.

याचाच अर्थ संशमनी गुटी म्हणजे केवळ गुळवेलीचा घन आहे.

गुळवेल हे उत्तम अग्निदीपन करणारे, त्रिदोष नाशक-विशेषतः वात नाशक व पित्तनाशक, तसेच रक्तदोष दूर करणारे औषध आहे. या गुणांमुळेच अनेक वातरोगांमध्ये व पित्ताच्या विकारांमध्येही संशमनी गुटीचा वापर केला जातो.

ज्वर किंवा ताप येणे हा एक पित्ताचा रोग. ताप अनेक कारणांनी येतो व अनेक प्रकारचा असू शकतो. पण अनेक वेळा तापाचे कारण सांगता येत नाही. P.U.O. किंवा Pyrexia of Unknown Origin असे याचे निदान (?) केले जाते. अशा अवस्थेमध्ये संशमनी गुटी उत्तम कार्यकारी ठरते. केवळ या प्रकारच्याच तापांमध्ये नव्हे तर अन्य सर्व प्रकारांतही संशमनी गुटीच्या उपयोगाने ताप उतरतो, दाहादि लक्षणे कमी होतात.

गुळवेल हे रक्तदोष दूर करणारे औषधी द्रव्य असल्याने रक्तदोष ज्यामध्ये प्रामुख्याने आढळतो, असे सर्व प्रकारचे त्वचारोग संशमनीने कमी होतात.

गुळवेल हे उत्तम वातघ्न औषध आहे. म्हणूनच संधिवात, आमवात, वातरक्त या रोगांमध्ये असणारी सांधेदुखी कमी करण्यासाठी या कल्पाचा उपयोग होतो.

या सर्वांचे जोडीला गुळवेल हे बल्य, विशेषतः हृदयाला बळ देणारे द्रव्य असल्याने कोणत्याही रोगात, रोगामुळे येणारे दौर्बल्य, अशक्तपणा दूर करण्यासाठी, शरीरभाव पुन्हा प्राकृत स्थितीमध्ये आणण्यासाठी संशमनी गुटीचा उपयोग करणे हितावह ठरते.

**प्रमाण :** ताप कमी होण्यासाठी- १० ते २० गोळ्या दिवसातून ४ वेळा. अन्य कारणांसाठी ५ ते १० गोळ्या दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑



## १२. लघु मालिनी वसंत

**घटकद्रव्ये :** कलखापरी, मिरे.

**भावना :** लोणी, लिंबूरस.

शुद्ध कलखापरी आणि मिरे यांचे चूर्णामध्ये लोणी मिसळून नंतर हे मिश्रण लिंबाच्या रसात त्याचा ओशटपणा कमी होईपर्यंत खलून 'लघु मालिनी वसंत' बनविले जाते.

कलखापरी हे यातील महत्त्वाचे घटक द्रव्य. रस, रक्त, मांस आदी सर्व शरीर धातूंचे उत्पत्तीस आवश्यक असणारा अग्नि (धात्वग्नि) वाढविण्याचे महत्त्वाचे कार्य या कलखापरीचे आहे. काळी मिरी हीही या प्रकारचेच अग्नि वाढविण्याचे पचनशक्ती वाढविण्याचे कार्य करते. शरीरास बल प्राप्त करून देण्यासाठी विशेषतः मांस धातूची उत्पत्ति होणे आवश्यक असते. मिरे मांसाग्नि वाढवितात व मांसाचे पोषण चांगले होण्यास मदत करतात. म्हणूनच तर मांसाशन करतांना त्याबरोबर मिरपूड घेण्याची सर्वमान्य रूढी आहे.

कलखापरी व मिरे हे याप्रमाणे उत्कृष्ट धात्वग्निवर्धक असले तरी ती अत्यंत रुक्ष औषधे आहेत. त्यांच्या रुक्षतेचा शरीरावर कोणताही वाईट परिणाम होऊ नये म्हणूनच त्यात लोणी मिसळलेले असते. लिंबू रस हा पुनः पचनशक्ती वाढविण्याकरता वापरला जातो.

वरील सर्व गुणधर्मांचा विचार करता हे स्पष्ट होईल की कोणत्याही कारणाने जर बल कमी झाले असेल, वजन कमी झाले असेल तर लघुमालिनी वसंत वापरणे अत्यंत लाभदायक ठरते.

राजयक्ष्म्यामध्ये (टी. बी.) येणारे दौर्बल्य कमी करण्यासाठी उत्कृष्ट औषध म्हणून याची गणना केली जाते. तापानंतर किंवा अन्य कोणत्याही रोगानंतर येणारे दौर्बल्य कमी करण्यासाठी या कल्पाचा उत्तम उपयोग होतो.

धात्वग्निमांद्य प्रधान असणाऱ्या जीर्ण ज्वरासारख्या अन्य रोगावरही या कल्पाचा वापर करणे लाभदायी ठरते.

कफाचे शोषण करणारा हा कल्प असल्यानेच वारंवार पडसे, त्यामुळे निर्माण होणारी डोकेदुखी कमी करण्यासाठीही या कल्पाचा उपयोग करता येतो.

रोगी अवस्थेतच नव्हे तर प्राकृतावस्थेमध्येही लघु मालिनी वसंत घेतल्यास भूक वाढते, अन्नपचन सुधारते, धातूंची चांगल्या तऱ्हेने वाढ होण्यास मदत मिळते व वजनही वाढते. अर्थात अशा वेळी जोडीला बल्य आहार मात्र हवाच.

**प्रमाण :** २ गोळ्या दिवसातून ३ वेळा. गोळी सामान्यत: २५० मि. ग्रॅ. ची असते.

**अनुपान :** लोणी + साखर.

❑❑❑

## १३. सुवर्ण मालिनी वसंत

**घटकद्रव्ये :** लघु मालिनी वसंत प्रमाणेच सर्व अधिक हिंगुळ व सुवर्णभस्म.

कलखापरी व मिरे ही घटक द्रव्ये यामध्येही असल्याने सुवर्ण मालिनी वसंत ही लघुमालिनी वसंत प्रमाणेच सर्व कार्य करते.

सुवर्ण मालिनी वसंतात असणारे सुवर्णभस्म उत्तम बल्य औषध समजले जाते. याचमुळे वजन वाढावे म्हणून लघु मालिनी वसंतपेक्षा अधिक उपयोगी पडते.

हिंगुळ हाही यातील घटक आहे. हिंगुळ हे श्वसन मार्गातील कफाचे शोषण करणारे द्रव्य असल्याने सुवर्ण मालिनी वसंत हा कल्प राजयक्ष्यामध्ये सकफ कास असताना वापरण्यास उत्कृष्ट समजला जातो.

दम्यासारख्या रोग्यांमध्येही श्वसन मार्गाला बल प्राप्ती होण्यासाठी व पर्यायाने दम्याचे वारंवार येणारे वेग कमी करण्यासाठी या सुवर्ण मालिनी वसंतचा चांगला उपयोग होतो.

**प्रमाण :** १ गोळी दिवसातून ३ वेळा. गोळी सामान्यत: १२५ मि. ग्रॅ. ची असते.

**अनुपान :** लोणी + साखर

❑❑❑

## १४. मधु मलिनी वसंत

**घटकद्रव्ये :** यामध्येही लघुमालिनी वसंत प्रमाणेच घटक द्रव्ये असतात. जोडीला हिंगुळही असतो. यामध्ये लोण्याऐवजी अंड्यांचा बलक मिसळलेला असतो व त्यास लिंबाच्या रसात खलून गोळ्या बनविलेल्या असतात.

अंडी ही पौष्टिक, बल्यपदार्थात अग्रगण्य समजली जातात. अंड्यातील बलकापासून संपूर्ण पक्षी-बालक जन्माला येत असते. याचाच अर्थ अंड्यामध्ये, शरीरातील सर्वच भावपदार्थांच्या उत्पत्तीस पोषक अशी घटक द्रव्ये उपलब्ध असतात,



असा होतो.

याप्रमाणे कलपाखरी व मिरे या धात्वग्नि वाढवून धातूंच्या उत्पत्तीस मदत करणाऱ्या औषधांना या प्रकारचे उत्कृष्ट बल्य पदार्थाची जोड मिळाल्याने मधुमालिनी वसंत हा कल्प बल्य, सर्व प्रकारचे शरीरधातू वाढविणारा, वजन वाढविणारा, एक अजोड कल्प बनतो.

कालपाखरी व मिरे हे दोन्ही रुक्ष असल्याने कफघ्न म्हणूनही त्यांचा उपयोग होतो. यामुळेच राजयक्ष्म्यात असणारा खोकला, कफ पडणे ही लक्षणे मधुमालिनी वसंतच्या उपयोगाने निश्चितच कमी होतात.

लघुमालिनी वसंत प्रमाणेच याचा उपयोग राजयक्ष्मा, दमा आदि व्याधिंमधे केला जातो.

**प्रमाण :** २ गोळ्या दिवसातून ३ वेळा. गोळी सामान्यत: २५० मि. ग्रॅ. ची असते.

**अनुपान :** लोणी + साखर

❑❑❑

## १५. विषतिंदुक वटी

**घटकद्रव्ये :** हिरडा, कारस्कर (कुचला) ही दोन द्रव्ये कांजीमध्ये भाजून नंतर त्यात हिंग, वावडिंग, सैंधव, पादेलोण, मीठ, ओवा, कीरमाणी ओवा, सुंठ, मिरे, पिंपळी, गंधक ही द्रव्ये मिसळतात.

**भावना :** लसूण रस.

विषतिंदुकवटी मधील प्रमुख घटक द्रव्य कारस्कर म्हणजेच कुचला हे आहे. कुचला हे एक विषद्रव्य असून ते शुद्ध करून मगच वापरले जाते. कुचल्याचे कार्य प्रामुख्याने होते मांसधातुवर. ऐच्छिक व अनैच्छिक स्नायु असे जे स्नायुंचे दोन प्रकार या दोहोंवरही याचे कार्य घडत असते तरी विशेषत: अनैच्छिक स्नायुवर या द्रव्याचा अधिक परिणाम झालेला आढळतो.

कुचल्यामुळे मांसधातूला संहनन प्राप्त होते. संहनन म्हणजेच Tone. याचा अर्थ कुचल्यामुळे मांसधातूची कार्यशक्ती वाढते. ज्या व्याधीमध्ये स्नायूंचा Tone कमी होतो, स्नायु शिथील होतात असे अनेक व्याधी विषतिंदुकवटीने बरे होतात.

लहान व मोठे आतडे हे अनैच्छिक स्नायुंचेच बनलेले असते. आतड्यांच्या हालचाली सातत्याने चालू असतात व त्यामुळे खाल्लेले अन्न घुसळले जाते, पुढे

पुढे ढकलले जाते. जर आतड्याचे स्नायुंमध्ये शिथिलता आली तर हे कार्य कमी होते व अन्न एकाच ठिकाणी बराच काळ राहून पोटात दुखणे, मळमळणे यांसारखी अनेकविध लक्षणे निर्माण होतात. अशा अवस्थेमध्ये आतड्याची कार्यशक्ति विषतिंदुकवटीमुळे वाढते व यामुळे उत्पन्न होणारी लक्षणे नाहीशी होतात.

अगदी बाल्यावस्थेतमध्ये मुले रात्री गादीतच मूत्रत्याग करतात. जसजसे वय वाढेल तसतसे या मूत्रत्यागाचे क्रियेवर मुलांचे नियंत्रण येते व न कळत होणारी मूत्रप्रवृत्ति थांबते. परंतु काही मुलांमध्ये वय वाढले तरी रात्री गादी भिजवणे मात्र थांबत नाही. मूत्रमार्गाचे ठिकाणी असणाऱ्या स्नायुंवर नियंत्रण नसल्याचे हे लक्षण आहे. या स्नायूंचा टोन वाढावा, त्यांची कार्यशक्ती वाढावी याकरिता विषतिंदुकवटी वापरली जाते. या कल्पाच्या सेवनाने लक्षणीय असा फायदा आढळून येतो. मात्र याकरिता सातत्याने २-३ महिने विषतिंदुकवटीचा उपयोग करणे आवश्यक ठरते.

कारस्करामुळे मांसधातूस संहनन प्राप्त होते, शैथिल्य दूर होते व म्हणूनच जेव्हा पुरुषामध्ये इंद्रियाचा ताठरपणा कमी होऊन नैसर्गिक संभोगशक्ती कमी होते अशा अवस्थेत (Sexual Debility) विषतिंदुकवटीचा उपयोग करणे अत्यंत लाभदायी ठरते.

विषतिंदुकवटीतील इतर सर्व औषधे ही भूक वाढविणारी व अन्नपचन सुधारण्यास मदत करणारी अशी औषधे आहेत. लसूण हे सुद्धा असेच अग्नि वाढविणारे द्रव्य आहे. याचसाठी विषतिंदुकवटी ही बरेच दिवसांपासून असणारे अग्निमांद्य कमी करण्यासाठीही वापरली जाते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा. (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** तूप साखर.

❏❏❏

## १६. अग्नितुंडी रस

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, ओवा, वावडिंग, पळसाचे बी, कुचला.

**भावना :** मध.

अग्नितुंडीमधील प्रमुख घटकद्रव्य कारस्कर म्हणजेच कुचला हे आहे व म्हणूनच विषतिंदुकवटी प्रमाणेच स्नायुशैथिल्य दूर करण्यासाठी या कल्पाचाही चांगला उपयोग होतो.



पोटात दुखणे, बरेच काळ असणारे अग्निमांद्य यावर म्हणूनच या कल्पाचा उपयोग होतो.

या कल्पातील औषधे ही अग्नि वाढविणारी तर आहेतच पण त्याचबरोबर वावडींग, पळसाचे बी यासारखी द्रव्ये कृमिघ्नही आहेत. पोटातील जंत, विशेषत: गांडूळासारखे लांब जंत (Common round worms) तसेच सुताच्या धाग्यासारखे दिसणारे छोटे छोटे जंत (Thread worms) यावर अग्नितुंडीचा सफल उपयोग करता येतो.

आंत्रपुच्छ शोथ (Chronic appendisitis) हा जेव्हा बराच काळ टिकून राहतो त्यावेळेस यामुळे उत्पन्न होणारा उदरशूल (पोटातील वेदना) या अग्नितुंडीच्या सेवनाने त्वरीत कमी होतो.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी किंवा तूप साखर.

❏❏❏

## १७. वातगजांकुश

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, कुचला, सुंठ, मिरे, पिंपळी.

**भावना :** लिंबूरस.

वातगजांकुश हाही अग्नितुंडी किंवा विषतिंदूक वटी प्रमाणेच कुचल्याचा एक कल्प आहे. परंतु यामध्ये कुचल्याचे प्रमाण मात्र या दोन्हीपेक्षा खूपच कमी आहे.

अग्नितुंडी, विषतिंदूकवटी याप्रमाणेच हाही कल्प अजीर्ण, अग्निमांद्य व त्यामुळे निर्माण होणारी पोटदुखी यावर उत्तम काम करतो, कारण या कल्पामध्येही सुंठ, मिरी, पिंपळी सारखी अग्निप्रदीप्त करणारी औषधे आहेलच. तसेच आंत्राच्या ठिकाणी आलेल्या शैथिल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या उदरवेदनाही या कल्पाने कमी होतात.

अनेकवेळा आंत्राच्या प्राकृत हलचालींमध्ये अवरोध उत्पन्न होऊन अन्न पुढे ढकलण्याचे कार्यामध्ये अडथळा येतो व त्यामुळे पोटात तीव्र वेदना सुरू होतात. Colicky type च्या या प्रकारच्या वेदना कमी करण्याचे काम वातगजांकुशाने चांगले घडते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** गरम पाणी.

❏❏❏

## १८. शंखवटी

**घटक द्रव्ये :** चिंचाक्षार, स्नुहीक्षार, अर्कक्षार, शंखभस्म, हिंग, अष्टलवणे, यवक्षार, सज्जीक्षार.

**भावना :** लिंबाचा रस, चित्रकमूल काढा, माक्याचा रस, निर्गुडी रस, मुंडी रस, आल्याचा रस.

शंखवटीमध्ये अनेक वनस्पतींचे क्षार आहेत. हे सर्व क्षार जठर व लहान आतड्यातील पाचक रसांतील स्राव वाढविण्यास मदत करणारे आहेत. त्याचप्रमाणे यात असणारी हिंग, शंखभस्म इत्यादि द्रव्येही जाठराग्नि प्रदीप्त करून भूक वाढविणारी म्हणून प्रसिद्ध आहेत. याशिवाय लिंबाचा रस, आल्याचा रस, चित्रकमूल क्वाथ इत्यादींच्या भावना दिलेल्या असल्याने या कल्पाचे अग्निदीपनाचे कार्य प्रकर्षाने वाढते.

याच सर्व कारणांमुळे शंखवटी हा अजीर्णावरील उत्तम औषधी कल्प समजला जातो.

भूक न लागणे, पोटात गुबारा धरणे, पोटात दुखणे, मळमळणे किंवा उलटी होणे, जुलाब होणे, जीभ अस्वच्छ, पांढरी, लिप्त असणे ही सर्व अजीर्णाची लक्षणे आहेत. या सर्व लक्षणांसाठी शंखवटी वापरता येते.

नको इतके व नको ते पदार्थ खाण्यानेच भूक मंदावते असे नव्हे. इतरही अनेक कारणांनी अग्निमांद्य निर्माण होणे शक्य असते. अशा अग्निमांद्य पीडित व्यक्तींमधील अग्निमांद्य बरेच कालपर्यंत टिकते. यामध्ये तोंडाला चव नसते, खाण्यावर इच्छाच होत नाही, पोट नेहमी भरल्याप्रमाणेच भासते. याही अवस्थेत शंखवटी उत्तम कार्यकारी ठरते.

अम्लपित्त, परिणाम शुल अशा रुग्णांमध्ये तसेच ज्या रुग्णांमध्ये Hyper acidity किंवा Peptic ulcer असतो अशा रुग्णांमध्ये मात्र उदरवेदना असूनही शंखवटीचा उपयोग करू नये. अशा रुग्णांमध्ये शंखवटीचा फायदा होण्याऐवजी क्वचित् अधिक पीडाच होण्याची शक्यता असते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ४ वेळा (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑



## १९. लशुनादि वटी

**घटकद्रव्ये :** लसूण, सुंठ, मिरे, पिंपळी, हिंग, सैंधव, गंधक.

**भावना :** लिंबू रस.

लशुनादि वटीलाच गंधक वटी असेही नाव काही वेळेला दिले जाते. या कल्पातील सर्व औषधी द्रव्ये ही जठराग्नि प्रदीप्त करणारी म्हणजेच दीपन, पाचन अशी आहेत.

याचसाठी या कल्पाचा उपयोग अग्निमांद्य, अजीर्ण या रोगात व त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या पोटात दुखणे, गुबारा धरणे, मळमळणे इत्यादी लक्षणांसाठी प्रामुख्याने केला जातो.

यामध्ये असणाऱ्या लसूण, हिंग या द्रव्यांमुळे आतड्याच्या हालचाली प्राकृत ठेवण्यासाठी मदत होते.

आतड्यामध्ये तसेच मूत्रमार्ग, पित्तवाहिनी यामध्ये जर काही कारणांनी अडथळा निर्माण झाला तर किंवा त्याच्या प्राकृत हालचाली थांबल्या तर (Spasm किंवा वेठ येणे) तीव्र स्वरूपाच्या वेदना सुरू होतात. यांनाच Colicky pain असे म्हटले जाते. यामध्ये वेदनेच्या तीव्रतेमुळे रुग्ण अत्यवस्थ होतो. वेदना सहन न झाल्याने गडबडा लोळू लागतो.

अशा अवस्थेमध्ये वातानुलोमक म्हणून, Anti Spamodic म्हणून, लशुनादि वटी खरोखरीच उत्कृष्ट कार्य करते.

लशुनादि वटी साठी सर्वसामाण्यपणे गरम पाणी हे अनुपान वापरतात. पण यापेक्षाही लवकर व चांगले कार्य लशुनादि वटीचे घडावे याकरिता लशुनादि वटी तोंडात धरून चघळणे श्रेयस्कर ठरते.

**प्रमाण :** १ गोळी दिवसातून ४ वेळा - अजीर्णासाठी. आत्ययिक रुग्णामध्ये १-१ गोळी प्रत्येक १५ मिनिटांनी - उदरवेदना कमी होईपर्यंत.

(गोळी सामान्यत; २५० मि. ग्रॅ. ची असते.)

❑❑❑

## २०. व्योष्यादि वटी

**घटकद्रव्ये :** त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), अम्लवेतस, चित्रक, जीरक.

या कल्पातील सर्वच द्रव्ये जाठराग्नि वाढविणारी, आमाचे पचन करणारी

अशीच आहेत.

या कल्पाचा उपयोगही अग्निमांद्य, अजीर्ण व तद्जनित पोटात दुखणे, गुबारा धरणे, मळमळणे यासाठी उत्तम प्रकारे होतो.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसांतून ३ वेळा (गोळी सामान्यतः २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## २१. शूलहर वटी

**घटकद्रव्ये :** सुंठ, टंकण, सैंधव, हिंग.

**भावना :** शेवग्याच्या पाल्याचा रस.

शूलहर वटीमधील सुंठ, हिंग, शेवगा ही सर्वच द्रव्ये जाठराग्नि वाढविणारी आहेत. यामुळेच अग्निमांद्य व अजीर्णावरील एक उत्तम औषध म्हणून या कल्पाचा उपयोग होतो.

सुंठी सारखी द्रव्ये असल्याने अजीर्णामुळे होणारे जुलाब याने त्वरित कमी होतात. हिंग हे उत्तम वातनाशक औषधी द्रव्य असल्याने पोटात धरणारा गुबारा, वारंवार येणाऱ्या ढेकरा ही अजीर्णजन्य लक्षणेही लगेचच कमी होतात.

विशेषतः पोटात दुखणे-उदरशूल-हे अजीर्णातील महत्त्वाचे लक्षण याने त्वरित थांबते म्हणूनच या कल्पाला शूलहर वटी म्हटलेले आहे.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## २२. कांकायन गुटी

**घटक द्रव्ये :** हिरडा, मिरे, पिंपळी, पिंपळमूळ, चव्य, चित्रक, सुंठ, बिब्बा, सुरण, यवक्षार, गूळ.

कांकायनगुटी हे अर्शावरील म्हणजेच मुळव्याधीवरील (Piles) एक उत्तम औषध म्हणून प्रसिद्ध आहे.



गुदभागी होणारे अर्श (गुदार्श) यांचे उत्पत्तीचे मूलभूत कारण आहे अग्निमांद्य. अर्श, अतिसार, संग्रहणी यासारखे रोग अग्निमांद्याशिवाय उत्पन्नच होऊ शकत नाहीत असे आयुर्वेद शास्त्र सुचविते. म्हणूनच अर्श किंवा मुळव्याध बरी होण्यासाठी अग्नि वाढविणारी, दीपन अशी औषधी चिकित्सा करावी लागते.

कांकायन गुटीतील सर्वच औषधे ही अग्निदीपन करणारी व म्हणूनच अर्शावर उपयुक्त अशी आहेत.

मुळव्याध ही दोन प्रकारची असते. स्रावी व शुष्क. स्रावी प्रकारात मलप्रवृत्तिबरोबर किंवा नंतर रक्त पडते. याउलट शुष्कार्शामध्ये मोड येतात, दुखते, पण रक्तस्राव मात्र असत नाही. कांकायन गुटीमध्ये असणारा भल्लातक (बिब्बा) हा उत्कृष्ट दीपन करणारा व म्हणून अर्शोघ्न असला तरी तीक्ष्ण असल्याने रक्ती मुळव्याधीमध्ये वापरणे अनिष्ट ठरते. म्हणूनच कांकायनगुटीचा उपयोग फक्त शुष्क अर्शासाठीच होतो, रक्ती मुळव्याधीसाठी नव्हे, हे विशेषतः लक्षात ठेवले पाहिजे.

कांकायन गुटीतील सुरण हेही असेच उत्तम दीपन औषध असून याच्या सेवनाने मलप्रवृत्ति साफ होऊन मुळव्याधीचा त्रास कमी होतो. सूरण हे मूळव्याधिवरील श्रेष्ठ औषध आहे, असेच वर्णन आयुर्वेदीय ग्रंथातून मिळते.

इतर सर्व औषधे अग्नि प्रदीप्त करून बिब्बा व सुरण यांचे कार्य अधिक वाढवितात.

**प्रमाण :** २ ते ४ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी मोठी म्हणजे ५०० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## २३. बोलबद्ध रस

**घटक द्रव्ये :** पारा, गंधक, गुळवेलसत्त्व, रक्तबोळ.

**भावना :** काटेसावरीच्या सालींचा काढा.

यातील महत्त्वाचे घटकद्रव्य रक्तबोळ हे आहे. रक्तस्राव थांबविणारे असे हे द्रव्य आहे. (येथे रक्तबोळ आहे. काळा बोळ नव्हे. काळा बोळ हा रक्तस्राव वाढविणारा आहे.) गुळवेलसत्त्व हेही शीत असल्याने रक्तस्तंभनाचे कार्य करते. काटे सावरीची साल कषाय रसाची म्हणजेच तुरट असून त्यामुळेही रक्तस्राव थांबविण्यास मदत होते.

याप्रमाणे बोलबद्धरस हा रक्तस्तंभन करणारा श्रेष्ठ कल्प आहे. विशेषतः

अधोमार्गाने रक्तस्राव होत असेल वर बोलबद्धरसाचा अधिक चांगला उपयोग होतो. म्हणजेच गुदमार्ग, मूत्रमार्ग व योनिमार्गातून रक्तस्राव होत असेल तर हा कल्प अधिक उपयुक्त ठरतो.

यामुळेच रक्तार्श (रक्ती मूळव्याध), रक्तज प्रवाहिका (रक्ती आव), रक्तप्रदर (योनिमार्गातून होणारा रक्तस्राव) यासारख्या रोगांमध्ये याचा उपयोग होतो.

**प्रमाण :** २ ते ४ गोळ्या दिवसातून ४ वेळा (गोळी सामान्यत: २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## २४. प्रतापलंकेश्वर

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, मिरे, लोहभस्म, शंखभस्म, गाईच्या गोवऱ्यांची राख, बचनाग, अभ्रकभस्म.

**भावना :** माक्याचा रस.

प्रतापलंकेश्वर हा स्त्रीरोगांवरील एक औषधी कल्प आहे. श्वेतप्रदर हा एक स्त्री रोग. यामध्ये योनिमार्गातून श्वेतस्राव होत असतो. (धुपणी किंवा पांढरे जाणे). त्यामुळे कंबर फार दुखते, अशक्तपणाही अतिशय येतो. प्रतापलंकेश्वराच्या उपयोगाने श्वेतप्रदर कमी होतो व त्यामुळे उत्पन्न होणारी सर्व लक्षणेही कमी होतात.

प्रतापलंकेश्वर या कल्पामधील औषधे ही उत्तम कफनाशक आहेत. या कल्पांमध्ये गोवऱ्यांची राख ही जवळजवळ इतर सर्व औषधांच्या एकत्रित प्रमाणाइतकी म्हणजेच ५० टक्के इतकी असते. या गोमयाच्या राखेमुळे कफाचे उत्तम प्रकारे शोषण होते.

लोहभस्म हेही तुरट, स्राव कमी करणारे असल्याने उपयुक्त ठरते. लोह व अभ्रक भस्मांमुळे अशक्तपणा कमी होतो. बल प्राप्त होते.

प्रतापलंकेश्वरमध्ये असणाऱ्या बचनाग या घटकद्रव्यांमुळे तापावरही उपयोगी असा हा कल्प आहे. विशेषत: सुतिकाज्वरांवर (बाळंतपणानंतर येणारा ताप) याचा लाभ दिसून येतो.

बाळंतपणानंतर उत्पन्न होणारे ताप, योनिदोष, श्वेतप्रदर, स्तन्यदोष आदि उपद्रव टाळण्यासाठी प्रतिबंधक उपाय म्हणूनही बाळंतपणानंतरचे पहिले १० दिवस प्रतापलंकेश्वर वापरल्यास हे सर्व उपद्रव टाळता येतात.

**उपाय :** १ ते ३ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** गरम पाणी, मध.

❑❑❑



## २५. कृमिमुद्‌गर रस

**घटक द्रव्ये :** पारा, गंधक, कीटमारी ओवा, वावडिंग, कुचला, पळसाचे बी.

**भावना :** नागरमोथा काढा.

कृमिमुद्‌गर रस या नावावरूनच हा एक कृमिसाठी म्हणजेच पोटातील जंतांसाठी वापरला जाणारा कल्प आहे हे स्पष्ट होते.

कीटमारी ओवा, वावडिंग, पलाशबीज ही सर्वच औषधे कृमिघ्न आहेत. आकाराने लांबट असे गंडूपद कृमि (Common round worms), सूताच्या धाग्यासारखे दिसणारे सुत्रांकुर कृमि (Thread worms) आदि सर्वच प्रकारच्या जंतांवर या औषधाचा उपयोग होतो.

पलाशबीज जसे कृमिघ्न आहे तसेच ते मृदुविरेचन करणारेही आहे. यामुळे पातळ मल आल्याने कृमि पडण्यास मदतच होते. अन्य काही जुलाबाचे औषधाची जरूरी भासत नाही.

केवळ असलेले कृमि पडून जाण्यासाठीच नव्हे तर पुन:पुन्हा कृमींची उत्पत्ति होण्याची प्रवृत्ति थांबविण्यासाठीही या कृमिमुद्‌गर रसाचा उपयोग होतो. कृमिमुद्‌गर रसातील वावडिंग या द्रव्यामुळे हे घडते.

पोटात असणाऱ्या जंतांमुळे पोटात दुखते, पोटात वेठ येतात तसेच पोट फुगते. ही सर्व लक्षणे कमी करून तत्काळ आराम मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य कारस्कर किंवा कुचला या द्रव्यामुळे घडते.

म्हणूनच कृमिपातन व कृमींची उत्पत्ती थांबविणारा उत्तम कल्प म्हणजेच कृमिमुद्‌गर रस होय.

**प्रमाण :** २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असे)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## २६. लवंगादि वटी

**घटक द्रव्ये :** लवंग, मिरे, बेहडा, कात.

**भावना :** बाभळीच्या सालींचा काढा.

लवंगादि वटी मधील सर्व घटक द्रव्ये ही कंठ्य म्हणजेच घशावर उपयोगी

अशी द्रव्ये आहेत.

यामुळेच पडसे किंवा तत्सम इतर कारणामुळे जेव्हा घसा धरतो, दुखू लागतो, बोलताना त्रास होतो किंवा घसा बसतो या सर्व अवस्थांमध्ये लवंगादि वटी उत्तम कार्यकारी ठरते.

खोकल्यावरील उत्तम औषध म्हणूनही या गोळ्या ओळखल्या जातात. घशामध्ये निर्माण झालेली विकृती किंवा फुफ्फुसातील विकृती या दोन कारणांनी खोकला निर्माण होतो. यापैकी घशातील विकृतीमुळे उत्पन्न झालेल्या खोकल्यावर लवंगादि वटी वापरली जाते.

कोरडा खोकला असताना, ढास लागली असताना खोकून खोकून रुग्ण बेजार होतो. लवंगादि वटीच्या वापराने ढास लगेच थांबते. काही वेळा खोकल्यामुळे येणारा कफ हा चिकट असल्याने घशात अडकतो, लवकर बाहेर पडत नाही व रुग्णास सतत खोकल्याची ढास येत राहते. लवंगादि वटीमधील द्रव्यांचे मुळे हा कफ लवकर सुटण्यास मदत होते व त्यामुळेही खोकल्यापासून त्वरित आराम मिळतो.

दम्याच्या रुग्णामध्येही अशीच अवस्था उत्पन्न होत असते. दम्याचा ॲटॅक आलेला असताना घशात कफ अडकतो, तो लवकर बाहेर पडत नाही. त्यामुळे ढास लागते. अडकलेल्या कफाने अधिकाधिक श्वासावरोध होऊन दमा वाढतो. खोकण्याच्या श्रमामुळेही दमा वाढत असतो. अशा वेळीही लवंगादि वटी उत्तम लाभदायी ठरते व त्याच्या उपयोगाने दम्याचा ॲटॅक नियंत्रित करण्यासाठी मदत होते.

लवंगादि वटी ही याप्रमाणे घशावर कार्यकारी असल्याने ती चघळल्यानेच उपयोगी ठरते. चघळल्याने निर्माण होणारा लालारस हा घशापर्यंत पोहोचतो व त्यामुळे ही द्रव्ये कार्यकारी होऊ शकतात.

लवंगादि वटी चघळताना खडीसाखरेचा खडा तोंडात धरल्याने लवंगादि वटीचे गुणधर्म अधिक वाढतात.

**प्रमाण :** दिवसातून ४ पासून १० गोळ्यांपर्यंत प्रत्येक वेळी १-१ गोळी याप्रमाणे.

❑❑❑



## २७. खदिरादि वटी

**घटकद्रव्ये :** खदिरसाल, इरिमेद, लवंग, कंकोळ, जायफळ, जायपत्री, कापूर.

लवंगादीवटीप्रमाणेच अनेक कंठ्य (घशावर उपयोगी) अशी औषधे खदिरादि वटी मध्येही आहेत. घशातील बिघाडामुळे उत्पन्न होणाऱ्या खोकल्यासाठी उपयुक्त ठरणारे हेही एक औषध आहे. याचा उपयोग चांगला होण्यासाठी या गोळ्या तोंडात धरुन चघळाव्या लागतात. चघळल्याने घशात अडकलेला कफ सुटा होतो व लवकर बाहेर पडतो. दम्यासारख्या रोगामध्ये ॲटॅक असताना येणारा खोकला खदिरादिच्या उपयोगाने त्वरेने कमी होतो.

लवंगादि प्रमाणेच चघळताना खडीसाखरही तोंडात धरणे अधिक लाभदायी ठरते.

**प्रमाण :** दिवसातून ४ ते १० गोळ्या, प्रत्येक वेळी १-१ गोळी या प्रमाणे चघळावे.

**अनुपान :** खडीसाखर.

❑❑❑

## २८. नागगुटी

**घटक द्रव्ये :** लवंग, जायफळ, जायपत्री, बचनाग, मिरे, पिंपळमूळ, कस्तूरी, केशर.

**भावना :** आल्याचा रस.

नागगुटी हा कस्तूरीचा एक महत्त्वाचा कल्प आहे. नागगुटीतील लवंग, मिरे, कस्तूरी, केशर, बचनाग ही सर्वच औषधे उष्ण आहेत. कफघ्न आहेत. कस्तूरीही कफाचे शोषण करून रूक्षता निर्माण करणारी आहे. याच सर्व गुणधर्मामुळे नागगुटी हे पडश्यावरील उत्तम औषध समजले जाते.

विशेषत: ज्या पडश्यामध्ये नासास्राव अधिक असतो अशा पडश्यामध्ये कस्तूरीच्या शोषण गुणामुळे तत्काळ फायदा मिळतो.

पडश्यामुळे घसा दुखणे, आवाज बसणे इत्यादि निर्माण होणारी लक्षणेही नागगुटींने त्वरित कमी होतात.

नागगुटीमध्ये बचनाग आहे. बचनाग उत्तम स्वेदन करणारा म्हणजेच घाम

आणणारा असल्याने नागगुटीच्या सेवनाने पडश्यामुळे निर्माण होणारी ज्वर, अंग मोडून येणे, डोके दुखणे ही लक्षणे तत्काळ कमी होतात.

कस्तूरी, लवंग आदि द्रव्यांमुळे, या रोगात निर्माण होणारा खोकला त्वरित थांबतो. आल्याचा रस हाही उत्तम कफघ्न असल्याने नागगुटीच्या एकंदर गुणधर्मात वाढच होते.

एकंदरीत पाहता पडश्यावरील तत्काळ लाभदायी असा सर्वोत्कृष्ट कल्प म्हणून नागगुटीचा उल्लेख करावा लागेल.

नागगुटीत कस्तूरी हे अत्यंत रुक्षता उत्पन्न करणारे द्रव्य असल्याने याचे प्रमाण मात्र कमी आहे. अधिक प्रमाणात नागगुटी वापरल्यास नाक फारच कोरडे पडते व त्यामुळे श्वासोच्छ्वासास अवरोध होण्याची शक्यता असते. इतकी रूक्षता येऊ नये याची काळजी घेणे आवश्यकच आहे; परंतु जर अशी रूक्षता निर्माण झालीच तर तूप १-१ चमचा कोमट पाण्याबरोबर पोटात घेतले व तूपाचेच काही थेंब नाकात सोडले तर यापासून त्वरित आराम मिळतो.

**प्रमाण :** १ गोळी दिवसातून ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** विड्याच्या पानाबरोबर.

❑ ❑ ❑

## २९. चतुर्भुज रस

**घटक द्रव्ये :** रससिंदूर, हरताळ, मन:शिल, कस्तूरी, सुवर्णभस्म.

**भावना :** कुमारी (कोरफड) रस.

चतुर्भुज रसातील सर्वच घटक द्रव्ये ही उत्तम कफनाशक आहेत त्याचप्रमाणे फुफ्फुस व हृदयाला बळ देणारी आहेत.

रससिंदूर, हरताळ, मन:शिला व कस्तूरी ही सर्वच औषधे श्वसनमार्गातील कफाचे शोषण करण्याचे कार्य करतात. कस्तूरीकडून हे कार्य प्रकर्षाने घडत असते. सुवर्ण हे हृदयाला बल देणाऱ्या द्रव्यामध्ये श्रेष्ठ समजले जाते.

न्यूमोनियामध्ये फुफ्फुसामध्ये कफ अधिक प्रमाणात साठतो. कफ साठल्याने श्वासास अडथळा येतो. खोकला अतिशय असतो आणि छातीमध्ये दुखते. अशा रोग्यांमध्ये चतुर्भुजरस हे सर्वोत्कृष्ट औषध आहे. चतुर्भुजामुळे कफाचे शोषण होते. श्वासावरोध कमी होतो व खोकलाही कमी होतो.

ब्रॉन्कॉयटीसमध्ये असाच कफसंचय फुफ्फुसामध्ये होऊन अवरोध उत्पन्न



होतो. खोकला अत्यधिक प्रमाणात असतो. याही अवस्थेत उपयुक्त असा हा कल्प आहे.

कस्तूरी ही अत्यंत रुक्ष असल्याने केवळ कफप्रधान रोगात हा कल्प वापरता येतो. कोरडा खोकला असताना हा कल्प वापरल्यास बरे वाटण्याऐवजी अधिकच त्रास होतो हे लक्षात ठेवले पाहिजे.

**प्रमाण :** १/२ ते १ गोळी दिवसातून ३ वेळ (गोळी ५० मि. ग्रॅ. ची असते.)

किंवा चतुर्भुज मात्रा उगाळून वापरली जाते.

**अनुपान :** आल्याचा रस, मध.

❑ ❑ ❑

## ३०. श्वासकुठार

**घटक द्रव्ये :** पारा, गंधक, बचनाग, टंकण, मन:शिल, मिरे, सुंठ, पिपळी.

तमकश्वास किंवा श्वासरोग म्हणजे दमा (Bronchial Asthama) या श्वासाचा नाश करणारे जे औषध ते श्वासकुठार हे होय. या कल्पातील प्रमुख घटक द्रव्ये मिरे व मन:शिल ही आहेत.

अस्थमा किंवा दमा यामध्ये जी अनेक लक्षणे असतात त्यामध्ये दम लागणे हे प्रमुख लक्षण होय. दम रात्रीचे वेळी जास्त प्रमाणात लागतो. दम लागल्यानंतर उठून बसावे लागते. झोपल्याने अधिक त्रास होतो. रोग्याला खोकला येतो, ढास लागते पण कफ मात्र लवकर सुटत नाही. तो सुटला की थोडेसे बरे वाटते.

अशा प्रकारचा हा श्वासरोग दोन प्रकारचा असतो. एका प्रकारात छातीत कफ दाटतो. खोकल्यात कफाचे प्रमाणही अधिक असते. हा कफप्रधान श्वासरोग होय. याउलट दुसऱ्या प्रकारात अगदी कोरडा खोकला असतो, कफष्ठिवन अजिबात नसते. हा वातप्रधान प्रकार आहे.

हे जे दम्याचे दोन प्रकार त्यापैकी केवल कफप्रधान तमकश्वासासाठी श्वासकुठारचा उपयोग होतो. मिरे, मन:शिला, टंकण आदि द्रव्ये रुक्ष आहेत. यांच्या उपयोगाने रूक्षता येऊन कफ कमी होतो व त्यामुळे श्वसनमार्ग मोकळा होऊन दमही कमी होतो. परंतु याच रुक्षतेमुळे वातप्रधान तमकश्वासात याचा उपयोग केल्यास रुक्षतेने वात वाढून दम अधिक वाढतो.

म्हणजेच दम्यामध्ये श्वासकुठार हे उत्तम औषध असले तरी प्रथमत: हा दमा

कोणत्या प्रकारचा आहे याची निश्चिती करून फक्त कफप्रधान दम्यामध्येच श्वासकुठार वापरले पाहिजे ही गोष्ट स्पष्ट होईल. हे सर्व झाले, दम लागला असतानाचे विवेचन. जेव्हा ॲटॅक कमी होतो त्यावेळी पुन्हा पुन्हा असा दम्याचा ॲटॅक येऊ नये यासाठीही काही चिकित्सा करावी लागते. या अवस्थेमध्येही श्वासकुठार हे एक उत्तम औषध आहे.

तमकश्वास किंवा दमा हा आमाशयात उद्‌भवणारा रोग आहे, हे शास्त्रीय वचन लक्षात घेतले तर श्वासकुठारचा उपयोग कसा होतो हे लक्षात येईल. श्वासकुठारामधील मिरे हे द्रव्य उत्कृष्ट अग्निदीपन करणारे, आमाशयावर कार्य करणारे असे द्रव्य आहे. श्वासाचा वेग (Attack) पुन्हा येऊ नये यासाठी आमाशयाला बल देणे आवश्यक असते व हेच कार्य श्वासकुठार हा कल्प करतो.

दोन ॲटॅकच्या मधल्या काळात श्वासकुठारचा उपयोग दोन्ही प्रकारच्या दम्यामध्ये होतो हे विशेष. याच्या वापराने दोन ॲटॅकमधील अंतर वाढते व येणारा ॲटॅक हा फारसा तीव्र असत नाही.

**प्रमाण :** २ ते ४ गोळ्या दिवसातून २ वेळा. (गोळी सामान्यतः १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** मध, आल्याचा रस.

❑❑❑

## ३१. श्रीफल कुसुम वटी

**घटकद्रव्ये :** श्रीफल कुसुम, गोरोचन, जायफळ, सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, लवंग, जायपत्री, केशर, अक्कलकारा, कापूर, जिरे.

श्रीफल कुसुम म्हणजे नारळाच्या पोयीतील फुले व अगदी बारीक कोवळे नारळ, यापासून बनविली जाते म्हणून ही श्रीफलकुसुमवटी. हे राजयक्ष्म्यावरील (T.B.) एक उत्तम औषध समजले जाते.

या गुटीमध्ये अग्निदीपन करणारी, धातूंचे उत्पत्तीस आवश्यक असा धात्वग्नि वाढविणारी तसेच श्वसन मार्गावर कार्यकारी अनेक घटक द्रव्ये आहेत.

गोरोचन, सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, लवंग, अक्कलकारा ही सर्व कफनाशन करणारी द्रव्ये आहेत. उरःस्थानामध्ये, छातीत श्वसनमार्गात साठलेल्या कफावर ही कार्यकारी होतात. राजयक्ष्म्यामध्ये असणारा खोकला, त्याबरोबर असणारे कफष्ठिवन ही लक्षणे म्हणूनच या गुटीमुळे त्वरीत कमी होतात. या गुटीमध्ये कापूर आहे.



कापूर सेवन केल्यानंतर तो नेहमीच श्वासाबरोबर शरीराबाहेर टाकला जातो. यामुळेच श्वासाला कापराचा गंध येऊ लागतो व तोंडाला येणारी किंवा श्वासाला असणारी दुर्गंधी सहज दूर होते.

श्रीफलकुसुम हे मधुररसाचे, बल्य, स्निग्ध, रसरक्तादि सर्व शरीरधातू वाढविणारे औषधी द्रव्य आहे. या श्रीफलकुसुमाला धात्वग्निवर्धन करणाऱ्या औषधी घटकांची जोड मिळाल्याने ही वटी राजयक्ष्म्यातील अनेक औषधांपैकी एक उत्तम वटी समजली जाते.

विशेषतः दौर्बल्य कमी व्हावे, खोकला कमी व्हावा, खोकल्याबरोबर असणारा कफ कमी व्हावा व पर्यायाने राजयक्ष्मा दूर व्हावा यासाठी या कल्पाचा उपयोग केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ गोळ्या दिवसातून ३ वेळा. (गोळी सामान्यतः २५० मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** दूध

❑❑❑

## ३२. चंद्रप्रभा

**घटकद्रव्ये :** कचोरा, वेखंड, नागरमोथा, गुळवेल, देवदार, हळद, अतिविष, पिंपळमूळ, चित्रक, निशोत्तर, दंतीमूळ, तमालपत्र, दालचिनी, वेलदोडा, वंशलोचन, धने, त्रिफळा, चव्य, वावडिंग, गजपिंपळी, मिरे, सुंठ, पिंपळी, पंचलवण, लोहभस्म, शिलाजतु, गुग्गुलु.

**भावना :** त्रिफळा क्वाथ.

चंद्रप्रभेमधील महत्त्वाची औषधे म्हणजे शिलाजतु व गुग्गुलु ही होत. हिमालयातील एका विशिष्ट प्रकारच्या खडकामधून उन्हाळ्यामध्ये खडक वितळून रस पाझरू लागतो. तोच हा शिलाजतु होय. शिलाजतुला गोमूत्राचा वास असतो. शिलाजतु हे मूत्रमार्गावर काम करणारे द्रव्य आहे. चंद्रप्रभेमध्ये असणारी कचोरा, नागरमोथा, देवदार, हळद, धने इत्यादि द्रव्ये शिलाजतुचे गुणधर्म वाढविण्यास उपयुक्त ठरतात.

मूत्रनिर्मितीचे कार्याचे नियमन या चंद्रप्रभेमुळे होते. म्हणूनच ज्या ज्या रोगांमध्ये मूत्राचे प्रमाण वाढते वा कमी होते, या दोन्ही प्रकारांमध्ये या कल्पाचा उपयोग करता येतो.

Pyelitis किंवा Nephritis हे मूत्रपिंडाच्या विकृतीमुळे उत्पन्न होणारे रोग. या

रागांमध्ये तोंडावर सूज येणे व ती क्रमाने वाढत जाऊन सर्वांगावर येणे, मूत्राचे प्रमाण कमी होणे, थंडी वाजून ताप येणे, अंग जड होणे यांसारखी लक्षणे उत्पन्न होतात. मूत्र परीक्षणामध्ये मूत्रामध्ये Albumin व Pus cells आढळतात.

चंद्रप्रभा हे वरील लक्षणांवर उत्तम कार्यकारी असे औषध आहे.

अनेक वेळा मूत्रमार्गातील दुष्टीमुळे सदाहमूत्रता हे लक्षण उत्पन्न होते. मूत्रप्रवृत्ति थोडी थोडी, वारंवार होते व मूत्रत्यागाचे वेळी असह्य असा दाह होते. उन्हाळे लागणे असा शब्दप्रयोग याकरिता व्यवहारात केला जातो. यावरही चंद्रप्रभा यशस्वीरीत्या वापरली जाते.

मधुमेहामध्येही मूत्राची विकृती असते. यामध्ये मूत्राचे प्रमाण वाढलेले असते. याचे नियमनही चंद्रप्रभेमुळे होत असते. मधुमेहामध्ये शरीरधातूंची उत्पत्ती होत असताना क्लेद म्हणजेच टाकावू भाग अधिक प्रमाणात निर्माण होत असतो. चंद्रप्रभेमध्ये असणारा शिलजतु व इतर द्रव्ये हा क्लेद कमी करतात.

मधुमेहात धातूंची उत्पत्ती नीट होत नाही. क्लेद अधिक प्रमाणात उत्पन्न होतो व म्हणूनच प्रमेही रुग्णास झालेल्या जखमा लवकर भरून येत नाहीत. अशा अवस्थेमध्ये तर चंद्रप्रभेसारखे दुसरे औषध शोधूनही सापडणार नाही.

मधुमेहातच नव्हे तर कोणत्याही कारणाने झालेली जखम जर लवकर भरून येत नसेल तर त्या ठिकाणी चंद्रप्रभा उत्तम कार्यकारी ठरते.

स्थौल्य किंवा मेदोराग यामुळे अनेक प्रकारच्या विकृती आढळतात. विशेषत: थोड्याशा श्रमाने किंवा चालण्याने दम लागणे, थकवा, घाम अधिक येणे ही याची प्रमुख लक्षणे. शिलाजतु व गुग्गुलु ही दोन्ही द्रव्ये मेदधातु कमी करणारी असल्याने चंद्रप्रभा हे स्थौल्यावरील एक उत्तम औषध समजले जाते.

विशेषत: चंद्रप्रभेच्या उपयोगाने मेद कमी होऊन वजन कमी झाले तरी कोणत्याही प्रकारचा थकवा जाणवत नाही; नव्हे उलट अधिक उत्साह मात्र प्राप्त होतो. मात्र यासाठी चंद्रप्रभेच्या गोळ्या गरम पाण्याबरोबर घेणे अधिक उपयुक्त ठरते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी मोठी म्हणजे ५०० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** पाणी

❑❑❑



## ३३. गोक्षुरादि गुग्गुळु

**घटकद्रव्ये :** गोखरु, गुग्गुळु, त्रिफळा, त्रिकटु, नागरमोथा.

**भावना :** गोखरु काढा.

गोक्षुर म्हणजेच गोखरु. ही एक काटेरी वनस्पती आहे. ही वनस्पती उत्तम मूत्रल म्हणजेच मूत्राचे प्रमाण वाढविणारी औषधी आहे. त्रिफळा, नागरमोथा हीही याचकरिता उपयुक्त असून गुग्गुळु हा या सर्वांचे गुणांत वाढ करीत असतो.

याचसाठी गोक्षुरादि गुग्गुळु हा एक मूत्रमार्गावर कार्य करणारा औषधी कल्प आहे असे म्हटले जाते.

मूत्रकृच्छ्र या रोगामध्ये मूत्रप्रवृत्ति ही कष्टाने होते. वारंवार, थोडी थोडी मूत्र प्रवृत्ति असते व त्यावेळी अत्यंत दाह होत असते. उन्हाळे लागणे असे यास म्हटले जाते. गोक्षुरादि गुग्गुळु हे या अवस्थेवरील सर्वोत्कृष्ट औषध आहे.

मूतखडा झाल्यानेही अनेक वेळा मूत्रमार्गात अवरोध निर्माण होतो व तीव्र स्वरुपाच्या उदरवेदना उत्पन्न होतात. पृष्ठभागाकडून खाली पोटाचे खालचे भागापर्यंत चमका येऊ लागतात. रुग्ण अस्वस्थ होतो. मूत्र हे बरेच वेळा रक्तयुक्त असते. अशा अवस्थेमध्ये गोक्षुरादि गुग्गुळुचा वापर केला असताना अवरोध कमी होतो व त्यामुळे लक्षणे कमी होण्यास मदत होते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी ५०० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** पाणी

❑❑❑

## ३४. स्मृतिसागर रस

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, हरताळ, मन:शिला, ताम्रभस्म.

**भावना :** वेखंडाचा काढा, ब्राह्मी रस, जोतिष्मती (मालकांगोणी) तैल.

आयुर्वेदीय शास्त्राने ज्याचे वर्णन मानसरोग म्हणून केलेले आहे अशा अनेक रोगांपैकी उन्माद व अपस्मार हे दोन महत्त्वाचे रोग आहेत. या दोन्हीमध्येही मनाची दुष्टी प्रामुख्याने आढळते. यापैकी अपस्मार रोगावरील स्मृतिसागर हे एक उत्तम औषध समजले जाते.

अपस्मारास व्यवहारामध्ये फेफरे येणे असे म्हटले जाते. (Epilepsy) यामध्ये रुग्ण अचानक बेहोष होतो, तोंडातून फेस येऊ लागतो व हातापायांना झटके येऊ लागतात. या प्रकारच्या फिट्समधून थोड्या वेळाने तो जागा होतो व हे असे वारंवार घडत राहते.

अपस्मार किंवा फेफरे येणे यामध्ये दोन फिट्सच्या मधल्या काळात रुग्ण पूर्ण बरा असतो असे मात्र नव्हे. या रोगामध्ये धी, धृति व स्मृति म्हणजेच ग्रहणशक्ति, धारणाशक्ति व स्मरणशक्ति या बुद्धीच्या तीनही प्रकारांची, विशेषतः स्मृतीची विकृति उत्पन्न होते. या रोगांमध्ये स्मृतिनाश किंवा स्मृत्याल्पता निश्चयाने आढळते. याचेच जोडीला रुग्ण भित्रा बनतो, मनोदैन्य प्राप्त होते.

स्मृतिसागर रसाच्या उपयोगाने मनोविकृती दूर होते. या कल्पात असणारी हरताळ, मनःशिला या सारखीद्रव्ये वाताचा विषम गुण कमी करून मनाची चंचलता कमी करतात व मनाला स्थैर्य प्राप्त होते. वेखंड, ब्राम्ही, ज्योतिष्मति ही तर मनावर कार्य करणारी औषधे म्हणूनच प्रसिद्ध आहेत.

स्मृतिसागराच्या उपयोगाने मनोदैन्य कमी होते, रुग्णास आत्मविश्वास प्राप्त होतो आणि अपस्माराचे वेग येण्याचे प्रमाण कमी होते.

अपस्मारानेच नव्हे तर इतर कोणत्याही कारणाने मनोदैन्य आले असेल तर या कल्पाचा यशस्वीपणे प्रयोग करता येतो. मनावर पडणारा ताण यामुळे कमी होत असल्याने परीक्षेच्या दिवसामध्ये आत्मविश्वास वाढावा, स्मरणशक्ति वाढावी म्हणूनही या कल्पाचा व्यवहारात अनेक वेळा वापर केला जातो.

बुद्धिने मंद, मतिमंद मुलांमध्ये नावाप्रमाणेच काम करणारा स्मृतिसागर रस वापरून निश्चयाने सुधारणा आढळून येते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा. गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.

**अनुपान :** तूप (तूप हेही मेध्य, बुद्धिवर्धक म्हणून वापरले जाते.)

❑❑❑

## ३५. उन्मादगजकेसरी

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, मनःशिला, धोतरा.

**भावना :** वेखंडाचा काढा, रास्नादि काढा.

उन्माद व अपस्मार या दोन महत्त्वाच्या मानस रोगांपैकी उन्मादावरील हे एक औषध आहे हे नावावरूनच स्पष्ट होते.

उन्माद म्हणजे वेड लागणे. बुद्धीचे अधिष्ठान, मनाचे अधिष्ठान असणाऱ्या



हृदयाची विकृती या रोगामध्ये होते. रज आणि तम या मानसिक दोषांची वृद्धि होते आणि सत्वगुण कमी होतो. विषम गुणांनी वाढलेला वात ही विकृति घडवून आणतो.

मनःशिला, धोतरा, वेखंड, रास्ना आदि सर्वच द्रव्ये ही उत्कृष्ट वातघ्न म्हणून समजली जातात. प्रकुपित वाताचे शमन झाल्याने आपोआपच मानसदोष कमी होत असतात. मनःशिला, वेखंड ही द्रव्ये मनावर कार्य करणारी म्हणूनही प्रसिद्ध आहेत.

उन्मादामध्ये नाकात औषधी द्रव्ये घालणे, रुग्णास आत्मज्ञान करून देणे, धीर देणे इत्यादि अनेक उपचार करावे लागतात. या सर्व उपक्रमांबरोबर पोटात देण्यासाठी उन्मादगजकेसरी वापरल्याने निश्चयाने फायदा मिळतो.

**प्रमाण :** २ ते ४ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी सामान्यतः १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** तूपसाखर, मध.

❑❑❑

## ३६. गंधकरसायन

**घटकद्रव्ये :** शुद्ध गंधक.

**भावना :** गाईचे दूध, दालचिनी, तमालपत्र, नागकेशर, वेलदोडा, गुळवेल, त्रिफला, सुंठ या द्रव्यांचा काढा, माक्याचा रस, आल्याचा रस.

गंधक हे द्रव्य एक विषद्रव्य म्हणून ओळखले जात असले तरी ते शुद्ध करून औषधात वापरले जाते.

शुद्ध गंधक हे रक्तदोष दूर करणारे असे द्रव्य आहे व म्हणूनच अनेक प्रकारच्या रक्तदोषामुळे निर्माण होणाऱ्या रोगांमध्ये याचा चांगला उपयोग होतो. गंधकाचे तीक्ष्ण, उष्ण, विषारी परिणाम घडू नयेत, त्यामुळे पित्त वाढू नये यासाठीच शुद्ध गंधकाला अनेक पित्तशामक औषधांच्या भावना दिल्या जातात. गंधक रसायन तयार करताना यासाठीच गाईचे दूध, गुळवेल, सुंठ, माका, आले या उत्कृष्ट पित्तशामक तसेच रक्तदोष दूर करणाऱ्या औषधांच्या भावना दिलेल्या असतात.

खरूज, नायटा, इसब, गजकर्ण किंवा त्यासारखे अनेक प्रकारचे त्वचारोग यामध्ये रक्त दूषित झालेले असते. गंधक रसायनाच्या उपयोगाने रक्तदोष दूर झाल्याने या प्रकारचे त्वचारोग पूर्णपणे बरे होऊ शकतात.

शरीरात कोठेही पाक होणे (Inflammation) हे पित्ताचेच एक लक्षण आहे. रक्तदोषामुळेही Inflammation होत असते. अशा अवस्थेमध्येही गंधकरसायन उपयुक्त ठरते. टॉन्सील्स वाढणे, दुखणे, त्या ठिकाणी पू होणे इत्यादी लक्षणे असताना त्वरित आराम मिळण्यासाठी गंधकरसायन हे खरोखरीच उत्कृष्ट असे औषध आहे.

कोणत्याही कारणाने झालेली जखम जर चिघळली असेल, Septic झाली असेल तर अशा वेळी गंधक रसायन पोटातून घेण्याने जखम स्वच्छ होते. त्यातून वाहणारा स्राव कमी होतो व ती जखम लवकर भरून येण्यास मदत होते.

शरीरात कोठेही, कशाहीमुळे जखम झाली तर ती Septic होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय म्हणूनही या गंधकरसायनाचा उत्तम उपयोग होतो. म्हणूनच शस्त्रकर्मानंतर (Post Operative) वापरले जाणारे एक औषध म्हणून या कल्पाचा उपयोग केला जातो.

**प्रमाण** : २ ते ४ गोळ्या दिवसातून ३ वेळा. (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान** : मध, पाणी.

❑❑❑

## ३७. स्वायंभुव गुग्गुळु

**घटकद्रव्ये** : बावची, शिलाजतु, सु. माक्षिक भस्म, मुंडी, त्रिफळा, कात, गुळवेल, निशोत्तर, दंती, नागरमोथा, हळद, कुडा, निंब, चित्रक, बाहव्याचा मगज, गुग्गुळु, करंज.

स्वायंभुव गुग्गुळु हा अनेक प्रकारचे त्वचारोग व महाकुष्ठावरील (लेप्रसी) उपयुक्त असा कल्प आहे.

रक्तदोषांमुळेच अनेक प्रकारचे त्वचारोग आणि महाकुष्ठही निर्माण होत असते. या औषधांतील बावची, करंज, गुळवेल, निंब, हळद यासारखी द्रव्ये ही रक्तदोष दूर करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. शिलाजतु, सु. माक्षिक, मुंडी, कात, नागरमोथा यासारखी द्रव्ये ही पित्तनाशक व पर्यायाने रक्तदोष दूर करणारी अशीच आहेत. त्रिफळा, दंती, निशोत्तर, बाहवा यांसारखी द्रव्ये मृदुरेचक असल्याने रक्तदोष दूर करण्यास मदत करतात.

गुग्गुळु हा वरील सर्व द्रव्यांचे गुणधर्म वाढविण्याचे कार्य करतो. स्वायंभुव



गुग्गुळुचा उपयोग म्हणूनच अनेक प्रकारच्या त्वचारोगांवर होत असतो. विशेषत: ज्या प्रकारच्या त्वचारोगांमध्ये शरीरावर फोड येतात, जखमा होतात व त्यातून स्राव अधिक प्रमाणात वाहतो अशा प्रकारांमध्ये याचा अधिक उपयोग होतो. इसब (Eczema) या कल्पाच्या उपयोगाने लवकर बरे होते.

लेप्रसी किंवा महाकुष्ठावरीलही स्वायंभुव गुग्गुळु हे एक महत्त्वाचे औषध गणले जाते. या प्रकारच्या रोग्यांमध्ये रक्तदोषामुळे त्वचेच्या ठिकाणी स्पर्शज्ञान कमी होते वा नष्ट होते. कालांतराने हातापायाची बोटे झडतात, क्रमाने नष्ट होतत. स्वायंभुव गुग्गुळुच्या उपयोगाने निश्चितपणे रोगाची प्रगति थांबते. विशेषत: लेप्रसीच्या प्रारंभिक अवस्थेमध्येच स्वायंभुव गुग्गुळुचा प्रयोग केल्यास रोग पूर्णपणे आटोक्यात आणता येतो.

**प्रमाण** : २ ते ४ गोळ्या दिवसातुन ३ वेळा (गोळी ५०० मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान** : पाणी. यावेळी मीठ वर्ज करणे आवश्यक आहे.

❑❑❑

## ३८. अश्वकंचुकी

**घटकद्रव्ये** : पारा, गंधक, टंकण, बचनाग, सुंठ, मिरे, पिंपळी, त्रिफळा, हरताळभस्म, जयपाळ बी.

**भावना** : माक्याचा रस.

अश्वकंचुकी हा जयपाळाचा कल्प आहे. जयपाळ बी हे उत्कृष्ट रेचक आहे. अगदी अल्प प्रमाणात घेऊनही जयपाळाने अनेक वेळी जुलाब होतात. म्हणूनच जयपाळ शुद्ध करून म्हणजेच त्याची तीव्रता कमी करून मगच औषधात वापरले जाते.

अनेक रोगांमध्ये विरेचन अपेक्षित असते. विशेषत: जलोदरासारख्या रोग्यांमध्ये तर दररोज ५-६ वेळा जुलाब होणे आवश्यक असते. जलोदरी रोग्याच्या पोटात साठलेले पाणी हे जुलाबावाटेच बाहेर निघून जात असते. अश्वकंचुकी हे म्हणूनच जलोदरामध्ये दररोज वापरले जाते.

इतरही अनेक रोगांमध्ये कोठा साफ राहण्यासाठी विरेचन दिले जाते. विशेषत: वेगवेगळ्या त्वचारोगांमध्ये (खरूज, नायटा, इसब इ.) असणारा रक्तदोष दूर करण्यासाठी विरेचन वापरले जाते. यासाठीसुद्धा अश्वकंचुकीचा उपयोग करता येतो.

विरेचन हा अनेक प्रकारच्या पित्ताच्या रोगांसाठीही उपयुक्त असा चिकित्सोपक्रम आहे. परंतु यासाठी मृदुविरेचन अपेक्षित असते, तीक्ष्ण नव्हे. जयपाळ हे तीव्र विरेचन करणारे द्रव्य असल्याने अम्लपित्तादि पित्ताच्या व्याधीत याचा वापर केला जात नाही.

जयपाळ हे याप्रमाणे उत्कृष्ट विरेचन करणारे औषध असले तरी याच्या सेवनाने पोटात मुरडा धरतो व पोट दुखते. अश्वकंचुकीतील टंकण, सुंठ, मिरे, पिंपळी ही द्रव्ये जयपाळाने निर्माण होणारी ही जी लक्षणे ती कमी करण्यासाठी उपयुक्त ठरतात. त्याचप्रमाणे मुरडा धरणे वगैरे लक्षणे टाळण्यासाठी जयपाळ युक्त औषधे नेहमी गरम पाण्याबरोबर वापरली जातात. गरम पाण्याने ही सर्व लक्षणे निश्चितपणे टळतात.

**प्रमाण :** १ गोळी रात्री झोपण्यापूर्वी (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ३९. इच्छाभेदी

**घटकद्रव्ये :** सुंठ, मिरे, पारा, गंधक, टंकण, जयपाळ बी.

इच्छाभेदी हाही अश्वकंचुकीप्रमाणेच जयपाळाचा कल्प असून घटक द्रव्येही बरीचशी समान आहेत. याचमुळे अश्वकंचुकीप्रमाणेच याही औषधाचा उपयोग होतो.

परंतु यामध्ये जयपाळाचे प्रमाण मात्र अश्वकंचुकीपेक्षा बरेच जास्त म्हणजे तिप्पट असते. याचसाठी जेव्हा एखाद्या रुग्णास कोठा जड असल्याने अश्वकंचुकीचा उपयोग होत नसेल किंवा अधिक तीव्र विरेचनाची अपेक्षा असेल त्यावेळेस इच्छाभेदी वापरतात.

**प्रमाण :** १ गोळी रात्री झोपण्यापूर्वी (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ४०. नाराच रस

**घटकद्रव्ये :** टंकण, मिरे, सुंठ, पिंपळी, पारा, गंधक, जयपाळ बी.

अश्वकंचुकी व इच्छाभेदीप्रमाणेच जवळ जवळ सर्व घटक द्रव्ये असणारा जयपाळाचाच हा आणखी एक कल्प आहे व म्हणूनच याचाही वापर अश्वकंचुकीप्रमाणेच



करता येतो.

नाराच रसामध्ये अश्वकंचुकी व इच्छाभेदीपेक्षाही जयपाळाचे प्रमाण अधिक आहे. अश्वकंचुकीपेक्षा यामध्ये जयपाळ हे चारपटीने अधिक आहे. याचसाठी जेव्हा अधिक तीव्र विरेचनाची अपेक्षा असेल त्यावेळेस नाराच रसाचा उपयोग केला जातो.

**प्रमाण :** १ गोळी रात्री झोपण्यापूर्वी (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ४१. जलोदरारि

**घटकद्रव्ये :** पिंपळी, मिरे, दारुहळद, ताम्रभस्म, जयपाळ बीज.

अश्वकंचुकी, इच्छाभेदी, नाराचरस या सर्वांपेक्षाही जयपाळाचे प्रमाण अधिक असणारा हा एक कल्प आहे. ज्या वेळेस अधिक तीव्र विरेचनाची अपेक्षा असते त्यावेळी जलोदरारीचा वापर करणे इष्ट ठरते.

जलोदर या रोगामध्ये अशा प्रकारच्या तीव्र विरेचनाची जरुरी असते. जलोदरामध्ये पोटात साठलेले पाणी विरेचनाद्वारे बाहेर काढावे लागते. यासाठीच तीक्ष्ण विरेचनाची आवश्यकता असते. जलोदरारि या कल्पात असणारे ताम्रभस्म हेही लेखन करणारे, यकृतावर कार्यकारी व म्हणूनच उपयुक्त ठरणारे आणखी एक विशेष द्रव्य होय. यामुळेच या कल्पाला जलोदरारि म्हणजेच जलोदराचा शत्रु असे सार्थ नाव दिलेले दिसते.

**प्रमाण :** १ गोळी रात्री झोपण्यापूर्वी (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम दूध किंवा गरम पाणी.

❑❑❑

## ४२. कांचनार गुग्गुळु

**घटकद्रव्ये :** कांचनार साल, त्रिफळा, त्रिकटु, वरुणसाल, दालचिनी, वेलदेडे, तमालपत्र, गुग्गुळु.

कांचनार ही वनस्पती मांस व मेद यावर कार्य करते. उष्ण, तीक्ष्ण कटुरसाची असल्याने या धातुंची झालेली अनाठायी वाढ कमी करण्याचे हे कार्य आहे. पण यापेक्षाही कांचनारची विशेष क्रिया घडते ती लसीका ग्रंथींवर व त्यामुळेच शरीरात

अनेक कारणांनी वाढणाऱ्या लसिकाग्रंथींवर (Lymph glands) कांचनार गुग्गुळ उत्तम कार्यकारी ठरते.

वरुणसाल, त्रिफळा, त्रिकटु ही द्रव्येही कांचनार प्रमाणेच त्याच गुणकर्मांची असल्याने त्यांचीही जोड या कल्पामध्ये दिलेली आहे.

गुग्गुळु हाही लेखन करणारा म्हणजेच धातूंचा क्षय करून, वाढलेले धातू कमी करून अवरोध दूर करणारा म्हणून उपयुक्त ठरतो.

याच सर्व कारणांमुळे गंडमाळेसाठी कांचना गुग्गुळु वापरला जातो.

गंडमाळा (Tubercular lymph glands) या रोगामध्ये मानेतील, काखेतील किंवा जांघेतील (Lymph glands) लसिकाग्रंथींची वाढ होते. अनेक ग्रंथी वाढल्याने त्यांची जणु मालाच निर्माण झाल्याचे भासते. (Chain of glands) मांस व मेद यांची दुष्टीच या सर्व रोगांमध्ये प्रामुख्याने आढळते.

गंडमाळेसाठी केल्या जाणाऱ्या औषधी चिकित्सेमध्ये कांचनार गुग्गुळु हे म्हणूनच सर्वोत्कृष्ट औषध समजले जाते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी ५०० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑ ❑ ❑

## ४३. त्रिफळा गुग्गुळु

**घटकद्रव्ये :** त्रिफळा, त्रिकटु, गुग्गुळु.

त्रिफळा गुग्गुळु हा एक वातविकारावर उपयुक्त असा औषधी कल्प आहे.

वातविकार दोन प्रकारचे असतात. एका प्रकारामध्ये शरीरधातूंचा क्षय होऊन वात वाढतो तर दुसऱ्या प्रकारामध्ये वाताची जी प्राकृत गती त्या गतीमध्ये अडथळा आल्याने वात वाढत जातो. या दोन प्रकारच्या वातविकारामध्ये अगदी वेगळी, परस्परांशी विरुद्ध अशी चिकित्सा करावी लागते.

त्रिफळा गुग्गुळुमधील त्रिफळा, त्रिकटु, गुग्गुळु ही तीनही द्रव्ये धातूंचे क्षरण करणारी, धातू कमी करणारी असल्याने या औषधाचा उपयोग मार्गावरोधजन्य वातविकारांमध्ये होतो. या कल्पाचा उपयोग धातुक्षयाने उत्पन्न होणाऱ्या वातव्याधींमध्ये करू नये. जर केला तर रोग बरा होण्याऐवजी वाढण्याचीच शक्यता अधिक.

म्हणूनच जर रोगी कृश असेल तर हा कल्प वापरणे योग्य ठरणार नाही.



संधीवातावरील त्रिफळा गुग्गुळु हे एक खरोखरच उत्तम असे औषध आहे. संधीवातासाठीच नव्हे तर ज्या वातविकारामध्ये वेदना हे लक्षण असते, त्या सर्वच विकारांत त्रिफळा गुग्गुळुचा उपयोग होतो. याचसाठी गृध्रसी म्हणजेच सायटिका सारख्या रोगात त्रिफळा गुग्गुळु यशस्वीपणे वापरला जातो.

अनेक व्यक्तींमध्ये सर्वांगावर त्वचेच्या खाली मेदाच्या लहानमोठ्या ग्रंथी (Lipoma) निर्माण होतात. या ग्रंथी त्रिफळा गुग्गुळुच्या उपयोगाने निश्चितपणे कमी होतात. मात्र यासाठी सातत्याने ४-५ महिने तरी नियमाने त्रिफळा गुग्गुळु घ्यावे लागते.

मेदोरोगामध्ये किंवा अतिस्थूल व्यक्तींमध्ये वजन कमी करण्यासाठीही त्रिफळा गुग्गुळु वापरला जातो. धातूंचे क्षरण होत असल्याने त्रिफळा गुग्गुळुमुळे निश्चितपणे वजन कमी होते. कोणत्याही प्रकारे अशक्तपणा न जाणवता वजन कमी करण्याचे कार्य हा त्रिफळा गुग्गुळु करीत असतो.

**प्रमाण :** २ ते ४ गोळ्या दिवसातून ३ वेळा. (गोळी ५०० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑ ❑ ❑

## ४४. वातविध्वंस

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, नागभस्म, अभ्रकभस्म, लोहभस्म, सुंठ, मिरे, पिंपळी, बचनाग, टंकण.

**भावना :** त्रिफळा काढा, चित्रकमूळ काढा, माक्याचा रस, कोष्ठ काढा, निर्गुडी रस, रूईचा चीक, भुईआवळा रस, आल्याचा रस, लिंबाचा रस.

या कल्पालाच महावातविध्वंस असेही म्हटले जाते.

वातविध्वंस हे नावाप्रमाणेच अनेक प्रकारच्या वातविकारांचा नाश करणारे औषध आहे. यामध्ये बचनाग हा महत्त्वाचा घटक आहे. बचनाग हे अवरोध दूर करून, अडथळे बाजूस सारून दोषांना प्राकृत गति मिळवून देणारे व म्हणूनच वातनाशन करणारे द्रव्य आहे. याचेच जोडीला वंग, नाग, लोह, अभ्रक यांच्या भस्मांची जोड मिळाल्याने बल्य व वातहर म्हणून या कल्पाचा उपयोग होतो. चित्रक, निर्गुडी, रुई, भुईआवळा, लिंबू, आले ही सर्व औषधे ही अग्निदीपन करणारी, उत्तम वातनाशक म्हणून ओळखली जाणारी औषधी द्रव्ये आहेत.

वातविध्वंसाचा उपयोग शरीरात कोठेही असणारी वेदना थांबविण्यासाठी प्रामुख्याने होतो. याचमुळे संधिवातावरील (Arthritis) एक उत्तम औषध म्हणून वातविध्वंस ओळखले जाते. आमवातामध्ये (Rheumatism) सांध्यामध्ये तीव्र स्वरूपाची पीडा असते,ही कमी करण्यासाठीही वातविध्वंस वापरतात. गृध्रसी (Sciatica), विश्वाची (Brachial neuritis) या रोगामध्येही असणाऱ्या असह्य वेदना वातविध्वंसाच्या उपयोगाने कमी होतात.

पाठीत, मानेत चमक भरणे, पाठ किंवा कंबर दुखणे, पाय, पिंढऱ्या दुखणे किंवा या प्रकारच्या शरीरातील अन्य ठिकाणच्या वेदना वातविध्वंसामुळे त्वरीत कमी होतात. एखाद्या ठिकाणी मार लागल्याने त्या ठिकाणी सूज येते व तीव्र वेदना निर्माण होतात. याही अवस्थेत वातविध्वंस कार्यकारी ठरते.

याप्रमाणे वातविध्वंस हे वेदनाहर म्हणून वपरले जात असले तरी फक्त यासाठीच याचा उपयोग होतो असे मात्र नव्हे.

वातविध्वंसामध्ये बचनाग आहे. बचनाग हे उत्तम स्वेदन म्हणजेच घाम आणणारे द्रव्य असल्याने तापासाठीही वातविध्वंस उपयुक्त ठरते. विशेषत: ज्या तापामध्ये चढ उतार फार आढळतो, अंग फार ठणकते अशा वातप्रधान तापामध्ये हे अधिक कार्यकारी ठरते. तापामध्ये अनेक वेळा भ्रम होतो, रुग्ण असंबद्ध बडबडू लागतो. याही अवस्थेत वातविध्वंसाचा उपयोग करणे हितवाह ठरते.

वाताचा विषम गुण कमी करण्याचे कार्य वातविध्वंस करीत असल्याने तसेच तीक्ष्ण द्रव्य असल्याने अपस्मार (Epilepsy) किंवा अशासारख्या अन्य रोगांमध्ये जेव्हा रोगी बेहोष होतो त्यावेळी त्याला त्वरित शुद्धीवर आणण्यासाठी वातविध्वंसाचे चूर्ण करून ते नाकात घातले जाते. यामुळे रुग्ण त्वरित शुद्धीवर येतो.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** पाणी, दूध.

❑❑❑

## ४५. सिंहनाद गुग्गुळु

**घटकद्रव्ये :** त्रिफळा चूर्ण, सु. माक्षिक भस्म, गंधक, एरंडतेल, गुग्गुळु.

शरीररूपी वनामध्ये संचार करणारा, आमवातरूपी जो गजेंद्र, त्या गजेंद्राचा नाश करण्यास समर्थ असणारा एकमेव केसरी किंवा सिंह म्हणजेच एरंडतेल होय,



अशी एरंडतेलाची प्रशस्ती आयुर्वेदीय ग्रंथातून केलेली आढळते.

अशा प्रकारची प्रशस्ती लाभलेले एरंडेल ज्या कल्पांमध्ये आहे असा सिंहनाद गुग्गुळु हा कल्प म्हणूनच आमवातावरील एक उत्तम औषधी कल्प आहे.

एरंड हे उत्कृष्ट वातशामक द्रव्य आहे. याच बरोबर ते अग्निदीपन करणारे, पाचन करणारे द्रव्य आहे. अग्निमांद्यांमुळे निर्माण होणारा आम अपक्व रसधातू (जो एक प्रकारचे विषद्रव्य (Toxin) समजला जातो.) याचेही पाचन एरंडामुळे घडत असत.

आमवात (Rheumatic arthritis) या रोगास कारणीभूत होणाऱ्या वात व आम दोहोंवरही कार्यकारी असल्यानेच एरंड आमवातावरील उत्कृष्ट औषध समजले जाते.

आमवातामध्ये मृदुरेचनाचीही अपेक्षा असते. एरंडस्नेहाने मृदुरेचन होतेच पण शिवाय सिंहनाद गुग्गुळुमधील त्रिफलाचूर्णही हे कार्य करीत असते.

आमवात किंवा Rheumatism मध्ये सांधेदुखी तीव्र स्वरूपाची असते, सांधे सुजतात. त्या ठिकाणी स्पर्शही सहन होईनासा होतो. रोग्याला ताप असतो, भूक मंदावते.

वरील सर्वच लक्षणे सिंहनाद गुग्गुळुने कमी होत असतात.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ४६. योगराज गुग्गुळु

**घटकद्रव्ये :** चित्रक, पिंपळमूळ, बडिशेप, ओवा, वावडिंग, जिरे, देवदार, चव्य, वेलदोडा, सैंधव, कोष्ठ, रास्ना, गोखरू, धने, त्रिफळा, नागरमोथा, सुंठ, मिरे, पिंपळी, दालचिनी, वाळा, जवखार, तालीसपत्र, लवंग, सज्जीक्षार, कपूरकाचरी, दंती, गुळवेल, हपुषा, अश्वगंधा, शतावरी, गुग्गुळु.

योगराज गुग्गुळुमधील प्रमुख घटक गुग्गुळु हे आहे. गुग्गुळु हा उत्तम वातहर म्हणून ओळखला जातो. त्याचप्रमाणे यामध्ये अनेक अग्निदीपन करणारी, पाचन करणारी, वातहर औषधे मिसळलेली असतात. आमाचे पाचन झाल्याने मलावरोध दूर होतो, वाताला प्राकृत गती प्राप्त होते व म्हणूनच वातविकार कमी होत

असतात.

संधीवात (Arthrits), आक्षेपक (Fits), अर्धांगवात (Hemiplegia किंवा Paralysis), विश्वाची (Brachial neuritis), सर्वांगाचे ठिकाणी किंवा शरीराच्या विशिष्ट भागांमध्ये कंप किंवा कापरेपणा येणे, बोलताना अडखळणे किंवा अशा अनेक प्रकारच्या वातविकारांसाठी योगराज गुग्गुळु उत्तम कार्यकारी ठरतो.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी ५०० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** तूप साखर.

## ४७. महायोगराज गुग्गुळु

**घटकद्रव्ये :** सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, चव्य, चित्रक, हिंग, ओवा, मोहरी, जिरे, शहाजिरे, रेणूकबीज, इंद्रयव, पाठा, वावडिंग, गजपिंपळी, कुटकी, अतिविष, भांर्गी, वेखंड, मरवा, त्रिफला, गुग्गुळु, वंगभस्म, रौप्यभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म, मंडूर भस्म, रससिंदूर.

योगराज गुग्गुळुप्रमाणेच महायोगराज गुग्गुळुमध्येही गुग्गुळुबरोबर अनेक दीपन, पाचन करणारी औषधे आहेत. म्हणूनच योगराज गुग्गुळु प्रमाणेच अनेक प्रकारच्या वातविकारांसाठी हा कल्पही उपयुक्त ठरतो.

या कल्पामध्ये वंग, रौप्य, लोह, अभ्रक, मंडूर या धातूंच्या भस्मांची जोड दिलेली आहे. या धातूंच्या भस्मांमुळे शरीरधातूंची पुष्टी होऊन त्यांची कार्यशक्ति वाढते. यामुळेच धातुक्षयाने उत्पन्न होणाऱ्या वातविकारांमध्ये या कल्पाचा अधिक चांगला उपयोग होतो.

याचसाठी कृश व अशक्त रोग्यांमध्ये होणाऱ्या वातविकारांसाठी हा कल्प अवश्य वापरला जातो.

**उपयोग :** योगराज गुग्गुळु प्रमाणेच.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी सामान्यतः ५०० मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** तूप, साखर.



## ४८. त्रयोदशांग गुग्गुळु

**घटकद्रव्ये :** बाभूळ साल, अश्वगंधा, शतावरी, गुळवेल, रास्ना, गोखरू, खुरासनी ओवा, गुग्गुळु इत्यादि.

त्रयोदशांग गुग्गळु हाही गुग्गुळुचा एक प्रमुख कल्प आहे. उत्तम वातहर अशा अश्वगंधा, शतावरी या सारख्या बल्य द्रव्यांची जोड असल्याने धतुक्षयजन्य वातविकारांसाठी याचा उपयोग केला जातो. गुळवेल, रास्ना, खुरासनी ओवा यांच्या सहभागाने वेदना प्रशमनाचे कार्यही याने चांगले घडते. बाभूळ साल हे यातील घटक द्रव्य अस्थि धातुवर विशेष कार्यकारी आहे. या दृष्टीने पाहता संधिवात, आमवात, वातरक्त या सारख्या संधिवेदना असणाऱ्या रोगांमध्ये या कल्पाचा यशस्वीरीत्या वापर करता येतो. गोखरु सारखी मुत्राचे प्रमाण वाढविणारी व वातानुलोमन घडवून आणणारी औषधे त्रयोदशांग गुग्गुळुत असल्याने अनेक प्रकारच्या स्त्रोतोरोधप्रधान व्याधितही त्रयोदशांग गुग्गुळु उपयुक्त ठरतो.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी २५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** मध किंवा गरम पाणी.

## ४९. पुनर्नवा गुग्गुळु

**घटकद्रव्ये :** पुनर्नवा, देवदार, गुळवेल, हिरडा, गुग्गुळु.

पुनर्नवा गुग्गळुमधील पुनर्नवा, देवदार, गुळवेल, हिरडा व गुग्गुळु ही सर्वच घटक द्रव्ये उत्कृष्ट वातशामक अशी आहेत. यामुळेच हा कल्प अनेक प्रकारच्या वातविकारांमध्ये वापरला जाणारा कल्प आहे. विशेषतः ज्या वातविकारांमध्ये वेदना असते, शूल असतो अशा सर्व वातविकारांमधील उत्कृष्ट औषध म्हणून पुनर्नवा गुग्गुळु ओळखला जातो.

संधिवात (Arthritis), आमवात (Rheumatic arthritis) वातरक्त (Rheumatoid Arhritis) यासारख्या संधिवेदना असणाऱ्या विकारांमध्ये याचा म्हणूनच विशेष उपयोग होतो.

पुनर्नवा ही वनस्पती शोथहर म्हणजेच सूज कमी करणारी आहे. पुनर्नवेमुळे मूत्राचे प्रमाण वाढते व म्हणूनच शरीरात कोठेही असणारी सूज कमी होण्यास मदत

होत असते.

संधिभागी वेदनेबरोबर अनेक वेळा सूजही असते. सांधे दुखणे व सुजणे ही दोन्ही लक्षणे एकत्रित असताना या पुनर्नवा गुग्गुळुचा लाभ अधिक होत असतो.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी ५०० मि. ग्रॅ. ची असते. )

**अनुपान :** मध, गरम पाणी.

❑❑❑

## ५०. हृदयार्णव रस

**घटक द्रव्ये :** कज्जली, अभ्रकभस्म.

हृदयार्णव रसांत प्रमुख घटक असणारे अभ्रकभस्म हे हृद्बल्य औषधामध्यें अग्रगण्य समजले जाते. यामुळेच हृद्रोगाच्या विविध अवस्थांमध्ये या कल्पाचा उपयोग केला जातो. हृदयाच्या स्नायुंना बळ प्राप्त व्हावे, त्याठिकाणी आलेले शैथिल्य दूर व्हावे व स्नायुंना पुन्हा संहनन प्राप्त व्हावे यासाठी अभ्रकभस्म हे उत्तम कार्यकारी ठरते. हृदयामध्ये येणाऱ्या शैथिल्यामुळे थोड्याही श्रमाने दम लागणे (Breathlessness on excertion), कास (Cough), पायांवर सूज येणे (Oedema on feet) यांसारखी लक्षणे उत्पन्न होतात. हृद्रोगाच्या अशा अवस्थेत (C.C.F.) हृदयार्णव रस हे अत्यंत उपयुक्त ठरते.

अभ्रक भस्माचे प्राणवहस्रोतस हे विशेष कार्यक्षेत्र आहे. केवळ हृदयावरच नव्हे तर फुफ्फुसावरही याचे उत्तम कार्य घडते. अभ्रक भस्म उत्तम कफनाशकही आहे. राजयक्ष्मा (T.B.) या रोगामध्ये फुफ्फुसात जी पोकळी निर्माण होते, ती भरून काढण्यासाठी अभ्रक भस्म उत्कृष्ट समजले जाते. उत्तम कफघ्न व फुफ्फुसावर कार्यकारी असण्यानेच श्वास (Bronchial Asthamia), जलपार्श्व (Pleursy with effusion) या सारख्या रोगांमध्येही हृदयार्णव रस कार्यकारी ठरते.

अभ्रकाच्या जोडीला असणारी योगवाही अशी कज्जली हृदयार्णव रसातील अभ्रकाचे गुणधर्मात शतपटीने वाढ करीत असते.

**प्रमाण :** १ ते २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** मध, गरम पाणी.

❑❑❑



## ५१. बृहत्‌वातचिंतामणि

**घटकद्रव्ये :** सुवर्णभस्म, रौप्यभस्म, अभ्रकभस्म, लोहभस्म, प्रवाळभस्म, मौक्तिकभस्म, रससिंदूर.

**भावना :** कुमारी (कोरफडी) रस.

बृहत् वातचिंतामणि हे एक उत्कृष्ट बल्य म्हणजेच बळ वाढविणारे, वजन वाढविणारे असे औषध आहे. यामध्ये सुवर्ण, रौप्य, अभ्रक, लोह, प्रवाळ, मौक्तिक यांसारख्या अनेक धातूंची भस्मे आहेत. या सर्वांमुळे मांसादि शरीरधातूंची कार्यशक्ती वाढत असते. रससिंदूर हाही यातील एक घटक आहे. रससिंदूर पारा व गंधक यांचे एक संयुग असून योगवाही म्हणजेच ज्या द्रव्यांबरोबर दिले जाते त्यांचे गुण वाढविणारे द्रव्य आहे. या रससिंदूरामुळेच यात असणाऱ्या सुवर्णादि भस्मांचे बल देण्याचे गुणामध्ये वाढ होते.

रससिंदूर हे द्रव्य फुफ्फुसाला बल देणारे, कफाचे शोषण करणारे म्हणूनही प्रसिद्ध आहे. याचप्रमाणे बृहत् वातचिंतामणि मधल्या अभ्रकभस्माचेही गुणधर्म आहेत. अभ्रक हेही फुफ्फुसाला बल देणारे द्रव्य आहे. सुवर्णभस्म हे हृदयाला बल देणारे द्रव्य आहे.

यासाठीच श्वसनमार्गाला बल देण्यासाठी या बृहत् वातचिंतामणीचा चांगला उपयोग होतो. दमा, राजयक्ष्मा, हृद्रोग यासारख्या रोगांमध्ये हा कल्प वापरल्याने रोग लवकर बरा होण्यास मदत होते.

अनेक वातविकार शरीरधातू क्षीण झाल्यान उत्पन्न होत असतात. अशा धातुक्षयजन्य विकारासाठी बृहत्‌वातचिंतामणी उपयुक्त ठरते. अर्धांगवात, मांसशोष आदि व्याधींमध्ये म्हणूनच वापरले जाते.

**प्रमाण :** १ गोळी ३ वेळा. गोळी ५० मि. ग्रॅ. ची असते.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ५२. वसंतकुसुमाकर

**घटकद्रव्ये :** सुवर्णभस्म, रौप्यभस्म, वंगभस्म, नागभस्म, कांतलोहभस्म, रससिंदूर, अभ्रकभस्म, प्रवाळभस्म, मौक्तिकभस्म.

**भावना :** गाईचे दूध, उसाचा रस, अडुळसा रस, चंदन काढा, वाळा काढा,

हळद काढा, केळीच्या कंदाचा रस, शतपत्र रस, मालतीपुष्प रस, कस्तुरी जल.

यामध्येही बृहत्‌वातचिंतामणीमध्ये असणारी सर्व घटक द्रव्ये आहेतच. म्हणून हाही कल्प बृहत्‌वातचिंतामणी प्रमाणेच धातूंना बल देणारा, श्वसनमार्गाला बल देणारा तसेच धातुक्षयजन्य वातविकारांसाठीही उपयुक्त आहे.

बृहत्‌वातचिंतामणीपेक्षा वसंतकुसुमाकरामध्ये वंग व नाग ही दोन भस्मे अधिक आहेत. वंग व नाग ही दोन्ही द्रव्ये ओजोवर्धक म्हणून प्रसिद्ध आहेत. ओज म्हणजे सप्तधातूंचा सारभाग. ओजोवर्धक द्रव्ये रसरक्तादि सर्व शरीरधातूंची पुष्टी करण्यामध्ये अग्रगण्य असतात.

वसंतकुसुमाकरला गाईचे दूध, उसाचा रस, अडुळसा, वाळा, हळद, कदलीकंदरस इत्यादी अनेक शीत औषधांच्या भावना दिलेल्या असतात. याचमुळे वातविकारांचे जोडीला जेव्हा पित्ताचा अनुबंध असतो त्यावेळेस वसंतकुसुमाकर वापरले जाते.

यामध्ये असणाऱ्या वंग, नाग या द्रव्यांमुळे वसंतकुसुमाकर हे द्रव्य शुक्रवर्धनासाठीही उपयुक्त आहे. कस्तुरी ही सुद्धा स्त्रीसमागमाचे वेळी पुरुषाचे सामर्थ्य वाढविणारी आहे. म्हणूनच पुरुष रुग्णामध्ये कामशक्ती अधिक वाढावी, पौरुषत्व वाढावे म्हणून वसंतकुसुमाकर वापरले जाते.

वसंतकुसुमाकर हे बृहत्‌वातचिंतामणीपेक्षा अधिक बल्य, अधिक कार्यकारी आहे असे म्हणता येईल.

**प्रमाण :** १ गोळी दिवसातून ३ वेळा (गोळी ५० मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## ५३. योगेन्द्र रस

**घटकद्रव्ये :** रससिंदूर, सुवर्णभस्म, कांतलोहभस्म, अभ्रकभस्म, मौक्तिकभस्म, वंगभस्म.

बृहत्‌वातचिंतामणि प्रमाणेच सुवर्ण, लोह, अभ्रक व मौक्तिक या सारख्या धातूंची भस्मे यातही आहेत. शरीरातील मांसादि धातूंची कार्यशक्ती वाढविण्याचे कार्य याकडून घडत असते. पारद-गंधकाच्या संयुग असणाऱ्या रससिंदूर या द्रव्याच्या योगवाहीगुणामुळे वरील भस्मांचे गुणधर्मात वाढ होते. सुवर्ण, अभ्रक, रससिंदूर ही तीनही द्रव्ये कफ शोषण करणारी आणि हृदय व फुफ्फुस यांना बल देणारी आहेत. यासाठीच दमा, राजयक्ष्मा, हृद्रोग यांसारख्या रोगांवर योगेन्द्र रसाचा वापर केला जातो.



योगेन्द्र रसात असणारे वंगभस्म हे उत्कृष्ट ओजोवर्धक आहे. रसरक्तादि धातूंचा सारभाग अशा ओजाची वृद्धि झाल्याने उत्कृष्ट बल्य म्हणून या वंगभस्माचा उपयोग होतो. त्यामुळेच अनेक प्रकारच्या धातुक्षयजन्य वातविकारांसाठी योगेन्द्र रस कार्यकारी ठरतो. वंग भस्म हे मूत्रवहस्रोतसातील दुष्टी दूर करण्यासाठीही उपयुक्त ठरते. यासाठीच कफजशोथ (Pyelitis) यासारख्या मूत्रविकारातही योगेन्द्र रस उपयुक्त ठरते.

**प्रमाण :** १ गोळी दिवसातून ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते)

**अनुपान :** मध किंवा आल्याचा रस.

❑ ❑ ❑

## ५४. लक्ष्मीविलास

**घटकद्रव्ये :** रससिंदूर, सुवर्णभस्म, अभ्रकभस्म, रौप्यभस्य, ताम्रभस्म, वंगभस्म, कांतलोहभस्म, तीक्ष्णलोहभस्म, मुंडलोहभस्म, नागभस्म, मौक्तिकभस्म, बचनाग.

**भावना :** चित्रकाचा काढा.

या कल्पालाच काहीवेळा महालक्ष्मीविलास असे म्हणतात. बृहत्‌वातचिंतामणी प्रमाणेच सर्व औषधी घटक असणारे आणखी एक औषध म्हणजे लक्ष्मीविलास रस होय. यामध्ये बचनाग हे एक अधिक असणारे घटक द्रव्य आहे.

बचनाग हा उत्तम स्वेदन करणारा असून हृदयाची गती वाढविणारा आहे. त्याचप्रमाणे लक्ष्मीविलास बनविताना चित्रकाच्या काढ्याच्या दिलेल्या भावनेमुळे हे द्रव्य शीघ्र कार्यकारी ठरते.

म्हणूनच बृहत्‌वातचिंतामणीप्रमाणे बल्य म्हणून या कल्पाचा उपयोग होतोच पण विशेषतः हृदयाला बल देण्यासाठी हे औषध उत्कृष्ट समजले जाते.

ज्या अवस्थेमध्ये नाडीही लागेनाशी होते अशा वेळी लक्ष्मीविलास रस केवळ जिभेवर चोळल्याने हृदयाला बल मिळून नाडीची गती व बल प्राकृत होत असते. अशा अवस्थेमध्ये लक्ष्मीविलास आल्याच्या रसातून किंवा मधातून उगाळून चाटण करून जिभेवर चोळतात व वारंवार ही क्रिया करावी लागते.

प्राणदायी म्हणून हा कल्प प्रत्येकाच्या संग्रही हवाच.

छातीत धडधडणे, घाबरल्यासारखे वाटणे, थोडेसेही चालले असता दम लागणे ही सर्व लक्षणे लक्ष्मीविलासाने त्वरित कमी होतात. Low Blood Pressure मुळेही अशक्तपणा, चक्कर येणे इत्यादि लक्षणे येतात. लक्ष्मीविलासाने

नाडीला बल मिळत असल्याने Blood Pressure त्वरित वाढते, प्राकृत स्थितीस येते व रुग्णास लाभ दिसून येतो.

**प्रमाण :** १ गोळी दिवसातून २ किंवा ३ वेळा.

**अनुपान :** मध, आल्याचा रस.

❑❑❑

## ५५. नित्यानंद रस

**घटकद्रव्ये :** कज्जली, ताम्रभस्म, वंगभस्म, हरताळ, मोरचूद, लोहभस्म, कपर्दिक भस्म, पंचलवण, त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी) इत्यादी.

नित्यानंद रस हा श्लीपदावरील एक उत्कृष्ट कल्प आहे. श्लीपद (Elephantitis) या रोगामध्ये पादभागी असणाऱ्या लसिका वाहिन्यांमध्ये अवरोध निर्माण झालेला असतो. यामुळेच पादभागी कठीण अशी सूज आलेली असते; यामुळे पाय जड होतो व क्रमाने सूज वाढत राहते. या रोगाला हत्तीपाय असे सार्थ नाव दिले जाते.

या रोगात सर्वप्रकारचे लेखन, स्रोत:शोधी उपचार करणे जरुरीचे असते. या कल्पातील ताम्र भस्म हे उत्कृष्ट लेखन करणारे द्रव्य आहे. हरताळ, मोरचूद यांसारखी विषद्रव्येही यामध्ये आहेत. ही विषद्रव्ये ताम्राच्या स्रोत:शोधनाचे कार्यास मदत करतात. त्रिफळा, त्रिकटु ही औषधेही लसिका वाहिन्यांच्या क्षोभ कमी करून श्लीपद कमी करण्यास सहाय्यभूत ठरतात.

कज्जलीच्या योगवाही गुणामुळे वरील सर्व लेखन द्रव्यांचे कार्य अनेक पटीने वर्धमान होते.

नित्यानंद रसाचा वापर बऱ्याच कालपर्यंत करावा लागतो व हळूहळू पण निश्चयाने रोग आटोक्यात येऊ शकतो.

**प्रमाण :** २ गोळ्या दिवसातून ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. ची असते.)

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ५६. बाळगोळी

**घटकद्रव्ये :** सुंठ, वावडिंग, पिंपळी, अक्कलकारा, बेहडा, जेष्ठमध, अतिविष, मुरूडशेंग, केशर, बाळहिरडा, रससिंदूर.

**भावना :** तुळस, आले, नागरमोथा यांचा रस.



पूर्वी लहान बालकांना दररोज अनेक औषधी द्रव्ये उगाळून सकाळी व सायंकाळी गुटी देण्याची पद्धत होती. कालानुसार याच गुटीमध्ये वापरल्या जाणाऱ्या घटक द्रव्यांची गोळी करून औषधे देणे, गुटी देणे सोपे केले गेले आहे.

बाळगुटीमध्ये याप्रमाणे लहान मुलांसाठी उपयुक्त अशी अनेक औषधे एकत्रित केलेली असतात. लहान बालकांमध्ये पचनाच्या तक्रारी विशेष करून आढळतात. त्या दूर व्हाव्यात, दूध चांगले पचावे, भूक वाढावी यासाठीच यामध्ये सुंठ, केशर, बाळहिरडा, पिंपळी वगैरे औषधे घातलेली असतात.

कृमि किंवा जंत होणे हा लहान मुलांमध्ये आढळणारा दुसरा एक विकार. लहान मुलांमध्ये जंत निर्माणच होऊ नयेत याची काळजी घेणे आवश्यक असते. वावडिंग हे या दृष्टीने उत्तम औषध आहे. वावडिंगामुळे कृमींची उत्पत्ति निश्चयाने थांबते.

बाळगुटीमधील जेष्ठमध, पिंपळी, अतिविष, केशर, रससिंदूर याप्रकारची असणारी औषधे उत्तम कफनाशक अशी आहेत व म्हणूनच बाळगुटीचा उपयोग खोकला, पडसे, नाक वाहणे, छाती भरणे इत्यादि साठीही चांगला होतो.

बालकांमध्ये वयाच्या सातव्या, आठव्या महिन्यामध्ये दात येऊ लागतात. दात येण्याच्या वेळी काही मुलांमध्ये ताप, खोकला, उलटी, जुलाब अशा प्रकारची लक्षणे उत्पन्न होतात. यांनाच दंतोद्भवज विकार अशी संज्ञा आहे. हे सर्व दंतोद्भवज विकार बाळगोळीतील अतिविष, सुंठ, पिंपळी यांसारख्या औषधी घटकांमुळे त्वरित कमी होतात.

केवळ उत्पन्न झालेल्या रोगांवरच बाळगोळीचा उपयोग करावा असे नसून प्रतिबंधक उपाय म्हणूनही बाळगोळी अगदी जन्मापासून ते वयाची २ वर्षे पूर्ण होईपर्यंत नियमाने दिली पाहिजे.

**प्रमाण :** १ गोळी दिवसातून २ किंवा ३ वेळा (गोळी १२५ मि. ग्रॅ. असते)

**अनुपान :** दुधातुन् गोळी उगाळुन किंवा दुधाबरोबर.

❑❑❑

## ५७. लेपगुटी

**घटकद्रव्ये :** गुग्गुळु, पुनर्नवा, लोध्र, चित्रक, सुंठ, हळद, त्रिफळा काढा व गोमुत्र.

वरील द्रव्यांची चूर्णे, त्रिफळा काढा व गोमुत्र यांचे एकत्रित मिश्रण करून ते मंदाग्निवर शिजवले जाते व नंतर याच्या मोठ्या लांबट आकाराच्या गोळ्या बनविल्या जातात.

नावावरूनच हे स्पष्ट होते की या गुटीचा उपयोग लेपासाठी केला जातो; पोटात घेण्याचे हे औषध नव्हे.

कोणत्याही प्रकारचा आघात झाला असताना, मार लागला असताना येणारी सूज कमी करण्यासाठी या लेपाचा उत्तम उपयोग होतो. या लेपामुळे सूज तर कमी होतेच पण त्याचबरोबर त्या ठिकाणी असणारा ठणकाही कमी होतो. त्या ठिकाणी साकळलेल्या रक्ताचे विलयन झाल्यानेच हे शक्य होते.

कोठेही जर गळू होत असेल तर ते पिकण्यापूर्वी त्या ठिकाणी सूज येते, अत्यधिक प्रमाणात ठणका लागतो व स्पर्शही सहन होईनासा होतो. अशावेळी लेपगुटीचा लेप केला असताना गळू लवकर पिकण्यास मदत होते व त्यामुळेच वेदना व सूजही कमी होते.

गोळी पाण्यात उगाळून लेप करतात. लेप चांगला जाडसर लावला पाहिजे. तसाच लेप गरम करून नंतरच लावावा.

सकाळी लावलेला लेप सायंकाळी व सायंकाळचा लेप सकाळी स्वच्छ धुऊन नवीन लेप करणे आवश्यक असते.

❑ ❑ ❑

## ५८. श्वित्रहरवर्ति

**घटकद्रव्ये :** हरताळ, कण्हेर, चित्रक, बावची.

**भावना :** गोमुत्र, रुईचा चिक.

श्वित्र म्हणजेच पांढरे कोड. हा एक त्वचा रोग गणला जातो. त्यामध्ये कोणत्याही तऱ्हेच्या वेदना असत नाहीत पण त्वचेच्या ठिकाणी दिसणारे पांढरे डाग हे विद्रुप दिसतात. हा एक भयंकर रोग आहे असे समजले जाते, परंतु तसे नाही.

कोडामध्ये त्वचेत प्राकृतावस्थेत निर्माण होणारे रंगद्रव्य (Melanin) निर्माण होत नाही किंवा त्वचेखाली संचित होत नाही. हे असे का घडते याविषयी निश्चयाने काहीच सांगता येत नसले तरी त्वचेची विकृति, स्थानवैगुण्य हे एक कारण निश्चितच आहे. ही स्थानविकृती दूर करून त्या ठिकाणी रंगद्रव्य संचित व्हावे याकरिता स्थानिक चिकित्सा ही महत्त्वाची आहे.



या स्थानिक चिकित्सेमध्ये त्या ठिकाणी क्षोभ निर्माण करणे आवश्यक ठरते. या क्षोभामुळे (Irritation) त्या ठिकाणी रंगद्रव्य संचित होण्याच्या क्रियेस चालना मिळते. यासाठी श्वित्रहरवर्ति खरोखरच उत्कृष्ट समजली पाहिजे.

श्वित्रहरवर्तिमधील हरताळ, कण्हेर, चित्रक, बावची, गोमुत्र, रुईचा चीक ही सर्वच द्रव्ये उष्ण, तीक्ष्ण म्हणून प्रसिद्ध आहेत. या वर्तीचा लेप केला असताना काही वेळा सुरवातीस त्याजागी बारीक पुरळ येते, आगही होते. हे क्षोभ निर्माण होत असल्याचेच लक्षण आहे. या प्रकारच्या लेपामुळे कोडाच्या रंगामध्ये बदल घडून येऊ लागतो व क्रमाने कोड बरे होऊ लागते.

अर्थात याबरोबर औषधी द्रव्ये, पोटात घेण्याची औषधे व जळवा लावण्यासारखे बाह्य उपचार करणेही इष्ट ठरते.

श्वित्रहरवर्ति हे लेपाचे म्हणजेच बाह्य उपचारासाठी वापरले जाणारे औषध आहे. पोटात घेण्याचे नव्हे.

गोळी उगाळावयाची असल्याने आकाराने लांबट व मोठी असते. गोळी पाण्यात किंवा गोमूत्रात उगाळून लेप करतात. लेप जाड लावावा. लेप गारच लावावा, गरम करून नव्हे. लेप रात्री झोपण्यापूर्वी लावावा.

❑ ❑ ❑

## अकारानुक्रमे कल्पांची यादी


| क्र. नाव | पृ. क्र | क्र. नाव | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ अग्नितुंडी रस | २० | ३० मधुमालिनी वसंत | १८ |
| २ अश्वकंचुकी | ३९ | ३१ महायोगराज गुग्गुळु | ४६ |
| ३ आनंद भैरव रस | १३ | ३२ योगराज गुग्गळु | ४५ |
| ४ आरोग्यवर्धिनी | ३ | ३३ योगेन्द्र रस | ५० |
| ५ इच्छाभेदी | ४० | ३४ लघु मालिनी वसंत | १७ |
| ६ उन्मादगजकेसरी | ३६ | ३५ लघु सूतशेखर | १० |
| ७ कांकायन गुटी | २४ | ३६ लवंगादि वटी | २७ |
| ८ कांचनार गुग्गुळु | ४१ | ३७ लशुनादि वटी | २३ |
| ९ कृमिमुद्गर रस | २७ | ३८ लक्ष्मीविलास | ५१ |
| १० खदिरादि वटी | २९ | ३९ लेपगुटी | ५३ |
| ११ गंधक रसायन | ३७ | ४० वसंतकुसुमाकर | ४९ |
| १२ गोक्षुरादि गुग्गुळु | ३५ | ४१ वातगजांकुश | २१ |
| १३ चतुर्भुज रस | ३० | ४२ वातविध्वंस | ४३ |
| १४ चंद्रकला | १४ | ४३ विषतिंदुक वटी | १९ |
| १५ चंद्रप्रभा | ३३ | ४४ व्योष्यादि वटी | २३ |
| १६ जलोदरारि | ४१ | ४५ शंखवटी | २२ |
| १७ त्रयोदशांग गुग्गुळु | ४७ | ४६ शंखोदर | ७ |
| १८ त्रिफळा गुग्गुळु | ४२ | ४७ शूलहर वटी | २४ |
| १९ त्रिभुवनकीर्ति | ११ | ४८ श्वासकुठार | ३१ |
| २० नागगुटीनाव | २९ | ४९ श्वित्रहरवर्ति | ५४ |
| २१ नाराच रस. | ४० | ५० श्रीफल कुसुम वटी | ३२ |
| २२ नित्यानंद रस. | ५२ | ५१ संजीवनी गुटी | ५ |
| २३ निद्रोदय रस. | ८ | ५२ संशमनी गुटी | १६ |
| २४ पारिजातक गुटी. | १३ | ५३ सिंहनाद गुग्गुळु | ४४ |
| २५ पुनर्नवा गुग्गुळु. | ४७ | ५४ सुवर्ण मालिनी वसंत | १८ |
| २६ प्रतापलंकेश्वर. | २६ | ५५ सूतशेखर | ९ |
| २७ बाळगोळी. | ५२ | ५६ स्मृतिसागर रस | ३५ |
| २८ बोलबद्ध रस. | २५ | ५७ स्वायंभुव गुग्गुळु | ३८ |
| २९ बृहत्वातचिंतामणी | ४९ | ५८ पुनर्नवा गुग्गुळु | ४७ |


❑❑❑



## या पुस्तकातील औषधांची रोगानुरूप वर्गवारी

अग्निमांद्य - अग्नितुंडी, लशुनादि वटी, वातगजांकुश, शंखवटी, शूलहर वटी, व्योष्यादि वटी.
अतिसार - संजीवनी, शंखोदर.
अर्धांगवात - योगराज गुग्गुळु, महायोगराज गुग्गुळु.
अपस्मार - उन्मादगजकेसरी, स्मृतिसागर.
अम्लपित्त - लघुसूतशेखर, सूतशेखर.
अर्श - कांकायन गुटी, बोलबद्ध रस.
आमवात - वातविध्वंस, सिंहनाद गुग्गुळु, पुनर्नवा गुग्गुळु, त्रयोदशांग गुग्गुळु.
आक्षेपक - योगराज गुग्गुळु, वातविध्वंस.
इसब - गंधकरसायन, स्वायंभुव गुग्गुळु.
उन्माद - उन्मादगजकेसरी.
उन्हाळे लागणे - चंद्रकला, चंद्रप्रभा.
कफजशोथ - चंद्रप्रभा, योगेन्द्र रस.
कास - लवंगादि वटी, खदिरादि वटी.
काविळ - आरोग्यवर्धिनी.
कुष्ठ - स्वायंभुव गुग्गुळु.
कृमि - अग्नितुंडी, कृमिकुठार, संजीवनी.
कोड - श्वित्रहरवर्ति
खरूज - गंधक रसायन
खोकला - लवंगादि वटी, खदिरादि वटी.
गजकर्ण - गंधक रसायन.
गलग्रह - लवंगादि वटी, खदिरादि वटी.
गंडमाला - कांचनार गुग्गुळु.
ग्रहणी - संजीवनी गुटी.
गृध्रसी - वातविध्वंस.
छर्दी - सूतशेखर
जलोदर - अश्वकंचुकी, आरोग्यवर्धिनी, इच्छाभेदी, नाराच रस. जलोदरारि.
ज्वर - आनंदभैरव, चंद्रकला, त्रिभुवनकीर्ति, संजीवनी, संशमनी, सूतशेखर.

जीर्णज्वर - आरोग्यवर्धिनी, मधु मालिनी वसंत, सुवर्ण मालिनी वसंत, लघु मालिनी वसंत.
त्वचारोग - आरोग्यवर्धिनी, गंधक रसायन, स्वायंभुव गुग्गुळ.
दमा - बृहत् वात चिंतामणी, श्वासकुठार, सुवर्ण मालिनी वसंत.
दाह - चंद्रकला, चंद्रप्रभा.
निद्रानाश - निद्रोदय रस.
पडसे - त्रिभुवनकीर्ति, नागगुटी.
प्रतिश्याय - त्रिभुवनकीर्ति, नागगुटी.
प्रवाहिका - संजीवनी.
प्रमेह - चंद्रप्रभा.
पांडू - आरोग्यवर्धिनी.
पित्तावृतवात - सूतशेखर, आरोग्यवर्धिनी.
प्लीह दोष - आरोग्यवर्धिनी.
प्लीहोदर - आरोग्यवर्धिनी.
बद्धकोष्ठता - आरोग्यवर्धिनी, अश्वकंचुकी, इच्छाभेदी, नाराच रस.
मधुमेह - चंद्रप्रभा.
मंदज्वर - आरोग्यवर्धिनी.
मनोदोष - उन्मादगजकेसरी, स्मृतिसागर.
मूत्रदाह - चंद्रप्रभा.
मुळव्याध - कांकायन गुटी, बोलबद्ध रस.
यकृतदोष - आरोग्यवर्धिनी.
यकृतोदर - आरोग्यवर्धिनी.
रक्तदोष - आरोग्यवर्धिनी, गंधक रसायन.
रक्तपित्त - चंद्रकला.
रक्तार्श - बोलबद्ध रस.
राजयक्ष्मा- बृहत् वात चिंतामणी, मधु मालिनी वसंत, लघु मालिनी वसंत, श्रीफलकुसुम वटी, सुवर्ण मालिनी वसंत, योगेन्द्र रस.
वातकफज्वर - त्रिभुवनकीर्ति, चतुर्भुज रस.
वातरक्त - पुनर्नवा गुग्गुळ.
वातव्याधि - त्रिफळा गुग्गुळ, पुनर्नवा गुग्गुळ, महायोगराज गुग्गुळ, योगराज गुग्गुळ, वातविध्वंस, त्रयोदशांग गुग्गुळ.



विश्वाची - वातविध्वंस.
विसूचिका - शंखोदर.
वैवर्ण्य - आरोग्यवर्धिनी, श्वित्रहरवर्ति.
शोथ - आरोग्यवर्धिनी, चंद्रप्रभा.
श्वेतप्रदर - प्रतापलंकेश्वर.
संधिवात - त्रिफळा गुग्गुळ, पुनर्नवा गुग्गुळ, त्रयोदशांग गुग्गुळ.
स्तन्यदोष - प्रतापलंकेश्वर.
सूज येणे - आरोग्यवर्धिनी, चंद्रप्रभा.
सुतिकाज्वर - प्रतापलंकेश्वर.
स्मृत्याल्पता - स्मृतिसागर.
स्थौल्य - चंद्रप्रभा, त्रिफळा गुग्गुळ.
हृद्रोग - बृहत् वात चिंतामणी, लक्ष्मीविलास, योगेन्द्ररस, हृदयार्णव रस.
क्षय - बृहत् वात चिंतामणी, मधु मालिनी वसंत, लघु मालिनी वसंत, श्रीफल कुसुम वटी, सुवर्ण मालिनी वसंत, योगेन्द्र रस.

※

Allergy - संजीवनी.
Anaemia - आरोग्यवर्धिनी.
Ascitis - अश्वकंचुकी, आरोग्यवर्धिनी, इच्छाभेदी, नाराच रस, जलोदरारी.
Asthma - बृहत् वात चिंतामणी, श्वासकुठार, सुवर्ण मालिनी वसंत.
Bleeding piles - बोलबद्ध रस.
Brachial neuritis - वातविध्वंस.
Bronchitis - चतुर्भुज रस.
Burning micturition - चंद्रप्रभा.
Appendisitis - अग्नितुंडी.
Chronic colitis - संजीवनी.
Chronic Fevers - लघु मालिनी वसंत, मधु मालिनी वसंत, सुवर्ण मालिनी वसंत.
Chronic Rhinitis - संजीवनी.
Cholera - शंखोदर.
Cirrhosis of Liver - आरोग्यवर्धिनी.
Constipation - आरोग्यवर्धिनी, अश्वकंचुकी, इच्छाभेदी, नाराच रस.

Colic - लशुनादि वटी, वातगजांकुश.
Cough - लवंगादि वटी, खदिरादि वटी.
Diabetes - चंद्रप्रभा.
Diarrhoea - संजीवनी, शंखोदर.
Dysentery - संजीवनी.
Epillepsy - उन्मादगजकेसरी, स्मृतीसागर, वातविध्वंस.
Gout - पुनर्नवा गुग्गुळु, महायोगराज गुग्गुळु.
High blood pressure - सूतशेखर, आरोग्यवर्धिनी.
Hypertention - सूतशेखर, आरोग्यवर्धिनी.
Influenza - आनंदभैरव, त्रिभुवनकीर्ति.
Jaundice - आोग्यवर्धिनी.
Lipoma - त्रिफळा गुग्गळु.
Leprosy - स्वायंभुव गुग्गुळु.
Malaria - पारिजातक गुटी.
Nephritis - चंद्रप्रभा.
Oedema - आरोग्यवर्धिनी, चंद्रप्रभा, योगेन्द्र रस.
Piles - कांकायन गुटी, बोलबद्ध रस.
Pneumonia - चतुर्भुज रस.
P. U. O. - संशमनी गुटी.
Purgative - अश्वकंचुकी, आरोग्यवर्धिनी, इच्छाभेदी, नाराच रस.
Pyelitis - चंद्रप्रभा, योगेन्द्र रस.
Pyelonephritis - चंद्रप्रभा, योगेन्द्र रस.
Rheumatic Arthritis - वातविध्वंस, सिंहनाद गुग्गुळु.
Scanty urination - चंद्रप्रभा.
Sciatica - वातविध्वंस.
Tonic - आरोग्यवर्धिनी.
Tonsilitis - आरोग्यवर्धिनी.
Tubercular Lymph Glands - कांचनागर गुग्गुळु.
Tuberculosis - बृहत् वात चिंतामणी, मधु मालिनी वसंत, लघु मालिनी वसंत, श्रीफल कुसुम वटी, सुवर्ण मालिनी वसंत, योगेन्द्र रस.
Worms - अग्नितुंडी, कृमिकुठार, संजीवनी.

❑❑❑

वैद्य य. गो. जोशी (G.F.A.M., H.P.A.) यांनी अनेक जबाबदारीच्या पदांवर कामे केली आहेत.

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे व आयुर्वेद महाविद्यालय हडपसर येथे प्राचार्य, प्राध्यापक व कायचिकित्सा विभागप्रमुख, मानद चिकित्सक-साने गुरुजी रुग्णालय-हडपसर, शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेदीय रुग्णालय, वै. पुरुषोत्तम शास्त्री नानल रुग्णालय, ब्लाईंड रिलीफ असोसिएशन नेत्र रुग्णालय, वसई इत्यादी मान्यवर रुग्णालयांत सेवा केली आहे.


आयुर्वेदाच्या सिद्धांताचा नवीन दृष्टीकोनातून विचार, आयुर्वेद शास्त्राचा प्रत्यक्षात यशस्वीपणे उपयोग करण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास, सूत्ररूप ग्रंथोक्त ज्ञानाचा प्रत्यक्षरूप उपयोग करून आयुर्वेदीय विषय निपुणतेने, सुलभसाध्य पद्धतीने शिकविण्याची हातोटी.

विद्यार्थी तसेच सर्वसामान्य व्यक्तींना आयुर्वेदाची यथायोग्य माहिती देवून त्याबद्दलचे गैरसमज दूर करून आदरभावना निर्माण करण्याचे प्रयत्न.

अनेक व्याख्याने, चर्चासत्रे, चिकित्साशिबिरांचे आयोजन.

विविध रुग्णालयातील कामकाजाप्रमाणेच खाजगी आयुर्वेदीय व्यवसाय.

कायचिकित्सा, आयुर्वेदीय पंचकर्म विज्ञान, शारीरक्रिया विज्ञान, शारीर क्रिया प्रात्याक्षिक, रोगविज्ञान-विकृतीविज्ञान, रोगावस्था, गुटीवटी, चूर्णे, आसव अरिष्ट काढे, भस्म पिष्टी रसायनकल्प, घृततैल अवलेह-मलम, ऋतुचर्या, साधे उपाय सोपे उपाय, माझं सोनुलं, यशवंत चिकित्सा, सद्य:फलदायी व आत्ययिक चिकित्सा, उदरभरण नोहे, चरक संहिता-यशवंत टीका भाग १ व २ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत.



Jay O. Savla

पुणे विद्यापिठांतर्गत बी.ए.एम्.एस्. च्या अभ्यासक्रमातील 'काय-चिकित्सा' या विषयासाठी मान्यताप्राप्त संदर्भ ग्रंथ.

# घृत तैल अवलेह मलम

**प्रा. वैद्य यशवंत गोविंद जोशी**
जी.एफ.ए.एम्., एच्.पी.ए.
- प्राचार्य आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर
- प्राध्यापक कायचिकित्सा विभाग आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर
- माजी प्राचार्य, प्राध्यापक, कायचिकित्सा विभाग टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे
- मानद चिकित्सक सानेगुरूजी रुग्णालय, हडपसर

**पुणे साहित्य वितरण**

GHRUT TAIL AVLEH MALAM (MARATHI)
VAIDYA Y. G. JOSHI

❑ **प्रकाशक**
सौ. संपदा श्याम कोपर्डेकर
पुणे साहित्य वितरण
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

❑ **© वैद्य य. गो. जोशी**

❑ प्रथम आवृत्ती : १९८१
द्वितीय आवृत्ती : १९९६
तृतीय आवृत्ती : १५ ऑगस्ट १९९९
चौथी आवृत्ती : ३० सप्टेंबर २००८
पाचवी आवृत्ती : ४ नोव्हेंबर २०१३

❑ **मुद्रणस्थळ**
मधुसूदन घळसासी
एम. आर. ॲण्ड को.
१५५२, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

❑ **मूल्य ४५ रुपये**

## अणुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| प्रास्ताविक | १ | ३८ बला तेल | ३७ |
| १ च्यवनप्राश | ४ | ३९ शतपाकीक्षीरबला तैल | ३८ |
| २ धात्री रसायन | ५ | ४० चंदनबलालाक्षादि तेल | ३९ |
| ३ आमकलकी अवलेह | ६ | ४१ पद्मकादि तेल | ४० |
| ४ गुलकंद | ७ | ४२ चंदनादि तेल | ४१ |
| ५ अश्वगंधावलेह | ८ | ४३ नारायण तेल | ४२ |
| ६ अश्वगंधादि घृत | ९ | ४४ महामाष तैल | ४४ |
| ७ कुष्मांडवलेह | ९ | ४५ व्रणशोधन तेल | ४५ |
| ८ अभयामलकी अवलेह | १० | ४६ व्रणरोपण तेल | ४६ |
| ९ अगस्त्यहरितकी अवलेह | ११ | ४७ पारिभद्र तेल | ४७ |
| १० पूगपाक | १२ | ४८ जात्यादि तेल | ४८ |
| ११ अमृतभल्लातकावलेह | १३ | ४९ जात्यादि घृत | ४९ |
| १२ लशूनपाक | १४ | ५० शतधौत घृत | ४९ |
| १३ उदुम्बरावलेह | १५ | ५१ मरिच्यादि तेल | ५० |
| १४ कंदर्पपाक | १६ | ५२ बृहन्मरिच्यादि तेल | ५२ |
| १५ कुटजावलेह | १७ | ५३ हरताळ मिश्रण | ५२ |
| १६ बिल्वावलेह | १८ | ५४ लाक्षादि तेल | ५३ |
| १७ चुक्र तैल | १९ | ५५ पिण्ड तेल | ५४ |
| १८ एरंड स्नेह-तेल | २० | ५६ विषगर्भ तेल | ५५ |
| १९ फल घृत | २१ | ५७ सहचर तेल | ५६ |
| २० शतावरीघृत | २२ | ५८ वचा तेल | ५७ |
| २१ चोपचिनीपाक | २३ | ५९ इरिमेदादि तेल | ५८ |
| २२ भल्लातक तैल | २४ | ६० कर्णशूलहर तेल | ५९ |
| २३ भल्लातकावलेह | २६ | ६१ कर्णस्रावहर तेल | ५९ |
| २४ कंटकार्यावलेह | २६ | ६२ बिल्व तेल | ६० |
| २५ भार्गी अवलेह | २७ | ६३ अणु तैल | ६० |
| २६ वासावलेह | २८ | ६४ षड्बिंदु तैल | ६२ |
| २७ वासा घृत | २९ | ६५ त्रिफळा घृत | ६२ |
| २८ आर्द्रकावलेह | २९ | ६६ चंद्रोदयावर्ती | ६३ |
| २९ दाडिमावलेह | ३० | ६७ ब्राह्मी तेल | ६४ |
| ३० दाडिमादि घृत | ३१ | ६८ भृंगराज तेल | ६५ |
| ३१ ब्राह्मीप्राश | ३२ | ६९ जपाकुसुम तेल | ६६ |
| ३२ शंखपुष्पी अवलेह | ३२ | ७० दारुषट्क लेप | ६६ |
| ३३ सारस्वत घृत | ३३ | ७१ दशांग लेप | ६७ |
| ३४ कल्याणक घृत | ३४ | ७२ लशुनादि लेप | ६८ |
| ३५ पंचगव्य घृत | ३५ | ७३ पाददारी मलम | ६९ |
| ३६ तिक्तक घृत | ३६ | अकारानुक्रमे कल्पांची यादी | ७० |
| ३७ षट्पल घृत | ३७ | रोगानुरूप औषधे | ७२ |

❑❑❑

# घृत, तैल, अवलेह, मलम याविषयी थोडेसे प्रास्ताविक

आयुर्वेद शिक्षणमालेची 'गुटीवटी', 'आसव-अरिष्ट काढे', 'चूर्णे' ही पहिली तीन पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. या पुस्तकांना आयुर्वेदीय व्यावसायिक, वैद्यकाचे विद्यार्थी व सामान्यजन या सर्वांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्याच मालिकेमधील चवथे पुस्तक आज प्रकाशित होत आहे.

आयुर्वेदीय औषधी द्रव्यांमध्ये प्रामुख्याने वनस्पतीजन्य द्रव्यांचा उपयोग केला जातो. ही वनस्पतिद्रव्ये काही ठराविक कालपर्यंतच गुणकारी राहू शकतात, नंतर ती किडतात, निर्वीर्य होतात व म्हणूनच त्यांचे औषधी गुणकर्म नष्ट होतात. किंबहुना अशा जुन्या, किडलेल्या वनस्पतीद्रव्यांमध्ये काही विपरीत गुण येण्याचीही शक्यता असते. यासाठीच वनस्पतींपासून काही विशिष्ट पद्धतींचा वापर करून टिकाऊ कल्प बनविले जातात. पारदगंधकाच्या संयोगाने रसकल्प, काढे, आसव-अरिष्टे, चूर्णे, या वनस्पतींनी सिद्ध केलेली घृते (तूप) वा तैले, अवलेहादी विविध प्रकारे हे साधले जाते. यापैकी 'गुटीवटी'मध्ये खल्वी रसायनांचा, 'आसव-अरिष्ट काढे' यामध्ये द्रवद्रव्यांचा तर 'चूर्णे' या पुस्तकात चूर्णांचा विचार केला गेला आहे. आज या चवथ्या पुस्तकामध्ये तेले, घृते, अवलेह यांचा ऊहापोह करावयाचा आहे.

वनस्पतींचे टिकाऊ स्वरूपाचे जे कल्प आहेत त्यांपैकीच स्नेहकल्पना ही एक आहे. स्नेहकल्पना म्हणजे वनस्पतीद्रव्यांनी सिद्ध कलेली घृते वा तैले यांची निर्मिती होय. घृत (तूप), तैल (तेल), वसा (मांसस्नेह किंवा मेद) व मज्जा (Bone Marrow) हे चार स्नेह उत्तम स्नेहद्रव्ये आहेत. त्यापैकी पहिले दोन स्नेह, म्हणजेच तूप व तेल हे सहजतेने उपलब्ध असल्याने त्यांचा व्यवहारात अधिक वापर केला जातो. तूप वापरताना सामान्यत: गाईचे तूप वापरतात तर तेलासाठी तिळाच्या तेलाचा वापर केला जातो.

हे स्नेह सिद्ध करण्याची काही विशिष्ट पद्धत आहे. ताज्या वनस्पतिद्रव्यांचा बारीक वाटून तयार कलेला कल्क किंवा त्यांच्या चूर्णांचा पाण्यात तयार केलेला कल्क, त्याच वनस्पतींचा काढा व तूप किंवा तेल यापैकी एक स्नेहद्रव्य एकत्रित करून मंदाग्निवर शिजवितात. यासाठी कल्काच्या चौपट वजनाचा स्नेह व त्याच्या चौपट काढा सामान्यत: वापरला जातो. मंदाग्निवर उकळवत असताना त्यातील पाण्याचा अंश पूर्णपणे जाईपर्यंत ही प्रक्रिया चालू राहते. पाण्याचा अंश पूर्णांशाने गेला म्हणजे स्नेह सिद्ध झाला असे समजले जाते व हा स्नेह वापरण्यास योग्य



बनतो, गाळून स्नेह बाजूस करून वापरला जातो.

पाण्याचा अंश पूर्णपणे गेला नाही, त्यात थोडासाही जलांश राहिला तरी हा सिद्ध स्नेह थोड्याच दिवसात खराब होतो, त्यास दुर्गंध येऊ लागते.

स्नेह सिद्ध करताना त्यात काढा वापरल्याने वनस्पतीतील पाण्यात विरघळणारे सर्व पदार्थ यात येतात तर कल्क स्वतंत्रपणे वापरल्याने तेलात वा तुपात विरघळणारे घटकही या स्नेहात उतरतात. यामुळेच काढ्यापेक्षा स्नेह हा काही अंशी अधिक गुणकारी ठरतो.

अनेकविध प्रकारच्या घृत व तेलांचे वर्णन आयुर्वेदीय वाङ्मयात मिळते. त्यांपैकी व्यवहारात अधिक वापरली जाणारी व बाजारात सहजतेने उपलब्ध असणारी घृत वा तैले यांचेच विवेचन या पुस्तकात केलेले आहे. सिद्ध केलेल्या स्नेहाबरोबरच काही एकेरी तेलांचे वर्णनही यात मिळेल. उदा. एरंड-तेल किंवा बिब्ब्याचे तेल. ही तेले सिद्ध स्नेहाचे प्रकार नाहीत. तरीही व्यवहारात अनेक रोगात यशस्वीपणे वापरली जाणारी ही तेले असल्यानेच त्यांचेही गुणकर्मांचे विवेचन येथे केलेले आहे.

यात वर्णिलेल्या काही स्नेहांचा उपयोग पोटात घेण्यासाठी होतो तर काही केवळ बाह्य उपचारासाठीच वापरली जातात.

सिद्ध स्नेहांप्रमाणेच औषधी वनस्पतींचे गुणकर्म टिकविण्यासाठी जे अन्य उपक्रम केले जातात त्यामध्ये अवलेहांचाही समावेश होतो. अवलेह बनविण्यासाठी साखरेचा वापर करतात. अवलेह बनविण्यासाठी औषधी द्रव्यांची चूर्णे वा कल्क, व त्याच वनस्पतींचा रस किंवा दूध आणि साखर एकत्रित करून मंदाग्निवर पाक केला जातो. शिजविताना त्यातील जलांश पूर्णपणे नाहीसा झाला व साखरेचा चांगला एकतारी पाक तयार झाला की अवलेह तयार झाला असे समजले जाते. यामध्येही अवलेह टिकाऊ होण्यासाठी पाण्याचा अंश पूर्णपणे नष्ट झाला पाहिजे अन्यथा या अवलेहास लवकरच बुरशी येऊ लागते.

अवलेह म्हणजे चाटण्यायोग्य पदार्थ. यासच 'पाक' अशीही संज्ञा वापरली जाते, उदा. आलेपाक, पुगपाक इत्यादी. हा अवलेह अधिक आटवून काही वेळा त्याच्या वड्या करून त्याही वापरतात.

अवलेहांपैकीही बाजारात सहजतेने उपलब्ध व अधिक प्रमाणात वापरले जाणारे कल्पच या पुस्तकात वर्णिलेले आहेत.

घृत, तैलांचे वर्णन करताना काही स्नेह हे केवळ बाह्य उपचारासाठीच वापरले जातात हे स्पष्ट केलेले आहे. बाह्य उपचारांमध्ये या तेल वा तुपाने संवाहन (चोळणे, मसाज करणे) व्रणकर्म (ड्रेसिंग) आदी प्रकार समाविष्ट होतात. बाह्य

उपचारांमध्ये या स्नेहाप्रमाणेच मलम व लेप या स्वरूपातही काही कल्प वापरले जातात. या मलम व लेपांचाही समावेश या पुस्तकात केलेला आहे.

मलम तयार करण्यासाठी वनस्पती द्रव्ये (कल्क वा चूर्ण), पाणी, स्नेह व काही वेळा खनिज द्रव्येही एकत्रित करून त्यांचा लेप केला जातो. लेपासाठी वापरली जाणारी द्रव्ये चांगली बारीक केलेली श्लक्ष्ण अशी असावीत. लेप सामान्यत: गरम करून लावला जातो. लेप फार पातळ व फार दाट असू नये, तो मध्यम जाडीचा असावा. चांगला सुकल्यानंतर सामान्यत: लेप काढून टाकला जातो. सकाळी लावलेला लेप सायंकाळनंतर व सायंकाळी लावलेला लेप सकाळनंतर ठेवू नये, तो काढून टाकावा. पहिला लेप काढल्याशिवाय दुसरा लेप लावू नये तसेच एकदा वापरलेला लेप पुन्हा वापरू नये. इतके सामान्य नियम पाळले तरच लेप गुणकारी होतात.

घृत, तेल, अवलेह, मलम हे सर्व कल्प योग्य प्रकारे बनविले गेले असले तर खराब न होता अनेक वर्ष गुणकारी राहू शकतात व म्हणूनच त्यांना Expiratory Date नसते.

घृत, तेल, अवलेह, मलम, लेप यांच्या या सामान्य विवेचनानंतर प्रत्येक कल्पाचा स्वतंत्रपणे क्रमश: विचार करणे सोपे होईल.

❑ ❑ ❑



# १. च्यवनप्राशावलेह

**घटक द्रव्ये :** आवळे किंवा आवळकाठी, पुष्करमूळ, मनुका, अडूळसा, वेलची, नागरमोथा, गोखरु, रिंगणी, भुईकोहाळा, गुळवेल, त्रिफळा, काकडशिंगी, चतुर्जात, पिंपळी, मध, साखर.

ताजे आवळे आणून ते वाफारून घेतले जातात. त्यातील सर्व बिया काढून टाकून ते वाफारलेले आवळे तुपावर परतून घेऊन, मग चांगले वाटून त्यात साखर व इतर द्रव्ये मिसळून अवलेह बनवला जातो.

च्यवनप्राशामध्ये याप्रमाणे आवळा हा प्रमुख घटक आहे. आमलकी (आवळा) हे एक रसायन आहे. रसायन कल्प म्हणजे रस-रक्तादी सर्व शरीरधातुंची वृद्धी करून शरीरास बल प्राप्त करून देणारे व पर्यायाने निरोगी अवस्था कायम ठेवण्यास मदत करणारे औषध होय. रसायनांचे नित्य सेवनाने तारुण्य अधिक काल टिकते असे जे म्हटले जाते ते याच अर्थाने. सर्वच शरीरधातू उत्तम, प्रशस्तगुणयुक्त बनल्याने ही किमया घडते असे म्हणता येईल.

ताजा आवळा हा 'क' जीवनसत्त्वाने संपृक्त असा असतो. 'क' जीवनसत्त्वामुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते असे आधुनिक वैद्यक शास्त्रही सांगते. आवळ्याचा हाही एक लक्षणीय गुण समजला पाहिजे. याचसाठी अनेक उपलब्ध द्रव्यांपैकी आमलकी हे प्रधान-द्रव्य आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

आमलकीमुळे सर्वच शरीरधातुंना बल मिळत असले तरी याची क्रिया प्रामुख्याने घडते ती प्राणवहस्रोतसावर म्हणजेच श्वसन मार्गावर. आमलकीमुळे श्वसनमार्गातील फुफ्फुसादी सर्वच अवयवांना बल प्राप्त होत असल्याने च्यवनप्राशाच्या सेवनाने श्वसनमार्गातील रोग टाळता येतात वा झाले असल्यास ते बरे होण्यास मदतही होते.

तमकश्वास (दमा-Bronchial Asthama) हा एक श्वसनमार्गातील महत्त्वाचा रोग. या रोगामध्ये फुफ्फुसात स्थानवैगुण्य निर्माण झालेले असते. हे स्थानवैगुण्य कुलज वा अन्य कारणानेही उत्पन्न होऊ शकते. याचमुळे थोड्याश्याही अपथ्याने किंवा हवेतील बदलानेही दम्याचा त्रास होऊ लागते. हा रोग संपूर्णपणे बरा होणे काही वेळा अशक्य असले तरी च्यवनप्राशाच्या सेवनाने तो आटोक्यात मात्र निश्चित राखता येतो. च्यवनप्राशामुळे फुफ्फुसातील स्थानवैगुण्य कमी होऊन वारंवार वेग येण्याचे प्रमाण निश्चितच कमी होते.

च्यवनप्राशामधील पुष्करमूळ, अडूळसा, रिंगणी, काकडशिंगी, चतुर्जात,

पिंपळी आदी द्रव्येही फुफ्फुसावर कार्यकारी व कफहर असल्याने आमलकीच्या कार्यास हातभार लावणारी ठरतात. अर्थात च्यवनप्राशाचा उपयोग दम्याचा वेग (अॅटॅक) आलेला असताना तो कमी करण्यासाठी म्हणून फारसा नसून पुन:पुन्हा अॅटॅक न येण्यासाठी आहे हे ध्यानात ठेवले पाहिजे.

तमकश्वासाप्रमाणेच वातजकास (Bronchitis), जलपार्श्व (Pleurecy with effussion), हृद्रोग (C. C. F.), राजयक्ष्मा (Pulmonary T. B.) आदी अनेक रोगांमध्ये च्यवनप्राश लाभदायी ठरतो. च्यवनप्राशातील पुष्करमूल हे जलपार्श्वातील असणारी वेदना कमी करण्यासाठी उत्तम कार्यकारी आहे. च्यवनप्राशामध्ये असणारी अडूळशासारखी द्रव्ये ही राजयक्ष्म्यामधील खोकला व रक्तष्ठीवन (Haemoptesis) ही लक्षणे त्वरेने कमी करतात. रक्तष्ठीवन कमी करण्यासाठी आमलकीही (त्यातील 'क' जीवनसत्त्वामुळे) महत्त्वाचा वाटा उचलते.

श्वसनमार्गाखेरीज अन्यत्र निर्माण होणारे दौर्बल्यही च्यवनप्राशाच्या सेवनाने कमी होतच असते. विशेषत: दीर्घ स्वरुपाच्या आजारपणानंतर येणारे दौर्बल्य कमी करण्यासाठी हा कल्प निश्चितच लाभदायी ठरतो.

पुराणांतरी च्यवनऋषींची कथा सांगितली जाते च्यवनऋषींना आलेले वार्धक्य दूर करण्यासाठी अश्विनीकुमारांनी वापरलेला हा आमलकीपासून बनविलेला कल्प पुढे च्यवनप्राश म्हणून प्रसिद्धीस आला आहे.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा

**अनुपान :** दूध.

❏ ❏ ❏

## २. धात्री रसायन

**घटकद्रव्ये :** आवळकाठी, वेलची, नागरमोथा, अगरु, तगर, जटामांसी, चंदन, वंशलोचन, चतुर्जात, केशर, जायफळ, सुवर्णपत्र, रजतपत्र, साखर, गुलाबजल इ.

धात्री म्हणजे आवळे. आमलकी किंवा आवळकाठी हे एक रसायन म्हणजेच सर्व शरीरधातुंची सम्यक् वृद्धि करणारे औषध आहे. आमलकी या प्रमाणे सर्वच शरीरधातुंना बल देणारी वनस्पती असली तरी याचे विशेष कार्यक्षेत्र श्वसनमार्गाला बल देऊन श्वसन मार्गातील विविध प्रकारचे रोग टाळण्यासाठी केला जातो. तमकश्वास (दमा- Bronchial Asthama) सारख्या रोगामध्ये दम्याचे वारंवार येणारे अॅटॅक



कमी करण्यासाठी या धात्री रसायनाचा लाभ होतो. आवळकाठी ही 'क' जीवनसत्वाने संपृक्त असल्याने याच्या सेवनाने शरीराची व्याधीप्रतिकारशक्ती बरीच वाढते.

या कल्पात असणारी अगुरु, तगर, जटामांसी, चतुर्जात, वेलची इत्यादी द्रव्ये मनावरही कार्यकारी आहेत. मानसिक संतुलन बिघडले असता या धात्री रसायनाचा प्रयोग केल्यास मनोदोष नाहीसे होऊन रुग्ण स्वस्थ बनतो. व्यवहारात उत्कृष्ट 'ब्रेन टॉनिक' म्हणूनच हा कल्प ओळखला जातो. ज्यांना मानसिक श्रमांची कामे अधिक करावी लागतात अशा वकील, डॉक्टर, शिक्षक, कारकून वगैरे लोकांमध्ये हा कल्प विशेष लाभदायी ठरतो.

हा कल्प बनविताना त्यावर सुवर्ण व रौप्य यांचे संस्कार त्या द्रव्यांवर घडलेले असतात. त्यामुळे धात्री रसायनाच्या बल्य व मनोदोषहर या गुणांमध्ये शतपटीने वाढ होते.

कोणत्याही रोगानंतर आलेले दौर्बल्य कमी करण्यासाठी रोगोत्तर कालामध्ये धात्री रसायनासारखे अन्य औषध क्वचितच मिळेल.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून २ वेळा

**अनुपान :** दूध.

❏ ❏ ❏

## ३. आमलकी-अवलेह, मोरावळा

**घटक द्रव्ये :** आमलकी, साखर.

च्यवनप्राशाप्रमाणेच आमलकी म्हणजेच आवळ्यापासून बनविलेला हा आणखी एक अवलेह होय. यासच मोरावळा असेही म्हटले जाते. च्यवनप्राशाप्रमाणेच रसायन व श्वसनमार्गावर कार्यकारी असणारा हाही एक कल्प आहे. च्यवनप्राशामध्ये असणारी इतर घटक द्रव्ये यामध्ये नसल्याने च्यवनप्राशाच्या तुलनेने कमी प्रतीचा असा हा कल्प आहे.

श्वसनमार्गाचा विचार करण्याचे दृष्टीने इतर घटक नसल्याने कमी प्रतीचा वाटणारा हा कल्प अन्य काही रोगांमध्ये मात्र उत्तम कार्यकारी ठरतो. अम्लपित्त हा यांपैकी एक महत्त्वाचा रोग. आवळा हा आंबट असला तरी मधुरविपाकी असल्याने उत्तम पित्तशामक असतो. चक्कर येणे, मळमळणे, उलटी होणे वा डोळ्यांसमोर अंधेरी येणे यासारख्या पित्ताच्या लक्षणांसाठी मोरावळा हा स्वतंत्रपणे वा अन्य औषधांबरोबर अनुपान म्हणून वापरणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** १ ते २ तोळे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❏ ❏ ❏

## ४. गुलकंद

**घटक द्रव्ये :** गुलाबाच्या पाकळ्या, साखर, प्रवाळपिष्टी.

गुलकंद तयार करण्यासाठी गुलाबाच्या पाकळ्या व साखर एकत्रित करून बरेच दिवस ठेवावे लागते. साखरेत गुलाबाच्या पाकळ्या चांगल्या मुरल्या की गुलकंद तयार होतो.

गुलाबपुष्प हे उत्कृष्ट शीतवीर्य असून पित्तशामक द्रव्यातील श्रेष्ठ द्रव्य आहे. विशेषत: पित्त हे जेव्हा त्याच्या उष्ण व तीक्ष्ण गुणाने वाढते त्या वेळेस या गुलकंदाचा उपयोग अधिक चांगला होतो. गुलकंद तयार करताना वापरावी लागणारी साखरही मधुर रसाची व म्हणूनच पित्तघ्न आहे.

अनेक वेळा या गुलकंदामध्ये प्रवाळपिष्टी मिसळली जाते. प्रवाळ हेही पित्ताचा तीक्ष्ण, उष्ण गुण कमी करणारे एक महत्त्वाचे द्रव्य आहे. गुलकंदास प्रवाळाची जोड दिल्याने या कल्पाचे गुणधर्म अनेक पटीने वृद्धिंगत होतात.

गुलकंद हा या प्रकारे उष्ण, तीक्ष्ण गुणाच्या विरोधी असल्यानेच उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कडक उन्हाळा बाधू नये यासाठी याचा प्रामुख्याने उपयोग केला जातो. सर्वांमध्येच पण विशेषत: लहान मुलांमध्ये उन्हाळ्याच्या दिवसात या कल्पाचा नित्य वापर करणे हितावह ठरते. याच्या उपयोगाने हाता-पायांची जळजळ, डोळ्यांची आग, ज्वर इत्यादी लक्षणे निश्चयाने टाळता येतात.

उन्हाळ्यातच नव्हे तर अन्यत्रही दाह हे अनेक रोगात आढळणारे त्रासदायक लक्षण कमी करण्यासाठी गुलकंद वापरणे युक्त ठरते.

रक्तपित्त या रोगात रक्ताची पित्ताने दुष्टी होऊन बाह्यमार्गाने रक्त हे शरीराच्या बाहेर पडू लागते. नाका-तोंडातून वा अधोमार्गाने (गुद, मूत्र वा योनिमार्गाने) बाहेर पडणारे रक्त थांबविण्यासाठी अनेक प्रकारचे शीतोपचार आवश्यक असतात. यासाठीही गुलकंदाचा प्रयोग इष्ट ठरतो.

उन्हाळ्यात लहान बालकांमध्ये आढळणाऱ्या गोवर, कांजिण्या यांसारख्या रोगांनंतर येणारे दौर्बल्य दूर करण्यासाठी व या रोगांची जी पश्चात लक्षणे असतात ती दूर करण्यासाठीही गुलकंदाचा वापर करणे संयुक्तिक आहे.

**प्रमाण :** १ ते २ चमचे, ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑



## ५. अश्वगंधावलेह

**घटक द्रव्ये :** (१) अश्वगंधा, गाईचे दूध, साखर, चतुर्जात, जायपत्री, जायफळ, केशर, वंशलोचन, मोचरस, जटामांसी, चंदन, अगरू, पिंपळी, पिंपळमूळ, लवंग, कंकोळ, खाजकुयलीचे बी, अक्रोड बी, भल्लातक बी (गोडांबी), काकडशिंगी, गोखरू, रससिंदूर, अभ्रकभस्म, नागभस्म.

प्रथमत: अश्वगंधा, गाईचे दूध व साखर घेऊन अवलेह बनविला जातो व नंतर त्यात इतर द्रव्ये मिसळली जातात.

अश्वगंधावलेह हे एक उत्कृष्ट बल्य, सप्तधातुवर्धक असे औषध आहे. अश्वगंधा हे रसायन म्हणूनही ओळखले जाते. रसायन म्हणजे सर्व शरीरधातू प्राकृत ठेवून, निरोगी अवस्था टिकवून, पर्यायाने तारुण्य अधिककाल टिकविणारे औषध होय. अश्वगंधावलेहामध्ये अश्वगंधेच्या जोडीला असणारी इतर द्रव्येही धातुंची उत्पत्ती योग्य तऱ्हेने होण्यासाठी आवश्यक असणारा शरीरातील धात्वग्नी वाढविणारी व पर्यायाने अश्वगंधेच्या रसायन कर्मास सहाय्यभूत ठरणारी आहेत. अक्रोड बी, गोडांबी यांसारखी द्रव्ये मांसधातुवर्धनाकरता अग्रगण्य समजली जातात.

अश्वगंधावलेहातील रससिंदूर, अभ्रक, पिंपळी, वंशलोचन, चतुर्जात आदी द्रव्ये श्वसनमार्गावर कार्यकारी व कफघ्न आहेत. याचमुळे राजयक्ष्मा (Pulmonary T. B.), हृद्रोग (C. C. F.) यांसारख्या रोगांमध्येही बल्य म्हणून या अश्वंगाधावलेहाचा उपयोग होतो.

अश्वगंधा हे शुक्रधातू वाढविणारे द्रव्य म्हणून प्रसिद्ध आहे. शुक्रक्षयाने उत्पन्न होणाऱ्या विविध अवस्थांवर म्हणूनच अश्वगंधावलेहाचा उपयोग होतो. मैथूनशक्ती कमी होणे (Sexual Debelity) यासाठीही अश्वगंधावलेह प्रभावी आहे. अश्वगंधावलेहातील खाजकुयलीचे बी, जायफळ, केशर, बिब्ब्याचे बी, नागभस्म आदी द्रव्ये अश्वगंधेस या कर्मामध्ये सहाय्यभूत ठरतात. फिरंग, उपदंश आदी रोगांमध्येही या अवलेहाचा लाभदायक प्रयोग केला जातो.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ६. अश्वगंधादिघृत

**घटक द्रव्ये :** अश्वगंधा, विदारीकंद, शतावरी, गोखरू, आवळकाठी, जेष्ठमध, पुनर्नवा, वाळा, तृणपंचमूळ, एरंडमूळ, लिंबाचा रस, तूप.

अश्वगंधादिघृत हे उत्कृष्ट बल्य आहे. अश्वगंधा, विदारीकंद, शतावरी, आमलकी ही सर्व द्रव्ये शीतगुणाची, कटुपौष्टिक व वातनाशक अशी द्रव्ये आहेत. शरीरधातुंचा ऱ्हास झाल्याने शरीरातील वात वाढून अनेक प्रकारचे वाताचे रोग संभवतात. या प्रकारच्या सर्व वातविकारासाठी अश्वगंधादिघृत उपयुक्त ठरते.

पुनर्नवा, वाळा, तृणपंचमूळ, एरंडमूळ, गोखरू, शतावरी व स्वत: अश्वगंधा ही सर्व द्रव्ये शीतगुणांची पित्तप्रशमन करणारी व मूत्रल म्हणजेच मूत्राचे प्रमाण वाढविणारी आहेत. या गुणधर्मामुळेच अश्वगंधादिघृत हे मूत्रकृच्छ्र, सदाह मूत्रप्रवृत्ती (Burning micturition), सरक्त मूत्रप्रवृत्ती (Heamaturia) साठीही लाभदायक ठरते. फिरंग व उपदंश आदी रोगांमध्ये जीर्णावस्थेत जी औषधे वापरली जातात त्यापैकी अश्वगंधादिघृत हा एक महत्त्वाचा कल्प होय.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## ७. कुष्माण्डावलेह

**घटक द्रव्ये :** कोहळा, आवळकाठी, गाईचे दूध, साखर.

कुष्माण्ड म्हणजे कोहळा. यापासून बनविला जाणारा अवलेह तो कुष्मांडावलेह होय. काही वेळा याच्या वड्या करून त्याही वापरल्या जातात.

कोहळा हा शीत, मधुर, गुरू, स्निग्ध गुणांचा वातनाशक असून उत्कृष्ट बल्य आहे. विशेषत: मांसधातुवर्धनाचे कार्य या द्रवाने घडते.

शरीरधातुंचा क्षय झाल्याने वातवृद्धी होऊन अनेक प्रकारचे वातविकार उत्पन्न होतात. या सर्व धातुक्षयजन्य वातविकारासाठी कुष्मांडावलेह उपयुक्त ठरतो. ज्वर किंवा यासारख्या अन्य रोगानंतर असणारे दौर्बल्य कमी करण्यासाठी तर कोहळा-पाकासारखे अन्य औषध नाही.

या पाकात असणारे आवळकाठी हे घटकद्रव्य रसायन म्हणजेच सप्तधातूंच्या वाढीसाठी उपयुक्त असल्याने याचे सहाय्याने कुष्मांडावलेहाचे गुणधर्म अनेकपटींनी वाढतात. आवळकाठी ही 'क' जीवनसत्त्वाने संपृक्त असते. 'क' जीवनसत्त्वामुळे



शरीराची व्याधिप्रतिकारकशक्ती वाढते. या गुणांमुळेही कुष्मांडावलेहाचा रोगोत्तर कालामध्ये (Convalasene period) अधिकच चांगला उपयोग होतो.

कुष्मांडावलेह तयार करताना त्यात गाईचे दूध वापरले जाते. दूध हे सर्व शरीरधातुंची वाढ करणारे श्रेष्ठ द्रव्य असल्यानेच याची जोड या कल्पास दिलेली असते.

केवळ रोगावस्थेतच नव्हे तर प्राकृतावस्थेतही जनरल टॉनिक म्हणून हा कल्प वापरला जातो. थंडीच्या दिवसात म्हणजेच विसर्गकालामध्ये याचा अधिक चांगला उपयोग होतो.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## ८. अभयामलकी लेह

**घटक द्रव्ये :** हिरडा, आवळकाठी, ब्राह्मी, शंखपुष्पी, विडंग, चंदन, अगुरू, वेखंड, दशमूळ, साखर.

अभया म्हणजे हिरडा व आमलकी म्हणजे आवळकाठी. अभया व आमलकी ही दोन महत्त्वाची घटक द्रव्ये असणारा हा अभयामलकी लेह मुख्यत: वापरला जातो तो वार्धक्यामुळे येणारे दौर्बल्य दूर करण्यासाठी व मनोदौर्बल्य दूर करण्यासाठी.

हिरडा व आवळकाठी ही दोन्ही रसायन द्रव्ये आहेत. सर्वच शरीरधातुंची वाढ होण्यासाठी आवश्यक असणारा धात्वग्नी वाढवून धातू पोषणाचे कार्य करणारी ही द्रव्ये आहेत. वृद्धावस्थेमध्ये हळूहळू सर्वच धातू क्षीण होत जातात. या वृद्धावस्थेत येणाऱ्या किंवा अन्य कारणाने उत्पन्न होणाऱ्या धातुक्षयामुळे वातप्रकोप होऊन अनेक प्रकारचे वातरोग निर्माण होण्याची शक्यता असते. अभयामलकीलेहातील दशमूल या महत्त्वाच्या कार्यकारी द्रव्यामुळे हा वातप्रकोप व तद्जन्य सर्व वातविकार हे टाळता येतात किंवा उत्पन्न झालेले असतील तर नष्ट करता येतात.

वार्धक्यामुळे शारीरिक दौर्बल्याबरोबरच मनोदौर्बल्यही येते. या निर्माण होणाऱ्या मनोदैन्याचे परिणाम म्हणजे स्वभाविकपणे येणारा चिडचिडेपणा होय. याचसाठी शारीरिक बल्य-औषधांचे जोडीला मनोबल वाढविणारी औषधेही वापरणे इष्ट असते. याच दृष्टीकोनातून विचार करून अभयामलकी लेहाला ब्राह्मी, शंखपुष्पी, वावडिंग, अगुरू, वेखंड आदी मनोवह स्रोतसावर कार्यकारी व मनोदोष दूर

करण्यास उपयुक्त असणाऱ्या औषधांची जोड दिलेली आहे.

केवळ वार्धक्याने येणारे मनोदैन्य यामुळे कमी होते असे नव्हे तर उन्माद (वेडेपणा), अपस्मार (फिट्स येणे) यासारख्या रोगांमधील मनोदोष दूर करण्यासही हा कल्प युक्त ठरतो.

**प्रमाण :** १/२ ते १ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध

❑❑❑

## ९. अगस्त्य हरीतकी अवलेह

**घटक द्रव्ये :** हिरडा, जवस, दशमूळ, चित्रक, पिंपळमूळ, अपामार्ग (आघाडा), कपूरकाचरी, खाजकुयलीचे बी, शंखपुष्पी, भारंगमूळ, गजपिंपळी बला, पुष्करमूळ, साखर.

अगस्ती या सिद्धहस्त प्राचीन मुनींनी सांगितलेला हा कल्प पुढे त्यांच्याच नावाने म्हणजेच अगस्त्य हरीतकी अवलेह या नावाने प्रसिद्ध पावलेला आहे.

हरीतकी म्हणजेच हिरडा हे यातील प्रमुख घटक द्रव्य असून या हिरड्यास अनेक बल्य, वातकफघ्न व श्वासमार्गावर कार्यकारी औषधांची जोड दिलेली असते. जवस, चित्रक, कपूरकाचरी, भारंगमूळ, गजपिंपळी, पुष्करमूळ यासारख्या घटकद्रव्यांमुळेच या कल्पाचा उपयोग प्राधान्याने श्वसनमार्गातील विविध रोगावर होत असतो. विशेषत: कास (खोकला) या लक्षणावर अधिक उपयुक्त असा हा कल्प आहे. ज्या खोकल्यात कफ फार पडतो (Cough with Expectoration) अशा खोकल्याच्या प्रकारात तर याचा फारच चांगला उपयोग होतो. या कल्पातील जवस, पुष्करमूळ, कपूरकाचरी आदी औषधी घटक द्रव्यामुळे फुफ्फुसात साठणाऱ्या कफाचे शोषणही होते. जलपार्श्व (Pleurecy with Effussion) या रोगात फुफ्फुसावरणामध्ये जल संचिती होते. या जलाच्या शोषणाचे कार्यही वरील घटकांकडून घडते. याच रोगात असणारी उरोवेदना (Pain in Chest) कमी करण्यास या अवलेहात असणारी दशमूळ, गजपिंपळी, पुष्करमूळ ही द्रव्ये सहाय्यभूत ठरतात.

राजयक्ष्मा (Pulmonary T. B.) या रोगातही खोकला, छातीत दुखणे, ताप येणे यासारखी लक्षणे प्राधान्येकरून आढळतात. ही सर्व लक्षणे अगस्त्य हरीतकी अवलेहाचे प्रयोगाने कमीहोतात. राजयक्ष्म्यामध्ये सर्वच शरीर धातू क्षीण होतात व म्हणूनच त्यास क्षय असेही संबोधिले जाते. हा धातुक्षय दूर करण्यासाठी हा अवलेह



समर्थ ठरतो. यातील हरीतकी हे द्रव्य रसायन जाहे. त्याचे धातुवर्धनाचे कार्यास खाजकुयलीचे बी, बला यासारख्या उत्तमबल्य औषधांचे सहाय्य मिळाल्याने गुणकर्म अनेक पटीने वृद्धिंगत होत असतात.

वारंवार होणारे पडसे किंवा जीर्ण स्वरूपाचे पडसे (Acute or Chronic Rhinitis) यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध औषधी कल्पांबरोबर या अवलेहाचा अनुपान म्हणून उपयोग केला जातो.

अगस्त्यहरीतकी अवलेह हा श्वसनमार्गाप्रमाणेच पचनसंस्थेवरही तितकाच चांगला, प्रभावी कल्प आहे. यातील घटकद्रव्ये ही उत्तम दीपनपाचन करणारी असल्याने अग्निप्रदीप्त करून, भूक वाढवून पर्यायाने खाल्लेल्या अन्नाचे सम्यक् पचन करून रोग्याचे बल वाढविण्यास सहाय्यभूत ठरणारी आहेत. विशेषत: चित्रक, पिंपळमूळ, आघाडा, गजपिंपळी या द्रव्यामुळे हे कार्य घडत असते. म्हणून ग्रहणीसारख्या अग्निमांद्यप्रधान रोगांवरही याचा उपयोग केला जातो.

दीपन-पाचन करून भूक वाढविणारा व त्याचबरोबर बल्य औषधांनी युक्त असा हा कल्प उत्कृष्ट रसायनकल्प म्हणूनच ओळखला जातो.

**प्रमाण :** १ ते २ चमचे, ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## १०. पूगपाक

**घटकद्रव्ये :** नागकेशर, नागरमोथा, चंदन, त्रिकटू, आवळकाठी, प्रियाळ, लाजाळू, दालचिनी, तमालपत्र, वेलची, जिरे, शहाजिरे, शिंगाडा, वंशलोचन, जायफळ, लवंग, धने, बडिशेप, सुपारी, दूध, तूप, साखर, आमलकी, शतावरी.

प्रथमत: सर्व द्रव्ये व सुपारी एकत्रित करून दुधाबरोबर शिजवतात. नंतर त्यात साखर, तूप घालून अवलेह तयार केला जातो. शेवटी आमलकी व शतावरी चूर्ण मिसळून कल्प तयार होतो.

पूगीफल म्हणजेच सुपारी हे यातील प्रमुख कार्यकारी घटक द्रव्य आहे. सुपारी ही कषायरसाची (तुरट) असून उत्तम स्तंभक (Astringent) आहे. त्यातही ओल्या सुपारीत हे गुणधर्म अधिक प्रकर्षाने आढळतात. याचसाठी पूगीपाक बनविताना ओलीसुपारी किसून वापरली जाते.

सुपारी ही कषाय व स्तंभक असल्याने याचे सेवनाने क्लेद (शरीर-धातुंची

उत्पत्ती होत असताना तयार होणारा टाकवू पदार्थ) कमी होतो. क्लेद अधिक प्रमाणात ज्या रोगात वाढलेला असतो असा रोग म्हणजे प्रमेह (Diabetis Melitis) हा होय. या रोगाच्या जीर्णावस्थेत पूगपाकाचा विशेषत्वाने लाभ होतो. या कल्पाचे उपयोगाने क्लेद कमी झाल्याने मूत्राचे वाढलेले प्रमाण कमी होते व रक्तातील साखरेचे प्रमाणही आटोक्यात राखता येते. मधुमेहाखेरीज अन्यत्र आढळणारी बहूमूत्रता (Polyuria) हे लक्षण असणारा (Diabetis Insipedus) साठीही पूगकल्प हे औषध प्रभावी ठरते.

या कल्पात सुपारीखेरीज असणारी बहुतेक सर्व घटक द्रव्ये ही उत्कृष्ट दीपन-पाचन करणारी, अग्निवर्धक असून त्यामुळे घेतलेल्या आहाराचे सम्यक् पाचन करणारी आहेत. आहाराच्या सम्यक् पाचनानेच सर्व शरीरधातुंची उत्पत्ती योग्य प्रमाणात होते व निर्माण होणाऱ्या क्लेदाचे प्रमाणही कमी राहते. यामुळेच ही सर्व द्रव्ये क्लेदक-कफाचे सर्वच विकारात, विशेषत: प्रमेहाचे चिकित्सेत उपयुक्त ठरतात.

या कल्पास आवळकाठी व शतावरीचे दिलेल्या जोडामुळे हा कल्प प्रमेहादी रोगांमुळे येणारे दौर्बल्य दूर करण्याचे कार्यही करतो.

जीर्ण प्रवाहिकेमध्ये (Chronic Dysentery) पूगपाकाचा उपयोग त्याच्या दीपन-पाचन व स्तंभक गुणांमुळेच होतो. याचे उपयोगाने वारंवार होणारी सकफ मलप्रवृत्ती (आव पडणे) त्वरेने थांवते, पोटात धरणारा मुरडा कमी होतो व रुग्णास तत्काळ आराम मिळतो. यासाठी या कल्पातील जायफळ, नागकेशर ही द्रव्ये विशेष कार्यकारी ठरतात.

धूपणी (योनिगत श्वेत स्राव, Leucorrhea) यामध्येही पूगपाकाचा यशस्वीप्रयोग केला जातो. श्वेत प्रदराप्रमाणेच रक्तप्रदरामध्येही (Menorrhagia) हा कल्प उत्तम लाभदायी ठरतो.

**प्रमाण :** १ ते २ चमचे, ३ वेळा.

**अनुमान :** दूध.

❑ ❑ ❑

## ११. अमृतभल्लातकावलेह

**घटक द्रव्ये :** गुळवेल, बिब्बा, त्रिफळा, गोखरू, पित्तपापडा, नागरमोथा, त्रिकटू, दालचिनी, वेलची, नागकेशर, साखर.

अमृता म्हणजे गुळवेल व भल्लातक म्हणजे बिब्बा. अमृतभल्लातकावलेह हा



गुळवेल व बिब्बा ही प्रमुख घटक द्रव्ये असणारा कल्प आहे. या कल्पातील सर्व द्रव्ये ही वातकफनाशक आहेत. हा कल्प मुख्यत: कुष्ठासाठी वापरतात. महाकुष्ठा (लेप्रसी) वरील जे कल्प वापरले जातात त्यापैकी हा एक महत्त्वाचा कल्प आहे. त्वचेच्या ठिकाणी नष्ट झालेली संज्ञा पुन्हा प्राप्त करून देण्याचे कार्य या अवलेहाकडून घडते.

अनेक वातविकारांमध्येही शरीराच्या काही भागातील संज्ञा नष्ट होते. या विकारांतही हा कल्प उपयुक्त ठरतो. अर्धांगावर (Hemiplegia) हा अवलेह म्हणूनच उपयुक्त ठरतो. वातविकारामध्ये असणारी वेदना या अवलेहातील बिब्बा, गुळवेल यासारख्या घटक द्रव्यांनी कमी होते.

फिरंग, उपदंशादी रोगातही या कल्पाचा उपयोग होतो.

या अवलेहात भल्लातक म्हणजे बिब्बा असल्याने हा कल्प फार काळजीपूर्वक वापरावा लागतो. कारण अनेक व्यक्तिना बिब्ब्याची ॲलर्जी असते. विशेषत: पित्तप्रकृतीच्या व्यक्तिमध्ये व पित्तानुबंधी रोगांमध्ये हा कल्प देण्याचे शक्यतो टाळले पाहिजे. बिब्बा हा तीक्ष्ण, उष्ण असल्यानेच त्याचा वापर चालू असताना रुग्णाने सर्व प्रकारचे उष्ण पदार्थ वर्ज्य केले पाहिजेत. उन्हामध्ये फिरणे, विस्तवाजवळ अधिक काळ राहणे वगैरे गोष्टीही टाळल्या पाहिजेत.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## १२. लशूनपाक

**घटक द्रव्ये :** लसूण, दूध, तूप, रास्ना, गुळवेल, गव्हलाकचोरा, सुंठ, देवदार, ओवा, चित्रक, बडिशेप, पुनर्नवा, पिंपळी, वावडिंग, मध, साखर.

**प्रक्षेप द्रव्ये :** लोहभस्म, रससिंदूर, कापूर, कस्तुरी, कुचला.

लसणीच्या पाकळ्या सोलून दुधात शिजविल्या जातात. नंतर त्यात साखर, तूप व इतर औषधी द्रव्ये मिसळून अवलेह केला जातो. तयार झालेल्या अवलेहात लोहभस्म वगैरे प्रक्षेप द्रव्ये मिसळली जातात. याप्रकारे तयार झालेला हा लशूनपाक विविध वात व कफविकारांसाठी उपयुक्त ठरतो.

लसूण ही उष्ण, तीक्ष्ण, दीपनपाचन करणारी व वातकफनाशक आहे. महास्रोतसाशी संबंधित अनेक रोगांमध्ये (Diseases related to digestive system)

विशेषत: ज्यामध्ये अग्निमांद्य हे लक्षण प्राधान्याने आढळते अशा सर्व रोगांमध्ये लशूनपाक वापरणे इष्ट ठरते. अजीर्ण व तद्‌जन्य तीव्र उदरशूल, कृमि या सर्वांवर लशूनपाक कार्यकारी ठरतो. सुंठ, ओवा, चित्रक, पिंपळी, वावडिंग ही सर्व द्रव्ये यासाठी सहाय्यभूत ठरतात.

वातानुलोमन योग्यप्रकारे न झाल्याने, वायुला प्रतिलोमगती प्राप्त झाल्याने किंवा वायूच्या प्राकृत गतीमध्ये अडथळा आल्याने अनेक वेळा तीव्र स्वरूपाची उदरवेदना (Acute Colicky Pain) उत्पन्न होते. कारस्कर (कुचला) हे द्रव्यही वातानुलोमनाचे कार्यात मदत करते.

लशूनपाकाचा उपयोग श्वसनमार्गातील अनेक रोगांसाठीही चांगला होतो. लसूण, सुंठ, पुनर्नवा, पिंपळी, कापूर या वनस्पतिजन्य द्रव्यांबरोबरच रससिंदूर, कस्तुरी यासारख्या खनिज व प्राणिज द्रव्यांची जोडही दिली जाते. श्वसनमार्गावर, विशेषत: फुफ्फुसावर कार्यकारी अशी ही सर्व द्रव्ये आहेत. तमक-श्वास (Bronchial Asthama), वातकफज्वर (Influenza), श्वसनकज्वर (Pneumonia), जलपार्श्व (Pleurecy with Effussion) यासारख्या कफप्रधान रोगांमध्ये लशूनपाकाचा उपयोग केल्याने सर्व लक्षणे त्वरेने कमी होत जातात. यातील रससिंदूर, कस्तुरी सारख्या उष्ण, तीक्ष्ण व द्रवाचे शोषण करणाऱ्या घटक द्रव्यांमुळे जलपार्श्वातील असलेली जलसंचिती कमी करण्यास हा कल्प उपयुक्त ठरतो.

लशूनपाकाचा उपयोग सर्व प्रकारच्या संधिवेदना कमी करण्यासाठी होतो. लसूण, गुळवेल, सुंठ, देवदार, कारस्कर ही सर्व वातघ्न, वेदनाप्रशमन करणारी द्रव्ये यासाठी उपयुक्त ठरतात. संधिवात (Simple Arthritis) आमवात (Rhaumatic Arthritis) वातरक्त (Gout) आदी रोगातील संधिवेदना कमी करण्यासाठी त्याचप्रमाणे गृध्रसी (Sciatica), विश्वाची (Brachial neuritis) यासारख्या रोगातील वेदना कमी करण्यासाठीही हा कल्प लाभदायक ठरतो.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑ ❑ ❑

## १३. उदुम्बरावलेह.

**घटक द्रव्ये :** उंबराची पाने, गुलाबकळी, अनंतमूळ, मेंदी, साखर.

उदुंबर किंवा उंबर हा महत्त्वाचा घटक असणारा हा कल्प उत्कृष्ट कफपित्तनाशक



आहे. यातील सर्वच द्रव्ये शीतवीर्य असून पित्ताचा उष्ण गुण कमी करणारी आहेत. त्यामुळेच या कल्पाचा उपयोग प्रामुख्याने दाह (Burning Sensation) या लक्षणासाठी केला जातो. हस्तपाददाह, नेत्रदाह किंवा सर्वांगदाहामध्येही दाह त्वरेने कमी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त असा हा उंदुबरावलेह आहे.

उंबर हे शीत व रक्तप्रसादन करणारे तसेच रक्तस्तंभकही आहे. यामुळेच रक्तपित्त या रोगात या अवलेहाचा लाभदायक प्रयोग केला जातो. गुलाबकळी, अनंतमूळ, मेंदी ही सर्वच द्रव्ये या कार्यास उंदुबरास सहाय्यभूत ठरणारी आहेत.

राजयक्ष्म्यांसारख्या रोगात उर:क्षत (Cavitation) उत्पन्न होते व त्यामुळे रक्तष्ठीवन (Haemoptesis) होत असते. हे रक्तष्ठीवन कमी करण्यासही उदुम्बरावलेह वापरणे फायदेशीर ठरते.

रक्तप्रदर, श्वेतप्रदर या स्त्रीरोगांत तसेच गर्भिणी अवस्थेत गर्भपोषणासाठी युक्त असा हा एक कल्प आहे.

उदुंबर, मेंदी, अनंतमूळ ही घटक द्रव्ये मूत्रल (Diuretic) आहेत. उंदुबरावलेहाचे सेवनाने मूत्राचे प्रमाण वाढते व म्हणूनच मूत्रकृच्छ्र (Painful Micturation), मूत्राघात (Scanty Urination), सदाह मूत्रप्रवृत्ति (Burning Micturation) यासारख्या मूत्ररोगात हा कल्प कार्यकारी ठरतो.

उपदंशासारख्या रोगामध्येही हा कल्प वापरला जातो. शुक्रदौर्बल्यामुळे येणारी मैथुनासमर्थता (Sexual Debility) यासाठीही हा एक चांगला कल्प आहे.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑ ❑ ❑

## १४. कंदर्पपाक

**घटक द्रव्ये :** कांदा, दूध, तूप, मध, साखर, दालचिनी, जायपत्री, केशर, लवंग, खवा, खाजकुयलीचे बी, ताम्रभस्म.

कंदर्प किंवा कांदा हा उष्ण, लघु, कटु रसाचा (तिखट), उत्तेजक, कफघ्न व मूत्रजनन करणारा (मूत्राचे प्रमाण वाढविणारा) आहे. याच गुणकर्मांचा विचार करून कंदर्पपाकाचा विविध रोगांमध्ये उपयोग केला जातो.

कांदा वापरल्याने वात कमी होतो, पित्त पडून जाते व कफाचा नाश होतो. म्हणजेच कांदा हा तीनही दोषांवर कार्यकारी ठरतो असे म्हणता येईल. लहान

मुलांना व वृद्ध माणसांना दोघांनाही कफरोगांमध्ये याचा विशेष लाभ होतो. कंदर्पपाकाच्या उपयोगाने क्षय (Pulmonary T. B.) रोगातील खोकल्याचा त्रास कमी होतो. यातील कांदा, ताम्रभस्म व दालचिनी, लवंग, केशर, जायपत्री यासारखी सुगंधी द्रव्ये या सर्वांमुळे वातानुलोमनाचे कार्य उत्तम प्रकारे होते, आतड्याची चलनवलन शक्ती वाढून शौचास साफ होत असल्यानेच या पाकाचा उपयोग अर्श (Piles) गुदभ्रंश (Prolapse of the Rectum,) कावीळ (Jaundice) यांसारख्या रोगात होत असतो.

वारंवार गळवे होणे, तारुण्यपिटिका यावरही कंदर्पपाक उपयुक्त ठरतो.

कांद्याचा उपयोग आणखीही एका विशिष्ट अवस्थेत केला जातो. कांदा हा उत्तेजक असल्याने कामेच्छा कमी असणाऱ्या पुरुषात कांद्याच्या नित्य वापराने निश्चित सुधारणा आढळून येते. या कल्पातील खाजकुयलीचे बी, जायपत्री, केशर आदी द्रव्येही यासाठी उपयुक्त ठरतात.

कांद्यामध्ये एकप्रकारचे तीक्ष्ण, उग्रगंधी तेल असते. हा नकोसा वाटणारा उग्रगंध कमी करण्याचे कार्य केशर, लवंग, दालचिनी, जायपत्री ही द्रव्ये करीत असतात.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून २ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## १५. कुटजावलेह

**घटक द्रव्ये :** कुटजघन, साखर.

प्रथमत: कुड्याच्या सालीचा काढा करून तो आटविला जातो व नंतर त्यात साखर मिसळून हा अवलेह बनविला जातो.

कुडा हा शीत, रुक्ष व कषाय (तुरट) रसाचा व म्हणूनच उत्कृष्ट स्तंभक (Astringent) आहे. कुड्याचे कार्य प्रामुख्याने घडते ते मोठ्या आतड्यावर. कुडा हा स्तंभक असल्याने याच्या उपयोगाने मोठ्या आतड्याच्या हालचाली मंदावतात व त्यातून द्रव पदार्थांचे अधिक प्रमाणात शोषण होते. याच गुणकर्मामुळे कुड्याचे अनेक कल्प हे अतिसार, प्रवाहिका, ग्रहणी किंवा ज्यामध्ये जुलाब होतात असे सर्व प्रकारचे रोग यावर वापरले जातात.

कुड्याच्या विविध कल्पापैकी कुटजावलेहाचा उपयोग प्रामुख्याने जीर्ण प्रवाहिका (Chronic Dysentery) व ग्रहणी (Chronic Colitis किंवा Sprue) या रोगात



अधिक होतो. ग्रहणीमध्ये मोठ्या आतड्यात व्रण उत्पन्न होतात, खाल्लेल्या अन्नाचे पचन नीट होईनासे होते, आतड्यातून सारभागाचे शोषण योग्य प्रकारे होत नाही व वारंवार दुर्गंधीयुक्त शौचास होते. बरेच दिवस असे चालू राहिल्याने रोगी अतिशय दुबळा होतो, त्याचे वजन कमी होते, मानसिक संतुलनही बिघडते व सर्वच दृष्टीने गंभीर अवस्था प्राप्त होते. अशा अवस्थेत कुटजावलेहाचा अमृताप्रमाणे उपयोग होतो. कुटजावलेहाने पचनशक्ती सुधारते, मोठ्या आतड्यातील व्रण भरून येतात, सारभागाचे शोषणही योग्य प्रकारे होऊ लागते व शौचास बांधून येऊ लागते. कुटजावलेहाने त्वरीत लाभ होतो असे जरी नसले तरी सातत्याने औषध घेतल्यानंतर निश्चयाने फायदा मिळतो व मिळणारा लाभ कायम स्वरूपाचा असतो.

कुटजावलेहाचा उपयोग रक्तार्शामध्येही (Bleeding Piles) चांगला होतो. कुडा हे स्तंभक द्रव्य असल्याने गुदमार्गे होणारा रक्तस्राव लगेच थांबतो. कुडा हा जाठराग्नी प्रदीप्त करून अर्शाचे मूळ कारण अग्निमांद्य दूर करून व्याधीचा संपूर्ण नाश करण्याचेही कार्य करीत असतो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## १६. बिल्वावलेह - बेलाचा मुरंबा

**घटक द्रव्ये :** बेलफळाचा मगज, साखर.

बेलफळाचा जो मुरंबा बनविला जातो त्यासच बिल्वावलेह हे दुसरे नाव आहे.

सर्वसाधारणपणे औषधासाठी कोणतेही फळ वापरावयाचे असेल तर फळ चांगले पिकलेले असावे असा नियम सांगितला जातो. बेलफळ मात्र याला अपवाद आहे. बेलफळ पिकल्यानंतर त्याचे अपेक्षित गुण बदलले जात असल्याने अपेक्षित लाभ मिळण्यासाठी बिल्वावलेह बनविताना कच्चे फळच वापरावे लागते.

बाल बिल्व (कच्चे बेलफळ) हे ग्राही गुणाचे आहे. ग्राही म्हणजेच उष्ण गुणामुळे आतड्यातील द्रवांशाचे अधिक शोषण घडवून आणून जुलाब थांबविणारे औषध. ग्राही औषधे ही जाठराग्नि वाढविणारीही असतात.

कच्च्या बेलफळांपासून बनविला जाणारा मुरंबा हा याप्रकारे ग्राही असल्याने अतिसारावरील (Diarrhea) ते एक प्रभावी औषध आहे. अतिसार (Diarrhea), प्रवाहिका (Dysentery), ग्रहणी (Chronic Colitis or Sprue) यांसारख्या सर्वच

रोगात याचा लाभ होतो. याने जुलाब तर थांबतातच पण त्याचबरोबर आध्मान (पोटात धरणारा गुबारा) ही कमी होऊन पोट दुखणेही थांबते. बिल्वावलेहाने जाठराग्नि प्रदीप्त होऊन भूकही चांगली लागते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

## १७. चुक्र तैल

**घटक द्रव्ये :** चुक्याचा रस, बोरीचा काढा, दही, तिळाचे तेल, सुंठ, यवक्षार.

चुक्र म्हणजेच आंबट चुका. भाजीसाठी नेहमी वापरला जाणारा हा जो आंबट चुका तोच प्रमुख असणारे सिद्ध तेल म्हणजेच चुक्रतैल होय.

चुक्र तैलाचा उपयोग प्रामुख्याने केला जातो तो गुदभ्रंशासाठी. (Prolapse of the Rectum) कोणत्याही वयाच्या रुग्णामध्ये आढळणारे पण त्यातही लहान बालकांमध्ये अधिककरून असणारे हे लक्षण अतिसार (Diarrhea) वा प्रवाहिका (Dysentery) यामध्ये विशेषकरून आढळते. प्रवाहिकेमध्ये वारंवार मलप्रवृत्ती होते व तीही फार कुंथून कुंथून व थोडी थोडी. या कुंथण्यामुळेच अखेरीस गुदभ्रंश हा उपद्रव (Complication) निर्माण होतो. गुदभाग शरीराबाहेर पडू लागतो. सुरुवातीस मलप्रवृत्तीनंतर गुदभ्रंश झालेला भाग आपोआप आत जातो पण कालांतराने हा गुदाचा भाग आत जाईनासा होतो. अशा गुदभ्रंशाचे रुग्णास तो गुदभाग आत ढकलून बसवावा लागतो. या वेळी आत्यधिक प्रमाणात वेदनाही होते. या सर्व अवस्थेत चुक्रतैल लाभदायी ठरते. गुदभ्रंशाचे ठिकाणी चुक्रतैल लावून नंतर गुदभाग आत ढकलल्याने वेदना कमी होते. चुक्रतैलाने गुदभागास बल प्राप्त होऊन वारंवार होणारा गुदभ्रंशही कमी होतो. यासाठी गुदभागी चुक्रतैलाचा पिचु (तेलात भिजवलेला कापसाचा बोळा) ठेऊन बँडेज करणे युक्त ठरते. बोर हे यातील दुसरे औषधी घटक उत्कृष्ट कषाय रसाचे व म्हणूनच स्तंभक असल्याने पुन:पुन्हा गुदभ्रंश होण्याची प्रवृत्ती कमी होण्यास सहाय्यभूत ठरते.

चुक्रतैल उत्कृष्ट दीपन पाचन (भूक वाढविणारे) व पर्यायाने अतिसार, प्रवाहिका आदी रोगातील मूळ कारण असणारे अग्निमांद्य नष्ट करणारे असल्याने अशा रुग्णांना पोटात देण्याचे औषध म्हणूनही चुक्रतैलाचा यशस्वी वापर केला जातो.

**प्रमाण :** वाह्य उपचारासाठी - आवश्यकतेनुसार. पोटात घेण्यासाठी १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** कोमट पाणी.



## १८. एरंडस्नेह - एरंडेल

**घटकद्रव्ये :** एरंडेल.

एरंडतैल हे या पुस्तकात वर्णिलेल्या इतर तेलांपेक्षा वेगळे आहे. इतर तेले ही औषधी वनस्पती व तिळतेल एकत्र करून तैलप्रक्रियेने सिद्ध केलेली तेले आहेत. एरंडस्नेह म्हणजेच एरंडतेल हे मात्र या प्रकाराचे सिद्ध तेल नसून तिळाच्या तेलाप्रमाणेच एकेरी स्वतंत्र तेल आहे. एरंडेल हे एरंडीच्या बियांपासून मिळते व ते तसेच औषधी प्रयोगांसाठी वापरले जाते.

एरंडतेलाचा मुख्यत: वापर केला जातो तो विरेचनासाठी. अनेक रोगांमध्ये विरेचन (Purgative) अपेक्षित असते. अशा सर्वच रोगांमध्ये एरंडतेलाचा उपयोग होतो हे खरे. अशा रोगांची यादी बरीच मोठी होईल व म्हणूनच एरंडतेलाचा विशेष उपयोग ज्या रोगात होतो त्यांचाच विचार येथे करण्याचे ठरविले आहे.

आमवात (Rheumatic Arthritis) हा एक फार त्रासदायक असा रोग. यामध्ये सर्व मोठे सांधे सुजतात, ताप येतो व सांध्यांच्या ठिकाणी भयंकर वेदना असते. विंचू चावल्याप्रमाणे वेदना असते असे याचे सार्थ वर्णन केले जाते. सांध्यांच्या ठिकाणी असणारी वेदना व सूज यामुळे सर्व प्रकारच्या हालचाली थंडावतात. थोडीशीही हालचाल करताना मरणप्राय वेदना होत असतात. अशा प्रकारच्या या भयंकर रोगांमध्ये एरंडस्नेह म्हणजेच एरंडेल हे उत्कृष्ट औषध आहे. आमवाताच्या रोग्यामध्ये बद्धकोष्ठता नसली तरीही एरंडेल वापरावे लागते. अशा रुग्णांमध्ये नुसते एरंडेल पिण्यास दिले जाते किंवा इतर काही आहार द्रव्यांबरोबर मिसळून याचा वापर केला जातो. भाकरी वा पोळी करताना पिठातच एरंडेल मिसळून ती खाणे ही सर्वमान्य रूढ पद्धती आहे. एरंडेलाच्या उपयोगाने आमवाताची सर्वच लक्षणे कमी होण्यास मदत होते. शरीररूपी वनात संचार करणारा आमवातरूपी जो गजेंद्र त्याचा नाश करणारा एकमेव सिंह म्हणजे एरंडस्नेह होय असे रुपकात्मक यथार्थ वर्णन याचमुळे केले जाते.

पक्षाघात (Hemiplegia) या वातरोगामध्येही मृदुविरेचनाची (Mild Purgative) अपेक्षा असते. एरंडेल हे मृदुविरेचन करणारे असून ते उत्कृष्ट वातनाशक औषधी द्रव्य असल्याने त्याचा उपयोग या रोगात होतो. याच नव्हे तर गृध्रसी (Sciatica) आदी ज्या ज्या वात रोगांमध्ये मृदुविरेचन द्यावे लागते तेथे एरंडस्नेह वापरला जातो.

कामला (Jaundice), उदर (Ascitis) हे आणखी दोन महत्त्वाचे रोग की

ज्यामध्ये विरेचनासाठी एरंडतेलाचा प्रामुख्याने उपयोग केला जातो.

कृमीमध्ये (जंत) कृमिघ्न औषधे देऊन नंतर ते सर्व कृमी पडून जावेत यासाठीही एरंडेल वापरले जाते.

एरंडस्नेह विरेचनासाठी उत्कृष्ट द्रव्य असले तरी ते वापरताना काही काळजी घ्यावी लागते. एरंडस्नेहाने विरेचन होत असले तरी त्याने पोटात मुरडा धरतो. शौचास होताना पोटात बरेच दुखते. हे टाळण्यासाठी एरंडेल हे गरम पाण्याबरोबर दिले जाते. गरम पाणी किंवा सुगंधी द्रव्यांनी सिद्ध केलेले पाणी हे उत्कृष्ट वातानुलोमक असल्याने एरंडेल हे या द्रव्यांबरोबर वापरल्यास मुरडा धरत नाही व सुखाने विरेचन घडते. याचसाठी एरंडेल हे गरम चहाबरोबर किंवा सुंठीच्या काढ्याबरोबर देण्याची रूढी आहे.

विरेचनाप्रमाणेच एरंडस्नेह अन्य कारणासाठीही वापरले जाते. डोळ्यांची आग होणे, डोळे लाल होणे, तळावल्यासारखे होणे इत्यादी लक्षणांसाठी एरंडेलाचे डोळ्यात थेंब टाकले जातात. तळपायांना एरंडतेल चोळणे या उपक्रमानेही डोळ्यांची व हातापायांची होणारी जळजळ कमी होते.

**प्रमाण :** विरेचनासाठी. रुग्णाच्या कोठ्यानुसार २ ते ५ चमचे.
**अनुपान :** गरम पाणी वा चहा.
**आमवातामध्ये :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.
**अंजनासाठी :** १ ते २ बिंदू प्रत्येक डोळ्यामध्ये.
**बाह्यउपचारासाठी :** आवश्यकतेनुसार.

❏❏❏

## १९. फलघृत

**घटकद्रव्ये :** मंजिष्ठा, जेष्ठमध, कोष्ठ, त्रिफळा, खडीसाखर, बला, अश्वगंधा, ओवा, हळद, दारूहळद, कुटकी, प्रियंगु, कमल, लाक्षा, रक्तचंदन, श्वेतचंदन, तूप, शतावरीचा रस, दूध.

फलघृतातील महत्त्वाचे घटक द्रव्य शतावरी हे असून त्यास अनेक शीतगुणांच्या, तिक्त-कटुकषाय रसांच्या व पित्तशामक अशा वनस्पतींची जोड दिलेली आहे. फलघृताचा उपयोग प्रामुख्याने स्त्रीरोगात होतो. शतावरी बल्य असून विशेषत: गर्भाशयाचे पोषण करणारी आहे. ज्या स्त्रियांमध्ये गर्भाशय व तत्संबंधित प्रजननाचे अवयव यांची योग्य प्रकारे वाढ झालेली नसते अशा स्त्रीरुग्णांमध्ये या फलघृताचा



लाभदायक प्रयोग केला जातो. काही दिवस नियमाने हे तूप घेतल्यास या सर्व अवयवांची योग्यप्रकारे वाढ होते. गर्भाशयादिंची सुयोग्य वाढ झाल्यानेच स्त्री प्रजननक्षम बनते व वंध्यत्व (Sterility) नष्ट होते. गर्भाशयादी अवयवांची योग्यप्रकारे वाढ न झाल्याने येणारे वंध्यत्व दूर करण्यासाठी आजकाल जी अनेक प्रकारची 'हार्मोनल प्रिपरेशन्स' वापरली जातात त्यांचा काही वेळा चांगला उपयोग होतो हे खरे. पण त्याबरोबरच तदनुषंगिक अनेक दुष्परिणामही शरीरास भोगावे लागतात. फलघृताच्या उपयोगाने याउलट स्थिती असते. फलघृताने शंभर टक्के फायदा होतो पण कोणतेही दुष्परिणाम (Side Effects) मात्र कधीच आढळत नाहीत. फलघृताचे प्रयोगाने स्त्रीची कामेच्छाही निश्चितच वाढते.

या फलघृताचा उपयोग केवळ गर्भाशयवाढीसाठीच होतो असे नव्हे. शतावरीमुळे सर्वच धातूंना बल प्राप्त होत असल्याने गर्भिणी अवस्थेमध्येही (Pregnancy) फलघृत वापरणे इष्ट ठरते. याच्या वापराने गर्भाची वाढही उत्तमप्रकारे होते.

या फलघृतातील हळद, दारूहळद, प्रियंगु, कमळ, रक्तचंदन, श्वेतचंदन, लाक्षा यांसारखी घटकद्रव्ये पित्तशामक, रक्तप्रसादन करणारी व रक्तस्तंभक आहेत. या गुणकर्मांमुळेच फलघृत हे रक्तप्रदरावरील एक महत्त्वाचे औषध समजले जाते. रक्तप्रदराप्रमाणेच मूत्रमार्गातून होणाऱ्या रक्तस्त्रावासाठीही हे लाभदायी ठरते.

फलघृताने प्रजननाशी संबंधित सर्वच अवयवांच्या कार्याचे नियंत्रण होते असे सामान्यत: म्हणता येईल. याचमुळे फलघृत हे मासिक पाळीचे वेळी होणाऱ्या त्रासासाठीही (Dismennorhea) कार्यकारी ठरते.

भरद्वाज ऋषींनी सांगितलेले हे घृत निश्चितच फलदायी ठरत असल्यानेच यास फलघृत ही सार्थ संज्ञा प्राप्त झाली आहे.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून २ वेळा.
**अनुपान :** दूध.

❏❏❏

## २०. शतावरी घृत

**घटक द्रव्ये :** शतावरी, दूध, तूप.

शतावरी ही मधुर, शीत, गुरू गुणांची असून उत्कृष्ट बल्य आहे. शतावरी सप्तधातूंचे वर्धन करणारी पण त्यातही विशेषत्वाने मांसधातुला बल देणारी आहे. शतावरी उत्कृष्ट स्तन्यजनन करणारे द्रव्य असून वातघ्नही आहे. या सर्व गुणांचा

विचार करूनच शतावरी घृताचा विविध रोगांमध्ये वापर केला जातो. कोणत्याही रोगांमध्ये येणारे दौर्बल्य, कृशता व रुक्षता दूर करण्यासाठी शतावरी घृत लाभदायी ठरते.

गर्भिणी अवस्थेमध्ये गर्भाची वाढ योग्य तऱ्हेने व्हावी यासाठी तसेच सूतिकावस्थेमध्ये (बाळंतपणानंतर) दूध भरपूर येण्यासाठी शतावरी घृत निश्चितच कार्यकारी ठरते.

या घृताचा सर्वात अधिक उपयोग उदरशूलासाठी (Pain in Adbomen) होतो. परिणामशूल किंवा अम्लपित्त यामध्ये असणारी तीव्र स्वरूपाची उदरवेदना शतावरी घृताचे प्रयोगाने त्वरेने कमी होते. ग्रहणी रोगामध्ये शतावरी घृताचा वापर केल्याने भूक चांगली लागते, पचनशक्ती सुधारते, मलप्रवृत्ती बांधून येते व दौर्बल्य कमी होते.

हे घृत स्वतंत्रपणे किंवा बरेच वेळा अनुपानासाठी म्हणून इतर औषधी द्रव्यांबरोबर वापरणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## २१ चोपचिनी पाक

**घटक द्रव्ये :** चोपचिनी, पिंपळी, पिंपळमूळ, लवंग, दालचिनी, अक्कलकारा, मिरे, सुंठ, साखर.

चोपचिनी पाक हे उपदंश व फिरंग (Syphilis and Gonorrhoea) या रोगांवरील एक महत्त्वाचे औषध आहे. या रोगांच्या सुरुवातीच्या अवस्थेत म्हणजेच मेढ्र व योनीप्रदेशी जेव्हा जखमा होतात, सदाह मूत्रप्रवृत्ती (Burning Micturition) असते अशा वेळेस मात्र या कल्पाचा काहीच उपयोग होत नाही. पण या रोगाच्या पुढील अवस्थेत उत्पन्न होणारी सर्व लक्षणे मात्र चोपचिनी पाकाचे उपयोगाने निश्चितपणे कमी होतात.

फिरंगामध्ये कालांतराने उत्पन्न होणाऱ्या लक्षणांपैकी सांधे दुखणे हे प्रमुख लक्षण असते. या अवस्थेत सांधे दुखतात, सुजतात व त्यांच्या हालचाली करणे कठीण होते. संधिवाताप्रमाणेच यातही सर्व मोठ्या संधिमध्ये विकृती येते. या प्रकारच्या अवस्थेमध्ये चोपचिनीपाक हे अत्यंत उपयुक्त असे औषध आहे. यातील



पिंपळी, पिंपळमूळ, लवंग, अक्कलकारा, मिरे, सुंठ ही घटक द्रव्येही वेदनाप्रशमनासाठी सहाय्यभूत होतात.

केवळ फिरंगामध्ये असणाऱ्या सांधे दुखीवरच या कल्पाचा उपयोग होतो असा मात्र याचा अर्थ नव्हे. आमवात (Rheumatism), वातरक्त (Gout) यासारख्या रोगामधील संधिवेदना कमी करण्यासाठीही चोपचिनीपाक उपयुक्त ठरतो.

फिरंग, उपदंश यामुळे उत्पन्न होणारे क्लैब्य (नपुंसकता), मैथुनशक्ती कमी होणे (Sexual Debility) यांसारख्या लक्षणासाठीही हा पाक लाभदायक ठरतो.

चोपचिनीचा दुसरा महत्वाचा उपयोग मानस-रोगांमध्ये होतो. या कल्पातील चोपचिनी, अक्कलकारा, मिरे, लवंग ही द्रव्ये मनाचे ठिकाणी असणारे वैषम्य दूर करून मानसिक संतुलन प्राप्त करून देतात. यासाठीच अपस्मार (Epillepsy), उन्माद (वेड लागणे) यासारख्या रोगांमध्ये हा कल्प यशस्वीरीत्या वापरला जातो. अपस्माराचा वेग (Attack) येऊन गेल्यानंतर पुन्हा वेग येऊ नये व आलाच तर तो अल्प बल राहावा यासाठी जे कल्प उपयुक्त असतात त्यांपैकीच हा एक कल्प आहे.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## २२. भल्लातक तैल

**घटक द्रव्ये :** बिब्ब्याचे तेल.

बिब्ब्यालाच संस्कृतमध्ये भल्लातक असे म्हणतात. या बिब्ब्याचे तेल हे स्वतंत्रपणे औषधी द्रव्य म्हणून वापरले जाते. या पुस्तकात वर्णिलेल्या इतर तेलांप्रमाणे हे सिद्धतेल नसून बिब्ब्यापासून काढलेले तेल आहे हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

बिब्बा तीक्ष्ण, उष्ण व स्निग्ध आहे. बिब्ब्याची अनेक व्यक्तींमध्ये विषलक्षणे (Allergy) आढळतात. ही विषलक्षणे पित्तप्रकृतिच्या व्यक्तीमध्ये अधिक प्रमाणात आढळतात. यासाठी बिब्यांचे तेल वापरण्यापूर्वी त्या व्यक्तीस बिब्याची ॲलर्जी नाही याची प्रथमत: खात्री करून घेणे आवश्यक असते. अंगावर पुरळ उठणे, भयंकर खाज सुटणे ही याची विषलक्षणे होत. अगदी सूक्ष्म प्रमाणात बिब्बा वापरून, त्याची ॲलर्जी नाही याची खात्री करून मगच आवश्यक त्या योग्य मात्रेत बिब्बा वापरणे जरूरीचे ठरते.

बिब्ब्याचे तेल हे उष्ण, तीक्ष्ण व स्निग्ध आहे. यामुळेच ते वातप्रशमन

करणारे व वातामुळे निर्माण होणारी वेदना कमी करणारे आहे. सर्वसामान्यपणे वेदना उत्पन्न होते ती वाताचा शीत किंवा रुक्ष गुण वाढल्याने. याचसाठी व्यवहारातील उपक्रमांमध्ये कोठेही दुखत असले की स्नेहन (तेल लावणे) व स्वेदन (शेकणे) हे उपक्रम केले जातात. बिब्ब्याचे तेल हे वाताच्या शीत व रुक्ष गुणाच्या विरोधी गुणांचे म्हणजेच उष्ण व स्निग्ध असल्याने वेदना कमी करणारे द्रव्य ठरते. विशेषत: गृध्रसी (Sciatica) विश्वाचि (Brachial Neuritis), संधिवात (Simple Arthritis), आमवात (Rhaumatic Arthritis) यासारख्या रोगांतील वेदना कमी करण्याचे कार्य बिब्ब्यांच्या तेलाकडून घडते. वातरक्त (Gout), कोष्टुकशीर्ष (Tubercular Knee) सारख्या रोगात मात्र रक्त धातुचा अनुबंध असल्याने बिब्बा वापरता येत नाही. कारण बिब्ब्यामुळे रक्तदुष्टी अधिक होण्याची शक्यता असते. वरील सर्व रोगांमध्ये वेदना कमी करण्यासाठी बिब्ब्याचे तेल पोटात दिले जाते वा बाहेरून लावले जाते. मार लागल्याने, आघाताने उत्पन्न होणारी वेदना कमी करण्यासाठी तर त्या ठिकाणी बिब्बा घालण्यासारखा अन्य उपाय नाही.

भल्लातक हे आणखीही काही रोगांवर उपयुक्त असे द्रव्य आहे. ज्या बिब्ब्याची अनेकांना ॲलर्जी असते तोच बिब्बा अन्य कारणाने निर्माण होणाऱ्या ॲलर्जीवरील एक प्रमुख औषध आहे ही याची एक विशेषता. ॲलर्जीमुळे अनेक वेळा पडसे, डोके दुखणे, दम्यासारखी लक्षणे उत्पन्न होणे यासारखी लक्षणे आढळतात. ही सर्व लक्षणे बिब्ब्याचे तेलाने लगेच कमी होतात.

रक्तातील पांढऱ्या पेशीपैकी Eosinophills या श्वेतपेशी ॲलर्जीमुळे काही वेळा प्रमाणाबाहेर वाढतात. यामुळेही दम्यासारखीच लक्षणे उत्पन्न होतात. या Eosinophilia साठी भल्लातक हे इतर कोणत्याही उपलब्ध औषधांपेक्षा अधिक उपयुक्त असते.

बिब्बा हे अर्शावरील (Piles) एक महत्त्वाचे औषध आहे. अर्श म्हणजेच मूळव्याध. मूळव्याधीमध्ये जेव्हा रक्त पडत असते तेव्हा मात्र बिब्बा वापरू नये पण जेव्हा फक्त शुष्क अर्श असतात, अर्शाचे कोंब निर्माण होतात, तेव्हा बिब्ब्याचे तेल हे सर्वोत्कृष्ट औषध समजले जाते. बिब्बा हे दीपनपाचन करणारे, जाठराग्नी प्रदीप्त करणारे व म्हणूनच मूळव्याधीचे मूलभूत कारण अग्निमांद्य, तेच नष्ट करणारे आहे.

बिब्ब्याचे तेल अनेक प्रकारे दिले जाते. बिब्बा विस्तवावर धरून पेटविला असता त्यातून तेलाचे थेंब गळू लागतात. हे थेंब दुधात टाकून दिले जातात यालाच 'बिब्ब्याचे शेवते' असा शब्दप्रयोग व्यवहारात केला जातो. बिब्बा फोडून, तुकडे करून ते तुकडे दुधात उकळवून वा भाताबरोबर शिजताना घातल्याने बिब्ब्यातील



सर्व तेल अनुक्रमे दूध व भातात उतरते. असे दूध वा भात रुग्णास दिले जाते.

ज्यास बिब्बा मानवतो त्यास बिब्ब्यासारखे दुसरे चांगले औषध नाही. मात्र ज्यास बिब्बा उततो त्यास बिब्ब्यासारखे दुसरे विष नाही. म्हणून बिब्ब्याचा वापर अतिशय काळजीपूर्वक करावा लागतो ही गोष्ट पुन:पुन्हा सांगावीशी वाटते.

**प्रमाण :** बाह्य उपचारासाठी- आवश्यकतेनुसार.
पोटात देण्यासाठी ५ ते १० थेंब दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध किंवा भात.

❑❑❑

## २३. भल्लातकावलेह

**घटक द्रव्ये :** बिब्बा, दूध, तूप, साखर.

भल्लातकावलेहामध्ये बिब्बा हेच प्रमुख कार्यकारी द्रव्य असल्याने त्याचे कार्य पूर्वी भल्लातक तेलाचे प्रकरणात वर्णिल्याप्रमाणेच होत असते.

भल्लातक तेल रुग्णास देण्यामध्ये उत्पन्न होणाऱ्या अडचणी व गैरसोय लक्षात घेऊन भल्लातकाचे जे विविध कल्प बनविले जातात त्यापैकीच भल्लातकावलेह हा एक कल्प होय.

भल्लातकाचे तीक्ष्ण, उष्ण, विषगुण कमी करण्यासाठीच यामध्ये दूध व तुपाची योजना केलेली असते.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## २४. कंटकार्यावलेह

**घटक द्रव्ये :** रिंगणी, साखर.

रिंगणी हे एक काटेरी झुडुप आहे. याचे काटे फारच तीक्ष्ण असतात. या काट्यांमुळेच या वनस्पतीस कंटकाने युक्त 'कंटकारी' हे नाव प्राप्त झाले आहे. या कंटकारीपासून बनविलेला अवलेह तो कंटकार्यावलेह होय.

रिंगणी ही वनस्पती उष्ण स्वभावाची व वात, कफ नाशक असून फुफ्फुसावरील रोगांमध्ये ती विशेष उपयुक्त ठरते, कारण फुफ्फुस हे तिचे विशेष कार्यक्षेत्र आहे.

फुप्फुसातील विविध रोगांसाठी उपयुक्त असा हा कल्प कासरोगासाठी (खोकल्यासाठी) अधिक लाभदायी ठरतो. कफ लवकर सुटण्यास या अवलेहाने मदत होत असल्याने याचे उपयोगाने खोकल्यामध्ये असणारी ढास त्वरेने कमी होते. रिंगणी ही कंठ्य असल्याने घशातील खवखव कमी होण्यास व स्वरभेद दूर होण्यासाठी हा कल्प उपयोगी पडतो. उर:शूल (Pain in Chest), पार्श्वशूल (Dry Pleurecy) जलपार्श्व (Pleurecy with Effussion), प्रतिश्याय (पडसे), श्वास (Breathlessness) यासारख्या रोगांवरही अत्यंत लाभदायक असा हा कल्प आहे.

हृद्रोगांमध्ये (C. C. F.) फुप्फुसात होणारा कफसंचय दूर करण्यासाठी हा कल्प कार्यकारी ठरत असल्यानेच हृद्रोगांमध्ये येणारी श्वास, कास, पायावर सूज येणे आदी लक्षणे कंटकार्यावलेहाने कमी होत असतात.

उचकी वारंवा येत असेल तर ती कंटकार्यावलेहाचे चाटण केल्यास थांबते.

लहान मुलांमध्ये आढळणारा खोकला त्वरेने कमी करण्यासाठी तर या कल्पाइतका दुसरा चांगला कल्प शोधूनही सापडणे कठीण.

**मात्रा :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑ ❑ ❑

## २५. भांर्गी अवलेह

**घटक द्रव्ये :** भारंगमूळ, साखर.

भांर्गी हे एक कटुतिक्त रसाचे, उष्णस्वभावाचे व वातकफनाशक असे द्रव्य आहे. ते दीपनपाचन करणारे म्हणजेच अग्निमांद्य दूर करून भूक वाढविणारे आहे. ते शोथहर (सूज नाहीशी करणारे) ही आहे. या सर्व गुणांचा विचार करूनच भांर्गी अवलेह अनेक रोगात वापरला जातो.

श्वासासारख्या (Bronchial Asthama) रोगातील खोकला कमी करून पर्यायाने श्वास कमी करणारा हा एक कल्प आहे. केवळ श्वासातच नव्हे तर प्रतिश्याय (Rhinitis or Pharyngitis), यक्ष्मा (T. B.) या सारख्या रोगातही उत्कृष्ट कार्यकारी असा हा कल्प आहे.

ब्रॉंकायटीस सारख्या त्रासदायक रोगातील खोकला या भांर्गी अवलेहाने लगेच कमी होतो. वातकफज्वरावरही उत्तम कार्य करीत असणारा हा एक कल्प आहे.

हा कल्प दीपनपाचन (अग्निमांद्य नाशक) असल्यानेच अरुचि, अग्निमांद्य,



अजीर्ण, गुल्म या सारख्या रोगांत त्याचा यशस्वीरित्या वापर करता येतो.

सामान्यत: अन्य औषधांबरोबर अनुपानासाठी उपयुक्त म्हणूनच हा कल्प ओळखला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑ ❑ ❑

## २६. वासावलेह

**घटक द्रव्ये :** अडूळसा, साखर.

वासा म्हणजेच अडूळसा. अडुळश्याच्या पानांचा रस काढून त्यामध्ये साखर मिसळून हा अवलेह तयार करतात.

अडूळसा ही वनस्पती उत्कृष्ट कफनाशक असून याचा विशेष उपयोग श्वसन मार्गातील अनेक रोगांसाठी होत असतो.

वासा ही वनस्पती खोकल्यावरही एक अप्रतिम औषधी समजली जाते. याच कारणाने वासापासून बनवलेले अनेक औषधी कल्प बाजारात मिळतात. वासावलेह हे त्यापैकीच एक महत्त्वाचे औषध होय. ज्या खोकल्यामध्ये ढास लागते, कफ सुटता सुटत नाही अशा वातप्रधान कासासाठी (Dry Cough) वासावलेह अधिक उपयुक्त ठरतो. ज्यामध्ये कफ फार पडतो अशा खोकल्यामध्येही वासवलेह उपयुक्त ठरतो पण तरतमभावाने विचार करता पहिल्या प्रकारात अधिक गुणकारी असा हा कल्प आहे. वासावलेहात असणारी साखरही कफ लवकर सुटण्यास सहाय्यभूत ठरते.

दम्याच्या रोग्यामध्येही खोकला हे लक्षण प्रामुख्याने आढळते. या रोगातही कफ लवकर सुटत नाही व रोगी अस्वस्थ होतो. अशा रुग्णाने वासावलेह चाटल्यास कफ लवकर सुटतो व तात्पुरता का होईना पण आराम पडतो.

वासा ही वनस्पती रक्तपित्तनाशनासाठी प्रसिद्ध आहे. रक्तपित्त म्हणजे शरीराबाहेर रक्तस्राव होणे. विशेषत: उर्ध्वग रक्तपित्तावर म्हणजेच नाकावाटे वा तोंडातून रक्तस्राव होत असताना वासावलेहाचा उपयोग केला असता त्वरेने गुण मिळतो.

राजयक्ष्म्यामध्येही (Pulmonary T. B.) खोकला हे अतित्रासदायक लक्षण असते. खोकल्याबरोबर काही वेळा रक्तही पडते. वासावलेहाचे उपयोगाने हा खोकला व त्याचबरोबर पडणारे रक्त दोन्ही कमी होण्यास निश्चितच मदत होते.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## २७. वासाघृत

**घटक द्रव्ये :** अडूळसा, तूप.

अडूळशापासूनच सिद्ध केलेल्या घृतास वासाघृत असे म्हणतात.

अन्य अडूळशाच्या कल्पाप्रमाणेच वासाघृताचेही गुणकर्म आहेत. वासा उत्तम कफनाशक द्रव्य असल्याने कास (खोकला) रोगावरील हे प्रधान औषध समजले जाते. वातप्रधान कासासाठी म्हणजेच ज्यात ठसका अधिक लागतो अशा खोकल्यासाठी याचा अधिक उपयोग होतो. घृत हेही उत्कृष्ट वातनाशक असल्याने त्याचीही या कार्यात मदत होतेच.

वासा हे रक्तप्रसादन करणारे व स्तंभक औषध असून उर्ध्वग रक्तपित्तावर उपयुक्त असे द्रव्य आहे. वासाघृताच्या नस्याने (नाकात घातल्याने) नासागत रक्तपित्तात (Epistaxis) नाकातून वाहणारे रक्त थांबविण्यासाठी फारच त्वरेने लाभ होतो.

राजयक्ष्म्या (Pulmonary T. B.) या रोगात खोकला व रक्तष्ठीवन (Haemoptesis) ही दोन्ही त्रासदायक अशी लक्षणे असतात. अन्य वासाकल्पाप्रमाणेच वासाघृतही यामध्ये वापरले जाते.

तमकश्वास (Bronchial Asthama) या रोगात असणारी खोकल्याची ढास वासाघृताने त्वरीत कमी होते. यासाठी वासाघृत कोमट करून १-१ चमचा वारंवार दर १० मिनिटांनी वापरल्यास कफ लवकर सुटून, खोकला नाहीसा होतो. व रुग्णास तात्पुरता पण लगेच आराम मिळतो.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## २८. आर्द्रकावलेह-आलेपाक

**घटक द्रव्ये :** आले, साखर.

आर्द्रक म्हणजेच आले. आल्याचा रस व साखर यापासून अवलेह पद्धतीने बनविलेला लेह तोच आर्द्रकावलेह होय. आल्याच्या वड्या करून त्या वापरण्याचीही पद्धती आहे.

आले हे द्रव्य रुचीला तिखट, उष्णवीर्य असून उत्कृष्ट कफनाशक आहे श्वसनमार्गातील विविध प्रकारच्या कफरोगांसाठी या आर्द्रकावलेहाचा स्वतंत्रपणे वा



इतर औषधांबरोबर अनुपानासाठी म्हणून प्रयोग केला जातो.

आर्द्रकावलेहाचा विशेष उपयोग होतो तो प्रतिश्यायासाठी. प्रतिश्याय म्हणजेच पडसे. केवल पडशासाठीच नव्हे तर सर्दी, पडसे, खोकला, ताप या सर्वच रोगांसाठी हा एक उत्कृष्ट कल्प आहे. घसा दुखणे, खवखवणे, आवाज बसणे, खोकला व ढास लागणे ही सर्व लक्षणे आर्द्रकावलेहाच्या उपयोगाने फारच चटकन कमी होतात.

तमकश्वास (Bronchial Asthama), हृद्रोग (C. C. F.) या दोन्ही रोगांमध्ये आढळणारा खोकला कमी होण्यासाठी तसेच जलपार्श्व (Pleurecy with Effussion), ब्राँकाइटीस वगैरे रोगांमध्ये दिली जाणारी सर्वच औषधे ही आर्द्रकावलेहातून दिली असता निश्चितच अधिक कार्यकारी बनतात.

आर्द्रकावलेहने भूक चांगली वाढते व विशेषत: तोंडाला चव नसताना उत्तम प्रकारे रुचीही प्राप्त होते.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ४ वेळा.

❑ ❑ ❑

## २९. दाडिमावलेह

**घटक द्रव्ये :** डाळिंबाचा रस, साखर.

दाडिम हे डाळींबाचे संस्कृत नाव. डाळींब हे मधुर, अम्लरसाचे असून उत्तम अग्निदीपन करणारे, रुची वाढविणारे द्रव्य असून ते कफवातनाशकही आहे.

डाळिंबापासून बनविलेल्या या अवलेहाचा उपयोग स्वतंत्रपणे क्वचितच केला जातो. अन्य औषधांचे जोडीला अनुपान द्रव्य म्हणून प्राय: या कल्पाचा प्रयोग केला जातो.

डाळींब हे हृद्बल्य आहे. दाडिमावलेहाचा उपयोग म्हणूनच हृद्रोगी रुग्णांमध्ये (C. C. F.) केला जातो. याचे उपयोगाने हृदयाला बल मिळते त्यामुळे हृदयाचा वाढलेला आकार प्राकृत होण्यास सहाय्य होते. पर्यायाने या रोगात आढळणारी शोथ (Oedema), श्वास (Breathlessness) आदी लक्षणे कमी करण्यासही हा कल्प उपयुक्त ठरतो.

दाडिमावलेहाचा उपयोग पांडू (Anaemia) मध्येही केला जातो. दाडिम रक्तवर्धक व पित्तप्रशमनही आहे. यामुळेच लोह कल्प अधिक कार्यकारी होण्यास दाडिमावलेहाचे सहाय्य घडते.

डाळींब हे कृमिविघातकही आहे. विशेषत: लांब, रिबिनीप्रमाणे आकार असणारे कृमी (Tape worms) यांवर दाडिम विशेष कार्यकारी ठरते. अन्य कृमिघ्न कल्पांना दाडिमावलेह अनुपानासाठी वापरणे वापरणे हितावह ठरते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

❑ ❑ ❑

## ३०. दाडिमादि घृत

**घटक द्रव्ये :** धने, चित्रक, सुंठ, पिंपळी, डाळिंबाचा रस, तूप.

या घृतातील प्रमुख घटक द्रव्य डाळींब हे आहे. डाळींब हे कषाय (तुरट), अम्ल (आंबट) व मधुर (गोड) रसाचे असून उत्तम पित्तघ्न अशी जी अपवादात्मक द्रव्ये आहेत त्यापैकी प्रधान द्रव्य आहे.

दाडिमादि घृत हे उत्तम दीपनपाचन आहे. स्वत: घृत हे स्वतंत्रपणे पाहता अग्निवर्धक आहेच पण या घृतातील धने, चित्रक, सुंठ, पिंपळी आदी द्रव्येही अग्निमांद्य दूर करणारी, भूक वाढविणारी अशी आहेत. यामुळेच अग्निमांद्याने निर्माण होणाऱ्या अनेकविध रोगांमध्ये दाडिमादी घृत वापरले जाते.

ग्रहणी हा एक पित्ताने उत्पन्न होणारा, अग्निमांद्य प्रधान रोग. रुग्णास अत्यंत त्रासदायक असून अनेक उपद्रव (Complications) निर्माण करणाऱ्या या ग्रहणीमध्ये दिल्या जाणाऱ्या औषधांना अनुपान म्हणून घृत वापरावे लागते. यासाठी दाडिमादि घृत वापरणे संयुक्तिक ठरते.

पांडू (Anaemia) हाही एक पित्ताच्या दुष्टीने उत्पन्न होणारा रोग. या रोगामध्ये रक्तधातू कमी झालेला असतो. शरीरातील रक्तधातूची वाढ करण्यासाठी पांडूमध्ये अनेक प्रकारचे लोहकल्प (Iron Preparations) वापरले जातात. या लोहकल्पांबरोबर अनुपान म्हणून घृत वापरल्यासच रक्तधातूची उत्पत्ती योग्य प्रकारे होऊ शकते. तुपाशिवाय वापरल्या जाणाऱ्या लोहकल्पांचा अपेक्षित लाभ आढळत नाही. अनुपानासाठी साधे तूप वापरण्याऐवजी पांडूवरील कार्यकारी, रक्तवर्धनाची क्षमता बाळगणारे दाडिमादिघृत वापरल्यास मिळणारा लाभ हा शतपटीने अधिक असतो.

दाडिमादी घृत हे याप्रमाणे अनुपानासाठी म्हणून प्राय: वापरले जात असले तरी त्याचा स्वतंत्रपणेही उपयोग केला तरी लाभ प्राप्त होतोच.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑



## ३१. ब्राह्मीप्राश

**घटक द्रव्ये :** ब्राह्मी, साखर.

अनेक प्रकारच्या मानस रोगांसाठी उपयुक्त असा हा औषधीकल्प आहे. कोणत्याही कारणाने येणारे मनोदौर्बल्य नाहीसे करण्यासाठी या कल्पाचा यशस्वीपणे वापर करता येतो.

आजच्या यांत्रिक युगात, शहरी जीवनामध्ये मानसिक क्षोभ निर्माण होण्याचे, मनाचा तोल बिघडण्याचे प्रसंग वारंवार येतात व याचीच परिणती अनेक प्रकारच्या शारीरिक व मानसिक रोगांत होत असते. हे सर्व टाळावयाचे असेल तर मनाचे राजस व तामस गुण कमी करून सात्त्विक गुणांची वाढ व्हावयास हवी. हा सात्त्विक अंश निर्माण करून मनाचा तोल सावरण्याचे कार्य ब्राह्मीकडून घडते.

ब्राह्मीप्राश हा यासाठीच उन्माद (Mania), अपस्मार (Epileptic Fits) या मानस रोगांवरील श्रेष्ठ औषधी कल्प समजला जातो. निद्रानाश नाहीसा करण्यासाठीही हा उपयुक्त ठरतो.

परीक्षेच्या दिवसात आत्मविश्वास वाढावा, स्मृती अधिक तत्पर व्हावी व मनावरील ताण कमी व्हावा यासाठीही या कल्पाचा उत्कृष्ट उपयोग होतो.

मतिमंद मुलांमध्ये बुद्धी वाढविणारा हा कल्प मुलांच्या बुद्धीचा सर्वांगीण विकास घडवून आणतो.

ही सर्व कार्ये करणाऱ्या ब्राह्मीप्राशाचे शरीरावर अन्य काहीही दुष्परिणाम होत नाहीत हे याचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑ ❑ ❑

## ३२. शंखपुष्पी अवलेह

**घटकद्रव्ये :** ब्राह्मी, भुईकोहळा, वेखंड, शंखपुष्पी, कोष्ठ, साखर.

शंखपुष्पी अवलेहातील सर्वच घटकद्रव्ये ही मनावर कार्य करणारी असून वातघ्न आहेत. ब्राह्मी, वचा, शंखपुष्पी, कोष्ठ आदी द्रव्यांमुळे मनाचा बिघडलेला तोल सावरला जातो. यामुळेच उन्माद (वेड लागणे), अपस्मार (फिट्स येणे) यासारख्या रोगात या अवलेहाचा वापर मुख्यत: केला जातो. याचे उपयोगाने अपस्माराचे येणारे वेग टाळता येतात किंवा त्याचा जोर कमी करता येतो. या सर्व

घटक द्रव्यांमुळे बुद्धी चांगली वाढते. आकलनशक्ती, धारणाशक्ती व स्मरणशक्ती या बुद्धीच्या तिन्ही प्रकारांचे संवर्धन या कल्पाच्या सेवनाने होते. मतिमंद मुलांमध्ये यासाठीच या कल्पाचा यशस्वीपणे वापर केला जातो.

या कल्पाने मानसिक स्वास्थ्य लाभत असल्याने झोप व्यवस्थित यावी, गाढ लागावी यासाठी हा कल्प उपयुक्त ठरतो. म्हातारपणामुळे येणारा स्वाभाविक चिडकेपणाही या कल्पाने कमी होतो.

स्वतंत्रपणे व अन्य औषधीकल्पांबरोबर अनुपान म्हणून या कल्पाचा उपयोग केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## ३३. सारस्वत घृत

**घटक द्रव्ये :** आले, वेखंड, शेवगा, हिरडा, पिंपळी, मिरे, पाठा, सैंधव, गाईचे तूप, शेळीचे दूध.

सारस्वत घृतातील प्रमुख कार्यकारी द्रव्य वेखंड हे होय. वेखंड ही वनस्पती मनोदोषांवर कार्यकारी आहे. वेखंड हे स्मृतिवर्धकही आहे, आले, शेवगा, हिरडा, पिंपळी, मिरे आदी अन्य घटक द्रव्येही तीक्ष्ण उष्ण गुणांची असून वेखंडाचे कार्यास साहाय्यभूत ठरणारी आहेत. स्वतः घृत आणि शेळीचे दूध ही मेध्य म्हणजेच बुद्धिवर्धक आहेत.

धी, धृती व स्मृती म्हणजेच आकलनशक्ती, धारणाशक्ती व स्मरणशक्ती या बुद्धीचे तीनही प्रकारांचे संवर्धनासाठी सारस्वतघृत उपयुक्त ठरते.

अपस्मार (Epillepsy) या रोगात फिटस् येतात. रोग्याची स्मरणशक्ती कमी होते वा संपूर्ण नष्ट पावते. या रोगातही स्मरणशक्ती पूर्ववत् व्हावी तसेच अपस्माराचे वेगांची (Fits) तीव्रता कमी व्हावी यासाठी सारस्वत घृत वापरणे लाभदायक ठरते. फीट आली असताना याच घृताचे नस्य (थेंब नाकात टाकणे) केले असता रुग्ण लवकर शुद्धीवर येण्यास मदत होते. अपस्माराप्रमाणेच उन्माद (वेड लागणे) या मानसरोगावरही सारस्वतघृताचा प्रयोग करणे इष्ट ठरते. केवळ रोगावस्थेतच नव्हे तर प्राकृतावस्थेतही मुलांची बुद्धी, विशेषतः स्मरणशक्ती वाढावी यासाठी या औषधाचा चांगला उपयोग करून घेता येतो.



सरस्वती ही ज्ञानाची देवता. बुद्धिसंवर्धनासाठी सरस्वतीची कृपा असणे आवश्यक असते. सारस्वत घृताने जणू सरस्वतीची कृपादृष्टीच प्राप्त होत असते व म्हणूनच यास हे सार्थ नाव प्राप्त आहे.

**प्रमाण :** १ ते २ तोळे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ३४. कल्याणक घृत

**घटक द्रव्ये :** त्रिफळा, हळद, दारूहळद, रेणुकबीज, अनंतमूळ, प्रियंगु, शालिपर्णी, पृश्निपर्णी, देवदार, वालक, तगर, इंद्रवारुणी, दंती, डाळिंब, नागकेशर, नीलकमल, श्वेतकमल, मंजिष्ठा, वावडिंग, कोष्ठ, जाईची फुले, चंदन, तालिसपत्र, बृहती, तूप.

कल्याणक घृताचा उपयोग प्रामुख्याने मनोदोषांमुळे उत्पन्न होणाऱ्या विविध रोगांवर केला जातो. हे घृत स्वतः मेध्य म्हणजेच बुद्धी वाढविणारे द्रव्य आहे. या घृतावर तगर, वावडिंग, कोष्ठ, बृहती, प्रियंगु, रेणुकबीज यासारख्या मनोदोषांवर कार्यकारी द्रव्यांचा संस्कार घडल्यानेच हे घृत उन्माद (Mania), अपस्मार (Epilepsy), अतत्वाभिनिवेश यासारख्या मनाच्या विकृतीने उत्पन्न होणाऱ्या विविध रोगांवर उपयुक्त ठरते. मनाचा वाढलेला राजस गुण कमी करून सात्विक भाव उत्पन्न होतो व हे रोग कमी होतात.

यातील सर्वच घटकद्रव्ये ही शीतगुणांची, पित्तप्रशमन करणारी व रक्तदोष दूर करणारी आहेत. त्यामुळेच या घृताचा उपयोग पित्तरोगांसाठीही केला जातो. ज्वरामध्ये विशेषतः ज्यामध्ये रक्ताची दुष्टी असते अशा तृतीयक वा चतुर्थक ज्वरासाठी (थंडी वाजून दर तिसऱ्या किंवा चवथ्या दिवशी येणारा ताप) याचा अधिक लाभ आढळून येतो.

या कल्पातील चंदन, कमळ, वालक, अनंतमूळ, तगर, जाईची फुले इत्यादी द्रव्ये ही मूत्रल आहेत. मूत्रल म्हणजे मूत्राचे प्रमाण वाढविणारी द्रव्ये. त्यामुळेच कल्याणक घृताचा उपयोग सदाहमूत्रप्रवृत्ती (Burning Micturition) मूत्रकृच्छ्र (Painful Micturition), मूत्राघात (Scanty Urination) यासाठीही चांगला होतो.

वातरक्त हा एक रक्तदुष्टीमुळेच उत्पन्न होणारा रोग. या रोगामधील सांधे दुखणे, सुजणे ही लक्षणे कमी करण्यासाठी कल्याणक घृत कार्यकारी ठरते.

विशेषतः मनावर कार्य करून, मनाचे सात्विक भाव वाढविणारे हे घृत मानवाचे कल्याण करते व म्हणूनच यास कल्याणक घृत ही संज्ञा प्राप्त झालेली आहे.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ३५. पंचगव्यघृत

**घटक द्रव्ये :** गोक्षीर (गाईचे दूध), गोदधि, गोमयरस, गोमूत्र व गोघृत (गाईचे तूप).

गाईचे दूध, दही, गोमूत्र, गोमयरस व गाईचे तूप या पाच वस्तूंना मिळून पंचगव्य म्हटले जाते. ही सर्व पाचही द्रव्ये एकत्रित करून जे घृत सिद्ध केले जाते तेच पंचगव्यघृत होय.

पंचगव्यघृत हे मानसिक रोगांसाठी उपयुक्त असे घृत आहे. विशेषतः या घृताचा उपयोग अपस्मार (Epillepsy) या रोगासाठी उत्तमप्रकारे होतो. हे तूप स्वतंत्रपणे वा अपस्मारावरील अन्य औषधांचे जोडीला अनुपान म्हणून वापरले जाते. या घृताचे नित्य वापराने अपस्माराचे वारंवार येणारे वेग (Attacks) थांबतात वा या वेगामधील कालावधी वाढतो व येणारा वेगही थोडाच वेळ टिकतो. अपस्माराचे रुग्णांमध्ये इतर लक्षणांचे जोडीला स्मरणशक्ती कमी होणे हे लक्षणही प्रामुख्याने आढळते. घृत हे स्वतःच मेध्य म्हणजेच बुद्धीवर्धक व स्मृतीवर्धक असल्याने उपयुक्त ठरते हे खरे, पण त्यातही पंचगव्यघृत हे यासाठी अधिक कार्यकारी ठरते.

केवळ अपस्मारामध्येच नव्हे तर कोणत्याही कारणाने स्मरणशक्ती कमी झालेली असताना पंचगव्यघृत उपयुक्त ठरते. पंचगव्यघृताचे नित्य वापराने बुद्धी चांगली प्रगल्भ राहते असे प्रत्यक्षात आढळते. अर्थात पंचगव्यघृत हे दुर्गंधी असल्याने प्राकृत अवस्थेत याचा क्वचितच वापर केला जातो हेही खरे आहे.

उन्मादाचे रोग्यामध्येही (वेड लागणे) या घृताचा इतर औषधांबरोबर अनुपानासाठी वापर केला जातो.

उन्माद व अपस्मार या दोन्ही रोगात या घृताचा नस्यासाठीही उपयोग करणे हितावह ठरते. नस्य हे संज्ञाप्रबोधनासाठी उपयुक्त असते.

**मात्रा :** २ ते ४ वेळा दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम दूध.

**नस्यासाठी :** ५ ते १० लिंबू दिवसातून २ वेळा.

❑❑❑



## ३६. तिक्तकघृत-महातिक्तकघृत

**घटक द्रव्ये :** गुळवेल, पित्तपापडा, कडूनिंब, इंद्रयव, काडेचिराईत.

तिक्त म्हणजे कडू (संस्कृतमध्ये कडू रसाला तिक्त व तिखट रसाला कटु म्हणतात.) गुळवेल, पित्तपापडा, कडूनिंब, इंद्रयव व काडेचिराईत या पाचही वनस्पती अत्यंत कडू असून त्याला तिक्तपंचक ही संज्ञा वापरली जाते. या तिक्त वनस्पतींपासून सिद्ध केलेले घृत तिक्तकघृत किंवा महातिक्तकघृत म्हणून प्रसिद्ध आहे.

तिक्तरस हा पित्तशामक व ज्वरघ्न (ताप कमी करणारा) आहे. ज्वराच्या जीर्णावस्थेत (Chronic Condition) म्हणजेच ताप शरीरात बरेच दिवस राहिला असताना शरीरात रुक्षता वाढते. याकरिताच जीर्णज्वरात घृत व तेही तिक्तकघृत वापरणे युक्त ठरते. कडूरस हा अग्नीप्रदीप्त करून भूक वाढविणारा, स्वतः कडू असला तरी तोंडास रुची प्राप्त करून देणारा, उत्पन्न झालेल्या आमाचे (एक प्रकारचे विषद्रव्य) पाचन करणारा व पित्तशामक आहे. यामुळेच जीर्णज्वराप्रमाणेच अन्य अनेक रोगांमध्ये तिक्तकघृत हे स्वतंत्रपणे वा अनुपानासाठी म्हणून इतर औषधी कल्पांबरोबर वापरले जाते.

पांडू (Anaemia) हा रोगही पित्तामुळेच होणारा रोग असून यामध्येही अग्नीमांद्य निर्माण झालेले असते. या रोगामध्ये असणारे रक्तक्षयाचे लक्षण दूर करण्यासाठी, रक्त वाढविण्यासाठी अनेक प्रकारचे लोहकल्प (Iron Preparations) वापरले जातात. या लोहकल्पांपासून रक्तधातूचे पोषण होण्यासाठी घृताची प्रामुख्याने आवश्यकता असते. घृताशिवाय जर नुसतेच लोहकल्प वापरले तर त्यांचा रक्तवृद्धीसाठी फारसा फायदा होत नाही. पांडूमध्ये लोहकल्पांबरोबर जी अनेकविध सिद्ध घृते वापरली जातात. त्यातील तिक्तकघृत हे एक महत्त्वाचे आहे.

अजीर्ण, अम्लपित्त, परिणामशूल इत्यादी कारणाने उत्पन्न होणारा उदरशूल (Abdominal pain) कमी करण्यासाठीही तिक्तकघृत वापरणे लाभदायक ठरते. तिक्तरस व स्वतः घृतही उत्कृष्ट अग्नीवर्धक असल्याने अग्निमांद्य दूर होऊन वरील रोगांची मूळ कारणेच तिक्तक घृताने नष्ट होतात व म्हणूनच शूल कमी होतो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ३७. षट्पलघृत

**घटकद्रव्ये :** पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ, यवक्षार, तूप.

षट्पलघृतातील पिंपळी, पिंपळमूळ आदी सर्वच घटक द्रव्ये कटु-तिक्त रसाची, उष्ण वीर्य, उत्कृष्ट दीपनपाचन आहेत. तूप हे स्वत: अग्नी वाढविणारे असून त्यास वरील सर्व अग्नीवर्धक औषधांची जोड मिळाली असल्याने षट्पलघृत हे अग्नीमांद्यावरील एक प्रमुख औषध बनते. या घृतात असणाऱ्या यवक्षारामुळेही पाचकस्राव अधिक प्रमाणात स्रवतात. त्यामुळेच पचनक्रिया सुधारते व भूकही चांगली लागते.

अग्निमांद्य व अग्नीमांद्यजनित सर्वच विकारांसाठी षट्पलघृताचा उपयोग होतो. ग्रहणी हा या अग्नीमांद्यजन्य विकारांपैकी प्रमुख रोग होय. या ग्रहणीमध्ये जी औषधे वापरली जातात त्या सर्वांना षट्पलघृताचे अनुपान वापरल्याने त्या औषधांची गुणवत्ता अनेक पटीने वाढते.

अर्श, गुल्म यासारख्या अग्नीमांद्यानेच उत्पन्न होणाऱ्या रोगांमध्येही या घृताचा यशस्वी वापर स्वतंत्रपणे वा अनुपानासाठी केला जातो.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून २ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी.

❑❑❑

## ३८. बलातेल

**घटक द्रव्ये :** बला, तिळाचे तेल.

बला ही वनस्पती नावाप्रमाणेच उत्कृष्ट बल्य म्हणजेच बल प्राप्त करून देणारी एक वनस्पती आहे. या बलेने सिद्ध केलेले तेल ते बलातेल होय. बला ही वनस्पती मधुररसाची, शीतवीर्य (थंड) आणि गुरू गुणाची व म्हणूनच बल्य असते.

शरीरातील धातूंच्या क्षीणतेमुळे निर्माण झालेल्या वातरोगांसाठी बलातेल हे उत्कृष्ट औषधी द्रव्य म्हणून ओळखले जाते. बलातेलाचा उपयोग शरीरावर बाहेरून चोळण्यासाठी, तसेच पोटात घेण्यासाठीही केला जातो. शरीरात आलेली रुक्षता कमी करणे, धातूंचे पोषण करणे हे या तेलाचे महत्त्वाचे कार्य असल्यानेच कृश व्यक्तींमध्ये संवाहनासाठी (मसाज वा चोळण्यासाठी) या तेलाचा चांगला उपयोग होतो. बला या वनस्पतीमुळे शरीरातील रसरक्तादी सर्वच धातूंचे पोषण होत असले



तरी विशेषत: मांसधातुची पुष्टी या बलातेलाने होत असते व म्हणूनच पक्षाघात किंवा अर्धांगवात (Hemiplegia) यासारख्या किंवा मांसक्षय (Wasting of the Muscles) यासारख्या रोगात या तेलाचा विशेष उपयोग होतो.

बाहेरून चोळण्यासाठी आणि पिण्यासाठी बला तेल जसे वापरले जाते त्याप्रमाणेच अनेक वातरोगांसाठी औषधी द्रव्यांनी तयार कलेले बस्ति (Medicated Enima) वापरले जातात त्यासाठीही बलातेल वापरले जाते. कर्णपूरण (कानात तेल घालणे), शिर:पूरण (डोक्यावर तेल घालणे), नस्य (नाकात औषधी द्रव्ये घालणे) आदी उपक्रमांसाठीही बलातेलाचा यशस्वी वापर केला जातो. अनेक प्रकारचे वातरोग वरील प्रकारच्या उपक्रमांनी बरे करता येतात.

**प्रमाण :** १ ते २ चमचे दिवसातून २ वेळा पोटात घेण्यासाठी.

**१ ते २ थेंब :** नाकात टाकण्यासाठी व आवश्यकतेनुसार- बाहेरून चोळण्यासाठी.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ३९. शतपाकी क्षीरबला तैल

**घटक द्रव्ये :** बला, तिळाचे तेल, दूध.

क्षीरबलातैल तयार करताना बला वनस्पतीचा कल्क, तेल व काढ्याऐवजी दूध एकत्रित करून तैलप्रक्रियेने तैल सिद्ध केले जाते. यामध्ये दूध वापरले जात असल्यानेच यास क्षीरबलातैल असे म्हटले जाते. याप्रकारे जे तेल तयार होते त्यामध्ये पुन्हा बलावनस्पतीचा कल्क व दूध मिसळून पुन्हा तैल सिद्ध केले जाते. असे वारंवार शंभर वेळा केल्यानंतर शतपाकीक्षीरबलातैल तयार होते. शंभर वेळा याप्रकारे प्रक्रिया करताना दुधातील स्नेहांश यात येत असल्याने अखेरीस ते तुपाप्रमाणेच तयार झालेले द्रव्य असते हे लक्षात घेतले पाहिजे.

बला या वनस्पतीचा या तेलावर शंभर वेळा संस्कार घडत असल्यानेच साध्या बलातैलापेक्षा शंतपटीने अधिक गुणकारी असे हे क्षीरबलातैल असते. बलातैलापेक्षा फारच थोड्या मात्रेत हे सर्व कार्य घडते.

क्षीरबलातैलाचा उपयोग शरीरधातुंचा क्षय दूर करण्यासाठी केला जातो. धातुक्षयाने, दौर्बल्याने निर्माण होणारे अनेकविध वातरोग या तैलाचे उपयोगाने होत असल्याने निश्चयाने दूर होतात. या तैलाचे प्रयोगाने मांसक्षय त्वरेने दूर होत असल्यानेच Wasting of the Muscles (मांसक्षय) असताना तसेच मांसधातूवृद्धि

होऊन बल चांगले वाढावे यासाठीही या शतपाकीक्षीरबलातैलाचा उत्तम उपयोग होतो.

**प्रमाण :** ५ ते १० बिंदू दिवसातून २ ते ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑ ❑ ❑

## ४०. चंदनबलालाक्षादि तैल

**घटक द्रव्ये :** चंदन, बलामूळ, लाक्षा, वाळा, तिलतैल, दूध; चंदन, काळावाळा, ज्येष्ठमध, बडिशेप, कुटकी, देवदार, हळद, कुष्ठ, मंजिष्ठा, अश्वगंधा, बला, दारूहळद, मरवा, नागरमोथा, वेलची, दालचिनी, नागकेशर, रास्ना, लाक्षा, केवडा, चाफा, अनंतमूळ, सैंधव, सौर्वर्चल.

चंदन, बला, लाक्षा व वाळा या द्रव्यांचा कल्क मिसळून तैलप्रक्रियेने तेल, दूध व नंतर सांगितलेल्या सर्व द्रव्यांचा कल्क मिसळून तैलप्रक्रियेने हे चंदनबलालाक्षादि तेल तयार केले जाते.

चंदन, बला व लाक्षा ही यातील प्रमुख घटकद्रव्ये व म्हणूनच या तैलास चंदनबलालाक्षादि तैल हे नाव प्राप्त झाले. बला तैलाप्रमाणेच बल्य म्हणून उपयुक्त असणाऱ्या या तैलाचे इतरही अनेकविध उपयोग आहेत.

हे तैल सिद्ध करताना वापरलेली चंदन, वाळा, जेष्ठमध, हळद, मंजिष्ठा मरवा, नागरमोथा, वेलची यासारखी द्रव्ये ही शीतगुणांची व म्हणूनच पित्तशामक आहेत. याचेच जोडीला असणारा कषायरस (तुरट) व शीतवीर्य यामुळे मांसधातूचे संहनन (Muscular Tone) वाढविण्याचे कार्य या तेलाने घडते. कोणत्याही कारणाने निर्माण झालेला मांसक्षय (Wasting of the Muscles) कमी करून मांसवृद्धि करण्याचे कार्य या तेलाकडून घडते. याचसाठी चंदनबलालाक्षादि तेलाचा उपयोग प्रामुख्याने बाह्यतः चोळण्यासाठी (संवाहनासाठी) केला जातो. लहान मुलांमध्ये मूल गुटगुटीत व्हावे, मुलाचे वजन वाढावे याकरिता चंदनबलालाक्षादि तेलाचा संवाहनासाठी नित्य वापर केला जातो. केवळ संवाहनासाठीच नव्हे तर लहान मुलांमध्ये शिर:पूरण (ताळू भरणे), कर्णपूरण (कानात घालणे) यासाठीही याच तैलाचा नियमित वापर करणे लाभदायक ठरते.

शीतवीर्य व कषायरस यामुळेच हे तैल रक्तस्तंभकही आहे. यामुळेच या तेलाचा उपयोग गुदमार्गातून होणाऱ्या रक्तस्रावासाठीही चांगला होतो. रक्तप्रवाहिका (रक्ती आव) कमी होण्यासाठी या तेलाचा अभ्यंतर प्रयोग केला जातो म्हणजेच हे तेल पिण्यासाठी वापरले जाते. यामुळे रक्तस्राव तर थांबतोच पण यात असणाऱ्या चंदन, वाळा, मरवा, नागरमोथा, वेलची, दालचिनी, केवडा, चाफा, अनंतमूळ यासारख्या सुगंधी द्रव्यांमुळे वातानुलोमन योग्य प्रकारे होऊन पोटात होणारा मुरडाही त्वरेने थांबतो. या तेलातील जेष्ठमध, हळद, दारुहळद यासारखी द्रव्येही उत्कृष्ट व्रणरोपण करणारी आहेत. व्रणरोपण म्हणजे जखमा लवकर भरून आणण्याची क्रिया. याच कारणाने प्रवाहिकेमध्ये आंत्रात होणारे व्रण या तैलाच्या उपयोगाने भरून येत असतात.

रक्तप्रवाहिकेमध्ये हे तेल पिण्यासाठी वापरतात तर रक्तार्शासाठी (रक्ती मूळव्याध Bleeding Piles) या तेलाचा अनुवासन बस्ति (Enima) हितकर ठरतो. चंदन, लाक्षा, नागकेशर आदि द्रव्यांमुळे रक्त पडणे लगेच कमी होते. नागकेशर, कुटकी, वेलची, मरवा आदि यातील घटकद्रव्ये उत्कृष्ट दीपन म्हणजेच अग्निवर्धक असल्याने मूळव्याधीचे मूलभूत कारण जे अग्निमांद्य तेही दूर होण्यास या तेलाची मदत होते.

**मात्रा :** अभ्यंतर प्रयोगासाठी १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**बस्तीसाठी :** ५० मि. लि. प्रत्येक वेळी.

**बाह्योपचारासाठी :** आवश्यकतेनुसार.

❑ ❑ ❑

## ४१. पद्मकादि तेल

**घटक द्रव्ये :** पद्मकाष्ठ, जेष्ठमध, वाळा, हळद, सर्जरस, मंजिष्ठा, शतावरी, चंदन, तिळाचे तेल.

या तेलातील सर्वच घटकद्रव्ये ही तिक्त (कडू) व कषाय (तुरट) असून शीतस्वभावाची आहेत व म्हणूनच रक्तस्तंभनासाठी या तेलाचा उपयोग केला जातो. रक्तस्तंभनाचे कार्यासाठी या तेलातील सर्जरस हे प्रमुख कार्यकारी द्रव्य होय. इतर सर्व घटकद्रव्ये सर्जरसाचे कार्य वाढविण्यास सहाय्यकारी ठरतात.

उत्कृष्ट पित्तशामक म्हणूनही हे तेल प्रसिद्ध आहे.

शरीराबाहेर होणारा रक्तस्राव असो वा अभ्यंतर रक्तस्राव असो या तेलाचा उत्तम उपयोग होतो. नासागत रक्तपित्त (नाकातून रक्त येणे- Epistaxis) असताना या तेलाचा नस्यासाठी उपयोग केला जातो म्हणजेच हे तेल नाकात सोडले जाते. आमाशयगतव्रण (Peptic Ulcer) वा अन्य अनेकविध कारणाने आमाशयात रक्तस्राव

होऊ लागतो व हे रक्त उलटीवाटे तोंडातून बाहेर पडते किंवा मलावाटे बाहेर पडताना दिसते. यामध्येही पद्मकादि तेल २-२ चमचे वारंवार पिण्यासाठी वापरल्याने इष्ट लाभ होताना दिसतो.

अधोगरक्तपित्त, रक्तार्श (रक्ती मूळव्याध- Bleeding Piles), गुदगत व्रण, रक्तप्रवाहिका (Dysentery) वा अन्य अनेक रोगांमध्ये गुदमार्गाने रक्तस्राव होतो. हा रक्तस्रावही पद्मकादि तेलाचा अनुवासन बस्ति (Enima) दिल्यास त्वरेने कमी होतो.

मूत्रमार्गातून होणाऱ्या रक्तस्रावासाठी पद्मकादि तेलाचा उत्तर बस्ति वापरतात तर योनीमार्गातून रक्तस्राव असेल तर योनिप्रदेशी या तेलाचा पिचू ठेवला जातो.

याप्रमाणे पद्मकादि तेल हे जेव्हा जेव्हा रक्तस्राव असेल त्या वेळी सर्वत्र वापरण्यासाठी उपयुक्त असे आहे.

केवळ रक्तस्रावासाठी नव्हे तर पित्तप्रधान व्रणासाठीही या तेलाचा उपयोग होतो. जेष्ठमध, हळद, सर्जरस ही द्रव्ये जखमा लवकर भरून येण्यासाठीही उपयुक्त ठरतात व म्हणूनच हे तेल व्रणकर्मासाठी (ड्रेसिंग) वापरले जाते.

**मात्रा :** नस्यासाठी ५ ते १० बिंदू.

**पोटात घेण्यासाठी :** २ चमचे वारंवार प्रत्येक २ तासाने.

**बस्तिसाठी :** ५० मि. लि. प्रत्येक वेळी.

**बाह्योपचारासाठी :** आवश्यकतेनुसार.

❏❏❏

## ४२. चंदनादि तेल

**घटक द्रव्ये :** चंदन, जेष्ठमध, कोष्ठ, वालक, कमळ, मंजिष्ठा, वेलची, जटामांसी, लाक्षा, हळद, दारुहळद, अनंतमूळ, केशर, लवंग, दालचिनी, नागरमोथा, कंकोळ, तिळाचे तेल.

चंदनादि तेलातील सर्व औषधे शीत गुणांची असून पित्तप्रशमन करणारी आहेत. विशेषतः तीक्ष्ण, उष्ण गुणांनी वाढलेले पित्त कमी करण्यासाठी या तेलाचा अधिक चांगला उपयोग होतो. हातापायांची आग, डोळ्यांची जळजळ किंबहुना शरीरात कोठेही होणारा दाह (Burning Sensations) कमी करण्यासाठी या तेलाचा प्रयोग करणे इष्ट ठरते. हे तेल बाहेरून चोळण्यासाठी वापरतात व त्याचबरोबर पोटात घेण्यासाठीही. या दोन्ही प्रकारांनी तेल वापरल्याने अधिक लाभ प्राप्त करून घेता येतो.



रक्तपित्त या रोगावरीलही चंदनादि तेल हे महत्त्वाचे औषध आहे. रक्तपित्त म्हणजे शरीराबाहेर रक्तस्राव होणे. पित्ताने रक्ताची दुष्टी होऊन हा रोग उत्पन्न होत असतो. नासागत रक्तपित्तासाठी चंदनादि तेलाचे नस्य (Nasal Drops) केले जाते तर रक्तष्ठीवन (Haemoptesis) व रक्तछर्दिसाठी (Haematemesis) हे तेल पिण्यासाठी वापरतात. योनिगत वा मूत्रमार्गाने होणाऱ्या रक्तस्रावासाठी या तेलाचा उत्तरबस्ती (Dush) करणे योग्य ठरते.

चंदनादि तेलातील चंदन, वालक, अनंतमूळ, नागरमोथा ही द्रव्ये मूत्रल (मूत्राचे प्रमाण वाढविणारी) असल्याने मूत्रकृच्छ्र (Painful Micturition), मूत्राघात (Scanty urination), सदाह मूत्रप्रवृत्ती, (Burning Micturition), सरक्तमूत्रप्रवृत्ती (Haematuria) या सारख्या रोगांवरही चंदनादि तेलाचा अभ्यंतर प्रयोग करणे निश्चितच लाभदायक ठरते.

**प्रमाण :** बाह्य उपचारांसाठी आवश्यकतेनुसार. नस्यासाठी ५ ते १० बिंदू दिवसातून ३ वेळा. पोटात घेण्यासाठी १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❏❏❏

## ४३. नारायण तेल

**घटक द्रव्ये :** बेल, अग्निमंथ, टेंटू, पाटला, कडूनिंब, प्रसारणी, अश्वगंधा, रिंगणी, बृहती, बला, अतिबला, गोखरू, पुनर्नवा यांचा काढा, बडिशेप, देवदार, जटामांसी, वेखंड, चंदन, कोष्ठ, वेलची, शालिपर्णी, पृश्निपर्णी, मुद्गपर्णी, माषपर्णी, रास्ना, अश्वगंधा, सैंधव, पुनर्नवा यांचा कल्क, शतावरीचा रस व गाईचे दूध.

नारायण तेल हे बाह्य उपचारासाठी प्रामुख्याने वापरले जाते. विशेषतः याचा प्रयोग केल जातो तो संवाहनासाठी (चोळण्यासाठी). पण याचा अर्थ असा नव्हे की नारायण तेलाचा अभ्यंतर उपयोग निषिद्ध आहे. अनेक अवस्थांमध्ये नारायण तेल हे पोटात द्यावयाचे औषध म्हणूनही वापरले जाते हे येथे प्रथमतः लक्षात घेतले पाहिजे.

नारायण तेलातील प्रमुख घटक द्रव्य शतावरी हे आहे. शतावरी मधुर रसाची, शीतवीर्य, गुरू गुणाची असून उत्कृष्ट बल्य आहे. शतावरी ही उत्कृष्ट वातघ्नही आहे.

वाताचे रोग दोन प्रकारे होत असतात. त्यातील एक प्रकार म्हणजे धातूक्षयाने होणारे वातरोग हा होय. कोणत्याही कारणाने शरीरधातुंचा ऱ्हास झाला असता वातदोष वाढतो व अनेक प्रकारचे वातरोग उत्पन्न होतात. या सर्व वातविकारांसाठी नारायण तेल अत्यंत उपयुक्त ठरते. बेल, अग्निमंथ, टेंटू, बला, अश्वगंधा, देवदार, कोष्ठ, शालिपर्णी, पृश्निपर्णी, रास्ना ही या तेलात असणारी आणखी काही उत्तम वातनाशक औषधी द्रव्ये. ही सर्व द्रव्ये शतावरीचे वातनाशक व बल्य कर्माला सहाय्यभूत ठरतात.

नारायण तेल हे उत्तम बल्य, विशेषतः मांसधातूला बल देणारे असल्याने पक्षाघातासारख्या (Hemiplegia) वातरोगांमध्ये या तेलाचा संवाहनासाठी वापर केला जातो. संवाहनाने सिरा, स्नायू व मांसधातू यांना बल प्राप्त होते व या अवयवांचे ठिकाणी निर्माण झालेले शैथिल्य दूर होते. यामुळेच या अवयवांचे हालचाली करण्याचे प्राकृत कर्महीं हळूहळू पण निश्चयाने सुरू होते. नारायण तेलाचे संवाहनाने कटिशूल (पाठ, कंबर दुखणे), संधिशूल (सांधे दुखणे) आदी अनेक वेदनायुक्त वातरोगातील दुखणे कमी होत असल्याने या तेलाचा व्यवहारात बऱ्याच व्यापक प्रमाणात वापर केला जातो.

नारायण तेलाचा आणखी एका रोगामध्ये विशेष लाभ होताना आढळतो व तो रोग म्हणजे तमकश्वास (Bronchial Asthama) हा होय. तमकश्वास किंवा दम्याचे रोगामध्ये दम्याचा ॲटॅक आल्यानंतर त्यास खोकला येत असतो. खोकल्याचे वेळी येणारा कफ लवकर सुटत नाही. हा कफ लवकर पडून गेल्यास थोडा तरी आराम पडतो. दम्याचे रोगीही दोन प्रकारचे असतात. एकामध्ये दम लागतो त्यावेळी कफाचे प्रमाण फारच असते व खोकल्यावाटे बऱ्याच प्रमाणात कफ बाहेर पडतो. याउलट दुसऱ्या प्रकारच्या रोग्यामध्ये कोरडा खोकला असतो व बराच वेळ खोकल्यावर अगदी थोडासा कफ पडतो. दम्याचे हे जे दोन प्रकारचे रुग्ण आहेत त्यापैकी दुसऱ्या प्रकारात म्हणजेच ज्यात कफाचे प्रमाण कमी असते अशा वातप्रधान प्रकारात या नारायणतेलाचा अधिक फायदा होतो. दम्याचा वेग (Attack) आला असताना नारायण तेल गरम करून १-१ चमचा वारंवार पाजण्याने दम्याचा ॲटॅक त्वरेने कमी होतो. दम्याची अनेकविध औषधे, जी तत्काळ फायदा देणारी म्हणून आजकाल वापरली जातात त्यांचे अनेक दुष्परिणामही शरीरावर घडत असतात. नारायण तेलाने मात्र दम्याचा वेग कमी होत असूनही अन्य कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत, किंबहुना बल्य म्हणजेच बल वाढविणारे औषध म्हणून ते अधिकच युक्त ठरते. याच दृष्टीने पाहता नारायण तेल हे तमकश्वासाच्या रुग्णामध्ये एक वरदानच ठरते.



तमकश्वासामध्ये नारायण तेल ज्येष्ठमधाच्या गरम पाण्याबरोबर (फांट) देणे अधिक लाभदायक असते.

दम्याचा ॲटॅक गेल्यानंतरही दररोज नारायण तेल सेवन करीत राहिल्यास दम्याचे वारंवार येणाऱ्या वेगांचे प्रमाण बरेच आटोक्यात आणता येते.

**प्रमाण :** बाह्य उपचारासाठी आवश्यकतेनुसार.

पोटात देण्यासाठी वेगावस्थेत- १-१ चमचा दिवसातून दर १० मिनिटांनी वेग कमी होईपर्यंत.

**अन्यत्र :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** जेष्ठमध फांट.

❑ ❑ ❑

## ४४. महामाषतैल

**घटकद्रव्ये :** माष (उडीद), दशमूळ, एरंडमूळ, धमासा, पंचकोल (पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ), मंजिष्ठा, अश्वगंधा, गुळवेल, जेष्ठमध, कोष्ठ, तिळाचे तेल.

या तेलातील सर्वच घटक द्रव्ये ही उत्कृष्ट वातघ्न आहेत. उडीद पौष्टिक असून धातुवर्धन करणारे, विशेषतः मांसधातू परिपुष्ट करणारे असून त्याच्या या कार्यास अश्वगंधेसारखी द्रव्ये सहाय्यभूत ठरत असतात. दशमूळ, एरंडमूल, पंचकोल, गुळवेल, कोष्ठ आदी इतर द्रव्ये उत्तम वातानुलोमक आहेत.

या सर्व गुणकर्मामुळेच महामाषतेलाचा उपयोग अनेक प्रकारच्या वातव्याधींमध्ये केला जातो.

अर्धांगवात (पक्षाघात Hemiplegia) या रोगामध्ये शरीरातील विशिष्ट भागामधील मांसधातूचे संहनन नाहीसे होऊन, शैथिल्य निर्माण झालेले असते. यामुळेच रुग्णास कोणत्याही हालचाली करणे अशक्य होते. अशा रोग्यामध्ये महामाष तेल हे संवाहनासाठी (मसाजसाठी) वापरले जाते. संवाहन करून नंतर स्वेदन (Fomentation) केल्याने रुग्ण पूर्वस्थितीत लवकर येण्यास मदत होते.

महामाषतेलाने वातानुलोमनही उत्तम प्रकारे होत असल्याने वेदना प्रशमनासाठीही या तेलाने संवाहन केले जाते. मांसगतवात (Muscular Pain) कमी करण्यासाठी किंवा संधीवात, वातरक्त आदी रोगात आढळणारी संधीवेदना कमी करण्यासाठाही या तेलाने संवाहन केले जाते. गृध्रसी, विश्वाची सारख्या वातरोगातील वेदनाप्रशमनाचे

कार्यही महामाष तेलाने घडते.

महामाषतेलाचा उपयोग कर्णशूलासाठीही चांगला होतो. या तेलाचे थेंब कानात टाकल्याने कानातील सूज कमी होऊन कान ठणकणेही कमी होते.

महामाष तेल हे याप्रमाणे सामान्यत: बाह्य उपचारासाठी वापरले जात असले तरी अभ्यंतर प्रयोगासाठीही याचा काही वेळा प्रयोग केला जातो. मांसक्षय (Wasting of the Muscles) असताना तसेच अन्य या प्रकारच्या वातरोगांमध्ये महामाष तेल हे पोटात दिल्याने लाभ होतो. या तेलाचे उपयोगाने वजन वाढते व बलही चांगले प्राप्त होते.

**प्रमाण :** बाह्य उपचारासाठी - आवश्यकतेनुसार. कर्णपूरणासाठी- ५ ते १० बिंदू.

**पोटात देण्यासाठी :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ४५. व्रणशोधन तेल

**घटक द्रव्ये :** कडूनिंबाची पाने, करंज बिया, तिळाचे तेल.

या तेलाचा उपयोग बाह्यप्रयोगासाठी केला जातो, पोटात घेण्यासाठी नाही.

व्रणशोधन तेल हे मुख्यत: व्रणकर्मासाठी म्हणजेच ड्रेसिंगसाठी उपयोगात आणले जाणारे तेल आहे. यातील कडूनिंब व करंज ही दोन्ही घटक द्रव्ये रक्तदुष्टी दूर करण्यासाठी अग्रगण्य म्हणून समजली जातात. या तेलाचा उपयोग विशेषत: ज्या जखमेतून पू, लसिका यांसारखे स्राव येतात अशासाठी म्हणजेच दुष्टव्रणासाठी (Septic Wounds) अधिक होतो. अर्थात अन्यत्रही नेहमीसाठी या तेलाचे सहाय्याने जखमांचे ड्रेसिंग करणे युक्तच ठरते.

केवळ व्रणकर्मासाठीच नव्हे तर अन्य अनेक रोगांमध्येही व्रणशोधन तेलाचा उपयोग होत असतो. पामा (खरूज Scabies),विचर्चिका (इसब- Eczima), नायटा (Ring Worm) यासारख्या रोगावर हे तेल यशस्वीरीत्या वापरले जाते. याच नव्हे तर ज्या ज्या रोगांमध्ये खाज (Icching) अधिक असते अशा सर्व प्रकारच्या त्वचेच्या विकारांवर या तेलाचे लेपन करणे युक्त ठरते.

कोरड्या खरजेमध्ये अनेकवेळा सर्व शरीरावर छोट्या छोट्या पिडका (पुरळ) उत्पन्न होतात व याबरोबरच असह्य अशी खाज उठणे हे लक्षण आढळते. अन्य



प्रकारच्या उपचारांनी कमी न होणारी ही खाज व्रणशोधन तेल लावल्याने खरोखरीच फार त्वरेने कमी होते.

कोठेही लागले, खरचटले, जखम झाली तर लगेच याचा वापर केल्यास जखमेमध्ये पू होण्याचे टळते व पर्यायाने जखम लवकर भरून येण्यास मदत होते.

**मात्रा :** बाह्योपचारासाठी आवश्यकतेनुसार.

❑❑❑

## ४६. व्रणरोपण तेल

**घटक द्रव्ये :** लोध्र, कमळ, प्रियंगु, जेष्ठमध, चंदन, पद्मकाष्ठ, हळद, तिळाचे तेल.

या तेलाचा उपयोगही प्रामुख्याने बांह्योपचारांसाठीच केला जातो. यातील सर्वच घटक द्रव्ये ही शीतगुणाची असून कषायरसाची (तुरट) आहेत. यामुळेच रक्तस्राव थांबविण्यासाठी व व्रणरोपणासाठी (जखमा लवकर भरून येण्यासाठी) या तेलाचे सहाय्याने व्रणकर्म (ड्रेसिंग) केले जाते. व्रणरोपण तेल हे प्रामुख्याने जो व्रण शुद्ध असतो त्यासाठी वापरले जाते. दुष्टव्रण असताना (Septic Wound) या तेलाचा फारसा उपयोग होत नाही.

या तेलातील घटकद्रव्यांपैकी जेष्ठमध हे जखम लवकर भरून येण्यासाठी उपयुक्त असे महत्त्वाचे औषधी द्रव्य आहे. यामुळे याप्रकारे रक्तस्राव थांबवून, जखमा लवकर भरून येण्यासाठी जी जी औषधे बनविली जातात त्यामध्ये ज्येष्ठमध हा घटक असतोच असे दिसते. याचे जोडीला व्रणरोपण तेलात हळदही आहे. जखमेतून वाहणारे रक्त थांबविण्यासाठी व झालेली जखम चिघळू नये यासाठी घराघरातून हळदीचे चूर्ण यशस्वीरीत्या वापरले जाते. जेष्ठमध व हळदीच्या या गुणात भरीव वाढ करण्याचे कार्य लोध्र, कमळ, प्रियंगु, चंदन, पद्मकाष्ठ यासारखी द्रव्ये करीत असतात.

दुष्ट व्रण असेल तर प्रारंभी व्रणशोधन तेल वापरून व्रण शुद्ध झाल्यावर मग व्रणरोपण तेल वापरणे इष्ट ठरते.

**मात्रा :** बाह्योपचारासाठी आवश्यकतेनुसार.

❑❑❑

## ४७. पारिभद्र तेल

**घटक द्रव्ये :** कडूनिंब, तिळाचे तेल.

पारिभद्र हा कडूनिंबासाठी असणाऱ्या अनेक संस्कृत शब्दांपैकी एक शब्द. 'परितो भद्रं यस्मात्' म्हणजेच ज्यामुळे सर्व प्रकारचा लाभ होतो तो पारिभद्र अशी या शब्दाची निरुक्ति सांगितली जाते. कडूनिंबाचे उपयोगाने अनेक प्रकारचे रोग दूर होत असल्यानेच यास पारिभद्र ही संज्ञा प्राप्त झालेली आहे. अशा या पारिभद्र किंवा कडुनिंबापासून सिद्ध केलेले तेल म्हणजेच पारिभद्र तेल होय.

कडूनिंब तिक्त (कडू) रसाच्या द्रव्यांपैकी श्रेष्ठ होय. ते शीत गुणाचे, पित्तशामक व दाह कमी करणारे द्रव्य आहे. कडूनिंबामध्ये असणारे Margosa Oil नावाचे तेल हे यातील प्रमुख कार्यकारी द्रव्य आहे. या Margosa Oil मध्ये गंधकाचा अंश असतो.

पारिभद्र तेलाचा उपयोग प्रामुख्याने वाह्य उपचारांसाठी केला जातो. पारिभद्र तेल हे रक्तदुष्टी दूर करणारे तथा जंतुघ्न आहे. यामुळे ज्या जखमांतून पू वाहतो अशा दुष्ट व्रणामध्ये (Septic Wounds) व्रणकर्मासाठी (ड्रेसिंग) याचा वापर केला जातो. याचे उपयोगाने जखमेतील स्राव नाहीसे होतात, त्याठिकाणची दुर्गंधितता नष्ट होते, व्रण शुद्ध होतो व पर्यायाने जखम लवकर भरून येण्यास सहाय्य घडते. हे तेल उत्कृष्ट कंडूघ्न (खाज कमी करणारे) औषध आहे. यासाठीच ज्या त्वचाविकारांमध्ये कंडू हे प्रधान लक्षण आहे अशा सर्व विकारांवर या तेलाचा वापर केला जातो. या तेलाने मर्दन केल्यास दाहप्रशमनही होते.

अन्य कुष्ठघ्न औषधे वापरताना मलम करण्यासाठी माध्यम म्हणून अनेक वेळा या पारिभद्र तेलाचा वापर व्यवहारात केला जातो.

पारिभद्र तेल नेहमी बाह्य उपचारांसाठीच वापरले पाहिजे असे मात्र नव्हे. या तेलाचा अभ्यंतर प्रयोगासाठीही अनेक वेळा उपयोग केला जातो. कडूनिंब हे द्रव्य उत्कृष्ट पित्तशामक व रक्तदोषहर असल्याने जीर्णज्वर (Chronic Fevers), दाह (Burning Sensations), सर्व प्रकारचे रक्तविकार यावर हे तेल पोटात घेण्यासाठी दिल्याने लाभ होतो. पोटात घेतलेल्या या तेलातील कार्यकारी द्रव्ये ही त्वचेवाटे शरीराबाहेर विसर्जित होतात. यामुळेच त्वचेवर उत्तेजक क्रिया घडते. अनेक प्रकारच्या त्वचा रोगांसाठी म्हणूनच या तेलाचा अभ्यंतर प्रयोग केला जातो.

**प्रमाण :-** बाह्योपचारासाठी आवश्यकतेनुसार.
पोटात घेण्यासाठी १/२ ते १ चमचा दिवसातून ३ वेळा.
**अनुपान :** गरम पाणी.



## ४८. जात्यादि तेल

**घटक द्रव्ये :** जाईची पाने, गोखरू, मंजिष्ठा, लोध्र, खैर, जेष्ठमध, तिळाचे तेल.

हे तेलही प्रामुख्याने बाह्योपचारांसाठीच वापरले जाते.

या तेलातील सर्वच घटकद्रव्ये पित्तशामक आहेत व म्हणूनच या जात्यादि तेलाचा उपयोग पित्तप्रधान व्रणांसाठी केला जातो. ज्या जखमेचे ठिकाणी दाह असतो (आग होते), ज्या जखमांचा रंग रक्तवर्ण असतो वा ज्या जखमातून पिवळसर, पाण्यासारखा स्राव अधिक वाहतो त्या पित्तप्रधान जखमा होत. या सर्व लक्षणांनी युक्त जखमांमध्ये जात्यादि तेल कार्यकारी ठरते.

या तेलात असणाऱ्या लोध्र, खैर, जेष्ठमध यासारख्या घटक द्रव्यांमुळे जखमा लवकर भरून येण्यासही मदत होते.

वरील गुणकर्मामुळेच जात्यादि तेल हे प्रामुख्याने दग्ध व्रणासाठी (भाजल्यामुळे होणाऱ्या जखमांसाठी) उत्कृष्ट समजले जाते. या तेलाने व्रणकर्म (ड्रेसिंग) केले असता भाजलेल्या जागी असणारी आग कमी होण्यास मदत होते व जखमाही लवकर भरून येतात. भाजलेल्या ठिकाणी जखम भरून आल्यानंतर बरेच वेळा जे वैवर्ण्य (काळे किंवा पांढले डाग) उत्पन्न होते तेही जात्यादि तेलाने व्रणकर्म केल्यास फारसे उत्पन्न होत नाहीत असे आढळते.

वारंवार तोंड येते असे लक्षण अनेक रोग्यांमध्ये आढळते. यामध्ये तोंडात सर्वत्र, जिभेवर फोड येतात, लाली येते व काहीही खाताना दुखते. विशेषत: तिखट पदार्थांचा तर तोंडास स्पर्शही अशक्य ठरतो. या सर्व लक्षणांनी युक्त अशा मुखपाकामध्येही पित्तप्रकोप हाच कारणीभूत असतो. मुखपाक (तोंड येणे) यामध्ये म्हणूनच जात्यादि तेलाचे तोंडात प्रतिसारण केले असता तोंड कमी होते. जात्यादि तेल हे बाह्य उपयोगांसाठी प्राधान्याने वापरले जाते हे खरे असले तरी यातील कोणतेही घटक द्रव्य हे विषारी नाही व म्हणूनच मुखप्रतिसारण करण्यास कोणताही प्रत्यवाय नाही. जात्यादि तेल कडू असले, तरी त्यामुळे होणाऱ्या लाभाचा विचार करता त्याचे प्रतिसारण युक्तच ठरते. तोंडात आतून तेल लावल्यानंतर ४-५ मिनिटांनी कोमट पाण्याने गुळण्या केल्यास अधिक लाभ होतो.

**मात्रा :** बाह्योपचारासाठी आवश्यकतेनुसार.

## ४९. जात्यादि घृत

**घटक द्रव्ये :** जाईची पाने, कडूनिबांची पाने, मोरचूद, पटोल, हळद, दारूहळद, कुटकी, मंजिष्ठा, जेष्ठमध, मेण, करंजबीज, अनंतमूळ, तूप.

या घृतामध्ये मोरचूदासारखी अत्यंत विषारी द्रव्ये असल्याने हे घृत केवळ बाह्य उपचारांसाठीच वापरले जाते. याचा अभ्यंतर उपयोग कधीही करू नये हे लक्षात ठेवले पाहिजे.

जाई ही तिक्त (कडू) रसाची वनस्पती असून पित्तप्रशमन करणारी आहे. केवल जाईच नव्हे तर हळद, कुटकी, मंजिष्ठा, जेष्ठमध, अनंतमूळ यासारखी अन्य द्रव्ये ही पित्तप्रशमन करणारी व दाह कमी करणारी आहेत. यामुळेच ज्या व्रणात पित्तदोषाचा अनुबंध असतो अशा व्रणात म्हणजेच ज्या व्रणात दाह असतो, आरक्तवर्णता असते, व्रणातून लाल, पिवळ्या रंगाचा स्राव वहात असतो अशामध्ये व्रणकर्मासाठी (ड्रेसिंग) जात्यादि घृत वापरता येते. दग्धव्रण (भाजल्याने होणाऱ्या जखमा) यामध्ये याचसाठी जात्यादि घृत वापरणे इष्ट ठरते.

या घृतात असणारी मोरचूद, कडूनिंब, करंज, अनंतमूळ ही द्रव्ये व्रण शोधन करणारी असल्याने व्रणदुष्टी (Septic) दूर करून, स्राव कमी करण्याचे कार्य करीत असतात. हळद, जेष्ठमध ही घटक द्रव्ये व्रणशोधनाबरोबर व्रणरोपण (जखमा लवकर भरून आणण्याचे कार्य) करण्यास साहाय्यभूत ठरतात.

व्रणकर्मासाठी विशेषत: भाजलेल्या जखमांसाठी उपयुक्त असा हा कल्प आहे असे संक्षेपाने म्हणावे लागते.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी आवश्यकतेनुसार.

❑ ❑ ❑

## ५०. शतधौतघृत

**घटक द्रव्ये :** गाईचे तूप.

शतधौतघृत हे इतर घृताप्रमाणे स्नेहकल्पनेद्वारा सिद्ध केलेल घृत नसून ते बनविण्याची अगदी वेगळी पद्धती आहे.

गाईचे तूप एका तांब्याच्या परातीत वा ताम्हनात (कोणत्याही पसरट भांड्यामध्ये) घेऊन त्यात थोडेसे पाणी मिसळून हाताने चांगले रगडले जाते. यासाठीच तांब्याची वाटी किंवा तत्सम भांडे घेऊन त्याच्या तळभागाने हे तूप फेसता येते. या तुपातील



सर्व कणी नाहीशी होऊन तूप लोण्याप्रमाणे मऊ, श्लक्ष्ण व सफेद होईपर्यंत असे फेसले पाहिजे. असे चांगले फेसून झाल्यानंतर त्यातील पाणी काढून टाकून, दुसरे पाणी घालून पुन्हा पूर्ववत फेसावे असे वारंवार शंभर वेळा केल्यानंतर शतधौतघृत तयार होते,

असे तयार केलेले जे शतधौतघृत त्यावर ताम्रधातूचे संस्कार होतात व तांब्याचे गुण शतधौतघृतात येतात. यामुळेच या घृताचा अभ्यंतर प्रयोग (पोटात देण्यासाठी) निषिद्ध ठरतो. केवल बाह्योपचारासाठीच हे तेल वापरले जाते.

शतधौतघृत हे उत्कृष्ट पित्तप्रशमन करणारे, विशेषत: दाहप्रशमन करणारे आहे. या तुपाने व्रणकर्म (ड्रेसिंग) केले असता जखमा लवकर स्वच्छ होऊन त्या चटकन भरून येण्यासही मदत होते. यामुळेच शतधौतघृताचा उपयोग दग्धव्रणासाठी (Burn Wound) प्रामुख्याने केला जातो. कोणत्याही कारणाने उत्पन्न होणारा दाह (आग) कमी करण्यासाठी या घृताचे लेपन वा संवाहन उपयुक्त ठरते.

कक्षा (Herpis Zoster) सारख्या पित्तप्रधान रोगामध्ये शरीरावर, विशेषत: पोट, छाती किंवा पाठ या ठिकाणी बारीक फोड येतात, त्या ठिकाणचा रंग रक्तवर्ण असतो व त्याठिकाणी असह्य स्वरूपाचा दाह (आग होणे) हे लक्षण असते. हा दाह कमी करण्यासाठी जी थोडी औषधे उपयुक्त ठरतात त्यापैकी शतधौतघृताचा नंबर फार वर लागतो.

अनेक प्रकारचे उपचार करूनही ज्या जखमा भरून येत नाहीत (Unhealing Ulcers) त्यामध्ये शतधौतघृताने व्रणकर्म (ड्रेसिंग) केल्याने जखमा फार चटकन भरून येतात.

शतधौतघृत हे जसे स्वतंत्रपणे वापरले जाते तसेच मलमे तयार करताना साधन (Base) म्हणूनही या तुपाचा अनेक प्रसंगी वापर केला जातो.

**प्रमाण :** बाह्य उपचारासाठी आवश्यकतेनुसार.

❑ ❑ ❑

## ५१. मरिच्यादि तेल

**घटक द्रव्ये :** मिरे, हरताळ, त्रिवृत्त, रक्तचंदन, नागरमोथा, मन:शिला, जटामांसी, हळद, दारुहळद, देवदार, इंद्रवारुणी, कण्हेर, कोष्ठ, रुईचा चीक, बचनाग, कटुतैल, गोमयरस, गोमूत्र.

मरिच्यादि तेलामध्ये हरताळ, मन:शीला, कण्हेर, बचनाग, रुईचा चीक

अशी अनेक विषारी औषधे समाविष्ट केलेली आहेत. म्हणूनच या तेलाचा वापर फक्त बाह्य उपचारासाठीच केला जातो, अभ्यंतर प्रयोगासाठी नाही.

मरिच्यादि तेल हे सर्व प्रकारच्या त्वचा रोगांवर कार्यकारी तैल आहे. पामा (खरुज- Scabies), विचर्चिका (इसब- Eczima), नायटा (Ringworm) या व यासारख्या रोगामध्ये निर्माण होणाऱ्या पिटीकेवर (फोडांवर) वा तद्जन्य जे व्रण उत्पन्न होतात, जखमा होतात त्यावर हे तेल लावले जाते, किंवा या तेलाचे सहाय्याने व्रणकर्म (ड्रेसिंग) केले जाते यामुळे तेथील स्राव, विशेषतः पूय किंवा लसिका स्राव त्वरेने कमी होतो. त्याचप्रमाणे व्रणप्रदेशी असणारा कोथ (कुजलेला, निर्जीव बनलेला भाग) नाहीसा होतो व व्रण शुद्ध होतो.

त्वचा रोगात अनेक वेळा कंडू (Pruritis) म्हणजेच खाज येणे हे अत्यंत त्रासदायक असे लक्षण आढळते. व्रणाच्या ठिकाणी असणाऱ्या क्लेदामुळे (टाकाऊ भाग) हा कंडू उत्पन्न होत असतो. मरिच्यादि तेलाने क्लेद कमी होतो व म्हणूनच कंडू हे लक्षणही त्वरेने कमी होते.

कोरड्या खरजेमध्ये सर्वांगावर बारीक पुरळ येते व अत्यधिक प्रमाणात खाज असते. मरिच्यादि तेल लावल्याने ही खाज व पुरळ चटकन नाहीशी होते.

या तेलातील मिरे, हरताळ, मन:शिला, रुईचा चीक, कण्हेर, गोमूत्र यासारखी द्रव्ये ही उष्ण, तीक्ष्ण आहेत. या द्रव्यांमुळेच काहीवेळ तेल लावल्यानंतर थोडावेळ त्या जागी दाह (Burning Sensation) होणे शक्य असते हे लक्षात घेतले पाहिजे. पण याच गुणकर्माचा फायदा घेऊन या तेलाचा वापर श्वित्रासाठी (पांढरे कोड, Leucoderma) केला जातो. कोडामध्ये त्वचेचे ठिकाणी प्रकृतावस्थेमध्ये निर्माण होणारे रंजक द्रव्य (Melanin) काही ठिकाणी संचित होऊ शकत नाही व त्यामुळे त्वचेचा प्राकृतवर्ण जाऊन ती पांढरी दिसू लागते. त्याजागी रंजक द्रव्य पुन्हा संचित व्हावे यासाठी त्याजागी क्षोभ उत्पन्न करून पुन:प्रेरणा द्यावी लागते. मरिच्यादि तेल हे जर डागांवर लावले तर त्याठिकाणी होणाऱ्या क्षोभामुळे त्या भागास चेतना प्राप्त होते व त्यामुळेच रंजक द्रव्य त्याठिकाणी संचित होण्याच्या प्रक्रियेस गती मिळून पुन्हा त्या जागी प्राकृत त्वचावर्ण प्राप्त होतो.

किटिभ (Psoriasis) हा एक असाध्य गणला जाणारा कुष्ठाचा म्हणजेच त्वचारोगाचा प्रकार आहे. यामध्येही मरिच्यादि तेलाचा बाह्यतः वापर करण्याने सर्व लक्षणे निश्चयाने कमी होतात असे दिसते.

**प्रमाण :-** बाह्योपचारासाठी आवश्यकेतनुसार.

❏ ❏ ❏



## ५२. बृहन् मरिच्यादि तेल

**घटक द्रव्ये :** मरिच्यादि तेलातील सर्व घटक द्रव्ये आहेत. त्यांचे जोडीला कडूनिंब व खैर ही दोन द्रव्ये अधिक आहेत.

मरिच्यादि तेलापेक्षा काही अधिक घटक द्रव्ये यात असल्यानेच यास बृहन् मरिच्यादि तेल असे म्हटले जाते. या तेलात अधिक असणारी कडूनिंब व खैर ही दोन्ही द्रव्ये रक्तशोधन करणारी व कुष्ठघ्न म्हणूनच प्रसिद्ध आहेत. यांची जोड मिळाल्याने मरिच्यादी तेलाचे सर्व गुणकर्मामध्ये अधिक वाढ होते असे म्हणता येईल.

मरिच्यादि तेलाप्रमाणेच केवळ बाह्योपचारासाठीच या तेलाचा प्रयोग करता येतो.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी आवश्यकतेनुसार.

❏ ❏ ❏

## ५३. हरताळ मिश्रण

**घटक द्रव्ये :** हरताळ, गंधक, टंकण, नागरमोथा, मिरे, कासीसभस्म, मोरचूद.

हरताळ मिश्रणातील हरताळ, गंधक, कासीस, मोरचूद ही द्रव्ये अत्यंत विषारी आहेत. या औषधांचा म्हणूनच केवळ बाह्य उपचारासाठीच उपयोग केला जातो, अभ्यंतर प्रयोगासाठी नाही.

हरताळमिश्रणातील हरताळ, गंधक, टंकण, मिरे, मोरचूद ही सर्व घटक द्रव्ये कफघ्न असून व्रणातील स्राव कमी करणारी आहेत. हरताळ मिश्रणाचा उपयोग यासाठीच ज्यामध्ये पिटीका उत्पन्न होतात, पू किंवा लसिका स्राव अधिक असतो अशा विविध प्रकारच्या त्वचा रोगात प्रामुख्याने केला जातो. विशेषतः पामा (खरुज Scabis), इसब (Eczima) यासारख्या रोगात तर हरताळ मिश्रण हे सर्वोत्कृष्ठ औषध ठरते.

हरताळ मिश्रणातील मिरे, मोरचूद, टंकण यासारख्या घटक द्रव्यांमुळे कंडू (खाज सुटणे) हे लक्षणही त्वरेने कमी होते. यामुळेच ज्या ज्या रोगांमध्ये कंडू हे प्रधान लक्षण असते अशा इतर त्वचारोगांवरही हे मिश्रण लाभदायक ठरते.

या कल्पातील हरताळ, मिरे, गंधक, मोरचूद यासारख्या द्रव्यांमुळे हरताळमिश्रण

लावल्यावर काही प्रसंगी असह्य स्वरूपाची आग (Burning) होते. त्यामुळे हरताळमिश्रणाचा पुन्हा प्रयोग करण्यास रोगी तयार होत नाही. पण हरताळ मिश्रणाने मिळणारा त्वरीत व कायम स्वरूपाचा टिकणारा लाभ विचारात घेता, काही काळ होणारा दाह सहन करणे क्रमप्राप्त आहे याची जाणीव रुग्णास पूर्वीच करून देणे इष्ट ठरते.

हरताळमिश्रण हे चूर्ण या स्वरुपात असून विविध त्वचारोगांवर लावणे साठी याचे मलम करून ते वापरणे आवश्यक ठरते. यासाठी व्रणशोधन तेल किंवा पारिभद्र तेल वापरणे अधिक युक्त होय.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी-आवश्यकतेनुसार दिवसातून २ वेळा.

❑❑❑

## ५४. लाक्षादि तेल

**घटक द्रव्ये :** अश्वगंधा, देवदार, कुटकी, चंदन, मरवा, बडिशेप, हळद, क्रोष्ठ, जेष्ठमध, नागरमोथा, रास्ना, लाक्षा, गाईचे दही, तेल.

सामान्यत: बाह्योपचारांसाठी वापरले जाणारे हे तेल क्वचित प्रसंगी अभ्यंतर उपयोगासाठीही वापरले जाते.

लाक्षा तेलातील चंदन, कुटकी, मरवा, नागरमोथा, जेष्ठमध यासारखी घटकद्रव्ये शीतगुणांची व पित्तप्रशमन करणारी आहेत. याबरोबरच वातानुलोमन चांगल्या प्रकारे व्हावे यासाठीही या तेलाचा उपयोग होतो.

या तेलाचे अभ्यंग (तेल लावणे) केले असता तीक्ष्ण वेगीज्वर (Hyperpyrexia) कमी होतो. कास (खोकला), दमा (Bronchial Asthama), उर:शूल (Pain in Chest) यांसारख्या श्वसन मार्गातील रोगांमध्ये हे तेल छातीवर चोळले असता लक्षणे कमी होतात, वेदनाही तत्काल नाहीशी होते. उन्माद (Mania), अपस्मार (Epilepsy) यासारख्या मनोदोष असणाऱ्या रोगांमध्येही शिरोभ्यंगासाठी (डोक्यास चोळणे) हे तेल यशस्वीरीत्या वापरले जाते.

तीव्र स्वरूपाचा उदरशूल (Acute Colicy Pain) असताना या तेलाने पोट चोळणे हा उपक्रम फारच लाभदायी ठरतो. यामुळे उदरांत्राच्या हालचाली प्राकृत सुरू झाल्याने पोटात दुखणे लगेच थांबते.

त्वचा रोगात असणारे कंडू (खाज) हे लक्षण कमी करण्यासाठीही या तेलाने मसाज केल्यास लाभ होतो. या तेलात चंदन, मरवा, नागरमोथा यांसारखी सुगंधी



द्रव्ये असल्याने स्वेदाधिक्याने येणारे दौर्गंध्य या तेलाने कमी होते.

या तेलात देवदार, अश्वगंधा, रास्ना यासारखी वातघ्न द्रव्ये असल्याने अनेक प्रकारच्या वातविकारांसाठीही लाक्षादि तेलाने संवाहन (चोळणे) केले जाते. विशेषत: हाता-पायांना मुंग्या येणे, बधिरता येणे ही लक्षणे तर या तेलाचे प्रयोगाने निश्चयाने व त्वरेने कमी होतात.

या तेलाचा काहीवेळा पानासाठी (पिण्यासाठी) ही उपयोग केला जातो. पोटात दिल्याने हे तेल ज्वरघ्न (Antipyritic) म्हणून कार्य करते. गर्भिणी स्त्रीने सातत्याने सेवन केल्यास गर्भाची वाढही चांगल्या प्रकारे होण्यास सहाय्य घडते.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी- आवश्यकतेनुसार.

**पोटात देण्यासाठी :** १/२ ते १ चमचा दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** गरम पाणी किंवा दूध.

❑❑❑

## ५५. पिण्डतेल

**घटक द्रव्ये :** मंजिष्ठा, अनंतमूळ, राळ, जेष्ठमध, मेण, एरंडतेल.

इतर सिद्ध तेलांपेक्षा अगदी वेगळ्या स्वरूपाचे, वेगळ्या पद्धतीने तयार केलेले हे तेल आहे. तेल तयार करताना वापरलेल्या राळ व तेल यामुळे हे तेल घट्ट, पिण्डीभूत होते व म्हणूनच या तेलाला पिण्डतेल ही संज्ञा प्राप्त झाली आहे.

पिण्डतेलाचा उपयोग केवळ बाह्योपचारासाठी, मसाजसाठी केला जातो. अभ्यंतरासाठी नव्हे.

या तेलाने शरीरात असणारी वेदना, चमक नाहीशी होण्यास सहाय्य होते. वातरक्त (Gaut), आमवात (Rhaumatic Arthritis), संधिवात (Simple Arthritis) यासारख्या सांधेदुखी प्रधान लक्षण असणाऱ्या रोगांत पिण्डतेलाने संवाहन (चोळणे) केले असता त्याठिकाणची वेदना सूज कमी होते. पिण्डतेल हे पाक कमी करणारे (Anti-Inflammatory) असल्याने आघातजन्य शोथ (मार लागल्यामुळे येणारी सूज) व त्याठिकाणी साकळणारे रक्त कमी करण्यासही या तेलाचा उपयोग होतो. मंजिष्ठा, अनंतमूळ, जेष्ठमध ही द्रव्ये उत्कृष्ठ पित्तशामकही आहेत व म्हणूनच पाक कमी करण्याचे कार्य घडत असते.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी- आवश्यकतेनुसार.

❑❑❑

## ५६. विषगर्भ तेल

**घटक द्रव्ये :** कण्हेरमूळ, धोतरामूळ, निर्गुंडीमूळ, रूईचे मूळ यांचा काढा; कांजी, तिळाचे तेल व धोतरा, कोष्ठ, कळलावी, बचनाग, देवदार, दारूहळद, पिवळा धोतरा, रास्ना, कण्हेर, मालकांगोणी, मिरे, दंती, जटामांसी, वेखंड, चित्रक, मोहरी, एरंड, लाक्षा, त्रिफळा, लाजाळू यांचा कल्क.

विषगर्भ तेलातील घटकद्रव्यांकडे पाहिले असता असे लक्षात येते की यात कण्हेर, धोत्रा, रूई, पिवळा धोत्रा, बचनाग यासारखी अनेक तीक्ष्ण, उष्ण व विषद्रव्ये वापरलेली आहेत. यामुळेच या तेलास विषगर्भ तेल हे सार्थ नाव प्राप्त झालेले आहे.

विषगर्भ तेल प्रामुख्याने बाह्योपचारासाठी वापरले जाते. फार क्वचित प्रसंगी व तेही अगदी अल्पमात्रेत या तेलाचा पोटात देण्यासाठीही उपयोग केला जातो.

या तेलात वापरली जाणारी ही विषद्रव्ये उष्ण, तीक्ष्ण गुणांची व म्हणूनच उत्कृष्ट वातघ्न अशी आहेत. विशेषतः वात वाढल्याने निर्माण होणारी वेदना कमी करण्याचे कार्य या द्रव्यांकडून घडते. रास्ना, एरंड, कोष्ठ, देवदार, मिरे, चित्रक, मोहरी यासारखी इतर द्रव्येही उष्णवीर्यात्मक असून विषगर्भ तेलाचे वेदना प्रशमन (दुखणे कमी करणे) या कार्यास भरीव मदत करीत असतात.

वरील गुणकर्मामुळेच ज्यामध्ये वेदना असतात अशा सर्व प्रकारच्या वातरोगांमध्ये चोळण्यासाठी विषगर्भ तेल वापरले जाते. मांसगतवात, विश्वाची (Brachial Neuritis), गृध्रसी (Sciatica), संधिवात (Simple Arthritis), आमवात (Rhaumatic Arthritis), वातरक्त (Rhamumatoide Arthritis) वा अशाच प्रकारच्या अन्य रोगांमध्येही या तेलाने मालीश केले असता वेदना त्वरेने कमी होतात. कोठेही लचकले असेल तर अशावेळी या तेलाने चोळले असता वेदना कमी होऊन सर्व हालचाली पूर्ववत सुलभतेने करणे शक्य होते.

वातामुळे निर्माण होणारे रोग दोन प्रकारचे असतात. एका प्रकारात शरीरधातुंचा क्षय झाल्याने, रुक्षता येऊन वात वाढलेला असतो तर दुसऱ्या प्रकारात वायूच्या प्राकृत मार्गामध्ये अडथळा आल्याने वातप्रकोप झालेला आढळतो. तेल वा कोणतेही स्नेहद्रव्य हे सामान्यतः पहिल्या प्रकारात अपेक्षित असते, दुसऱ्या प्रकारात नव्हे. मार्गावरोधाने निर्माण होणाऱ्या वातरोगात तेल हे निषिद्ध असते. हा जरी सामान्य नियम झाला तरी विषगर्भ तेल मात्र यास अपवाद आहे, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. विषगर्भ तेलात असणारी सर्व विषद्रव्ये व त्यांचा उष्ण, तीक्ष्ण गुण; रास्ना,



एरंड, देवदार, मिरे यासारखी वातनाशक द्रव्ये, जटामांसी, वेखंड, मोहरी यासारखी सुगंधी व वातानुलोमक द्रव्ये या सर्वांचेच संस्कार तेलावर होत असल्याने यापासून बनणारे विषगर्भ तेल हे दोन्ही प्रकारच्या वातरोगांत वेदना कमी करण्यासाठी निरपवादपणे उपयुक्त ठरते.

या तेलाने संवाहन केल्याने (चोळल्याने) वेदना तर कमी होतातच पण त्याबरोबरच स्नायू व संधि याठिकाणी असणाऱ्या हालचालीही पूर्वस्थितीस आणण्यास या तेलाचा उत्तम उपयोग होतो.

वरील सर्व रोगांमध्येच क्वचित प्रसंगी अल्पमात्रेत हे तेल पोटातही दिले जाते व याचाही उत्तम लाभ होताना दिसतो.

**मात्रा :** बाह्योपचारासाठी- आवश्यकतेनुसार.

**पोटात देण्याठी :** ५ ते १० बिंदू दिवसातून २ वेळा.

**अनुपान :** दूध.

## ५७. सहचर तेल

**घटक द्रव्ये :** कोरांटीची पाने, तिळाचे तेल.

कोरांटी म्हणजेच सहचर. या कोरांटीच्या पानांनी सिद्ध केलेल्या तेलासच सहचर तेल असे म्हणतात. सहचर तेलाचा उपयोग केवळ बाह्योपचारासाठीच केला जातो.

कोरांटी ही तिक्त, मधुर रसाची, स्निग्ध व उष्णवीर्य आहे. ही उत्कृष्ट कफवातशामक आहे. सहचर तेलाचा प्रामुख्याने प्रयोग केला जातो तो त्वचारोगांसाठी. ज्यामध्ये व्रण उत्पन्न होतात, त्यातून स्राव वाहत असतो अशा त्वचारोगांत किंवा ज्यामध्ये पिटीका येतात, फुटतात, वाहतात, त्याजागी सूज असते, वेदना असते अशा त्वचारोगातही हे तेल वापरण्याने इष्ट लाभ आढळतो. या तेलाचे प्रयोगाने सूज कमी होते, वेदना कमी होते, निर्माण झालेले व्रण शुद्ध होऊन चटकन भरूनही येतात. या तेलाचे लेपनाने कंडू (खाज Prutitis) हे लक्षणही त्वरेने कमी होते. याच सर्व गुणकर्मामुळे सहचर तेल हे उत्तम कुष्ठघ्न आहे असेच याचे वर्णन केलेले आढळते. पामा (Scabies), विचर्चिका (Eczima), नायटा (Ringworm) व यांसारख्या सर्वच प्रकारच्या कुष्ठावर कार्यकारी असे हे तेल आहे.

सहचर तेल हे केश्यही आहे. कुष्ठघ्न व केश्य हे दोन्ही गुण एकत्रित

असल्याने या तेलाचा उपयोग डोक्यात होणारा कोंडा, खवडे व त्यामुळे केस गळणे ही सर्व लक्षणे नाहीसी करण्यासाठी होत असतो.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी आवश्यकतेनुसार.

❑❑❑

## ५८. वचा तेल

**घटक द्रव्ये :** वेखंड, तिळाचे तेल.

वचा म्हणजेच वेखंड. या वेखंडापासून सिद्ध केलेल तेल ते वचा तेल होय.

वचा तेलाचा उपयोग प्रामुख्याने नस्यासाठी (नाकात टाकण्यासाठी) केला जातो. क्वचित प्रसंगी संवाहनासाठी (चोळण्यासाठी) या तेलाचा वापर केला जातो.

वारंवार शिंका येणे, नाक चोंदणे, डोके जड होणे व दुखणे ही लक्षणे पडश्यामध्ये व पीनसामध्ये (Rhinitis and Sinusitis) आढळतात. ही सर्व लक्षणे त्वरेने कमी करण्याचे कार्य वचा तैलाचे नस्याने घडते. नस्य केल्यानंतर काही क्षणातच नाक रिकामे होते, डोके दुखणे थांबते व रोगी काही काळ का होईना पण लक्षणमुक्त होतो.

वेखंड हे मनावर कार्यकारी व म्हणूनच अनेक प्रकारच्या मानसिक विकारांवर उपयुक्त असे हे द्रव्य आहे. ते संज्ञाप्रबोधन करणारेही आहे. याचसाठी अपस्माराचे रोग्यांमध्ये (Epilepsy) वचा तेलाचे नस्याचा वापर केला जातो. अपस्माराचा वेग (Attack) आला असताना वचा तेलाचे थेंब नाकात टाकण्याने वेग त्वरेने कमी होतो. वेग नसतानाही वचा तेलाचे नस्याचा दररोज नियमाने उपयोग केल्यास अपस्माराचे वेग येण्याचे प्रमाण कमी होते.

अनेक रुग्णांमध्ये हाता-पायाला मुंग्या येणे, बधिरता येणे, दुखणे अशा प्रकारची लक्षणे आढळतात. अशा रोग्यांमध्ये वचा तेलाने संवाहन करून (चोळून) शेक दिल्याने लाभ होतो.

हाताच्या व पायाच्या तळव्यांना घाम अत्यधिक प्रमाणात येणे हे लक्षण घेऊनही अनेक रोगी येत असतात. अनेक प्रकारच्या उपचारानेही नियंत्रित न होणारे हे लक्षण वचा तेलाचे प्रयोगाने मात्र निश्चितच कमी होते. अशा रोग्यांना हातापायास वचा तेल चोळून नंतर हात-पाय सोसवेल इतक्या गरम पाण्यात बुडवून ठेऊन शेक द्यावा. असे काही दिवस दररोज केल्यास लवकरच इष्ट तो लाभ आढळून येतो.

वचा तेलाने संवाहन केल्यास काही वेळा त्या स्थानातील केस गळतात व



म्हणूनच हे तेल डोक्यास न लागेल याची खबरदारी घेणे आवश्यक ठरते.

**मात्रा :** बाह्योपचारासाठी आवश्यकतेनुसार.

नस्यासाठी २ ते ५ बिंदू.

❑❑❑

## ५९. इरिमेदादि तेल

**घटक द्रव्ये :** इरिमेद, कापूर, लवंग, कंकोळ, वेलची, लोध्र, तिळाचे तेल.

इरिमेद हा खदिर म्हणजेच कातासाठी असणारा एक संस्कृत शब्द. या इरिमेदापासून बनविलेल्या तेलाचा उपयोग अनेकविध प्रकारच्या हिरड्यांच्या रोगासाठी केला जातो. कात हा कषायरसाचा (तुरट) असून रक्तस्राव थांबविण्यासाठी श्रेष्ठ समजला जातो. इरिमेदादि तेल हिरड्यांवर चोळले असता दातातून (हिरड्यांतून) येणारे रक्त लगेच थांबते. इरिमेदादि तेलात असणारे लोध्रही यासाठी उपयुक्त ठरते.

कात व लोध्र यांचेमुळे हिरड्यातून होणारा रक्तस्राव व पू दोन्ही कमी होऊन हिरड्यांना बळकटी मिळते व म्हणूनच दात हलत असताना, सपूय, सरक्त दंतवेष्ट (हिरड्या) असताना या तेलाचा हिरड्यांना चोळण्यासाठी नियमाने काही दिवस वापर केल्यास निश्चितच फायदा होतो.

या तेलात असणारी कापूर, लवंग, वेलची यांसारखी सुगंधी द्रव्ये इरिमेदाची स्वभावतः असणारी दुर्गंधी कमी करतात. ही सुगंधी द्रव्ये उत्कृष्ट वातनाशक व वेदना कमी करणारी आहेत व म्हणूनच दात दुखत असताना या तेलाचा पिचू (बोळा) ठेवल्यास, तात्पुरती का होईना पण लगेच दातदुखी थांबते व रुग्णास आराम मिळतो.

दात व विशेषतः हिरड्या यांच्या विविध रोगांवर रामबाण असणारे हे तेल मुखरोगांसाठीही उपयुक्त ठरते. वारंवार तोंड येणे, तोंडामध्ये बारीक फोड येणे, लहान लहान जखमा होणे, घसा येणे व दुखणे, मुखदौर्गंध्य यासाठीही या इरिमेदादि तेलाचा चांगला फायदा होतो.

**प्रमाण :** दात व हिरड्या यांना लावून चांगले चोळावे. मुखरोगांसाठी तोंडात आतवर तेल लावावे. यानंतर कोमट पाण्याने गुळण्या कराव्यात. असे दिवसातून किमान २ वेळा तरी करावे.

❑❑❑

## ६०. कर्णशूलहर तेल

**घटक द्रव्ये :** मुळ्याचा रस, आल्याचा रस, लसुणीचा रस, रुईच्या पानांचा रस, हिंग, तिळाचे तेल.

कान दुखणे हे एक अत्यंत त्रासदायक असे दुखणे आहे. अचानक दुखू लागणारा कान स्वत: रुग्णास व घरातील सर्वांसच बेचैन करून सोडतो. अत्यंत वेदना असणाऱ्या या शीघ्रकारी रोगावर त्वरित परिणाम करणारी औषधे मात्र फारशी उपलब्ध नाहीत. यास अपवादात्मक अशी जी औषधे आहेत त्यामध्ये कर्णशूलहर तेल हे एक आहे. कर्णशूलहर तेलाने कर्णपूरण केल्याने (कानात टाकल्याने) काही क्षणातच कान दुखणे थांबते. रुग्णास आराम मिळतो व रुग्ण आपल्या नित्यकर्मासाठी तयार होऊ शकतो.

या तेलात असणारी मुळा, आले, लसूण, रुई इत्यादी द्रव्ये ही तीक्ष्ण, उष्ण, वातानुलोमक आहेत व म्हणूनच वेदना कमी करणारी आहेत. या द्रव्यांना हिंग याही एक उत्कृष्ट वातुलोमक द्रव्याची जोड मिळालेली असल्यानेच हे तेल कानातील वेदना नष्ट करण्याचे कार्य प्रभावीतपणे करू शकते.

**प्रमाण :** २ ते ५ बिंदू दिवसातून ४ वेळा कानात टाकण्यासाठी.

❏ ❏ ❏

## ६१. कर्णस्रावहर तेल

**घटक द्रव्ये :** गंधक, मन:शिला, हळद, मोहरीचे तेल, धोतऱ्याच्या पानांचा रस.

कर्णशूलाप्रमाणेच कर्णस्राव (कान वाहणे) हे एक अत्यंत त्रासदायक असे लक्षण आहे. कान फुटतो, त्यातून रक्त, पू किंवा लसिका स्राव सतत होत राहतो. कानाच्या ठिकाणी पाक होऊन, कान दूषित (Septic) होऊन हा स्राव उत्पन्न होत असतो.

कर्णस्रावहर तेलात असणाऱ्या गंधक, मन:शिला, हळद या द्रव्यांमुळे कानातील दुष्टी (Sepsis) कमी होते व स्राव निर्माण होण्याची प्रक्रिया थांबते. हळद ही व्रणशोधन व रोपण करणारी आहे. व्रण शुद्ध करून जखमा लवकर भरून आणण्याचे कार्य हळदीने घडते. हळद तिक्त-कषाय (कडू-तुरट) रसाची असल्याने स्रावाचे शोषणासही ती सहाय्यभूत ठरते.



वरील गुणकर्मामुळेच कर्णस्रावासाठी जी अनेकविध औषधे वापरली जातात त्यापैकीच एक महत्त्वाचे म्हणून हे कर्णस्रावहर तेल ओळखले जाते.

**प्रमाण :** ५ ते १० बिंदू दिवसातून ४ वेळा.

❏ ❏ ❏

## ६२. बिल्वतेल

**घटक द्रव्ये :** बेलफळांचा मगंज, तिळाचे तेल.

बेलफळांपासून सिद्ध केलेले हे बिल्वतेल मुख्यत: कर्णरोगांसाठी उपयुक्त असे औषध आहे.

बेल उष्ण स्वभावाचा असून उत्तम वातनाशक आहे. त्याचप्रमाणे बेलाचा कानांमध्ये प्रभावाने उपयोग होतो असे म्हणता येईल. याचसाठी कानाच्या अनेक प्रकारच्या वातजनित रोगांसाठी बिल्वतेलाचा उपयोग होतो.

या तेलाचा विशेष उपयोग होतो तो कर्णबाधिर्यासाठी, बहिरेपणाासाठी. अशा बहिऱ्या रोग्यांमध्ये बिल्वतेलाने कर्णपूरण करणे (कानात तेल घालणे) लाभदायक ठरते. विशेषत: ज्या रोग्यामध्ये या बहिरेपणाचे कारण निश्चित सांगता येत नाही अशा रुग्णात याचा अधिक लाभ होताना दिसतो. याच्या उपयोगाने लगेच फरक पडतो असे मात्र नव्हे तर बरेच दिवस नित्य कर्णपूरण केल्यासच फायदा होतो.

स्ट्रेप्टोमायसिन वा अन्य राजयक्ष्माविरोधी औषधे अनेक दिवस घेत राहिल्याने कर्णबाधिर्य उत्पन्न होते. बिल्वतेल प्रथमपासूनच जर वापरण्यास सुरुवात केली तर हे लक्षण निश्चयाने टाळता येते.

कमी ऐकू येणे, याप्रमाणेच कर्णनाद व कर्णक्ष्वेड (कानात आवाज येणे), कान दुखणे इत्यादी लक्षणांसाठीही या तेलाचा यशस्वीरित्या वापर केला जातो.

**प्रमाण :** कर्णपूरणासाठी ५ ते १० बिंदू दिवसातून २ वेळा.

❏ ❏ ❏

## ६३. अणुतेल

**घटक द्रव्ये :** जीवंती, वाळा, देवदार, नागरमोथा, दालचिनी, अनंतमूळ, चंदन, दारूहळद, तालिसपत्र, ज्येष्ठमध, त्रिफळा, कमळ, बालबिल्व, रिंगणी, बृहति, रास्ना, शालिपर्णी, पृश्निपर्णी, वावडिंग, तमालपत्र, वेलची, नागकेशर,

पद्मकेशर, तिळाचेतेल, शेळीचे दूध.

तेल सिद्ध करताना प्रथमत: वरील औषधी द्रव्यांचा काढा, कल्क व तिळाचे तेल एकत्रित करून तैल सिद्ध केले जाते. असे १० वेळा करून नंतर त्यात काढ्याऐवजी शेळीच्या दुधाचा वापर करून हे तेल तयार केले जाते.

अणुतैलामध्ये अनेक संस्काराने हे तेल अणू किंवा सर्व स्तोतोगामी बनते. म्हणजेच शरीरातील अगदी सूक्ष्मातिसूक्ष्म प्रदेशी सहजतेने जाऊन पोहोचते व म्हणूनच यास 'अणुतैल' असे म्हणतात.

अणुतैलाचा उपयोग प्रामुख्याने केला जातो तो नस्यासाठी. नस्य म्हणजेच नाकात औषधे टाकणे होय. केवळ नासारोगच नव्हे तर सर्वच उर्ध्वजत्रुगत रोगांसाठीही (शिरोरोग तथा कान, नाक, घशाचे रोग) या तैलाचे नस्य उपयुक्त ठरते.

अणुतैलातील बहुतांश औषधे ही शीतगुणाची, पित्तशामक आहेत व म्हणूनच पित्तप्रधान नासारोगांमध्ये याचा अधिक उपयोग होतो.

वारंवार होणारे पडसे (Acute or Chronic Rhinitis) कमी होण्यासाठी जे शमनोपचार केले जातात त्यामध्ये अणुतैल हे महत्त्वाचे औषध होय. नागरमोथा, कमळ, अनंतमूळ, चंदन, दारूहळद, नागकेशर यांसारखी यातील द्रव्ये ही कषायरसाची (तुरट) असून रक्तस्तंभन करणारी आहेत. यामुळेच नासागत रक्तस्त्राव असताना (Epistaxis) या तैलाचे नस्य केले असता रक्तस्त्राव थांबतो. वरचेवर होणाऱ्या पडशामध्ये बरेच वेळा नाकात खपली धरते, कोरडेपणा, रूक्षता येते व खाज सुटते. अशी खपली काढली तर जखमेतून रक्त येऊ लागते. ही सर्व लक्षणे कमी करण्यासाठी अणुतैल नस्याचा निश्चितच लाभ होतो. नस्यामुळे नाकात असणारी वेदना, दाह ही लक्षणे कमी होतात व रुग्णास लगेच आराम मिळतो.

अर्धावभेदक (अर्धशिशी), सूर्यावर्तक वा अन्य विविध प्रकारचे शिरोरोग यामध्ये डोके दुखणे हे प्रधान लक्षण असते. हे लक्षणही अणुतैल नस्याने त्वरेने दूर होते.

संक्षेपाने म्हणावयाचे झाल्यास अणुतैल हे नासा तथा शिरप्रदेशी होणारा पाक (Inflamation) कमी करून वेदना प्रशमन करणारे एक उत्कृष्ट औषधी तैल आहे असे म्हणता येईल.

सर्व स्नेहद्रव्यात इतर स्नेहापेक्षा तेलामध्ये सूक्ष्मस्तोतोगामी हा गुण असल्याने तिलतैलाचा केलेला प्रयोग हा सर्व द्रव्यांचे गुण वाढविण्यास सहाय्यभूत ठरतो. शेळीचे दूधही उत्तम पित्तशामक व म्हणूनच कल्पाच्या गुणकर्मांची वाढ करणारे ठरते

**मात्रा :** नस्यासाठी २ ते ४ बिंदू दिवसातून २ ते ४ वेळा.

❑❑❑



## ६४. षड्बिंदू तैल

**घटक द्रव्ये :** माका, एरंडमूळ, तगर, शतावरी, जीवंती, रास्ना, वावडिंग, जेष्ठमध, सुंठ, तिळाचे तेल.

षड्बिंदु तेलाचा वापर फक्त नस्यासाठी (As Nasal Drops) केला जातो. विविध प्रकारचे नासारोग व अन्य उर्ध्वजत्रुगतविकार (E. N. T. Diseases) यासाठी या तेलाचा उपयोग केला जातो.

यातील सर्वच द्रव्ये ही मुख्यत: वातपित्तशामक आहेत. जीर्ण स्वरूपाच्या प्रतिश्यायामध्ये (Chronic Rhinitis) या तेलाच्या नस्याने सर्वच लक्षणे त्वरेने कमी होऊ लागतात. डोकेदुखी, अर्धशिशी तर अगदी चटकन नाहीशी होते. सातत्याने काही दिवस जर या तेलाचे नस्य केले तर पुन:पुन्हा होणारे पडसे कायमचे नाहीसे होणे सहज शक्य असते.

नासागत रक्तपित्त (Epistaxis) यासाठीही या तेलाचे नस्य लाभदायी ठरते. नाकात वरचेवर फोड येणे, खपली धरणे व ती खपली निघली असता रक्त वाहणे अशा प्रकारची लक्षणेही वारंवार आढळतात. ही सर्व लक्षणे षड्बिंदु तैलाच्या नस्याने नष्ट होतात. शतावरी, जीवंती, जेष्ठमध यांसारखी द्रव्ये नाकातील व्रण लवकर भरून येण्यास साहाय्यभूत ठरतात.

एरंडमूळ, तगर, रास्ना, वावडिंग आदी घटकद्रव्यांमुळे वातप्रशमन चांगल्याप्रकारे होते व त्यामुळेच प्रतिश्यायामध्ये आढळणारे किंवा अन्य कारणाने उत्पन्न होणारे शिर:शूल (डोके दुखणे) हे लक्षण कमी करण्यासही या नस्याचा उत्कृष्ट फायदा होत असतो.

**प्रमाण :** ४ ते ६ बिंदू दिवसातून ३ वेळा नस्यासाठी.

❑❑❑

## ६५. त्रिफळा घृत

**घटक द्रव्ये :** हिरडा, बेहडा, आवळकाठी, गाईचे तूप.

हिरडा, बेहडा व आवळकाठी यांच्या एकत्रित मिश्रणास त्रिफळा ही संज्ञा आहे. या त्रिफळेपासून बनविले जाणारे ते त्रिफळाघृत होय.

त्रिफळा हे एक रसायन आहे. रसायन म्हणजे सर्व शरीरधातुंची योग्य प्रमाणात वाढ करून शरीरस्वास्थ्य टिकविणारे द्रव्य होय. सर्वधातुंची समतोल व निरोगी अवस्था यामुळेच रसायनाच्या सेवनाने वार्धक्यही लवकर येत नाही. त्रिफळा

घृताचा उपयोग ज्यामध्ये दौर्बल्य आलेले असते, शरीरधातू पोषणास आवश्यक असे धात्वग्नि बिघडलेले असतात अशा जीर्णज्वर (Chronic Fever), राजयक्ष्मा (Pulmonary T.B.) यांसारख्या रोगात होत असतो.

त्रिफळाघृताचा आणखी एक गुणविशेष म्हणजे त्याचे डोळ्यावरील कार्यकारित्व. त्रिफळा चक्षुष्य आहे म्हणजेच डोळ्यांना हितकर आहे. हे घृत दृष्टीमांद्य कमी करणारे आहे. अनेक रोग्यांमध्ये डोळ्यांचा नंबर सतत वाढत राहतो. डोळ्यांना रग लागते, डोळ्यातून वारंवार पाणी येते अशा प्रकारची लक्षणेही आढळतात. या सर्व लक्षणांसाठी त्रिफळाघृत हे पोटातून घेण्यासाठी व त्याचबरोबर अंजनासाठीही वापरले जाते. तरुण वयामध्ये लांबचे पाहण्यासाठी नवीनच चष्मा लागला असेल व नंबरही थोडा असेल तर त्रिफळाघृताचे प्रयोगाने चष्मा जाण्याचीही शक्यता असते.

अनेक वेळा विविध कारणांनी दृष्टीसंज्ञा वाहून नेणाऱ्या नाडीमध्ये शोष (Optic Atrophy) उत्पन्न होतो. या अवस्थेमध्ये कोणतीही लाभदायक चिकित्सा नाही असे जरी आधुनिक नेत्रवैद्यकात सांगितले जात असले तरी या अवस्थेत त्रिफळाघृताचा नेत्रबस्ती दिल्याने निश्चितच लाभ मिळतो असे प्रत्यक्षात दिसून येते. नेत्रबस्ती हा एक विशिष्ट उपक्रम असून त्यामध्ये त्रिफळाघृतामध्ये डोळा बुडवून ठेवावा लागतो. नेत्रबस्ती हा तज्ज्ञ वैद्याच्या मार्गदर्शनाखालीच केला पाहिजे याची जाणीव ठेवावयास हवी.

**प्रमाण :** अंजनासाठी ३ ते ५ थेंब

**नेत्रबस्तीसाठी :** ५० मि. ग्रॅम. प्रत्येक वेळी.

**पोटात देण्यासाठी :** १ ते २ चमचे दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## ६६. चंद्रोदयावर्ती

**घटक द्रव्ये :** शंखनाभिचूर्ण, बिब्ब्याचे बी (गोडांबी), हिरडा, मन:शिळ, पिंपळी, मिरे, कोष्ठ, वेखंड.

सर्व द्रव्यांचे चूर्ण एकत्रित करून त्यास गोमूत्राच्या भावना दिल्या जातात व त्यानंतर त्यांच्या लांबट, वातीप्रमाणे दिसणाऱ्या गोळ्या बनविल्या जातात. यांनाच चंद्रोदयावर्ती असे म्हणतात. ही चंद्रोदयावर्ती पाण्यात उगाळून तयार झालेला लेप हा अंजनासाठी (डोळ्यात घालण्यासाठी) वापरला जातो.



चंद्रोदयावर्तीमधील शंखनाभी, मन:शीळ, पिंपळी, मिरे, कोष्ठ, वेखंड ही सर्वच औषधे तीक्ष्ण, उष्ण असून त्यामुळेच या वर्तीचे अंजन केल्यानंतर डोळ्यांची मनस्वी आग होते, डोळ्यातून पाणी वाहू लागते व काही थोडा वेळ तरी रुग्ण अस्वस्थ बनतो. पण या वर्तीचा उपयोग काही नेत्ररोगामध्ये अत्यंत लाभदायक ठरत असल्यानेच हा त्रास होत असूनही या वर्तीचे अंजन व्यवहारात केले जाते.

काही रोग्यामध्ये डोळ्यात खुपऱ्या वाढतात. त्यामुळे डोळे लाल होतात, खुपत राहतात. उजेडही सहन होईनासा होतो. अशा रोगामध्ये अन्य उपचारांचा फायदा होत नसल्यास चंद्रोदयावर्तीचा वापर करावा. त्याचा निश्चितच फायदा होतो व तोही अल्पावधित, असे दिसेल.

ज्या रोग्यांमध्ये डोळ्यास अंधुक दिसू लागते, डोळ्यावर पडदा आल्याचे जाणवू लागते पण वैद्यकीय तपासणीमध्ये मात्र फारसा काही दोष आढळत नाही अशा रोग्यातही चंद्रोदयावर्तीचा लाभदायक प्रयोग केला जातो.

डोळ्यातील व्रण लवकर बरे व्हावेत यासाठीही चंद्रोदयावर्ती वापरणे इष्ट ठरते.

मूर्च्छा, अपस्मार (Epilepsy) यासारख्या रोगामध्ये वेगावस्थेत रोगी लवकर शुद्धीवर यावा म्हणून संज्ञा प्रबोधनासाठी जे त्रासन उपचार केले जातात त्यामध्ये चंद्रोदयावर्तीचे अंजन करणे हाही एक उपाय समाविष्ट आहे. चंद्रोदयावर्तीचे उपयोगाने डोळ्यांची असह्य आग होत असल्यानेच संज्ञाप्रबोधन होऊन रुग्ण लवकर शुद्धीवर येतो.

नेत्ररोगांमध्ये या वर्तीचा उपयोग केल्याने दृष्टी स्वच्छ होते. पौर्णिमेचा चंद्रप्रकाश जसा स्वच्छ, नितळ व शीतल असतो तशी दृष्टी प्राप्त होत असल्यानेच या वर्तीस चंद्रोदयावर्ती असे सुयोग्य नाव मिळालेले आहे.

**प्रमाण :** १ ते २ वळसे पाण्यात उगाळून अंजन करणे.

❑❑❑

## ६७. ब्राह्मी तेल

**घटक द्रव्ये :** ब्राह्मी, तिळाचे तेल.

ब्राह्मी ही वनस्पती शीत स्वभावाची व मानसदोषांवर कार्यकारी म्हणून ओळखली जाते. पण या सर्वांपेक्षाही ब्राह्मीचा आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे ब्राह्मी उत्तम केश्य आहे. ब्राह्मी तेल डोक्यास नियमित लावल्याने केस चांगले वाढतात, लांब

होतात, दाटही होतात. केस गळणे, केसात कोंडा होणे हेही टळते. ब्राह्मी तेल वापरल्याने अकाली केस पिकणेही टाळता येते.

ब्राह्मी तेलाने डोळ्याची होणारी आग कमी होते, मनाला शांतता मिळून झोपही चांगली येते. यासाठी ब्राह्मी तेलाने शिरःप्रदेशी मर्दन करणे आवश्यक आहे. शांत झोपेने अन्नाचे पचन चांगले होते. शांत झोप ही बलवर्धक, स्वास्थ्यरक्षक, आयुवर्धक व उत्साह मिळवून देणारी असते. अलीकडे दगदगीच्या, अस्थिर, अशांत जीवनामध्ये शारीरिक रोगांबरोबरच अनेक मानसिक रोग निर्माण होऊन झोपेच्या तक्रारी सांगणारे असंख्य रुग्ण सातत्याने पाहण्यात येतात. किंबहुना शांत झोप म्हणजे काय हेच कित्येकांना समजेनासे झाले आहे. अशा रोग्यांमध्ये ब्राह्मीतेल हे खरोखरीच वरदान ठरते असे म्हणता येईल.

ब्राह्मी तेलाने झोप शांत लागल्यानेच केस गळणे थांबते, केस काळेही राहतात हे खरे. पण याचा अर्थ टक्कल पडले असताना केस पुन्हा येतील किंवा पिकलेले केस पुन्हा काळे होतील असा मात्र नव्हे ही गोष्टही निश्चितच लक्षात घेतली पाहिजे.

**प्रमाण :** डोक्याला लावण्यासाठी- आवश्यकतेनुसार.

❑ ❑ ❑

## ६८. भृंगराज तेल

**घटक द्रव्ये :** माका, तिळाचे तेल.

भृंगराज म्हणजे माका. माका ही वनस्पतीही शीतगुणाची, पित्तशामक म्हणून प्रसिद्ध आहे. माक्याचे तेल हेही ब्राह्मी तेलाप्रमाणेच केश्य म्हणून प्रसिद्ध आहे. माक्याचे तेलानेही केस गळणे थांबते. पिकणेही थांबते. याच्या नित्य वापराने केस चांगले वाढतात, दाटही होतात. ब्राह्मी तेलाप्रमाणेच याही तेलाने झोप चांगली लागते.

भृंगराज व ब्राह्मी तेलाचे गुण बरेचसे समान असल्यानेच अधिक चांगला व निश्चित गुण मिळावा याकरिता बरेच वेळा भृंगराज व ब्राह्मी एकत्रित करून तयार केलेले सिद्ध तेल वापरण्याची पद्धती रूढ आहे.

**प्रमाण :** बाह्य उपचारासाठी- आवश्यकतेनुसार.

❑ ❑ ❑



## ६९. जपाकुसुम तेल

**घटक द्रव्ये :** जास्वंदीची फुले, तिळाचे तेल.

जपा म्हणजे जास्वंदी. लाल जास्वंदीच्या फुलांनी सिद्ध केलेले तेल म्हणजे जपाकुसुम तेल होय.

भृंगराज व ब्राह्मी तेलांप्रमाणेच हे तेलही एक केश्य असे तेल आहे. डोक्यास नित्य लावल्याने केस गळणे, केस पिकणे, डोक्यात कोंडा होणे इत्यादी लक्षणे निश्चयाने कमी होतात. या तेलाचा कायम उपयोग केल्याने केस लांबसडक, दाट व मृदु बनतात. झोप नीट न येणे, डोळ्याची आग होणे, हातपायांची जळजळ, डोके जड होणे ही लक्षणेही या तेलाचे उपयोगाने नाहीशी होतात.

डोक्यास टक्कल पडले असता व केस पिकले असता या तेलाचा अजिबात उपयोग होत नाही. तर केस गळू नयेत, अकाली पिकू नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून याही तेलाचा उपयोग होतो हे लक्षात घ्यावयास हवे.

**प्रमाण :** दररोज डोक्यास लावण्यासाठी- आवश्यकतेनुसार.

❑ ❑ ❑

## ७०. दारुषट्क लेप

**घटक द्रव्ये :** देवदार, वेखंड, कोष्ठ, बडिशेप, हिंग, सैंधव.

लेपासाठी म्हणजेच केवल बाह्य उपचारासाठीच वापरल्या जाणाऱ्या या दारुषट्क लेपांमध्ये देवदार व इतर मिळून एकंदर ६ द्रव्यांची चूर्णे एकत्रित केलेली असतात.

दारुषट्क लेपातील सर्वच औषधी घटक द्रव्ये ही उष्ण स्वभावाची, स्रोतोरोध दूर करणारी व वातानुलोमन करणारी आहेत. वातानुलोमन म्हणजे वायुची प्राकृत गती कायम ठेवणे वा प्रतिलोम झाली असेल तर प्राकृत गती प्राप्त करून देणे होय.

याचा उपयोग प्रामुख्याने उदरातील विविध प्रकारच्या रोगांमध्ये केला जातो. आध्मान हा त्यातील एक प्रधान रोग. आध्मान म्हणजे पोटात गॅसेस होणे, वायूची संचिती होणे (Tympanitis). या आध्मानामुळे पोटास तडस लागते, उदरशूल (Abdominal Pain) उत्पन्न होतो व रुग्ण बेचैन होतो.

बद्धोदर, अजीर्ण, अग्निमांद्य, प्रवाहिका, उदावर्त अशा अनेक रोगात आढळणाऱ्या या आध्मानावर दारुषट्काचा लेप करणे आवश्यक ठरते. उदर प्रदेशी याचा लेप

केल्याने वातानुलोमन चांगल्या प्रकारे होते. वातानुलोमनामुळेच उदरस्थ वायूचे योग्य ते संचरण सुरू झाल्याने तडस कमी होते, पोटात दुखणेही थांबते. दारुषट्क लेपाचा इष्ट तो लाभ होण्यासाठी दारुषट्क चूर्ण पाण्यात मिसळून त्याचा गरमगरम लेप केला जातो व नंतर शेकले जाते. गार लेपाचा प्रयोग केला तर मात्र वातानुलोमनाची क्रिया होण्याऐवजी स्तंभन अधिक प्रमाणात होऊन सर्वच लक्षणे वाढण्याचीच शक्यता असते. यासाठीच लेप गार नाही ना याची प्रथमतः खात्री करून घेतलीच पाहिजे.

दारुषट्क लेप हा उत्तम कार्यकारी आहेच पण त्याचे अभावी फक्त हिंग + मीठ यांचा गरम लेप पोटावर लावल्यासही काही वेळा अपेक्षित तो गुण आढळून येत असतो.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी- आवश्यकतेनुसार.

❑❑❑

## ७१. दशांग लेप

**घटक द्रव्ये :** शिरीष, तगर, जेष्ठमध, चंदन, वेलची, जटामांसी, हळद, दारुहळद, कोष्ठ, वाळा.

एकंदर दहा औषधी द्रव्ये एकत्रित करून बनविला जाणारा व म्हणूनच दशांग लेप या नावाने प्रसिद्ध असणारा हा लेप आहे.

यातील सर्वच द्रव्ये ही उत्कृष्ट वातनाशक व वेदनाप्रशमन करणारी आहेत. शिरीष, तगर, चंदन, वेलची, जटामांसी, वाळा ही सर्व सुगंधी द्रव्ये असून त्यामुळेच ती वातानुलोमन करणारी आहेत.

दशांग लेपाचा उपयोग आघातजन्य शोथावर (मार लागल्याने आलेल्या सुजेवर) चांगला होतो. हळद, दारुहळद, कोष्ठ, तगर, चंदन यासारख्या यातील घटक द्रव्यांमुळे एकेठिकाणी साकळलेल्या रक्ताचे विलयन होते व त्यामुळेही सूज लवकर कमी होत असते. मार लागल्याने जर थोडीफार जखम झाली असेल तर तीही जेष्ठमध, हळद यासारख्या द्रव्यांमुळे भरून येते.

ज्या रोगात सूज येणे हे प्रधान लक्षण असते अशा कफज शोथ (Nephritis), हृद्रोग (C. C. F.), जलोदर (Ascitis) इत्यादी अन्य विकारातही या लेपाचा उत्तम लाभ आढळून येतो.

दशांग लेप हा लेपकल्प असला तरी याचा उपयोग वरील सर्व रोगांत पोटात



देण्यासाठीही करणे लाभदायक ठरते. बाह्योपचाराबरोबरच अभ्यंतर उपचार केल्याने शोथ व वेदना निश्चयाने नाहीशा होतात.

दशांग लेप हा चूर्ण स्वरूपात उपलब्ध असतो. हे चूर्ण पाण्यात मिसळून तयार होणाऱ्या कल्काचा दाटसर लेप लावावा. लेप लावताना तो गरम करूनच वापरावा. कधीही गार लेप लावू नये. गार लेप लावल्यास फायदा होण्याऐवजी वेदना अधिकच वाढतील. एकदा पाण्यात मिसळून तयार केलेले लेपद्रव्य पुनः पुन्हा वापरू नये. प्रत्येक वेळी नवीन लेप लावावा. सकाळचा लेप सायंकाळी व सायंकाळचा लेप सकाळी धुऊन काढणे आवश्यक आहे. पहिला लेप काढल्याशिवाय दुसरा लेप लावू नये.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी- आवश्यकतेनुसार दिवसातून २ वेळा.
पोटात देण्यासाठी २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ७२. लशुनादिलेप

**घटक द्रव्ये :** हळद, मीठ, लसूण.

लसूण, हळद व मीठ एकत्रितपणे बारीक वाटून गरम करून त्यांचा लेपासाठी प्रयोग केला जातो. ही तीनही द्रव्ये उष्णस्वभावाची, वातनाशक असल्याने वेदना कमी करणारी आहेत.

कोणत्याही ठिकाणी असणारी वेदना ही सामान्यतः शीत व रुक्ष गुणाने वात वाढल्याने निर्माण झालेली असते. यासाठीच कोठेही दुखत असताना तेल लावून चोळणे व शेकणे हे रुक्ष व शीत गुणाच्या विरोधी उपक्रम व्यवहारात केले जातात. लसूण ही स्निग्ध व उष्ण असल्यानेच वाताचा उपशम होतो व वेदना नाहिशी होते. विशेषतः आघातजन्य शोथासाठी (मार लागल्याने येणारी सूज) या लेपाचा अधिक चांगला उपयोग होतो. या लेपाने एके ठिकाणी साकळलेल्या रक्ताचे विलयन होते व त्या स्थानाचा रक्तपुरवठाही वाढतो व त्यामुळे वेदनाप्रशमन होते व सूजही कमी होते.

या लेपात असणारी हळद जंतुघ्न (Antiseptic) आहे. ती व्रणरोपकही आहे. आघाताने जर काही लहान-मोठ्या जखमा निर्माण झाल्या असतील तर त्या दुष्ट (Septic) होऊ नयेत व लवकर भरून याव्यात याकरिता हळदीचा उपयोग होतो.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी- आवश्यकतेनुसार.

❑❑❑

## ७३. पाददारीमलम

**घटक द्रव्ये :** सोनकाव, चंदन, संगजीरे, टंकण, गंधक, राळ, खोबरेलतेल, मेण.

वरील सर्व द्रव्ये एकत्रित करून, शिजवून मलम तयार केले जाते.

पाददारी म्हणजे पायांना भेगा पडणे, यालाच व्यावहारिक भाषेमध्ये 'जळवात' असेही म्हणतात. या रोगामध्ये तळपायाला भेगा पडतात, असह्य वेदनेने रुग्ण हैराण होतो व चालवेनासे होते. काही वेळा या भेगातून रक्तस्रावही होतो. अशा सर्व अवस्थेमध्ये लगेच सर्व लक्षणे कमी होण्यासाठी पाददारी मलमासारखे अन्य औषध नाही.

पाददारी मलमातील गेरु, संगजीरे, मेण, खोबरेल ही द्रव्ये तळपायाच्या ठिकाणी आलेली रुक्षता, खरखरीतपणा कमी करतात. त्या ठिकाणी असणारी वेदनाही कमी होते. चंदन, टंकण, गंधक ही घटकद्रव्ये यासाठी उपयोगी पडतात. या सर्वांबरोबरच राळ, मेण, चंदन यासारख्या घटकांकडून भेगा भरून आणण्याचे कार्य घडत असते. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे असह्य वेदनायुक्त पाददारीचा संपूर्ण विनाश होय.

पाददारीप्रमाणेच अनेक व्यक्तींमध्ये, विशेषत: नेहमी पाण्यात वावरणाऱ्या लोकांमध्ये पायांच्या बोटामध्ये चिखल्या उत्पन्न होतात. यासाठीही पाददारी मलमाचा यशस्वीरीत्या वापर करता येतो.

हात व पाय यांच्या तळव्यांची कातडी अनेक वेळा जाऊ लागते. तेथील त्वचा रुक्ष, कोरडी बनते. यामागील कारणपरंपरा बरेच वेळा लक्षात येत नाही. अशा रुग्णांमध्येही पाददारी मलमाचा उपयोग लाभदायक ठरतो.

**प्रमाण :** बाह्योपचारासाठी- आवश्यकतेनुसार.

❑ ❑ ❑



## अकारानुक्रमे कल्पांची यादी


| क्र. | नाव | पृष्ठ क्र. | क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | अगस्त्यहरीतकी अवलेह | ११ | ३७ | पंचगव्य घृत | ३५ |
| २ | अणु तैल | ६० | ३८ | पाददारी मलम | ६९ |
| ३ | अभयामलकी अवलेह | १० | ३९ | पारिभद्र तेल | ४७ |
| ४ | अमृतभल्लातकावलेह | १३ | ४० | पिण्ड तेल | ५४ |
| ५ | अश्वगंधादि घृत | ९ | ४१ | पूगपाक | १२ |
| ६ | अश्वगंधावलेह | ८ | ४२ | फल घृत | २१ |
| ७ | आमलकी अवलेह | ६ | ४३ | बला तेल | ३७ |
| ८ | आर्द्रकावलेह | २९ | ४४ | बिल्व तेल | ६० |
| ९ | इरिमेदादि तेल | ५८ | ४५ | बिल्वावलेह | १८ |
| १० | उदुंबरावलेह | १५ | ४६ | ब्राह्मी तेल | ६४ |
| ११ | एरंड स्नेह-तेल | २० | ४७ | ब्राह्मीप्राश | ३२ |
| १२ | कर्णशूलहर तेल | ५९ | ४८ | बृहन्मरिच्यादि तेल | ५२ |
| १३ | कर्णस्रावहर तेल | ५९ | ४९ | भल्लातक तैल | २४ |
| १४ | कल्याणक घृत | ३४ | ५० | भल्लातकावलेह | २६ |
| १५ | कंटकार्यावलेह | २६ | ५१ | भांर्गी अवलेह | २७ |
| १६ | कंदर्पपाक | १६ | ५२ | भृंगराज तेल | ६५ |
| १७ | कुटजावलेह | १७ | ५३ | मरिच्यादि तेल | ५० |
| १८ | कुष्मांडावलेह | ९ | ५४ | महातिक्तक घृत | ३६ |
| १९ | गुलकंद | ७ | ५५ | महामाष तैल | ४४ |
| २० | चंदनबलालाक्षादि तेल | ३९ | ५६ | लशूनपाक | १४ |
| २१ | चंदनादि तेल | ४१ | ५७ | लशुनादि लेप | ६८ |
| २२ | चंद्रोदयावर्ति | ६३ | ५८ | लाक्षादि तेल | ५३ |
| २३ | च्यवनप्राश | ४ | ५९ | वचा तेल | ५७ |
| २४ | चुक्र तैल | १९ | ६० | वासा घृत | २९ |
| २५ | चोपचिनीपाक | २३ | ६१ | वासावलेह | २८ |
| २६ | जपाकुसुम तेल | ६६ | ६२ | विषगर्भ तेल | ५५ |
| २७ | जात्यादि घृत | ४९ | ६३ | व्रणरोपण तेल | ४६ |

| क्र. | नाव | पृष्ठ क्र. | क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| २८ | जात्यादि तेल | ४८ | ६५ | शतधौत घृत | ४९ |
| २९ | त्रिफळा घृत | ६२ | ६६ | शतावरी घृत | २२ |
| ३० | दशांग लेप | ६७ | ६७ | शंखपुष्पी अवलेह | ३२ |
| ३१ | दाडिमादि घृत | ३१ | ६८ | षट्पल घृत | ३७ |
| ३२ | दाडिमावलेह | ३० | ६९ | षड्बिंदु तैल. | ६२ |
| ३३ | दारूषट्क लेप | ६६ | ७० | सहचर तेल | ५६ |
| ३४ | धात्री रसायन | ५ | ७१ | सारस्वत घृत | ३३ |
| ३५ | नारायण तेल | ४२ | ७२ | हरताळ मिश्रण | ५२ |
| ३६ | पद्मकादि तेल | ४० | ७३ | शतपाकीक्षीरबला तैल | ३८ |
| ६४ | व्रणशोधन तेल | ४५ | | | |


❑ ❑ ❑



**रोगानुरुप औषधे**

अग्निमांद्य - तिक्तकघृत, भांर्गी अवलेह, लशुनपाक, षट्पलघृत.

अतिसार - कुटजावलेह, बिल्वावलेह.

अर्धांगवात - अमृतभल्लातकावलेह, एरंडतेल, नारायणतेल, बलातेल, महामाषतेल.

अपस्मार - अभयामलकीलेह, कल्याणकघृत, चोपचिनीपाक, चंद्रोदयावर्ति, पंचगव्यघृत, ब्राह्मीप्राश, लाक्ष्यादितेल, बलातेल, शंखपुष्पी अवलेह, सारस्वतघृत.

अम्लपित्त - तिक्तकघृत, मोरावळा.

अर्श - कंदर्पपाक, भल्लातकतेल, षट्पलघृत.

आध्मान - दारूषट्कलेप, बिल्वावलेह.

आमवात - एरंडतेल, चोपचिनीपाक, पिंडतेल, लशूनपाक, विषगर्भतेल.

आमाशयगतव्रण - पद्मकादितेल.

उचकी - कंटकार्यावलेह.

उन्माद - अभयामलकीलेह, कल्याणकघृत, चोपचिनीपाक, ब्रह्मीप्राश, लाक्ष्यादितेल, शंखपुष्पी अवलेह, सारस्वतघृत.

उपदंश - अमृत भल्लातकावलेह, चोपचिनीपाक.

उर:शूल - अगस्त्यहरीतकी अवलेह, कंटकार्यावलेह, लाक्ष्यादितेल.

उदर - एरंडतेल.

उदरशूल - तिक्तकघृत, दारूषट्कलेप, लशूनपाक, लाक्ष्यादितेल, शतावरीघृत.

कफष्ठीवन - अगस्त्यहरीतकी अवलेह.

कर्णबाधिर्य - बिल्वतेल.

कर्णशूल - कर्णशूलहरतेल, महामाषतेल.

कर्णस्राव - कर्णस्रावहरतेल.

कक्षा - शतधौतघृत.

कंडू - पारिभद्रतेल, बृहन्मरिच्यादितेल, मरिच्यादितेल, लाक्ष्यादितेल, व्रणशोधनतेल, सहचरतेल.

कामला - एरंडतेल, कंदर्पपाक.

काविळ - एरंडतेल, कंदर्पपाक.

कास - अगस्त्यहरीतकी अवलेह, आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, च्यवनप्राश, लाक्ष्यादितेल, वासाघृत, वासावलेह.

किटीभ - बृहन्मरिच्यादितेल, मरिच्यादितेल.

कुष्ठ - अमृतभल्लातकावलेह.

केस पिकणे - जपाकुसुमतेल, ब्राह्मीतेल, भृंगराजतेल.

केस गळणे - जपाकुसुमतेल, ब्राह्मीतेल, भृंगराजतेल.

कोड - बृहन्मरिच्यादितेल, मरिच्यादितेल.

कृमि - एरंडतेल, दाडिमावलेह.

क्लैब्य - चोपचिनीपाक.

खरूज - बृहन्मरिच्यादितेल, मरिच्यादितेल, व्रणशोधनतेल, सहचरतेल, हरताळमिश्रण.

खोकला - अगस्त्यहरीतकी अवलेह, आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, च्यवनप्राश, लाक्ष्यादितेल, वासाघृत, वासावलेह.

गर्भवृद्धिकर - फलघृत, शतावरीघृत.

गुदभ्रंश - कंदर्पपाक, चुक्रतेल.

गुल्म - भार्गीअवलेह, षट्पलघृत.

ग्रहणी - अगस्त्यहरीतकी अवलेह, कुटजावलेह, बिल्वावलेह.

गृध्रसी - भल्लातकतेल, लशुनपाक, विषगर्भतेल.

जलपार्श्व - अगस्त्यहरीतकी अवलेह, आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, च्यवनप्राश, लशुनपाक.

जीर्णज्वर - तिक्तकघृत, त्रिफळाघृत, पारिभद्रतेल.

ज्वर - कल्याणकघृत, लाक्ष्यादितेल.

तमकश्वास - आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, च्यवनप्राश, दाडिमावलेह, धात्रीरसायन, नारायणतेल, लशूनपाक, वासावलेह.

तोंड येणे - इरिमेदादितेल, जात्यादितेल.

दग्धव्रण - जात्यादितेल, जात्यादिघृत, शतधौतघृत.

दमा - आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, च्यवनप्राश, दाडिमावलेह, धात्रीरसायन, नारायणतेल, लशूनपाक, वासावलेह.

दंतशूल - इरिमेदादितेल.

दाह - उदुंबरावलेह, गुलकंद, चंदनादितेल, जात्यादितेल, परिभद्रतेल, शतधौतघृत.

दुष्टव्रण - जात्यादिघृत, व्रणशोधनतेल.

दृष्टीदोष - चंद्रोयदयावर्ती, त्रिफळा घृत.



धूपणी - पूगपाक.

नायटा - बृहन्मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल, हरताळ मिश्रण.

नासागत रक्तपित्त - चंदनादि तेल, पद्मकादि तेल, वासाघृत, षड्बिंदू तेल.

पक्षाघात - अमृतभल्लातकावलेह, एरंड तेल, नारायण तेल, बला तेल, महामाष तेल.

पाददारी - पाददारी मलम.

पामा - बृहन मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल, व्रणशोधन तेल, सहचर तेल.

पांडू - तिक्तक घृत, दाडिमादि घृत, दाडिमावलेह.

पार्श्वशूल - कंटकार्यावलेह.

प्रतिश्याय - अगस्त्यहरीतकीअवलेह, अणुतेल, आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, भार्गी अवलेह, वचा तेल, षड्बिंदु तेल.

प्रवाहिका - कुटजावलेह, चंदनबलालाक्षादि तेल, पद्मकादि तेल, पूगपाक, बिल्वावलेह, लाक्षादी तेल.

फिरंग - अमृतभल्लातकावलेह, चोपचिनी पाक.

बल्य - कुष्मांडावलेह, च्यवनप्राश, धात्रीरसायन, नारायण तेल, बला तेल शतपाकी बला तेल.

मधुमेह - पूगपाक.

मनोदोष - अभयामलकीलेह, ब्राह्मीप्राश.

महाकुष्ठ - अमृतभल्लातकावलेह.

मांसगतवात - महामाष तेल, विषगर्भ तेल.

मांसक्षय - नारायण तेल, महामाष तेल, शतपाकी बला तेल.

मूत्रल - उदुंबरावलेह, चंदनादि तेल.

मूत्रकृच्छ्र - उदुंबरावलेह, कल्याणक घृत, चंदनादि तेल.

रक्तपित्त - गुलकंद, पद्मकादि तेल, वासाघृत, वासावलेह.

रक्तप्रदर - चंदनादि तेल, पद्मकादि तेल, पूगपाक.

रक्तार्श - कुटजावलेह, चंदनबलालाक्षादि तेल, पद्मकादि तेल.

रक्तष्ठीवन - चंदनादि तेल, च्यवनप्राश, वासाघृत, वासावलेह.

रसायन - अश्वगंधावलेह, च्यवनप्राश, धात्रीरसायन.

राजयक्ष्मा - अगस्त्यहरीतकीअवलेह, अश्वगंधावलेह, कंदर्पपाक, त्रिफळाघृत, वासाघृत, वासावलेह.

वातकफज्वर - लशूनपाक.

वातरक्त - कल्याणक घृत, चोपचिनी पाक, पिंड तेल, लशुनपाक, विषगर्भ तेल.

विचर्चिका - बृहन् मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल, व्रणशोधन तेल, सहचर तेल.

विश्वाची - भल्लातक तेल, लशुनपाक, विषगर्भ तेल.

शिर:शूल - अणु तेल, वचा तेल, षड्बिंदु तेल.

शुक्रक्षय - अश्वगंधावलेह.

शोथ - दशांग लेप, दाडिमावलेह, लशुनादि लेप.

श्वित्र - बृहन मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल.

श्वेतप्रदर - पूगपाक.

सदाहमूत्र प्रवृत्ति : उदुंबरावलेह, कल्याणक घृत, चंदनादि तेल, चोपचिनी पाक.

सपूय दंतवेष्ट - इरिमेदादि तेल.

सरक्त दंतवेष्ट - इरिमेदादि तेल.

सरक्त मूत्रप्रवृत्ति - चंदनादि तेल, पद्मकादि तेल.

संधिवात - पिंड तेल, भल्लातक तेल, लशूनपाक, विषगर्भ तेल.

हृद्रोग - अश्वगंधावलेह, आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, दाडिमावलेह.

Anaemia - तिक्तक घृत, दाडिमादि घृत, दाडिमावलेह.

Bronchial neuritis - भल्लातक तेल, लशूनपाक, विषगर्भ तेल.

Brain Tonic - धात्रीरसायन.

Bronachial Asthama - आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, च्यवनप्राश, दाडिमावलेह, धात्रिरसायन, नारायण तेल, लशूनपाक, वासावलेह.

Bronchitis - च्यवनप्राश, भांर्गी अवलेह.

Burning Micturition - उदुंबरावलेह, चोपचिनी पाक.

Burning Sensation - उदुंबरावलेह, गुलकंद, चंदनादि तेल, जात्यादि तेल, पारिभद्र तेल, शतधौत घृत.

C. C. F. - अश्वगंधावलेह, आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, दाडिमावलेह.

Colic - लशुनपाक.

Chronic Colitis - कुटजावलेह, बिल्वावलेह.

Diabetes Insipidus - पूगपाक.

Diabetes Mellitis - पूगपाक.



Diarrhoea - कुटजावलेह, बिल्वावलेह.

Diuretic - उदुंबरावलेह, चंदनादि तेल.

Dry Pleurecy - कंटकार्यावलेह.

Dysentry - कुटजावलेह, चंदनबलालाक्षादि तेल, पद्मकादि तेल, पूगपाक, बिल्वावलेह, लाक्षादि तेल.

Eczima - व्रणशोधन तेल, सहचर तेल.

Eiosinophelia - भल्लातक तेल.

Epilepsy - अभयामलकीलेह, कल्याणक घृत, चोपचिनी पाक, चंद्रोदयावर्ति, - पंचगव्य घृत, ब्राह्मीप्राश, लाक्षादि तेल, शंखपुष्पी अवलेह, सारस्वत घृत.

Epistaxis - चंदनादि तेल, पद्मकादि तेल, वासाघृत, षड्बिंदु तेल.

Fevers - कल्याणक घृत, तिक्तक घृत, त्रिफळा घृत.

Gonorrhoea - चोपचिनी पाक.

Gout - कल्याणक घृत, चोपचिनी पाक, पिंडतेल, लशूनपाक, विषगर्भ तेल.

Heamatemesis - चंदनादि तेल, पद्मकादि तेल.

Heamoptesis - चंदनादि तेल, च्यवनप्राश, वासाघृत, वासावलेह.

Headache - अणु तेल, वचा तेल, षड्बिंदु तेल.

Hemiplegia - अमृतभल्लातकावलेह, एरंड तेल, नारायण तेल, बला तेल, महामाष तेल.

Herpis-Zoster - शतधौत घृत.

Hyperpyrexia - लाक्षादि तेल.

Influenza - लशुनपाक.

Jaundice - कंदर्पपाक.

Leucoderma - बृहन्मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल.

Leprosy - अमृतभल्लातकावलेह.

Leucorrhea - पूगपाक.

Oedema - दशांग लेप, दाडिमावलेह, लशुनादि लेप.

Optic Atrophy - त्रिफळा घृत.

Pain in chest - अगस्त्यहरीतकीअवलेह, कंटकार्यावलेह, लाक्षादि तेल.

Painful Micturition - उदुंबरावलेह, कल्याणक घृत.

Peptic Ucler - पद्मकादि तेल.

Piles - कंदर्पपाक, कुटजावलेह, भल्लातक तेल, चंदनबलालाक्षादि तेल.

Pleurecy with Effussion - अगस्त्यहरीतकीअवलेह, आर्द्रकावलेह, कंटकार्यावलेह, च्यवनप्राश, लशूनपाक.

Polyuria - पूगपाक.

Prolapse of the Rectum - कंदर्पपाक, चुक्रतेल.

Pruritus - पारिभद्र तेल, बृहन् मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल, लाक्षादि तेल, व्रणशोधन तेल, सहचर तेल.

Psoriasis - बृहन् मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल.

Purgative - एरंड तेल.

Rhinitis - अगस्त्य हरीतकी अवलेह, अणु तेल, आर्द्रकावलेह, कंटकार्यावळे, भांर्गी अवलेह, वचा तेल, षड्बिंदु तेल.

Rhaumatic Arthritis - एरंड तेल, चोपचिनी पाक, पिंड तेल, लशूनपाक, विषगर्भ तेल.

Ring-worm - बृहन् मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल, हरताळमिश्रण.

Scabis - बृहन् मरिच्यादि तेल, मरिच्यादि तेल, शोधन तेल, सहचर तेल, हरताळ मिश्रण.

Scantiy Urination - उदुंबरावलेह, कल्याणक घृत.

Sciatica - भल्लातक तेल, लशूनपाक, विषगर्भ तेल.

Septic Wounds - जात्यादि घृत, पारिभद्र तेल, व्रणशोधन तेल.

Sexual Debility - अश्वगंधावलेह, उदुंबरावलेह, चोपचिनी पाक.

Sprue - अगस्त्यहरीतकी अवलेह, कुटजावलेह, बिल्वावलेह.

Syphilis - चोपचिनी पाक.

Tonics - कुष्मांडावलेह, च्यवनप्राश, धात्रीरसायन.

Tuberculosis - अगस्त्य हरीतकी अवलेह, अस्वगंधावलेह, कंदर्पपाक, त्रिफळा घृत, वासाघृत, वासावलेह.

Unhealing Ulcers - शतधौत घृत.

Wasting of the Muscles - नारायण तेल, बला तेल, महामाष तेल, शतपाकी बला तेल.

❑❑❑

वैद्य य. गो. जोशी (G.F.A.M., H.P.A.) यांनी अनेक जबाबदारीच्या पदांवर कामे केली आहेत.

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे व आयुर्वेद महाविद्यालय हडपसर येथे प्राचार्य, प्राध्यापक व कायचिकित्सा विभागप्रमुख, मानद चिकित्सक-साने गुरुजी रुग्णालय-हडपसर, शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेदीय रुग्णालय, वै. पुरुषोत्तम शास्त्री नानल रुग्णालय, ब्लाईंड रिलीफ असोसिएशन नेत्र रुग्णालय, वसई इत्यादी मान्यवर रुग्णालयांत सेवा केली आहे.

आयुर्वेदाच्या सिद्धांताचा नवीन दृष्टीकोनातून विचार, आयुर्वेद शास्त्राचा प्रत्यक्षात यशस्वीपणे उपयोग करण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास, सूत्ररूप ग्रंथोक्त ज्ञानाचा प्रत्यक्षरूप उपयोग करून आयुर्वेदीय विषय निपुणतेने, सुलभसाध्य पद्धतीने शिकविण्याची हातोटी.

विद्यार्थी तसेच सर्वसामान्य व्यक्तींना आयुर्वेदाची यथायोग्य माहिती देवून त्याबद्दलचे गैरसमज दूर करून आदरभावना निर्माण करण्याचे प्रयत्न.

अनेक व्याख्याने, चर्चासत्रे, चिकित्साशिबिरांचे आयोजन.

विविध रुग्णालयातील कामकाजाप्रमाणेच खाजगी आयुर्वेदीय व्यवसाय.

कायचिकित्सा, आयुर्वेदीय पंचकर्म विज्ञान, शारीरक्रिया विज्ञान, शारीर क्रिया प्रात्याक्षिक, रोगविज्ञान-विकृतीविज्ञान, रोगावस्था, गुटीवटी, चूर्णे, आसव अरिष्ट काढे, भस्म पिष्टी रसायनकल्प, घृततैल अवलेह-मलम, ऋतुचर्या, साधे उपाय सोपे उपाय, माझं सोनुलं, यशवंत चिकित्सा, सद्य:फलदायी व आत्ययिक चिकित्सा, उदरभरण नोहे, चरक संहिता-यशवंत टीका भाग १ व २ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत.



Jay O. Savla

पुणे विद्यापिठांतर्गत बी. ए. एम्. एस्. च्या अभ्यासक्रमातील
'काय-चिकित्सा' या विषयासाठी मान्यत्याप्राप्त संदर्भ ग्रंथ

# आसव अरिष्ट काढे


**लेखक -**

**प्रा. वैद्य यशवंत गोविंद जोशी**

जी.एफ्.ए.एम्., एच्.पी.ए.

**माजी प्राचार्य आणि प्राध्यापक, कायचिकित्सा विभाग**

आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे

**- मानद चिकित्सक -**

सानेगुरूजी रुग्णालय, हडपसर

शेठ ताराचंद रामनाथ रुग्णालय, पुणे



**पुणे साहित्य वितरण**

ASAVA ARISHTA KADHE (MARATHI)
VAIDYA Y. G. JOSHI

❑ **प्रकाशक**
सौ. संपदा श्याम कोपर्डेकर
पुणे साहित्य वितरण
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

❑ **© वैद्य य. गो. जोशी**

❑ प्रथम आवृत्ती : १९७९
द्वितीय आवृत्ती : १९८५
तृतीय आवृत्ती : १९९६
चौथी आवृत्ती : १५ ऑगस्ट १९९९
पाचवी आवृत्ती : ३० सप्टेंबर २००८
सहावी आवृत्ती : ४ नोव्हेंबर २०१३

❑ **मुद्रणस्थळ**
मधुसूदन घळसासी
एम. आर. ॲण्ड को.
१५५२, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

❑ **मूल्य ४५ रुपये**

# अनुक्रमणिका

| क्र. | नाव | पृष्ठ. क्र. |
|---|---|---|
| | आसव, अरिष्ट व काढे यांविषयी थोडेसे | ४ |
| १. | कुमारीआसव | ७ |
| २. | रोहितकारिष्ट | ९ |
| ३. | मंजिष्ठादि काढा | १० |
| ४. | महामंजिष्ठादि काढा | ११ |
| ५. | खदिरारिष्ट | ११ |
| ६. | सारिवाद्यासव | १२ |
| ७. | उशीरासव | १४ |
| ८. | चंदनासव | १५ |
| ९. | अरविंदासव | १६ |
| १०. | दुरालभादि काढा -धमासा काढा | १७ |
| ११. | कुटजारिष्ट | १८ |
| १२. | बब्बुलाद्यारिष्ट | १९ |
| १३. | जीरकाद्यारिष्ट | २० |
| १४. | पंचकोलासव | २१ |
| १५. | अभयारिष्ट | २२ |
| १६. | अमृतारिष्ट | २३ |
| १७. | तिक्तपंचक काढा | २४ |
| १८. | परिपाठादि काढा -पर्पटादि काढा | २६ |
| १९. | महासुदर्शन काढा | २७ |
| २०. | द्राक्षासव | २८ |
| २१. | विडंगारिष्ट | २९ |
| २२. | विडंगासव | ३० |
| २३. | दशमूल काढा | ३१ |
| २४. | दशमूलारिष्ट | ३२ |
| २५. | देवदार्व्यादि काढा -दार्व्यादि काढा | ३३ |
| २६. | रास्नापंचक | ३४ |
| २७. | रास्नासप्तक काढा | ३५ |
| २८. | महारास्नादि काढा | ३६ |
| २९. | भल्लातकादि काढा | ३७ |
| ३०. | भल्लातकासव | ३८ |
| ३१. | पुनर्नवादि काढा | ४० |
| ३२. | पुनर्नवासव | ४१ |
| ३३. | वरुणादि काढा | ४२ |
| ३४. | कनकासव | ४३ |
| ३५. | वासकासव | ४४ |
| ३६. | वासादि काढा | ४५ |
| ३७. | असनादि काढा | ४६ |
| ३८. | जम्ब्वासव | ४७ |
| ३९. | अशोकारिष्ट | ४८ |
| ४०. | लोध्रासव | ४९ |
| ४१. | बाळंतकाढा नं. १ | ५० |
| ४२. | बाळंतकाढा नं. २ | ५१ |
| ४३. | बाळंतकाढा नं. ३ | ५२ |
| ४४. | अर्जुनारिष्ट-पार्थाद्यारिष्ट | ५३ |
| ४५. | अश्वगंधारिष्ट | ५३ |
| ४६. | बलारिष्ट | ५५ |
| ४७. | लोहासव | ५६ |
| ४८. | सारस्वतारिष्ट | ५६ |
| | कल्पांची अकारानुक्रमे यादी | ५९ |
| | रोगानुरूप औषधे | ६० |

❑ ❑ ❑

## आसव-अरिष्ट-काढे याविषयी थोडेसे

आयुर्वेद शिक्षणमालेच्या पहिल्या प्रकाशनाद्वारे आपणापुढे 'गुटी वटी' हे पुस्तक सादर केल्यानंतर आता दुसऱ्या भागामध्ये पातळ (द्रव) स्वरूपात वापरल्या जाणाऱ्या औषधीकल्पांची ओळख करून घ्यावयाची आहे.

औषधे वापरण्याच्या ज्या वेगवेगळ्या पद्धती आहेत त्यांपैकी ज्या गोळ्या या स्वरूपात वापरल्या जातात त्यांची माहिती आपण पूर्वी पाहिली आहे. या गोळ्या तयार करताना वनस्पतिद्रव्यांची चूर्णे, काही खनिजपदार्थांची भस्मे व काही प्राणिज द्रव्येही वापरली जातात.

आसव, अरिष्ट आणि काढे मात्र केवळ वनस्पतिजन्य पदार्थांपासून बनविली जातात. यामध्ये खनिजपदार्थांची जोड जवळजवळ नसते. क्वचित प्रसंगी विशिष्ट धातूंच्या भांड्यामध्ये आसवारिष्टे बनविली जातात (उदा. सारस्वतारिष्ट) किंवा काही विशिष्ट धातू आसवारिष्टामध्ये बुडवून ठेवून धातूंचे केवल संस्कार मात्र केले जातात (उदा. कुमारी आसव).

वनस्पतींचा वापर करताना वनस्पती वेगवेगळ्या पद्धतीने वापरली जाते. स्वरस, कल्क वा चूर्ण व काढा या यातील तीन महत्त्वाच्या पद्धती. स्वरस म्हणजे वनस्पतीचा रस काढून त्याचा वापर करणे. औषधी गुणधर्मांच्या दृष्टीने पाहता स्वरस वापरणे ही श्रेष्ठ पद्धती आहे. पण व्यवहारामध्ये मात्र अनेक वेळा रस काढून तो वापरणे अशक्य होते. ताजी, ओली वनस्पती प्रत्येक वेळी हाताशी उपलब्ध असणे अशक्यप्रायच व म्हणूनच इतर पद्धतीने औषध तयार करून वापरावे लागते.

वनस्पती जर वाळलेली असेल तर तिचे चूर्ण करून किंवा अशा वनस्पतीचा काढा करून तो वापरता येतो.

काढा करीत असताना वनस्पती ओली असेल तर बारीक तुकडे करून व वाळलेली असेल तर तिचे भरड चूर्ण करून त्याच्या आठपट पाणी घालून ते उकळविले जाते. घातलेल्या पाण्यापैकी १/४ इतक्या प्रमाणात पाणी उरेल इतके ते आटविले जाते. त्यानंतर गाळून तयार होणारा द्रव वापरतात. हा द्रव म्हणजेच काढा होय. काढा तयार करीत असताना केल्या जाणाऱ्या अग्निसंस्कारामुळे (उकळण्याने)



वनस्पतींमधील बहुतांश सर्व कार्यकारी द्रव्ये ही पाण्यात विरघळतात व तयार होणारे द्रव द्रव्य-काढा यामध्ये वनस्पतींचे गुण येतात. काढा तयार करताना तो मंदाग्नीवर तयार करावा लागतो. यामुळे वनस्पतीमधील सर्व कार्यकारी द्रव्ये पाण्यामध्ये निश्चितपणे उतरू शकतात.

शुष्क किंवा वाळलेल्या वनस्पतीचा काढा वापरणे हे याप्रमाणे सोईचे पडत असले तरी प्रत्येक वेळी किंवा प्रत्येक दिवशी ताजा काढा तयार करून तो वापरावा लागतो. अन्यथा तो काढा खराब होतो, आंबतो, नासतो व अपेक्षित लाभदायक गुण मिळण्याऐवजी काही विषगुणाचे परिणाम शरीरावर होण्याची शक्यता उत्पन्न होते, ही गोष्ट मात्र निश्चितपणे लक्षात ठेवली पाहिजे.

हा दोष टाळण्यासाठी वनस्पतिद्रव्यांपासून औषधीकल्प बनविण्याची आणखी एक पद्धती प्रचारात आली व ती म्हणजे संधानक्रियेद्वारा औषधांची निर्मिती करून त्याचा उपयोग करणे.

औषधी वनस्पतींची चूर्णे पाण्याबरोबर मिसळून किंवा या वनस्पतींचा काढा तयार करून त्यामध्ये गूळ, साखर, मध यांसारखे गोड पदार्थ मिसळून हे तयार होणारे मिश्रण लाकडी, मातीच्या वा धातूच्या भांड्यात तोंड बंद करून एक महिन्यापेक्षा अधिक काळ ठेवून देतात. यामुळे संधानक्रिया (Fermentation) घडते व तयार होणाऱ्या द्रवात मद्य (Alcohol) वा अम्ल (Acid) निर्माण होते. जर मद्यार्कयुक्त किण्व (Alcoholic fermentation) झाले तर तयार होणाऱ्या औषधीकल्पास आसव किंवा अरिष्ट म्हटले जाते. याउलट जर आम्ल किंवा (Acidic fermentation) झाले तर त्यास शुक्त किंवा सिरका (Vinegar) म्हणतात.

वनस्पतींपासून आसवारिष्टे तयार करताना वनस्पतीचे गुण त्यामध्ये उतरतात. औषधीकल्प तयार करताना आसवारिष्टे करून वापरणे हितकारक असते, शुक्त करून नव्हे. किण्वीकरण (Fermentation) करताना मद्यार्कयुक्त किण्व (Alcoholic Fermentation) व्हावे, आम्ल किण्व (Acidic Fermentation) न व्हावे यासाठी आसवारिष्टे तयार करताना त्यात धायटीची फुले मिसळली जातात. धायटीच्या फुलांमध्ये यीस्ट (Yeast) भरपूर प्रमाणात असल्याने मद्यार्कयुक्त किण्व (Alcoholic Fermentation) घडून येते व आसवारिष्टांची निर्मिती होते.

आसव व अरिष्ट यांमध्येही किंचितसा भेद आहे. आसव म्हणजे वनस्पतिद्रव्यांची चूर्णे व पाणी एकत्र करून त्यापासून साखर, गूळ, धायटी वगैरेंच्या मदतीने अल्कोहोलिक फरमेंटेशन घडवून आणले जाते व आसव तयार होते. याउलट अरिष्टामध्ये केवल वनस्पतीचे चूर्ण व पाणी एकत्रित करून वापरण्याऐवजी प्रथमतः त्या वनस्पतीचा काढा करून नंतर त्यात साखर, गूळ, मध, धायटीची फुले वगैरे

मिसळून संधानक्रिया केलेली असते.

सामान्यत: ज्या वनस्पती शीत गुणाच्या, पित्तनाशक अशा असतात त्यांचे आसव बनविले जाते, तर इतर वनस्पतींची अरिष्टे बनविली जातात.

आसवारिष्टांमुळे वनस्पतीचे टिकाऊ कल्प बनविता येतात. वनस्पतिकल्प या पद्धतीने बनविल्याने ते जुने होऊन खराब, टाकाऊ होत नाहीत, तर जितके जुने तितके हे कल्प अधिक गुणकारी बनतात.

काढे हे दररोज ताजे तयार करून वापरावेत असे जरी शास्त्रात म्हटलेले असले तरी आधुनिक प्रगत रसायनशास्त्राच्या मदतीने काढ्यांमध्ये काही रासायनिक पदार्थ अल्प प्रमाणात मिसळून (Preservatives) तयार टिकाऊ काढे बनविले जातात व तेही बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असतात. काढ्यालाच 'क्वाथ' असेही म्हणतात.

आजच्या धावपळीच्या, धकाधकीच्या जीवनामध्ये दररोज ताजी वनस्पती आणून स्वरस काढून घेणे वा दररोज ताजा काढा तयार करून वापरणे प्रत्येक वेळी शक्य होत नाही. यासाठीच या पुस्तकामध्ये केवळ बाजारात सहजपणे उपलब्ध असणारे तयार, टिकाऊ काढे आणि आसवारिष्टे यांच्याबाबतच विचार मांडलेले आहेत.

आसवारिष्टांमध्ये मद्य (Alcohol) थोड्या प्रमाणात का होईना असल्याने ही आसवारिष्टे तीक्ष्ण बनतात व म्हणूनच रिकाम्या पोटी यांचा वापर करणे टाळले पाहिजे व यासाठीच सर्व आसवारिष्टे ही जेवणानंतरच दिली पाहिजेत. तसेच त्यांचे तीक्ष्णत्व कमी करण्यासाठी त्यांमध्ये पाणी मिसळून मगच ती वापरणे श्रेयस्कर ठरते. औषधांच्या प्रमाणाइतकेच त्यात पाणी मिसळून औषध घेतले जाते.

औषधाचे प्रमाण सांगताना किती चमचे औषध घ्यावे हे सांगितले आहे. १ चमचा म्हणजे चहाचा एक चमचा (Tea Spoon) म्हणजे ४ मि. लि. पातळ पदार्थ होतो.

इतक्या प्रस्ताविकानंतर आता प्रत्येक आसवारिष्ट वा काढ्याचा स्वतंत्रपणे विचार करणे शक्य होईल.

❑❑❑



## १. कुमारीआसव

**घटकद्रव्ये :** कोरफडीचा रस, गूळ, हिरड्याचा काढा, मध, धायटीची फुले, जायफळ, लवंग, कंकोळ, जटामांसी, चव्य, चित्रक, जायपत्री, शृंगी, बेहडा, पुष्करमूळ, ताम्रभस्म, लोहभस्म.

कोरफड हे यातील प्रमुख घटकद्रव्य. कोरफडीलाच संस्कृतमध्ये कुमारी म्हणतात. कोरफड किंवा कुमारीपासून बनविलेले आसव म्हणजे कुमारीआसव होय.

कोरफडीचा रस, गूळ व हिरड्यांचा काढा एकत्र करून शिजविला जातो व त्यानंतर त्यात इतर द्रव्ये मिसळून आसव बनविले जाते. धायटीची फुले, मध व गूळ ही आसवासाठी आवश्यक असणारी व संधानक्रिया (Alcoholic fermentation) करण्यास आवश्यक अशी द्रव्ये आहेत.

कुमारीआसव दोन प्रकारचे असते : कुमारीआसव नं. १ व कुमारीआसव नं. ३. कुमारीआसव तयार करीत असताना त्यामध्ये तांब्याचे तुकडे किंवा ताम्रभस्म मिसळले तर त्या ताम्राचे संस्कार आसवावर होतात. ताम्राचे तीक्ष्ण, उष्ण, पित्तनि:सारणाचे गुणधर्म आसवामध्ये उतरतात व आसव हे अधिक तीव्र स्वरूपाचे बनते. अशाप्रकारे ताम्रभस्म मिसळून वा तांब्याचे पत्रे टाकून संस्कारित कुमारीआसव म्हणजे कुमारीआसव नं. १ होय. ताम्राशिवाय अन्य सर्व घटकद्रव्यांचे साहाय्याने बनविलेले ताम्रसंस्कारविरहित असे कुमारीआसव नं. ३ म्हणून गणले जाते.

या प्रकारे कुमारीआसव नं. १ व. नं. ३ बनविले जात असले तरी कुमारीआसव नं. २ मात्र कोठेही वर्णिलेले नाही. बहुधा प्राचीन काळी औषधीकल्प निर्मितीविषयक जे अनेक प्रयोग केले गेले त्यापैकी नं. १ व नं. ३ चे कल्प अधिक उपयुक्त ठरले. पण नं. २ चा प्रायोगिक कल्प मात्र उपयुक्त नाही असे आढळले असेल व म्हणूनच केवल नं. १ व नं. ३ पुढे प्रचिलत राहिले असावेत, असे म्हणता येईल.

कोरफड ही औषधी, अत्यंत कडू असून यकृतावर कार्यकारी असे हे द्रव्य आहे. यकृतातून निर्माण होणारा पित्ताचा स्राव चांगल्या तऱ्हेने निर्माण होणे, त्याचे वहन चांगले होणे व त्यामुळे पर्यायाने पचनशक्ती सुधारणे ही सर्व क्रिया या कोरफडीमुळे घडत असते. चव्य, चित्रकासारख्या तीक्ष्ण, उष्ण गुणात्मक औषधांमुळेही कोरफडीच्या सर्वच गुणधर्मांची वाढ होण्यास साहाय्य होते.

लवंग, जायफळ, जायपत्री, जटामांसी, कंकोळ ही सर्व सुगंधी द्रव्ये आहेत. सुगंधी द्रव्ये ही वातानुलोमन करणारी म्हणजेच वायूची गती प्राकृत राखणारी

आहेत. याचमुळे योग्य पचनासाठी आतड्याची आवश्यक असणारी हालचाल (Peristaltic Movements) उत्तम प्रकारे नियंत्रित करण्याचे कार्य या द्रव्यांकडून घडते. यकृतात निर्माण झालेला पित्तरस आतड्यापर्यंत विनाअडथळा वाहून आणण्याचे, पित्ताचे स्त्रवण उत्तम करण्याचे कार्यासही ही द्रव्ये मदत करीत असतात.

कुमारीआसव हा कल्प याप्रकारे यकृतावर कार्यकारी असल्यानेच यकृताच्या सर्व प्रकारच्या विकारांवर याचा उपयोग होतो. काविळीवरील (Jaundice) एक उत्तम औषध अशी या कल्पाची प्रशस्ती सांगितली जाते.

लहान मुलांमध्ये काही वेळा यकृतदोष निर्माण होऊन यकृताचा आकार वाढतो, काही प्रसंगी पोटात पाणी साठू लागते व जलोराची अवस्था प्राप्त होते (Cirrhosis of Liver). केवळ लहान मुलांमध्येच नव्हे, तर अतिरिक्त मद्यपान किंवा तत्सम कारणांनी मोठ्या व्यक्तींमध्येही वरील अवस्था उत्पन्न होऊ शकते. या अवस्थेतही कुमारीआसव यशस्वीरीत्या वापरले जाते.

यकृतदोषामुळेच अनेक वेळा अजीर्ण उत्पन्न होते. भूक न लागणे, मळमळणे, पोटात दुखणे वा गुबारा धरणे, अस्वस्थता, खाल्लेल्या अन्नाचे योग्य तऱ्हेने पचन न होणे ही सर्व अजीर्णाची लक्षणे आहेत. बऱ्याच कालावधीपर्यंत टिकणाऱ्या या प्रकारच्या अजीर्णासाठी कुमारीआसव वापरणे इष्ट ठरते.

आयुर्वेदीय दृष्टिकोनातून पाहता पोटातील जंत हे अजीर्णामुळे उत्पन्न होत असतात. कुमारीआसवाच्या उपयोगाने अजीर्णाचा नाश होत असल्याने पर्यायाने कृमींचाही (पोटातील जंत) नाश होतो. अर्थात निर्माण झालेले कृमी पडण्यासाठी या कल्पाचा उपयोग नाही. परंतु कृमिघ्न औषधे दिल्याने कृमी (जंत) पडून गेल्यानंतर जर कृमारीआसव सातत्याने एक महिनाभर दिले तर वारंवार उत्पन्न होण्याची जी कृमींची प्रवृत्ती तिला निश्चितच प्रतिबंध करता येतो.

कुमारी किंवा कोरफड हे द्रव्य जसे पित्तनि:सारक म्हणून यकृतावर कार्यकारी आहे. तसेच ते उत्तम कफनाशन करणारेही द्रव्य आहे. यामुळे छातीत दाटलेल्या कफाचे शोषण चांगल्या प्रकारे होते. ज्या खोकल्यामध्ये कासाबरोबर कफ फार पडतो अशा प्रकारच्या खोकल्यावरील हे एक उत्तम औषध आहे.

जलपार्श्व (Pleurecy with Effusion) यामध्ये छातीत फुफ्फुसाच्या बाह्यत्वचेमध्ये द्रवसंचिती होते; याबरोबरच तीव्र स्वरूपाचा ज्वर व खोकला ही लक्षणेही असतात. कुमारीआसवामुळे कफ व द्रवाचे शोषण होत असल्याने प्लुरसीवरील एक उत्तम औषधीकल्प म्हणून कुमारीआसव वापरले जाते.

जलपार्श्वाप्रमाणेच जलोदरामध्येही कुमारीआसव उपयुक्त ठरते. जलोदराच्या उत्पत्तीसाठी अग्निमांद्य हे कारण घडत असते. हे अग्निमांद्य दूर करण्याचे, तसेच



द्रवाचे शोषण करण्याचे कार्य कुमारीआसवाने घडत असते.

या प्रकारे कुमारीआसव हे काविळ (Jaundice), जलोदर (Ascitis), यकृतोदर (Cirrhosis of Liver), अजीर्ण (Chronic Indigesion), जलपार्श्व (Pleurecy with Effusion) इत्यादी रोगांवर उपयुक्त ठरते. पण प्राकृतावस्थेमध्येही, विशेषत: लहान मुलांमध्ये नित्यनियमाने याचा वापर केला तर भूक वाढून, पचनशक्ती सुधारून अनेक व्याधीपासून बालकांना दूर ठेवता येते. भूक वाढून, पचनशक्ती सुधारत असल्यानेच लहान मुलांमध्ये 'टॉनिक' म्हणूनही याचा उपयोग केला जातो.

लहानमुलांमध्ये कुमारीआसव नं. ३ चा व मोठ्या व्यक्तीमध्ये कुमारीआसव नं. १ चा प्रयोग सामान्यत: केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## २. रोहितकारिष्ट

**घटकद्रव्ये :** रोहितक, गूळ, धायटीची फुले, पंचकोल (पिंपळी, पिंपळमूळ, चव्य, चित्रक, सुंठ), त्रिजात (वेलची, दालचिनी, नागकेशर), त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी)

प्रथम रोहितकाचा काढा करून त्यात इतर औषधांची चूर्णे मिसळून गूळ, धायटीच्या फुलांच्या साहाय्याने संधानक्रिया करून रोहितकारिष्ट तयार केले जाते.

रोहितक हे उष्णवीर्य व लेखन करणारे औषध आहे. याचे विशेष कार्यक्षेत्र आहे प्लीहा (Spleen) आणि यकृत (Liver). प्लीहाविकृती असताना विशेषत: प्लीहेचा आकार वाढलेला असताना रोहितकाचा चांगला उपयोग होतो. (प्लीहा वाढणे यालाच व्यावहारिक भाषेत पाणथरी वाढणे असे म्हणतात.)

उदर या रोगामध्ये पोटात पाणी साठते. जलोदर असे यास व्यावहारिक भाषेत म्हटले जाते. अग्निमांद्य, मलावष्टंभ (शौचास न होणे), पायावर सूज येणे ही याची इतर प्रमुख लक्षणे. अग्निमांद्य हे या रोगाचे मूलभूत कारण असते. प्लीहोदर या उदराच्या एका प्रकारामध्ये उदराच्या वरील लक्षणांचे जोडीला प्लीहावृद्धी किंवा पाणथरी वाढणे (Enlarged Spleen), पांडुता (Anaemia) व मंदज्वर (Low Fever) ही लक्षणेही असतात. या प्लीहोदरासाठी रोहितकारिष्ट हे एक महत्वाचे औषध समजले जाते. रोतिकारिष्टामध्ये असणारी पंचकोल व त्रिजातातील सर्वच औषधी घटकद्रव्ये ही उत्तम अग्निवर्धन करणारी आहेत व म्हणूनच उदरावर कार्यकारी ठरणारी आहेत. उदरामध्ये विरेचन ही चिकित्सा आवश्यक असते.

रोहितकारिष्टामध्ये असणाऱ्या त्रिफलेमुळे विरेचन घडते असते.

रोहितक हे उष्णवीर्य व उत्तम लेखन करणारे औषधीद्रव्य असल्यानेच गुल्म (शरीरात आतल्या बाजूस वाढणारी गाठ) या रोगामध्येही रोहितकारिष्ट उपयुक्त ठरते.

अग्निमांद्यप्रधान लक्षण असणारा व बद्धकोष्ठता असणारा आणखी एक रोग म्हणजे मूळव्याध किंवा अर्श (Piles) रोग. यामध्येही रोहितकारिष्ट वापरणे लाभदायक ठरते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३. मंजिष्ठादि काढा

**घटकद्रव्ये :** मंजिष्ठा, त्रिफळा, कुटकी, वेखंड, दारुहळद, गुळवेल, कडूनिंब.

मंजिष्ठादि काढा हा रक्तदोष दूर करण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या अनेक कल्पांपैकी एक महत्त्वाचा असा कल्प आहे.

मंजिष्ठा हे उत्तम कफनाशक तसेच रक्तदोष दूर करणारे औषधीद्रव्य आहे. दारुहळद, गुळवेल, कडूनिंब ही मंजिष्ठादि काढ्यातील घटकद्रव्येही रक्तदोष दूर करण्यामध्ये अग्रगण्य समजली जातात. यातील कुटकी या घटकद्रव्यामुळे यकृतातून पित्ताचे स्रवण चांगले होते व पित्तदोष दूर होतो. याचमुळे यकृतदोषही कमी होतो. पित्त व रक्त यांच्या नेहमीच असणाऱ्या साहचर्यामुळे पित्तदोष दूर झाल्याने आपोआपच रक्तदोषही कमी होतो. यकृत हा रक्ताच्या उत्पत्तीच्या कार्याचे नियमन करणारा अवयव आहे. म्हणूनच यकृतावर कार्यकारी औषधांनी रक्तदोषही दूर होण्यास मदत होत असते.

मंजिष्ठा, त्रिफळा, दारुहळद, कुटकी, गुळवेल, निंब ही सर्वच द्रव्ये याप्रमाणे उत्तम रक्तदोषहर असल्यानेच खरूज, नायटे, इसब, सर्वांगावर पुरळ उठणे, अंगाला खाज फार येणे ही व या प्रकारची रक्तदोषामुळे उत्पन्न होणारी इतर लक्षणे यावर मंजिष्ठादि काढा फारच चांगला उपयोगी पडतो.

काही व्यक्तींमध्ये त्वचेचा प्राकृत वर्ण बदलून कातडी ही प्राकृत नैसर्गिक वर्णापेक्षा काळपट, निस्तेज होऊ लागते किंवा याउलट काही लोकांमध्ये त्वचेचा प्राकृत वर्ण नाहीसा होऊन त्या ठिकाणी कोड (पांढरे डाग) निर्माण होऊ लागतात. या दोन्ही प्रकारच्या वर्णबदलास, वैवर्ण्यास रक्तदोषच कारणीभूत असतात. या सर्व अवस्थांमध्येही म्हणूनच मंजिष्ठादि काढा यशस्वीपणे वापरता येतो.

शरीरावर वारंवार गळवे होणे, फोड येणे, त्यात पू होणे ही प्रवृत्ती अनेक रोग्यांमध्ये आढळून येते. रक्तदोषामुळेच उत्पन्न होणाऱ्या याही रोगावस्थेमध्ये मंजिष्ठादि काढा वापरल्यास पुन:पुन्हा होणारी ही लक्षणे निश्चयाने थांबतात.



**प्रमाण :** ४ ते ८ चमचे, दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी.

❑❑❑

## ४. महामंजिष्ठादि काढा

**घटकद्रव्ये :** मंजिष्ठा, मरवा, कुडा, गुळवेल, कोष्ठ, सुंठ, भांर्गी, रिंगणी, वेखंड, निंब, हळद, दारुहळद, त्रिफळा, पटोल, कुटकी, वावडिंग, असन, चित्रक, शतावरी, त्रायमण, पिंपळी, इंद्रयव, अडुळसा, माका, देवदारु, पित्तपापडा, खैर, चंदन, निशोत्तर, वरुण, काडेचिराईत, बावची, बाहवा, करंज, अतिविष, इंद्रवारुणी, अनंतमूळ, पर्पट.

वरील घटकद्रव्यांचा विचार केला असता असे लक्षात येईल की, मंजिष्ठादि काढ्यामधील मंजिष्ठा, त्रिफला, कुटकी, वेखंड, दारुहळद, गुळवेल व कडूनिंब ही सर्वच घटकद्रव्ये महामंजिष्ठादि काढ्यामध्येही आहेतच. याशिवाय यामध्ये इतर अनेक औषधीद्रव्यांची जोड दिलेली आहे.

विशेषत: हळद, वावडिंग, पटोल, मरवा, देवदारु, खैर, चंदन, वरुण, बावची, बाहवा, करंज, अनंतमूळ यांसारखी द्रव्ये ही रक्तदोष दूर करण्यासाठी निश्चितच साहाय्यकारी अशी आहेत. यामध्ये चंदन, खैर, हळद, करंज यांसारख्या द्रव्यांमुळे त्वचारोगामधील उत्पन्न होणारा स्राव कमी करण्यास, जखम शुद्ध होण्यास निश्चितच मदत होते. म्हणूनच ज्या त्वचारोगांमध्ये पू अधिक निर्माण होतो, जखमा वाहात राहतात त्यामध्ये मंजिष्ठादि काढ्यापेक्षा महामंजिष्ठादि काढा वापरणे अधिक उपयुक्त ठरते.

संक्षेपाने सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की मंजिष्ठादि काढ्याचे जे उपयोग आहेत तेच महामंजिष्ठादि काढ्याचेही आहेत. एवढेच नव्हे, तर रक्तशुद्धीसाठी व तज्जन्य रोगनिवारण्यासाठी हा काढा निश्चितच अधिक उपयुक्त असा आहे.

**प्रमाण :** ४ ते ८ चमचे, दिवसातून तीन वेळा. अनुपान - पाणी.

❑❑❑

## ५. खदिरारिष्ट

**घटकद्रव्ये :** खैराची साल, देवदारु, बावची, दारुहळद, त्रिफळा, मध, साखर, धायटीची फुले, कंकोळ, नागकेशर, जायफळ, लवंग, वेलची, दालचिनी, जायपत्री, पिंपळी.

प्रथमत: खैराची साल, देवदारु, बावची, दारुहळद व त्रिफळा यांचा काढा करून त्या काढ्यामध्ये मध, साखर, धायटीची फुले व बाकी इतर औषधांची चूर्णे मिसळून संधानक्रियेद्वारा (Alcoholic Fermentation) खदिरारिष्ट बनविले जाते.

खदिरारिष्ट हे त्वचारोगावरील एक महत्त्वाचे औषध आहे. यातील खदिर किंवा खैर हे महत्त्वाचे औषध असून खैर ही वनस्पती कुष्ठघ्न व कृमिघ्न-कृमीचा नाश करणारी-म्हणून प्रसिद्ध आहे. याचे उपयोगाने अनेक प्रकारचे त्वचारोग-खरूज, नायटे, इसब, गजकर्ण इत्यादि निश्चयाने कमी होतात. विशेषत: ज्या त्वचाविकारांमध्ये पू, रक्त किंवा लसिकास्राव अधिक प्रमाणात वाहतो व त्याच्याबरोबर कंडू (खाज सुटणे) हेही लक्षण प्राधान्यत्वे करून असते, त्या सर्व विकारांमध्ये खदिरारिष्टाचा चांगला उपयोग होतो.

खदिराचे उपयोगाने त्वचारोगामुळे उत्पन्न होणारी सूजही त्वरेने कमी होते.

या काढ्यामध्ये असणारी देवदारु, दारुहळद, बावची हे औषधी घटकही उत्तम कुष्ठघ्न म्हणजेच त्वचारोग नाहीसा करण्यास उपयुक्त असेच आहेत. दारुहळद व बावची यांचा उपयोग शोथ (सूज) कमी करण्यासाठीही होतो.

त्वचेचे विकारांमुळे त्वचेचे ठिकाणी अनेक वेळा वैवर्ण्य येते म्हणजेच त्वचेचा वर्ण बदलतो, त्या ठिकाणी काळे किंवा पांढरट डाग पडतात. या प्रकारे येणारे वैवर्ण्य दूर करून त्वचेला तिचा प्राकृत वर्ण प्राप्त करून देण्यासाठी देवदारु व दारुहळद ही दोन औषधे कार्यकारी ठरतात.

सर्व प्रकारच्या त्वचारोगात रक्त दूषित होत असते. या रक्तदोषासाठी जुलाबाचे औषध घेणे आवश्यक ठरते. खदिरारिष्टामध्ये असणारी त्रिफळा ही मृदुविरेचन करणारी असल्यानेच रक्तदोष दूर करण्यास साहाय्यभूत ठरते.

त्वचारोगांसाठी वापरल्या जाणाऱ्या अनेकविध कल्पांपैकी खदिरारिष्ट हे एक प्रमुख औषध आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ६. सारिवाद्यासव

**घटकद्रव्ये :** सारिवा (उपळसरी), नागरमोथा, लोध्र, वडाची साल, पिंपळाची साल, कपूरकाचरी, अनंतमूळ, कमळ, वाळा, पाठा, आवळकाठी, गुळवेल, चंदन, रक्तचंदन, वेलदोडा, बडी इलायची, ओवा, कुटकी, कोष्ठ, हिरडा, गूळ, धायटीची फुले, मनुका.



सारिवा हे यातील प्रमुख घटकद्रव्य उत्तम पित्तनाशक, रक्तदोषनाशक म्हणून ओळखले जाते. सारिवाप्रमाणेच नागरमोथा, कमळ, वाळा, चंदन, रक्तचंदन इ. औषधीद्रव्ये ही उत्तम प्रकारची शीत गुणांची असून यामुळेच उष्ण गुणाने वाढलेल्या पित्ताचे शमन करणारी आहेत. फक्त वर वर्णिलेली नागरमोथा वगैरे द्रव्येच नव्हेत, तर बाकी लोध्र, पिंपळाची साल, वडाची साल, आवळकाठी ही औषधीद्रव्येही थंडावा उत्पन्न करणारी, रक्तदोष दूर करणारी, तसेच शरीराबाहेर होणारा रक्तस्राव त्वरित थांबविणारी आणि पित्तदोष दूर करणारी अशीच आहेत.

या सर्व गुणांनी युक्त अशा घटकद्रव्यांपासून बनविले जाणारे सारिवाद्यासव हे म्हणूनच रक्तदोष दूर करणारे एक उत्तम औषध समजले जाते. या रक्तदोषामुळे उत्पन्न होणारे त्वचारोग यावरील सारिवाद्यासव हे विशेष कार्यकारी औषध समजले जाते. वड, पिंपळ, लोध्र यासारखी तुरट रसाची, स्राव कमी करणारी औषधीद्रव्ये यात असल्याने विशेषत: ज्या त्वचारोगांमध्ये उत्पन्न झालेल्या जखमेतून किंवा फोडांमधून पू, रक्त, लसिका यांसारखे स्राव वाहतात अशा त्वचारोगांवर या कल्पाचा अधिक लाभ होताना दिसतो.

आयुर्वेदाने रक्त आणि पित्त यांचा अनन्य संबंध मानला आहे. पित्तदोष दूर करणारी औषधे ही रक्तदोषही आपोआपच कमी करीत असतात हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

कुटकी हे यातील आणखी एक घटकद्रव्य. कुटकी उत्तम पित्तवरेचन आहे. पित्तविरेचन म्हणजे यकृतावर कार्य करून यकृतातून स्रवणारे जे पित्त त्याची निर्मिती व त्या पित्ताचे वहन योग्य प्रकारे घडवून आणणारे द्रव्य. यकृत हा रक्तनिर्मितीचे अवयवांपैकी एक प्रमुख अवयव आहे. यकृताच्या कार्याचे नियंत्रण करणारे द्रव्य हे पर्यायाने रक्दोष दूर करणारेही ठरते, याही दृष्टिकोनातून पाहताना सारिवाद्यासव हा रक्तदोष दूर करणाऱ्या द्रव्यांपैकी एक श्रेष्ठ असा कल्प आहे हे लक्षात येईल.

या औषधीकल्पांमध्ये अनेक शीतगुणांची, थंडावा उत्पन्न करणारी, औषधीघटकद्रव्ये असल्याने पित्त जेव्हा त्याच्या तीक्ष्ण, उष्ण गुणाने वाढते त्या वेळेस सारिवाद्यासव निश्चितच उपयोगी पडते व म्हणूनच हातापायांची आग होणे, जळजळणे, शरीरातून वाफा निघाल्यासारखे भासणे आदि लक्षणे सारिवाद्यासवाच्या उपयोगाने त्वरित कमी होतात.

सारिवा (उपळसरी) हे मूत्रमार्गावरही उत्तम कार्यकारी असे औषध आहे. मूत्रकृच्छ्र किंवा व्यावहारिक भाषेमध्ये ज्याला 'उन्हाळे लागणे' असे म्हटले जाते, अशा प्रकारच्या रोगामध्ये उत्पन्न होणारा मूत्रदाह कमी करण्यासाठी म्हणूनच याचा उपयोग केला जातो.

मूत्रमार्गावर कार्यकारी असल्यानेच उपदंश (Gonorrhoea) या रोगावर वापरल्या

जाणाऱ्या इतर औषधीकल्पांच्या जोडीला सारिवाद्यासव वापरणे उपदंश त्वरेने बरा होण्याच्या दृष्टीने निश्चितच आवश्यक ठरते.

या कल्पामध्ये इतर घटकद्रव्यांबरोबर वापरली जाणारी धायटीची फुले, गूळ व मनुका यांचा उपयोग आसवक्रिया चांगली होण्यासाठी होत असतो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ७. उशीरासव

**घटकद्रव्ये :** वाळा, पांढरे कमळ, काश्मरी, प्रियंगु, पद्मकाष्ठ, लोध्र, मंजिष्ठा, धमासा, पाठा, काडेचिराईत, वडाची साल, उंबराची साल, कपूरकाचरी, पित्तपापडा, पटोल, कांचनार, जांभुळसाल, मोचरस, मनुका, धायटीची फुले, साखर, मध.

वरील सर्व औषधीद्रव्यांचे चूर्ण व पाणी एकत्रित करून साखर, मध व धायटीची फुले यांचे साहाय्याने संधानक्रिया (Alcoholic Fermentation) करून उशीरासव बनविले जाते.

वाळ्याला संस्कृत नाव आहे उशीर. वाळा किंवा उशीर ज्यामध्ये प्रमुख घटक आहे असे आसव ते उशीरासव होय.

वाळा हा उत्तम शीतगुणाचा आहे. केवळ वाळाच नव्हे, तर या उशीरासवामध्ये वापरलेली सर्वच औषधे ही शीतवीर्यात्मक म्हणजेच थंडावा निर्माण करणारी अशीच आहेत. ही सर्व औषधे जशी शीतगुणांची आहेत तशीच ती तिक्त (कडू) किंवा कषाय (तुरट) रसाची आहेत. शीतगुणाची, तिक्त व कषाय रसांची सर्व औषधे ही उत्तम पित्तशामक असतात.

म्हणूनच पित्त हे जेव्हा त्याच्या उष्ण, तीक्ष्ण गुणांनी वाढते त्या वेळेस उशीरासव उपयुक्त ठरते. याचमुळे कोणत्याही रोगात येणारे दाह (आग होणे) हे लक्षण कमी करण्याचे कार्य या उशीरासवाकडून घडते. हातापायांची आग होणे, डोळे जळजळणे ही लक्षणे या कल्पाने त्वरित कमी होतात.

उशीर किंवा वाळा हे जसे दाह प्रशमन करणारे द्रव्य आहे. तसेच ते उत्तम मूत्रल म्हणजेच मूत्राचे प्रमाण वाढविणारे आहे. म्हणूनच उशीरासवाचा उपयोग मूत्रदाहासाठी होतो. मूत्रकृच्छ्रता (उन्हाळे लागणे), मूत्राश्मरी वा मूत्रशर्करा (Urinary Stone) यामध्ये असणारा मूत्रदाह (Burning Micturition)याच्या उपयोगाने त्वरित कमी होतो.

रक्तपित्त या व्याधीमध्ये रक्ताची व पित्ताची दुष्टी असते. पित्त हे तीक्ष्ण, उष्ण



गुणांनी वाढून रक्तामध्ये दुष्टी उत्पन्न करते व शरीराबाहेर रक्तस्राव होऊ लागतो. हा रक्तस्राव त्वरित कमी करण्यासाठी व पित्तदोष नाहीसा करण्यासाठी उशीरासव अत्यंत उपयुक्त आहे. उशीरासवामधील वडाची साल, उंबराची साल, जांभुळसाल, कांचनार ही सर्व घटकद्रव्ये तुरट रसाची असल्याने रक्तस्तंभनासाठी त्यांची फार मोलाची मदत होते. या कल्पामध्ये योजलेला मोचरसही रक्तस्तंभनाचे कार्य करीत असतो. याचसाठी रक्तपित्तामध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रमुख कल्पांमध्ये उशीरासवाची गणना करावी लागते.

(रक्तपित्त म्हणजे नाक, तोंड, कान, गुद वा मूत्रमार्ग यातून रक्तस्राव होणे. हा एक रक्ताच्या विकृतीमुळे उत्पन्न होणारा रोग असून त्याचा व्यावहारिक भाषेत ज्याला रक्तपित्ती म्हणतात त्या कुष्ठरोगाशी म्हणजेच लेप्रसीशी काहीही संबंध नाही.)

ज्वरामध्ये (ताप आलेला असताना) तहान फार लागणे हे लक्षण बऱ्याच वेळा आढळते. या अवस्थेमध्येही उशीरासव उत्तम कार्यकारी आहे.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ४ ते ६ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## ८. चंदनासव

**घटकद्रव्ये :** श्वेतचंदन, रक्तचंदन, वाळा, नागरमोथा, कमळ, प्रियंगु, लोध्र, मंजिष्ठा, पाठा, काडेचिराईत, वडाची साल, कपूरकाचरी, पित्तपापडा, जेष्ठमध, रास्ना, कांचनार, आंब्याची साल, पटोल, मोचरस, धायटीची फुले, मनुका, गूळ.

श्वेतचंदनादि सर्व औषधीद्रव्यांची चूर्णे व पाणी एकत्रित करून त्यात धायटीची फुले, मनुका व गूळ मिसळून संधानक्रियेद्वारा (Alcoholic Fermentation) चंदनासव तयार केले जाते.

चंदनासवामध्ये वापरली जाणारी सर्वच घटकद्रव्ये ही उत्तम पित्तशामक द्रव्ये म्हणून प्रसिद्ध आहेत. यातील बहुतांश सर्व औषधे ही तिक्त (कडू) असून बाकीच्यांमध्ये तिक्ताचे जोडीला कषाय (तुरट) रस प्राधान्येकरून आढळतो. तिक्त आणि कषाय हे दोन्ही रस पित्तशामक असतात. चंदनासवामध्ये वापरलेली सर्वच घटकद्रव्ये ही शीत गुणाचीही आहेत. यामुळेच जेव्हा पित्त हे उष्ण, तीक्ष्ण गुणाने वाढते त्या वेळेस चंदनासवाचा उपयोग करणे इष्ट ठरते.

शरीरात कोठेही, कोणत्याही कारणाने निर्माण होणारा दाह (जळजळणे, आग होणे) हे पित्ताचे लक्षण असून ते चंदनासवाचे उपयोगाने त्वरित थांबते.

चंदन हे मूत्राचे प्रमाण वाढविणारे म्हणजेच मूत्रल असे औषधीद्रव्य आहे. चंदनासवातील वाळा, नागरमोथा, कमळ, प्रियंगु ही औषधेही मूत्राचे प्रमाण वाढवितात. यामुळेच जेव्हा मूत्रप्रवृत्ती थोडीथोडी, सदाह व सशूल (वेदना-युक्त) असते, अशा मूत्रकृच्छ्र (उन्हाळे लागणे) किंवा मूत्राश्मरी (मूतखडा, Urinary Stone) यासारख्या रोगांमध्ये चंदनासव लाभदायक ठरते.

ज्वरामध्ये येणारा दाह व तृष्णाधिक्य (तहान फार लागणे) या लक्षणांसाठीही चंदनासव उपयुक्त ठरते.

या सर्वांपेक्षाही चंदनासवाचा उपयोग होतो तो रक्तपित्त या रोगासाठी. रक्तपित्तामध्ये शरीराबाहेर होणारा रक्तस्राव त्वरित कमी करण्यासाठी चंदनासव फारच उपयुक्त आहे. रक्तपित्तामध्ये पित्त हे उष्ण, तीक्ष्ण गुणांनी वाढून रक्ताची दुष्टी उत्पन्न होत असते. चंदनासवातील सर्वच औषधे शीत व पित्तशामक तर आहेतच; पण वडाची साल, आंब्याची साल, लोध्र, मोचरस ही यातील औषधे रक्तस्तंभन करणारी, रक्तस्राव थांबविणारी अशी आहेत.

संक्षेपत: चंदनासवाबद्दल सांगावयाचे झाल्यास उशीरासवाप्रमाणेच हाही एक पित्तरोगावरील कल्प असून दोघांची घटकद्रव्ये ही बरीचशी सारखी आहेत. त्यामुळेच चंदनासवाचे कार्यकारित्वही उशीरासवाप्रमाणेच घडते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ४ ते ६ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## ९. अरविंदासव

**घटकद्रव्ये :** लाल कमळ, निळे कमळ, पांढरे कमळ, वाळा, शिवणमूळ मंजिष्ठा, वेलची, चिकणामूळ, जटामांसी, नागरमोथा, उपळसरी, वेखंड, त्रिफळा, कचोरा, निशोत्तर, पटोल, पित्तपापडा, अर्जुन, जेष्ठमध, मोरवेल, धायटीची फुले, मनुका, साखर.

लाल, निळे व पांढरे कमळ आणि इतर औषधांची चूर्णे पाण्यामध्ये एकत्रित करून त्यामध्ये मनुका, साखर आणि धायटीची फुले मिसळून संधानक्रिया घडवून आणली जाते व अशा पद्धतीने अरविंदासव बनते.

अरविंद म्हणजेच कमळ. कमळाचे तीनही प्रकार (लाल, निळे आणि पांढरे) हे यातील प्रमुख घटक असल्यानेच या कल्पाला अरविंदासव असे म्हटले जाते.

अरविंदासवातील सर्वच घटकद्रव्ये ही उत्कृष्ट शीतवीर्याची म्हणजेच शरीरात थंडावा निर्माण करणारी आहेत. यामुळेच ती उत्तम पित्ताशामक म्हणूनही ओळखली



जातात. पित्ताचा उष्ण, तीक्ष्ण गुण वाढल्याने निर्माण होणाऱ्या सर्व रोगांवर म्हणूनच अरविंदासव उपयुक्त ठरते.

हातापायांची आग होणे, डोळे जळजळणे, मूत्रप्रवृत्ती सदाह असणे (Burning Micturition) किंवा सर्वांगामध्ये दाह होणे हे जे पित्ताचे उष्ण, तीक्ष्ण गुण वाढल्याने निर्माण होणारे लक्षण ते अरविंदासवाच्या उपयोगाने त्वरित कमी होते. ज्वर (Fever), प्रमेह (Daibetes), राजयक्ष्मा (Tuberculosis) यांसारख्या रोगांमध्ये असणारे दाह हे लक्षण अरविंदासवाच्या सेवनाने निश्चितच कमी होते.

ज्वराच्या काही रोग्यांमध्ये आढळणारे तृष्णाधिक्य म्हणजे तहान फार लागणे हे लक्षण कमी करण्यासाठीही अरविंदासवाचा प्रयोग लाभदायक ठरतो.

अरविंदासवातील सर्वच घटकद्रव्ये ही जशी शीत गुणाची आहेत तशीच ती कषाय (तुरट) वा तिक्त (कडू) रसाची औषधे आहेत. हे दोन्ही रस असणारी द्रव्ये ही पित्तशमनाचे कार्य करीत असतात. शिवाय ही सर्व द्रव्ये रक्तावरही कार्यकारी असून शीत, कषाय (तुरट) रसामुळे रक्तस्तंभन करणारी, शरीराबाहेर होणारा रक्तस्राव थांबविणारी, अशी आहेत. याचमुळे अरविंदासव हे रक्तपित्तावरील एक महत्त्वाचे औषध आहे.

रक्तपित्तामध्ये नाक, कान, तोंडावाटे वा मूत्रमार्ग किंवा योनीमार्गातून रक्तस्राव होत राहतो. पित्ताच्या तीक्ष्ण, उष्ण गुणाने रक्ताची दुष्टी होते आणि रक्त शरीराबाहेर वाहू लागते. अशा अवस्थेत अरविंदासव वापरणे त्वरित लाभाचे दृष्टीने आवश्यक ठरते. याच्या वापराने रक्तस्राव त्वरित थांबतो. रक्तदोष दूर होतो. त्याचप्रमाणे उष्ण, तीक्ष्ण, गुणाने वाढलेल्या पित्ताचेही शमन होते आणि रोग लवकर बरा होण्यास साहाय्य होते. रक्तपित्तामध्ये होणारे दाह हे लक्षण तर अरविंदासवाच्या सेवनाने त्वरित थांबते.

या कल्पामध्ये असणारे त्रिफळा, निशोत्तरासारखे घटक हे मृदुविरेचन करणारे असल्याने त्यामुळेही पित्ताचे शमन होण्यास निश्चितच मदत होते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## १०. दुरालभादि क्वाथ-धमासा काढा

**घटकद्रव्ये :** धमासा, जेष्ठमध, देवदारु, काकडशिंगी, अनंतमूळ, अडुळसा, सोनामुखी, हिरडा.

धमासा ही एक काटेरी वनस्पती आहे. सर्वत्र काट्याने भरलेली असते. ती

हातात धरण्यास कठीण असल्याने या वनस्पतीला दुरालभा असे संस्कृत नाव दिलेले आहे. धमासा किंवा दुरालभादि क्वाथ या दोन्ही नावांनी हा काढा उपलब्ध आहे.

धमासा हे उत्कृष्ट वातपित्तशामक असे औषध असून त्याचे कार्यक्षेत्र मस्तिष्कप्रदेशी अधिक आहे. याचा उपयोग रक्तदाब वाढला असता (Hypertention किंवा High Blood Pressure) येणारी चक्कर, डोक्यात गरगरल्याप्रमाणे वाटणे, कानात आवाज होणे, डोके दुखणे, मूर्च्छा, छातीत धडधडणे यांसारखी लक्षणे त्वरेने कमी करण्यासाठी होत असतो. रक्तदाब वाढल्यामुळे उत्पन्न होणारी सर्वच लक्षणे ही वात वाढल्याची निदर्शक असली तरी हा वात वाढण्याचे कारण पित्तामुळे वायूचे प्राकृत गतीस निर्माण झालेला अडथळा हे असते (पित्तावृत्त वात). याचसाठी या रोगात सर्व प्रकारचे पित्तशामक उपचार अपेक्षित असतात. धमासा हे उत्तम पित्तशामक द्रव्य आहेच, पण त्याचबरोबर या काढ्यात असणारी अनंतमूळ, जेष्ठमध, अडुळसा यासारखी द्रव्येही पित्तशमनाचे कार्यास मदत करणारी आहेत.

सर्वप्रकारचे पित्तरोग तसेच रक्तदोषासाठीही मृदुविरेचन (Mild Purgative) अपेक्षित असते. दुरालभादि काढ्यातील सोनामुखी, हिरडा यांसारखी घटकद्रव्ये मृदुविरेचन करून या क्वाथाचा पित्तशामक गुण प्रकर्षाने वाढविणारी आहेत.

दुरालभा किंवा धमासा हे औषध मूत्रल (लघवीचे प्रमाण वाढविणारे) असल्याने व या काढ्यातील देवदारु, अनंतमूळ, यांसारखी घटकद्रव्ये या गुणास साहाय्यकारी असल्याने या काढ्याचा उपयोग मूत्रकृच्छ्र (वारंवार, थोडी थोडी होणारी मूत्रप्रवृत्ती), मूत्रदाह (Burning Micturition) या लक्षणासाठीही करण्यात येतो, विशेषत: लघ्वीवाटे कोणत्याही कारणाने रक्तस्राव होत असेल तर हे लक्षण या काढ्याच्या प्रयोगाने त्वरेने कमी होते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## ११. कुटजारिष्ट

**घटकद्रव्ये :** कुडासाल, मनुका, काश्मरी, धायटीची फुले, गूळ.

प्रथमत: कुडासाल, मनुका व काश्मरी यांचा काढा करून नंतर त्या काढ्यामध्ये धायटीची फुले व गूळ यांचे साहाय्याने संधानक्रिया (Alcoholic Fermentation) केली जाते.

कुड्याची साल (यालाच व्यावहारिक भाषेत कुड्याचे पाळ असे म्हणतात.) ही



तुरट रसाची, रूक्ष व शीत गुणाची आहे. या द्रव्याचे कार्य विशेषत: मोठ्या आतड्यावर घडते. कुडा हा तुरट, रूक्ष व शीत गुणाचा असल्यानेच उत्तम स्तंभक (Astringent) म्हणून ओळखला जातो. स्तंभक म्हणजे द्रव्याचे शोषण करणारे, त्याचप्रमाणे हालचाली कमी करणारे द्रव्य. अतिसार (Diarrhoea), प्रवाहिका (Dysentery) यासारख्या रोगांमध्ये मोठ्या आतड्यातील द्रवाचे शोषण करून त्याचप्रमाणे मोठ्या आतड्याच्या हालचाली (Peristaltic movements) कमी करून मलप्रवृत्ती प्राकृत करणे हे कार्य कुटजारिष्ट करीत असते.

कुडा हे उत्तम रक्तस्तंभन करणारे, रक्तस्राव थांबविणारे असे औषधीद्रव्य आहे; म्हणूनच ज्या रोगामध्ये मलाबरोबर रक्तही पडते अश सर्व रोगांसाठी कुटजारिष्ट उपयुक्त ठरते. रक्तप्रवाहिकेसाठी (Dysentery) हे याचसाठी वापरले जाते. रक्तस्तंभन करण्याच्या गुणधर्मामुळेच कुडा हा रक्तार्शावरील (Bleeding Piles) एक सर्वोत्कृष्ट कल्प समजला जातो.

ग्रहणीसारख्या रोगामध्ये (Chronic Colitis किंवा Sprue) मोठ्या आतड्यामध्ये व्रण उत्पन्न होतात. पचनशक्ती बघडते. पातळ व दुर्गंधीयुक्त मलप्रवृत्ती होते. या सर्वांचे जोडीला शारीरिक दुर्बलता, वजन कमी होणे, तोंड येणे इत्यादी अनेकविध लक्षणे उत्पन्न होतात. बरेच दिवस टिकणाऱ्या या रोगामुळे रुग्णाचे मन:स्वास्थ्यही हरवते. अशा प्रकारच्या गंभीर स्वरूपाच्या या ग्रहणी किंवा संग्रहणी रोगामध्येही कुटजारिष्ट हे एक प्रभावी औषध आहे. कुड्याच्या शीत, रूक्ष, तुरट रस वगैरे गुणधर्मामुळेच मोठ्या आतड्यात उत्पन्न झालेले व्रण लवकर भरून येतात. शौचास बांधून होते, पचनशक्ती सुधारते व रुग्णास त्वरित आराम मिळतो. सातत्याने काही महिने कुटजारिष्टाचा उपयोग चालू ठेवल्यास रुग्णाची ग्रहणी रोगातून कायमची सुटका होऊ शकते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## १२. बब्बुलाद्यारिष्ट

**घटकद्रव्ये :** बाभळीची साल, गूळ, धायटीची फुले, पिंपळी, जायफळ, कंकोळ, दालचिनी, वेलची, जायपत्री, नागकेशर, लवंग, मिरे.

बाभळीच्या सालीच्या काढ्यामध्ये गूळ, धायटीची फुले, इतर औषधीद्रव्यांची चूर्णे मिसळून संधानक्रिया करून बब्बुलाद्यारिष्ट तयार केले जाते.

बाभूळ ही वनस्पती कषाय (तुरट) रसाची, शीत गुणाची व त्यामुळेच स्तंभन

करणारी आहे. स्तंभन म्हणजे हालचाली कमी करून मोठ्या आतड्यातील द्रवाचे शोषण करणे. या स्तंभन गुणामुळेच बब्बुलाद्यारिष्टाचां उपयोग अतिसार (Diarrhoea), प्रवाहिका (Dysentery), ग्रहणी (Chronic Colitis) किंवा यासारख्या इतर कोणत्याही रोगात येणारी द्रवमलप्रवृत्ती (Loose Motions) कमी करण्यासाठी केला जातो.

बब्बुलाद्यारिष्टामध्ये बाभूळ सालीच्या जोडीस असणारी जायफळ, जायपत्री, नागकेशर ही औषधेही उत्तम स्तंभक म्हणूनच प्रसिद्ध आहेत. त्याचमुळे यांची जोड मिळाल्याने बब्बुलाद्यारिष्टाचे गुणधर्मांमध्ये निश्चयाने अनेकपटीने वाढ होत असते.

अतिसार, ग्रहणी, प्रवाहिका यांसारखे सर्व रोग पोट बिघडण्याचे, अजीर्ण वा अग्निमांद्याचे द्योतक असतात. या सर्व रोगांमध्ये दीपनपाचन करणारी, अग्नि वाढवून घेतलेल्या अन्नाचे पचन योग्य तऱ्हेने करणारी औषधे वापरावी लागतात. याच दृष्टीने विचार करून बब्बुलाद्यारिष्टास पिंपळी, कंकोळ, दालचिनी, लवंग, मिरे यांसारख्या औषधांची जोड दिलेली आहे.

लवंग, कंकोळ, दालचिनी, वेलदोडे, जायपत्री यांसारखी सुगंधी द्रव्ये ही वातानुलोमन करणारी असतात. त्यामुळेच पोटात दुखणे, गुबारा धरणे, मुरडा होणे यांसारखी अतिसारादी रोगात येणारी लक्षणे त्वरेने कमी होतात.

प्रमेह किंवा मधुमेहामध्ये (Daibetes) कषाय किंवा तुरट रसाची द्रव्ये कार्यकारी ठरतात. त्यामुळे प्रमेहास कारणीभूत असणारा क्लेदक कफ कमी होत असतो. याचसाठी प्रमेहात इतर औषधांचे बरोबर बब्बुलाद्यारिष्टाची जोड देणे लाभदायक ठरते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## १३. जीरकाद्यारिष्ट

**घटकद्रव्ये :** जिरे, गूळ, धायटीची फुले, सुंठ, जायफळ, दालचिनी, वेलची, नागकेशर, ओवा, कंकोळ, लवंग.

प्रथमत: जिऱ्याचा काढा करून त्या काढ्यामध्ये गूळ व धायटी यांचेबरोबर सुंठ वगैरे औषधांची चूर्णे मिसळून अरिष्ट बनविले जाते.

जीरकाद्यारिष्ट हे अतिसारावरील (Diarrheoa) एक प्रभावी औषध आहे. केवळ अतिसारच नव्हे, तर अग्निमांद्य, अजीर्ण, ग्रहणी (Chronic Colitis), प्रवाहिका (Dysentery) या सर्वच रोगांसाठी याचा उत्तम उपयोग होतो.

या काढ्यामध्ये असणारी सुंठ, जायफळ, नागकेशर ही औषधे मोठ्या आतड्याच्या



हालचाली कमी करण्यासाठी व त्यायोगे मोठ्या आतड्यामध्ये द्रवाचे अधिक प्रमाणात शोषण होण्याची क्रिया करण्यासाठी उपयोगी पडतात.

या सर्व रोगांमध्ये अग्निमांद्य हे प्रमुख लक्षण असते. या कल्पातील प्रमुख द्रव्य जिरे व त्याचबरोबर सुंठ, दालचिनी, वेलची, नागकेशर, ओवा, कंकोळ, लवंग ही सर्वच औषधे उत्तम दीपनपाचन अशी असल्याने अग्निमांद्य दूर करून रोग बरा करण्यास मदत करतात.

अग्निमांद्य झाल्याने पोटात दुखणे, पोटात गुबारा धरणे, भूक न लागणे, अंग जड होणे, उलटी किंवा जुलाब होणे, जीभ पांढरी व लिप्त असणे (Coated Tongue) यांसारख्या सर्व लक्षणांसाठी, त्वरित आराम मिळावा म्हणून, जीरकाद्यारिष्ट वापरणे फायद्याचे ठरते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## १४. पंचकोलासव

**घटकद्रव्ये :** पिंपळी, पिंपळमूळ, चव्य, चित्रक, सुंठ, मनुका, गूळ, धायटी.

पिंपळी, पिंपळमूळ, चव्य, चित्रक आणि सुंठ या पाच औषधीद्रव्यांना मिळून पंचकोल अशी शास्त्रीय संज्ञा आहे. या पंचकोलापासून बनविले जाणारे आसव ते पंचकोलासव होय. पचकोलाचे चूर्ण पाण्यात मिसळून मनुका, गूळ व धायटीची फुले एकत्रित करून आसवक्रियेद्वारा पंचकोलासव तयार केले जाते.

पंचकोलासवातील सर्वच औषधे ही उत्कृष्ट दीपनपाचन करणारी म्हणजेच अन्नपचनासाठी आवश्यक असणारा जाठराग्नि वाढवून, भूक वाढविणारी व खाल्लेल्या अन्नाचे उत्कृष्टपणे पाचन करणारी अशी आहेत. यामुळेच पंचकोलासवाचा उपयोग प्रामुख्याने अग्निमांद्य या रोगासाठी केला जातो.

आसवक्रियेमुळे (Alcoholic Fermentation) निर्माण होणारी आसवे वा अरिष्टे ही स्वभावत:च उत्तम अग्निवर्धन करणारी असतात; त्यातही अग्नि वाढविणाऱ्या म्हणजेच दीपनपाचन गुणांनी युक्त अशा घटकांपासून बनविलेले हे पंचकोलासव तर अधिकच कार्यकारी ठरते.

भूक न लागणे, खाल्लेल्या अन्नाचे पचन न होणे, उलटी किंवा जुलाब होणे, जीभ पांढरी व त्यावर जाडसर थर (Coated) असणे, पोटात गुबारा धरणे, गुडगुडणे वा दुखणे, अंग जड वाटणे, थकवा येणे अशी अनेक प्रकारची लक्षणे पोट बिघडले असताना म्हणजेच अग्निमांद्य वा अजीर्ण झाले असताना उत्पन्न

होतात. ही सर्वच लक्षणे अग्निमांद्य दूर झाल्याने कमी होऊ शकतात. याचसाठी या प्रकारच्या लक्षणांमध्ये पंचकोलासारखे औषध एक प्रभावी औषध म्हणून समजले जाते.

केवल अग्निमांद्य रोगातच नव्हे, तर अग्निमांद्यामुळे उत्पन्न होणाऱ्या मूळव्याध (Piles), ग्रहणी (Chronic colitis) किंवा या प्रकारच्या अन्य रोगांमध्येही या कल्पाचा लाभदायक उपयोग केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## १५. अभयारिष्ट

**घटकद्रव्ये :** हिरडा, मनुका, वावडिंग, धायटीची फुले, गूळ, गोखरू, निशोत्तर, धने, चव्य, सुंठ, मोचरस, इंद्रवारुणी, दंती.

अभया म्हणजे हिरडा. अभया किंवा हिरडा प्रमुख असल्याने या कल्पाला अभयारिष्ट हे नाव प्राप्त झाले आहे.

यामध्ये प्रथमतः हिरडा, मनुका व वावडिंग यांचा काढा करून नंतर त्या काढ्यामध्ये गोखरू, निशोत्तर वगैरे उरलेल्या द्रव्यांची चूर्णे मिसळली जातात. यांत गूळ व धायटीची फुले मिसळून संधानक्रिया (Alcoholic Fermentation) केली जाते व अभयारिष्ट बनविले जाते.

हिरडा हे एक उत्तम अनुलोमक असे औषधीद्रव्य आहे. ज्या औषधांचे सेवनानंतर जाठराग्नि वाढून, खाल्लेल्या अन्नाचे चांगले पचन होऊन मलाचे भेंदन होते व शौचास पातळ येते, ती औषधे अनुलोमक म्हणून ओळखली जातात. विरेचक औषधांनीही शौचास पातळ येते, पण त्यामुळे पचन मात्र सुधारत नाही, जसे असेल तसेच अपाचित अन्न विरेचक द्रव्यामुळे बाहेर पडते. अनुलोमक व विरेचक द्रव्ये यांमध्ये हा फार मोठा फरक आहे.

हिरडा हा अनुलोमक आहे, विरेचक नव्हे, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. हिरड्याप्रमाणेच मनुकाही उत्तम अनुलोमक म्हणूनच प्रसिद्ध आहेत. वावडिंगही अनुलोमनाचेच कार्य करीत असते. अनुलोमन करणाऱ्या औषधीपासून बनविलेले हे अभयारिष्ट प्रामुख्याने ज्या व्यक्तींमध्ये बद्धकोष्ठता आढळते अशांमध्ये वापरले जाते. अनुलोमक असल्याने पचनशक्ती सुधारते. या औषधाची इतर विरेचक औषधांप्रमाणे सवय मात्र लागत नाही. याउलट कालांतराने शौचास साफ होण्याची क्रिया आपोआपच सुधारत जाते.



या सर्व अनुलोमक औषधांचे जोडीला निशोत्तर, दंती यांसारख्या मृदुविरेचक औषधांचीही अभयारिष्टामध्ये योजना केलेली आहे. धने, सुंठ, चव्य, इंद्रवारुणी यांसारख्या अग्निदीपन करणाऱ्या, पचनशक्ती सुधारण्यास मदत करणाऱ्या औषधांमुळे अभयारिष्टाचे गुमधर्मामध्ये वाढच होत असते.

या सर्व गुणकर्मांमुळेच ज्या रोगांमध्ये अनुलोमन वा मृदुविरेचनाची अपेक्षा असते अशा सर्व रोगांमध्ये अभयारिष्ट उपयुक्त ठरते. अम्लपित्त, काविळ, शोथ (सर्वांगावर सूज येणे), जलोदर इत्यादी रोगांमध्ये अभयारिष्ट यशस्वीपणे वापरले जाते. अनेक प्रकारच्या त्वचारोगांमध्येही मृदुविरेचनाची आवश्यकता असते. यासाठीही अभयारिष्ट वापरता येते.

रक्तार्श किंवा रक्तीमूळव्याध (Bleeding Piles) या रोगामध्ये मलाचे खडे होतात, शौचाचे वेळेस अत्यंत दाह (आग होणे), या लक्षणांचे जोडीला मलावाटे रक्तही पडत असते. मूळव्याध हाही एक अग्निमांद्यामुळेच उत्पन्न होणारा रोग आहे. या रोगामध्ये जाठराग्नि वाढविणारी, पचन सुधारण्यास मदत करणारी व अनुलोमक अशीच औषधे आवश्यक असतात. अभयारिष्ट या सर्वच गोष्टींसाठी उपयुक्त असल्याने ते रक्तार्शावरील (रक्तीमूळव्याधीवरील) एक महत्त्वाचे औषध आहे.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## १६. अमृतारिष्ट

**घटकद्रव्ये :** गुळवेल, दशमूळ, सप्तपर्णी, पित्तपापडा, इंद्रयव, नागरमोथा, धायटीची फुले, गूळ, मिरे, अतिविष, नागकेशर, सुंठ, पिंपळी.

प्रथमतः गुळवेल, दशमूळ, सप्तपर्णी, पित्तपापडा, इंद्रयव व नागरमोथा यांचा काढा करून त्यात धायटीची फुले व गूळ मिसळून अरिष्ट तयार केले जाते. अरिष्ट तयार करतानाच त्यामध्ये मिरे, अतिविष, नागकेशर, सुंठ, पिंपळी यांची चूर्णे मिसळलेली असतात.

अमृता हा गुळवेलीला पर्यायवाची शब्द आहे. अनेक रोगांमध्ये उपयुक्त असून रोग्याला अमृताप्रमाणे जीवनदान प्राप्त करून देणारी ही अमृता किंवा गुळवेल वनस्पती, ही प्रमुख घटकद्रव्य असणारा कल्प, म्हणूनच अमृतारिष्ट असे नाव या कल्पास मिळाले आहे.

गुळवेल ही त्रिदोषशामक वनस्पती असून रक्तदोष दूर करण्यासाठीही या गुळवेलीचा चांगला उपयोग होतो.

अमृतारिष्टामध्ये गुळवेलीबरोबर असणारी पित्तपापडा, इंद्रयव यांसारखी औषधीद्रव्ये उत्तम ज्वरशामक म्हणजेच ताप कमी करणारी औषधे आहेत. अमृतारिष्टाचा उपयोग याचमुळे ज्वररोगासाठी (Fevers) केला जातो.

या कल्पामध्ये असणारी सुंठ, पिंपळी, अतिविष, मिरे, नागकेशर यांसारखी द्रव्ये ही उत्तम दीपनपाचन करणारी (अग्नि वाढविणारी) असल्यानेच ज्वर कमी करण्यास मदत करतात. ही सर्व औषधे उत्तम कफघ्नही आहेत व म्हणूनच ज्या तापाबरोबर खोकल्यासारखी कफाची लक्षणे आढळतात, त्या सर्व प्रकारांमध्ये अमृतारिष्टाचा वापर निश्चितच लाभदायक ठरतो.

अनेक रुग्णांमध्ये ज्वराचे कारण निश्चित करणे कठीण होते. अशा ज्वरप्रकारांसाठी (P. U. O. = Pyrexia of Unknown Origin) अमृतारिष्ट एक महत्त्वाचे औषध ठरते.

गुळवेल, दशमूळ, सप्तपर्णी यांसारखी उत्तम वातनाशक व सुंठ, पिंपळी, मिरी यांसारखी दीपनपाचन औषधे यांनी युक्त असा हा अमृतारिष्ट नावाचा कल्प अनेक प्रकारच्या वातविकारांसाठीही उपयुक्त ठरतो. गुळवेल हे रक्तदोष दूर करण्यामध्येही श्रेष्ठ द्रव्य आहे. यामुळेच वातरक्तासारख्या (Gout) रोगामध्ये अमृतारिष्टाचा वापर करणे नेहमीच लाभदायक ठरते.

अमृतारिष्टाचा उपयोग अनेक विकारांमध्ये होत असतो. त्याचप्रमाणे वातनाशक द्रव्यांनी, दीपनपाचन द्रव्यांनी युक्त असल्याने या औषधीकल्पाचा उपयोग जनरल टॉनिक म्हणूनही उत्तम प्रकारे होत असतो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑ ❑ ❑

## १७. तिक्तपंचक काढा

**घटकद्रव्ये :** गुळवेल, पटोल, कडूनिंब, इंद्रयव (कुड्याचे बी), काडेचिराईत.

तिक्त म्हणजे कडू. (संस्कृतमध्ये कडू रसाला तिक्त म्हणतात तर तिखट रसाला कटू) पाच कडू औषधांपासून बनविलेला काढा तो तिक्तपंचक काढा. गुळवेल, पटोल, कडूनिंब, इंद्रयव आणि कडेचिराईत या पाचही वनस्पती अत्यंत कडू अशाच आहेत.

ज्वर (ताप येणे, Fevers) हा एक पित्ताचा रोग आहे. या रोगामध्ये आमाशय किंवा जठर आणि लहान आतडे यांमध्ये असणारे पाचकपित्त हे आपल्या स्थानातून बाहेर, शरीरातील अन्य धातूंचे ठिकाणी विमार्गग होत असते. पित्त आणि अग्नि



यांच्यामध्ये असणाऱ्या अनन्यसाधारण साहचर्यामुळे (अग्नि हा पित्ताच्या आश्रयाने राहात असल्याने) पाचक पित्ताचा आमाशयात क्षय झाल्यामुळे त्या ठिकाणी अग्निमांद्य उत्पन्न होते. याउलट त्वचेमध्ये पित्त वाढल्याने ज्वर (देहोष्मा वाढणे) हे लक्षण उत्पन्न होते. या ज्वररोगामध्ये ताप भरतो, सर्व अंग जखडल्याप्रमाणे भासते, सर्व अंग ठणकते, घाम येईनासा होतो आणि या सर्व लक्षणांचे जोडीला तीव्र स्वरूपाचे अग्निमांद्य उत्पन्न होते.

ज्वर हा याप्रकारे एक पित्ताचा रोग असून त्यावर पित्तशामक उपचार करावे लागतात.

षड्रसांपैकी मधुर (गोड), तिक्त (कडू) आणि कषाय (तुरट) हे तीन रस पित्तशामक म्हणून ओळखले जातात व म्हणूनच पित्तविकारांसाठी या तीन रसांनी युक्त आहार व औषधी असावी लागते.

ज्वर हा एक पित्ताचा रोग असला व गोड, तुरट हे रस जरी पित्तशामक असले तरीही ज्वरामध्ये मात्र या दोन रसांचा उपयोग करता येत नाही. ज्वरात तिक्तरसच वापरावा लागतो. मधुर किंवा गोड रसाचे पदार्थ हे पचावयास जड असतात आणि तापामध्ये तर तीव्र स्वरूपाचे जाठराग्निमांद्य असल्याने पचण्यास अत्यंत हलकी अशीच द्रव्ये अपेक्षित असतात. म्हणूनच गोड रस हा ज्वरांमध्ये अपथ्यकारक समजला जातो. कषाय किंवा तुरट रस हा विमार्गग झालेल्या पित्ताला स्वस्थानी आणण्याचे अपेक्षित कार्याला अडथळा करीत असतो व म्हणूनच हाही रस ज्वरात अपथ्यकारकच आहे.

तिक्त किंवा कडूरस मात्र अग्नि प्रदीप्त करून भूक वाढविणारा, स्वत: कडू असला तरी तोंडास रुची प्राप्त करून देणारा, उत्पन्न झालेल्या आमाचे (एक प्रकारचे विषद्रव्य) पाचन करणारा व पित्तशामक असल्याने ज्वरामध्ये उपयुक्त ठरतो.

याच कारणाने तापावर वापरली जाणारी सर्वच औषधे ही कडू असतात. तिक्तपंचक काढ्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या पाचही वनस्पती अत्यंत कडू असल्यानेच त्यांचा उपयोग ज्वरामध्ये केला जातो. सर्व प्रकारचे ज्वरामधील ज्वरवेग (वाढलेला देहोष्मा) त्वरेने कमी करण्याचे कार्य या तिक्तपंचक काढ्याने होत असते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ४ वेळा, गरम पाण्याबरोबर.

❑ ❑ ❑

## १८. परिपाठादि काढा - पर्पटादि काढा

**घटकद्रव्ये :** पित्तपापडा (पर्पट), जेष्ठमध, नागरमोथा, हिरडा, गुलाबकळी, वाळा.

परिपाठादि काढ्यालाच पर्पटादि काढा असेही नाव काही वेळा दिले जाते.

परिपाठा किंवा पर्पट यालाच मराठी नाव आहे पित्तपापडा. पित्तपापडा हे अत्यंत कडू रसाचे व शीत गुणाचे द्रव्य असून हे उत्तम पित्ताशामक असे औषध आहे.

ज्या तापामध्ये त्वचेवर पीटिका वा विस्फोट येतात अशा (Irruptive Fevers) गोवर (Measels), कांजिण्या (Chicken-Pox), देवी (Small-Pox) किंवा अशाच प्रकारच्या अन्य तापावरही परिपाठादि काढा हे उत्कृष्ट औषध आहे.

या सर्व Irruptive fevers मध्ये पित्ताचा उष्णगुणामुळे प्रकोप झालेला असतो. या उष्ण गुणाच्या पित्तप्रकोपामुळे शरीरातील उष्णता तर वाढतेच, पण त्याचबरोबर रूक्षताही बरीच वाढते. त्वचेच्या ठिकाणी पीटिका येतात व त्या ठिकाणी कंडू (खाज सुटणे) हे लक्षणही बऱ्याच वेळा आढळते.

पित्तपापडा हा शीत गुणाचा, कडू रसाचा, पित्तघ्न व म्हणून ताप कमी करणारा आहे. पित्तपापडा पोटात घेतल्यानंतर त्यातील कार्यकारी द्रव्य हे त्वचेवाटे शरीराबाहेर टाकले जाते. म्हणजेच ते त्वचेपर्यंत सुलभतेने पोहोचून त्वचेमधील पित्तामुळे निर्माण झालेली दुष्टी दूर करण्यास मदत करते.

पित्तपापड्याच्या बरोबर या काढ्यामध्ये जेष्ठमध, नागरमोथा, वाळा, गुलाबकळी या सर्व थंडावा उत्पन्न करणाऱ्या औषधांची जोड मिळालेली आहे. त्यामुळेही उष्ण गुणाने वाढलेले पित्त कमी होण्यास मदत होते.

या प्रकारच्या सर्व तापांमध्ये तापाबरोबर खोकला हेही एक त्रासदायक असे लक्षण आढळते. हे कमी करण्यासाठी जेष्ठमधाचा चांगला उपयोग होतो.

परिपाठादि काढ्यामध्ये असलेल्या हिरड्यामुळे मृदुविरेचन होते. मृदुविरेचन हाही पित्तप्रशमनासाठी उपयुक्त असाच उपक्रम आहे.

वरील सर्व गुणधर्मामुळेच परिपाठादि काढा हा अशा प्रकारच्या तापामध्येच नव्हे, तर ताप येऊन गेल्यानंतही या तापामुळे राहणारी अनेक लक्षणे (After Effects) कमी करण्यासाठी वापरणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसून ४ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑



## १९. महासुदर्शन काढा

**घटकद्रव्ये :** त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी) हळद, रिंगणी, गुळवेल, धमासा, वावडिंग, कुटकी, पित्तपापडा, निंब, जेष्ठमध, कुड्याची साल, चित्रक अतिविष, भूनिंब, त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), नागरमोथा, वाळा, वेखंड, देवदार.

महासुदर्शन काढा हे ज्वरावरील एक प्रभावी औषध आहे. ज्वर म्हणजे ताप येणे. हा एक पित्ताचा रोग असून त्यामध्ये पित्त हे उष्ण गुणाने वाढलेले असते. अपथ्यकर आहार किंवा विहारामुळे वाढलेले दोष हे आमाशयातील (लहान आतडे) पाचक पित्तास व त्याच्या आश्रयाने राहणाऱ्या जाठराग्नीस आमाशयातून बाहेर काढून शरीरात अन्यत्र नेतात. यामुळेच अग्निमांद्य झाल्याने भूक नाहीशी होते. याउलट शरीरात त्वचेचे ठिकाणी पित्त वाढल्याने तेथे ज्वर (देहोष्मा वाढणे) हे लक्षण उत्पन्न होते.

ज्वरामध्ये यासाठी पित्तप्रशमन करणारी व जाठराग्नि वाढविणारी, भूक वाढविणारी औषधे वापरणे आवश्यक असते.

महासुदर्शन काढ्यातील हळद, गुळवेल, कुटकी, निंब, भूनिंब, पित्तपापडा, अतिविष, नागरमोथा, वाळा यांसारखी बहुसंख्य औषधे तिक्तरसाची (कडू) असून वाढलेला पित्तदोष कमी करणारी आहेत. कडू रसाची औषधे ही भूक वाढविणारी, तोंडाला रुची प्राप्त करून देणारी असतात. अग्नि वाढल्यामुळेच हे कार्य कडू रसाच्या औषधांकडून घडत असते.

ज्वरामध्येही विषमज्वर नावाचा जो एक प्रकार आहे त्यासाठी या महासुदर्शन काढ्याचा अधिक चांगला उपयोग होतो असे दिसते. विषमज्वर म्हणजे ठराविक काळाने (दर दोन किंवा तीन दिवसांनी) येणारा ताप. सामान्यत: विषमज्वरामध्ये थंडी वाजून ताप येत असतो. या प्रकारासाठी महासुदर्शनकाढा महत्त्वाचा आहे.

तापामध्ये अनेक वेळा त्रासदायक असा खोकला येऊ लागतो. महासुदर्शन काढ्यामधील रिंगणी, जेष्ठमध, पिंपळी, अतिविष, वेखंड यांसारखी द्रव्ये ही या लक्षणाचा नाश करणारी असल्याने महासुदर्शन काढा हा ज्वरातील खोकल्यासाठी अत्यंत उपयुक्त असा कल्प आहे.

याप्रमाणे महासुदर्शन काढा हा ताप व त्या अनुषंगाने निर्माण होणारी त्रासदायक लक्षणे यांचा नाश करण्यासाठी सुदर्शनचक्राप्रमाणे धावून येणारा कल्प आहे असे म्हणता येईल.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ४ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## २०. द्राक्षासव

**घटकद्रव्ये :** द्राक्षे, साखर, मध, धायटीची फुले, कंकोळ, लवंग, जायफळ, मिरे, चातुर्जात, पिंपळी, चित्रक, चव्य, पिंपळमूळ, चंदन, कापूर.

प्रथमत: द्राक्षे किंवा मनुका घेऊन त्यांचा काढा केला जातो. या काढ्यामध्ये कंकोलादि द्रव्यांची चूर्णे मिसळून त्याचबरोबर साखर व धायटीची फुले घालून संधानक्रिया (Alcoholic Fermentation) घडवून द्राक्षासव बनविले जाते.

द्राक्षे ही मधुर रसाची, शीत गुणाची, धातुवर्धन करणारी म्हणजेच बल्य किंवा बल प्राप्त करून देणारी असतात. त्याचप्रमाणे ती वात व पित्तदोषाचे शमनही करतात. या प्रकारे द्राक्षापासून बनविलेले आसव म्हणूनच अनेक रोगांमध्ये बल्य (Tonic) म्हणून वापरता येते.

राजयक्ष्मा (Tuberculosis, Pulmonary T. B.) या रोगामध्ये ताप असतो. शरीरातील सर्वच धातू क्षीण झालेले असतात. यामुळेच रोग्याचे वजन कमी झालेले असते. थकवा फारच जाणवत असतो. अशा अवस्थेमध्ये द्राक्षासव खरोखरच अमृतासम समजले जाते. द्राक्षे ही मधुर रसाची, शीत गुणाची व पित्तप्रशमन करणारी असल्याने, तापास कारणीभूत असणाऱ्या पित्ताचा प्रशम होत असल्याने, तापामुळे उत्पन्न होणारी दाहादि लक्षणे त्वरेने कमी होतात, तापही उतरतो. द्राक्षे ही मधुर रसाची व बल्य असल्याने धातुक्षय कमी करण्यासाठीही याचा उपयोग होतो.

राजयक्ष्म्यामध्ये जाठराग्निमांद्य फारसे असत नाही. परंतु धात्वग्निमांद्य मात्र फारच असते. (धातूंचे पोषण होण्यासाठी आवश्यक असणारा शरीरातील अग्नि तो धात्वग्नि). धात्वग्निमांद्य दूर करण्याचे, धात्वग्नि प्रदीप्त करून धातूंचे पोषण होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य आसवामुळे घडत असते. कारण आसवारिष्टे ही स्वभावत:च धात्वग्निवर्धन करण्यामध्ये श्रेष्ठ समजली जातात.

द्राक्षासवामध्ये द्राक्षांच्या जोडीला असणारी कंकोळ, लवंग, चातुर्जात, पिंपळी, चित्रक, चव्य, पिंपळमूळ, मिरे वगैरे औषधीद्रव्येही उत्तम दीपनपाचन म्हणजेच अग्निप्रदीप्त करून भूक वाढविणारी अशीच आहेत. विशेषत: मिरे तर केवल जाठराग्नीच नव्हे, तर धात्वग्नीही प्रदीप्त करण्यात अग्रगण्य असे द्रव्य आहे. या सर्व गुणांनी युक्त असणऱ्या औषधांची जोड मिळाल्याने द्राक्षासवाचे गुण प्रकर्षाने वाढत असतात.

द्राक्षासवामध्ये असणारी कंकोळ, पिंपळी व मिरे ही द्रव्ये श्वसनमार्गावरही कार्यकारी आहेत. विशेषत: फुफ्फुस हे यांचे कार्यक्षेत्र आहे. पिंपळीमुळे फुफ्फुसाला बल मिळते व राजयक्ष्म्यामध्ये फुफ्फुस या अवयवाची असणारी दुष्टी दूर होण्यास मदत होते.



कापूर हे औषध पोटात घेतले असता श्वसनवाटे शरीराबाहेर पडते. शरीराबाहेर पडत असताना कापूर हा फुफ्फुसातील कफाचे शोधन करतो. राजयक्ष्म्यामध्ये असणारे खोकला हे त्रासदायक लक्षण त्वरेने कमी करण्यासाठी द्राक्षासवाचा उपयोग करता येतो.

केवळ राजयक्ष्म्यामध्येच नव्हे, तर श्वसनमार्गातले जीर्णकास (Bronchitis), दमा (Asthma) किंवा यासारखे अन्य रोग यांचेवरही द्राक्षासव उपयुक्त ठरते.

द्राक्षासव हे या प्रकारे क्षुधा वाढविणारे, धात्वग्नि वाढविणारे व त्याचबरोबर बल्य असल्याने सामान्यत: जनरल टॉनिक म्हणूनही या औषधाचा व्यवहारामध्ये यशस्वीरीत्या उपयोग केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## २१. विडंगारिष्ट

**घटकद्रव्ये :** वावडिंग, पिंपळमूळ, रास्ना, इंद्रयव, पाठा, आवळकाठी, मध, धायटीची फुले, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडा, प्रियंगु, कांचनार साल, लोध्र, सुंठ, मिरे, पिंपळी.

वावडिंगाला संस्कृत नाव विडग असे आहे. वावडिंग ज्यामध्ये महत्त्वाचा घटक आहे ते विडंगारिष्ट होय.

यामध्ये प्रथमत: वावडिंग, पिंपळमूळ, रास्ना, इंद्रयव, पाठा, आवळकाठी यांचा काढा करून नंतर त्या काढ्यामध्ये उरलेल्या औषधांची चूर्णे मिसळून विडंगारिष्ट बनविले जाते. धायटीची फुले व मध यांचा उपयोग अरिष्ट उत्तम बनविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या संधानक्रियेसाठी (Alcoholic Fermentation) होत असतो.

विडंगारिष्ट हे कृमींसाठी (पोटातील जंत) उपयुक्त असे औषध आहे.

वावडिंगामुळे पोटात निर्माण झालेले जंत पडून जातात असा मात्र याचा अर्थ नव्हे. जंत पडून जाण्यासाठी आवश्यक असणाऱ्या इतर औषधांचा प्रयोग झाल्यानंतर विडंगारिष्ट वापरण्यास सुरुवात करावी. याच्या उपयोगाने वारंवार जंत निर्माण होण्याची जी प्रवृत्ती ती मात्र निश्चयाने थांबते.

जंत किंवा अभ्यंतर कृमी यांची उत्पत्ती होण्यासाठी भूक मंदावणे, अग्निमांद्य, उत्पन्न होणे हे एक महत्त्वाचे कारण असतेच. याचसाठी जंत वारंवार होण्याची सवय कमी करावयाची असेल तर जाठराग्नि वाढला पाहिजे, पचनशक्ती सुधारली पाहिजे. याच महत्त्वाच्या दृष्टिकोनातून विडंगारिष्ट बनविलेले आहे. पिंपळमूळ,

रास्ना, इंद्रयव ही सर्व औषधे कडू रसाची व त्यामुळेच अग्नि वाढविणारी अशी आहेत. दालचिनी, तमालपत्र, वेलची, प्रियंगु, सुंठ, मिरे, पिंपळी इत्यादी अनेक दीपन, पाचन म्हणजेच अग्नि वाढविणारी, पचनशक्ती वाढविणारी औषधे या वावडिंगाचे जोडीला मिसळली जातात ती याचसाठी.

विडंगारिष्टाच्या उपयोगाने सुताच्या धाग्याप्रमाणे दिसणारे वा इतर छोटे जंत (Thread Worms or Hook Worms), गांडूळासारखे दिसणारे मोठे लांब जंत (Common Round Worms) आदि सर्वच प्रकारचे जंत कमी होत असले तरी याचा उपयोग मुख्यत: मोठे लांब जंत (Common Round Worms) यासाठी अधिक चांगला होत असतो.

श्वित्र किंवा पांढरे कोड (Leucoderma) या त्वचरोगाची निश्चित कारणे अद्यापि माहीत झालेली नाहीत. परंतु कृमी (जंत) हे या रोगाचे एक कारण असू शकते असे म्हटले जाते. याचसाठी कोड वाढू नये किंवा झालेले कमी व्हावे यासाठी केल्या जाणाऱ्या इतर औषधांस विडंगारिष्टाची जोड देणे निश्चितच फायद्याचे ठरते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## २२. विडंगासव

**घटकद्रव्ये :** वावडिंग, पिंपळमूळ, रास्ना, इंद्रयव, पाठा, कुड्याची साल, धायटीची फुले, मध, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडा, प्रियंगु, कांचनार साल, लोध्र, सुंठ, मिरे, पिंपळी.

विडंगासवामध्ये विडंगारिष्टामधील सर्व घटकद्रव्ये असून त्यांचे जोडीला कुड्याची साल हे घटकद्रव्य अधिक आहे.

विडंगारिष्टाप्रमाणेच सर्व घटकद्रव्ये असल्याने याचाही उपयोग विडंगारिष्टाप्रमाणेच केला जातो. यामध्ये असणारे कुडा हे औषधीद्रव्य मोठ्या आतड्यावर कार्यकारी असून भूक वाढविणारे, पचनशक्ती वाढविणारे आहे. यामुळेच विडंगारिष्टापेक्षा विडंगासव अधिक उपयुक्त ठरते.

कुड्यामुळे मल बांधून येण्यास मदत होते. याचसाठी जंतांमुळे जेव्हा शौचास पातळ होते, जुलाब होतात (Diarrhoea) अशा अवस्थेत विडंगासव हे अधिक उपयोगी पडते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑



## २३. दशमूलक्वाथ

**घटकद्रव्ये :** कंटकारी, बृहति, शालिपर्णी, पृश्निपर्णी, गोखरू, बेल, टेंटू, पाटला, एरंड, काश्मरी.

या काढ्यामध्ये वर उल्लेखिलेल्या दहा वनस्पतींची मुळे वापरलेली असतात. या दहा वनस्पतींच्या मुळांपासून बनविलेला तो दशमूल काढा होय.

दशमूलक्वाथात वापरलेली सर्वच औषधीद्रव्ये ही उत्तम वातशमन करणारी औषधे म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यामुळेच अनेक प्रकारच्या वातरोगांसाठी उपयुक्त असे हे औषध आहे.

शरीरामध्ये वाताचा प्रकोप हा दोन वेगवेगळ्या प्रकारे घडत असतो. एका प्रकारामध्ये शरीरधातूंचा क्षय होऊन, त्यांचा ऱ्हास होऊन शरीरात रूक्षता वाढते व वात वाढतो. याउलट, दुसऱ्या प्रकारामध्ये शरीरातील वायूची जी प्राकृत गती असते त्या गतीस अडथळा आल्यास वाताचा प्रकोप होतो व त्यामुळे वाताची अनेक लक्षणे निर्माण होत असतात.

दशमूलक्वाथाचा उपयोग या दुसऱ्या प्रकारच्या वातरोगात होत असतो. म्हणूनच रुग्ण कृश असेल, दुर्बल असेल किंवा धातुक्षयाची इतर काही लक्षणे असतील तर मात्र दशमूलक्वाथाचा वापर करू नये.

अंग ठणकणे, पाठ, मान वा कंबर दुखणे, पोटऱ्या दुखणे इत्यादी अनेक प्रकारच्या वेदना वातामुळे होत असतात. या वेदना त्वरित कमी करण्याचे कार्य दशमूलक्वाथामुळे घडते. संधिगतवात (Infective Arthritis), आमवात (Rhumatic Arthritis); वातरक्त (Rhumatoid Arthritis किंवा Gout) इत्यादी रोगात असणाऱ्या संधिवेदना किंवा गृध्रसी (Sciatica) मध्ये असणारी वेदना यांची तीव्रता दशमूलक्वाथाने निश्चयाने कमी होते.

कंपवात (हात, पाय किंवा सर्वांगामध्ये कापरे भरणे), पक्षाघात किंवा अर्धांगवात (Hemiplegia), हातपाय आखडणे, आक्षेपक (झटके येणे) इत्यादी अनेक वातरोगांमध्येही दशमूलक्वाथ उपयोगी पडतो.

दशमूल काढा उत्तम वातानुलोमक (वाताची गती प्राकृत करणारा) असल्यानेच त्याचा उपयोग पोटात गुबारा धरणे, पोटात गुडगुडणे, शौचास साफ न होणे या लक्षणांसाठीही होतो. याच लक्षणांचे जोडीला असणारा उदरशूल (पोटात दुखणे) हे लक्षणही दशमूलक्वाथाने कमी होते.

मलावष्टंभ असेल तर दशमूलक्वाथाचा बस्ति (Enima) दिला असता त्वरित लाभ आढळतो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

देवदारु, पिंपळी, गजपिंपळी, जायफळ, रिंगणी, अतिविष, काकडशिंगी यांसारखी या काढ्यातील औषधे ही उत्तम कफनाशक असून यामुळेच या काढ्याचा उपयोग खोकल्यासाठीही केला जातो. विशेषत: ज्या खोकल्याबरोबर चिकट कफ पडतो अशा जुनाट खोकल्यावर आणि बरेच दिवस टिकून असणाऱ्या पडशावरही उपयुक्त म्हणून या औषधाची गणना करावी लागते.

देवदारु, सुंठ, काडेचिराईत, जायफळ, कुटकी, गुळवेल, अतिविष यांसारखी औषधे ही ज्वरघ्न म्हणजेच तापासाठी उपयोगी पडणारी आहेत. विशेषत: जीर्णज्वरासाठी (Chronic Fevers) याचा उपयोग करणे इष्ट ठरते.

यातील सर्वच औषधे ही रूक्ष, लघु असल्याने व ती अवरोध दूर करून वातशमन करणारी असल्याने स्थौल्यासाठी (शरीरात वाढलेली चरबी किंवा मेद कमी करून वजन कमी करण्यासाठी) इतर औषधांचे बरोबर त्यांना साहाय्यक म्हणूनही या काढ्याचा वापर केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## २६. रास्नापंचक काढा-रास्नादि काढा

**घटकद्रव्ये :** रास्ना, गुळवेल, देवदारु, सुंठ, एरंडमूळ.

रास्नादि काढा किंवा रास्नापंचक काढा या दोन्ही नावांनी हा कल्प उपलब्ध आहे. रास्ना वगैरे पाच घटकद्रव्यांपासून बनविला जाणारा हा काढा असल्यानेच यास रास्नापंचक काढा असे म्हटले जाते.

रास्ना ही वनस्पती कटु, तिक्त रसाची असून उष्णवीर्य आहे. वायू शीत गुणाने वाढला असताना होणाऱ्या वातविकारांसाठी याचा उपयोग होतो. वायूच्या प्राकृत गतीमध्ये किंवा मार्गामध्ये अडथळा उत्पन्न झाला, कोणताही अवरोध उत्पन्न झाला तर वाताचा प्रकोप होतो व त्यामुळेही अनेक प्रकारचे वातविकार उत्पन्न होतात. या प्रकारे निर्माण होणाऱ्या वातविकारांसाठी रास्ना ही वनस्पती उपयुक्त ठरते. रास्नाच्या उष्ण गुणांमुळे व कटु रसामुळे अवरोध दूर होण्यास मदत होते व त्यामुळेच वायूला आपली प्राकृत गती प्राप्त होऊन वातविकारांचे शमन होते.

रास्नापंचक काढ्यातील सर्वच औषधे ही या प्रकारची वातनाशक द्रव्ये असल्याने रास्नाचे गुणधर्मामध्ये अनेकपटीने वाढ होत असते.

वातविकारांमुळे उत्पन्न होणाऱ्या अनेकविध लक्षणांपैकी वेदना किंवा शूल हे लक्षण प्राधान्येकरून असणाऱ्या रोगांमध्ये रास्नापंचक काढ्याचा चांगला उपयोग



होतो. वेदना ही वाताचा शीत गुण वाढल्याने होत असते व हा वाढलेला शीत गुण कमी करण्याचे सामर्थ्य रास्नापंचकामध्ये निश्चित आहे. याचमुळे संधिवेदना असणारे संधिवात (Simple Infective Arhtritis), आमवात (Rhumatic Arthritis), वातरक्त (Rhumatoid Arthritis किंवा Gout) यांसारखे रोग रास्नापंचक काढ्याने त्वरित कमी होतात. वेदना प्रशमनासाठी वापरल्या जाणाऱ्या इतर कल्पांचे बरोबर रास्नापंचक काढ्याची जोड दिल्यास हमखास अपेक्षित गुण मिळतात.

यामध्ये असणारी गुळवेल व सुंठ ही औषधीद्रव्ये वातशमनाप्रमाणेच रक्तदोष दूर करण्यासही मदत करीत असल्याने रक्तदोष असणाऱ्या वातविकारांपैकी वातरक्त (Gout) व कोष्टुकशीर्ष (Tubercular Knee Joint) या रोगात या कल्पाचा अधिक लाभ आढळतो.

विश्वाचि (Brachial Neuritis), गृध्रसी (Sciatica) किंवा यासारख्या वेदना हे प्रमुख लक्षण असणाऱ्या रोगातही वेदना कमी करण्यासाठी रास्नापंचकाचा लाभदायक उपयोग केला जातो.

केवळ वेदना असतील तरच या कल्पाचा उपयोग होतो असे मात्र नव्हे. अन्य अनेक प्रकारच्या वातविकारांसाठीही रास्नापंचक काढा उपयोगी असतो. शरीराचा कोणताही भाग आखडल्याप्रमाणे वाटणे, कोणत्याही हालचाली मंदावणे, लचक भरणे, कंपवात, अर्धांगवात (Hemiplegia) यांसारख्या वातरोगातही हा कल्प निश्चित कार्यकारी आहे.

वातव्याधी निर्माण होताना तो जसा वायूचे गतीत आलेल्या अडथळ्यामुळे उत्पन्न होतो, तसाच तो काही वेळा धातुक्षयाने वात वाढूनही होत असतो. या धातुक्षयाने निर्माण होणाऱ्या वातविकारांमध्ये मात्र रास्नापंचक काढा हा कल्प कटाक्षाने टाळला पाहिजे. अशा धातुक्षयजन्य वातविकारांमध्ये जर रास्नापंचक काढा वापरला तर रूक्षता वाढून रोग अधिक वाढण्याचीच शक्यता असते. याचसाठी कृशव्यक्तींमध्ये, दुर्बल्य रुग्णांमध्ये रास्नापंचक काढा कधीही वापरता उपयोगी नाही.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## २७. रास्नासप्तक काढा

**घटकद्रव्ये :** रास्ना, गुळवेल, बाहवा, देवदारु, गोखरू, एरंडमूळ, पुनर्नवा.

या काढ्यामध्ये रास्ना वगैरे सात घटकद्रव्ये असल्याने या काढ्यास रास्नासप्तक काढा असे म्हणतात. या काढ्यामध्येही रास्नापंचक काढ्याप्रमाणेच बहुतांश घटकद्रव्ये

असून रास्नापंचकाप्रमाणेच हाही कल्प वापरला जातो. रास्नापंचकापेक्षा यामध्ये बाहवा, गोखरू व पुनर्नवा ती तीन द्रव्ये अधिक आहेत तर शुंठी हा घटक यातून गाळलेला आहे.

शुंठी हे एक ग्राही म्हणजेच मल बांधून करणारे औषधीद्रव्य आहे, तर बाहवा, गोखरू, पुनर्नवा ही तीनही मृदुविरेचन करणारी औषधे आहेत.

रास्नापंचकामध्ये वर्णिलेल्या सर्व वातविकारांसाठी हा कल्प उपयोगी आहे. पण त्यातही जर वरील लक्षणांचे जोडीला बद्धकोष्ठता असेल तर रास्नापंचकापेक्षा रास्नासप्तकाचा उपयोग करणे अधिक योग्य ठरते.

रास्नापंचकाप्रमाणे केवल गतिरोधामुळे किंवा मार्गावरोधामुळे वाढलेल्या वातामुळे निर्माण होणाऱ्या वातविकारांसाठीच याचा उपयोग होतो. धातुक्षयाने उत्पन्न होणाऱ्या वातविकारासाठी नव्हे, हे याही कल्पाचा उपयोग करताना निश्चितच लक्षात ठेवले पाहिजे.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## २८. महारास्नादि काढा

**घटकद्रव्ये :** रास्ना, धमासा, बला, एरंडमूळ, देवदारु, सुंठ, कपूरकाचरी, वेखंड, अडुळसा, हिरडा, चव्य, नागरमोथा, पुनर्नवा, गुळवेल, बडिशेप, गोखरू, अश्वगंधा, अतिविष, बाहवा, शतावरी, पिंपळी, कोरांटी, धने, रिंगणी, बृहति.

महारास्नादि काढ्यामध्ये रास्नापंचक वा रास्नासप्तक काढ्यामध्ये असलेली सर्व घटकद्रव्ये आहेतच, पण त्याचबरोबर आणखी इतर १६-१७ वातशामक औषधांची जोड या कल्पास दिलेली आहे.

महारास्नादि काढ्यातील सर्वच घटकद्रव्ये उत्तम वातनाशक आहेत. केवळ गतिरोधाने निर्माण झालेल्या वातविकारावरच नव्हे, तर धातुक्षयजन्य वातविकारासाठीही या महारास्नादि काढ्याचा उत्तम उपयोग होतो. या कल्पात असणारी बला, नागरमोथा, अश्वगंधा, शतावरी यांसारखी घटकद्रव्ये ही उत्तम धातुवर्धन करणारी म्हणजेच शरीरधातू वाढविणारी आहेत.

शरीरधातूंची वाढ चांगली व्हावी यासाठीच या कल्पामध्ये पिंपळी, धने, रिंगणी, सुंठ, वेखंड, कपूरकाचरी, यांसारखी औषधे उपयोगात आणलेली आहेत.

संक्षेपाने सांगावयाचे तर सर्व प्रकारचे वातविकारांवर मग तो विकार मार्गावरोधजन्य असो वा धातुक्षयजन्य असो, महारास्नादि काढ्याचा खरोखरच उत्तम उपयोग होतो.



याचसाठी सर्व प्रकारच्या, सर्व वयाच्या रुग्णांमध्ये होणाऱ्या वातविकारांमध्ये महारास्नादि काढा हा स्वतंत्रपणे किंवा इतर औषधांबरोबर अवश्य वापरला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## २९. भल्लातकादि काढा

**घटकद्रव्ये :** बिब्बा, गुळवेल, पुनर्नवा, सुंठ, देवदारु, हिरडा, दशमूळ.

बिब्ब्यालाच संस्कृतमध्ये भल्लातक असे म्हणतात. यावरूनच बिब्बा किंवा भल्लातक प्रमुख असणाऱ्या या काढ्याला भल्लातकादि काढा हे नाव दिलेले आहे.

बिब्बा हे तीक्ष्ण, उष्ण हे औषधीद्रव्य असून ते उत्कृष्ट वातहर औषध आहे. भल्लातक किंवा बिब्ब्याची अनेक व्यक्तींमध्ये विषलक्षणे (Allergy) आढळून येतात. म्हणून बिब्बा वापरताना नेहमी प्रथमतः या औषधाचा उपयोग अगदी अल्प प्रमाणात करून त्याची ॲलर्जी नाही याची खात्री करून घेणे अत्यावश्यक आहे. अंगाला खाज सुटणे, आग होणे, अंगावर पुरळ उठणे ही याची अगदी सुरवातीस दिसणारी असात्म्यत्वाची लक्षणे आहेत. या प्रकारची लक्षणे दिसल्यास बिब्ब्याचे कोणतेही औषध देणे लगेच बंद करणे आवश्यक आहे. विशेषतः पित्तप्रकृतीच्या व्यक्तींमध्ये किंवा पित्त व रक्त दोषामुळे उत्पन्न होणाऱ्या रोगांमध्ये बिब्बा वापरणे अपायकारक ठरत असते.

बिब्बा हा उष्ण, तीक्ष्ण, वातनाशक असल्याने अनेक प्रकारच्या वातरोगांमध्ये याचा उपयोग केला जातो. विशेषतः ज्या वातरोगांमध्ये वेदना हे लक्षण प्रमुख असते अशा रोगांमध्ये भल्लातकादि काढा अधिक उपयुक्त ठरतो. वेदना किंवा शूल हे लक्षण सामान्यतः वाताचा शीत व रूक्ष गुण वाढल्याने होत असते. बिब्बा हा तीक्ष्ण, उष्ण व स्निग्ध असल्याने म्हणजेच वेदनेस कारणीभूत असणाऱ्या वाताच्या विरोधी गुणधर्माचा असल्यानेच याचे उपयोगाने वातशमन होऊन वेदना कमी होत असतात.

सांधे दुखणे हे लक्षण संधिवात (Simple Infective Arthritis) आमवात (Rhumatic Arthritis) या दोन रोगांमधील प्रधान लक्षण आहे. यासाठी भल्लातकादि काढा उपयुक्त ठरतो. परंतु वातरक्त (Rhumatoid Arthritis किंवा Gout) आणि कोष्टुकशीर्ष (Tubercular Knee Joint) या रोगात मात्र संधिवेदना अधिक प्रमाणात असूनही भल्लातकादि काढा वापरता येत नाही. कारण या दोन्ही रोगांमध्ये वाताच्या जोडीला रक्तदुष्टीही असते व भल्लातकाचे उपयोगाने ही रक्तदुष्टी वाढण्याची शक्यताच अधिक असते.

गृध्रसी (Sciatica), विश्वाचि (Brachial Neuritis) यांसारख्या रोगांमध्येही वेदना कमी करण्यासाठी भल्लातकादि काढा वापरला जातो.

भल्लातकादि काढ्यातील दशमूळ, गुळवेल, देवदार, सुंठ, पुनर्नवा यांसारखी घटकद्रव्ये ही उत्तम वातनाशक अशीच औषधीद्रव्ये असल्याने भल्लातकादि काढ्याची गुणवत्ता केवल बिब्ब्याच्या उपयोगापेक्षा अनेक पटीने वाढत असते.

बिब्बा हे जसे वातविकारावरील वेदना कमी करणारे उत्तम औषध आहे तसेच ते आणखीही एका रोगासाठी श्रेष्ठ औषधीद्रव्य समजले जाते आणि तो रोग म्हणजे अर्श किंवा मूळव्याध (Piles) हा होय. अर्श किंवा मूळव्याधीच्या उत्पत्तीचे मूलभूत कारण अग्निमांद्य असते असे आयुर्वेद मानतो. या अग्निमांद्याचे निराकरण करून म्हणजेच अग्निमांद्य दूर करून अर्श कमी करण्याचे महत्त्वाचे कार्य भल्लातकाकडून होत असते. अर्थात बिब्ब्याचे कोणतेही कल्प वापरताना बिब्बा हा उष्ण, तीक्ष्ण गुणांचा असतो हे कधीही विसरून चालत नाही. मूळव्याधीमध्येही जर ती मूळव्याध स्रावी असेल म्हणजेच रक्त पडत असेल तर (Bleeding Piles) भल्लातकादि काढा कधीही वापरता येत नाही. फक्त ज्या प्रकारात केवळ मूळव्याधीचे मोड बाहेर येतात, शौचाचे वेळेस फार दुखते अशा शुष्क अर्शामध्येच भल्लातकादि काढा वापरणे इष्ट ठरते.

बिब्बा हा अग्निदीपनाप्रमाणेच स्तंभनासाठीही प्रसिद्ध आहे. म्हणूनच अतिसार (Diarrhoea), ग्रहणी (Chronic Colitis), प्रवाहिका (Dysentery) यांसारख्या रोगांमध्ये जर रक्तदुष्टी जोडीस नसेल तर भल्लातक हे एक उत्तम औषध समजले जाते. भल्लातकादि काढ्याचे उपयोगाने वरील रोगात होणारे जुलाब तर थांबतातच, पण त्याचबरोबर पोटात दुखणे, मुरडा धरणे आदि असणारी लक्षणेही कमी होतात.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा.

❑❑❑

## ३०. भल्लातकासव

**घटकद्रव्ये :** बिब्बा, आवळकठी, हिरडा, गुळवेल, साखर, धायटीची फुले, मध, लोहभस्म.

बिब्बा किंवा भल्लातक, आवळकाठी, हिरडा आणि गुळवेल यांचे चूर्णामध्ये पाणी मिसळून त्यात साखर, धायटीची फुले, मध घालून संधानक्रियेद्वारा (Alcoholic Fermentation) भल्लातकासव बनविले जाते. भल्लातकासव बनविताना त्यात लोहभस्मही मिसळलेले असते.



भल्लातकासवातील मुख्य कार्यकारी घटक म्हणजे भल्लातक किंवा बिब्बा हाच आहे. भल्लातकादि काढ्यामध्ये वर्णन केल्याप्रमाणे भल्लातकासव हेही वेदना कमी करण्याचे कार्य उत्कृष्टपणे करीत असते. याचसाठी भल्लातकादि काढ्याप्रमाणेच संधिवात (Simple Arthritis) व आमवातावरील (Rhumatic Arthritis किंवा Gout) उत्तम औषध म्हणून भल्लातकासवाचीही गणना केली जाते. भल्लातकादि काढ्याप्रमाणेच भल्लातकासवही गृध्रसी (Sciatica), विश्वाचि (Brachial Neuritis) यांसारख्या रोगांमध्ये वेदना कमी करण्यासाठी वापरले जाते. तसेच ते शुष्कार्श, अतिसार, प्रवाहिका, ग्रहणी यासारख्या रोगांवरही तितकेच उपयुक्त ठरते.

अर्थात भल्लातकादि काढा जेथे वापरणे अपायकारक ठरते अशा पित्तरोगांमध्ये, रक्तरोगांमध्ये व पित्तप्रकृतीच्या व्यक्तींमध्ये भल्लातकासवही वापरता येत नाही; हेही येथे नमूद करणे आवश्यक आहे.

याचबरोबर भल्लातकासवाचे असणारे आणखीही काही उपयोग अवश्य लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

कोणत्याही द्रव्यापासून केल्या जाणाऱ्या काढ्यापेक्षा त्या द्रव्यापासून बनविलेल्या आसवामध्ये त्या औषधांचे गुणकर्म वाढत असतात; ते अधिक सूक्ष्म, अधिक कार्यकारी बनत असते.

भल्लातकासवही भल्लातकादि काढ्यापेक्षा अधिक सूक्ष्म, अधिक कार्यकारी बनते. त्याचप्रमाणे आसवक्रियेमुळे भल्लातकासवात तीक्ष्णत्व अधिक आल्याने ते उत्तम कफघ्नही बनते.

भल्लातकासवाचा उपयोग श्वसनमार्गातील जीर्ण स्वरूपाचे रोगांवर चांगला होतो. दुष्ट पीनस (Chronic Rhinitis) म्हणजे वारंवार होणारे व टिकून राहणारे पडसे. यामध्ये निर्माण होणारी डोकेदुखी, डोके जड वाटणे, नाक चोंदणे, वारंवार शिंका येणे, ताप येणे अशा प्रकारची लक्षणे भल्लातकासवाने कमी होतात. इतकेच नव्हे, तर अशा प्रकारचे रोग पूर्णांशाने नष्ट करण्यासाठी भल्लातकासव फारच उपयुक्त ठरते.

ॲलर्जीमुळे अनेक वेळा शरीरातील रक्तधातूमधील Eosinophills नावाच्या पांढऱ्या पेशींमध्ये प्रमाणाबाहेर वाढ होते. यामुळेही अनेक वेळा श्वसनमार्गामध्ये पडसे, खोकला, इतकेच नव्हे तर दम्यासारखे (Bronchial Asthma) रोगही होऊ शकतात. या Eosinophellia वरील बिब्बा हे सर्वोत्कृष्ट औषध होय. सध्या बाजारात उपलब्ध असणारी इतर अनेक प्रकारची औषधे घेऊनही कमी न होणारा हा रोग भल्लातकासवाने मात्र निश्चयाने व त्वरेने कमी होतो.

वास्तविकपणे पाहता बिब्ब्याचीच ॲलर्जी अनेकांना असते. असे असूनही इतर

प्रकारच्या ॲलर्जीसाठी मात्र भल्लातक उपयुक्त ठरते. काट्याने काटा काढणे किंवा विषाने विषाचा नाश करणे आशाचपैकी हाही एक प्रकार आहे असे याबाबत म्हणता येईल.

ज्यास बिब्बा मानवत नाही त्यास तो देऊ नये, पण ज्याला मानवतो त्यास मात्र तो अमृतोपमेय ठरतो हे निश्चित.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३१. पुनर्नवादि काढा

**घटकद्रव्ये :** पुनर्नवा, दारुहळद, हळद, सुंठ, हिरडा, गुळवेल, चित्रक, भांर्गी.

पुनर्नवा हे औषधीद्रव्य उत्तम मूत्रल (Diuretic, लघवीचे प्रमाण वाढविणारे) व त्याचबरोबर मृदुविरेचक (Mild Purgative) आहे. या काढ्याचा उपयोग विशेषत: कफजशोथासाठी (Pylitis or Pylonephritis) होतो. या कफजशोथामध्ये सर्वांगावर सूज येते, त्यातही तोंडावर, डोळ्यांभोवती सूज अधिक असते. सुजेचे प्रमाण सकाळी अधिक असते तर सायंकाळी ते पुष्कळच कमी होते. या रोगामध्ये लघवीचे प्रमाण फारच कमी होते व मूत्रामधून Albumin जात असते आणि त्यामध्ये पूही जातो. (Pus Cells) पुनर्नवादि काढ्यामुळे लघ्वीचे प्रमाण वाढते व या रोगाची सर्वच लक्षणे यथावकाश कमी होत जातात.

पुनर्नवादि काढ्याचा उपयोग कफजशोथाप्रमाणेच मूत्रकृच्छ्रादि मूत्रमार्गाचे अन्य रोगांमध्ये मूत्राचे प्रमाण वाढविण्यासाठी केला जातो. या काढ्यात असणारी हळद, दारुहळद, सुंठ यांसारखी द्रव्ये ही रक्तशुद्धिकर तसेच मूत्रदोष दूर करणारी म्हणून उपयुक्त ठरतात. मूत्रावाटे जाणारे Albumin व Pus Cells चे प्रमाण आटोक्यात आणण्यास ती उपयुक्त आहेत.

केवल कफजशोथामध्येच नव्हे तर अन्य काही रोगांमध्ये शरीरावर येणाऱ्या सुजेसाठीही पुनर्नवादि काढ्याचा उपयोग होतो. हृद्रोग (Congestive Cardiac Failure), पांडु (Anaemia) यामध्ये येणारी सूज किंवा आघातजन्य सूजही (Traumatic Oedema) पुनर्नवादि काढ्याने कमी होते.

पुनर्नवा अनुलोमक वा मृदुविरेचक आहे. तसेच ते उत्तम दीपन, पाचन म्हणजेच भूक वाढविणारे, पचनशक्तीची वाढ करणारे औषध आहे. याचमुळे अग्निमांद्य (Indigesion), बद्धकोष्ठता (Constipation), जलोदर (Ascitis)



यांसारख्या रोगांमध्ये पुनर्नवादि काढा वापरला जातो. पुनर्नवा काढ्यातील सुंठ, भार्गी, चित्रक ही द्रव्ये दीपनपाचन कार्य वाढविण्यास समर्थ असतात.

पुनर्नवा व दारुहळद ही दोन्ही औषधे डोळ्यांना हितकर आहेत. डोळ्यांचे ठिकाणी होणारा दाह (जळजळ) हे लक्षण तर या काढ्याने त्वरित कमी होतेच, पण या काढ्याच्या नित्य सेवनाने दृष्टिदोष नाहीसा होऊन दृष्टि सुधारण्यासही मदत होते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३२. पुनर्नवासव

**घटकद्रव्ये :** पुनर्नवा, पाठा, दंतिमूळ, गुळवेल, चित्रक, रिंगणी, त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), गूळ, मध, धायटीची फुले.

पुनर्नवा व इतर औषधीद्रव्यांचे चूर्णात पाणी मिसळून गूळ, मध व धायटीची फुले एकत्रित करून संधानक्रियेद्वारा (Alcoholic Fermentation) पुनर्नवासव तयार केले जाते.

पुनर्नवादि काढ्याप्रमाणेच पुनर्नवासव हेही कफजशोथ (Pylitis or Pylonephritis) किंवा अन्य कारणाने येणारा शोथ (सूज, Oedema) यावर उपयुक्त आहेच. काढ्यापेक्षा आसव हे जास्त सूक्ष्म म्हणजेच अल्प प्रमाणात अधिक कार्यकारी असे होत असल्याने पुनर्नवादि काढ्यापेक्षा पुनर्नवासव वापरणे अधिक उपयुक्त ठरते.

पुनर्नवासवामध्ये पुनर्नवादि काढ्यापेक्षा काही घटकद्रव्ये वेगळीही आहेत हेही येथे लक्षात घ्यावयास हवे.

पुनर्नवाचे गुणकर्म सांगताना पुनर्नवा ही कासहर द्रव्यांमध्ये (खोकल्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांमध्ये) अग्रगामी आहे असे म्हटलेले आहे. पुनर्नवाचा हा गुण वाढविण्याचे कार्य पुनर्नवासवामधील रिंगणीसारखी द्रव्ये करीत असतात. शिवाय आसवक्रिया केल्यानेही खोकला कमी करण्याचे कार्यात निश्चितच वाढ झालेली असते. याचसाठी अनेक प्रकारच्या खोकल्यांसाठी पुनर्नवासव लाभदायक ठरते. बऱ्याच दिवसांपासून असणारा खोकला, विविध प्रकारची औषधे घेऊनही कमी न होणारा खोकला यामध्ये पुनर्नवासवाने होणारा लाभ खरोखरच अप्रतिम असतो.

पुनर्नवासव हे खोकल्याप्रमाणेच श्वसनमार्गावरील अन्य व्याधींमध्ये विशेषत: तमकश्वासामध्ये (Bronchial Asthma) उपयुक्त ठरते. पुनर्नवा ही हृदयाला बल देणारी असल्याने हृद्रोगावरील (Congestive Cardiac Failure) एक उत्तम औषधी

आहे. पुनर्नवासवाचे उपयोगाने हृदयाचा वाढलेला आकार कमी होतो, त्याचप्रमाणे हृद्रोगामध्ये येणारी सूज, खोकला, दम लागणे आदि लक्षणेही यामुळे त्वरेने कमी होतात. पुनर्नवा ही रक्तवर्धन करणारी आहे व यामुळेच पांडुरोगामध्ये (Anaemia) अन्य लोहकल्पांबरोबर पुनर्नवासव वापरणे लाभदायक ठरते.

ज्वर म्हणजे ताप येणे. या ज्वर रोगामध्ये विषमज्वर म्हणून एक प्रकार असतो. विषमज्वरामध्ये थंडी वाजून ठराविक कालाने ताप येतो. यामध्येसुद्धा चातुर्थिक विषमज्वरामध्ये (दर तिसऱ्या दिवशी येणारा ताप) पुनर्नवासव वापरणे इष्ट ठरते. पुनर्नवासवातील गुळवेल व त्रिफळा यांसारखी औषधीद्रव्ये पुनर्नवासवाचे ज्वरघ्न गुण प्रकर्षाने वाढवीत असतात.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३३. वरुणादि काढा

**घटकद्रव्ये :** वरुण किंवा वायवर्णा, पाषाणभेद, सुंठ, गोखरू.

वरील द्रव्यांपासून बनविलेल्या काढ्यातील वरुण किंवा वायवर्णा हा प्रमुख घटक आहे. वरुण ही वनस्पती उत्तम मूत्रल आहे. मूत्रल म्हणजे मूत्राचे प्रमाण वाढविणारी. त्याचबरोबर वरुण भेदनही आहे. भेदन म्हणजे तुकडे करणारी, छेदणारी वनस्पती. वरुणामुळे मूत्रमार्गामध्ये कोठेही असणाऱ्या मूतखड्याचे (Urinary Stone) भेदन होते म्हणजेच तो फुटून त्याचे अगदी बारीक बारीक तुकडे होतात. मूत्रमार्गातील मूतखडा शरीराबाहेर निघून जाण्यासाठी प्रथमतः त्याचे बारीक तुकडे होणे हे आवश्यक असते. असे जर झाले तरच ते बाहेर पडू शकतात. वरुणादि काढ्याकडून हे काम होत असल्यानेच हा कल्प मूतखड्यासाठी वापरला जातो.

जर हा मूत्राश्मरी (मूतखडा) फार मोठा असेल तर मात्र शस्त्रकर्म करून तो काढून टाकावा लागतो. ज्या रोग्यांमध्ये शस्त्रकर्म करून मूतखडा काढून टाकला जातो, त्या रोग्यांमध्येही शस्त्रकर्मानंतर वरुणादि काढ्याचा उपयोग करणे इष्ट ठरते. यामुळे पुन्हा नवीन मूतखडा होण्याची प्रवृत्ती रोखली जाते.

उतारवयामध्ये अनेक पुरुषांमध्ये पौरुषग्रंथींची वाढ होऊ लागते (Enlarged Prostate). अशा रुग्णांमध्ये वरुणादि काढ्याचा नित्य उपयोग केल्यास पौरुषग्रंथींची होणारी ही वाढ थांबवून शल्यकर्म टाळता येते.

पाषाणभेद, गोखरू ही औषधेसुद्धा वरुणाप्रमाणेच मूत्रल असल्याने वरुणाचे गुमकर्मांमध्ये वाढ करण्यास उपयुक्त ठरतात.



वरुण हे औषधीद्रव्य गुल्मासाठीही वापरतात. गुल्म म्हणजे शरीरात आतल्याबाजूस उत्पन्न होणारी गाठ. या गुल्माची वाढ रोखण्यासाठी व ही उत्पन्न झालेली गाठ आतल्या आत जिरविण्यासाठी वरुणादि काढा यशस्वीरीत्या वापरला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३४. कनकासव

घटकद्रव्ये :- धोत्रा, अडुळसा, जेष्ठमध, पिंपळी, कंटकरी (भुईरिंगणी), नागकेशर, सुंठ, भांर्गी, तालीसपत्र, धायटीची फुले, मनुका, साखर, मध.

कनक म्हणजे धोत्रा. धोत्र्याच्या पानांचा उपयोग यामध्ये विशेषत्वाने केला जातो म्हणून हे कनकासव.

तमकश्वास म्हणजेच दम्यावरील (Asthma) हे एक खरोखरच जीवदायी, प्राणदायी असे औषध आहे.

दम्यामध्ये फुफ्फुसांचे स्नायूंचे ठिकाणी असणारे प्राकृत शैथिल्य नाहीसे होऊन या स्नायूंचा संकोच उत्पन्न होतो व त्यामुळे फुफ्फुसाच्या हालचाली मंदावतात, Spasm येतो, ती नीट प्रसरण पावू शकत नाहीत व या सर्वांमुळे श्वासोच्छ्वासास अडथळा उत्पन्न होतो. जीवनास आवश्यक असा प्राणवायू (ऑक्सिजन) पुरेशा प्रमाणात न मिळाल्याने तो मिळविण्यासाठी श्वासोच्छ्वासाची गती प्रमाणाबाहेर वाढते व दमा उत्पन्न होतो.

दम्याच्या या प्रकारच्या अटॅकमध्ये रुग्णास त्वरित फायदा मिळण्यासाठी, त्वरेने बरे वाटण्यासाठी कनकासवाचा फारच चांगला उपयोग होतो. धोत्रा हा उत्तम Antispasmodic आहे. धोत्र्याच्या उपयोगाने फुफ्फुसाचे ठिकाणी आलेला Spasm कमी होतो. फुफ्फुसाच्या ठिकाणचा संकोच दूर झाल्याने त्यांच्या हालचाली प्राकृत होतात व दम्याची लक्षणेही जलद गतीने कमी होतात. रुग्णास त्वरित आराम मिळतो.

कनकासवातील धोत्र्याखेरीज असणारी इतर औषधेही श्वसनमार्गावर कार्यकारी अशीच आहेत. अडुळसा, जेष्ठमध, पिंपळी, रिंगणी, तालिसपत्र ही सर्व घटकद्रव्ये कफ कमी करणारी असल्याने दम कमी करण्यास उपयुक्त अशीच आहेत.

केवळ दम्याच्या वेगावस्थेतच (During Attack) नव्हे, तर इतर वेळीही दम्याचा ॲटॅक येऊ नये याकरिताही कानकासवाचा उपयोग चांगला होतो. कनकासव वापरल्याने दम्याचा ॲटॅक येण्याचा कालावधी लांबविता येतो व ॲटॅक आलाच तर तो अगदी सौम्य स्वरूपाचा असतो.

श्वसनमार्गावर कार्यकारी कफनाशक अशा द्रव्यांनी युक्त असलेले हे कनकासव खोकल्यासाठीही उत्तम औषध गणले जाते. विशेषतः ज्या प्रकारच्या खोकल्यामध्ये वारंवार ढास लागते, कफ घशातच अडकून राहिल्याप्रमाणे वाटतो व तो कफ फार कष्टाने बाहेर पडतो, अशा प्रकारात कफ लवकर सुटावा, ढास कमी व्हावी यासाठी कनकासवाचा फारच चांगला उपयोग होतो असे दिसते. Bronchitis साठी एक महत्त्वाचे औषध म्हणून या कानकासवाचा उल्लेख करता येईल.

धोत्रा हा Antispasmodic असल्याने याचा उपयोग अन्यत्रही केला जातो. पोटामध्ये वारंवार होणारा मुरडा कमी करण्यासाठी कनकासवाचा उपयोग होतो. पोटात दुखणे, विशेषतः ज्यास Colic म्हटले जाते अशा प्रकारच्या तीव्र स्वरूपाच्या उदरशूलामध्ये (पोटात दुखणे) वेदना त्वरेने कमी करण्यासाठी हे कनकासव काही वेळा उपयुक्त ठरते.

**प्रमाण :** १) दम्यासाठी १-१ चमचा, वारंवार, प्रत्येक अर्ध्या तासाने दम कमी होईपर्यंत

२) अन्य कारणासाठी २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३५. वासकासव

**घटकद्रव्ये :** अडुळसा, गूळ, धायटीची फुले, दालचिनी, वेलदोडा, जायपत्री, नागकेशर, कंकोळ, त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), वाळा.

वासा म्हणजेच अडुळसा. या वासा किंवा अडुळशापासून बनते ते वासकासव होय. प्रथमतः अडुळशाचा काढा करून त्यात गूळ, धायटीची फुले मिसळून त्यात बाकी इतर औषधांची चूर्णे मिसळून वासकासव बनविले जाते.

वासा किंवा अडुळसा ही औषधी वनस्पती कफनाशक असून याचा विशेष उपयोग श्वसनमार्गावर होत असतो खोकल्यासाठी वासा व त्यापासून बनणारे सर्वच कल्प हे निश्चयाने उपयोगी पडतात.

ज्या खोकल्यामध्ये ढास फार लागते अशा वातप्रधान खोकल्यामध्ये तसेच ज्यामध्ये कफ फार पडतो अशा कफप्रधान खोकल्याच्या प्रकारामध्येही वासकासव उपयुक्त ठरते.

वासकासवाचा उपयोग केल्याने तमकश्वास किंवा दम्यामध्ये (Bronchial Asthma) खोकल्याबरोबर येणारा कफ लवकर सुटतो व त्यामुळे तात्पुरते का होईना पण



रुग्णास आराम मिळतो.

वासा हे रक्तप्रसादन करणारे, रक्तस्तंभन करणारे औषध म्हणून प्रसिद्ध असून उर्ध्वग रक्तपित्त या रोगात जेव्हा मुखावाटे वा नाकावाटे रक्तस्राव होत राहतो त्यावेळी वासकासवाचे उपयोगाने लक्षणे त्वरित कमी होतात.

राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis) या रोगामध्येही खोकला हे अतित्रासदायक असे लक्षण असते. काही वेळा खोकल्याबरोबर रक्तही पडते. हा खोकला व त्यावाटे पडणारे रक्त यासाठी वासकासव हा अत्यंत लाभदायक असा कल्प आहे.

खोकल्यावाटे बाहेर पडणाऱ्या कफामुळे येणारी मुखदुर्गंधी हे लक्षणही वासकासवाच्या उपयोगाने दूर होते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३६. वासादि काढा

**घटकद्रव्ये :** अडुळसा, गुळवेल, त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), कुटकी, काडेचिराईत, निंब, मध.

प्रथमतः सर्व औषधांचा काढा करून त्या काढ्यात मध मिसळून तो वापरला जातो.

अडुळसा किंवा वासा हे प्रमुख घटक असणारा हा काढा वासकासवाप्रमाणेच खोकल्यावरील एक प्रमुख औषधीकल्प आहे. दमा (Bronchial Asthma), राजयक्ष्मा (Tuberculosis) यासारख्या रोगांमध्ये असणारा खोकला व रक्तपित्तामध्ये होणारा रक्तस्राव थांबविण्यासाठीही वासादि काढ्याचा वासकासवाप्रमाणेच उपयोग होतो.

याखेरीज अन्य काही अवस्थांसाठीही वासादि काढा वापरलाजातो. या काढ्यामध्ये अडुळशाच्या बरोबर असणारी गुळवेल, कुटकी, काडेचिराईत ही सर्व औषधे तिक्त (कडू) रसाची असून ज्वरघ्न म्हणजेच ताप कमी करणारी आहेत. या सर्व औषधांनी वाढलेले पित्त कमी होते व म्हणूनच ती ज्वरघ्न म्हणून उपयोगी पडतात. वातकफज्वरामध्ये ताप व खोकला ही दोन लक्षणे प्रधानतया असतात. ही दोन्ही लक्षणे वासादि काढ्याचे उपयोगाने नाहीशी होतात.

खोकला व ताप ही दोन लक्षणे प्रामुख्याने असणारा आणखी एक रोग म्हणजे राजयक्ष्मा (T. B.) या रोगामध्येही वासादि काढा उपयुक्त ठरतो.

वासादि काढ्यामध्ये असणारी तिक्तरसाची, पित्तशामक अशी अडुळशास मिळणारी जोड रक्तपित्तातील केवळ रक्तस्राव थांबविण्यास उपयोगी अशी नव्हे, तर याबरोबरच संपूर्ण रोग बरा करण्याचे सामर्थ्य असणारी आहे. याचसाठी रक्तपित्तातील प्रमुख औषधांचे यादीत वासादि काढ्याचा समावेश केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ४ वेळा, पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३७. असनादि क्वाथ

**घटकद्रव्ये :** असन, लोध्र, अर्जुन, करंज, खदिर, शिंशपा, श्वेतचंदन, रक्तचंदन, पळसाची साल, सागाची साल, सुपारी, इंद्रयव.

असनादि काढा हा प्रमेहावरील किंवा मधुमेहावरील (Diabetes Melitis) एक महत्त्वाचा कल्प आहे.

प्रमेह किंवा मधुमेहामध्ये क्लेदक कफाची विकृती झालेली असते. आपण घेतलेल्या आहारापासून शरीरधातूंची उत्पत्ती योग्य तऱ्हेने होण्यासाठी धात्वग्नि प्राकृत स्थितीमध्ये असणे आवश्यक असते. प्रमेही रुग्णांमध्ये धात्वग्नीची विकृती झालेली असते. विशेषत: मेद व मांस यांचे धात्वग्नि बिघडलेले असतात. पचनाचे वेळी, धातूंचे निर्मितीचे वेळी धातू हा योग्य तऱ्हेने न उत्पन्न होता अपाचित, टाकाऊ असा भाग बनतो. यालाच क्लेद अशी संज्ञा दिली जाते. या क्लेदामुळेच या रोगाची पुढील सर्व संप्राप्ति घडत असते.

प्रमेही रुग्णांमध्ये हा क्लेद कमी करणे ही महत्त्वाची चिकित्सा ठरते. हा क्लेद कमी करण्यासाठी कषायरसाची (तुरट) औषधीद्रव्ये वापरावी लागतात. असनादि काढ्यातील सर्वच घटकद्रव्ये ही कषाय रसाची (तुरट) असून म्हणूनच क्लेद कमी करणारी व यामुळेच मधुमेहावर उपयुक्त अशी आहेत.

असन हे द्रव्य मूत्रसंग्राहक म्हणजेच मूत्राचे प्रमाण कमी करणारे आहे. मधुमेहामध्ये बहुमूत्रता असते. म्हणजेच मूत्रचे प्रमाण अतिशय वाढलेले असते. मधुमेहातील बहुमूत्रता हे लक्षण कमी करण्यासाठी असनादि काढ्याचा उपयोग होतो.

मधुमेहामध्ये काही वेळा त्वचेवर विस्फोट होतात. यांनाच प्रमेहपिडिका असे म्हटले जाते. असन, करंज, खदिर, शिंशपा ही द्रव्ये कुष्ठघ्न, त्वचारोग दूर करणारी असल्याने त्यांचा उपयोग प्रमेहपीडिकांसाठीही होत असतो.

मधुमेही रुग्णामध्ये कोणत्याही कारणाने शरीरास झालेली जखम लवकर भरून येत नाही. असन, करंज, लोध्र, अर्जुन, खदिर या असनादि काढ्यातील द्रव्यांमुळे



जखमा लवकर भरून येण्यास साहाय्य मिळते. क्लेद कमी होऊन नवीन धातूंची उत्पत्ती चांगल्या तऱ्हेने झाल्यानेच हे व्रणरोपणाचे काम घडून येते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून ३ वेळा पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३८. जम्ब्वासव

**घटकद्रव्ये :** जांभळाचा रस, गूळ, मध, धायटीची फुले, वंगभस्म.

जांभळाच्या रसाबरोबर गूळ, मध, धायटीची फुले व वंगभस्म मिसळून संधानक्रिया करून जम्ब्वासव बनविले जाते.

जांभूळ हे मधुर (गोड), अम्ल (आंबट), कषाय (तुरट) रसाचे असले तरी त्यामध्ये कषायरस हा प्राधान्यत: आढळतो. जांभूळ हे लघु आणि रूक्षही आहे. याच गुणामुळे जांभूळ हे उत्तम दाहप्रशमन (आग किंवा जळजळ कमी करणारे), स्तंभन व त्वचारोग दूर करणारे आहे.

वरील गुणांनी युक्त अशा जांभळापासून बनविलेले जम्ब्वासव हे मधुमेहावरील (Diabetes) एक उत्तम औषध समजले जाते. मधुमेहामध्ये असणारी बहुमूत्रता (वारंवार व अधिक प्रमाणात लघ्वी होणे) आणि हातापायाची जळजळ ही लक्षणे जम्ब्वासवाने कमी होतात. जांभळाने यकृतातील साखरेच्या पचनाचे कार्याचे नियंत्रण होते व त्यामुळेच लघ्वी व रक्त यामधील वाढलेले साखरेचे प्रमाणही (Urine and Blood Sugar) नियंत्रित करण्यास जम्ब्वासव उपयुक्त ठरते.

वंगभस्म हेही एक जम्ब्वासवातील घटकद्रव्य आहे. वंगभस्म हे उत्कृष्ट ओजोवर्धक म्हणून ओळखले जाते. ओज म्हणजेच रसरक्तादि सप्तशरीरधातूंचा सारभाग होय. जेव्हा सर्व शरीराधातूंची उत्पत्ती, त्यांचे पोषण उत्तम प्रकारे होत असते त्या वेळेस या ओजाची निर्मिती होते. जर धातुपोषण योग्य झाले नाही तर अपाचित असा टाकाऊ भाग अधिक प्रमाणात तयार होतो, यासच क्लेद अशी संज्ञा आहे. मधुमेहात धातुपोषण बिघडलेले असते. त्यामुळेच क्लेद अधिक प्रमाणात निर्माण होतो. ओजक्षय होणे व थकवा वाटणे आणि वजन कमी होणे अशीही लक्षणे उत्पन्न होतात. वंगभस्माने ओज वाढते म्हणजेच रसरक्तादि सर्वच धातूंचे पोषण योग्य तऱ्हेने होते व त्यामुळेच क्लेद कमी होतो, थकवा कमी होतो आणि मधुमेहही कमी होण्यास निश्चयाने मदत होते.

मधुमेही रुग्णामध्ये अनेक वेळा त्वचेवर फोड येतात, व्रण उत्पन्न होतात. अशा रुग्णामध्ये कोणत्याही कारणाने झालेल्या जखमा लवकर भरून येत नाहीत.

वंगभस्माने नवीन धातूंची निर्मिती चांगली होत असल्याने, तसेच क्लेद, स्राव कमी होत असल्याने, मधुमेही रुग्णास होणाऱ्या जखमा त्वरेने बऱ्या होतात व प्रमेहपीडिकाही कमी होतात.

जांभूळ हे कषाय (तुरट) रसाचे असल्याने ते मोठ्या आतड्यामध्ये शोषणाचे कार्य करते व म्हणूनच जम्ब्वासवाचा उपयोग अतिसार (Diarrhoea), प्रवाहिका (Dysentery) यासारख्या रोगामध्ये येणारी द्रवमलप्रवृत्ती (Loose Motions) कमी करण्यासाठीही केला जातो.

जांभूळ हे रक्तस्तंभन करणारे म्हणजेच रक्तस्राव कमी करणारे वा थांबविणारे असल्याने विशेषत: रक्तातिसारावर (Loose Motions with Mucus and Blood) याचा अधिक उपयोग होतो. याच कारणामुळे रक्तप्रदरावरही जम्ब्वासवाचा लाभदायक प्रयोग केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ३९. अशोकारिष्ट

**घटकद्रव्ये :** अशोक, गूळ, धायटीची फुले, नागरमोथा, सुंठ, देवदारु, त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), अडुळसा, चंदन.

प्रथमत: अशोकाचा काढा करून त्या काढ्यामध्ये जिरे वगैरे द्रव्यांची चूर्णे मिसळून गूळ व धायटीची फुले यांचे साहाय्याने संधानक्रिया (Alcoholic Fermentation) केली जाते व या प्रकारे अशोकारिष्ट तयार होते.

अशोक हे वनस्पतिद्रव्य तिक्त, कषाय रसाचे (कडू व तुरट), रूक्ष व शीत असे औषध आहे. याचे विशेष कार्य गर्भाशय व योनिप्रदेशी घडते. याचमुळे अशोकारिष्ट हे स्त्रीरोगावरील एक उत्तम औषध म्हणून ओळखले जाते. रक्तप्रदर, श्वेतप्रदर, कष्टार्तव (मासिक पाळीचे वेळी होणारा त्रास) व गर्भाशयशैथिल्य या सर्व रोगांसाठी या अशोकारिष्टाचा चांगला उपयोग होतो.

रक्तप्रदरामध्ये योनिगत रक्तस्राव हा अत्यधिक प्रमाणात असतो. अशोकाच्या शीत गुणामुळे व कषाय (तुरट) रसामुळे हा रक्तस्राव कमी होतो. अशोकारिष्टामध्ये अशोकाचे जोडीस असणारी नागरमोथा, चंदन, अडुळसा ही सर्व औषधेही अशीच शीत गुणाची व रक्तस्तंभन करणारी आहेत. यामुळेही रक्तप्रदर कमी होण्यास मदत होते.

श्वेतप्रदरामध्येही (Leucorrhoea, अंगावर पांढरे जाणे) कषाय किंवा तुरट रसाची व शीत गुणांचीच औषधे उपयोगी पडतात. तुरट रसाच्या औषधीद्रव्यांमुळे



स्राव कमी होत असल्यानेच श्वेतप्रदरही कमी होतो.

स्त्रियांमध्ये अनेक रोगांमुळे किंवा दौर्बल्यामुळे वा कालमानाप्रमाणे गर्भाशयाचे ठिकाणी असणारे प्राकृत संहनन (Tone) कमी होते व त्या अवयवाचे ठिकाणी शैथिल्य येते. या शैथिल्यामुळे मासिक पाळीचे वेळी कंबर दुखणे, मांड्या दुखणे, ओटीपोटामध्ये दुखणे अशा प्रकारची लक्षणे उत्पन्न होतात. अशोकामुळे गर्भाशयाचे ठिकाणचे शैथिल्य कमी होत असल्याने या कष्टार्तवाचे अवस्थेवरही अशोकारिष्ट उत्तम लाभदायक आढळून येते.

कष्टार्तव (मासिक पाळीचे वेळी होणारा त्रास) किंवा इतर स्त्रीरोगांसाठी बाजारात उपलब्ध असणारी औषधे ही बऱ्याच वेळा शरीरातील अंतस्रावापासून (Harmonal Preparations) बनविलेले असतात व त्यांचे शरीरावर काही वाईट परिणामही संभवतात. अशोकारिष्टाने मात्र केवळ लाभच होतो. त्यामुळे शरीरावर कोणताही अनिष्ट परिणाम घडत नाही हे विशेष.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ४०. लोध्रासव

**घटकद्रव्ये :** लोध्र, कपूरकाचरी, पुष्करमूळ, वेलची, मूर्वा, वावडिंग, त्रिफळा, चव्य, प्रियंगु, सुपारी, इंद्रवारुणी, काडेचिराईत, कुटकी, भांर्गी, इंद्रयव, तगर, चित्रक, पिंपळमूळ, कोष्ठ, अतिविष, पाठा, नागकेशर, तमालपत्र, जिरे, नागरमोथा, गूळ, धायटीची फुले.

सर्व औषधांची चूर्णे, पाणी, गूळ व धायटीची फुले एकत्रित करून संधानक्रियेद्वारा (Alcoholic Fermentation) लोध्रासव तयार केले जाते.

लोध्रासव हा अनेक प्रकारच्या स्त्रीरोगांसाठी उपयुक्त असा एक कल्प आहे. या कल्पाचा उपयोग श्वेतप्रदरासाठी (अंगावर पांढरे जाणे) होत असतो. लोध्र हे कषाय रसाचे (तुरट) असल्याने स्राव कमी करण्याचे कार्य याकडून घडत असते. लोध्राचे विशेष कार्यक्षेत्र आहे गर्भाशय व त्यामुळेच योनिगत श्वेतस्राव कमी होतो. लोध्रासवातील कपूरकाचरी, प्रियंगु, सुपारी, कोष्ठ, नागरमोथा यासारखी घटकद्रव्ये लोध्राचे गुणकर्मांमध्ये वाढ करीत असतात.

श्वेतप्रदराप्रमाणेच रक्तप्रदरासाठीही म्हणजेच योनिगत रक्तस्राव अधिक असताना (Bleeding P. V.) लोध्रासवाचा चांगला उपयोग होतो. नागकेशर, नागरमोथा, सुपारी, तगर यांसारखी सर्व द्रव्ये यासाठी उपयुक्त ठरतात.

अनेक स्त्रियांमध्ये आढळणारे आणखी एक त्रासदायक लक्षण म्हणजे कष्टार्तव हे होय. मासिक पाळीचे वेळी होणारा त्रास म्हणजे कष्टार्तव. हे लक्षण कमी करण्यासाठी लोध्रासव वापरले जाते. मासिक पाळीमध्ये असणारी अनियमितता जाऊन नियमितपणा येण्यासाठीही लोध्रासवाचा लाभदायक प्रयोग केला जातो.

काही स्त्रियांमध्ये वारंवार गर्भस्राव होणे (Abortion) हे लक्षणही आढळते. बरेच वेळा यामागचे कोणतेही निश्चित कारण सांगणे कठीण होते. अशा स्त्रियांमध्ये गर्भस्राव होण्याची प्रवृत्ती थांबविण्यासाठीही लोध्रासव यशस्वीरीत्या वापरले जाते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ४१. बाळंतकाढा नं. १

**घटकद्रव्ये :** दशमूळ, धायटीची फुले, मनुका, गूळ, पिंपळी, कोष्ठ, जटामांसी, नागरमोथा.

बाळंतकाढा नं. १, नं. २ व नं. ३ असे तीन वेगवेगळे कल्प बाजारात मिळतात. यांपैकी बाळंतकाढा नं. १ हा प्रसूतीनंतर पहिल्या १० दिवसांसाठी वापरला जातो. दहाव्या दिवसापासून एक महिना पूर्ण होईपर्यंत बाळंतकाढा नं. २ वापरतात. तर बाळंतकाढा नं. ३ हा एक महिन्यानंतर पुढील तीन ते चार महिने वापरावयाचा कल्प आहे.

बाळंतकाढा नं. १, नं. २ व नं. ३ या सर्वांना जरी काढा असे म्हटले जात असले तरी हे खरे काढे नसून हे सर्व आसवारिष्ट पद्धतीने बनविलेले कल्प आहेत. म्हणजेच संधानक्रिया (Alcoholic Fermentation) करूनच हे कल्प बनविले जातात. असे असले तरी रूढीमुळे यांना काढा हे नामाभिधान प्राप्त झालेले आहे.

बाळंतकाढा नं. १ करताना दशमूळांचा काढा करून त्या काढ्यात धायटीची फुले, मनुका, गूळ, यांचे जोडीला पिंपळी, नागरमोथा, जटामांसी व कोष्ठ यांची चूर्णे मिसळून संधानक्रियेद्वारा अरिष्ट बनविले जाते.

प्रसूतीच्या वेळी मातेस होणाऱ्या तीव्र स्वरूपाच्या वेदना, त्यावेळी होणारे श्रम तसेच प्रसूतीचे वेळी होणारा रक्तस्राव या कारणांमुळे फार थकवा येतो व वातप्रकोपही होत असतो. यामुळे सर्व अंग दुखतही असते.

याच काळामध्ये पुढील उपद्रव टाळण्यासाठी मातेस फार जपावे लागते, फार काळजी घ्यावी लागते.

या काळात निर्माण होणारा वातप्रकोप व त्याबरोबर उत्पन्न होणारी इतर लक्षणे कमी करण्यासाठी या दशमूळांपासून बनविलेला बाळंतकाढा नं. १ चा निश्चयाने



लाभ होतो. दशमूळ हे औषधीद्रव्य उत्कृष्ट वातशामक आहेच, पण पिंपळी, जटामांसी, कोष्ठ, नागरमोथा ही घटकद्रव्ये ही दशमूळाचे वातनाशनाचे कार्यात वाढ करीत असतात. म्हणूनच बाळंतकाढा नं. १ हा उत्कृष्ट वातनाशक कल्प बनतो.

गरोदर अवस्थेमध्ये गर्भाशयाचा आकार वाढलेला असतो. हा आकार प्रसूतीनंतर पुन्हा पूर्ववत होणे आवश्यक असतो. ही क्रिया व्यवस्थित घडावी याकरिताही बाळंतकाढा नं. १ चा चांगला उपयोग होतो. यामध्ये असणारी कोष्ठ, नागरमोथा, पिंपळी ही घटकद्रव्ये गर्भाशयसंकोचक असल्यानेच हे घडून येते.

प्रसूतीनंतर स्तन्य उत्पन्न होते. बालकास मिळणारे हे स्तन्य (दूध) अधिक प्रमाणात उत्पन्न व्हावे यासाठी बाळंतकाढा नं. १ मधील नागरमोथा हा साहाय्यकारी होत असतो.

याचसाठी प्रत्येक स्त्रीने प्रसूतीनंतरच्या पहिल्या काही दिवसांसाठी अवश्य वापरला पाहिजे असा हा कल्प आहे.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ४२. बाळंतकाढा नं. २

**घटकद्रव्ये :** देवदार, अडुळसा, इंद्रयव, दंतिमूळ, मंजिष्ठा, हळद, दारुहळद, रास्ना, नागरमोथा, वावडिंग, खैर, गुळवेल, चित्रक, ओवा, कुटकी, धायटीची फुले, गूळ, मध, शिरीष, तगर, श्वेतचंदन, तेजपत्र, पिंपळी, नागकेशर, वेलची, दालचिनी.

प्रथमत: देवदार ते कुटकी या संगितलेल्या औषधांचा काढा केला जातो. त्या काढ्यामध्ये धायटीची फुले, गूळ, मध, आणि शिरीष वगैरे उरलेल्या औषधांची चूर्णे मिसळून संधानक्रियेद्वारा हा कल्प बनविला जातो.

बाळंतकाढा नं. २ हा कल्प प्रसूतीनंतर दहा दिवस झाल्यानंतर पुढे एक महिना पूर्ण होईपर्यंत वापरावयाचा औषधीकल्प आहे. या काळामध्ये प्रामुख्याने गर्भाशयसंकोचक, स्तन्यजनन, स्तन्यदोष दूर करणारी व बल्य अशी उपाययोजना अपेक्षित असते.

बाळंतकाढा नं. १ मध्ये असणारी पिंपळी, नागरमोथा यासारखी गर्भाशय संकोचक द्रव्ये या कल्पामध्येही आहेतच. शिवाय यांचे जोडीला हळद, दारुहळद, चित्रक, तगर यासारखी गर्भाशयशोधन, गर्भाशयसंकोचक (गर्भाशयाचा आकार प्राकृत करणारी) असे घटकही या कल्पामध्ये आहेत. यामुळे गर्भाशयाचा आकार

पूर्णांशाने प्राकृत स्थितीमध्ये येण्यास निश्चयाने मदत होत असते.

याच कल्पात स्तन्यवृद्धी करणारी (दुधाचे प्रमाण वाढविणारी), स्तन्यदोष असतील तर ते दूर करणारी औषधेही आवश्यक असतात. देवदारु, मंजिष्ठा, हळद, कुटकी, नागरमोथा ही सर्वच द्रव्ये स्तन्य वाढविण्यास व स्तन्यदोष दूर करण्यास उपयुक्त ठरतात.

प्रसूतीनंतरच्या या काळामध्ये थोडेसेही अपथ्य घडले तर अनेक प्रकारचे रोग होण्याची शक्यता असते. ही शक्यता टाळण्यासाठी अनेक दीपन, पाचन म्हणजेच जाठराग्नि वाढविणारी, भूक वाढविणारी, खाल्लेल्या अन्नाचे पाचन उत्तम करणारी अशा औषधांची जोड बाळंतकाढा नं. २ या कल्पास दिलेली असते. सूतिकारोग टाळण्यासाठी खरोखरच आवश्यक असा हा कल्प आहे.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ४३. बाळंतकाढा नं. ३

**घटकद्रव्ये :** लोहासव, अश्वगंधारिष्ट, अर्जुनारिष्ट.

प्रसूतीनंतर एक महिना पूर्ण झाल्यानंतर पुढे ३-४ महिने सातत्याने हा कल्प वापरला जातो. या कल्पामध्ये लोहासव, अश्वगंधारिष्ट व अर्जुनारिष्ट यांचे समभाग मिश्रण असते.

प्रसूतीनंतर एक महिना पूर्ण होईतो गर्भाशय प्राकृत स्थितीत आलेला असतो. स्तन्यप्रवृत्तीही योग्य तऱ्हेने होत असते. प्रसूतीच्या वेळी झालेल्या वातप्रकोपाचे शमन बहुतांश होऊन त्यामुळे उत्पन्न होणारी लक्षणेही नाहीशी झालेली असतात. अशावेळी अपेक्षित असतात ते बल्य असे औषधी प्रयोग.

बालकाचे पोषण आईच्या दुधावाटे होत असल्याने आईला पौष्टिक, बलवर्धक अशा आहाराची आवश्यकता असते. पण केवळ बल्य आहारावरच विसंबून न राहता बल वाढविणाऱ्या औषधीद्रव्यांची जोड देणे अधिक लाभदायक ठरते.

लोहासव, अश्वगंधारिष्ट व अर्जुनारिष्ट हे तीनही कल्प उत्तम बलवर्धन करणारे म्हणून नेहमीच वापरले जातात, हे या तीन कल्पांचे स्वतंत्रपणे वर्णन करताना सविस्तरपणे मांडले आहेच. या तीनही औषधांचा एकत्रित प्रयोग केल्याने 'अधिकस्याधिकं फलम्' या न्यायाने उत्कृष्ट लाभ होत असतो हे निश्चित.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑



## ४४. अर्जुनारिष्ट-पार्थाद्यारिष्ट

**घटकद्रव्ये :** अर्जुन, शिवणफळ, धायटीची फुले, साखर.

अर्जुन व शिवणफळ या दोन वनस्पतींपासून धायटीची फुले व साखर यांचे साहाय्याने संधानक्रिया करून बनविले जाणारे अरिष्ट ते अर्जुनारिष्ट होय. अर्जुनाला संस्कृतमध्ये दुसरे नाव आहे पार्थ. यावरूनच अर्जुनारिष्टाला पार्थाद्यारिष्ट असेही नाव काही वेळा दिले जाते. या दोन्ही नावांनी हे औषध उपलब्ध होत असते.

अर्जुन ही वनस्पती हृदयाला बल देणारी वनस्पती आहे. या वनस्पतीच्या उपयोगाने हृदयाची पोषणक्रिया चांगली होते. हृद्पेशींना बल मिळते. हृद्स्पंदन (छातीत धडधडणे, हृदयाची गती वाढणे) हे लक्षण अर्जुनामुळे त्वरित कमी होते. याचमुळे अर्जुनारिष्ट हे हृद्रोगावरील विशेषत: ज्या हृद्रोगामध्ये हृद्दौर्बल्यामुळे जेव्हा हृदयाचा आकार वाढतो, त्यामुळे दम लागतो व पायावर किंवा सर्वांगावर सूज येते, त्या वेळेस अर्जुनारिष्ट विशेष उपयुक्त ठरते. अर्जुनामुळे सूक्ष्म रक्तवाहिन्यांचा संकोच होत असल्याने सर्वांगावर येणारी सूज कमी होण्यास मदत होते.

अर्जुनारिष्टामधील अर्जुन व शिवणफळ दोन्ही उत्तम बल्य असल्याने कोणत्याही रोगांमुळे येणारे दौर्बल्य कमी होण्यासाठी रोगोत्तर कालामध्ये (Convalescent Period) अर्जुनारिष्ट वापरणे लाभदायक ठरते. विशेषत: दीर्घ मुदतीच्या तापानंतर येणारा थकवा, अशक्तपणा कमी करण्यासाठी याचा विशेष फायदा दिसून येतो.

अर्जुनारिष्ट हे याप्रमाणे हृद्रोगावरील प्रमुख औषध तसेच बल्य औषध म्हणून प्रसिद्ध असले तरी याचे जोडीला इतर अनेक रोगांमध्येही याचा उपयोग होतो. अर्जुन हे कषाय (तुरट) रसाचे, शीत गुणाचे, रक्तस्तंभन करणारे असे औषध आहे. याचमुळे रक्तातिसार (Loose Motions with Blood), रक्तप्रदर (Bleeding P.V.) अर्शासारख्या रोगामध्ये रक्तस्राव त्वरित थांबविण्यासाठी अर्जुनारिष्ट वापरले जाते.

श्वेतप्रदरावरही (Leucorrhoea अंगावर पांढरे जाणे) अर्जुनारिष्टाचा लाभदायक प्रयोग केला जातो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ४५. अश्वगंधारिष्ट

**घटकद्रव्ये :** अश्वगंधा (आस्कंद), मंजिष्ठा, हिरडा, हळद, दारुहळद, जेष्ठमध, रास्ना, विदारी, अर्जुन, त्रिवृत्त, अनंतमूळ, उपळसरी, चंदन, रक्तचंदन, चित्रक,

गूळ, धायटीची फुले, नागरमोथा, वेखंड, सुंठ, मिरे, पिंपळी, तमालपत्र, नागकेशर, वेलची, दालचिनी.

प्रथमतः अश्वगंधेपासून चित्रकापर्यंतच्या औषधीघटकांची चूर्णे घेऊन त्यांचा पाण्याबरोबर काढा केला जातो. तयार झालेल्या काढ्यामध्ये धायटीची फुले व गूळ घालून संधानक्रिया घडविली जाते. त्याचवेळी नागरमोथा, चंदन, वेखंड वगैरे उरलेल्या द्रव्यांची चूर्णेही काढ्यात मिसळली जातात. या प्रकारे अश्वगंधारिष्ट तयार होते.

अश्वगंधा ही एक उत्तम बल्य म्हणजेच शरीरधातूंची योग्य प्रकारे वाढ करून शरीरास उत्तम बल मिळवून देणारी वनस्पती आहे. म्हणूनच कोणत्याही कारणाने आलेला अशक्तपणा, दौर्बल्य कमी करण्यासाठी अश्वगंधारिष्ट वापरले जाते. अनेक वेळा शरीरधातूंचा क्षय झाल्याने वातप्रकोप होऊन श्रम, मूर्च्छा, कानात अनैसर्गिक आवाज येणे, सर्वांग ठणकणे इत्यादी अनेक प्रकारची वातलक्षणे उत्पन्न होतात. अश्वगंधारिष्टाचे उपयोगाने धातुक्षयजन्य अशा वरील लक्षणांचे तसेच वातविकारांचे शमन होत असते.

रोगांमुळे येणारे दौर्बल्य कमी करण्यासाठीही या अश्वगंधारिष्टाचा चांगला उपयोग होतो. विशेषतः लहान वयामध्ये अशा अवस्थेत अश्वगंधारिष्ट हे अधिक उपयुक्त ठरते. अश्वगंधारिष्टातील विदारी, अर्जुन यासारखी औषधे ही अश्वगंधेचे गुणकर्म वाढविण्यास मदत करतात.

अश्वगंधा हे हृद्बल्य म्हणजेच हृदयाला बल देणारे औषधीद्रव्य असल्याने हृद्रोगामध्ये येणारी दम लागणे, सूज येणे यासारखी लक्षणे कमी करण्यासाठी अश्वगंधारिष्ट लाभदायक ठरते. अर्जुन हे यातील द्रव्यही हृद्बल्य असेच आहे.

अश्वगंधेच्या बल्य या गुणाचे जोडीला या द्रव्याचा मूत्रल म्हणजेच मूत्राचे प्रमाण वाढविणे हाही एक महत्त्वाचा गुण, सूज कमी करण्यासाठी उपयुक्त ठरतो. मूत्रल या गुणामुळेच मूत्रकृच्छ्र (वारंवार थोडी थोडी मूत्रप्रवृत्ती होणे), सदाह मूत्रप्रवृत्ती (Burning Micturition) यासारख्या मूत्रमार्गातील रोगांसाठीही अश्वगंधारिष्ट हे एक प्रधान औषध आहे. या कल्पातील हळद, दारुहळद, अनंतमूळ, उपळसरी, चंदन, नागरमोथा यासारखी औषधी घटकद्रव्येही अश्वगंधेचे मूत्रल गुण वाढविण्यास साहाय्यकारी अशी आहेत.

अश्वगंधा हे एक वाजीकर औषध आहे. वाजीकर म्हणजे पुरुषाची कामशक्ती वाढविणारे द्रव्य. अश्वगंधारिष्टाचा या वाजीकरणासाठीही अनेक वेळा यशस्वीपणे उपयोग केला जातो.

अश्वगंधारिष्ट हे सर्वच धातूंची वाढ करण्यास उपयुक्त असल्याने जनरल टॉनिक म्हणूनही या औषधाचा लाभ मिळत असतो.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑



## ४६. बलारिष्ट

**घटकद्रव्ये :** बला, अश्वगंधा, गूळ, धायटी, क्षीरकाकोली, एरंडमूळ, रास्ना, वेलची, प्रसारणी (लाजळू), लवंग, वाळा, गोखरू.

प्रथमतः बला व अश्वगंधा यांचा काढा करून त्यात इतर द्रव्यांची चूर्णे गूळ व धायटीच्या फुलांसह मिसळून संधानक्रियेद्वारा (Alcoholic Fermentation) बलारिष्ट तयार केले जाते.

बला ही वनस्पती शीत वीर्याची असून मधुर रसाची आहे. ही स्निग्ध असून एक उत्तम बल्य म्हणजेच शरीरास बल प्राप्त करून देणारी वनस्पती असून हिचे उपयोगाने सर्व शरीरधातूंची विशेषतः मांसधातूची वाढ चांगल्या तऱ्हेने होत असते.

वातरोग म्हणून जे रोग ओळखले जातात ते दोन प्रकारचे असतात. एका प्रकारात शरीरधातूंचा क्षय होतो व त्यामुळे शरीरात रूक्षता उत्पन्न होऊन वात वाढतो व अनेक प्रकारचे वातरोग निर्माण होतात. याउलट दुसऱ्या प्रकारात वायूच्या प्राकृत गतीमध्ये, मार्गामध्ये अडथळा आल्याने वायू वाढतो व अनेक विकारात्मक लक्षणे उत्पन्न करतो. हे जे दोन प्रकारचे वातविकार त्यामध्ये परस्पर भिन्न अशी चिकित्सा करणे आवश्यक ठरते.

बलाचा उपयोग धातुक्षयाने उत्पन्न झालेल्या वातविकारांसाठी उत्तम प्रकारे होत असतो.

बलाप्रमाणेच या कल्पामध्ये असणारी अश्वगंधा, क्षीरकाकोली ही औषधीद्रव्येही मधुर रसाची, शीत, तसेच स्निग्धता उत्पन्न करणारी व म्हणूनच बल्य असून बला या वनस्पतीचे गुणधर्म वाढविणारी आहेत. बलारिष्टामधील एरंडमूळ, रास्ना, प्रसारणी, गोखरू ही औषधेही उत्तम वातनाशक अशीच आहेत.

या सर्व गुणकर्मांमुळेच बलारिष्टाचा उपयोग अनेक प्रकारचे वातविकारांसाठी होतो. मांसक्षय किंवा मांसशोष (Wasting of the Muscles) कार्श्य किंवा कृशता, कंप (Tremers), निद्रानाश (झोप न येणे), भ्रम (Vertigo) अशा रोगांवर विशेष कार्यकारी असा हा कल्प आहे.

स्थूल व्यक्तीपेक्षा कृश व्यक्तीमध्ये आढळून येणाऱ्या वातविकारांसाठी हे औषध अधिक उपयुक्त ठरते, असेही संक्षेपाने म्हणता येईल.

केवल रोगावस्थेतच नव्हे, तर एरवीही वजन वाढावे म्हणून, जनरल टॉनिक म्हणून या बलारिष्टाचा निश्चयाने फायदा होतो असे आढळते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ४७. लोहासव

**घटकद्रव्ये :** त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), ओवा, वावडिंग, नागरमोथा, चित्रक, गूळ, धायटीची फुले, लोहभस्म.

सर्व वनस्पतीद्रव्यांची चूर्णे लोहभस्माबरोबर पाण्यात मिसळून गूळ व धायटीची फुले यांचे साहाय्याने संधानक्रिया (Alcoholic Fermentation) करून लोहासव बनविले जाते.

लोहासव हे पांडु रोगावरील (Anaemia) एक महत्त्वाचे औषध. पांडु रोगामध्ये रक्तधातू कमी होतो, त्याचप्रमाणे मेदादि इतर शरीरधातूंचे ठिकाणी शैथिल्य येत असते. त्यांची उत्पत्ती योग्य तऱ्हेने होत नाही.

रक्तास रक्तवर्ण ज्यामुळे येतो ते हिमोग्लोबीन नावाचे द्रव्य असते. या हिमोग्लोबिनमध्ये लोहक्षार हा प्रमुख घटक असतो. म्हणूनच हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी म्हणजेच रक्तधातूची निर्मिती चांगल्या तऱ्हने होण्यासाठी लोहाची (Iron) जरुरी असते.

शरीरात घेतलेल्या लोहकल्पांचे नीट शोषण होऊन त्यांचे रक्तात रूपांतर होणे हेही महत्त्वाचे आहे. अन्यथा औषधावाटे घेतलेले लोह शरीरात शोषले न जाता तसेच मलावाटे शरीराबाहेर निघून जाते. लोहभस्म हे शरीरात शोषण होणाऱ्या व रक्तात रूपांतर होणाऱ्या लोहकल्पांमध्ये श्रेष्ठ आहे.

याशिवाय, या लोहाचे शोषण चांगले व्हावे व त्यापासून रक्तनिर्मितीचे कार्यास चांलना मिळावी यासाठीच लोहासवामध्ये त्रिकटु, चित्रकासारख्या जाठराग्नि वाढविणाऱ्या व त्याचबरोबर रक्तधातू निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या, धात्वग्नि वाढविणाऱ्या औषधांची जोड दिलेली आहे.

लोहामुळे अनेक वेळा बद्धकोष्ठता हे लक्षण उत्पन्न होण्याची शक्यता असते. हे येणारे लक्षण टाळण्यासाठी व त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या उपद्रवापासून बचाव होण्यासाठी या कल्पामध्ये मृदुविरेचन करणाऱ्या त्रिफळेची योजना केलेली आहे.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑

## ४८. सारस्वतारिष्ट

**घटकद्रव्ये :** ब्राह्मी, शतावरी, विदारीकंद, हिरडा, वाळा, आले, बडिशेप, मध, धायटीची फुले, पित्तपापडा, त्रिवृत्त, बेहडा, पिंपळी, लवंग, वेखंड, कुष्ठ,



अश्वगंधा, गुळवेल, वेलदोडा, वावडिंग, दालचिनी, सोन्याचा पत्रा.

प्रथमत: ब्राह्मी, शतावरी, विदारीकंद, हिरडे, वाळा, आले, बडिशेप यांचा काढा तयार केला जातो. या काढ्यामध्ये मध, धायटीची फुले व उरलेल्या इतर सर्व औषधीद्रव्यांची चूर्णे मिसळून संधानक्रिया (Alcoholic Fermentation) करून सारस्वतारिष्ट तयार केले जाते. संधानक्रिया सुवर्णपात्रामध्ये म्हणजेच सोन्याच्या भांड्यात करावी असे शास्त्रात सांगितले जाते. परंतु व्यवहारामध्ये हे अशक्य असल्याने संधानक्रिया चालू असेपर्यंत त्या मिश्रणात सोन्याचा पत्रा बुडवून ठेवून औषधावर सुवर्णाचा संस्कार घडवून आणला जातो.

ब्राह्मी ही वनस्पती मेध्य म्हणजेच बुद्धी वाढविण्यासाठी प्रसिद्ध आहे. धी, धृती आणि स्मृती म्हणजेच आकलनशक्ती, धारणाशक्ती व स्मरणशक्ती हे जे बुद्धीचे तीन प्रकार, या सर्वांसाठीच ब्राह्मीचा उपयोग होतो. शतावरी, विदारीकंद, अश्वगंधा, कुष्ठ, वेखंड यासारखी या कल्पामध्ये असणारी औषधीद्रव्येही अशीच मेध्य आहेत व त्यामुळेच सारस्वतरिष्ट हे बुद्धिवर्धनासाठी उत्कृष्ट औषध म्हणून गणले जाते.

हा कल्प बनविताना त्यावर केलेले सुवर्णाचे संस्कारही महत्त्वाचे आहेत. सुवर्णसंस्कारामुळे मनोदोषावर कार्य करणाऱ्या या सारस्वतारिष्टाचे गुण अनेक पटीने वाढतात.

अनेक बालकांची बौद्धिक पातळी (I. Q.) कमी असते. अशा बुद्धिमांद्य असणाऱ्या; मतिमंद मुलांमध्ये लहानपणापासूनच सारस्वतारिष्टाचा उपयोग करणे लाभदायक ठरते.

अपस्मार (Epillepsy) या रोगामध्ये स्मृती कमी होणे किंवा संपूर्ण स्मृतिनाश हे लक्षण आढळते. या रोगामध्येही स्मरणशक्ती वाढविण्यासाठी, तसेच अपस्माराचे वेग (फिटस्) येऊ नयेत किंवा कमीत कमी दोन फिटस्‌मधील कालावधी वाढावा, त्यांची तीव्रता कमी व्हावी यासाठी सारस्वतारिष्ट निश्चितच उपयुक्त ठरते.

अपस्माराप्रमाणेच मनोदोषांमुळे निर्माण होणारा आणखी एक रोग म्हणजे उन्माद. उन्माद म्हणजे वेड लागणे. या रोगामध्येही इतर औषधांना सारस्वतारिष्टाची जोड देणे इष्ट ठरते.

आजच्या धकाधकीच्या, धावपळीच्या जीवनामध्ये अनेक कारणांनी मन:स्वास्थ्य बिघडते. ते बिघडू नये वा काही कारणाने मन:स्ताप झालाच तर त्यापासून अधिक त्रास होऊ नये यासाठीही सारस्वतारिष्टासारखे दुसरे प्रभावी औषध नाही.

केवळ रोगावस्थेतच नव्हे तर प्राकृतावस्थेतही मुलांची बुद्धी विशेषत: स्मरणशक्ती वाढावी यासाठी या औषधाचा चांगला उपयोग करून घेता येतो ·

मनोदोष दूर करणारे हे उत्कृष्ट औषध आहे हे खरे, पण याचा अर्थ केवळ

याचसाठी ते उपयुक्त ठरते असा मात्र नव्हे.

शरीरातील सर्वच धातूंची योग्य प्रमाणात वाढ करून शरीराधातूंना बल मिळवून देण्यासाठीही या कल्पाचा उपयोग होतो. यातील शतावरी, विदारीकंद, अश्वगंधा यांसारखी औषधे व त्यावर केला जाणारा सुवर्णाचा संस्कार यामुळे हे घडते. याचबरोबर या सारस्वतारिष्टामध्ये असणारी अनेक सुगंधी व दीपन, पाचन (अग्नि वाढविणारी) औषधे रोग्याचा अग्नि वाढवून, खाल्लेल्या अन्नाचे योग्यप्रकारे पचन घडवून आणून रोग्याचे बल वाढविण्यास मदत करतात.

बुद्धी वाढविणे, ज्ञान प्राप्त करून घेणेसाठी खरोखरच सरस्वतीचाच वरदहस्त आवश्यक असतो. असा वरदहस्तच या कल्पाने मिळत असल्याने या कल्पास सारस्वतारिष्ट असे संबोधले जाते.

**प्रमाण :** २ ते ४ चमचे, दिवसातून २ वेळा, जेवणानंतर पाण्याबरोबर.

❑❑❑



## कल्पांची अकारानुक्रमे यादी


| क्र. नाव | पृष्ठ. क्र | क्र. नाव | पृष्ठ. क्र |
|---|---|---|---|
| १ अभयारिष्ट | २२ | २४ पुनर्नवादि काढा | ४० |
| २ अमृतारिष्ट | २३ | २५ पुनर्नवासव | ४१ |
| ३ अरविंदासव | १६ | २६ बब्बुलाद्यारिष्ट | १९ |
| ४ अर्जुनारिष्ट-पार्थाद्यारिष्ट | ५३ | २७ बलारिष्ट | ५५ |
| ५ अश्वगंधारिष्ट | ५३ | २८ बाळंतकाढा नं. १ | ५० |
| ६ अशोकारिष्ट | ४८ | २९ बाळंतकाढा नं. २ | ५१ |
| ७ असनादि काढा | ४६ | ३० बाळंतकाढा नं. ३ | ५२ |
| ८ उशीरासव | १४ | ३१ भल्लातकादि काढा | ३७ |
| ९ कनकासव | ४३ | ३२ भल्लातकासव | ३८ |
| १० कुटजारिष्ट | १८ | ३३ महामंजिष्ठादि काढा | ११ |
| ११ कुमारीआसव | ७ | ३४ महारास्नादि काढा | ३६ |
| १२ खदिरारिष्ट | ११ | ३५ महासुदर्शन काढा | २७ |
| १३ चंदनासव | १५ | ३६ मंजिष्ठादि काढा | १० |
| १४ जम्ब्वासव | ४७ | ३७ रास्नापंचक काढा | ३४ |
| १५ जीरकाद्यारिष्ट | २० | ३८ रास्नासप्तक काढा | ३५ |
| १६ तिक्तपंचक काढा | २४ | ३९ रोहितकारिष्ट | ९ |
| १७ दशमूल काढा | ३१ | ४० लोध्रासव | ४९ |
| १८ दशमूलारिष्ट | ३२ | ४१ लोहासव | ५६ |
| १९ दार्व्यादि काढा- | | ४२ वरुणादि काढा | ४२ |
| देवदार्व्यादि काढा | ३३ | ४३ वासकासव | ४४ |
| २० द्राक्षासव | २८ | ४४ वासादि काढा | ४५ |
| २१ दुरालभादि काढा | | ४५ विडंगारिष्ट | २९ |
| धमासा काढा | १७ | ४६ विडंगासव | ३० |
| २२ पर्पटादि काढा | | ४७ सारस्वतारिष्ट | ५६ |
| परिपाठादि काढा | २६ | ४८ सारिवाद्यासव | १२ |
| २३ पंचकोलासव | २१ | | |


❑❑❑

## रोगानुरूप औषधे

अग्निमांद्य - जीरकाद्यारिष्ट, पंचकोलासव, पुनर्नवासव

अजीर्ण - कुमारीआसव, जीरकाद्यारिष्ट, पंचकोलासव

अतिसार - कुटजारिष्ट, जीरकाद्यारिष्ट, बब्बुलाद्यारिष्ट, भल्लातकादि काढा, भल्लातकासव

अर्धांगवात - दशमूलकाढा, दशमूलारिष्ट, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा.

अपस्मार - सारस्वतारिष्ट

आमवात - दशमूल काढा, दशमूलारिष्ट, देवदार्व्यादि काढा, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा.

आक्षेपक - दशमूलारिष्ट

इसब - महामंजिष्ठादि काढा, मंजिष्ठादि काढा

उन्माद - सारस्वतारिष्ट

उन्हाळे लागणे - उशीरासव, चंदनासव, सारिवाद्यासव

उपदंश - सारिवाद्यासव

कफजशोथ - पुनर्नवादि काढा, पुनर्नवासव

कष्टार्तव - अशोकारिष्ट, लोध्रासव

कंप - बलारिष्ट

कास - द्राक्षासव, पुनर्नवासव

काविळ - अभयारिष्ट, कुमारीआसव

कांजिण्या - परिपाठादि काढा

कृमि - कुमारीआसव, विडंगारिष्ट, विडंगासव

कोड- महामंजिष्ठादि काढा, मंजिष्ठादि काढा, विडंगारिष्ट

खरूज - खदिरारिष्ट, महामंजिष्ठादि काढा, मंजिष्ठादि काढा

खोकला - द्राक्षासव, पुनर्नवासव

गर्भपात - लोध्रासव

गर्भस्राव - लोध्रासव



गर्भाशय संकोचक - बाळंत काढा नं. १, नं. २

ग्रहणी - कुटजारिष्ट, जीरकाद्यारिष्ट, पंचकोलासव, बब्बुलाद्यारिष्ट, भल्लातकादि काढा, भल्लातकासव

गुल्म - वरुणादि काढा

गृध्रसी - दशमूल काढा, दशमूलारिष्ट, देवदार्व्यादि काढा, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा.

गोवर - परिपाठादि काढा

जलपार्श्व - कुमारीआसव

जलोदर - अभयारिष्ट, कुमारी आसव, पुनर्नवादि काढा, पुनर्नवासव

जंत - कुमारीआसव, विडंगारिष्ट, विडंगासव

ज्वर - अमृतारिष्ट, तिक्तपंचक काढा, देवदार्व्यादि काढा, महासुदर्शन काढा

जीर्णज्वर- देवदार्व्यादि काढा

डोळे जळजळणे - अरविंदासव, उशीरासव

तृष्णा - अरविंदासव, उशीरासव, चंदनासव

त्वचारोग - खदिरारिष्ट, महामंजिष्ठदि काढा, मंजिष्ठादि काढा, सारिवाद्यासव

दमा - कनकासव, दशमूलारिष्ट, द्राक्षासव

दाह - अरविंदासव, उशीरासव, चंदनासव, सारिवाद्यासव

देवी येणे - परिपाठादि काढा

नायटा - महामंजिष्ठादि काढा, मंजिष्ठादि काढा

पक्षाघात - दशमूल काढा, दशमूलारिष्ट

प्रमेह - असनादि काढा, जम्ब्वासव, बब्बुलाद्यारिष्ट

प्रवाहिका - कुटजारिष्ट, जीरकाद्यारिष्ट, बब्बुलाद्यारिष्ट, भल्लातकादि काढा, भल्लातकासव

पांडु - पुनर्नवासव, रोहितकारिष्ट, लोहासव

पित्तावृत्तवात - दुरालभादि काढा

प्लीहोदर - रोहितकारिष्ट

बद्धकोष्ठता - अभयारिष्ट

मधुमेह - असनादि काढा, जम्ब्वासव, बब्बुलाद्यारिष्ट

मंदज्वर - रोहितकारिष्ट

मनोदोष - सारस्वतारिष्ट

मूतखडा - उशीरासव, चंदनासव, वरुणादि काढा.

मांसशोष - (मांसक्षय-बलारिष्ट)

मूत्रकृच्छ्र - अश्वगंधारिष्ट, उशीरासव, चंदनासव दुरालभादि काढा, देवदार्व्यादिकाढा, सारिवाद्यासव.

मूत्रदाह - अश्वगंधारिष्ट, उशीरासव, चंदनासव, दुरालभादि काढा

मूत्राश्मरी - उशीरासव, चंदनासव, वरुणादि काढा

मूळव्याध - कुटजारिष्ट, पंचकोलासव, रोहितकारिष्ट

यकृतदोष - कुमारीआसव

यकृतोदर - कुमारीआसव

रक्तदोष - खदिरारिष्ट, महामंजिष्ठादि काढा, मंजिष्ठादि काढा, सारिवाद्यासव

रक्तप्रदर - अशोकारिष्ट, लोध्रासव

रक्तप्रवाहिका - कुटजारिष्ट, जम्ब्वासव

रक्तपित्त - अरविंदासव, उशीरासव, चंदनासव, वासादि काढा, वासकासव

रक्तार्श - अभयारिष्ट, कुटजारिष्ट

राजयक्ष्मा - द्राक्षासव

वातरक्त - अमृतारिष्ट, दशमूल काढा, दशमूलारिष्ट, देवदार्व्यादि काढा, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा

विषमज्वर - महासुदर्शन काढा

विश्वाचि - भल्लातकादि काढा, भल्लातकासव, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा

वैवर्ण्य - खदिरारिष्ट, महामंजिष्ठादि काढा, मंजिष्ठादि काढा, सारिवाद्यासव

श्वेतप्रदर - अशोकारिष्ट, लोध्रासव

शोथ - अभयारिष्ट, पुनर्नवादिकाढा, पुनर्नवासव

संधिवात - दशमूल काढा, दशमूलारिष्ट, देवदार्व्यादि काढा, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा.

स्तन्य - बाळंतकाढा नं. १, नं. २

सूज येणे - अभयारिष्ट, पुनर्नवादि काढा, पुनर्नवासव

स्थौल्य - देवदार्व्यादि काढा

हृद्रोग - अर्जुनारिष्ट, दशमूल काढा, दशमूलारिष्ट

क्षय - द्राक्षासव

Abortion - लोध्रासव

Allergy - भल्लातक काढा, भल्लातकासव

Anaemia - पुनर्नवासव, रोहितकारिष्ट, लोध्रासव

Ascitis- अभयारिष्ट, कुमारीआसव, पुनर्नवादि काढा, पुनर्नवासव



Asthma - कनकासव, दशमूलारिष्ट, द्राक्षासव, पुनर्नवासव, भल्लातकासव, वासकासव

Bleeding P. V. - लोध्रासव

Bleeding piles - अभयारिष्ट, कुटजारिष्ट

Brachial neuritis - महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा

Bronchitis - कनकासव, द्राक्षासव

Chicken pox - परिपाठादि काढा

Cirrhosis of Liver- कुमारीआसव

Chronic Colitis - कुटजारिष्ट, बब्बुलाद्यारिष्ट, भल्लातकादि काढा, भल्लातकासव

Chronic Fevers - देवदार्व्यादि काढा

Chronic Rhinitis - भल्लातकासव

Colic - कनकासव

Diabetes - असनादि काढा, जम्ब्वासव, बब्बुलाद्यारिष्ट

Diarrhoea - कुटजारिष्ट, जीरकाद्यारिष्ट, बब्बुलाद्यारिष्ट, भल्लातकादि काढा, भल्लातकासव

Epillepsy - सारस्वतारिष्ट

Enlarged Prostate - वरुणादि काढा

Enlarged spleen - रोहितकारिष्ट

General Tonic - अमृतारिष्ट, अश्वगंधारिष्ट, द्राक्षासव, बलारिष्ट

Gonorrhoea - सारिवाद्यासव

Gout - अमृतारिष्ट, दशमूल काढा, दशमूलारिष्ट, देवदार्व्यादि काढा, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा

Hypertention - दुरालभादि काढा

High-Blood Pressure - दुरालभादि काढा

Irruptive Fevers - परिपाठादि काढा

Jaundice - अभयारिष्ट, कुमारीआसव

Leukorrhoea - अशोकारिष्ट, लोध्रासव

Measles - परिपाठादि काढा

Piles - कुटजारिष्ट, पंचकोलासव, भल्लातकादि काढा, भल्लातकासव, रोहितकारिष्ट

Pleurecy with effussion- कुमारीआसव

P. U. O - अमृतारिष्ट

Pylitis - पुनर्नवादि काढा, पुनर्नवासव

Pylonephiritis - पुनर्नवादि काढा, पुनर्नवासव

Rhumatic Arthritis - दशमूल काढा, दशमूलारिष्ट, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा

Rhumatoid Arthritis - दशमूल काढा, दशमूलारिष्ट, महारास्नादि काढा, रास्नापंचक काढा, रास्नासप्तक काढा

small pox - परिपाठाद्रि काढा

Sciatica - दशमूलकाढा, देवदार्व्यादि काढा

Tubercular Knee Joint- अमृतारिष्ट, देवदार्व्यादि काढा

Tuberculosis - द्राक्षासव, वासादिकाढा, वासकासव

Urinary Stone - चंदनासव, वरुणादि काढा

Worms - कुमारीआसव, विडंगारिष्ट, विडंगासव.

❑❑❑

वैद्य य. गो. जोशी (G.F.A.M., H.P.A.) यांनी अनेक जबाबदारीच्या पदांवर कामे केली आहेत.

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे व आयुर्वेद महाविद्यालय हडपसर येथे प्राचार्य, प्राध्यापक व कायचिकित्सा विभागप्रमुख, मानद चिकित्सक- साने गुरुजी रुग्णालय-हडपसर, शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेदीय रुग्णालय, वै. पुरुषोत्तम शास्त्री नानल रुग्णालय, ब्लाईंड रिलीफ असोसिएशन नेत्र रुग्णालय, वसई इत्यादी मान्यवर रुग्णालयांत सेवा केली आहे.

आयुर्वेदाच्या सिद्धांताचा नवीन दृष्टीकोनातून विचार, आयुर्वेद शास्त्राचा प्रत्यक्षात यशस्वीपणे उपयोग करण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास, सूत्ररूप ग्रंथोक्त ज्ञानाचा प्रत्यक्षरूप उपयोग करून आयुर्वेदीय विषय निपुणतेने, सुलभसाध्य पद्धतीने शिकविण्याची हातोटी.

विद्यार्थी तसेच सर्वसामान्य व्यक्तींना आयुर्वेदाची यथायोग्य माहिती देवून त्याबद्दलचे गैरसमज दूर करून आदरभावना निर्माण करण्याचे प्रयत्न.

अनेक व्याख्याने, चर्चासत्रे, चिकित्साशिबिरांचे आयोजन.

विविध रुग्णालयातील कामकाजाप्रमाणेच खाजगी आयुर्वेदीय व्यवसाय.

कायचिकित्सा, आयुर्वेदीय पंचकर्म विज्ञान, शारीरक्रिया विज्ञान, शारीर क्रिया प्रात्याक्षिक, रोगविज्ञान-विकृतीविज्ञान, रोगावस्था, गुटीवटी, चूर्णे, आसव अरिष्ट काढे, भस्म पिष्टी रसायनकल्प, घृततैल अवलेह-मलम, ऋतुचर्या, साधे उपाय सोपे उपाय, माझं सोनुलं, यशवंत चिकित्सा, सद्यःफलदायी व आत्ययिक चिकित्सा, उदरभरण नोहे, चरक संहिता-यशवंत टीका भाग १ व २ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत.



Jay U. Savla

पुणे विद्यापिठांतर्गत बी.ए.एम्.एस्. च्या अभ्यासक्रमातील
'काय-चिकित्सा' या विषयासाठी मान्यताप्राप्त संदर्भ ग्रंथ.

# भस्म पिष्टी रसायनकल्प

**प्रा. वैद्य यशवंत गोविंद जोशी**
जी.एफ.ए.एम्., एच्.पी.ए.
- प्राचार्य आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर
- प्राध्यापक कायचिकित्सा विभाग
  आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर
- माजी प्राचार्य, प्राध्यापक, कायचिकित्सा विभाग
  टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे
- मानद चिकित्सक
  सानेगुरूजी रुग्णालय, हडपसर

**पुणे साहित्य वितरण**

BHASM PISHTI RASAYANKALPA (MARATHI)
VAIDYA Y. G. JOSHI

❑ **प्रकाशक**
**सौ. संपदा श्याम कोपर्डेकर**
**पुणे साहित्य वितरण**
**२७३, शनिवार पेठ,**
**पुणे ४११०३०**

❑ **© वैद्य य. गो. जोशी**

❑ **प्रथम आवृत्ती : १९८१**
**द्वितीय आवृत्ती : १९९६**
**तृतीय आवृत्ती : १५ ऑगस्ट १९९९**
**चौथी आवृत्ती : ३० सप्टेंबर २००८**
**पाचवी आवृत्ती : ४ नोव्हेंबर २०१३**

❑ **मुद्रणस्थळ**
**मधुसूदन घळसासी**
**एम. आर. ॲण्ड को.**
**१५५२, सदाशिव पेठ,**
**पुणे ४११०३०**

❑ **मूल्य ४५ रुपये**

# अनुक्रमणिका

| अनुक्रम | पृष्ठ क्र. | अनुक्रम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| भस्म पिष्टी रसायनकल्प याविषयी थोडेसे | १ | २७ हीरकभस्म | ३७ |
| १ शंखभस्म | ५ | २८ वैक्रांतभस्म | ३८ |
| २ कपर्दिकभस्म | ६ | २९ अकीकपिष्टी | ३९ |
| ३ लोकनाथरस | ७ | ३० माणिक्यपिष्टी | ४० |
| ४ प्रवाळभस्म | ८ | ३१ नीलमपिष्टी | ४१ |
| ५ मौक्तिकभस्म | ९ | ३२ पन्नापिष्टी | ४१ |
| ६ शौक्तिकभस्म | १० | ३३ तृणकांतपिष्टी | ४२ |
| ७ प्रवाळपंचामृत | ११ | ३४ जहरमोहरापिष्टी | ४३ |
| ८ कामदुधा | १३ | ३५ गोदन्तिहरताळपिष्टी | ४३ |
| ९ अभ्रकभस्म | १४ | ३६ दगडीबोरपिष्टी | ४५ |
| १० शृंगभस्म | १६ | ३७ कुक्कुटांडत्वक्‌भस्म | ४५ |
| ११ वंगभस्म | १७ | ३८ अजास्थिभस्म | ४७ |
| १२ सुवर्णराजवंगेश्वर | २० | ३९ मयूरपिच्छामशी | ४७ |
| १३ नागभस्म | २१ | ४० कज्जली | ४८ |
| १४ जसदभस्म | २१ | ४१ रसपर्पटी | ५० |
| १५ त्रिवंगभस्म | २२ | ४२ लोहपर्पटी | ५१ |
| १६ लोहभस्म | २३ | ४३ पंचामृतपर्पटी | ५२ |
| १७ मंडूरभस्म | २५ | ४४ सुवर्णपर्पटी | ५३ |
| १८ कांतलोहभस्म | २६ | ४५ रससिंदूर | ५४ |
| १९ कासीसभस्म | २७ | ४६ मल्लसिंदूर | ५६ |
| २० पुनर्नवामंडूर | २८ | ४७ व्याधिहरणरस | ५७ |
| २१ सुवर्णमाक्षिकभस्म | २९ | ४८ मकरध्वज, पूर्णचंद्रोदय | ५८ |
| २२ नवायसलोह | ३१ | ४९ हेमगर्भ | ५९ |
| २३ ताप्यादिलोह | ३१ | ५० समीरपन्नगरस | ६० |
| २४ रौप्यभस्म | ३२ | ५१ माणिक्यरस | ६२ |
| २५ ताम्रभस्म | ३४ | अकारानुक्रमे कल्पांची यादी | ६४ |
| २६ सुवर्णभस्म | ३५ | औषधांची रोगानुरूप यादी | ६५ |

❑❑❑

## भस्म पिष्टी रसायनकल्प याविषयी थोडेसे

आयुर्वेद शिक्षणमालेतील हे पाचवे पुस्तक. आतापर्यंतच्या या मालेतील पुस्तकांमधून ज्याप्रकारे आयुर्वेदीय औषधी कल्पांची माहिती करून दिली गेली तसाच प्रयत्न उरलेल्या काही औषधांचे बाबतीत या पुस्तकात केलेला आहे.

'गुटीवटी' या मालेच्या पहिल्या पुस्तकात आयुर्वेदीय चिकित्सेमध्ये वापरल्या जागाऱ्या विविध प्रकारच्या गोळ्यांची माहिती दिलेली होती. या गोळ्या बनविताना प्रामुख्याने वनस्पतिजन्य औषधांचा उपयोग केला जातो व यास पारा, गंधक आदी खनिजांची जोड काहीवेळा दिलेली असते, हे आपण पाहिले. 'आसव अरिष्ट काढे,' 'चूर्णे,' व 'घृत तैल अवलेह-मलम' या पुस्तकांतून ज्या कल्पांची ओळख करून घेतली, त्यापैकीही बहुतांश सर्व द्रव्ये ही वनस्पतिजन्यच होती. या पुस्तकात मात्र मुख्यत: खनिज व प्राणिज द्रव्यांपासून बनविलेल्या औषधी कल्पांचा उहापोह करण्याचे ठरविले आहे.

वनस्पतीजन्य द्रव्ये वापरताना रस, कल्क, चूर्ण, काढा, आसव, अरिष्ट, स्नेहकल्पना इत्यादी अनेक प्रकारे प्रक्रिया करून कल्प बनविता येतात. या सर्व औषधीकरणाच्या प्रक्रिया तशा अगदी सुलभतेने, सहजपणे करता येण्याजोग्या आहेत. खनिज द्रव्यांबाबत मात्र असे नाही. खनिज द्रव्ये, विशेषत: सर्व धातू हे कठीण असून त्यांचे सहज चूर्ण करता येत नाही व ही द्रव्ये सहजतेने शरीराशी सात्म्यही होत नाहीत. यासाठीच औषधी द्रव्य म्हणून यांच्या प्रयोगापूर्वी त्यांची भस्मे बनवावी लागतात.

भस्म बनविण्यापूर्वीही धातू शुद्ध करून घेतले जातात. यासाठी धातू गरम करून, तापवून लाल करून तेल, ताक, गोमूत्र, कांजी इत्यादी द्रवात बुडविले जातात. यामुळे रासायनिकदृष्ट्या धातू शुद्ध व्हावेत ही अपेक्षा नसून धातूंच्या ठिकाणी असणारे विषारी, शरीर बाधाकर असे जे गुण, ते कमी व्हावेत ही अपेक्षा असते. धातूशुद्धी म्हणजे ते Chemically Pure बनविणे हा अर्थच येथे अभिप्रेत नाही. अशी शुद्धी न करता धातूंचे भस्म बनविल्यास त्यामध्ये शरीरास अपायकारक असे अनेक गुण कायम राहतात व म्हणून अशी भस्मे वापरणे अयोग्य असते.

तेल, ताक, गोमूत्र, कांजी इत्यादी पदार्थात हे धातू चांगले तापवून पुन: पुन्हा बुडविल्याने त्यांचे काठीण्य कमी होऊन भस्मप्रक्रिया करणे सोपे जाते हेही याप्रकारे पूर्वकर्म करण्यामागचे एक महत्त्वाचे कारण आहे.



धातूंच्या भस्मीकरणाच्या प्रक्रियेला 'मारण क्रिया' असेही म्हणतात. ही भस्मप्रक्रिया किंवा मारणप्रक्रिया करण्यासाठी प्रथमत: शुद्ध धातूला अनेक वनस्पतिरसाबरोबर खलून, भावना देऊन नंतर त्यापासून भस्म बनविले जाते.

भस्म करणे म्हणजेच जाळून त्याची राख करणे. धातूंचे भस्म करण्याची प्रक्रिया बरेच दिवस चालणारी व करण्यास बरीच किचकट व कठीणही आहे. धातू जाळून त्यांचे भस्म करण्यासाठी तीक्ष्णाग्नीची जरूरी असते. या जाळण्याच्या क्रियेलाच 'पुट' अशी संज्ञा आहे. यासाठी शुद्ध केलेला धातू एका मातीच्या पसरट भांड्यामध्ये (ज्यास शराव म्हणतात) ठेऊन त्यावर दुसरे त्याच आकाराचे, पहिल्या भांड्याच्या तोंडावर बरोबर बसेल असे मातीचे भांडे ठेवतात या दोन शरावांवर कापड गुंडाळून त्यावर गोपीचंदनाचा लेप करून भांडे व्यवस्थित बंद केले जाते. हा गोपीचंदनाचा थर चांगला वाळला की पुन्हा कापड गुंडाळून, पुन्हा गोपीचंदनाची माती लिंपली जाते. असे ५ ते ७ वेळा करून चांगले सुकल्यावर हे 'शरावसंपुट' तयार होते. मातीचे भांडे कितीही तीव्र अग्नी लागला तरी त्यास तडा जाऊ नये व फुटले तरी त्यातील द्रव्य बाहेर पडू नये ही या मागची अपेक्षा असते.

एका मोठ्या दोन हात लांब, रुंद व खोल अशा खड्ड्यात गोवऱ्या भरून त्याचे मध्यभागी हे शरावसंपुट ठेऊन, त्या गोवऱ्या पेटविल्या जातात. यासच 'गजपुट' असे म्हणतात. गोवऱ्या सतत चोवीस तास किंवा त्याहून अधिक काल जळत राहतात. मध्यभागी ठेवलेल्या शरावसंपुटातील धातूस तीव्र स्वरूपाचा अग्नी मिळत राहतो व याप्रकारे आतील द्रव्याचे भस्म होते.

याप्रकारे एकदाच पुट देऊन भागत नाही. अनेक वेळा ही सर्व प्रक्रिया करावी लागते व त्यानंतर भस्म तयार होते. विशेषत: लोह, ताम्र, अभ्रक यांसारख्या धातूंची भस्मे तयार होण्यासाठी अनेक पुटांची जरुरी असते. या उलट कुक्कुटांडत्वक, अजास्थी, मयूरपिच्छा यासारख्या द्रव्यांचे भस्म केवळ एकाच पुटात पूर्ण होते. म्हणूनच किती पुटे दिली हे माहीत करून घेण्यापेक्षा भस्म चांगले बनले की नाही हे पाहणे महत्त्वाचे आहे व याच दृष्टीकोनातून या प्रकरणात भस्म परीक्षेविषयी माहिती घेणे आवश्यक आहे.

भस्म चांगले बनले किंवा नाही हे ठरविण्यासाठी ज्या महत्त्वाच्या परीक्षा आहेत त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

**१. रेखापूर्णत्त्व :-** भस्म होताना धातूचे अगदी सूक्ष्म कणात रूपांतर होत असते. भस्मापैकी अगदी थोडा भाग बोटात धरला असता बोटातील रेषांमध्ये हे चूर्ण पसरते. भस्म जर सूक्ष्म झाले असले तरच हे रेखापूर्णत्व मिळते अन्यथा नाही

असा याचा अर्थ आहे.

**२. वारितरत्व :-** वारि म्हणजे पाणी. भस्म प्रक्रियेमध्ये जड धातू हे हलके बनतात, त्यांचे सूक्ष्म कणांमध्ये रूपांतर होत असते व म्हणून भस्मांचे कण पाण्यावर तरंगू शकतात.

**३. अपुनर्भव :-** अपुनर्भव म्हणजे या भस्मापासून पुन्हा मूळधातू न मिळणे, अग्नी अधिक प्रमाणात देऊन पुन्हा त्यापासून धातू मिळाला तर ते योग्य भस्म नव्हे असे समजले जाते.

यापैकी तिसरी परीक्षा करणे कठीण असते. मात्र पहिल्या दोन परीक्षा सहजपणे करता येतात व म्हणूनच व्यवहारात त्यांचाच प्रामुख्याने अवलंब केला जातो.

या पुस्तकामध्ये खनिज धातूप्रमाणेच काही प्राणिजन्य पदार्थांपासून बनविली जाणारी औषधेही वर्णिलेली आहेत. उदा. प्रवाळ, मोती, कवड्या, शंख, शिंपले इत्यादी समुद्रातून मिळणारे पदार्थ, कोंबडीच्या अंड्यांचे कवच, शेळीची हाडे, मोराची पिसे इत्यादी. यांचीही भस्मे करूनच ती वापरली जातात. पण यांची भस्मे तयार करणे हे धातूंच्या भस्मप्रक्रियेपेक्षा कितीतरी पटीने सुलभ असते.

काही पदार्थांचे मात्र भस्म न बनविता त्यांची पिष्टी बनविली जाते. पिष्टी म्हणजे चूर्ण. अगदी बारीक, श्लक्ष्ण असे चूर्ण. विशेषत: शीत गुणांची व ठिसूळ असी जी खनिज द्रव्ये आहेत, त्यांची पिष्टी बनवितात. पिष्टी करताना अग्नींची क्रिया टाळली जाते. भस्म प्रक्रियेमध्ये बराच वेळ अग्निची क्रिया द्रव्यांवर होत राहते व त्यामुळे त्या द्रव्यातील अपेक्षित शीत गुण नष्ट होण्याची शक्यता लक्षात घेऊनच ही प्रक्रिया टाळलेली असते. पिष्टी अधिक सूक्ष्म व्हावी, अधिक श्लक्ष्ण व्हावी व द्रव्याचे शीतगुणामध्ये वाढ दिसावी यासाठी गुलाबजलामध्ये ही पिष्टी बराच काळ खलली जाते. याला गुलाबजलाची भावना देणे असे म्हणतात. मोती, पन्ना, माणिक, तृणकांत यांसारखी रत्ने, जहरमोहरा, दगडीबोर यांसारखी अन्य खनिजे यांची पिष्टी बनविली जाते.

भस्म व पिष्टी या प्रकारेच खनिज द्रव्ये विशेषत: पारा (mercury) वापरण्याच्या आणखीही काही पद्धती आहेत. पारा हा स्वतंत्रपणे कधीही वापरला जात नाही. नेहमी गंधकाबरोबर त्याची संयुगे तयार करून त्यांचा वापर केला जातो. पारा म्हणजेच रस. या पाऱ्यापासून बनलेली औषधे म्हणजेच रसायन कल्प होत.

पारा व गंधक एकत्र खलून त्यापासून कज्जली बनवितात. कज्जलीपासून अग्नीसंस्काराने पर्पटी तयार होते. याच कज्जलीपासून वालुकायंत्राचे सहाय्याने कुपिपक्वपद्धतीने सिंदूर बनवितात. हीच कज्जली गंधकात शिजवून पोट्टली बनविली



जाते. कज्जली, पर्पटी, सिंदूर व पोट्टली या प्रकारे पाऱ्याचे कल्प वापरत असताना त्यास अन्य खनिज वा वनस्पतिजन्य द्रव्यांची जोड देऊन अनेक टिकाऊ कल्प तयार होतात. त्यापैकीही काही कल्पांचा ऊहापोह या पुस्तकात केलेला आहे. या विविध प्रकारे बनविल्या जाणाऱ्या धातू, अन्य खनिज द्रव्ये, प्राणिज द्रव्ये यांच्या वापराच्या पद्धतीचा सामान्य विचार केल्यानंतर आता प्रत्येक द्रव्यापासून बनणाऱ्या कल्पांच्या गुणकर्माचा विस्ताराने विचार करणे शक्य होईल.

❑ ❑ ❑

## १. शंखभस्म

समुद्रातील मोठ्या शंखापासून शंखभस्म बनविले जाते. शंख, शिंपले, कवड्या, मोती व प्रवाळ या समुद्रात मिळणाऱ्या पाच पदार्थांचे रासायनिक पृथ:करण केले तर ही पाचही द्रव्ये सारखीच आहेत असे आधुनिक रसयनशास्त्र म्हणते. ही सर्व द्रव्ये कॅल्शियमयुक्त ($CaCO_3$) आहेत. त्यात कोणताही भेद नाही. रासायनिक दृष्ट्या एकाच प्रकारची अशी जी ही पाच द्रव्ये त्यांचे शरीरामध्ये कार्य मात्र वेगवेगळे घडते. म्हणूनच या पाच द्रव्यांचा वेगवेगळा विचार करणे आवश्यक ठरते. त्यापैकी प्रथमत: शंखभस्माचा विचार केला जाणार आहे.

शंखभस्म हे उष्ण गुणाचे, दीपनपाचन (अग्नि वाढविणारे) व ग्राही म्हणून प्रसिद्ध आहे. ग्राही म्हणजेच उष्ण गुणामुळे अग्निवर्धन करणारे व आतड्यातील द्रवांशाचे शोषण करणारे द्रव्य. शंखभस्माचे विशेष कार्यक्षेत्र आहे आमाशय म्हणजेच जठर हे. जठरामध्ये निर्माण होणाऱ्या स्रावांचे नियंत्रण या शंखभस्मामुळे होते.

शंखभस्माचा उपयोग प्रामुख्याने होतो तो अम्लपित्तासारख्या रोगामध्ये. अम्लपित्तामध्ये पित्ताचा द्रव, सर गुण वाढलेला असतो. अग्निमांद्यही असते. व त्यामुळे पोटात दुखणे, पोटात आग पडणे, छातीत जळजळणे, घशाशी आंबट येणे, डोके दुखणे इत्यादी अनेक लक्षणे उत्पन्न होतात. अम्लपित्तामध्ये काही वेळा आंबट अशी उलटीही होते व उलटीनंतर थोडा वेळ का होईना पण निश्चितपणे बरे वाटते. आमाशयातून प्राकृतावस्थेमध्येही स्रवणाऱ्या स्रावामध्ये (Gastric Secretions) हैड्रोक्लोरिक अम्ल काही ठराविक प्रमाणात असते. या हैड्रोक्लोरिक अम्लाचे प्रमाणात वाढ झाली (Hyperacidity) तर आमशयातील अंत:स्त्वचेचा विदाह (Gastritis) होतो व त्यामुळेच वरील सर्व लक्षणे उत्पन्न होतात. या आमाशयातील अधिक प्रमाणात वाढलेल्या अम्लामुळेच काही वेळा आमाशयात व्रण (Peptic Ulcer) उत्पन्न होऊ शकतात.

या सर्व अवस्थेत लक्षणे कमी करण्यासाठी शंखभस्म कार्यकारी ठरते.

Gastritis किंवा Hyperacidity कमी करण्यासाठी; सध्या काही अम्लविरोधी औषधे Antacids वापरली जातात. या औषधांनीही त्वरित लाभ मिळतो हे खरे पण मिळणारा लाभ हा अगदी तात्पुरता असतो हेही तितकेच खरे होय. शंख भस्माचे उपयोगाने त्वरेने लाभ मिळतोच पण त्याहीपेक्षा [illegible] म्हणजे याने स्राव निर्मितीची प्रक्रियाच नियंत्रित केली जात असल्याने रोग [illegible] विनाश करण्याचेही



कार्य त्यावरोबरच घडत असते. यासाठीच शंखभस्म हे अम्लपित्तावरील औषधांपैकी महत्त्वाचे द्रव्य गणले जाते.

शंखभस्म हे या प्रकारे स्रावांचे नियंत्रण करणारे द्रव्य असल्यानेच अजीर्णासारख्या रोगांमध्ये (Indigesion) अग्निवर्धनासाठी याचा फार चांगला उपयोग होतो. पोटात धरणारा गुबारा (आध्मान, Tympanitis) उदरशूल (Abdominal Colic), छर्दि (उलटी होणे, Vomitting) या सारख्या अग्निमांद्यप्रधान रोगांवरील तर शंखभस्म हे एक अवश्यंभावी असे औषध आहे.

अतिसार (Diarrhea), ग्रहणी (Cronic Colitis), प्रवाहिका (Dysentery), विसूचिका (Gastroenteritis) यासारख्या रोगांमध्ये जुलाब होत असतात. हे सर्व अग्निमांद्यामुळेच निर्माण होणारे रोग असून यामध्ये होणारे जुलाब थांबविण्यासाठीही शंखभस्म अत्यंत उपयुक्त असे औषध आहे. ग्राही गुणाचे असल्यानेच या भस्माचा उपयोग वरील अवस्थांमध्ये करून घेतला जातो.

**प्रमाण :** ५०० मि. ग्रॅ. ते १ ग्रॅम दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** अम्लपित्तासाठी - लिंबू सरबत. जुलाब, अजीर्ण यासाठी - गोड ताजे ताक.

❑ ❑ ❑

## २. कपर्दिक भस्म

कपर्दिक भस्म बनविण्यासाठी पिवळ्या रंगाच्या मोठ्या आकाराच्या कवड्या वापरणे अधिक श्रेयस्कर असते. समुद्रपंचकापैकी कवड्यांपासून बनविलेल्या या कपर्दिक भस्माचे गुण शंखभस्माप्रमाणेच असतात असे सर्वसामान्यपणे म्हणता येईल.

कपर्दिक भस्म हेही उष्ण गुणाचे, दीपनपाचन करणारे व ग्राही असल्याने याचा अम्लपित्तावर शंखभस्माप्रमाणेच उत्तम लाभ होतो. शंखभस्म व कपर्दिक भस्म यातील महत्त्वाचा भेद म्हणजे शंखभस्माचे कार्य प्रामुख्याने उर्ध्व आमाशयावर (Stomach) होते तर कपर्दिक भस्माचे कार्य विशेषत्वाने ग्रहणी (Small Intestine) या अवयवावर होत असते. ग्राही, उष्ण, अग्नि वाढविणारे व ग्रहणी या अवयवावर कार्यकारी असल्यानेच, कपर्दिक भस्माचा उपयोग प्रामुख्याने केला जातो. तो ग्रहणी (Sprue किंवा Cronic Colitis) या रोगामध्ये. या रोगातील भूक न लागणे, अन्नाचे पचन न होणे, आहार रसाचे शोषण [illegible] न होणे, शौचास दुर्गंधयुक्त व

पातळ येणे ही सर्वच लक्षणे कपर्दिक भस्माचे उपयोगाने त्वरेने कमी होत असतात.

अजीर्ण (Indigesion) व त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या उदरशूल (Abdominal Pain), आध्मान (Tympanitis), छर्दि (उलटी होणे. Vomitting) यासारख्या लक्षणांवरही कपर्दिक भस्माच्या प्रयोगाने लाभ मिळतो.

कपर्दिक भस्माचा आणखीही एका विशिष्ट लक्षणासाठी फारच चांगला उपयोग होतो व ते लक्षण म्हणजे कान वाहणे. कान वरचेवर फुटणे, त्यातून पू वाहणे, ठणक असणे ही लक्षणे घेऊन अनेक रुग्ण येतात. अशा रोग्यांमध्ये कपर्दिक भस्म कानात टाकून त्यावर लिंबाचा रस पिळला जातो. या लिंबू रसाने कपर्दिक भस्म फसफसून वर येते. फार मोठ्या प्रमाणात फेस निर्माण होतो व बाहेर पडणाऱ्या फेसाबरोबरच सर्व पूही निघून जातो व कान स्वच्छ होतो. केवल तत्कालिक लाभासाठीच नव्हे तर लक्षणे पूर्णांशाने नाहिशी होऊन रोग बरा करण्यासाठीही या प्रयोगाचा उपयोग होऊ शकतो, मात्र यासाठी दररोज कपर्दिक भस्माचा वरीलप्रमाणे प्रयोग करणे आवश्यक ठरते. अन्य अनेक औषधी प्रयोगाने असफल होणारी कर्णस्रावाची चिकित्सा कपर्दिक भस्माचे वरील प्रकारच्या प्रयोगाने मात्र हमखास सफल होताना दिसते.

**प्रमाण :** पोटात घेण्यासाठी २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** लिंबू सरबत, गोड ताजे ताक, कानात टाकण्यासाठी २५० मि. ग्रॅ. १ वेळ. वर लिंबूरस पिळणे.

❑❑❑

## ३. लोकनाथरस

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, कपर्दिक (कवड्या), टंकण, गाईचे दूध.

प्रथमतः पारा व गंधक यांची कज्जली तयार करून ती कज्जली कवड्यांमध्ये भरली जाते. गाईच्या दुधात भिजवलेल्या टंकणाने कवड्यांची तोंडे बंद करून नंतर या कवड्यांचे भस्म बनविले जाते. या प्रकारे बनणाऱ्या कल्पासच लोकनाथ रस ही संज्ञा वापरली जाते. संक्षेपाने पहावयाचे तर हा कपर्दिकेचाच एक कल्प असून त्यास कज्जलीपासून अग्निसंस्काराने बनणाऱ्या पर्पटीची जोड मिळालेली आहे. कपर्दिकभस्म व रसपर्पटी ही दोन्ही द्रव्ये ग्रहणीरोग नाशनासाठी श्रेष्ठ समजली जाणारी द्रव्ये. हीच दोन्ही औषधे एकत्रितपणे असणारा हा कल्प त्यामुळे निश्चितच ग्रहणीरोगासाठी



सर्वोत्कृष्ट कल्प म्हणून ओळखिला जातो.

याच लोकनाथरसाला काहीवेळा सुवर्ण भस्माची जोड देऊन सुवर्ण लोकनाथरस तयार केला जातो. ग्रहणी रोगामध्ये येणारे दौर्बल्य कमी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सुवर्ण पर्पटीपेक्षाही अधिक गुणकारी असा हा कल्प आहे.

ग्रहणी (Chronic Colitis) प्रमाणेच अतिसार (Diarrhea), अरूचि, अग्निमांद्य, अजीर्ण या रोगावरही लोकनाथरस वापरणे लाभदायक ठरते.

ग्रहणी वगैरे अग्निमांद्यामुळे उत्पन्न होणाऱ्या रोगांप्रमाणेच श्वसनमार्गाशी संबंधित असणारे कास (Cough), कफजकास (Bronchitis) राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis), श्वास (दमा Bronchial Asthma) आदी रोगातही सुवर्ण लोकनाथरस उपयुक्त ठरतो. यातील टंकण व सुवर्ण ही द्रव्ये या रोगांसाठी विशेष उपयुक्त ठरतात.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप + साखर

❑❑❑

## ४. प्रवाळभस्म - प्रवाळपिष्टी

शंख व कवड्यांप्रमाणेच समुद्रातील प्राण्यापासूनच मिळणारे आणखी एक कॅलशियमचे द्रव्य ($CaCO_3$) म्हणजे प्रवाळ होय. उत्पत्ति व रासायनिक घटक समान असूनही प्रवाळाचे गुणधर्म हे शंख वा कपर्दिकेपेक्षा अगदी भिन्न आहेत. शंख व कपर्दिक प्रामुख्याने त्यांच्या उष्ण, दीपनपाचन व ग्राही गुणासाठी प्रसिद्ध आहेत तर प्रवाळ हे त्याच्या शीत गुणासाठी, थंड प्रकृतीसाठी सुप्रसिद्ध आहे.

प्रवाळाची पिष्टी (चूर्ण) तयार करून ते वापरले जाते. प्रवाळभस्म बनविताना अग्नीचा वापर केला जात नाही. प्रवाळपिष्टी (अगदी बारीक, सूक्ष्म, मऊ चूर्ण) करून त्यास गुलाबजलाच्या भावना देतात. म्हणजेच गुलाबपाण्यात ही पिष्टी खलतात. त्यानंतर हे मिश्रण चांदण्यामध्ये सुकविले जाते, व याप्रकारे तयार होणाऱ्या द्रव्यासच 'चंद्रपुटी प्रवाळ' असे संबोधिले जाते. फार क्वचित प्रसंगी सूर्यपुटी वा अग्निपुटी प्रवाळही बनवितात. परंतु गुणधर्मांचा विचार करता चंद्रपुटी प्रवाळच श्रेष्ठ होय असे म्हणता येते. गुलाबपाणी शीत गुणाचे असून त्याच्या भावना दिल्याने प्रवाळाचा शीतगुण अधिक वाढतो तर शीतल अशा चंद्रप्रकाशाचे संस्काराने तो अधिकच वृद्धिंगत होतो.

चंद्रपुटीप्रवाळ हे यामुळेच सर्वप्रकारच्या पित्तविकृतीवर उपयुक्त असे द्रव्य ठरते. विशेषतः तीक्ष्ण, उष्ण गुणाने वाढलेल्या पित्तासाठी तर प्रवाळासारखे लाभदायी अन्य औषध शोधावेच लागेल. हातपायांची आग होणे, डोळे जळजळणे, शरीरातून वाफा आल्यासारखे वाटणे यासारखी लक्षणे किंबहुना शरीरात कोठेही असणारा दाह (Burning Sensations) हे लक्षण कमी करण्यासाठी प्रवाळभस्म विशेष कार्यकारी ठरते.

तीक्ष्णवेगी ज्वर (Hyper Pyrexia) असताना प्रवाळभस्माचा वापर केल्यास ताप लगेच कमी होण्यास मदत होते.

रक्तपित्त या रोगामध्येही प्रवाळपिष्टी उत्तम कार्यकारी ठरते. रक्तपित्त म्हणजे शरीरातून नाक, कान, तोंड, मूत्रमार्ग व मलमार्ग आदिद्वारा शरीराबाहेर रक्तस्राव होणे. उष्ण व तीक्ष्ण गुणांनी वाढलेल्या पित्तामुळे रक्ताची दुष्टी होऊन शरीरातून बाह्यमार्गाने रक्तस्राव होऊ लागतो व रक्तपित्त हा व्याधि उत्पन्न होतो. प्रवाळ हे उत्तम शीतवीर्यात्मक औषधी द्रव्य असल्यानेच याचे प्रयोगाने पित्ताचा उष्ण, तीक्ष्ण गुण कमी होऊन शरीराबाहेर होणारा रक्तस्रावही थांबतो व पुढील सर्व आत्ययिक अवस्था टळतात.

प्रवाळाच्या शीत गुणाचा विचार करूनच कडक उन्हाळ्याच्या दिवसात उन्हाने निर्माण होणारी उष्णता बाधू नये व रोगप्रतिकार शक्ति कायम रहावी यासाठी प्रवाळभस्माचा उपयोग नित्य व्यवहारातही केला जातो. गुलकंदासारख्या उन्हाळ्यासाठी उपयुक्त असणाऱ्या कल्पासही प्रवाळाची सुयोग्य अशी जोड दिलेली असते ती प्रवाळाच्या शीतगुणाचा विचार करूनच होय.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** शीतजल.

## ५. मौक्तिकभस्म

मौक्तिक म्हणजे मोती. समुद्रातून प्राप्त होणाऱ्या पदार्थांपैकी एक महत्त्वाचा व मौल्यवान औषधी पदार्थ. अलंकारासाठी वापरला जाणारा व दैदिप्यमान तेज असणारा हा मोती म्हणजे रासायनिकदृष्ट्या पाहता केवळ कॅल्शियम ($CaCO_3$) असणारा एक प्राणिज पदार्थ. मौक्तिक प्रवाळाप्रमाणेच शीत गुणाचे असते. प्रवाळापेक्षाही मौक्तिकामध्ये शीत गुण प्रकर्षाने आढळतो व म्हणूनच प्रवाळाप्रमाणेच मौक्तिकाचेही



अग्निसंस्काराने भस्म न करता त्याच्या पिष्टीचाच वापर केला जातो. मौक्तिकाचे अगदी श्लक्ष्ण-मऊ असे चूर्ण करून त्यास गुलाबपाण्याची भावना देऊन मौक्तिकभस्म वा मौक्तिक पिष्टी तयार केली जाते.

उत्कृष्ट शीतवीर्यात्मक द्रव्य असल्यानेच प्रवाळाप्रमाणेच ज्या ज्या वेळी उष्ण व तीक्ष्ण गुणाने पित्त वाढलेले असेल त्या सर्व अवस्थांमध्ये मौक्तिकाचा वापर केल्यास अपेक्षित लाभ त्वरेने मिळतो. दाह (Burning Sensation) तीक्ष्णवेगीज्वर (Hyper Pyrexia) रक्तपित्त (शरीराबाहेर रक्तस्राव होणे) आदी सर्व विकारांवर प्रवाळापेक्षा अधिक कार्यकारी असे हे द्रव्य आहे.

प्रवाळापेक्षा गुणकर्मांचे बाबतीत अधिक चांगले असे हे द्रव्य व्यवहारात मात्र अगदी मोजक्याच प्रसंगी वापरले जाते व त्याचे कारणही अगदी स्पष्ट असते. हे कारण म्हणजे मौक्तिकाची असणारी किंमत. प्रवाळापेक्षा मौक्तिक थंड आहे हे खरं, पण त्याबरोबरच प्रवाळापेक्षा तुलनेने ते कितीतरी पट अधिक मौल्यवान आहे. यामुळेच मौक्तिकभस्म वापरणे प्रत्येकवेळी प्रत्येकास शक्य होत नाही. यासाठीच जेव्हा प्रवाळाने अपेक्षित लाभ लवकर मिळत नाही असे दिसते, केवळ त्याच वेळी मौक्तिकाचा प्रयोग केला जातो.

मौक्तिकाचा आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे मौक्तिक हे हृदयावर कार्य करणारे, हृदयाला बल देणारे एक चांगले औषध आहे. छातीत धडधडणे, छातीत दुखणे, थोड्याशा श्रमाने दम लागणे, धाप लागणे इत्यादी लक्षणे असताना मौक्तिकाच वापर केल्यास तुरंत लाभ आढळून येतो. राजयक्ष्मा या रोगात आढळणाऱ्या लक्षणांपैकी रक्तष्ठीवन (Haemoptesis) हे महत्त्वाचे लक्षण. या लक्षणापासून त्वरीत आराम पडावा यासाठी मौक्तिक वापरणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून तीन वेळा.

**अनुपान :** दूध, पाणी.

## ६. शौक्तिकभस्म

शुक्ता म्हणजे शिंपला. या शिंपल्यांपासून बनविलेले भस्म म्हणजेच शौक्तिकभस्म होय. सामान्यतः समुद्रातील शिंपल्यांचा वापर भस्म करण्यासाठी केला जातो. त्यातही साधे शिंपले वापरण्याऐवजी ज्यात मोती तयार होतात असे मोठे शिंपले वापरणे अधिक उपयुक्त ठरते. या शिंपल्यांनाच मुक्ताशुक्ति किंवा मोत्यांचे शिंपले

असे म्हटले जाते.

प्रवाळ व मौक्तिकाप्रमाणेच शौक्तिकही उत्तम शीतवीर्यात्मक औषधी द्रव्य आहे. म्हणूनच याचे भस्महीं अग्निसंस्काराने न बनविता प्रवाळ व मौक्तिकाप्रमाणे याचीही पिष्टी वापरण्याची पद्धती आहे. शौक्तिकाचे गुणकर्महीं मौक्तिकाप्रमाणेच, पण थोड्याशा कमी प्रतीचे असे आहेत.

शीतगुणाधिक्यानी युक्त असे औषधी द्रव्य असल्यानेच दाह (Burning Sensation), तीक्ष्णवेगी ज्वर (Hyper Pyrexia), रक्तपित्त यासारख्या पित्ताच्या तीक्ष्ण, उष्ण गुणांनी निर्माण होणाऱ्या रोगांवर शौक्तिक उत्तम कार्यकारी ठरते.

मौक्तिक भस्म वापरणे हे आवश्यक असूनही अनेक वेळा व्यावहारिकदृष्ट्या, त्याच्या किमतीचा विचार करता, अशक्य ठरते. अशा वेळी मौक्तिकाला पर्यायी म्हणून त्याच गुणकर्माचे द्रव्य असलेल्या मुक्ताशुक्तिपासून बनविलेल्या पिष्टीचा वापर केला जातो. साधे शिंपले मात्र मुक्ताशुक्तिपेक्षा बऱ्याच कमी प्रतीचे असतात. या साध्या शिंपल्यापासून अग्निसंस्काराने (पुट देऊन) बनविलेले भस्म शंखभस्माप्रमाणे अम्लपित्तावर अत्यंत उपयुक्त असते.

**प्रमाण :** २५० ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध, लिंबाचे सरबत.

❑❑❑

## ७. प्रवाळपंचामृत

**घटकद्रव्ये :** प्रवाळभस्म, शंखभस्म, शौक्तिक भस्म, कपर्दिक भस्म, मौक्तिक भस्म.

**भावना :** रुईचा चीक.

समुद्रपंचक म्हणजेच समुद्रात मिळणारी प्रवाळ, शंख, शुक्ता (शिंपला), कपर्दिक (कवडी) व मोती ही पाच द्रव्ये होत. या पाच प्राणिज घटकांपासून बनविलेल्या कल्पाला प्रवाळ पंचामृत हे नाव मिळालेले आहे.

प्रवाळपंचामृत हा कल्प महास्रोतसावर म्हणजेच पचनसंस्थेवर विशेष कार्यकारी असा कल्प आहे. यातील सर्व औषधी घटकांचे पृथःकरण केले तर ही सर्व $CaCO_3$ आहेत असे दिसते. असे असले तरी या प्रत्येकाचे शरीरातील कार्यक्षेत्र व गुणधर्म मात्र प्रत्यक्षत: 'भिन्न असतात असे आढळते. यातील शंखभस्म उत्तम अग्निदीपन करणारे असून ग्राही गुणाचे आहे. याचे कार्य मुख्यत: उर्ध्व आमाशयावर



(Stomach) होते. कपर्दिक भस्माचे गुणकर्म शंखभस्माप्रमाणेच असले तरी याचे कार्यक्षेत्र ग्रहणी किंवा लघ्वंत्र (Small Intestine) हे आहे. प्रवाळ, मौक्तिक व शौक्तिक ही शीत गुणांची व त्यामुळे पित्तशामक म्हणून ओळखिली जाणारी द्रव्ये आहेत.

याचे सर्व गुणकर्मांमुळे प्रवाळपंचामृताचा उपयोग अम्लपित्तासाठी विशेषत: होतो. अम्लपित्तामध्ये पित्त हे द्रव व सर गुणांनी वाढलेले असते व ते साम (अपाचित) असे असते. यासाठी ग्राही, पित्तशामक व अग्निवर्धक गुणांनी युक्त औषधांची जरुरी असते.

प्रवाळपंचामृत तयार करताना रुईच्या चिकाच्या भावना दिल्या जातात. खरे पाहता या ठिकाणी 'भावना देणे' हा शब्दप्रयोग थोडासा अप्रस्तुत वाटतो. भावना देण्यासाठी जे द्रव द्रव्य वापरावयाचे त्यामध्ये मूळपदार्थ संपूर्ण भिजावेत ही अपेक्षा असते. याठिकाणी रुईचा चीक इतक्या अधिक प्रमाणात न वापरता अगदी थोड्या प्रमाणात मिसळलेला असतो. म्हणूनच येथे 'रुईच्या चिकाने भावना दिल्या जातात' असे म्हणण्याऐवजी रुईच्या चिकाचे संस्कार केले जातात असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. रुईचा चीक हे अग्निवर्धनासाठी प्रसिद्ध असे द्रव्य आहे त्याचप्रमाणे ते विरेचन करणारे व त्याद्वारे पित्त कमी करणारेही आहे. अशा या रुईच्या चिकाचे संस्काराने प्रवाळपंचामृताचे गुणधर्म अनेकपटीने वृद्धिंगत होत असतात.

प्रवाळपंचामृतामुळे अम्लपित्तामध्ये आढळणारी छातीत जळजळणे, आंबट ढेकर येणे, उलटी होणे किंवा मळमळणे, पोटात दुखणे आदी लक्षणे तर त्वरेने कमी होतातच पण या औषधाचे उपयोगाने पाचकाग्नी सुधारल्याने भूक चांगली वाढते, खाल्लेल्या अन्नाचे पचन चांगले होते व अग्निमांद्य दूर झाल्यानेच म्हणजे रोगाचे मूळ कारणच दूर झाल्याने, कालांतराने संपूर्ण रोगमुक्ती प्राप्त करता येते. अर्थात यासाठी प्रवाळपंचामृत सातत्याने अनेकदिवस चालू ठेवणे क्रमप्राप्त ठरते.

केवळ अम्लपित्तातच नव्हे तर अग्निमांद्यजनित इतरही अनेक रोगांवर प्रवाळपंचामृताचा लाभदायक प्रयोग केला जातो.

अम्लपित्त, Hyperacidity, Peptic Ulcer या सारख्या रोगांमध्ये खरोखरीच अप्रतिम असा हा कल्प रुग्णासाठी वरदानच ठरतो.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मिं. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी, लिंबू सरबत.

❑❑❑

## ८. कामदुधा

**घटकद्रव्ये :** मुक्तापिर्ष्टी, प्रवाळपिर्ष्टी, शौक्तिक भस्म, कपर्दिक भस्म, शंखभस्म, गैरीक, गुळवेलसत्व.

कामदुधा किंवा कामदुहा या नावाने हा कल्प प्रसिद्ध आहे. खरे पाहता कामदुधा या नावाचे अनेकविध प्रकारचे, वेगवेगळी घटकद्रव्ये असणारे कल्प बनविले जातात व वापरलेही जातात. यासाठीच कामदुधा या केवळ नावावर विसंबून न राहता त्यातील घटकद्रव्यांचा विचार प्रत्येक वेळी केलाच पाहिजे. याठिकाणी जो कामदुहा कल्प वर्णिलेला आहे त्याचा पाठ भैषज्यरत्नावलीतील असून याचाच व्यवहारात सर्वाधिक प्रमाणात वापर केला जातो.

कामदुधेच्या वर वर्णिलेल्या घटकद्रव्यांकडे पाहता असे लक्षात येईल की यात समुद्रपंचकापैकी सर्वच्या सर्व द्रव्ये आहेतच. म्हणजेच प्रवाळपंचामृतातील सर्व घटक द्रव्ये यात असून जोडीला गैरीक व गुळवेल सत्व आहे. ही सर्वच द्रव्ये पित्तशामक आहेत. अम्लपित्त या रोगातील सर्वच लक्षणे कमी करण्यासाठी या कल्पाचा उपयोग होत असतो. अम्लपित्तामध्ये आढळणारे छर्दि (Vomitting) हे लक्षण तर कामदुधेने त्वरेने कमी होते. कामदुधा हे उत्तम Antacid असल्याने Hyperacidity याने नाहीशी होते व म्हणूनच अम्लपित्तात उपद्रवात्मक येणाऱ्या आमाशयगत व्रण (Peptic Ulcer) या लक्षणावरही उत्तम कार्यकारी असे हे द्रव्य आहे.

कामदुधेचा आणखी एक प्रमुख उपयोग म्हणजे मुखपाकनाशन. मुखपाक (Stomatitis) म्हणजे व्यवहारात ज्याला 'तोंड येणे' असे म्हणतात, ते लक्षण. मुखपाक हे लक्षणही पित्त वाढल्याचेच द्योतक आहे, त्याचबरोबर ते रक्तदुष्टिचेही द्योतक आहे. कामदुधेमध्ये असणाऱ्या गैरीकामुळे तोंडात व जीभेवर आलेले व्रण चटकन भरून येतात. यात असणारे गुळवेलसत्व हे रक्तदोष दूर करण्यातील एक अग्रगण्य असे औषध असल्याने जो काही रक्तदोष या मुखपाकास कारणीभूत असतो तोही दूर होतो. मुखपाक हे लक्षण अग्निमांद्याचेही द्योतक आहे. हे अग्निमांद्य दूर करण्याचे कार्य कामदुहेतील इतर द्रव्ये करीत असतात. याप्रकारे मुखपाकाच्या विविध अंगावर कार्यकारी असल्यानेच कामदुधा हे या मुखपाकावरील सर्वोत्कृष्ट औषध बनते.

कामदुधा उत्कृष्ट पित्तशामक असल्यानेच दाह कमी करण्याचे कार्यही या कल्पाकडून घडते. हस्तपाददाह, नेत्रदाह, सदाहमूत्रप्रवृत्ती, सर्वांगदाह आदी अनेक लक्षणे या कामदुधेचे प्रयोगाने नाहिशी होतात.

यातील गैरीक व गुळवेल सत्व यामुळे या कल्पाचा उपयोग योनिगत श्वेतस्राव (Leucorrhoea) यासाठीही होत असतो. गैरीक कषाय (तुरट) रसाचे व द्रवशोषक असल्यानेच त्याचेकडून हे कार्य घडते.

ज्वर हाही एक पित्तप्रधान रोग. पित्ताच्या तीक्ष्ण गुणानी सर्वांगाचा दाह होत असतो. आमाशयातील पित्त सर्व शरीरात पसरल्याने या पित्ताच्या तीक्ष्ण, उष्ण गुणाने रुक्षता येत असते. यासाठीच ज्वरामध्ये व ज्वरोत्तर कालामध्येही कामदुधा उपयुक्त ठरते. ज्वरानंतर येणारा थकवा नाहीसा होण्यासाठी पित्तशामक पण अग्नीवाढविणारी अशी चिकित्सा करावी लागते. मौक्तिकादि द्रव्यानीयुक्त कामदुधेने हे कार्य घडते व म्हणूनच या अवस्थेत वापरण्यासाठी हा एक सर्वात चांगला कल्प समजला जातो.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ९. अभ्रक भस्म

अभ्रक (Mica) हा ही एक खनिज पदार्थ आहे. अभ्रक नुसते पाहिले तर ते पारदर्शक असते व त्यास चकाकीही फार असते. भस्म करताना ही चकाकी पूर्ण नाहीशी होणे आवश्यक असते. थोडीशीही चकाकी दिसत असली तरी अजून भस्म चांगले बनलेले नाही असा याचा अर्थ होतो. ज्याची चकाकी पूर्णपणे नाहिशी झालेली आहे अशा अभ्रक भस्मास 'निश्चंद्र अभ्रक' अशी संज्ञा वापरली जाते. अभ्रक भस्मासाठी किमान एवढीतरी परीक्षा ही आवश्यक असते.

अभ्रक भस्म बनविताना जे अग्निसंस्कार केले जातात त्यास 'पुट' असे म्हणतात. जितकी अधिक पुटे द्यावीत तितके ते भस्म अधिक चांगले बनते, अधिक कार्यकारी होते व म्हणूनच अभ्रकभस्म निश्चंद्र बनल्यानंतरही त्याची प्रक्रीया पुढे चालूच ठेवावी असे म्हटले जाते. शंभर पुटे देऊन बनविलेले ते 'शतपुटी अभ्रक,' हजार पुटे देऊन बनविलेले ते 'सहस्रपुटी अभ्रक.' या प्रकारे वेगवेगळ्या गुणश्रेणींची अभ्रकभस्मे बनविली जातात. 'सहस्रपुटी अभ्रक' हे सर्वश्रेष्ठ प्रकारचे अभ्रकभस्म आहे असे म्हटले जाते.

शास्त्रीय दृष्ट्या विचार करता 'सहस्रपुटी अभ्रक' हे सर्वश्रेष्ठ असले तरी

व्यवहारात बाजारात मिळणारे 'सहस्रपुटी अभ्रक' हे खरोखरीच सहस्रपुटी आहे का याची शंकाच असते. अभ्रक भस्म बनविताना एक पुट द्यावयाचे तर किमान २८ दिवस सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लागतात. याप्रमाणे हिशेब केल्यास १००० पुटे होण्यास किमान ५५ वर्षांचा कालावधी लागेल व तेही ही प्रक्रिया सतत चालू राहिली तरच. इतक्या कालावधिनंतर बनू शकणारे हे 'सहस्रपुटी अभ्रक' खरोखरीच कोणी बनवते का? व ते बाजारात विकणे परवडते कसे? या सर्वांचा खरोखरीच विचार करावयास हवा. ज्या औषधी कंपन्यांची स्थापना होऊन काही मोजकी वर्षे सुद्धा लोटली नाहीत त्या कंपन्याही 'सहस्रपुटी (?) अभ्रक' विकतात हे पाहता तर निश्चितच शंका येते.

यासाठीच अधिक किमतीच्या 'सहस्रपुटी'च्या नादी न लागता केवळ 'निश्चंद्र अभ्रक' वापरावे, तेही उत्तम गुणकारी असते असे मी म्हणेन.

अभ्रकाविषयी इतक्या प्रास्ताविकाची आवश्यकता होतीच व म्हणूनच त्याचा विस्तार केला. आता त्याच्या गुणकर्मांचा विचार करू.

अभ्रक भस्म हे उत्तम हृद्बल्य आहे. यामुळेच हृद्रोगाच्या विविध अवस्थेमध्ये या भस्माचा उपयोग केला जातो. विशेषत: ह्या भस्माने हृदयाच्या स्नायूंना बल प्राप्त होत असते. हृदयाच्या स्नायुना संहनन प्राप्त होत असल्याने ज्यामध्ये हृदयाच्या स्नायुमध्ये शैथिल्य उत्पन्न होऊन त्यामुळे थोड्याशाही श्रमाने दम लागणे (Breathlessness on Excertion), कास (Cough), पादभागी सूज येणे (Oedema on Feet) वगैरे लक्षणे आढळतात अशा हृद्रोगाच्या अवस्थेत (C.C.F.) अभ्रक भस्म उत्तम कार्यकारी ठरते.

अभ्रक हे श्वसन मार्गाच्या अनेक रोगांवर उपयुक्त ठरते. अभ्रकाचे प्राणवहस्रोतस (विशेषत: फुफ्फुसे) हे विशेष कार्यक्षेत्र आहे. अभ्रक भस्म उत्तम कफनाशकही आहे. राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis) या रोगात अभ्रकाचा उत्कृष्ट लाभ आढळून येतो. राजयक्ष्म्यामध्ये फुफ्फुसात जी पोकळी निर्माण होते (Cavitation) ती पोकळी भरून काढण्यासाठी अभ्रक भस्माइतके दुसरे चांगले द्रव्य शोधावेच लागेल. उत्तम कफघ्न व फुफ्फुसांवर कार्यकारी असल्यानेच तमकश्वास (दमा- Bronchial Asthma), जलपार्श्व (Pleurecy with Effussion) या सारख्या रोगांमध्येही रसायन म्हणून या भस्माचा यशस्वी वापर केला जातो. अभ्रक भस्माने दम्याचा अ‍ॅटॅक कमी होतो असे मात्र नव्हे तर फुफ्फुसाला बल मिळाल्याने पुन:पुन्हा अ‍ॅटॅक येण्याची प्रक्रिया निश्चितच नियंत्रित करता येते.

अभ्रक भस्माने स्नायुंना बल प्राप्त होत असल्याने, सिरास्नायुंचे संहनन



(Tone) वाढत असल्याने Low Blood Pressure यासाठीही या भस्माचे प्रयोगाने त्वरित लाभ मिळतो.

अभ्रकाने केवल स्नायुच नव्हे तर सर्वच शरीरावयांचे ठिकाणी असणारे शैथिल्य दूर होते. याचकरिता सर्व धातूंचे ठिकाणी शैथिल्य ज्या रोगात उत्पन्न होते अशा पांडु रोगात (Anaemia) लोह भस्माबरोबर अभ्रक भस्माचा उपयोग केल्यास लोहाचे गुणकर्मात अनेक पटीने वाढ होते. यासाठीच पांडु रोगात इतर औषधांचे जोडीला अभ्रकाचाही वापर केला जातो.

कोणताही रोग बरा झाल्यानंतर शरीरात राहणारे दौर्बल्य कमी करण्यासाठी, पूर्ववत शक्ती प्राप्त होण्यासाठी अभ्रक भस्माचा उपयोग करणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑ ❑ ❑

## १०. शृंग भस्म-मृगशृंग भस्म

शृंग म्हणजे शिंग. प्राण्यांच्या शिंगापासून बनविलेले भस्म म्हणजेच शृंग भस्म होय. यासाठी कोणत्याही प्राण्यांची शिंगे वापरावयाची नसून केवळ मृग शृंगाचाच म्हणजे हरिण व सांबर यांच्या शृंगाचाच उपयोग करावयाचा असतो. म्हणूनच यास मृगशृंग भस्म असाही पर्यायी शब्द वापरला जातो.

मृगशृंग भस्म हे उत्तम कफघ्न द्रव्य असून प्राणवहस्रोतस म्हणजेच श्वसनमार्ग हे याचे विशेष कार्यक्षेत्र आहे. मृग शृंगाचा मुख्य उपयोग होतो तो त्याच्या हृद्बल्य- हृदयाला बळ देणे-या कर्मामुळे. अनेक प्रकारच्या हृद्रोगांमध्ये या भस्माचा उपयोग होतो. विशेषत: ज्यामध्ये हृत्शूल (Cardiac pain) हे लक्षण प्रामुख्याने आढळते, अशा सर्व रोगात शृंग भस्म उपयुक्त ठरते. Anginal Pains किंवा हृदयाला होणाऱ्या अपुऱ्या रक्तपुरवठ्यामुळे उत्पन्न होणारा हृद्रोग (Ischimic Heart Disease) यावर आत्ययिक अवस्थेत (During Emergency) उपयुक्त असणारी जी काही महत्त्वाची औषधे आहेत त्यापैकी शृंगभस्म हे अगदी पहिल्या प्रतीचे औषध समजले जाते. केवळ आत्ययिक अवस्थेतच नव्हे तर नंतरही हृद्रोगाची तीव्रता कमी व्हावी, हृद्रोग लवकर बरा व्हावा यासाठी तसेच पुन:पुन्हा हृत्शूल होणे टळावे यासाठीही शृंगभस्म वापरणे निश्चितपणे लाभदायी ठरते.

हृत्शूलाप्रमाणेच इतरही ज्या प्रकारच्या हृद्रोगांवर शृंगभस्म कार्यकारी ठरते,

त्यामध्ये हृदयाच्या स्नायुंचे संहनन (Tone) कमी होऊन, त्या स्नायुंचे टिकाणी शैथिल्य येऊन, हृदयाचा आकार ज्यामध्ये वाढतो अशा हृद्रोगाचा समावेश करता येईल. या प्रकारच्या हृद्रोगांमध्ये (C. C. F.) स्नायुशैथिल्यामुळे हृदयातून रस-रक्तादिंचे विक्षेपणाचे कार्य योग्य तऱ्हेने होत नाही. यामुळेच थोड्याशाही श्रमाने दम लागणे, खोकला येणे, पायावर सूज येणे व नंतर हळूहळू सर्वच अंग सुजणे अशा तऱ्हेची लक्षणे उत्पन्न होतात. ही सर्व लक्षणे कमी करण्यासाठी जी औषधे वापरतात त्यांचे जोडीला शृंगभस्महो वापरणे लाभदायक ठरते.

तमकश्वास (दमा-Bronchial Asthama), कफजकास (Bronchitis) किंवा कोणत्याही कारणांनी येणारा सकफ कास-ज्यामध्ये कफ पडतो असा खोकला (Cough with Expectoration) कमी करण्यासाठीही शृंगभस्माचा उपयोग करणे इष्ट ठरते.

राजयक्ष्मा (Pulmonary T. B.) पार्श्वशूल (Plurecy), श्वसनक ज्वर (Pneumonia) यासारख्या रोगात असणारी उरोवेदना (छातीत दुखणे- Chest Pain) कमी करण्यासाठीही मृगशृंगभस्म फारच उपयुक्त ठरते.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ११. वंग भस्म

वंग म्हणजे कथिल (Tin). या वंग म्हणजेच कथिलापासून बनविलेले भस्म म्हणजेच वंगभस्म होय.

वंगभस्म हे अनेकविध रोगांमध्ये, विविध अवस्थांमध्ये उपयुक्त असणारे औषध आहे. वंगभस्माचे मुख्य कार्य म्हणजे ओजोवर्धन करणे. ओज म्हणजेच सप्तधातूंचा सारभाग. याचे वर्धन वंगभस्माकडून घडते असा याचा अर्थ आहे. वंग भस्माने शरीरातील धातूंच्या पोषणाचे कार्य करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या, हे धातू योग्य प्रकारे निर्माण होण्यासाठी कार्यकारी असणाऱ्या अग्निंचे म्हणजेच धात्वग्निंचे पोषण व वर्धन होत असते. धातूंच्या निर्मितीची प्रक्रिया सुधारल्यानेच घेतलेल्या आहारापासून ते ते शरीरधातू सुयोग्य प्रमाणात निर्माण होऊ शकतात व अर्थातच या सर्व धातूंचा सारभाग जे ओज, त्याची निर्मिती होऊ शकते.

यासाठीच वंगभस्माचा उपयोग बल्य म्हणून-बल प्राप्त करून देणारे औषध



म्हणून- फारच चांगल्या प्रकारे होतो. कोणत्याही रोगानंतर येणारे दौर्बल्य कमी करण्यासाठी या वंगभस्माचा उपयोग केला जातो

राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis) किंवा मधुमेह (Diabetis Melitis) यासारख्या रोगांमध्ये ओज बिघडलेले असते, ओजक्षय झालेला असतो. या ओजक्षयानेच अनेकविध प्रकारची लक्षणे या रोगात निर्माण होत असतात. वंगभस्माने हा ओजक्षय दूर होत असल्यानेच या रोगांवरील वंगभस्म हे एक प्रभावी औषध ठरते.

वंगभस्माने सर्वच धातूंचे पोषण होते व ओजेवर्धन होते हे तर खरेच पण त्यातही वंगभस्माचे प्रमुख कार्य घडते ते शुक्रधातूवर. वंगभस्माचे उपयोगाने शुक्रधातूची उत्पत्ती उत्तम प्रकारे होत असल्याने या कल्पाचा उपयोग शुक्रक्षयजन्य अनेक लक्षणांसाठी होत असतो. शुक्रजंतू कमी असताना किंवा विकृत निर्माण होत असताना (Oligospermia) शुक्रवृद्धि करून नपुंसकता (Sterility) दूर करण्यासाठी जी औषधे वापरली जातात त्यापैकी वंगभस्म हे एक महत्वाचे औषध गणले जाते. शुक्रक्षयानेच काही रुग्णामध्ये मैथुन असमर्थता (Sexual Debility) येते. हे लक्षण कमी करण्यासाठीही वंगभस्माचा लाभदायक प्रयोग केला जातो. वंगभस्माचा उल्लेख 'वाजीकर' म्हणून केला जातो तो याच गुणकर्मामुळे. ज्या औषधांचे सेवनाने मानवास घोड्याप्रमाणे मैथुनसामर्थ्य प्राप्त होते त्या औषधास वाजीकर असे म्हटले जाते.

वंग भस्म हे कषायरसाचे व स्तंभक असल्याने पुरुष रुग्णांमध्ये आढळणारे 'स्वप्नावस्था' म्हणजेच झोपेतच शुक्रपात होणे हे लक्षण वंगभस्माने त्वरेने कमी होते. स्त्रियांमध्ये आढळणाऱ्या योनिगत श्वेतस्राव (Lucorrhea धुपणी) या लक्षणावरही वंगभस्म उत्तम कार्यकारी ठरते ते त्याच्या स्तंभक व कफघ्न गुणामुळेच होय.

प्रमेह (Diabetis) या रोगात क्लेद अत्यधिक प्रमाणात निर्माण होत असतो. क्लेद म्हणजे अपाचित, टाकाऊ, त्याज्य असा पदार्थ. आहारापासून शरीरभावांची उत्पत्ति होत असताना मलस्वरूपात या क्लेदाची उत्पत्ति होत असते. प्रमेहामध्ये शरीरधातूंची उत्पत्ती योग्य प्रमाणात व योग्य तऱ्हेने न होण्यानेच क्लेद अधिक प्रमाणात निर्माण होत असतो. वंगभस्माने सप्तधातूंचा सारभाग जे ओज, त्याची उत्पत्ति चांगली होते. याचाच अर्थ सर्वच धातूंची उत्पत्ती वंगभस्माने नियंत्रित होते असा आहे. यामुळेच टाकावू, अपाचित असा भाग (क्लेद) अत्यल्प प्रमाणात उत्पन्न होत असतो. प्रमेहाची मुख्य संप्राप्तीच याप्रमाणे वंगभस्माने भंग पावत असल्याने वंग हे प्रमेहावरील एक उत्कृष्ट औषधी द्रव्य म्हणून ओळखले जाते.

प्रमेहामध्ये त्वचेवर फोड येतात, ते फुटतात व त्यातून स्राव वाहू लागतो.

यांनाच प्रमेह पिडका असे म्हटले जाते. प्रमेह पिडका हा प्रमेहातील एक महत्त्वाचा उपद्रव (Complication) आहे. प्रमेह पिडका एकदा उत्पन्न झाल्या की त्या लवकर बऱ्या होत नाहीत. प्रमेही रुग्णामध्ये कोणत्याही कारणाने जखम झाली तर ती जखम लवकर भरून येत नाही असेही आढळते. जखम भरून येण्यासाठी जी धातूंची उत्पत्ती होणे आवश्यक असते ती न होता उलट पिंडका वा जखमांचे ठिकाणी क्लेद अधिक प्रमाणात उत्पन्न झाल्यानेच हे घडते. वंग भस्माने हा क्लेद कमी होऊन धातूंच्या पोषणाची प्रक्रियाही सुधारत असल्यानेच प्रमेहपिडकावरील वंगभस्म हे एक प्रधान औषध आहे. प्रमेही रुग्णांना होणाऱ्या जखमाही वंगभस्माचे सेवनानंतर त्वरेने भरून येऊ लागतात.

प्रमेहाप्रमाणेच आणखीही एका रोगामध्ये क्लेद अधिक प्रमाणात निर्माण होत असतो व तो रोग म्हणजे कुष्ठ हा होय. कुष्ठ (Skin Disease) या रोगात क्लेदामुळेच खाज सुटणे (कंडू-Icching) व स्राव (Secretions) ही दोन प्रमुख लक्षणे आढळत असतात. वंग भस्माने क्लेद कमी होत असल्यानेच पामा (Scabis) विचर्चिका (Eczima) या व यासारख्या अन्य कुष्ठ रोगांमध्ये, विशेषत: ज्या कुष्ठाच्या प्रकारात खाज व पाणी सुटणे ही दोन लक्षणे आढळतात अशा सर्वांमध्ये या वंगभस्माचा विशेषत्वाने प्रयोग केला जातो.

कामलेमध्येही (Jaundice) कंडू (Icching) हा प्रमुख उपद्रव (Complication) निर्माण होतो. क्लेदाचे प्रमाण वाढणे हेच यामागचे कारण असते. उपद्रवात्मक उत्पन्न होणाऱ्या अत्यंत त्रासदायक अशा कंडू लक्षणावर वंगाचा उपयोग केल्याने हे लक्षण त्वरेने कमी होत असते.

अनेक रोगांमध्ये त्वचेचा वर्ण बदलतो. त्वचा फिकट, निस्तेज दिसू लागते. याचे कारणही बरेच वेळा ओजक्षय हेच असते. पांडूरोगांमध्येही (Anaemia) ओजक्षय होतो असेच आयुर्वेदाचे मत आहे. हे वैवर्ण्य दूर करून त्वचेला प्राकृत वर्ण प्राप्त करून देण्यासाठीही वंग उत्तम कार्यकारी ठरते.

घाम फार येणे हेही शरीरातील क्लेद अधिक प्रमाणात वाढल्याचेच लक्षण आहे. काहीवेळा सर्व शरीरातून घामाच्या धारा वाहतात असे रुग्ण मिळतात तर काही रुग्णांमध्ये शरीराच्या ठराविक भागातच घाम फार येतो. हातापायाच्या तळव्यास घाम येणे व त्यामुळे लिहिताना व चालताना त्रास होणे हे लक्षण घेऊन तर अनेक रोगी येतात. या सर्व अवस्थांत वंग भस्म हे एकमेव कार्यकारी असे औषध आहे. याचे उपयोगाने स्वेदप्रवृत्ति निश्चितच कमी होते. पण बरेच दिवस क्वचित काही महिने वंगभस्माची चिकित्सा चालू ठेवावी लागते.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** दूध, मध.

❑❑❑

## १२. सुवर्णराजवंगेश्वर

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, नवसागर, कथिल.

सुवर्णराजवंगेश्वर हाही एक वंगाचा म्हणजेच कथिलाचा (Tin) एक कल्प. या कल्पाच्या नावात जरी सुवर्ण असले तरी घटक द्रव्यांमध्ये मात्र कोणत्याही स्वरूपात सुवर्ण नाही. सोन्याप्रमाणे पिवळ्या रंगाचा, सोन्याप्रमाणेच अत्यंत चककणारा कल्प असल्यानेच यास सुवर्णराजवंगेश्वर असे म्हणतात.

प्रथमत: कथिल गरम करून पातळ करतात. या उष्णतेने द्रव झालेल्या कथिलामध्ये पारा मिसळला असता, या दोहोंचे एक संयुग तयार होते. ते अत्यंत ठिसूळ असते. या संयुगाची पावडर करता येते. या चूर्णात गंधक व नवसागर मिसळून चांगले घोटून त्याची कज्जली तयार केली जाते. ह्या कज्जलीपासून कुपिपक्व पद्धतीने वालुकायंत्राचे सहाय्याने हा सुवर्णराजवंगेश्वर कल्प तयार केला जातो. सोनेरी वर्णाचा हा कल्प चूर्णाच्या स्वरूपातच तयार होतो.

सुवर्णराजवंगेश्वर हा कल्प वंगाचाच एक कल्प असल्यानेच वंगभस्माचे सर्वच गुणकर्म या कल्पातही आढळतात. या कल्पास वंगाचेशिवाय पारा व गंधकाची जोड मिळालेली असल्यानेच वंगभस्मापेक्षा कितीतरी अधिक पटीत हा कल्प कार्यक्षम ठरतो. पारा व गंधकाची सर्वच संयुगे ही उत्कृष्ट योगवाही असतात. योगवाही म्हणजेच ज्या द्रव्यांबरोबर ही संयुगे दिली जातात त्या द्रव्यांचे गुणकर्म वाढविण्याचे कार्य यांचेकडून घडते. यामुळेच वंगभस्मापेक्षा अगदी अल्पमात्रेत देऊनही अधिक कार्यकारी ठरणारा हा कल्प अनेक वेळा वंगभस्माऐवजी वापरला जातो.

शुक्रक्षय (Oligospermia) व त्यामुळे उत्पन्न होणारी विविध लक्षणे, घाम फार येणे (Excessive Sweating), कंडू (Icching), वैवर्ण्य (Discolouration of Skin) इत्यादी लक्षणांवर तसेच मूत्रमार्गातील मूत्राल्पता (Scanty Urination), मूत्रकृच्छ्र (Difficulty in Micturition) यासारख्या रोगांवर याचा निश्चितच उपयोग होतो. स्त्रियांमध्ये आढळणारे, योनिगत श्वेतस्राव वा श्वेतप्रदर (Leucorrhea) हे लक्षण व पुरुषात आढळणारे 'स्वप्नावस्था' हे लक्षणही सुवर्णराजवंगेश्वराने फार चटकन कमी होते. प्रमेह (Diabetis) व प्रमेह पिडका यावरील ही हे एक प्रधान औषध आहे.

उपदंश व फिरंग (Gonorrhea व Syphylis) या रोगांमध्येही सुवर्णराजवंगेश्वराचा लाभदायक प्रयोग केला जातो. या रोगांत सुरुवातीच्या अवस्थेत-जेव्हा मेढू वा योनिभागी व्रण असतो, जखम असते अशा अवस्थेत या कल्पाचा

काहीही उपयोग नाही. पण या रोगांच्या जीर्णावस्थेत (Chronic Condition) या सुवर्णराजवंगेश्वराचा फारच चांगला उपयोग होताना दिसतो.

**प्रमाण :** ५० मि. ग्रॅ. ते १२५ मि. ग्रॅ दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, पाणी.

❑❑❑

## १३. नागभस्म

नाग हा संस्कृत शब्द असून नागधातूला मराठीत शिसे (Lead) असे म्हणतात. या शिशापासून बनविलेले भस्म ते नागभस्म होय.

नागभस्म हेही वंगभस्माप्रमाणेच क्लेद कमी करणारे औषधी द्रव्य आहे. नागभस्माचा उपयोग मुख्यत: मूत्रमार्गातील रोगांसाठी होत असतो. नागभस्म मूत्रल (मूत्राचे प्रमाण वाढविणारे Diuretic) असल्याने मूत्रकृच्छ्र (Difficulty in Micturition), मूत्राघात (Scanty Urination) यासारख्या मूत्रवहस्रोतसाचे रोगांवर उत्तम कार्यकारी ठरते. क्लेद कमी करणारे व मूत्रल गुणाचे असल्यानेच या नागभस्माचा उपयोग शोथ (Oedema) या लक्षणासाठीही होतो.

श्वेतप्रदर (Leucorrhoea धुपणी) या रोगावरील जी औषधे उपयुक्त म्हणून गणली जातात त्यामध्ये नागभस्म हे एक प्रमुख औषधी द्रव्य आहे. उत्तम कफघ्न व क्लेदहारक असल्यानेच नागभस्माचे उपयोगाने योनिगत श्वेतस्राव हे लक्षण त्वरेने कमी होण्यास मदत होते.

क्लेद कमी करणारे औषधी द्रव्य असल्यानेच वंगभस्माप्रमाणेच अन्य विविध अवस्थांवर या भस्माचा उपयोग होतो. विशेषत: कुष्ठाच्या ज्या प्रकारात (Skin Diseases) खाज (Icching) व स्राव (Secretions) अधिक असतात त्यामध्ये नागभस्म विशेष उपयुक्त ठरते.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, पाणी.

❑❑❑

## १४. जसदभस्म

जस्त (Zink) या धातूपासून बनविले जाणारे ते जसदभस्म होय. नाग (Lead) व वंग (Tin) याप्रमाणे क्लेद कमी करणारे हेही एक भस्म असल्यानेच नाग व वंगभस्माप्रमाणेच विविध प्रकारच्या रोगांमध्ये याचा उपयोग होत असतो.



जसदभस्माचा मुख्य उपयोग होतो तो मधुमेहासाठी. मधुमेह (Diabetes Melitis) या रोगाच्या संप्राप्तिमध्ये क्लेद (अपाचित-टाकावू भाग) निर्माण होणे ही प्रमुख घटना असते. या क्लेदाची उत्पत्तिच होऊ नये यासाठी जसदभस्म कार्यकारी ठरत असल्याने त्याचे उपयोगाने मधुमेहाची सर्वच लक्षणे आटोक्यात राहतात. एवढेच नव्हे तर जसदभस्माचा सातत्याने वापर करीत राहिल्यास काही रुग्णांत का होईना पण मधुमेह नाहीसा झाला, पूर्णपणे बरा झाला असे दाखविता येते. याकरिताच मधुमेहाची चिकित्सा करीत असताना जसदभस्माचा वापर करणे योग्य, नव्हे आवश्यकच ठरते.

मधुमेहामुळे उत्पन्न होणाऱ्या प्रमेहपिडका कमी होण्यासाठी हे जसदभस्म कार्यकारी ठरते. या प्रमेहपिडकातून होणारा स्राव कमी करून, व्रण शुद्ध करून, तो लवकर भरून येण्याची क्रिया जसदभस्माने साधली जाते.

वंगभस्माप्रमाणेच विविध प्रकारच्या कुष्ठ रोगांवर (Skin Diseases) व कोणत्याही कारणाने उत्पन्न होणाऱ्या कंडू (Icching) या लक्षणासाठीही जसदभस्म उत्तम उपयोगी पडते.

**प्रमाण :** २५० ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, पाणी.

❑❑❑

## १५. त्रिवंगभस्म

**घटकद्रव्ये :** नाग (Lead), वंग (Tin), जसद (Zink) यांची भस्मे.

त्रिवंग भस्मामध्ये नाग, वंग व जसद या तीनही धातूंच्या भस्मांचे समप्रमाणात मिश्रण केलेले असते. नाग, वंग व जसद या तीनही धातूंच्या भस्मांचे गुणधर्म स्वतंत्रपणे यापूर्वी पाहिलेले आहेतच. या सर्व धातूंमध्ये क्लेद कमी करणे हा महत्त्वाचा गुण आढळून येतो. वंगभस्म उत्कृष्ट ओजोवर्धक व विशेषत: शुक्रवर्धक आहे. नागभस्म मूत्रल आहे तर जसद भस्म हे प्रमेहावरील उत्कृष्ट औषधी द्रव्य आहे. शरीरातील धात्वग्निंचे प्रदीपन करून त्याद्वारे शरीरधातूंची उत्पत्ती नियंत्रित करून, धातूंच्या निर्गितीचे वेळीच त्याज्य स्वरूपात उत्पन्न होणाऱ्या क्लेदाचे प्रमाण कमी करणारी ही तीनही भस्मे एकत्रित आली असता परस्परांना सहाय्यभूत ठरतात व त्यामुळेच त्रिवंगभस्म हा या स्वरूपाचा एक अप्रतिम कल्प बनतो.

त्रिवंग भस्मामध्ये नाग, वंग, जसद या सर्वांचे गुण एकवटलेले असल्याने

अनेकविध रोगांमध्ये विविध अवस्थामध्ये या भस्माचा उपयोग केला जातो.

प्रमेही रुग्णांमध्ये (Diabetes) केवळ एकेरी जसद भस्म वापरण्यापेक्षा त्रिवंगभस्म वापरणे अधिक श्रेयस्कर ठरते. त्रिवंगाचे उपयोगाने मूत्रातून जाणाऱ्या शर्करेचे प्रमाण चटकन नाहीसे होते व रक्तातील साखरेचे प्रमाणही (Blood Sugar Level) हळूहळू पण निश्चितपणे कमी होऊ लागते.

प्रमेहपिडका, कंडू (Icching) व स्राव (secretions) असणारे अन्य त्वचेचे रोग (Skin diseases), त्वचा वैवर्ण्य (Discolouration of Skin), श्वेतप्रदर (Leucorrhoea), स्वेदातिप्रवृत्ती (Excessive Sweating), शुक्राल्पता (Oligospermia) व त्यामुळे येणारे क्लैब्य (Sterility), मैथुनासामर्थ्य (Sexual Debility) इत्यादी सर्वच लक्षणांवर नाग, वंग, जसद यांचा एकेरी प्रयोग करण्यापेक्षा त्रिवंगभस्म वापरल्यास निश्चितच अधिक लवकर व अधिक चांगला लाभ मिळतो.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, पाणी.

❑❑❑

## १६. लोहभस्म

लोहभस्म हे उत्कृष्ट पोलादापासून (Steel Iron) बनविले जाते.

लोहभस्माचा उपयोग प्रामुख्याने पांडुरोगासाठी (Anaemia) केला जातो. पांडुरोगामध्ये ज्या प्रमुख घटना असतात त्यामध्ये रक्तधातू कमी होणे ही संप्राप्तिमधील प्रमुख घटना होय. रक्तातील रक्तरेणू (R. B. C.) या पेशीमध्ये लाल रंगाचे एक हिमोग्लोबीन नावाचे द्रव्य असते. हे हिमोग्लोबीन म्हणजेच खरे रक्त होय. रक्तकणांतील या हिमोग्लोबीनचा क्षय होणे म्हणजेच पांडुरोग निर्माण होणे होय.

हिमोग्लोबीनच्या निर्मितीसाठी लोहक्षार आवश्यक असतात. हिमोग्लोबीनच्या वाढीसाठी या लोहक्षारांचा उपयोग शरीरास व्यवस्थित व्हावा लागतो. इतर कोणत्याही प्रकारे लोहक्षार देण्यापेक्षा लोह हे लोहभस्म या स्वरूपात दिल्यास या लोहाचे शरीरात शोषण व त्याचे शरीरभावामध्ये सात्मीकरण उत्तम प्रकारे होऊ शकते. याचसाठी लोहभस्म हे पांडुरोगावरील एक आवश्यक असे औषधी द्रव्य आहे.

लोहभस्म हे दौर्बल्यासाठीही उपयुक्त ठरते. शारीरिक बल हे बऱ्याच अंशी रक्तधातूच्या शरीरातील स्थितीवरच अवलंबून असते. लोहभस्माने रक्त सुयोग्य प्रकारे निर्माण होत असल्यानेच या कल्पाचा उपयोग बल कायम राखण्यासाठी केला जातो.



लोहभस्म हे कषाय (तुरट) रसाचे असल्याने याचे प्रयोगाने सर्वच धातूंवर संहननाचे कार्य घडते. शरीरावयवांना आलेले शैथिल्य दूर करून त्यांना प्राकृत स्थिती प्राप्त करून देण्याचे कार्य लोहभस्माने घडते.

लोहभस्म हे कषाय (तुरट) असून शीतवीर्यही आहे. त्यामुळेच या कल्पाने रक्तसंवर्धनाप्रमाणेच रक्तस्तंभनाचेही कार्य घडते. कोणत्याही मार्गे शरीरातून बाहेर होणारा रक्तस्राव थांबविण्यासाठी लोहभस्म उपयुक्त ठरते ते त्याच्या रक्तस्तंभन करण्याचे गुणामुळेच. रक्तप्रदर (Bleeding P. V.) कमी करण्यासाठी या कल्पाचा विशेष उपयोग होत असतो. तुरट रसाचे, स्तंभक व उत्कृष्ट कफनाशक असलेनेच लोहभस्माचा योनिगत श्वेतस्रावासाठीही (Leucorrhea) लाभदायक प्रयोग केला जातो.

लोहभस्माचा उपयोग शुक्रक्षय व त्यामुळे उत्पन्न होणारी लक्षणे (Sexual Debility) कमी करण्यासाठीही होतो. ज्या रोग्याची कामशक्ती कमी झालेली असते अशा रुग्णात इतर औषधांना लोहभस्माची जोड दिल्यास निश्चितच अधिक लाभ आढळून येतो.

लोहभस्म हे रक्तवाढीसाठी श्रेष्ठ द्रव्य आहे याबाबत शंकाच नाही पण या भस्माचा अधिक चांगला उपयोग व्हावा असे वाटत असेल तर या भस्माचा प्रयोग तुपाबरोबर करणे आवश्यक ठरते. यासाठीच लोहभस्म वापरताना तूप हेच अनुपान म्हणून नेहमीकरिता लक्षात ठेवले पाहिजे.

लोहभस्म हे याप्रकारे रक्तवृद्धी करणारे, दौर्बल्य नाहीसे करणारे एक महत्त्वाचे औषधी द्रव्य असले तरी त्याच्या कषाय (तुरट) रसामुळेच मलाचेही स्तंभन होते. शौचास साफ न होणे, मळाच्या गाठी बनणे अशी लक्षणे आढळतात व त्यामुळेच अन्य अनेक उपद्रव (Complications) निर्माण होऊ शकतात. हे सर्व टाळण्यासाठीच लोहभस्माचा प्रयोग चालू असतानाच मृदुरेचन करणारी (Mild purgatives) देणे योग्य ठरते.

काही व्यक्तिमध्ये लोहकल्प दिले असता मळमळणे (Nausia), उलटी होणे (Vomitting) व जुलाब होणे (Diarrhea) अशी लक्षणे आढळतात. ही लक्षणे निर्माण होऊ नयेत यासाठीच लोहभस्माचे जोडीला अन्य दीपन औषधे देणेही आवश्यक ठरते. एवढे करूनही वरील लक्षणे उत्पन्न होतात असे आढळले तर लोहभस्माऐवजी अन्य लोहकल्प वापरणे इष्ट ठरते.

लोहभस्माचा प्रयोग चालू असताना दिलेल्या लोहभस्मापैकी सर्वच्या सर्व लोहांश शरीरात शोषला जातो असे नव्हे. न शोषला गेलेला लोहाचा अंश मलावाटे

शरीराबाहेर पडतो व याचमुळे शौचास काळी होते. लोहभस्मामुळेच ही काळ्या रंगाची मलप्रवृत्ती होते याची पूर्व कल्पना रुग्णास देणे आवश्यक असते. अन्यथा रोगी कांही कारण नसताना याची काळजी करणे शक्य असते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप.

❑❑❑

## १७. मंडूरभस्म

मंडूरभस्म हाही एक लोह कल्प आहे. मंडूरालाच लोहकिट्ट असा पर्यायवाची शब्द आहे. मंडूर किंवा लोहकिट्ट म्हणजे जुने लोखंड गंजून तयार होणारा कीस. (Old steel Iron Reduced) या मंडुरापासून बनविलेले भस्म म्हणजेच मंडूरभस्म होय.

मंडूरभस्म हे याप्रकारे लोहभस्माचीच एक उपकल्पना आहे असे म्हणता येईल. यामुळेच लोहभस्माचे जे गुणदोष ते सर्व मंडूरभस्माचेही गुणदोष आहेत असे याचे संक्षेपाने विवेचन करणे योग्य ठरेल.

लोहभस्माप्रमाणेच मंडूरभस्म हे पांडू (Aanemia) या रोगावरील एक महत्त्वपूर्ण औषध आहे. पण यापेक्षाही मंडूरभस्माचा विशेष उपयोग होतो तो शोथ (Oedema) या रोगासाठी. कषाय रसाचे (तुरट) असल्याने व याने सर्वशरीरावयावांचे ठिकाणी असणारे शैथिल्य दूर होत असल्याने मंडूर भस्माचा उपयोग या शोथरोगात होत असतो. हृदयाला बल देण्याचे कार्यही मंडूरभस्माने होत असल्याने सर्वांगशोथ (Anasaraca) हे हृदोगातील (C. C. F.) प्रमुख लक्षण कमी करण्याचे साठीही मंडूरभस्म सहाय्यभूत ठरते.

लहान मुलांमध्ये माती खाण्याची सवय बऱ्याच वेळा आढळते. शरीरास ज्या घटकांची आवश्यकता असते ते पदार्थ मिळविण्याची शरीराची प्रवृत्ती स्वाभाविकपणेच असते. शरीरास जेव्हा लोहक्षाराची उणीव भासू लागते त्या वेळेस लहान मुले या लोहक्षारांसाठीच माती खाण्याकडे प्रवृत्त होतात. पण अशा वेळी बालकांचे पोटामध्ये मातीबरोबर इतर अन्य अनेक नको असलेले पदार्थ, त्याचप्रमाणे घाणेरडे, दूषित, जंतुयुक्त पदार्थही जाणे क्रमप्राप्त असते. यामुळेच अशा बालकास अतिसार (Diarrhoea), उदरशूल (Pain in Abdomen), कृमी (Worms) इत्यादी अनेक उपद्रव होण्याची शक्यता असते. हे सर्व टाळावयाचे तर बालकाची माती खाण्याची



सवय नाहीशी झाली पाहिजे. मंडूरभस्माचा जर यासाठी नित्य वापर केला तर शरीरास आवश्यक तेवढे लोहक्षार मिळत राहतात व आपोआपच मुलांची माती खाण्याची प्रवृत्ती कमी कमी होत जाते.

लोह भस्माप्रमाणेच मंडूरभस्माचा वापर चालू असता शौचास साफ होत नाही हे खरे. पण हे प्रमाण लोहापेक्षा पुष्कळच कमी असते व म्हणूनच प्रत्येक वेळी, प्रत्येक रोग्यात मृदुविरेचन घेतलेच पाहिजे अशी जरुरी भासत नाही. याही दृष्टीकोनातून पाहता लहान मुलांमध्ये लोहभस्म न वापरता त्या ऐवजी मंडूरभस्म वापरणे अधिकाधिक योग्य ठरते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप.

❑❑❑

## १८. कांतलोह भस्म

कांतलोह म्हणजे लोहचुंबक (Magnetic Iron). खनिज स्वरूपात मिळणाऱ्या या कांतलोहापासून कांतलोहभस्म बनविले जाते.

इतर लोहकल्पांप्रमाणेच कांतलोह भस्माचा उपयोगही रक्तकणांतील रंजकद्रव्ये (Haemoglobin) वाढविण्यासाठी व त्यामुळेच पांडू (Anaemia) या रोगासाठी उत्तम प्रकारे होत असतो.

याशिवाय त्याचे जे गुण आहेत त्यांचा विस्तार करावयाचा तर असे म्हणता येईल की कांतलोहभस्म हे एक उत्तम वातघ्न म्हणजेच वातदोष दूर करणारे औषधी द्रव्य आहे. विशेषत: याचा उपयोग होतो तो संधिवेदना (Joint Pains) कमी करण्यासाठी. आमवात (Rhaumatic Arthritis) या रोगात कांतलोहभस्म हे विशेष कार्यकारी ठरते. या रोगात असणारी तीव्र संधिशूल (Joint Pain), संधीशोथ (Oedema on Joints) ही लक्षणे या कांतलोहभस्माचे प्रयोगाने त्वरेने कमी होतात. वेदना व सूज कमी झाल्यानेच अशा रोग्यामध्ये सांध्यांच्या हालचाली पूर्ववत सुरू होण्यास मदत होते व एकंदरीत रुग्णास तात्कालिक का होईना पण लगेच लाभ होतो.

उत्तम वातघ्न असल्यानेच केवल आमवातच नव्हे तर शरीरातील विविध प्रकारच्या, विविध स्थानी असणाऱ्या वेदना (Pain) व स्पर्शासहत्व (Tenderness) ही लक्षणे कमी करण्यासाठी या कांतलोहभस्माचा वापर करता येतो. कोणतेही

विशेष कारण नसताना शरीराच्या विविध भागात चमका येणे, वारंवार लचक भरणे, पायात गोळे येणे ही लक्षणेही कांतलोहभस्माचे प्रयोगाने निश्चितच आटोक्यात राखता येतात.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप, मध.

❑❑❑

## १९. कासीस भस्म

कासीस (Ferrous Sulphate) हेही एक लोह खनिज आहे. या कासीसापासून बनविलेले ते कासीस भस्म होय.

पांडू (Anaemia) या रोगासाठी जे विविध लोहकल्प वापरले जातात त्यापैकीच आणखी एक लोहकल्प म्हणजे कासीसभस्म होय. लोहभस्माचे सर्व गुणदोष कासीसभस्मामध्येही आहेतच व म्हणूनच उपयुक्तताही लोहभस्माप्रमाणे आहे असे म्हणता येईल.

कासीस भस्माचा उपयोग मुख्यत: पांडूरोगासाठी होत असला तरी त्याचे अन्य गुणकर्मांचा विचार करता हा कल्प अन्य अनेक अवस्थांवर उपयुक्त पडणारा कल्प आहे हे सहज लक्षात येईल.

कासीस भस्म हे दौर्बल्य (General Waekness) कमी करणारे एक महत्त्वपूर्ण औषध आहे. याच्या वातहर व श्वसनमार्गावरील उपयोगित्वामुळेच कासीस भस्माचा प्रयोग कास (Cough) या रोगासाठी करणे संयुक्तिक ठरते. याचे उपयोगाने कफष्ठीवन (Expectoration) हे लक्षण तर त्वरेने कमी होते.

प्लीहावृद्धि (Enlarged Spleen) हे लक्षण अनेक अवस्थांत, अनेक रोगांत उत्पन्न होत असते. रक्तक्षयानेही प्लीहावृद्धि होणे शक्य असते. कोणत्याही कारणाने झालेली असेना प्लीहावृद्धि असताना कासीस भस्म वापरणे इष्ट ठरते.

कासीस भस्माचा प्रयोग चालू असतानाही मृदुविरेचक (Mild Purgative) द्रव्यांची जोड द्यावी लागते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप, मध.

❑❑❑



## २०. पुनर्नवामंडूर

**घटकद्रव्ये :** पुनर्नवा, निशोत्तर, सुंठ, मिरे, पिंपळी, वावडिंग, देवदार, चित्रक, कोष्ठ, हळद, त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), दंती, चव्य, इंद्रयव, कुटकी, पिंपळमूळ, नागरमोथा, काकडशिंगी, जीरे, ओवा, कायफळ, मंडूरभस्म, गोमूत्र.

मंडूर म्हणजे लोहकिट्ट ज्यामध्ये प्रमुख घटक द्रव्य आहे असा हा कल्प असून मंडूर भस्माबरोबर अन्य अनेक अग्निप्रदीपन करणारी व मूत्रल वनस्पतिजन्य औषधे वापरलेली आहेत.

मंडूराप्रमाणेच असणारा महत्त्वाचा घटक म्हणजे पुनर्नवा होय. पुनर्नवा उत्कृष्ट मूत्रल (मूत्राचे प्रमाण वाढविणारी, Diuretic) वनस्पति असून त्यामुळेच शोथ (Oedema) कमी करण्याचे कार्य या वनस्पतिकडून घडते. शोथ कमी करणे हे मंडूर भस्माचेही एक प्रधान कार्य आहे. पुनर्नवायुक्त मंडूराने हे शोथ नाहीसा करण्याचे कार्य अधिकच चांगले होते. याचेच जोडीला यामध्ये देवदार, हळद, नागरमोथा, जीरे यासारख्या इतर मूत्रल द्रव्यांची जोड मिळाल्याने पुनर्नवामंडूराचे कार्यात अनेक पटीने वाढ होते. पुनर्नवा मंडूर तयार करताना ते गोमूत्रात शिजविलेले असते. गोमूत्रहेही एक उत्तम प्रकारचे मूत्रल द्रव्य आहे. त्याचे संस्कार घडल्याने या कल्पाची गुणवत्ता वाढून शोथ कमी करण्यासाठी जी औषधी द्रव्ये वापरली जातात त्यामध्ये हा एक श्रेष्ठ कल्प बनतो.

कफजशोथ (Nephritis), उदर (Ascitis), हृद्रोग (C.C.F.) इत्यादी अनेक रोगात येणारी सूज या पुनर्नवा मंडूराने कमी होत असते.

लोहकल्प असल्यानेच पांडू (Anaemia) या रोगावरही या पुनर्नवा मंडूराचा उपयोग होतो. विशेषत: जेव्हा शोथ (सूज) हा उपद्रव (Complication) निर्माण होतो त्यावेळी वापरण्यास योग्य असा हा कल्प आहे असे म्हणता येईल. या कल्पामध्ये कुटकी हेही द्रव्य आहे कुटकी यकृतावर कार्यकारी असून उत्कृष्ट पित्तविरेचक आहे. पांडूरोगामध्ये यकृताची व पित्त दोषाची विकृति असते. ही विकृति दूर करून पांडूरोग कमी करण्यासाठी म्हणूनच कुटकीचा उपयोग होत असतो.

लोहभस्माने जो मलावरोध (Constipation) होतो तो टळावा यासाठी या कल्पातील निशोत्तर, त्रिफळा, कुटकी यासारखी मृदु विरेचन करणारी द्रव्ये उपयुक्त ठरतात. चित्रक, सुंठ, मिरे, पिंपळी, पिंपळमूळ, ओवा, जीरे इत्यादी औषधांनी

अग्नि प्रदीप्त होऊन, खाल्लेल्या अन्नाचे नीट पचन होऊन बल वाढविण्यास सहाय्य घडते.

अनेक वेळा उदरातील कृमि (Worms) हे पांडूरोगाचे महत्त्वाचे कारण ठरते. अर्जीर्ण, अग्निमांद्य व त्यामुळे कृमि व कृमिमुळे पांडूरोग अशी ही साखळी असते. हे सर्व थांबवायचे तर अग्नि सुधारला पाहिजे. त्याबरोबरच कृमिंचाही विनाश झाला पाहिजे. कृमि विनाशासाठी या कल्पातील वावडिंग हे द्रव्य कार्यकारी ठरते. अग्निवर्धनासाठी अनेक औषधे यात आहेतच, तसेच पांडूसाठी मंडूरही आहे. या सर्वांच्या एकत्रित परिणामावरून पुनर्नवामंडूर हा, कृमिरोग व त्यामुळे उपद्रवात्मक उत्पन्न होणाऱ्या पांडू या रोगावरील उत्कृष्ट कल्प समजला जातो.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप, मध.

❑❑❑

## २१. सुवर्णमाक्षिक भस्म

सुवर्णमाक्षिक हेही एक खनिज आहे. या सुवर्ण माक्षिकाचे स्फटीक स्वरूपातील खनिज उपलब्ध असते. हे स्फटीक अगदी सोन्यासारखे पिवळे, चकचकीत दिसतात व म्हणूनच या खनिजास सुवर्णमाक्षिक असे म्हणतात. या एवढ्या वर्णसाधर्म्याशिवाय सुवर्णमाक्षिक व सुवर्ण यामध्ये अन्य कोणताही सारखेपणा नाही.

सुवर्णमाक्षिक (Chalcopyriter, Iron Parite) हे एक लोह, ताम्र व गंधक यांपासून बनलेले संयुग आहे. आधुनिक रसायनशास्त्राचे परिभाषेत बोलावयाचे तर याचा रासायनिक फॉर्म्युला ($CuFeS_2$) असा आहे ज्यावेळेस या सुवर्णमाक्षिकाचे भस्म बनविले जाते त्यावेळी यातील गंधकाचा अंश नाहीसा होऊन त्याचे ऑक्साइड बनत असते.

सुवर्णमाक्षिकभस्म हा प्रकारे लोह व ताम्र यांचा संयुक्त कल्प आहे असे म्हणता येईल. याचमुळे लोहभस्म व ताम्रभस्म ज्या अवस्थेत, ज्या रोगात वापरता येते, त्या सर्व प्रसंगी सुवर्णमाक्षिक भस्माचा प्रयोग करणे लाभदायक ठरते.

यात लोह असल्यानेच पांडूरोगावरील (Anaemia) एक महत्त्वाचे औषध म्हणून या कल्पाचा उपयोग केला जातो. अन्य लोह कल्पांपेक्षा वैशिष्ट्य म्हणजे त्यास मिळालेली ताम्राची जोड. लोहभस्माप्रमाणेच ताम्रभस्मही सर्व धातूंचे ठिकाणी येणारे शैथिल्य दूर करणारे व म्हणूनच लोहाचे गुणकर्मात अनेक पटीने वाढ



करणारे आहे. ताम्रभस्म हे यकृतावर कार्यकारी असणारे म्हणून प्रसिद्ध आहे. ताम्रभस्मामुळे यकृतातून होणाऱ्या पित्तस्रावांची निर्मिती व त्यांचे स्रवण या दोन्ही क्रियांना अधिक चालना मिळते. पांडूमध्ये ज्या रक्त या शरीराधातूचा क्षय आढळतो त्या रक्तधातूच्या निर्मितीचे प्रमुख स्थान यकृत हेच असते. या अशा महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या यकृतावर नियंत्रण करणाऱ्या ताम्राची जोड लोहास मिळालेली असल्याने याठिकाणी 'समसमासंयोग' घडलेला आहे असे म्हणता येईल.

ताम्रभस्म स्वतंत्रपणे वापरल्यास त्यापासून हल्लास (मळमळणे), छर्दि (उलटी होणे), भ्रम (चक्कर येणे) इत्यादी अनेक विषलक्षणे आढळतात. सुवर्णमाक्षिक भस्मातील ताम्राने मात्र अपेक्षित सर्व गुणांचा लाभ होत असूनही वरीलप्रकारचे वा अन्य कोणतेही शरीरविघातकर भाव मात्र कधीच निर्माण होत नाहीत. ताम्रभस्माप्रमाणेच लोहभस्म स्वतंत्रपणे वापरले तर बद्धकोष्ठता व त्यामुळेही काही उपद्रव (Complication) उत्पन्न होऊ शकतात. सुवर्णमाक्षिक भस्मातील लोहाने मात्र मलावष्टंभ होत नाही. म्हणजेच लोह व ताम्र यांची भस्मे स्वतंत्रपणे वापताना जी काही थोडी फार अनिष्ट लक्षणे उत्पन्न होण्याची शक्यता असते ती सुवर्णमाक्षिक वापरल्याने टाळता येतात, पण त्यांचे अपेक्षित लाभ मात्र पदरात पाडून घेता येतात.

याचसाठी अन्य कोणत्याही लोह कल्पांपेक्षा सुवर्णमाक्षिक भस्म हा पांडूरोगावरील श्रेष्ट कल्प आहे असे म्हणता येईल.

सुवर्णमाक्षिकभस्मामध्ये लोह व ताम्र असल्यानेच दौर्बल्य कमी करण्यासाठीही या भस्माच्या प्रयोग करणे लाभदायक ठरते. हृद्रोगामुळे उत्पन्न होणारा पादशोथ (Oedema on Feet) किंवा सर्वांगशोथ (Anasaraca) कमी करण्याचे कार्यही या सुवर्णमाक्षिकाकडून घडते.

सुवर्णमाक्षिक भस्म हे उत्तम पित्तघ्न औषध आहे. विशेषत: जेव्हा पित्त साम असेल, द्रवगुणाने वाढले असेल त्यावेळेस या सुवर्णमाक्षिक भस्माचा अधिक चांगला उपयोग होतो. याचमुळे अम्लपित्त या रोगावरील एक प्रमुख औषधी कल्प म्हणून याची गणना केली जाते. घशाशी आंबट येणे, छातीत जळजळणे, मळमळ व पोटात दुखणे इत्यादी अम्लपित्तामुळे येणारी लक्षणे यामुळेच चटकन कमी होतात. छर्दि, हस्तपादनेत्रदाह वा सर्वांगदाह इत्यादी लक्षणे सुवर्णमाक्षिक भस्माचे उपयोगाने त्वरने कमी होतात. आमाशयगत व्रण (Peptic Ulcer) यासाठी जी औषधे वापरली जातात त्यामध्ये सुवर्ण माक्षिकाची जोड देणे युक्त ठरते.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप, मध.

❑❑❑

## २२. नवायस लोह

**घटकद्रव्ये :** त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी), त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), लवंग, जायफळ, वेलची, लोहभस्म.

अयस म्हणजेच लोह. लोहभस्म इतर ९ वनस्पतिद्रव्यांबरोबर मिसळून त्यापासून बनविला जाणारा कल्प तो नवायस लोह होय.

लोहभस्म हे पांडू (Anaemia) रोगावरील एक आवश्यक असे औषध. हे औषध एकेरी वापरण्याऐवजी इतर काही वनस्पतिद्रव्यांबरोबर येथे वापरलेले दिसते. यातील काही द्रव्ये लोहाचे गुणकर्मात वाढ करणारी आहेत तर काही लोहभस्मामुळे येणारी मलबद्धतेसारखी लक्षणे कमी करणारी आहेत असे या कल्पाचे संक्षेपाने विवेचन करता येईल.

लोहभस्म धातूशैथिल्य दूर करून धातूंना बल प्राप्त करून देणारे औषधी द्रव्य आहे. रक्तक्षय कमी होऊन पांडूरोग बरा व्हावयाचा म्हटले तर रक्त कणातील हिमोग्लोबीन वाढले पाहिजे व हे हिमोग्लोबीन वाढवावयाचे तर लोहक्षार भरपूर व सुयोग्य प्रकारचे मिळाले पाहिजेत. हे लोहक्षार मिळवून देण्याचे कार्य लोहभस्म करीतच असते पण या लोहभस्माचे शरीरात शोषण व परिणमन चांगल्याप्रकारे व्हावे यासाठी अग्निप्रदीपनही आवश्यक आहे. अग्निप्रदीप्त करण्याचे कार्य या कल्पातील त्रिकटु म्हणजेच सुंठ, मीरे, पिंपळी यांसारखी द्रव्ये करीत असतात.

लोहभस्माच्या कषाय (तुरट) रसाने स्तंभन होऊन बद्धकोष्ठता येण्याची शक्यता असते. ही बद्धकोष्ठता टाळण्यासाठीच या कल्पास अनुलोमक अशा त्रिफळाचूर्णाची जोड दिलेली आहे लोहाच्या कषायरस व मलबद्धता यामुळेच क्वचित मलावष्टंभाबरोबरच उदरशूल (Pain in Abdomen) हे लक्षण आढळते. या लक्षणाच्या निवारणासाठीच वातानुलोमन करणारी सुगंधी अशी लवंग, जायफळ, वेलची ही द्रव्ये या कल्पात मिसळलेली असतात.

**प्रमाण :** १५० मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप, मध.

❑❑❑

## २३. ताप्यादि लोह

**घटकद्रव्ये :** रौप्यभस्म, शिलाजतु, सुवर्णमाक्षिक भस्म, लोहभस्म, चित्रक, त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी), वावडिंग, त्रिकटु (सुंठ, मीरे, पिंपळी), साखर.



ताप्यादि लोह हही एक ज्यामध्ये लोहभस्म आहे असा कल्प आहे, ताप्य म्हणजे चांदी किंवा रौप्य (Silver). या कल्पात लोह भस्माप्रमाणेच रौप्यभस्महीं असते असेच या ताप्यादि लोह या नावाने ध्वनित होते. केवळ रौप्य व लोहच नव्हे तर यामध्ये या दोन भस्माबरोबर सुवर्णमाक्षिकभस्मही असते. सुवर्णमाक्षिकात पुन्हा लोह व ताम्र हे घटक असतात. म्हणजेच ताप्यादिलोहामध्ये लोह, रौप्य व ताम्र या तिन्ही खनिज द्रव्यांची भस्मे असतात असे म्हणता येईल.

शरीरधातूंचे ठिकाणी असणारे शैथिल्य दूर करून शरीरावयवांना बल देणारी म्हणून जी औषधीद्रव्ये प्रसिद्ध आहेत त्यामध्ये लोहभस्म, रौप्यभस्म व ताम्र भस्म ही अग्रगण्य अशी औषधे आहेत. या कल्पात असणारे शिलाजित हेही धातुशैथिल्य दूर करणारे एक उत्तम औषध आहे. पांडूरोगामध्ये रक्तधातू (Haemoglobin) चा क्षय व सर्व शरीरधातूंमध्ये शैथिल्य निर्माण झालेले असते. याचसठी लोह, ताम्र, रौप्य, शिलाजतु यांचा वापर केला जातो. या सर्वांबरोबरच लोह वापरल्याने हिमोग्लोबीन म्हणजेच रक्त वाढते व पांडूरोग पूर्णत: बरा होऊ शकतो.

धातूशैथिल्य दूर होऊन शरीराधातूंना बल मिळावे यासाठी धातूपोषणाची क्रियाही सुरळीत चालू राहिली पाहिजे. ही धातू पोषणाची क्रिया चांगली व्हावी यासाठी अग्नी चांगला प्रदीप्त झालेला हवा. या अग्नीचे प्रदीपन व्हावे म्हणूनच या कल्पास चित्रक, त्रिकटु यांसारख्या दीपन द्रव्यांची जोड दिलेली असते. लोहकल्पाने येणारे बद्धकोष्ठता हे लक्षण टाळण्यासाठीच यात त्रिफळेचाही वापर केला जातो.

एकंदरीत पाहता पांडूरोगावर उपयुक्त असणारी ताम्र, लोह, रौप्य, सुवर्णमाक्षिक ही भस्मे, दीपन-पाचन करणारी त्रिकटु, चित्रक यांसारखी द्रव्ये, अनुलोमन करणारी त्रिफलेसारखी द्रव्ये यांचे एकत्रिकरणामुळे ताप्यादि लोह हा कल्प पांडूवरील एक सर्वोत्कृष्ट कल्प म्हणून ओळखिला जातो.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, तूप.

❑❑❑

## २४. रौप्यभस्म

रुपे किंवा चांदी (Silver) यापासून जे भस्म बनविले जाते त्यास रौप्य भस्म असे म्हटले जाते.

रौप्यभस्माचा प्रामुख्याने उपयोग होतो तो बल्य म्हणजेच सर्व शरीरावयवांना

बल प्राप्त करून देणारे द्रव्य म्हणून. कोणत्याही कारणाने आलेले दौर्बल्य कमी करण्यासाठी, विशेषत: एकादा रोग होऊन गेल्यानंतर काही दिवस शरीरात राहणाऱ्या दौर्बल्यासाठी रौप्यभस्म अत्यंत उपयुक्त ठरते.

पांडू (Anaemia) या रोगात रक्तक्षय असतो हे खरे, पण त्याबरोबर सर्वच शरीराधातूंचे ठिकाणी शैथिल्य निर्माण झालेले असते हेही खरे. रौप्य भस्माने सर्वच शरीरधातूंचे ठिकाणी असणारे शैथिल्य दूर होत असल्याने पांडूची पूर्ण चिकित्सा होऊ शकते. या भस्माची जोड इतर औषधांना दिल्याने पांडू रोगातील लक्षणे फार त्वरेने दूर होतात.

रौप्यभस्म हे या प्रकारे सर्वच शरीर धातूंवर कार्यकारी ठरत असले तरी या कल्पाचा विशेष उपयोग होतो तो मज्जाधातूवर. मज्जाक्षयाने शरीरात जी लक्षणे आढळतात ती सर्व लक्षणे कमी करण्याचे सामर्थ्य रौप्यभस्मात आहे कारण रौप्याने मज्जाधातूचे साक्षात् पोषण व संवर्धन होत असते. भ्रम (Vertigo), डोळ्यासमोर अंधेरी येणे, क्वचित मूर्च्छा (Uuconsiousness) ही सर्व लक्षणे मज्जादुष्टीची आहेत. ही सर्व लक्षणे रौप्यभस्माचे प्रयोगाने चटकन कमी होतात.

मस्तुलुंग (मेंदू) हा शरीरावयव डोक्याच्या कवटीत, हाडांच्या पोकळीत बसविलेला असतो व त्याचे स्वरूप हे पुष्कळसे मज्जेप्रमाणेच आहे. हा मेंदू मनाचे तथा इंद्रियांचे प्रमुख स्थान आहे. रौप्यभस्म मज्जेवर म्हणजेच पर्यायाने मेंदूवर कार्यकारी असते. मेंदूवर कार्यकारी द्रव्य म्हणजेच मन व इंद्रियावरही कार्यकारी असणारे द्रव्य होय. याळेच रौप्यभस्माचा उपयोग अनेकविध प्रकारच्या मानस रोगांसाठी (Psycic Disorders) यशस्वीपणे केला जातो. मनोदौर्बल्य कमी करणारे औषध असल्यानेच या भस्माचे उपयोगाने छातीत धडधडणे, भीती वाटणे, बेचैनी, कोणत्याही अवस्थेत बरे न वाटणे इत्यादी लक्षणे त्वरेने कमी होत असतात. उन्माद (Mania) व अपस्मार (Epillepsy) सारख्या मानस विकृतीमुळे उत्पन्न होणाऱ्या रोगांतही या भस्माचा उपयोग करणे रोग पूर्णत: बरा करण्याचे दृष्टिने सहाय्यभूत ठरते. धी, धृती, स्मृती व मेधा या बुद्धीच्या चारही प्रकारांचे संवर्धन रौप्यभस्माने होते. विशेषत: स्मरणशक्ती वाढविण्यासाठी रौप्यभस्माचा फारच चांगला उपयोग होतो. मनोदौर्बल्यामुळे येणारे स्मृत्याल्पता हे लक्षण या कल्पाने त्वरेने कमी होते.

धातूक्षयाने निर्माण होणाऱ्या वातरोगांसाठी सुद्धा रौप्यभस्म वापरणे हितावह ठरते. रौप्यभस्माने सर्वच शरीरधातूंना बल प्राप्त होत असल्यानेच साहजिकच याच्या प्रयोगाने सर्व शरीरधातूंची पुष्टी होऊन वातप्रकोप नाहीसा होतो व वातरोग बरे होण्यास मदत होते. पक्षाघात (Hemiplegia) या रोगात मांसक्षय तथा स्नायुशोष



व दौर्बल्य ही लक्षणे आढळतात. या रोगासाठी जी औषधे वापरली जातात त्यामध्ये रौप्यभस्म हे एक महत्त्वाचे औषध आहे. मांसगत वातामाठीही या भस्माचा अतिशय उत्तम लाभ होतो. पिंडिकोद्वेष्टन (पिंढऱ्या दुखणे) हे लक्षण रौप्यभस्माने त्वरित कमी होते. वारंवार शिर:शूल होणे, सर्व शरीरात मधून मधून चमका निघणे इत्यादी लक्षणे म्हणजेच मांसगत वेदना कमी करण्यासाठी रौप्यभस्म महत्त्वाचे औषधी द्रव्य ठरते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.
**अनुपान :** मध.

## २५. ताम्रभस्म

ताम्रधातूपासून म्हणजेच तांब्यापासून बनविलेले ताम्रभस्म. हा यकृतावर कार्यकारी असा औषधी कल्प आहे. उत्कृष्ट पित्तविचरक असणाऱ्या या कल्पामुळे यकृतात निर्माण होणाऱ्या पित्तरसांची उत्पत्ती व त्यांचे वहन योग्य प्रकारे होते. यामुळेच अनेक प्रकारच्या यकृतविकारावर उपयोगी पडणारा हा एक महत्त्वाचा औषधी कल्प आहे. रुद्धपथकामला (Obstructive Jaundice), यकृतोदर (Cirrhosis of Liver) या रोगांसाठी जी औषधे वापरली जातात त्यामध्ये ताम्रभस्म हे निश्चितपणे एक घटक द्रव्य असतेच. यकृतात निर्माण होणाऱ्या पित्ताच्या स्रावाप्रमाणेच आतड्यातील अन्य पाचक रसांवरही ताम्रभस्माची क्रिया होऊन त्यांचेही स्राव वाढताना दिसतात व म्हणूनच ताम्रभस्म हे अग्नी वाढविणारे द्रव्य आहे असे म्हटले जाते.

पांडूरोग (Anaemia) हा रोग रक्तक्षयामुळे निर्माण होणारा रोग आहे. या रोगाचे मूळ कारण पित्त दोषाची विकृती हे आहे. रक्ताची उत्पत्ती ज्या स्थानी होते त्यास रक्तवहस्रोतस असे म्हणतात. या रक्तवहस्रोतसाचे महत्त्वाचे स्थान, सर्व रक्तवहस्रोतसाचे नियंत्रण करणारे स्थान यकृत हेच आहे. अशा यकृतावर कार्यकारी तसेच पित्त विकृती दूर करणारे ताम्रभस्म साहजिकच पांडूरोगावरील एक महत्त्वाचे औषध ठरते. पांडूरोगासाठी लोहभस्म, अभ्रकभस्म इत्यादींचा वापर करताना यासाठीच या द्रव्यांना ताम्रभस्माची जोड देणे सुयोग्य ठरते.

ताम्र हे तीक्ष्ण, उष्ण व स्रोत:शोधी आहे. स्रोतोरोधामुळे म्हणजेच मार्गात निर्माण झालेल्या अडथळ्यामुळे जेव्हा वात दोष वाढतो व त्यामुळे जेव्हा विविध स्वरूपांची लक्षणे उत्पन्न होऊ लागतात त्यावेळी हे तीक्ष्ण, उष्ण, स्रोतोरोध नाहीसा

करणारे ताम्रभस्म वापरल्याने निश्चितच लाभ मिळतो. अनेक प्रकारच्या वातविकारावर या भस्माचा उपयोग होतो तो यामुळेच. विशेषत: संधिवातामध्ये जेव्हा सांधे आखडतात, त्यांच्या हालचाली काही प्रमाणात वा पूर्णतया मंदावतात अशा अवस्थेत (Ankylosis) ताम्रभस्म वापरल्याने स्तंभ नाहीसा होतो व सांध्याच्या हालचाली हळूहळू पण निश्चितपणे अधिकाधिक प्रमाणात होऊ लागतात. आधुनिक वैद्यक शास्त्राचे मते शरीरात कोठेही एकदा Fibrosis झाले की ते नाहीसे होत नाही. पण ताम्रभस्माचे उपयोगाने मात्र संधिप्रदेशी निर्माण झालेले हे Fibrosis निश्चितच कमी होताना दिसते.

ताम्रभस्म हे या प्रकारे अनेकविध रोगांमध्ये, अनेकविध अवस्थांमध्ये उपयुक्त असले तरी या भस्माचा वापर फार काळजीपूर्वक करावा लागतो. ताम्रभस्म हे तीक्ष्ण, उष्ण असल्यानेच ते अनेकांना मानवत नाही. त्याच्या उपयोगाने दाह (सगळ्या अंगाची आग होणे, वाफा निघाल्याप्रमाणे भासणे) उत्पन्न होतो. शिवाय ताम्रभस्म जर चांगले बनले नसेल, त्याचे मारण (भस्म प्रक्रिया) योग्य झाले नसेल तर या ताम्रभस्माचे वापरने अनेक प्रकारची विषलक्षणे उत्पन्न होतात. छर्दि (उलटी होणे) हे या विषलक्षणांपैकी महत्त्वाचे लक्षण. मळमळणे, उलटी होणे, चक्कर येणे इत्यादी लक्षणे अशावेळी अगदी अत्यल्प मात्रेत ताम्रभस्माचा प्रयोग केला तरी आढळतात.

यासाठीच ताम्रभस्माचा स्वतंत्रपणे प्रयोग फारच क्वचित प्रसंगी केला जातो. इतर अन्य औषधी कल्पांच्या जोडीलाच ताम्रभस्म वापरणे श्रेयस्कर ठरते.

ताम्रभस्माच्या आढळणाऱ्या विषलक्षणांचा विचार करता ताम्रभस्म वापरताना ते केवळ तज्ज्ञ वैद्यांच्या सल्ल्याने व रुग्ण त्याच्या प्रत्यक्ष देखरेखी खाली असतानाच वापरले पाहिजे ही महत्त्वाची सूचना ठरेल.

**प्रमाण :** ५० मि. ग्रॅ. ते १०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## २६. सुवर्णभस्म

सुवर्ण हे बल वाढविणारे एक उत्कृष्ट औषध आहे. यामुळेच ज्या रोगांमध्ये कोणत्याही कारणाने का असेना बल कमी होते त्यामध्ये सुवर्ण भस्माचा वापर प्रामुख्याने केला जातो. सुवर्णाने सर्वच शरीरधातूंना बल मिळत असले तरी याचे



विशेष कार्य घडते ते मांसधातूवर. शारीरिक बल हे प्रामुख्याने शरीरातील मांसधातूच्या स्थितीवरच अवलंबून असते. सुवर्णभस्माने मांसधातू वाढण्यासाठी आवश्यक असणारा शरीरातील अग्नीचा जो अंश (मांसाग्नी) त्याचे दीपन होत असते. घेतलेल्या आहारापासून मांसधातूची उत्पत्ती होण्यासाठी आवश्यक असणारा हा अग्नि सुवर्णाने प्रज्वलित होत असल्यानेच मांसधातूची निर्मिती सुयोग्य प्रकारे होते व दौर्बल्य कमी होते. सुवर्णाचे हे कार्य घडते ते ऐच्छिक व अनैच्छिक अशा दोन्ही प्रकारच्या स्नायूंवर.

सुवर्ण हे उत्कृष्ट हृद्‌बल्यही आहे. हृद्‌बल्य म्हणजे हृदयाला बल देणारे औषध. सुवर्णाने हृदयाच्या स्नायूंना बल प्राप्त झाल्याने, त्यांचे संहनन (Tone) वाढल्याने अनेक प्रकारच्या हृद्रोगात सुवर्णभस्माचा यशस्वीरीत्या वापर केला जातो. छातीत धडधडणे, भीती वाटणे, चक्कर येणे यासारखी लक्षणे असणाऱ्या हृद्रोगी रुग्णांमध्ये याचा विशेषत्वाने लाभ होतो. हृदयाच्या स्नायूंमध्ये शैथिल्य उत्पन्न झाल्याने काहीवेळा हृदयाचा आकार वाढतो, हृदयातून होणाऱ्या रसरक्तादींचे विक्षेपणाचे कार्यही बिघडते. यामुळेच दम लागणे, अल्पश्रमानेही श्वास लागणे, खोकला, सूज (विशेषत: पायांवर) येणे या प्रकारची लक्षणे निर्माण होतात. ही सर्व लक्षणे कमी करण्यासाठी जी औषधी द्रव्ये वापरली जातात त्या सर्वांच्याबरोबर सुवर्णभस्माचा वापर केल्यास त्या द्रव्यांचा अधिक लाभ होताना दिसतो.

सुवर्णभस्म बलवर्धक असल्यानेच विविध प्रकारच्या वातरोगांवरही यशस्वीपणे त्याचा वापर केला जातो. वातव्याधी दोन प्रकारचे असतात. एक स्रोतोरोधाने निर्माण होणारे अणि दुसरे शरीरधातूंचा क्षय झाल्याने निर्माण होणारे. यांपैकी केवल धातूक्षयजन्य वातरोगांसाठीच सुवर्णाचा उपयोग होतो. दुसऱ्या प्रकारात या भस्माचा फारसा उपयोग होत नाही.

वातरोगांपैकीच एक अत्यंत त्रासदायक व बरा होण्यास अत्यंत कठीण असा रोग म्हणजे अर्धांगवात किंवा पक्षाघात (Hemiplegia). या रोगात शरीरातील अर्ध्या भागातील स्नायूंचे संहनन नाहीसे होऊन त्या ठिकाणी शैथिल्य आलेले असते. या अवस्थेत सुवर्णभस्माचा वापर करणे इष्ट ठरते. बालपक्षाघात (Polio) या रोगात निर्माण होणारे स्नायुशैथिल्य तसेच स्नायुशोष (Wasting of the Muscles) ही लक्षणे त्वरेने कमी कमी होण्यासाठीही जी औषधे वापरतात त्यामध्ये सुवर्णभस्म हे महत्त्वाचे औषधी द्रव्य आहे.

सुवर्णभस्म हे वातरोगांवर याप्रमाणे कार्यकारी असले तरी या द्रव्याचा विशेष परिणाम होतो तो प्राणवायुच्या दुष्टीमुळे उत्पन्न होणाऱ्या रोगांवर. प्राणवायू हा सर्व

ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांचे नियंत्रण करणारा वाताचा प्रकार आहे. मनावर व हृदयावरही प्राणवायूचेच नियंत्रण असते. असा महत्त्वपूर्ण क्रिया करणारा, मनावर, हृदयावर व इंद्रियांवर नियंत्रण ठेवणाऱ्या प्राणवायूवर सुवर्णभस्म कार्यकारी असल्यानेच शारीरिक दुष्टीप्रमाणेच मानसिक विकारांमाठी सुवर्णाचा उत्तम उपयोग होतो.

सुवर्णाने मनाचे राजस व तामस दोष कमी होऊन सात्त्विक गुणांचा उत्कर्ष होतो. म्हणूनच ज्या रोग्यात स्मृति कमी होते (Loss of Memory) अशा व्यक्तीमध्ये सुवर्णभस्म वापरणे फायद्याचे ठरते. झोप नीट न लागणे, बेचैनी, अस्वस्थता आदी लक्षणे कमी करून मनाचे योग्य प्रकारे संतुलन प्राप्त व्हावे यासाठी सुवर्ण कार्यकारी ठरते.

सुवर्णभस्म वा सुवर्णाचा अन्य कोणताही कल्प पोटात घेण्यासाठी वापरला तरी सुवर्णाचे शरीरात शोषणमात्र, अगदी किंचितही प्रमाणातसुद्धा, कधीच होत नाही. सुवर्णाचे शरीरात शोषणच होत नसल्याने त्याचे शरीरभावात रुपांतर होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. असे असूनही सुवर्ण बल्य म्हणून वा अन्य तऱ्हेने कसे कार्यकारी होते अशी शंका साहजिकच उत्पन्न होईल. याचे उत्तर अगदी स्पष्ट आहे. सुवर्ण हे ज्या ज्या द्रव्यांशी संबंधात येते त्या द्रव्यांवर सुवर्णाचे संस्कार होतात; त्या त्या द्रव्यांवर सुवर्णाच्या गुणांचे आरोपण होते. म्हणजेच त्या द्रव्यात सुवर्णाचे गुण उतरतात. अशी संस्कारित द्रव्ये शरीरात शोषिली जाऊन सुवर्णाचे बल्य हे कर्म घडवून आणतात. यामुळेच सुवर्णभस्मच नव्हे तर केवळ सुवर्णसंस्कारित जलही उत्तम बल्य ठरते.

या सुवर्णाच्या गुणाचा विचार करूनच सुवर्णभस्म हे स्वतंत्रपणे फारच क्वचित वापरले जाते. सामान्यतः अन्य औषधी द्रव्यांबरोबर मिसळून सुवर्णाचा प्रयोग व्यवहारात केला जातो.

सुवर्णाचे संपर्कामुळे होणाऱ्या या संस्कारांना खरोखरीच फारच महत्त्व असल्याने बाह्यतःही सुवर्णालंकार वापरण्याची पद्धती रूढ झालेली असावी असे म्हणता येईल.

**प्रमाण :** १० ते २५ मि. ग्रॅ. दिवसातून २ वेळा.

**अनुपान :** दूध.

❑❑❑

## २७. हीरक भस्म

हीरक म्हणजे हिरा (Diamond). सर्व रत्नांमधील श्रेष्ठ अशा या द्रव्यापासून बनविले जाणारे भस्म म्हणजेच हीरक भस्म होय.



हीरक भस्म हे सर्व धातूंना बल देणारे उत्कृष्ट औषधी द्रव्य आहे. यासाठीच याचा उपयोग कोणत्याही कारणाने येणाऱ्या दौर्बल्यासाठी केला जातो. विशेषतः रोगोत्तर काळामध्ये येणारे दौर्बल्य म्हणजेच कोणत्याही रोगानंतर स्वाभाविकपणे राहणारा अशक्तपणा कमी करण्यासाठी हे उत्कृष्ट औषधी द्रव्य समजले जाते.

राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis) या रोगातही रसरक्तादी सर्वच शरीरधातूंचा क्षय आढळतो. या रोगात सप्तधातूवर्धक अशीच चिकित्सा अपेक्षित असते. राजयक्ष्याप्रमाणेच ज्यात दौर्बल्य अत्यधिक प्रमाणात आढळते असा आणखी एक रोग म्हणजे कर्करोग (Cancer) हा होय. या दोन्ही रोगांमध्ये हीरक भस्माचा वापर केल्यास निश्चितच लाभ होतो. हीरक भस्माने राजयक्ष्मा वा कर्करोग बरा होतो असा मात्र याचा अर्थ नव्हे. या दोन्ही रोगात रोगनाशनासाठी जी अन्य औषधे वापरली जातात त्यांना हीरक भस्माची जोड दिल्यास दौर्बल्य त्वरेने व निश्चयाने कमी होते एवढाच याचा अर्थ आहे.

केवळ रोगावस्थेत वा रोगोत्तर काळात येणारे दौर्बल्य कमी करण्यासाठीच या हीरक भस्माचा वापर केला जातो असेही नव्हे. या भस्माचा उपयोग वार्ध्यक्यकाळीसुद्धा चांगला होत असतो. वृद्धापकाळामध्ये स्वभावतःच सर्व धातूंचे ठिकाणी शैथिल्य येऊ लागते. धातूंच्या पोषणाची क्रियाही मंदावते. सर्वच धातूंच्या चयापचायाची क्रिया मंदावल्याने हे दौर्बल्य येत असते. अशा वेळी हीरक भस्माचा प्रयोग करण्याने धातूशैथिल्य दूर होते, धातूंना बळ प्राप्त होते व त्यामुळेच उत्साह, बल, वर्ण या सर्वांची यथायोग्य वाढ होऊ लागते. यासाठीच जरानाशक म्हणजेच वार्धक्य दूर करणारे औषध म्हणून हीरक भस्म उपयोगात आणले जाते.

**प्रमाण :** १० मि. ग्रॅ ने २५ मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, दूध.

❑❑❑

## २८. वैक्रांत भस्म

वैक्रांत (Tourmalin) हेही एक रत्न असून यापासून बनविले जाणारे भस्म हे हीरक भस्माला पर्यायी द्रव्य म्हणून वापरले जाते. हीरक भस्म हे किमतीने फारच महाग असल्याने याचा वापर करणे बरेच वेळा व्यवहार्य ठरत नाही. अशा वेळी हीरकाप्रमाणेच गुणकर्म असणारे, पण थोड्या कमी प्रतीचे असले तरी किमतीने तुलना करता बरेच स्वस्त असे वैक्रांत भस्म वापरणे श्रेयस्कर ठरते.

वैक्रांत भस्म हेही हीरक भस्माप्रमाणेच सप्तधातूवर्धक असल्याने याचे प्रयोगाने शरीरातील रसरक्तादी सर्वच धातूंची सुयोग्यप्रकारे वृद्धी होत असते. याचमुळे या भस्माचा उपयोग कोणत्याही कारणाने येणाऱ्या दौर्बल्यासाठी, विशेषत: रोगोत्तर काळी येणाऱ्या दौर्बल्यासाठी होत असतो.

राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis) व कर्करोग (Malignancy) यासारख्या रोगांमध्ये उत्पन्न होणारी कृशता व दौर्बल्य यासाठी धातूंचे पोषण करणारी चिकित्सा करणे आवश्यक असते. या दोन्ही रोगांसाठी दिल्या जाणाऱ्या रोगनाशक चिकित्सेच्या जोडीला जर वैक्रांत भस्म वापरले तर धातूक्षय व तदूजन्य दौर्बल्य कमी होऊन रोगप्रतिकारशक्ती वाढत असते.

वृद्धापकाळी स्वभावत: येणारे धातुशैथिल्य दूर करून, धातूंची चयापचय प्रक्रिया वाढवून बल प्राप्त करून देणे व वार्धक्यामुळे उत्पन्न होणाऱ्या लक्षणांपासून काही काळ का होईना, सुटका मिळविणे ही कार्ये वैक्रांत भस्माकडून घडतात.

संक्षेपाने पुन्हा म्हणावयाचे तर हीरकाचेच सर्व गुण यामध्येही असतात व म्हणूनच हीरक भस्माऐवजी बऱ्याच वेळा वैक्रांत भस्माचा वापर केला जातो.

**प्रमाण :** २५ मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## २९. अकीक पिष्टी

अकीक हे एक खनिज असून त्याचा रत्नामध्ये समावेश होतो. या अकीक (Agate) पासून पिष्टी बनविली जाते. पिष्टी बनवताना अकीकाचे सूक्ष्म चुर्णास गुलाब जलाच्या भावना दिल्या जातात. अकीक शीतगुणाचे असल्यानेच त्याची पिष्टी बनविली जाते, भस्म नव्हे. याप्रकारे अग्निसंस्कार टाळून शीतगुण कायम राखला जातो. एवढेच नव्हे तर पिष्टी बनवताना गुलाबजलाच्या भावना दिल्याने याच्या शीतगुणाचा अधिकच उत्कर्ष होतो.

अकीक पिष्टी हे याप्रकारे उत्कृष्ट शीतवीर्यात्मक औषधी द्रव्य असल्यानेच ज्या वेळी शरीरातील पित्त हे त्याच्या तीक्ष्ण व उष्ण गुणाने वाढते त्या वेळेस या पिष्टीचा वापर करता येतो. तीक्ष्ण, उष्ण गुणाने वाढलेल्या पित्ताने जे रोग उत्पन्न होतात त्यामध्ये दाह (Burning Sensations) हा प्रमुख रोग होय. हस्त, पाद, नेत्र एवढेच नव्हे तर काही वेळा सर्वांगदाह हे लक्षण यामध्ये उत्पन्न होते, रुग्ण बेचैन होतो. अशा वेळी अकीक पिष्टी वापरल्याने त्वरित लाभ आढळून येतो.



अकीक पिष्टी शीतवीर्यात्मक व म्हणूनच रक्तस्तंभकही (Haemostatic) आहे. रक्तपित्त (Haemorrhgic Diseases) या व्याधित या पिष्टीचा लाभदायक प्रयोग केला जातो. रक्तपित्त म्हणजे बाह्य मार्गाने रक्तस्राव होणे. हा रक्तस्राव थांबविण्याचे कार्य या पिष्टीकडून घडून येते. विशेषत: उर्ध्वग रक्तपित्त (Bleeding through Nose, Ears, Lungs and Stomach) या प्रकारासाठी अकीक पिष्टीचा उपयोग अधोग रक्तपित्तापेक्षा अधिक चांगला होताना दिसतो.

अकीक पिष्टी अम्लपित्तावरीलही एक महत्त्वाचे औषध आहे. अम्लपित्तामुळे उत्पन्न होणारी उरोविदाह (Heart Burns), अम्लोद्गार व छर्दी (Vomitting) ही लक्षणे अकीक पिष्टीच्या उपयोगने लगेच कमी होतात. अकीक पिष्टी उत्तम Antacid आहे असेच या पिष्टीचे वर्णन केले जाते.

अकीक पिष्टीचा उपयोग अनेक प्रकारच्या नेत्ररोगांतही होतो. अकीक हे चक्षुष्य म्हणजेच नेत्र या अवयवाला व इंद्रियाला बल देणारे (Eye Tonic) औषध आहे. एखाद्या रुग्णात डोळ्याचा नंबर कमी वा जास्त होऊन वारंवार त्रास होत असेल तर अकीक पिष्टी वापरावी. याने डोळ्यास बल मिळून इंद्रियशक्ती कायम राहते व नंबर कमी वा स्थिर होण्यास मदत होते.

अकीक पिष्टीचा उपयोग अपस्मार (Epilepsy) या रोगासाठीही होतो. अपस्माराचे वेग (Attacks) पुन:पुन्हा येण्याची प्रवृत्ती या पिष्टीच्या उपयोगाने टाळता येते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ३०. माणिक्य पिष्टी

माणिक (Ruby) हे लाल रंगाचे, अत्यंत तेजस्वी असे एक रत्न आहे. रत्न असल्यानेच अलंकारामध्ये याचा समावेश केला जात असला तरी औषधी गुणकर्मांचा विचार करता त्याची पिष्टी बनविली जाते. लाल रंगाचे व तेजस्वी रत्न असले तरी ते एक शीतगुणाचे द्रव्य आहे व म्हणूनच याची पिष्टी बनवतात, भस्म नव्हे. पिष्टी बनविताना गुलाबजलाची भावना दिलेली असतेच.

माणिक्य पिष्टीचा उपयोग प्रामुख्याने केला जातो तो बल्य म्हणून होय. याने सर्वच शरीरधातूंचे बल वाढत असले तरी याचे मुख्य कार्य घडते ते हृदयावर. हृदयस्नायूंच्या दौर्बल्यामुळे निर्माण होणारा हृद्रोग (C. C. F.) व त्यामुळे निर्माण होणारी शोथ (Oedema), श्वास (Breathlessness) आदी विविध लक्षणे यावर

माणिक्य पिष्टीचा उपयोग होतो.

माणिक्य पिष्टी हे मनोदौर्बल्यावरील तर एक महत्त्वाचे औषध आहे. कोणत्याही निज वा आगंतुक कारणाने निर्माण झालेले मानसिक दौर्बल्य या पिष्टीचा वापर केला असता चटकन कमी होते. छातीत धडधडणे, भीती वाटणे, बेचैनी, झोप न लागणे, झोपेत स्वप्ने अधिक पडणे वगैरे लक्षणे असणाऱ्या रुग्णात या पिष्टीचा उपयोग केल्यास फार त्वरेने लाभ मिळतो.

**प्रमाण :** ५० मि. ग्रॅ. ते १०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

## ३१. नीलम पिष्टी

नीलमणी (Sapphire) या रत्नापासून पिष्टी बनविली जाते. उत्कृष्ट शीतवीर्य असेच हेही एक औषधी द्रव्य आहे.

माणिक्य पिष्टीप्रमाणेच याचेही गुणधर्म आहेत. उत्कृष्ट बल्य, विशेषत: हृद्‌बल म्हणून या पिष्टीचा वापर केला जातो. पिष्टी बनविताना गुलाबजलाच्या दिलेल्या भावनेमुळे नीलमपिष्टीच्या गुणधर्मामध्ये वाढ होत असते. हृद्‌बल्य व पित्तशामक असल्यानेच हृत्स्पंद, छातीत धडधडणे, भीती वाटणे आदी लक्षणे या कल्पाचे उपयोगाने त्वरित नाहीशी होतात. याचे उपयोगाने निद्रानाशही कमी होतो. शांत झोप लागल्यानेही मनावरचे दडपण कमी होऊन अस्वस्थता कमी होऊन रोगी बराच शांत होतो व त्यामुळेच त्यास झालेला रोगही लवकर बरा होण्यास मदत घडते.

**प्रमाण :** २५ मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

## ३२. पन्ना पिष्टी

माणिक वा नीलम प्रमाणेच पन्ना (Emrald) या रत्नाचीही पिष्टी करून ती औषधांसाठी वापरली जाते. गुलाबजलाचाच उपयोग पिष्टी करताना केला जातो व त्यामुळे गुणकर्मात अनेक पटीने वाढ होत असते.



पन्नापिष्टीचे गुणकर्मही माणिक व नीलम यांच्या पिष्टीप्रमाणेच असल्याने या कल्पाचाही उपयोग हृद्‌बल्य म्हणून होत असतो. सार्वदेहिक दौर्बल्यासाठीही ही पिष्टी उत्तम कार्यकारी ठरते. अनेकविध प्रकारे येणारे मनोदौर्बल्य दूर करून, मानसिक संतुलन प्राप्त करून देऊन, मन:शांती मिळवून देणारे हेही एक औषधी द्रव्य आहे.

उत्कृष्ट शीतवीर्य औषध असल्यानेच कोणत्याही कारणाने उत्पन्न होणारे दाह हे लक्षण कमी करण्यासाठीही हा कल्प उपयुक्त ठरतो.

**प्रमाण :** २५ मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा

**अनुपान :** मध.

## ३३. तृणकांत पिष्टी

तृणकांतमणी (Amber Succinate) या रत्नाच्या शीतगुणाचा विचार करूनच याची औषधीकरणासाठी पिष्टी बनवली जाते, भस्म नव्हे.

पित्ताचा उष्ण व तीक्ष्ण गुणाने प्रकोप झाला असता वापरण्यास उपयुक्त अशी ही तृणकांतपिष्टी आहे. त्याचप्रमाणे पित्ताचा सर गुण वाढल्याने होणाऱ्या विकृतीवरही हा कल्प उपयोगी पडतो. याचमुळे अम्लपित्त असताना या पिष्टीचा लाभ आढळून येतो. विशेषत: जुने, बरेच दिवसापासून असणारे अम्लपित्त कमी करण्यासाठी या तृणकांत पिष्टीचा उपयोग फारच चांगल्या प्रकारे होतो. अम्लपित्तामुळे उत्पन्न होणारी छातीतील जळजळ, आंबट ढेकरा येणे, डोके व पोट दुखणे, उलटी होणे इत्यादी सर्वच लक्षणे या पिष्टीच्या उपयोगाने त्वरेने कमी होतात. केवळ तात्पुरता फायदा नव्हे तर कायम टिकणारा फायदा होण्याचे दृष्टिने अम्लपित्तावरील इतर औषधांपेक्षा तुलनात्मक दृष्ट्या पाहता तृणकांतपिष्टीचा उपयोग अधिक होत असतो.

अम्लपित्तामुळे उत्पन्न होणाऱ्या आमाशयगत व्रणासाठीही (Peptic Ulcer) या पिष्टीचा लाभ होतो.

कोणत्याही कारणाने उत्पन्न होणारा दाह (Burning Sensation) मग तो सार्वदेहिक असो वा शरीरातील एखाद्या विशिष्ट भागी असो, कमी करण्याचे कार्यही या तृणकांत पिष्टीकडून घडते.

शीतवीर्य व स्तंभक असल्यानेच रक्तपित्त या रोगात आढळणारे रक्तस्राव हे लक्षण चटकन कमी करण्यासाठी जी औषधे वापरली जातात त्यापैकी हे एक प्रमुख द्रव्य गणले जाते.

**प्रमाण :** २५ मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

## ३४. जहर-मोहरा पिष्टी

जहरमोहरा (Serpentine Orephite) या खनिजापासून जी पिष्टी बनवितात तीच जहरमोहरा पिष्टी होय. जहरमोहरा या नावात जहर म्हणजेच वीष असले तरी जहरमोहरा हे एक निर्विष असे औषध आहे. अत्यंत शीतवीर्यात्मक असल्यानेच त्याची पिष्टी करून वापरतात.

जहरमोहराची पिष्टी बनविताना गुलाबजलाच्या भावना दिलेल्या असल्याने जहरमोहराचा शीतगुण प्रकर्षाने वाढलेला असतो व यामुळेच या कल्पाचा उपयोग प्रामुख्याने केला जातो तो पित्ताचा तीक्ष्ण, उष्ण गुणाने प्रकोप झाला असताना. पित्ताच्या तीक्ष्ण, उष्ण गुणाने प्रकोप होऊन जे रोग संभवतात त्यापैकी ज्वर (Fever) हा एक रोग होय. तीक्ष्णवेगीज्वरावरील (Hyperpyrexia) हे एक महत्त्वाचे औषध ज्वरामध्ये काही वेळा ज्वरवेग १०४° F पेक्षा अधिक चढतो. अशावेळी काही तातडीचे उपचार करावे लागतात. या उपचारामध्येच जहरमोहरा पिष्टीचा वापर करणे ही प्रधान चिकित्सा आहे. ज्वरवेग लगेच कमी होत असल्याने या तीक्ष्णवेगी ज्वराने उत्पन्न होणारे उपद्रवही जहरमोहरा पिष्टीने टाळता येतात. प्रलाप हे ज्वरातील एक लक्षण. हे लक्षम कमी करण्यासही जहरमोहरा पिष्टीचा लाभ होत असतो.

जहरमोहरा हे उत्तम Antacid आहे. अम्लपित्तात आढळणारी मळमळ, छातीत जळजळणे, पोटात दुखणे, उलटी होणे आदी लक्षणे याचे उपयोगाने त्वरित थांबतात. केवल अम्लपित्तजन्यच नव्हे तर सर्वच प्रकारची, कोणत्याही कारणाने होणारे छर्दि (Vommiting), घशाशी येणे, मळमळणे (Nausea) ही लक्षणेही जहरमोहरा पिष्टीने त्वरेने कमी होतात.

**प्रमाण :** २५० ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑ ❑ ❑

## ३५. गोदन्ति हरताळ पिष्टी

गोदंति हरताळ (Gypsum) हेही एक खनिज द्रव्य आहे. गोदंति हरताळ या नावामध्ये जरी हरताळ शब्द असला तरी याचा हरताळाशी (Arsenic) काहीही संबंध नाही, हरताळ हे अत्यंत विषारी द्रव्य असून गोदंति हरताळ हे मात्र पूर्णतया



निर्विष द्रव्य आहे.

गोदंति हरताळ हे एक शीतवीर्यात्मक द्रव्य असून उत्कृष्ट रक्तस्तंभकही आहे. कॅलशियम हा महत्त्वाचा घटक असणाऱ्या या गोदंति हरताळाची पिष्टी करून वापरली जाते. याचा उपयोग विशेषत्वाने होतो तो उर्ध्वग रक्तपित्तासाठी. विशेषत: रक्तष्ठीवन (Haemoptesis) हे लक्षण कमी करण्यासाठी गोदंति हरताळाइतके कार्यकारी अन्य दुसरे औषध तर शोधावेच लागेल. राजयक्ष्मा (Pulmonary T. B.) या रोगात बरेचवेळा रक्तष्ठीवन हे लक्षण आढळते. गोदंति हरताळाचा या अवस्थेत उपयोग केल्यास रक्तष्ठीवन तर थांबतेच पण त्याचबरोबर या रोगात निर्माण झालेली फुफ्फुसातील पोकळी (Cavitation) भरून येण्यासही सहाय्य घडते. राजयक्ष्म्यांत असणारा ज्वर (Fever) कमी करण्याचे कार्यही गोदंति हरताळाकडून घडते.

अम्लपित्त या व्याधिमध्ये अनेकवेळा उपद्रव म्हणून आमाशयगत व्रण (Peptic Ulcer) उत्पन्न होतो. या आमाशयगत व्रणामुळेच इतर लक्षणांचे जोडीला रक्तछर्दि (Haematemesis) येण्याची शक्यता असते. अशावेळी गोदंति हरताळ हे महत्त्वाचे औषध ठरते. गोदंति हरताळाने रक्तछर्दि तर थांबतेच पण व्रण भरून येण्यास व अम्लपित्ताची लक्षणे कमी होण्यासही सहाय्य होते.

गोदंति हरताळ शीतवीर्यात्मक औषधी कल्प असल्यानेच दाह (Burning Sensations) कमी करणारी म्हणून जी औषधे आहेत त्यामध्ये याही द्रव्याचा समावेश करता येतो.

गोदंति हरताळाचा उपयोग स्त्रीरोगांमध्येही होतो. याचे उपयोगाने रक्तप्रदर (Menorrhoegia) तर कमी होतोच पण श्वेतप्रदरही (Leucorrhoea) पूर्णतया आटोक्यात येतो. गोदंति हरताळाच्या स्तंभक गुणानेच हेही कर्म घडते.

गोदंति हरताळ हा कॅलशियमचा कल्प आहे. यासाठी जेव्हा कॅलशियमच्या क्षारांची शरीरास आवश्यकता असते तेव्हा या पिष्टीचा उपयोग करणे लाभदायक ठरतो. याचसाठी फक्करोग (Rickets), कटीशूल (कंबर दुखणे), पिंडिकोद्वेष्टन (पिंढ्या दुखणे) आदी अनेक लक्षणांसाठी ही पिष्टी वापरली जाते. लहान मुलांची वाढ चांगली व्हावी, विशेषत: त्यांच्या हाडांची चांगली वाढ व्हावी, दात बळकट व्हावेत यासाठीही हा कल्प वापरणे इष्ट ठरते.

**प्रमाण :** ५०० मि. ग्रॅ. ते १ ग्रॅम दिवसातून ३ ते ४ वेळा.

**अनुपान :** मध.

❑ ❑ ❑

## ३६. दगडीबोर पिष्टी

दगडीबोर (Fossile Norinite) हेही एक खनिज आहे. याचे बोराच्या आकाराचे कठीण असे दगड मिळतात व म्हणूनच यास दगडीबोर हे नाव मिळाले आहे. हिंदीमध्ये यास पत्थरबेर म्हणतात. युनानी औषधी चिकित्सेमधील जी काही थोडीफार औषधे आयुर्वेदीयांनी स्वीकारलेली आहेत त्यापैकीच हे एक द्रव्य आहे. त्याचे युनानी नाव 'हज्रलयहूद' असे असल्याने हिंदीत यास 'हज्रतबेर' असेही म्हटले जाते.

दगडीबोर शीतवीर्यात्मक औषधी असल्याने त्याचे भस्म न बनविता पिष्टी बनविली जाते. पिष्टी बनवताना चूर्णास दिलेल्या गुलाबजलाच्या भावनांमुळे त्याचा शीतगुण अनेकपटीने वृद्धिंगत होतो.

दगडीबोराचा मुख्यत: उपयोग होतो तो मूत्रमार्गातील विविध प्रकारच्या रोगांसाठी. दगडीबोर हे शीतवीर्य व मूत्रल द्रव्य आहे. यासाठीच याचा वापर प्रामुख्याने मूत्रकृच्छ्रासाठी होतो. मूत्रकृच्छ्रामध्ये मूत्रप्रवृत्ति होताना भयंकर स्वरूपाची आग होते, वारंवार व थोडी थोडी मूत्रप्रवृत्ति होत राहते. व्यवहारात ज्याला 'उन्हाळे लागणे' असा शब्दप्रयोग केला जातो, तोच हा मूत्रकृच्छ्र व्याधि होय. दगडीबोरपिष्टी हे मूत्रकृच्छ्रावरील सर्वोत्कृष्ट-सर्वोत्तम औषध होय.

मूत्रकृच्छ्राप्रमाणेच सदाहमूत्रप्रवृत्ति (Burning Micturition), मूत्राल्पता (Scanty Urination), मूत्राघात (Anurea), मूत्रशर्करा (Crystalisation of Urine), मूत्राश्मरी (Urinary Calculus) आदी मूत्रमार्गातील अनेकविध रोगांसाठी या पिष्टीचा वापर करणे लाभदायक ठरते.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** पाणी, तांदुळाचे धुवण.

❑❑❑

## ३७. कुक्कुटांडत्वक् भस्म

कोंबडीच्या अंड्यांच्यावरील कवचास संस्कृतमध्ये कुक्कुटांडत्वक् असे म्हणतात. ही अंड्यांची टरफले जाळून जे भस्म तयार होते तेच कुक्कुटांडत्वक् भस्म होय. अंड्यांचे कवच म्हणजेच टरफले ही शरीरातील अस्थिधातूच्या सदृश असणारा पदार्थ आहे. त्यातील घटक हेही अस्थिधातूच्या उत्पत्तीस आवश्यक अशा घटकाप्रमाणेच



असतात. शरीरातील अस्थिधातूच्या (Bone Tissue) योग्य वाढीसाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे क्षार या कुक्कुटांडत्वक भस्माद्वारे उपलब्ध होतात. या अनेक क्षारांपैकी कॅलशियमचे क्षार हे यासाठी महत्त्वाचे. कॅलशियमचे क्षार खनिज पदार्थापासून मिळविण्यापेक्षा, प्राणिज पदार्थांपासून मिळविणे अधिक योग्य ठरते. प्राणिज पदार्थापासून मिळणारे हे कॅलशियमचे क्षार शरीरात फार लवकर शोषिले जातात व अस्थिंच्या वाढीसाठी त्वरेने उपयोगात आणले जातात. त्यांचे शरीरभावांमध्ये रूपांतर फार चटकन होऊ शकते.

समान पदार्थाने वा समान गुणकर्मांच्या पदार्थाने समानाची वाढ होते. (वृद्धि: समानै: सर्वेषाम्) या आयुर्वेदिय सिद्धान्ताचा विचार करता कुक्कुटांडत्वक् भस्माचा अस्थिंच्या वाढीसाठी होणारा उपयोग स्पष्ट होतो. अस्थिंच्या वाढीसाठी अस्थिसदृश प्राणिज पदार्थ वापरल्याने केवळ कॅलशियमच नव्हे तर अस्थिंच्या पोषणासाठी आवश्यक असणारे इतरही सर्व क्षार यातून सहजतेने उपलब्ध होतात व म्हणूनच अस्थिवर्धनाचे कार्यासाठी हा एक श्रेष्ठ कल्प म्हणून ओळखिला जातो.

लहान मुलांमध्ये उत्पन्न होणारा फक्करोग (Rickets) टाळण्यासाठी वा उत्पन्न झाला असल्यास तो त्वरेने बरा करण्यासाठी कुक्कुटांडत्वक् भस्म हे एक उत्तम औषधी द्रव्य आहे. गर्भिणी अवस्थेत, तसेच स्तनपान चालू असतानाही माता, गर्भ वा बालक यांची प्रकृती चांगली राहण्यासाठी, गर्भ वा बालकाची वाढ सुयोग्य व्हावी यासाठीही यासारखे अन्य चांगले औषध नाही.

या कल्पाचा वापर केल्याने अस्थिधातूंची वाढ योग्य प्रकारे होऊन, त्यांची जोमाने वाढ होऊ शकते व याचमुळे विनातक्रार, सुलभतेने दंतोद्भव व्हावा (दात यावेत) यासाठी हा कल्प बालकांमध्ये नित्य वापरणे हितावह ठरते.

अनेक रोगी केस अकाली गळतात हे लक्षण घेऊन येतात. या केस गळण्यामागे काही विशिष्ट कारणही सापडत नाही. अशा रुग्णांमध्ये कुक्कुटांडत्वक् भस्म वापरणे फायद्याचे ठरते. या कल्पाने अस्थिधातूचे सुयोग्य पोषण झाल्यानेच अस्थिंचा मल- केस- त्यांना बल प्राप्त होते व त्यांमुळेच केस गळण्याची प्रवृत्ती निश्चयाने कमी होते वा पूर्णत: नाहीशी होते.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ ते ५०० मि. ग्रॅ.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ३८. अजास्थिभस्म

अजास्थि म्हणजे शेळीची हाडे. ही हाडे जाळून त्यापासून जे भस्म मिळते तेच अजास्थिभस्म होय.

कुक्कुटांडत्वक् भस्माप्रमाणेच अजास्थिभस्महि अस्थिपोषणाचे कार्यास साहाय्यभूत ठरते. या अजास्थिभस्मातही अस्थिपोषणासाठी आवश्यक असे कॅलशियम व इतर सर्व प्रकारचे क्षार उपस्थित असतातच. हेही एक प्राणिज द्रव्य असल्याने यातील क्षारांचेही शरीरात शोषण व शरीरभावात रूपांतर फार त्वरेने होऊ शकते.

संक्षेपाने पाहता असे म्हणता येईल की कुक्कुटांडत्वक् भस्माप्रमाणेच घटक द्रव्य असणारे व त्याच गुणकर्माचे असे हेही एक औषधी द्रव्य आहे. या कल्पाचा उपयोग म्हणूनच कुक्कुटांडत्वक भस्माप्रमाणेच फक्करोगांमध्ये (Rickets) रोगाचा उद्भवच होऊ नये व झालाच तर तो रोग चटकन कमी व्हावा यासाठी होत असतो. गर्भिणी, गर्भ वा बालक यांचे प्रकृतीची जपवणूक करणारा, गर्भ व बालक यांची सुयोग्य वाढ होण्यास मदत करणारा असाच हाही एक कल्प आहे.

दात येण्याचे वेळी होणारा त्रास कमी व्हावा वा होऊच नये, दात विनातक्रार, विनासायास यावेत. यासाठी लहान बालकांमध्ये, तसेच केस गळणे या लक्षणांसाठी कोणत्याही वयोगटाच्या व्यक्तीमध्ये कुक्कुटांडत्वक् भस्माप्रमाणेच याही कल्पाचा व्यवहारात यशस्वीपणे वापर केला जातो.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** मध.

❏❏❏

## ३९. मयूरपिच्छामशी

मयुरपिच्छ म्हणजे मोराची पिसे. मोरपिसे जाळून मयुरपिच्छामशी बनविली जाते.

मशी म्हणजे राख. कोणताही पदार्थ जाळून त्याची जी पूर्ण पांढरी राख तयार होते त्यास भस्म असे म्हणतात. परंतु पदार्थ अर्धवट जाळल्याने जी काळी राख तयार होते तीस मशी ही संज्ञा आहे. मोरपिसांची मशी वापरली जाते भस्म नव्हे.

मयुरपिच्छामशी हे द्रव्य पचनाशी संबंधित अवयवांचे अनेक प्रकारच्या रोगांवर वापरले जाणारे औषध आहे. या कल्पाच्या उपयोगाने छर्दि (उलटी होणे-Vommitting)



हे लक्षण अगदी त्वरेने कमी होते. अनेक प्रकारच्या औषधांनाही दाद न देणारे उलटी हे लक्षण मयुरपिच्छामशी वापरल्यानंतर काही वेळातच कमी होते. उलटीमधून शरीरातील द्रवांश बाहेर पडत असतो, खाल्लेला वा प्यालेला कोणताही पदार्थ पोटात टिकत नाही; त्यामुळे फार चटकन रसक्षय (Dyhydration) होण्याची शक्यता असते. रुग्णास अशक्तपणाही फारच जाणवत असतो. ही सर्व लक्षणे कमी करण्यासाठी मयुरपिच्छामशीचा वापर व्यवहारात सर्वत्र केला जातो.

केवळ उलटी होणे या लक्षणासाठीच नव्हे तर उदरपटलाच्या क्षोभामुळे (Diphragmatic irritation) उत्पन्न होणाऱ्या सर्वच लक्षणांवर मयुरपिच्छामशी उपयुक्त ठरते. उलटी होणे (Vommitting), वारंवार उचकी लागणे (Hiccough), तीव्र स्वरूपाचा उदरशूल (Abdominal Colic) ही या उदरपटलाच्या क्षोभाने उत्पन्न होणाऱ्या लक्षणांपैकी महत्त्वाची लक्षणे. मयुरपिच्छामाशीमध्ये नैसर्गिक स्वरूपात ताम्राचा (Copper) काही अंश असतो या ताम्रामुळेच वायुची प्रतिलोमगती दूर होऊन त्यास अनुलोम म्हणजेच प्राकृत गती प्राप्त होते व त्यामुळेच उदरपटलाचा क्षोभ कमी होऊन त्यामुळे निर्माण होणारी सर्वच लक्षणे कमी होत असतात.

मयुरपिच्छामशीचा उपयोग याप्रमाणे उदरपटलक्षोभाने निर्माण होणाऱ्या सर्व विकारांवर उत्तम होतो हे निश्चितच, पण याचबरोबर अन्य कोणत्याही कारणाने निर्माण होणारी उचकी (Hiccough) कमी करण्यासाठीही या कल्पाचा चांगला उपयोग होतो, हेही तितकेच खरे होय.

**प्रमाण :** २५० मि. ग्रॅ. ते ५०० मि. ग्रॅ. दिवसातून ४ वेळा.

**अनुपान :** मध.

❏❏❏

## ४०. कज्जली

पारा व गंधकाची वस्त्रगाळ पूड एकत्रित करून खलामध्ये घोटत राहिल्यास या दोहोंमध्ये रासायनिक प्रक्रिया होऊन एकजीव असे वेगळेच द्रव्य तयार होते. हे एकजीव झालेले नवीन द्रव्य श्लक्ष्ण (मऊ), काजळासारखे काळे कुळकुळीत असते. यासच कज्जली ही पारिभाषिक संज्ञा आहे.

आयुर्वेदीय औषधे बनविताना त्यामध्ये पारा व गंधक ही दोन घटक द्रव्ये बऱ्याच औषधांतून वापरली जातात. यांनाच रसौषधी ही संज्ञा आहे. रस म्हणजे पारा. या पाऱ्यापासून बनविली जाणारी औषधी द्रव्ये ती रसौषधी होत. पारा हा

स्वतंत्रपणे वापरता येत नाही. पारा स्वतंत्रपणे वापरल्यास तो अत्यंत विषारी ठरतो, त्याने प्राणनाश होण्याचीही शक्यता असते. पण हाच पारा गंधकाबरोबर वापरल्यास गुणकारी ठरत असतो. पारा व गंधक एकत्रित खलून त्यापासून प्रथमत: कज्जली बनविली जाते. या कज्जलीपासूनच अनेकविध स्वरूपाचे पारा व गंधक यांचे कल्प बनविता येतात. पारा व गंधक यापासून बनविलेली कज्जली तापवून अग्निसंस्कार करून पर्पटीत रूपांतरित करता येते. याच कज्जलीपासून कुपिपक्व पद्धतीने रससिंदूर बनविला जातो तर पोट्टली पद्धतीने रसपोट्टली तयार होते. कज्जली, रसपर्पटी, रससिंदूर व रसपोट्टली हे याप्रकारे पारा व गंधक यापासून बनविलेले कल्प असले तरी त्या सर्वांचे गुणधर्म मात्र अगदी भिन्न असतात. त्या सर्वांचा उहापोह करण्याचे हे स्थान नव्हे पण कज्जली ही पारदकल्प करण्यासाठी मूलद्रव्य (Base) म्हणून वापरली जाते इतकेच या प्रकरणी म्हणणे योग्य ठरेल.

कज्जली ही सर गुणाची आहे. सर म्हणजे शौचास साफ करणारे द्रव्य. त्याचप्रमाणे कज्जली ही उत्कृष्ट योगवाहीही आहे. केवळ कज्जलीच नव्हे तर पारा व गंधक यापासून बनणारे सर्वच कल्प हे उत्कृष्ट योगवाही असतात. योगवाही द्रव्ये म्हणजे अन्य औषधी द्रव्यांबरोबर मिसळून दिल्यास त्या अन्य द्रव्यांचे गुणकर्मात वाढ करणारी द्रव्ये. कज्जली योगवाही असल्यानेच अन्य अनेक वनस्पतिज घटकांबरोबर मिसळून वेगवेगळे कल्प बनविले जातात.

कज्जलीचा पोटात घेण्याचे औषध म्हणून स्वतंत्रपणे मात्र कधीच वापर केला जात नाही. स्वतंत्रपणे कज्जली वापरली जाते ती फक्त बाह्य उपचारासाठीच. कज्जली व्हॅसलीन अगर मेणात मिसळून त्यापासून तयार केलेले मलम हे आघातजन्य शोथासाठी (मार लागल्याने येणारी सूज) उपयोगी ठरते. कज्जली मलम चोळल्याने सूज तर कमी होतेच पण शिवाय त्या ठिकाणी असणारी वेदनाही त्वरेने कमी होते. त्वचेच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या काही प्रकारच्या ग्रंथींसाठीही या मलमाचा उत्तम उपयोग होताना दिसतो.

**प्रमाण :** बाह्य उपचारासाठी आवश्यकतेनुसार. अभ्यंतर प्रयोगासाठी अन्य द्रव्यांबरोबर मिसळून.

❑❑❑



## ४१. रसपर्पटी

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक.

शुद्ध पारा व शुद्ध गंधक एकत्र घोटून जे काजळाप्रमाणे काळे कुळकुळीत द्रव्य तयार होते त्यास कज्जली असे म्हणतात. ही कज्जली एखाद्या लोहपात्रात घेऊन मंदाग्नीवर गरम केली असता पातळ एकजीव असे नवीनच मिश्रण तयार होते. हे द्रव्य जमिनीवर पसरलेल्या केळीच्या पानांवर ओतून त्यावर दुसऱ्या पानाने थापटून अगदी पातळ थर केला जातो. थंड झाल्यावर हे मिश्रण घन होते व त्याचे पापडाप्रमाणे पातळ पापुद्रे तयार होतात. यासच पर्पटी असे म्हणतात. रस म्हणजे पारा. केवल पारा व गंधक ही दोनच घटक द्रव्ये असणारी पर्पटी म्हणजेच रसपर्पटी होय.

रसपर्पटी उत्कृष्ट ग्राही औषध आहे. ग्राही म्हणजे स्वत:च्या उष्ण गुणामुळे आंत्रातील द्रवाचे शोषण करणारी द्रव्ये. यामुळेच जेव्हा शौचास पातळ होते, जुलाब होतात अशा सर्व अवस्थेत रसपर्पटीचा उपयोग केला जातो. केवळ रसपर्पटीच नव्हे तर सर्वच पर्पटीकल्प हे ग्राही म्हणून ओळखले जातात. रसपर्पटी ग्राही तर आहेच पण शिवाय ती उत्कृष्ट अग्निवर्धकही आहे व म्हणूनच जाठराग्निमांद्यामुळे उत्पन्न होणाऱ्या सर्वच रोगांवर रसपर्पटीचा चांगला उपयोग होतो.

पर्पटीचे विशेष कार्यक्षेत्र ग्रहणी (Small Intestine) हे आहे. यामुळेच ग्रहणी (संग्रहणी, Sprue किंवा Chronic Colitis) या रोगातील हा एक सर्वोत्तम कल्प समजला जातो. ग्रहणी रोगात, ग्रहणी या अवयवाची दुष्टी असते. त्यामुळेच अन्न ग्रहण करणे, त्याचे पाचन करणे, पचलेल्या अन्नातील सारभागाचे शोषण करणे व मलभाग पुढे ढकलणे या ग्रहणीच्या प्राकृत क्रियांपैकी एखादी नव्हे तर सर्वच क्रिया बिघडतात व अनेकविध रोगलक्षणे उत्पन्न होतात. भूक न लागणे, खाल्लेल्या अन्नाचे सम्यक् पचन न झाल्याने तसेच्या तसे अपाचित अन्न शौचावाटे बाहेर पडणे, शौचास अत्यंत दुर्गंध असणे, वारंवार शौचास जावे लागणे व मल बांधून न येणे यासारखी लक्षणे ग्रहणी रोगात आढळतात. वारंवार तोंड येणे व पोटात दुखणे ही लक्षणेही उत्पन्न होतात. अन्नाचे सम्यक् पचन व सारभागाचे शोषण न झाल्यानेच शरीर पोषणाची क्रिया मंदावते व दौर्बल्य जाणवू लागते. वजनही कमी होते. रसपर्पटी ही ग्रहणी या अवयवावर कार्यकारी. ग्रहणीतील विकृती दूर करणारी असल्यानेच वरील सर्व लक्षणांना युक्त ग्रहणीरोगावरील उत्कृष्ट औषधी कल्प म्हणून ओळखला जाणारा कल्प आहे.

संग्रहणीप्रमाणेच अतिसार (Diarrhea), प्रवाहिका (Dysentery) या सारख्या ज्यामध्ये शौचास पातळ येते अशा सर्वच रोगांमध्ये रसपर्पटी कार्यकारी ठरते.

उदर (Ascitis) हाही एक जाठराग्निमांद्यामुळेच उत्पन्न होणारा रोग आहे. या रोगामध्ये उदराचे अभ्यंतर त्वचेमध्ये (Peritoneal Cavity) जलसंचिती होत असते. याही अवस्थेत रसपर्पटीचा चांगला उपयोग होतो. रसपर्पटी अग्नी वाढविणारी व त्याचबरोबर द्रवाचे शोषण करणारी असल्यानेच या पर्पटीच्या उपयोगाने संचित जल कमी होण्यास सहाय्य होते.

दमा किंवा तमकश्वास (Bronchial Asthama) हा जरी श्वसन मार्गाचा रोग असला तरी त्याचा उद्‌भव आमाशयातूनच होत असतो असे आयुर्वेद मानतो. श्वसनमार्गाचे म्हणजेच प्राणवहस्रोतसाचे नियमनाचे कार्य ज्या अवयवांकडून घडते त्यापैकीच महास्रोतस हा एक अवयव आहे असेही आयुर्वेद मानतो. यासाठीच प्राणवहस्रोतसाचे मूळ म्हणून महास्रोतसाचा उल्लेख केलेला आढळतो. तमकश्वास (दमा) हा याप्रकारे जरी श्वसनमार्गाचा रोग असला तरी त्याची चिकित्सा करताना म्हणूनच महास्रोतसावर कार्यकारी अशा औषधी द्रव्यांद्वारे चिकित्सा होऊ शकते. रसपर्पटीचा म्हणूनच दम्याचे रोग्यांमध्ये उत्तम लाभ आढळून येतो. दम्याचा ॲटॅक आला असताना या रसपर्पटीचा काहीच उपयोग नाही. पण रसपर्पटीच्या नित्य वापराने दम्याचे वारंवार येणारे ॲटॅक मात्र निश्चितच नियंत्रित करता येतात.

**प्रमाण :** १२५ ते २५० मि. ग्रॅम. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप, साखर.

❑ ❑ ❑

## ४२. लोहपर्पटी

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, लोहभस्म.

शुद्ध पारा व शुद्ध गंधक यापासून बनविलेल्या कज्जलीबरोबर लोहभस्म मिसळून पर्पटी पद्धतीने लोहपर्पटी हा कल्प बनविला जातो.

लोहपर्पटीमध्ये रसपर्पटीचे सर्व गुणधर्म आहेतच. पण शिवाय यामध्ये असणाऱ्या लोहभस्मामुळे ग्रहणी (Sprue किंवा Chronic Colitis) या रोगामध्ये उत्पन्न होणाऱ्या पांडू (Anaemia) या उपद्रवासाठी (Complication) या कल्पाचा अधिक वापर केला जातो. ग्रहणीमध्ये जाठराग्निमांद्यामुळे आहाराचे सम्यक् पचन होत नाही व पाचित आहाररसाचे योग्य त्या प्रमाणात शोषणही होत नाही. यामुळे शरीरधातूंच्या



पोषण क्रियेमध्ये अडथळे निर्माण होऊन रक्तादि धातूंचा ऱ्हास होत असतो. याप्रकारे निर्माण होणाऱ्या रक्तक्षयामुळेच पांडू हा रोग उत्पन्न होत असतो. लोहभस्माच्या स्वरूपात दिलेल्या लोहाचे शरीरामध्ये अधिक चांगल्या प्रकारे शोषण होते व त्यामुळेच रक्तवृद्धिसाठी आवश्यक असा हा लोहघटक योग्य प्रकारे व योग्य प्रमाणात मिळाल्याने रक्ताचे पोषणही योग्य प्रकारे होऊ शकते. रक्ताचे प्रमाण वाढल्याने पांडूरोगही लवकर नाहीसा होतो.

लोहभस्म हे कषाय (तुरट) रसाचे असल्याने स्तंभक (Astringent) असते व म्हणूनच पर्पटीच्या, मलातील द्रवांशाचे शोषण करून मलप्रवृत्ती प्राकृत करण्याच्या गुणकर्मास, सहाय्यकारी ठरते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप + साखर

❑ ❑ ❑

## ४३. पंचामृतपर्पटी

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, अभ्रकभस्म, लोहभस्म, ताम्रभस्म.

पारा व गंधक यापासून बनविलेल्या कज्जलीमध्ये लोहभस्म, अभ्रकभस्म व ताम्रभस्म मिसळून पर्पटी पद्धतीने बनविलेल्या कल्पास पंचामृतपर्पटी असे म्हणतात. पाच द्रव्यांनी युक्त अशी अमृतोपम गुणकर्म असणारी पर्पटी ती पंचामृतपर्पटी होय.

पंचामृतपर्पटी हाही इतर पर्पटी कल्पांप्रमाणेच संग्रहणीसाठी अत्यंत उपयुक्त असा कल्प आहे. रसपर्पटीचे सर्व गुणधर्म पंचामृतपर्पटीत आहेतच व त्यामुळेच जेथे रसपर्पटीचा वापर केला जातो त्या सर्व अवस्थांमध्ये पंचामृतपर्पटी वापरता येते. पण याशिवाय पंचामृतपर्पटीतील लोह, अभ्रक व ताम्र यांच्या भस्मांमुळे या कल्पाचे गुणकर्मांमध्ये निश्चितच वाढ होते व म्हणूनच अन्य अनेक अवस्थांमध्ये या पंचामृतगुटीचा यशस्वी वापर केला जातो.

पंचामृतपर्पटीतील एक घटक द्रव्य असणारे लोहभस्म हे पांडू (Anaemia) या रोगावरील एक महत्त्वाचे औषध आहे. पांडूमध्ये रक्तधातू (Haemoglobin) कमी झालेले असते. लोहभस्मामुळे रक्तवृद्धीसाठी आवश्यक असणारा लोहधातू शरीरास मिळत असल्याने रक्तवृद्धी होऊन पांडूता कमी होत असते. पांडूमध्ये केवल रक्तक्षय नसून रक्तक्षयाचे जोडीला सर्वच धातूंमध्ये शैथिल्य उत्पन्न झालेले असते. शरीरधातूंचे ठिकाणी असणारे शैथिल्य दूर करून सर्व धातू प्राकृत स्थितीत

आणण्यासाठी कषाय रसांची लोह, अभ्रक व ताम्र ही भस्मे उपयुक्त ठरतात म्हणूनच लोह पर्पटीपेक्षाही अधिक कार्यकारी असा हा कल्प आहे.

संग्रहणी या रोगात पाचन व शोषणाच्या बिघडलेल्या क्रियांमुळे रक्तधातूचेही पोषण योग्य प्रकारे होऊ न शकल्याने अनेक वेळा पांडू (Anaemia) हा रोग उपद्रवात्मक स्वरूपात (Complication) निर्माण होतो. पंचामृतपर्पटीचा या ग्रहणी उपद्रव पांडू या अवस्थेमध्ये उपयोग करणे अत्यंत संयुक्तिक ठरते.

केवळ पांडुतावस्थेतच नव्हे तर ग्रहणीमुळे येणाऱ्या दौर्बल्याच्या निवारणासाठीही ही पंचामृतपर्पटी लाभदायी ठरते.

**प्रमाण :** १२५ मि. ग्रॅ. ते २५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप + साखर

❑❑❑

## ४४. सुवर्णपर्पटी

घटकद्रव्ये - पारा, गंधक, सुवर्णभस्म.

पारा व गंधक यापासून बनविलेल्या कज्जलाबरोबर सुवर्णभस्म मिसळून पर्पटी पद्धतीने तयार केलेल्या कल्पास सुवर्णपर्पटी असे म्हणतात.

ग्रहणी रोगामध्ये (Sprue किंवा Chronic Colitis) कार्यकारी असणाऱ्या इतर पर्पटी कल्पांप्रमाणेच सुवर्णपर्पटी हाही एक कल्प असल्याने रसपर्पटीचे सर्व गुणधर्म यामध्येही आहेतच.

इतर पर्पटी कल्पांपेक्षा या सुवर्णपर्पटीमध्ये अधिक असणारा घटक म्हणजे सुवर्णभस्म होय. या सुवर्णभस्मामुळेच सुवर्णपर्पटीमध्ये अन्य अनेक उपयुक्त गुणधर्मांची भर पडलेली आहे.

सुवर्णभस्म हे उत्तम बल्य आहे. शरीरधातूंची वाढ योग्य तऱ्हेने करून शरीरावयवांना बल प्राप्त करून देणारी जी द्रव्ये त्यांनाच बल्य असे म्हटले जाते. या बल्य औषधी द्रव्यांमध्ये सुवर्ण हे श्रेष्ठतम आहे. सुवर्णाचे मुख्य कार्य घडते मांस धातूवर. मांसाच्या उत्पत्तीसाठी आवश्यक असणारा शरीरातील जो मांसाग्नी त्याचे प्रदीपन या सुवर्णाने घडते व त्यामुळेच मांसधातूचे उत्तम प्रकारचे पोषण व उत्पत्ती होत असते. शरीरबल मुख्यतः अवलंबून असते ते मांसधातूवरच व म्हणूनच मांसधातूंचे पोषण करणारे सुवर्ण हे उत्कृष्ट बल्य समजले जाते. याचा अर्थ सुवर्ण केवळ मांसवर्धन करते असा मात्र नव्हे. सुवर्णाने सर्वच शरीरधातूंची वाढ होण्यास



सहाय्य होते. मांसधातूवर्धनाचे कार्य सुवर्णाकडून विशेषत्वाने घडते एवढाच याचा अर्थ होय.

ग्रहणीमध्ये शरीरधातूंचे पोषण मंदावल्याने दौर्बल्य हे लक्षण फार मोठ्या प्रमाणात येते. रोग्याचे वजनही कमी होते. अशा वेळी ग्रहणीवर कार्यकारी औषधांचे जोडीला सुवर्णासारखे बल्य औषध वापरणे अगत्याचे ठरते. सुवर्णपर्पटीमुळे भूक सुधारते, खाल्लेल्या अन्नाचे पचन योग्य प्रकारे होते व मलप्रवृत्तीही बांधून येऊ लागते. पण या सर्वाहून महत्त्वाचे म्हणजे रुग्णास जाणवणारा थकवा त्वरेने कमी होतो, वजनही हळूहळू पण निश्चितपणे वाढू लागते व रोगी रोगीअवस्था संपवून पुन्हा आरोग्याकडे वाटचाल करू लागतो.

ग्रहणीमध्ये अगदी प्रथमतःच सुवर्णपर्पटीचा वापर करणे मात्र शक्यतो टाळावे. कारण सुवर्ण हे बल्य असले तरी गुरू म्हणजेच पचण्यास जड आहे. सुरुवातीसच सुवर्णयुक्त औषधांचा वापर केला तर अग्निमांद्य वाढून रोगलक्षणे काही काळ का होईना पण वाढण्याची शक्यता असते व म्हणूनच ग्रहणीमध्ये पर्पटी कल्पांचा वापर करताना प्रथमतः रसपर्पटीने थोडीशी भूक सुधारली, अग्नी वाढला की मगच सुवर्णपर्पटीचा वापर सुरू करावा.

**प्रमाण :** ६० ते १२५ मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** तूप + साखर

❑❑❑

## ४५. रससिंदूर

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, नवसागर.

शुद्ध पारा व गंधकचूर्ण एकत्रित करून दगडी खलामध्ये घोटले असता काळीकुळकुळीत अशी कज्जली तयार होते. या कज्जलीपासून कुपिपक्व पद्धतीने वालुकायंत्राचे सहाय्याने रससिंदूर तयार केला जातो.

रससिंदूराचा रासायनिक फॉर्म्युला HgS असा आहे. रस म्हणजे पारा या पाऱ्यापासून सिंदूराप्रमाणे गडद लाल रंगाचा कल्प बनत असल्यानेच यास रससिंदूर हे नाव प्राप्त झाले आहे.

रससिंदूर हे एक उत्कृष्ट कफनाशक द्रव्य आहे. याचे विशेष कार्यक्षेत्र म्हणजे प्राणवहस्रोतस किंवा श्वसनमार्ग हे होय. त्यातही फुफ्फुस या अवयवावर याचे कार्य अधिक प्रमाणात होते. याचमुळे ज्या ज्या प्रसंगी फुफ्फुसात कफामुळे विकृति

आढळते अशा सर्व रोगांमध्ये या रससिंदूराचा उपयोग करणे योग्य ठरते.

अशा रोगांपैकी महत्त्वाचा रोग म्हणजे श्वसनक ज्वर (Pneumonia) हा होय. फुफ्फुसात कफसंचय झाल्यानेच या रोगात श्वास (Breathlessness), श्वासकृच्छ्ता (Difficulty in Breathing), ज्वर (Fever) ही लक्षणे आढळतात. यावेळी संचित कफाचे शोषण होणे आवश्यक असते. रससिंदूराच्या उष्ण गुणामुळे द्रवाचे, कफाचे शोषण होते. श्वसनमार्ग मोकळा होतो व सर्वच लक्षणेही त्वरेने कमी होण्यास मदत होते.

जलपार्श्व (Plurecy with Effussion) या रोगातही वरील प्रकारचीच लक्षणे आढळतात. पण याचे कारण मात्र वेगळे असते. या रोगात फुफ्फुसाच्या आवरणातील दोन थरामध्ये जलसंचिती होते व श्वासकृच्छ्ता हे लक्षण उत्पन्न होते. याही अवस्थेत संचित जलाचे शोषण करण्यासाठी रससिंदूर हे महत्त्वाचे औषधी द्रव्य ठरते.

रससिंदूर हे उष्ण असून स्रोतोरोध दूर करणारे असल्यानेच याचे उपयोगानंतर घाम येतो व वरील दोन्ही अवस्थेत आढळणारा ज्वर कमी होण्यासही याने मदत होते.

तमकश्वासाचे (Bronchial Asthama) कफभूयिष्ट किंवा कफप्रधान प्रकारातही कफघ्न, उष्ण, स्रोत:शोधी व फुफ्फुसावर कार्यकारी औषधांचाच प्रयोग करावा लागतो. तमकश्वासाचे वेगकालीन अवस्थेमध्ये (During Attack) रससिंदूर वापरल्यास श्वासवेग त्वरेने कमी होतो व रोग्यास थोडावेळ का होईना पण आराम पडतो. यासाठी रससिंदूर उगाळून वारंवार चाटावयास द्यावा लागतो.

वारंवार होणाऱ्या प्रतिश्यायासाठीही हे अत्यंत लाभदायी असे औषध आहे.

रससिंदूर हे स्वत: उत्तम कफघ्न असे द्रव्य आहेच. पण त्याचा आणखीही एक गुण लक्षात ठेवावयास हवा व तो गुण म्हणजे त्याचे योगवाहित्व. पारा व गंधकाचा कल्प असल्यानेच अन्य औषधी द्रव्यांबरोबर अगदी अल्प प्रमाणात जरी वापरला तरी त्या दुसऱ्या द्रव्यांचे गुणकर्म रससंयोगाने अनेकपटीने वाढतात व म्हणूनच रससिंदूराच्या सहाय्याने अनेक रसकल्प तयार केले गेलेले आढळतात.

रससिंदूराचे खडे (मात्रा) असतात. ही मात्रा उगाळून वापरणे अधिक श्रेयस्कर, अधिक गुणकारी असते.

**प्रमाण :**

**मात्रा :** उगाळून ५ ते १० वळसे

**चूर्ण :** २५ मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** आल्याचा रस.

❑❑❑



## ४६. मल्लसिंदूर

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, सोमल, रसकापूर.

पारा व गंधक यापासून बनविलेली कज्जली, सोमल व रसकापूर ($HgCl_2$) हे सर्व एकत्रित घोटून तयार होणाऱ्या मिश्रणापासून कुपिपक्वपद्धतीने, वालुकायंत्राचे सहाय्याने मल्लसिंदूर हा कल्प बनविला जातो.

मल्लसिंदूर हा सोमलाचा एक कल्प आहे. सोमलाचे कल्प उत्कृष्ट वातकफघ्न असतात. शिवाय हा सिंदूर कल्प असल्याने त्याची कफघ्नता अधिकच वाढते.

कफप्रधान तमकश्वासासाठी (Bronchial Asthama) हा एक महत्त्वाचा औषधी कल्प आहे. ज्या दम्याच्या रोग्यामध्ये खोकल्याद्वारे कफ फार पडतो, ज्याची छाती कफाने भरलेली असते तो कफप्रधान तमकश्वास होय. मल्लसिंदूराचे उपयोगाने श्वासवेग त्वरेने कमी होतो. केवळ तमकश्वासासाठीच नव्हे तर जेव्हा जेव्हा कफस्थानामध्ये वातविकृती असते त्यावेळी किंवा कफानुबंधी वातरोगामध्ये या मल्लसिंदूराचा उत्तम लाभ होताना दिसतो. याचमुळे संधिशूल (सांधे दुखणे) या लक्षणावरीलही एक उत्तम औषध म्हणून या कल्पाची गणना केली जाते.

पण या सर्वांपेक्षाही मल्लसिंदूराचे खरे कार्य घडत ते फिरंग (Syphilis) व उपदंश (Gonorrhoea) या रोगांवर. सोमलाचे सर्वच कल्प फिरंग व उपदंशासाठी उपयुक्त ठरतात. या मल्लसिंदूरात सोमलाचे जोडीला असणाऱ्या रसकापरामुळे त्याची या दोन रोगांवरील कार्यशक्ती अधिकच वाढते. ज्यावेळी मेढ्र वा योनिप्रदेशी जखम असते अशा फिरंग वा उपदंशाच्या प्रारंभीच्या अवस्थेमध्ये या मल्लसिंदूराचा फारसा उपयोग होत नाही. पण जुन्या, मुरलेल्या (Chronic) अवस्थेत आढळणारी सर्व लक्षणे कमी व्हावीत व संपूर्ण रोगमुक्ती मिळावी यासाठी मात्र या कल्पाचा निश्चितच उपयोग होतो. फिरंगाच्या अभ्यंतर अवस्थेत तीव्र स्वरूपाचा संधिशूल व संधिशोथ (सांधे दुखणे व सुजणे) ही लक्षणे आढळतात. या अवस्थेत तर मल्लसिंदूर हे एक अप्रतिम असे औषध आहे. उपदंशाचे जीर्णावस्थेत उत्पन्न होणारी मूत्रावरोध वगैरे लक्षणे टाळावयाची असतील तर मल्लसिंदूराचा प्रयोग बरेच दिवस सातत्याने करणे जरूरीचे ठरते.

सोमलाच्या इतर कल्पांप्रमाणेच विषमज्वर (Intermittent Fever) या प्रकारामध्येही मल्लसिंदूराचा चांगला उपयोग होत असतो.

**प्रमाण :** २५ मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

❑❑❑

## ४७. व्याधिहरणरस

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, रसकापूर ($HgCl_2$)

पारा व गंधक यांची कज्जली व रसकापूर यांच्या एकत्रित मिश्रणापासून कुपिपक्व पद्धतीने, वालुकायंत्राचे सहाय्याने व्याधिहरणरस बनविला जातो. इतर सिंदूर कल्पांप्रमाणेच लाल रंगाचा हा कल्प, बाटलीच्या तोंडाशी जमा होतो.

व्याधिहरणरस हा कल्प मुख्यत: वापरला जातो तो फिरंग व उपदंश या व्याधिच्या चिकित्सेमध्ये. या कल्पाच्या घटक द्रव्यामध्ये रसकापूर ($HgCl_2$) हे एक विशिष्ट द्रव्य आहे. पाऱ्याचे अनेक कल्प औषधांमध्ये वापरतात. या सर्व कल्पांमध्ये पाऱ्याचे जोडीला गंधक असते. गंधकाशिवाय पाऱ्याचे जे कल्प बनतात (पारदाची निर्गंध जारणा) त्यांचा वापर औषधीकरणामध्ये फारसा केला जात नाही. यास काही अपवाद आहेत व त्यापैकीच रसकापूर हा एक अपवाद आहे. असे हे रसकापूर नावाचे द्रव्य व्याधिहरण रसातील एक घटक द्रव्य असून ते फिरंग व उपदंशनाशनाकरिता उत्कृष्ट समजले जाणारे द्रव्य आहे. फिरंगाच्या (Syphilis) किंवा उपदंशाच्या (Gonorrhoea) सुरुवातीच्या अवस्थेत, जेव्हा योनिमार्ग वा मेढ्रमणि या ठिकाणी व्रण असतात त्यावेळेस, या कल्पाचा फारसा उपयोग ही लक्षणे कमी होण्यासाठी होत नाही. व्याधिहरणरसाचा उपयोग प्रामुख्याने होतो तो जीर्णावस्थेमध्ये (Chronic Conditions). फिरंगाच्या जीर्णावस्थेत त्वचेवर फोड येणे, सर्व सांधे दुखणे व सुजणे इत्यादी लक्षणे आढळतात तर उपदंशामध्ये मूत्रमार्गामध्ये अवरोध (Stricture) हे लक्षण प्राधान्येकरून आढळते. या सर्व लक्षणांसाठी व्याधिहरणरस हे फार मोलाचे औषध ठरते. याच्या उपयोगाने सांधेदुखी व सूज फार चटकन कमी होते.

फिरंग व उपदंशाचा परिणाम म्हणून अनेक व्यक्तिमध्ये क्लैब्य (Sterility) उत्पन्न होते तर काही स्त्री रुग्णामध्ये वारंवार गर्भपात, गर्भस्राव (Abortion) होणे ही लक्षणे आढळतात. ही लक्षणे कमी होण्यासाठी रोग पूर्ण बरा होणे आवश्यक असते. व्याधिहरण रसाचे उपयोगाने ही संपूर्ण रोगमुक्ति शक्य होते.

रोगाच्या जीर्णावस्थेत या व्याधिहरणरसाचा चांगला उपयोग होतो म्हणजे केवळ जीर्णावस्थेतच हा कल्प वापरावा असा मात्र याचा अर्थ नव्हे. अगदी नवीनच उत्पन्न झालेल्या रुग्णात असणाऱ्या, मेढ्र व योनिमार्गात आढळणाऱ्या जखमा भरून येण्यासाठी याचा उपयोग नसला तरी, यासाठी जी इतर औषधे वापरली जातात त्यांना व्याधिहरणरसाची जोड दिल्यास पुढील सर्व अवस्था टाळता येतात. पुढील अवस्था निर्माण होण्यापूर्वीच रोग नष्ट करता येतो.



यामार्गीच या कल्पाचा उपयोग सर्वच अवस्थेत होतो असे म्हणता येते.

**प्रमाण :** २५ मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध.

## ४८. मकरध्वज, पूर्ण चंद्रोदय

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, सुवर्णभस्म.

प्रथमत: पारा व गंधक यांची कज्जली करून त्यात सुवर्णभस्म चांगले मिसळून तयार झालेल्या मिश्रणापासून कुपिपक्व पद्धतीने व वालुका यंत्राचे सहाय्याने जो सिंदूर कल्प तयार होतो त्यासच मकरध्वज असे म्हणतात. या मकरध्वजासच 'पूर्णचंद्रोदय' असाही पर्यायवाची शब्द अनेकवेळा वापरला जातो.

मकरध्वज हा कल्प शुक्रधातुला बल देण्यामध्ये सर्वश्रेष्ठ अशा स्वरूपाचा कल्प आहे. शुक्रधातूच्या विकृतिमुळे जे विविध प्रकारचे रोग निर्माण होतात त्यासाठी मकरध्वज म्हणूनच वापरला जातो. क्लैब्य किंवा नपुंसकता (Sterility), शुक्राल्पता (Oligopermia) मैथुनशक्ति कमी असणे (Sexual Debility), शुक्रस्राव लवकर होणे इत्यादी अनेक लक्षणांसाठी मकरध्वजाचा लाभदायक प्रयोग केला जातो. मकरध्वजाचा उपयोग केल्याने स्वप्नावस्था (झोपेत नकळत शुक्रस्राव होणे) हा दोषही त्वरेने दूर होतो.

मकरध्वजाचा उपयोग केवळ शुक्रधातुच्या वृद्धिसाठीच होतो असा मात्र याचा अर्थ नव्हे. मकरध्वजाचा उपयोग सर्वच धातूंच्या वाढीसाठी केला जातो. विशेषत: शुक्राप्रमाणेच मांसधातूवरही याचे कार्य घडते. मांस धातूची वाढ व्हावी व झालेली वाढ कायम टिकावी यासाठी मकरध्वजासारखे अन्य औषध नाही. रोगोत्तर कालामध्ये येणारे दौर्बल्य कमी करण्यास यातील सुवर्णभस्म कार्यकारी ठरते. सुवर्णभस्म हे मांसाग्निवर्धक असल्यानेच हे सर्व कर्म घडून येते.

मकरध्वज हाही एक सिंदूर कल्प असल्याने प्राणवहस्रोतसावर, विशेषत: श्वसन मार्गातील फुफ्फुसावर याचा उपयोग होतो. उत्कृष्ट वातकफघ्न असणाऱ्या या सिंदूर कल्पाचा उपयोग म्हणूनच तमकश्वास (Bronchial Asthama), जलपार्श्व (Pleurecy with Effussion) इत्यादी अनेक रोगांत होतो. जलपार्श्वामध्ये फुफ्फुसावरणातील पोकळीमध्ये जलसंचिती होत राहते, ती मकरध्वजाचे प्रयोगाने त्वरेने कमी होते.

राजयक्ष्मा (Pulmonary T.B.) या रोगात श्वसन मार्गाचीच दुष्टी असते. खोकला हे प्रधान लक्षण असते व त्याबरोबर दौर्बल्यही अधिक प्रमाणात असते. या रोगात शरीरातील सर्वच धातूंचा क्षय होत असल्याने केवल दौर्बल्य जाणवते असे नसून भारक्षयही होतो, म्हणजेच वजन कमी होते. ही सर्वच लक्षणे मकरध्वजाने कमी होत असतात. मकरध्वजातील सिंदूरामुळे स्वेदन घडते व त्यामुळेच राजयक्ष्म्यामध्ये असणारा तापही कमी होतो.

**प्रमाण :** २५ मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, दूध.

❑❑❑

## ४९. हेमगर्भ

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, सुवर्णभस्म, ताम्रभस्म.

शुद्ध पारा व शुद्ध गंधक एकत्रित घोटून त्यापासून बनविलेली कज्जली, सुवर्णभस्म आणि ताम्रभस्म एकत्रित करून, त्यांची एका रेशमी कापडामध्ये पोट्टली करून, ही पोट्टली उकळत्या गंधकामध्ये मंदाग्निवर शिजविली जाते. या प्रकारे जो औषधी कल्प तयार होतो तोच हेमगर्भ होय. हेम म्हणजे सोने. ज्यामध्ये सोने आहे, सुवर्ण भस्म आहे असा जो कल्प तो हेमगर्भ होय.

हेमगर्भाची मात्रा हृद्बल्य (हृदयास बल देणारी) आहे. सर्वच पोट्टली कल्प हृद्बल्य समजले जातात पण त्यातही हेमगर्भ पोट्टली उत्कृष्ट कल्प आहे. याचमुळे हेमगर्भ प्रसिद्ध आहे ते अगदी शेवटच्या अवस्थेत, नाडी लागत नाही अशा अवस्थेत देण्याचे औषध म्हणून. हेमगर्भाची मात्रा उगाळून ती चाटवताच किंवा नुसती जीभेवर चोळताच रोग्याची नाडी सुधारते, हृदयातून होणारे रसरक्तादिचे विक्षेपण योग्य तऱ्हेने होऊ लागते. अशा अवस्थेत हेमगर्भाइतका कार्यकारी असा कोणताही दुसरा कल्प आजमितीस तरी खरोखरीच उपलब्ध नाही. हेमगर्भाच्या उपयोगाने मरणोन्मुख झालेल्या रोग्याचे आयुर्मान थोड्या कालाकरिता का होईना, पण निश्चितपणे वाढते.

पण या सर्वाचा अर्थ हेमगर्भ हे केवळ अंतिम अवस्थेत वापरावयाचे औषध आहे, असा मात्र नव्हे. हेमगर्भाचा उपयोग अन्य अनेक रोगांमध्ये, अनेक अवस्थांमध्ये हृदयाला बल देण्यासाठी होत असतो. उत्कृष्ट कफनाशक असणारा हा कल्प राजयक्ष्मा (Pulmonary Tuberculosis), हृद्रोग (C. C. F.), कफजकास



(Bronchitis) वगैरे श्वसन मार्गातील अनेक रोगामध्ये यशस्वीरित्या वापरला जातो.

सुवर्णभस्म हे मांसधातूवर विशेष कार्यकारी द्रव्य आहे. मांस धातूच्या उत्पत्तिस कारणीभूत असणारा शरीरातील अग्निचा अंश (मांसाग्नि) वाढवून त्याद्वारे मांस धातूची उत्पत्ति चांगल्या प्रकारे होण्यास सुवर्णाने मदत होते. शारीरिक दौर्बल्य बरेच अंशी मांसधातूवर अवलंबून असते. याचसाठी कोणत्याही कारणाने आलेले दौर्बल्य, विशेषत: रोगावस्थेनंतर बरेच दिवस टिकून राहणारे दौर्बल्य कमी करण्यासाठी हेमगर्भाचा उत्तम उपयोग होतो. हेमगर्भामध्ये असणाऱ्या ताम्रभस्मामुळे धातुशैथिल्य दूर होऊन शरीरधातूचे ठिकाणी संहनन (Tone) प्राप्त होत असतो. यासाठीच हेमगर्भामध्ये सुवर्णाचे जोडीला ताम्रभस्माची योजना केलेली असते.

हेमगर्भ हे याप्रकारे उत्कृष्ट हृद्बल्य व संहनन वाढविणारे द्रव्य असल्यानेच ज्या रोग्यामध्ये रक्तदाब कमी असण्याची प्रवृत्ति असते (Low Blood Pressure) व त्यामुळे चक्कर येणे, डोके दुखणे, बेचैनी आदी लक्षणे उत्पन्न होत असतात त्यामध्ये हेमगर्भ हे फारच उत्तम प्रकारे कार्यकारी होते.

हेमगर्भाची मात्रा असते. याचे चूर्ण करून ती पावडर वापरण्यापेक्षा उगाळून वापरल्यास याची उपयुक्तता अधिक वाढते. तसेच उगाळून वापरल्यास अगदी कमी प्रमाणात वापरूनही इष्ट तो सर्व लाभ प्राप्त होत असतो. आल्याच्या रसात उगाळून वापरणे अधिक श्रेयस्कर ठरते.

**प्रमाण :** २ ते ४ वळसे (सामान्यत: १/८ ते १/४ गुंज किंवा १५ ते ३० मि. ग्रॅ) दिवसातून ३ वेळा.

आत्ययिक अवस्थेत (During Emergency) हेच प्रमाण प्रत्येक ५ मिनिटांनी जीभेवर चोळण्यासाठी.

**अनुपान :** आल्याचा रस, मध.

❑❑❑

## ५०. समीरपन्नगरस

**घटकद्रव्ये :** पारा, गंधक, सोमल, हरताळ, मनशीळ.

**भावना :** तुळशीचा रस.

प्रथमत: पारा व गंधक यांची कज्जली करून घेऊन त्या कज्जलीबरोबर सोमल, मनशीळ व हरताळ यांचे बारीक चूर्ण एकत्र करून हे सर्व मिश्रण तुळशीचे रसात चांगले एकजीव होईपर्यंत घोटले जाते. नंतर या मिश्रणापासून वालुकायंत्राचे

सहाय्याने कूपिपक्व पद्धतीने जे रसायन बनविले जाते तोच हा समीरपन्नग रस होय. अन्य कूपिपक्व औषधांप्रमाणे बाटलीच्यावर तोंडाशी हा कल्प जमा होत नाही तर बाटलीच्या तळाशीच राहतो व म्हणूनच याला 'तलस्थ समीरपन्नग' असेही संबोधले जाते.

समीरपन्नग हा वातविकारांवरील एक उत्तम औषधी कल्प आहे हे त्याच्या नावावरूनच स्पष्ट होते. समीर म्हणजे वात या वाताचा नाश करणारे औषध ते समीरपन्नग होय. यासाठीच समीरपन्नग ही वाताची मात्रा म्हणून व्यवहारात प्रसिद्ध आहे. समीरपन्नग कोणत्याही प्रकारच्या वातविकारांमध्ये उपयोगी पडते असा मात्र याचा अर्थ नव्हे. समीरपन्नगाचा उपयोग होतो तो केवळ स्रोतोरोधाने वात वाढलेला असताना. धातुक्षयामुळे निर्माण होणाऱ्या वातविकारांसाठी या कल्पाचा फारसा चांगला उपयोग होत नाही.

समीरपन्नगरस अधिक कार्यकारी ठरतो तो कफस्थानामध्ये वातविकृति असताना किंवा वाताचे जोडीला कफाचा अनुबंध असताना. या विशिष्ट कर्मामुळेच समीरपन्नग तमकश्वासावरील एक महत्त्वाचे औषध ठरते. तमक श्वास (Bronchial Asthama -दमा) या रोगामध्ये फुफ्फुसामध्ये विकृति असते. फुफ्फुस हे कफाचे स्थान आहे. शिवाय दम्यामध्ये वात व कफ या दोन्ही दोषांची वृद्धि झालेली असते. फुफ्फुसावर कार्यकारी अशा समीरपन्नगाचा उपयोग केल्याने रोग्यास येणारा खोकला कमी होतो, श्वासवेग कमी पडतो. दम्याचा अ‍ॅटॅक फार त्वरेने नाहीसा होतो. मात्र यासाठी समीरपन्नग आल्याच्या रसात उगाळून तयार होणारे चाटण वारंवार चाटविले गेले पाहिजे.

दम्याप्रमाणेच श्वासमार्गातील अन्य अनेक विकारांसाठीही समीरपन्नग उपयुक्त ठरते. कास (Cough) विशेषत: वातजकास (Bronchitis) यासाठी तर समीरपन्नगरसासारखे अन्य उपयुक्त औषध मिळणार नाही.

सांधे दुखणे हे अनेक रोगात आढळणारे लक्षण समीरपन्नगाने फार चटकन दूर होते. सांधे हेही कफाचे एक महत्त्वाचे स्थान. या कफस्थानांमध्ये वातप्रकोप होऊन निर्माण होणाऱ्या संधिवेदना या लक्षणासाठी समीरपन्नग हे रामबाण औषध ठरते. संधिवात (Simple infective Arthritis), आमवात (Rhaumatic Arthritis), वातरक्त (Rhaumatoide Arthritis or Gout), या क्रोष्टुकशीर्ष (Tubercular Knee Joint), यासारख्या संधिवेदना प्रमुख लक्षण असणाऱ्या रोगांमध्ये म्हणूनच समीरपन्नगाचा यशस्वी वापर केला जातो. विश्वाची (Brachial Neurits), गृध्रसी (Sciatica) यासारख्या रोगात निर्माणारे चमकही समीरपन्नगाचे उपयोगाने नष्ट होते.



समीरपन्नगात हरताळ, मनशिळ ही द्रव्येही आहेत. सोमलाचे सर्वच कल्प हे उत्कृष्ट वातकफघ्न असतात व म्हणूनच या द्रव्यांचा येथे वापर केलेला आहे. सोमलाचे कल्प हे उत्तम ज्वरघ्नही असतात. ज्वरघ्न म्हणजे ताप कमी वा नाहीसा करणारे द्रव्य. विशेषत: थंडी वाजून येणारा, वारंवार चढ-उतार ज्यामध्ये आहे असा व निश्चित काही ठराविक कालावधी नंतर येणारा जो विषमज्वर (Intermittent Fevers) विशेषत: मलेरिया सदृश्य भासणारा तो तापाचा प्रकार त्यावर जी औषधे वापरली जातात त्यापैकीच समीरपन्नग हे एक औषध आहे.

समीरपन्नग तयार करतान काही वेळा त्यामध्ये सुवर्णभस्म मिसळून मग कल्प तयार केला जातो. याप्रकारे तयार होणाऱ्या कल्पास 'सुवर्ण समीरपन्नग' असे म्हणतात. सुवर्णाचे सहकार्य लाभल्याने समीरपन्नगाचे वातनाशनाचे कार्यामध्ये अनेक पटीने अनुकूल वाढ होते. याने रोग्याचे बलही चांगले वाढते. आमवाताच्या रुग्णात कालांतराने हृदयाची बाधा उत्पन्न होण्याची शक्यता असते. आमवातात निर्माण होणारा हा उपद्रव (Complication) उत्पन्न होण्याची शक्यता गृहीत धरूनच सुवर्ण समीरपन्नगाचा उपयोग केल्याने हा गंभीर उपद्रव निश्चयाने टाळता येतो कारण सुवर्ण हे उत्कृष्ट हृद्बल असे औषध आहे.

**प्रमाण :** ३० मि. ग्रॅ. ते ५० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.
तमकश्वासासाठी वारंवार चाटण घेणे.

**अनुपान :** मध, आल्याचा रस.

## ५१. माणिक्यरस

माणिक या रत्नाप्रमाणे दिसणारा लालचुटुक रंगाचा, चकाकणारे स्फटिक असणारा हा कल्प **माणिक्यरस** या नावाने ओळखला जातो. यालाच रसमाणिक्य असेही काही वेळा म्हटले जाते. रंग व रूप साधर्म्यामुळे यास हे नाव प्राप्त झाले आहे, अन्यथा यात **माणिकही नाही** आणि रस म्हणजे पाराही नाही.

माणिक्य रस म्हणजे रासायनिक दृष्ट्या पाहता $As_2 S_2$ आहे. म्हणजेच हा सोमलाचा किंवा आर्सेनिकचा कल्प आहे हे स्पष्ट होते. माणिक्यरस बनविला जातो हरताळापासून. हरताळ ($As_2 S_3$) चूर्ण अभ्रकाच्या पातळ पापुद्र्यात ठेवून त्याचे मंदाग्निवर पाचन केले असता या हरताळामधील गंधकाचा एक भाग निघून जातो व त्यापासून हा माणिक्यरस नावाचा कल्प तयार होतो. $As_2 S_3$ पासून $As_2 S_2$ ची निर्मिती केली जाते. अन्य प्रकारे सांगावयाचे तर प्रयोगशाळेत, औषधीनिर्माण

शाळेत तयार होणारी ही शुद्ध मनशीळ आहे.

सोमलाचा कल्प असल्यानेच उत्कृष्ट वातकफघ्न असा हा कल्प असतो. याचे विशेष कार्यक्षेत्र प्राणवहस्त्रोतस म्हणजे श्वसनमार्ग हे आहे. श्वसनमार्गातील अनेकविध रोगांसाठी या माणिक्यरसाचा उपयोग केला जातो. तमकश्वास (Bronchial Asthama) या रोगात वेगावस्थेत (During Attack) या कल्पाचा उत्तम उपयोग होतो. प्राणवायुच्या मार्गात क्लेदक कफाने आवरण केल्याने प्राणवायुची गती विरोधी होते व त्यामुळेच श्वासोच्छवासास त्रास होऊ लागतो. माणिक्य रसाचे उपयोगाने या संप्राप्तिचा भंग होतो, क्लेदक कफाचे आवरण दूर झाल्याने प्राणाच्या गतीस अनुलोमता येते व त्यामुळेच रोगी लक्षणमुक्त होत असतो. दम्याचा ॲटॅक अगदी त्वरेने कमी होतो.

वातकफजन्यकास (Bronchitis) या अवस्थेतही वातकफनाशक अशा या कल्पाचा चांगला फायदा होतो. खोकल्याची ढास कमी करून रुग्णास आराम मिळवून देण्याचे कार्य माणिक्यरसाकडून घडते.

सोमलाच्या अन्य औषधी कल्पांप्रमाणेच ज्वराच्या जीर्णावस्थेत (Chronic Fevers) आणि विषमज्वरामध्ये (Malerial Type of Fevers) माणिक्यरस हे खरोखरीच उत्कृष्ट औषध आहे.

या सर्वांखेरीज माणिक्यरसाचा उपयोग आणखीही एका रोगासाठी व्यवहारात केला जातो व तो रोग म्हणजे कर्करोग होय. विशेषत: फुफ्फुसाच्या ठिकाणी असणारा कर्करोग संपूर्णपणे जरी बरा होत नसला तरी आटोक्यात राहण्यासाठी तरी या रसमाणिक्याचा निश्चितच उपयोग होतो. या प्रकारच्या कर्करोगांमध्ये इतर रोगनाशक औषधांच्या जोडीला माणिक्यरस वापरणे लाभदायी ठरते इतके तरी किमान निश्चितच म्हणता येईल.

**प्रमाण :** ५० मि. ग्रॅ. ते १०० मि. ग्रॅ. दिवसातून ३ वेळा.

**अनुपान :** मध, च्यवनप्राश.

❑❑❑



**अकारानुक्रमे कल्पांची यादी**


| अनुक्रम | पृ. क्र. | अनुक्रम | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ अकीकपिष्टी | ३९ | २७ मयूरपिच्छामशी | ४७ |
| २ अजास्थिभस्म | ४७ | २८ मल्लसिंदूर | ५६ |
| ३ अभ्रकभस्म | १४ | २९ मंडूरभस्म | २५ |
| ४ कज्जली | ४८ | ३० माणिक्यपिष्टी | ४० |
| ५ कपर्दिकभस्म | ६ | ३१ माणिक्यरस | ६२ |
| ६ कामदुधा | १३ | ३२ मौक्तिकभस्म | ९ |
| ७ कासीसभस्म | २७ | ३३ रसपर्पटी | ५० |
| ८ कांतलोहभस्म | २६ | ३४ रससिंदूर | ५४ |
| ९ कुक्कुटांडत्वक्भस्म | ४५ | ३५ रौप्यभस्म | ३२ |
| १० गोदंतिहरताळपिष्टी | ४३ | ३६ लोकनाथरस | ७ |
| ११ जसदभस्म | २१ | ३७ लोहपर्पटी | ५१ |
| १२ जहरमोहरापिष्टी | ४३ | ३८ लोहभस्म | २३ |
| १३ ताप्यादिलोह | ३१ | ३९ वंगभस्म | १७ |
| १४ ताम्रभस्म | ३४ | ४० वैक्रांतभस्म | ३८ |
| १५ त्रिवंगभस्म | २२ | ४१ व्याधिहरणरस | ५७ |
| १६ तृणकांतपिष्टी | ४२ | ४२ शंखभस्म | ५ |
| १७ दगडीबोरपिष्टी | ४५ | ४३ शौक्तिकभस्म | १० |
| १८ नवायसलोह | ३१ | ४४ शृंगभस्म | १६ |
| १९ नागभस्म | २१ | ४५ समीरपन्नग | ६० |
| २० नीलमपिष्टी | ४१ | ४६ सुवर्णपर्पटी | ५३ |
| २१ पन्नापिष्टी | ४१ | ४७ सुवर्णभस्म | ३५ |
| २२ पंचामृतपर्पटी | ५२ | ४८ सुवर्णमाक्षिकभस्म | २९ |
| २३ पुनर्नवामंडूर | २८ | ४९ सुवर्णराजवंगेश्वर | २० |
| २४ मकरध्वज, पूर्णचंद्रोदय | ५८ | ५० हीरकभस्म | ३७ |
| २५ प्रवाळभस्म | ८ | ५१ हेमगर्भ | ५९ |
| २६ प्रवाळपंचामृत | ११ | | |


❑❑❑

## या पुस्तकातील औषधांची रोगानुसार वर्गवारी

अजीर्ण - कपर्दिकभस्म, लोकनाथ रस, शंखभस्म.
अतिसार - रसपर्पटी, लोकनाथ रस, शंखभस्म.
अर्धांगवात - रौप्यभस्म.
अपस्मार - अकीक पिष्टी.
अम्लपित्त - अकीक पिष्टी, कामदुधा, जहरमोहरा, तृणकांत पिष्टी, प्रवाळ पंचामृत, शंखभस्म, सुवर्णमाक्षिक भस्म.
आध्मान - शंखभस्म.
उदर - पुनर्नवा मंडूर, रसपर्पटी.
उदरपटल क्षोभ - मयूरपिच्छामशी.
उदरशूल - कपर्दिक भस्म, मयूरपिच्छामशी, शंखभस्म.
उपदंश - मल्लसिंदूर, व्याधिहरणरस, सुवर्णराजवंगेश्वर.
उरोवेदना - शृंगभस्म.
उलटी होणे - कपर्दिकभस्म, जहरमोहरा, शंखभस्म.
ओजक्षय - वंगभस्म.
कर्करोग - माणिक्य रस, वैक्रांतभस्म, हीरकभस्म.
कर्णस्राव - कपर्दिकभस्म.
कंडू - वंगभस्म, सुवर्णराज वंगेश्वर.
कान फुटणे - कपर्दिक भस्म
कास - कासीसभस्म, लोकनाथरस, शृंगभस्म.
कुष्ठ - वंगभस्म.
केस गळणे - अजास्थिभस्म, कुक्कुटांडत्वकभस्म.
ग्रहणी - कपर्दिकभस्म, पंचामृतपर्पटी, रसपर्पटी, लोकनाथरस, लोहपर्पटी, शंखभस्म, सुवर्णपर्पटी.
घाम येणे - वंगभस्म.
छर्दि - कपर्दिकभस्म, जहरमोहरा, मयूरपिच्छामशी, शंखभस्म.
जलपार्श्व - अभ्रकभस्म, मकरध्वज, रससिंदूर.
ज्वर - कामदुधा, जहरमोहरा, प्रवाळभस्म, मल्लसिंदूर, मौक्तिकभस्म, शौक्तिकभस्म, समीरपन्नग.



दमा - अभ्रकभस्म, मकरध्वज, मल्लसिंदूर, माणिक्यरस, रसपर्पटी, रससिंदूर, लोकनाथरस, शृंगभस्म, समीरपन्नग.
दंतोद्भवज रोग - अजास्थिभस्म.
दाह - अकीकपिष्टी, कामदुधा, गोदंतिहरताळ, तृणकांतपिष्टी, प्रवाळभस्म, मौक्तिकभस्म, शौक्तिकभस्म.
दौर्बल्य - कासीसभस्म, मकरध्वज, लोहभस्म, सुवर्णभस्म, हीरकभस्म.
नपुंसकता - मकरध्वज, वंगभस्म.
पामा - वंगभस्म.
पांडू - अभ्रकभस्म, कासीसभस्म, कांतलोहभस्म, ताप्यादिलोह, ताम्रभस्म, नवायसलोह, पंचामृतपर्पटी, पुनर्नवामंडूर, मंडूरभस्म, रौप्यभस्म, लोहपर्पटी, लोहभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म.
पिंडिकोद्वेष्टन - रौप्यभस्म.
प्रमेह - जसदभस्म, त्रिवंगभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
प्रमेह पिडका - जसदभस्म, त्रिवंगभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
प्लीहा वृद्धी - कासीसभस्म.
प्रवाहिका - रसपर्पटी, शंखभस्म.
फक्क - अजास्थिभस्म, कुक्कुटांडत्वक्भस्म, गोदंतिहरताळ पिष्टी.
फिरंग - मल्लसिंदूर, व्याधिहरण, सुवर्णराजवंगेश्वर.
भ्रम - रौप्यभस्म.
मधुमेह - जसदभस्म, त्रिवंगभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
माती खाणे - मंडूरभस्म.
मानसरोग - माणिक्यपिष्टी, पन्नापिष्टी, नीलमपिष्टी, रौप्यभस्म सुवर्णभस्म.
मुखपाक - कामदुधा.
मूत्रकृच्छ्र - दगडीबोर, नागभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
मूत्राघात - दगडीबोर, नागभस्म.
मूत्राल्पता - दगडीबोर, पुनर्नवामंडूर, सुवर्णराजवंगेश्वर.
मूत्राश्मरी - दगडीबोर.
रक्तछर्दि - गोदंति हरताळ.
रक्तपित्त - अकीकपिष्टी, गोदंति हरताळ, तृणकांतपिष्टी, प्रवाळभस्म, मौक्तिकभस्म, शौक्तिकभस्म.
रक्तप्रदर - लोहभस्म.

रक्तष्ठीवन - गोदंति हरताळ, मौक्तिकभस्म.
राजयक्ष्मा - अभ्रकभस्म, मकरध्वज, मौक्तिकभस्म, लोकनाथरस, वंगभस्म, वैक्रांतरस, शृंगभस्म, हीरकभस्म.
वातव्याधि - रौप्यभस्म, समीरपन्नगरस, सुवर्णभस्म.
विचर्चिका - वंगभस्म.
विसूचिका - शंखभस्म.
विषमज्वर - मल्लसिंदूर, माणिक्यरस, समीरपन्नग.
वैवर्ण्य - वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
शुक्रक्षय - त्रिवंगभस्म, लोहभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
शोथ - नागभस्म, पुनर्नवामंडूर, लोहभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म.
श्वसनकज्वर - रससिंदूर.
श्वास - अभ्रकभस्म, मकरध्वज, मल्लसिंदूर, माणिक्यरस, रसपर्पटी, रससिंदूर, लोकनाथरस, शृंगभस्म, समीरपन्नगरस, नागभस्म, लोहभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
श्वेतप्रदर - कामदुधा, गोदंति हरताळ, त्रिवंगभस्म, नागभस्म, लोहभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
संधिशूल - कांतलोहभस्म, समीरपन्नग.
स्मृत्याल्पता - सुवर्णभस्म.
स्वेदाधिक्य - त्रिवंगभस्म, वंगभस्म.
हिक्का - मयूरपिच्छामशी.
हृत्शूल - शृंगभस्म.
हृद्रोग - अभ्रकभस्म, नीलमपिष्टी, पुनर्नवामंडूर, पन्नापिष्टी, मकरध्वज, मंडूरभस्म, माणिक्यपिष्टी, मौक्तिकभस्म, सुवर्णभस्म.
Abdominal Colic - मयूरपिच्छामशी, शंखभस्म.
Anaemia - अभ्रकभस्म, कासीसभस्म, कांतलोहभस्म, ताप्यादिलोह, ताम्रभस्म, नवायसलोह, पंचामृतपर्पटी, पुनर्नवामंडूर, मंडूरभस्म, रौप्यभस्म, लोहपर्पटी, पुनर्नवामंडूर, मंडूरभस्म, रौप्यभस्म, लोहपर्पटी, लोहभस्म, सुवर्ण माक्षिकभस्म.
Anginal Pain - शृंगभस्म.
Anckylosis - ताम्रभस्म.
Ascitis - पुनर्नवामंडूर, रसपर्पटी.
Bleeding P. V. - लोहभस्म.



Bronchial Asthama - अभ्रकभस्म, मकरध्वज, मल्लसिंदूर, माणिक्यरस, रसपर्पटी, रससिंदूर, लोकनाथरस, शृंगभस्म, समीरपन्नग.
Bronchitis - लोकनाथरस, शृंगभस्म.
Burning Sensation - अकीकपिष्टी, कामदुधा, गोदंतिहरताळ, तृणकांतपिष्टी, प्रवाळभस्म, मौक्तिक भस्म, शौक्तिक भस्म.
Cancer - माणिक्यरस, वैक्रांतभस्म, हीरकभस्म.
C. C. F. - अभ्रकभस्म, नीलमपिष्टी, पन्नापिष्टी, पुनर्नवामंडूर, मकरध्वज, मंडूरभस्म, माणिक्यपिष्टी, मौक्तिक भस्म, सुवर्णभस्म.
Chronic Colitis - कपर्दिकभस्म, पंचामृतपर्पटी, रसपर्पटी, लोकनाथरस, लोहपर्पटी, शंखभस्म, सुवर्णपर्पटी.
Cirrhosis of Liver - ताम्रभस्म.
Cough - कासीसभस्म, लोकनाथरस, शृंगभस्म.
Diabetes - जसदभस्म, त्रिवंगभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
Diarrhoea - रसपर्पटी, लोकनाथरस, शंखभस्म.
Diphragmatic Irritation - मयूरपिच्छामशी.
Discolouration - वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
Diuretic - नागभस्म, पुनर्नवामंडूर.
Dysentery - रसपर्पटी, शंखभस्म.
Eczima - वंगभस्म.
Enlarged spleen - कासीसभस्म.
Epilepsy - अकीकपिष्टी.
Eye Tonic - अकीकपिष्टी.
Fever - कामदुधा, जहरमोहरा, प्रवाळभस्म, मल्लसिंदूर, मौक्तिकभस्म शौक्तिकभस्म, समीरपन्नग.
Gastritis - शंखभस्म.
Gastro Enteritis - शंखभस्म.
Gonorrhea - मल्लसिंदूर, व्याधिहरणरस, सुवर्णराजवंगेश्वर.
Haematemesis - गोदंतिहरताळ.
Haemoptesis - गोदंतिहरताळ, मौक्तिकभस्म.
Heart Tonic - अभ्रकभस्म, मकरध्वज, सुवर्णभस्म.
Hemiplegia - रौप्यभस्म.

Hiccough - मयूरपिच्छामशी.
Hyperacidity - कामदुधा, प्रवाळपंचामृत, शंखभस्म.
Icching - वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
Ichimic Heart - शृंगभस्म.
Jaundice - ताम्रभस्म.
Joint Pains - कांतलोहभस्म.
Leucorrhoea - कामदुधा, गोदंतिहरताळ, त्रिवंगभस्म, नागभस्म, लोहभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर.
Liver Disorder - ताम्रभस्म.
Low Blood Pressure - अभ्रकभस्म, हेमगर्भ.
Nephritis - पुनर्नवामंडूर.
Oedema - नागभस्म, पुनर्नवामंडूर, लोहभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म.
Oligospermia - मकरध्वज, त्रिवंगभस्म, वंगभस्म, सुवर्णराजवंगेश्वर
Pain in chest - शृंगभस्म.
Peptic Ulcer - कामदुधा, तृणकांतपिष्ठी, प्रवाळपंचामृत, सुवर्णमाक्षिक भस्म.
Pleurecy with Effussion - अभ्रकभस्म, मकरध्वज, रससिंदूर.
Pneumonia - रससिंदूर.
Polio - सुवर्णभस्म.
Rickets - अजास्थिभस्म, कुक्कुटांडत्वक्भस्म, गोदंतिहरताळ.
Scabis - वंगभस्म.
Sexual Debility - मकरध्वज, लोहभस्म, वंगभस्म.
Sprue - कपर्दिकभस्म, शंखभस्म, रसपर्पटी, पंचामृतपर्पटी.
Sterility - मकरध्वज, वंगभस्म.
Stomatitis - कामदुधा.
Syphilis - मल्लसिंदूर, व्याधिहरण, सुवर्णराजवंगेश्वर.
Tuberculosis - अभ्रकभस्म, मकरध्वज, मौक्तिकभस्म, लोकनाथरस, वंगभस्म, वैक्रांतभस्म, शृंगभस्म, हीरकभस्म.
Tympanitis - कपर्दिकभस्म, शंखभस्म.
Vertigo - रौप्यभस्म.
Vomitting - कपर्दिकभस्म, शंखभस्म.